टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी

सादर करण्यात आलेला

प्रबंध

" सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास :

एक चिकित्सक अभ्यास"

संशोधक

अमिता नवनाथ नागणे

मार्गदर्शक

डॉ. सोपान रा. शेंडे

नोव्हेंबर - २०१४

संशोधकाचे प्रमाणपत्र

मी **अमिता नवनाथ नागणे** असे घोषित करते की, **" सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहासः एक चिकित्सक अभ्यास"** या विषयावरील हा प्रबंध तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत **' इतिहास '** विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी सादर करीत आहे.

सदर प्रबंध यापूर्वी या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

संशोधक

(अमिता नवनाथ नागणे)

ठिकाण : सोलापूर

दिनांक :

मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत ' इतिहास ' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी **अमिता नवनाथ नागणे** यांनी **"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहासः एक चिकित्सक अभ्यास "** या विषयावरील हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

सदर प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. यापूर्वी हा प्रबंध या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

मार्गदर्शक

डॉ. सोपान रा. शेंडे

ठिकाण : पुणे

दिनांक :

ऋणनिर्देश

इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी **"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहासः एक चिकित्सक अभ्यास"** या विषयावरील माझ्या संशोधन कार्यात माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. शेंडे एस. आर. यांचे बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन लाभले त्यांच्याविषयी ऋणनिर्देश व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते. त्यांचे केवळ आभार मानणे हा या मागे हेतू नसून त्यांच्या ऋणात मी राहू इच्छिते.

माझ्या संशोधन विषयाच्या अनुषंगाने मी सोलापूर, पुणे, अहमदनगर आणि मुंबई येथील ग्रंथालयांना व पुराभिलेखागारास भेटी दिल्या. तेथील ग्रंथपाल, पुराभिलेखागारातील संचालक व सेवक वर्ग, ग्रंथालय भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, पुणे व मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, तसेच सोलापूर शहरातील हिराचंद नेमचंद वाचनालयातील ग्रंथपाल दत्ताञय मोरे आणि सौ. माधुरी करंटे व त्यांचे सहकारी, दयानंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल सुहास भोजगे, वालचंद महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. वंदना गवळी आणि छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे ग्रंथपाल नागनाथ नवगिरे, या सर्वांच्या सहकार्यामुळेच माझे संशोधनाचे कार्य सहज व सुलभ झाले.

सोलापूर शहरातील विविध देवस्थान समितीचे प्रमुख, मंदिरांचे पुजारी, विविध मठांतील मठाधिपती, मशिदिंचे इमाम, यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचेही आभार मानते.

संशोधन करताना मला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अशा अडचणीतही ज्यांनी माझ्या मनात सकारात्मक विचार रुजवून सतत सहकार्य व प्रोत्साहन दिले ते माझे पती प्रा. डॉ. सोपान जावळे, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय सोलापूर यांच्या ऋणात राहणे मी पसंत करेन.

मुख्यत्त्वेकरून डॉ. श्रध्दा कुंभोजकर, डॉ. कारेकर सर, डॉ. वाते , डॉ. संध्या पंडीत आणि सौ. मंगल शेंडे यांचेही मला प्रोत्साहन व सहकार्य लाभले त्यांचेही मी आभार मानते. सोलापूर येथील छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश पवार, प्राचार्य. डॉ. बी. व्ही. चौधरी, डॉ. मोहन चौगुले, प्रा. मधुकर पवार, प्रा. विमल माने, प्रा. अरुण सोनकांबळे, डॉ. लता अकलूजकर, डॉ. विलास निंबाळकर, डॉ. चंद्रकांत चव्हान, प्रा. भारत जाधव, प्रा. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. मारूतीराव सावंत, प्रा. मारूतीराव मस्के, डॉ. रवी जाधव, डॉ. नभा काकडे, डॉ. संजय गायकवाड, प्रा. प्रभाकर

कोळेकर, प्रा. बळीराम जाधव, प्रा. शशिकांत साळुखे, श्री. सुकुमार मोहळे, ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज व जुने विठ्ठल मंदिराचे पुजारी किरण जोशी यांनी दिलेल्या सहकार्य व प्रोत्साहनाबद्दल त्यांचेही आभार मानते.

मी ज्या महाविद्यालयात इतिहास विषयाच्या अध्यापनाचे कार्य करीत आहे त्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे व सचिव प्रा. डॉ. अनिल बारबोले यांची प्रेरणा व आशिर्वादामुळे माझ्या संशोधनाला गती प्राप्त झाली, त्यांचेही आभार मानते.

माझ्या संशोधन कार्यात माझी मुले पूनम, प्रतिक्षा व निरंजन यांची मला मोलाची साथ मिळाली. माझे शिक्षण पूर्ण करून मला संशोधनासाठी सतत प्रोत्साहित करणारे माझे वडील नवनाथ नागणे व आई हौसाबाई यांच्या ऋणात राहणेच पसंत करते. माझे बंधू शांतीनाथ व अंबरनाथ नागणे आणि माझे शजारी श्री. व सौ. कामत यांनी मला वेळोवेळी सहकार्य दिले.

या प्रबंधांचे सुबक, सुयोग्य असे संगणकीकृत काम परिश्रमपूर्वक केल्याबद्दल श्री. तानाजी शिवाजी वाघ व श्री. मुकूंद शंकर फाळके, प्रथमेश कॉम्प्युटर टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटर, तसेच छायाचित्रकार जयजित पटवा सोलापूर यांचेही आभार मानते. या प्रबंध लेखनासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या सर्वांचे आभार मानते.

संशोधक

नागणे अमिता नवनाथ

अनुक्रमणिका

अ. क्र	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र
१	सोलापूर शहराचा इतिहास	१ ते ३६
२	धर्म व पंथ	३७ ते ८९
३	सोलापूर शहरातील धार्मिक स्थळे	९० ते २५१
४	धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव	२५२ ते २९५
५	उपसंहार	२९६ ते ३०५
६	संदर्भ सूची	३०६ ते ३२२
७	परिशिष्टे	३२३ ते ३४६

संक्षिप्त रूपे

१.	**A. R. S. M.**	-	Administrative Report of Solapur Municipality
२.	**B. A.**	-	Bombay Archives
३.	**G. D.**	-	General Department
४.	**P. W. D.**	-	Public Work Department
५.	**R. D.**	-	Revenue Department
६.	**ह. भ. प.**	-	हरि भक्त परायण

तक्त्यांची यादी

अ. क्र	तक्त्यांचे शीर्षक	पृष्ठ क्र
१)	सोलापूर शहराचे तपमान (१८९६-१९११)	४
२)	सोलापूर शहरातील पेठवार लोकसंख्या (१८६९)	१४
३)	सोलापूर शहराची लोकसंख्या (इ. स. १८५१-१९५१)	१४
४)	सोलापूर शहराची धर्मनिहाय लोकसंख्या (२०११)	१६

छायाचित्रांची यादी

अ. क्र	छायाचित्रांचे शीर्षक	पृष्ठ क्र
१.	श्री सिध्देश्वर तलाव व मंदिर	१७
२.	सोलापूर शहरातील भुईकोट किल्ल्याचे क्र. २ चे प्रवेशद्वार	२०
३.	किल्ल्यातील बत्तीसखांबी मशिदीचे खांब	२२
४.	भुईकोट किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिराचे अवशेष	२२
५.	इंद्रभुवन (सोलापूर महानगरपालिका इमारत)	२५
६.	डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक	२७
७.	भुईकोट किल्ल्यातील भग्न अवस्थेतील मल्लिकार्जून मंदिर	९४
८.	बाळीवेशीतील मल्लिकार्जून मंदिर	९६
९.	शंभर वर्षापूर्वीचे श्री सिध्देश्वर मंदिर	१००
१०.	काळभैरवनाथ मंदिर	१४६
११.	वेताळ देवस्थान	१५४
१२.	श्री रूपाभवानी मंदिर	१५७
१३.	श्री रूपाभवानी मंदिरासमोरील दिपमाळेवरती अर्पण केलेल्या वस्तू	१६०
१४.	हिंगुलांबिका देवी मूर्ती	१६१
१५.	भुईकोंट किल्ल्यातील महांकाळेश्वर बुरूजाखालील महांकाळेश्वर मंदिर	१७६
१६.	मरिआई देवी मंदिर तुळजापूर वेस	१८१
१७.	खोकलाई देवी मंदिर	१८५
१८.	शुभराय महाराज मठातील विठ्ठल मूर्ती	१९२
१९.	प्रभाकर महाराज समाधीस्थळ व मठ	१९४
२०.	किल्ल्यातील बत्तीसखांबी मशिद	२०४
२१.	गायखाटीक (कुरेशी) मशिद	२०९
२२.	आदिनाथ व श्री रत्नत्रय दिगंबर जैन मंदिर (जोडमंदिर)	२२१
२३.	शांतिनाथ जैन श्वेतांबर मंदिर (जुनी मिल परिसर)	२२५
२४.	पहिली ख्रिस्तमंडळी चर्च	२३०

नकाशा क्र. १


सोलापूर नगरपालिका हद्दवाढ दर्शक नकाशा



(संदर्भ - सोलापूर नगरपालिका शतसांवत्सरिक ग्रंथ, (संपा.), कुलकर्णी ग. प., पृ. ५२.)

नकाशा क्र. २

सोलापूर शहरातील धार्मिक स्थळे दर्शविणारा नकाशा



(सौजन्य : पूनम सोपान जावळे, सोलापूर.)

प्रास्ताविक

प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक संस्कृतीच्या जडण-घडणीमध्ये धर्माचा महत्त्वाचा वाटा होता. म्हणूनच धर्म म्हणजे संस्कृती असे समिकरण सर्वत्र पाहावयास मिळते. धर्मामुळे मानवी जीवनात उदात्त स्वरूपाचा साक्षात्कार होतो. परंतु या धर्माचे स्वरूप इतिहास काळात वेळोवेळी बदलत गेले. यादवकालीन धार्मिक जीवन परमेश्वराच्या सगूण उपासनेने भरलेले होते. विठ्ठल-रूक्मिणी, तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई आणि खंडोबा इत्यादि दैवतांची उपासना यादव काळात मोठ्या प्रमाणावर होत होती. परंतु महानुभव वाङ्मयामध्ये गणपती, नरसिंह, नागनाथ, वैजनाथ, मैराळ, राम, गोपाळ, नारायण, महालक्ष्मी, भैरव इत्यादी अनेक देवतांच्या मंदिराचा उल्लेख आढळतो. जाखाई, जोखाई, मरिआई, सटवाई, भैरोबा, म्हसोबा इत्यादी ग्रामदेवता ही काही जमातीमध्ये आदरणीय होत्या. अशा विविध धार्मिक स्थळांची पार्श्वभूमी पाहिली असता, महाराष्ट्राला धार्मिक स्थळांची फार मोठी देणगी मिळालेली दिसून येते. म्हणून धार्मिक स्थळे ही मानवी जीवनाचे अंग मानल्याने हा घटक समाजावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम करताना दिसून येतो.

सुरूवातीला इतिहास लेखनासाठी ग्रीकांनी प्रामुख्याने राजकीय घटना, लढाया, युध्दे हे विषय निवडले असले तरी काळाच्या ओघात इतिहास लेखनात फार मोठ्या प्रमाणावर बदल होत गेला. अठरावे शतक हा बुध्दीवाद्यांचा काळ ठरला तर एकोणिसाव्या शतकात इतिहासाच्या विषयात मूलगामी बदल घडून आले. त्या काळात मानवी जीवनाचा अधिकाधिक व्यापक दृष्टीने विचार होऊ लागला. माणूस हा एकाकी प्राणी नसून तो समाजाचा अविभाज्य घटक आहे, त्याच्या जडणघडणीत समाजाचा वाटा आहे.

विसाव्या शतकातील इतिहास लेखनातील एक महत्त्वाचा इतिहास प्रकार म्हणजे प्रादेशिक इतिहास होय. एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या अध्ययनामागील मुख्य हेतू, त्या प्रदेशाची सखोल व सर्वांगिण माहिती करून घेणे हा असतो. प्रादेशिक इतिहासाचाच एक भाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. भारताचा इतिहास हा प्रादेशिक इतिहास तर चेन्नई, बेंगलोर अशा शहरांचे इतिहास स्थानिक इतिहासात समाविष्ठ होतात. स्थानिक इतिहासामध्ये सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक इतिहास इत्यादी बाबींचा समावेश होतो.

धार्मिक इतिहासात ज्या युगात जी धर्मभावना प्रबळ असते तिचा विचार केलेला असतो. प्रो. रेनियर म्हणतात, 'Ecclesiastical History is not the same subject as history of religion. It belongs to political more than to social history. The story of the Church of Rome cannot be separated from diplomatic history, not needed from military history'. धार्मिक जीवनाचा अभ्यास करीत असताना मानवाची जी विविध अंगे महत्त्वाची मानली आहेत त्यापैकी धार्मिक स्थळे हे एक महत्त्वाचे अंग आहे. धार्मिक स्थळांची पार्श्वभूमी, महत्त्व, ठिकाणे, यात्रा, उत्सव आणि पर्यटनाच्या निमित्ताने होणारी आर्थिक उलाढाल व आचार विचारांचे अभिसरण इत्यादि घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. हे सर्व घटक समाजाच्या विविध अंगावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कसे परिणाम करतात हे जाणून घेण्यासाठी "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास: एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला होता.

भारत भूमी ही विविध धर्मांची जन्मभूमी असून येथे अनेक धर्म, पंथ व उपपंथ निर्माण झाले. मध्ययुगीन काळात भक्तीची लाट संपूर्ण देशभर निर्माण झाली होती त्यातून महाराष्ट्रात अनेक भक्तीसंप्रदाय उदयाला आले. वारकरी, दत्त, नाथ, वीरशैव (लिंगायत) आणि सुफी इत्यादी संप्रदाय व भक्तीपंथांचा त्यात समावेश होतो. सोलापूर शहरात हिंदु, जैन, बौध्द, लिंगायत, मुस्लिम, ख्रिश्चन अशा विविध धर्म व पंथाचे लोक राहतात. अशा धर्माचा वा पंथाचा प्रभाव सोलापूर शहरावर पडलेला दिसून येतो.

तेराव्या शतकात भारतात सुफींचे आगमन झाले, त्यांनी भारताच्या विविध भागात आपल्या पंथाचा प्रसार व प्रचार करून लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला, असे अनेक सुफी संत सोलापूर शहर व जिल्ह्यातही कार्यरत होते. त्यांनी याच भूमीत आपला देह ठेवला, त्यामुळे सोलापूर शहर व परिसरात अनेक सुफी संतांचे दर्गे पाहावयास मिळतात. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी आणि मिशन्स् सोलापूरात आले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी सोलापूर शहर व परिसरात विविध चर्चेसची निर्मिती केली.

अशा विविध धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने दरवर्षी विविध देव-देवतांच्या यात्रा, उरूस व उत्सवाच्या निमित्ताने कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील अनेक भाविक सोलापूर शहरात येतात त्यामुळे येथे विविध संस्कृतींचा संगम पहावयास मिळतो.

विषयाची निवड

सोलापूर शहरातील विविध जाती-धर्मांच्या लोकांनी आपापला धर्म व संस्कृती टिकवून ठेवली आहे. त्या अनुषंगानेच शहरात विविध धर्मीयांची धार्मिक स्थळे (देवालये) निर्माण झाली. परंतू धार्मिक परिस्थितीबद्दल अथवा धर्मस्थळाबद्दल माहिती देणारे परिपूर्ण असे लिखाण झाले नाही. शहरात असणाऱ्या ऐतिहासिक वास्तू, देवालये, मशिदी, दर्गे, गुरूद्वार, चर्च, अग्यारी, बौध्द विहार यांचा शोध घेण्यासाठी "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास: एक चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडण्यात आला. या धार्मिक स्थळाद्वारे संस्कृतीची देवाण-घेवाण, आचार-विचार, बोलीभाषा कशा प्रकारे साधली गेली आहे हे या संशोधनाद्वारे स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून मांडले आहे.

साहित्याचे पुनर्विलोकन

सोलापूर शहराच्या विविध विषयांवर अनेक विचारवंतांनी लिखाण केले आहे. परंतु धार्मिक स्थळांच्या अंगाने परिपूर्ण असे लिखाण कोणीही केलेले नाही. त्यामुळे "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास - एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला.

विठ्ठल नरसप्पा जक्कल यांनी सन १९२९ मध्ये 'सोलापूर शहराचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला यामध्ये वेशी, पेठा, शहराचा राजकीय इतिहास, दुष्काळ, काही धार्मिक ठिकाणे, शहराचा व्यापार इत्यादी घटकांच्यावर त्यांनी प्रकाश टाकला. गणेश पंढरीनाथ कुलकर्णी यांनी सोलापूर नगरपालिकेची माहिती देणारा 'शतसंवत्सरिक ग्रंथ' १९५३ मध्ये प्रसिध्द केला. नगरपालिकेचा कारभार, लोकसंख्या, आरोग्य, पाणी पुरवठा, निवडणुका, शहराचा विस्तार इत्यादी बाबतची माहिती त्यांनी या ग्रंथात दिली आहे.

कवि राघवांक यांचे 'श्री सिध्दरामेश्वर पुराण' प्रसिद्ध असून डॉ. जयदेवीताई लिगाडे, शशिकला मडकी, राजशेखर मडकी, चंद्रशेखर कपाळे इत्यादी लेखकांनीही श्री सिध्देश्वरांच्या विषयी माहिती देणारे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. परंतु त्यांच्या ग्रंथातून धार्मिक स्थळांविषयी माहिती मिळत नाही. भगवंत अघोर यांच्या 'पुण्यात्मा पांडुरंग' या ग्रंथात शहरातील जुन्या विठ्ठल मंदिराची त्रोटक स्वरूपाची माहिती उपलब्ध आहे.

बामणगांवकर ना. रा. यांच्या 'पुण्यश्लोक वारद' या ग्रंथातून आप्पासाहेब वारदांचे चरित्र व त्यांचा धार्मिक दृष्टीकोन पाहावयास मिळतो. आशण्णा ईराबत्ती यांनी लिहिलेल्या 'माझ्या आयुष्यातील टिपणे व प्रवास वर्णने' या ग्रंथात पद्मशाली समाजाची व मार्कंडेय मंदिराबद्दलची माहिती आहे. व्ही. जी. अंदूरकर, निलकंठ पुंडे, शं. भा. येवले, डॉ. श्रीकांत येळेगांवकर, गोपाळराव देशमुख यांनी सोलापूर शहर व जिल्ह्यातील राजकीय व स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाचा आढावा घेतला असून त्यांच्या ग्रथात धार्मिक स्थळांविषयी माहिती मिळत नाही.

डॉ. रणनवरे डी. डी. यांनी 'History of Solapur' (१८५२-१९५२) या ग्रंथामध्ये सोलापूर नगरपालिकेचे प्रशासन, उत्पन्न व खर्च, आरोग्य, शिक्षण, सामाजिक चळवळी, उद्योगधंदे व कामगार चळवळी इत्यादी विषयांवर लिखाण केले आहे. डॉ. लता अकलुजकर यांनी 'किल्ले सोलापूर' नावाचा ग्रंथ लिहून सोलापूरच्या भूईकोट किल्ल्याचा इतिहास मांडला आहे तर डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी 'सोलापूरची गिरणी कामगार चळवळ' या विषयावर कामगार आणि शहरातील उद्योगावर माहिती दिली आहे. डॉ. सोपान जावळे यांनी प्रकाशित केलेला 'सोलापूर शहर व परिसराचा इतिहास' आणि 'सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकाचा टिकात्मक अभ्यास' (१२०६-१८१८) या विषयावर स्वराली कुलकर्णी यांनी संशोधन केले परंतू या ग्रंथातून सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांची माहिती फारच त्रोटक स्वरूपात पहावयास मिळते.

संशोधनाची व्याप्ती व महत्त्व

सदरचे संशोधन हे सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांशी संबंधित असले तरी संशोधनातून काढलेले निष्कर्ष हे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक अभिसरणच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहेत. हे संशोधन सोलापूर शहरापूरते मर्यादित असले तरी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर देखिल ते महत्त्वाचे ठरणार आहे. धार्मिक स्थळांचा अभ्यास करताना या ठिकाणी असणाऱ्या विविध धर्म व पंथांचा विकास कसा झाला आणि त्या अनुषंगाने सण, यात्रा व उत्सवातून आर्थिक उलाढाल कशप्रकारे होते हे दर्शविले आहे. सोलापूर शहरात असणारी धार्मिक विविधता आणि त्यातून साधले जाणारे सांस्कृतिक व राष्ट्रीय ऐक्य याचा आदर्श इतर शहरातील लोकांनी घ्यावा, हा उद्देश या संशोधनाचा असल्याने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधनाची साधने

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या अधारे केलेली असून ही साधने मुंबई व पुणे पुराभिलेखागार, गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय दादर मुंबई, बॉम्बे ॲसेयाटिक सोसायटी ग्रंथालय मुंबई, मुंबई, पुणे आणि सोलापूर विद्यापीठ ग्रंथालय तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, येथील ग्रंथालय, सोलापूर जिल्हा धर्मादाय आयुक्त कार्यालयातील कागदपत्रे, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर इत्यादि ठिकाणी असलेली कागदपत्रे, वृत्तपत्रे, नियतकालिके, गॅझिटियर्स, विविध धार्मिक ग्रंथ, विविध कोश वाड.मय आणि अप्रकाशित प्रबंध इत्यादी साधनांचा उपयोग सदरच्या संशोधनासाठी करण्यात आला आहे. सोलापूर शहरातील विविध मंदिरे, मठ, दर्गे, मशिदी, चर्च इत्यादी धार्मिक संस्थांकडील कागदपत्रे, केलेले प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि तेथील पुजारी व मंदिर समिती प्रमुखांच्या मुलाखतीचाही उपयोग प्रबंधाची मांडणी करण्यासाठी केला आहे. विषयाचे आकलन होण्यासाठी प्रबंधामध्ये नकाशे, तक्ते, व फोटो यांचाही वापर केलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांची सखोल माहिती समाज आणि वाचक यांच्यापुढे यावी हा प्रस्तुत प्रबंधाचा उद्‌देश आहे. प्रबंधाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

(१) सोलापूर शहरातील महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करणे.

(२) सोलापूर शहरात असणाऱ्या विविध धर्म व पंथांचा, सण, यात्रा व उत्सव इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

(३) शहरातील विविध धर्मियांच्या धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.

(४) धार्मिक स्थळांचा महाराष्ट्र व कर्नाटकातील लोकांवर पडलेला प्रभाव आणि विविध संस्कृतींचा झालेला संगम अभ्यासणे.

(५) धार्मिक स्थळांमुळे घडून आलेले सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व आर्थिक अभिसरण इत्यादींचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके

ऐतिहासिक पध्दतीने धार्मिक स्थळांचा अभ्यास करून अनेक प्रश्नांची उत्तरे या संशोधनातून मांडली आहेत. शहरात असणारे विविध धर्म, पंथ त्यातून निर्माण झालेले सांस्कृतिक ऐक्य, मराठी - कानडी - तेलगु आणि इस्लामी या संस्कृत्यांची देवाण-घेवाण शहरात कशा प्रकारे होत आहे. धार्मिक स्थळांचा महाराष्ट्र व कर्नाटकातील लोकांवर तसेच सोलापूर शहराच्या सर्वांगिण घटकांवर कसा प्रभाव पडला. धार्मिक स्थळांमधील देव-देवतांची उपासना पद्धती, यात्रा व उत्सव, मंदिराचे व्यवस्थापन कशा प्रकारे चालते. धार्मिक स्थळे आणि धर्म संस्थांचे विविध घटक कोणते, पारंपारिक व प्रस्थापित देव-देवतांचे वेगळेपण कसे, असे अनेक प्रश्न हा विषय निवडल्यानंतर मनामध्ये उभे राहिले होते. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे या संशोधनामूळे मिळाली आहेत. या संशोधनामूळे धार्मिक स्थळांशी निगडीत असणाऱ्या अनेक घटना उजेडात आल्या. अशा विविध घटकांची मांडणी वस्तुनिष्ठ पध्दतीने करण्यात आली आहे.

संशोधन पध्दती

या संशोधनात ऐतिहासिक व सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला असून प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने, अप्रकाशित साधने, अभिलेखागारातील उपलब्ध मूळ कागदपत्रे व संदर्भ ग्रंथ तसेच वृत्तपत्रे, स्मरणिका, साप्ताहिके, मासिके, नकाशे, फोटो याचबरोबर सरकारी कागदपत्रे व विविध धार्मिक स्थळांची व संस्थांची कागदपत्रे इत्यादी साधनांचा वापर या संशोधन लेखनासाठी केलेला असून धार्मिक स्थळांतील लोकांचा सहभाग समजून घेण्यासाठी शहरातील विविध देवस्थान समितीचे प्रमुख, मंदिराचे पुजारी, विविध मठांतील मठाधिपती इत्यादिंच्या मुलाखतीद्वारे माहिती गोळा केलेली आहे.

प्रबंधाचा आराखडा

प्रस्तुतचा प्रबंध हा पाच प्रकरणांमध्ये विभागलेला असून प्रकरण एकमध्ये सोलापूर शहराच्या भौगोलिक परिस्थितीचे वर्णन करुन शहराच्या इतिहासाची मांडणी क रण्यात आली आहे. प्रकरण दोनमध्ये विविध धर्म व पंथाचा आढावा घेवून शहरातील धार्मिक जीवन, चालीरिती व रुढी परंपरा, संत-महंत या प्रमूख मुद्यांचे विवेचन केले आहे. तिस-या प्रकरणात सोलापूर शहरातील विविध धार्मिक स्थळांचा अभ्यास केला आहे. त्यात प्रामुख्याने धार्मिक स्थळांच्या बांधकामाची रचना, त्या

ठिकाणी होणारी नित्यनैमित्तिक पुजा-अर्चा, उपासक व उपासना पध्दती आणि वार्षिक सण, उत्सव व यात्रा तसेच धार्मिक स्थळांचे व्यवस्थापन, पुजाऱ्यांना मिळालेली वतने, इनामे त्यांचे स्वरूप, धार्मिक स्थळांना दिलेल्या देणग्या व त्यांचे स्वरूप इत्यादी बाबींचे विवेचन केले आहे. चौथे प्रकरण धार्मिक स्थळांचा लोकजीवनावरील प्रभाव हे असून या प्रकरणामध्ये धार्मिक स्थळे ही मानवाच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक जीवनात कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावतात व अभिसरण घडवून आणतात, याचा आढावा घेतला आहे. पाचवे प्रकरण हे निष्कर्षाचे असून धर्म व धार्मिक स्थळांचा अभ्यास करीत असताना ज्या बाबी निदर्शनास आल्या त्याचे सिंहावलोकन करून निष्कर्ष रूपाने मांडलेल्या आहेत. त्यामध्ये मानवी जीवनातील धर्म व धार्मिक स्थळांचे महत्त्व व प्रभाव आचरणाचे नियम देव-देवता, सण-उत्सव, सांस्कृतिक संगम इत्यादीबाबतच्या निरीक्षणांचा समावेश होतो. धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने जाणवलेल्या काही उणीवा सुचनांद्वारे येथे मांडल्या आहेत.

प्रकरण पहिले

सोलापूर शहराचा इतिहास

अ. क्र	घटक
१.१	**सोलापूर शहराचे भौगोलिक स्थान**
१.२	**तेलगू-मराठी-कन्नड भाषांचा अनुबंध**
	१.२.१ भाषा
	१.२.२ सोलापूर ग्रामनाम
१.३	**सोलापूर शहराची रचना**
	१.३.१ जूने सोलापूर शहर
	१.३.२ वेशी
	१.३.३ पेठा व त्यामधील धार्मिक स्थळे
	१.३.४ सोलापूर नगरपालिकेची स्थापना व शहराचा विस्तार
१.४	**सामाजिक पार्श्वभूमी**
१.५	**लोकसंख्या**
१.६	**सोलापूर शहरातील महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे**
	१.६.१ सिध्देश्वर तलाव
	१.६.२ भूईकोट किल्ला
	१.६.३ कंबर तलाव
	१.६.४ इंद्रभुवन
	१.६.५ डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक
	१.६.६ देशमुख वाडा
	१.६.७ कुंभार वाडा

प्रकरण - पहिले

सोलापूर शहराचा इतिहास

सोलापूर शहर हे महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशांच्या सिमेवर वसलेले असून येथे मराठी, कानडी, तेलगु आणि मुस्लिम संस्कृतीचा संगम पहावयास मिळतो. त्यामुळे हे शहर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. सोलापूर शहरावर हिंदू, मुस्लिम, जैन, बौध्द, ख्रिश्चन व पारशी धर्माचा प्रभाव असून वरील धर्मीयांची अनेक धार्मिक स्थळे शहरात आढळून येतात. त्यामध्ये शिवमंदिरे, विठ्ठल मंदिरे, दत्त मंदिरे, हनुमान मंदिरे, मातृदेवता मंदिरे, जैन मंदिरे, बौध्द विहार, चर्चस्, मशिदी, दर्गे, अग्यारी आणि विविध पंथीयांचे मठ इत्यादींचा समावेश होतो. या धार्मिक स्थळांमुळे सोलापूर शहराला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर, वडवळचे नागेश संप्रदायाचे नागनाथ मंदिर, माचणूरचे श्री सिध्देश्वर मंदिर, अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर आणि जिल्ह्यात असणारी इतर हेमाडपंथी मंदिरे इत्यादी धार्मिक स्थळांचाही प्रभाव शहरावर पडलेला आहे.

१.१ सोलापूर शहराचे भौगोलिक स्थान

सोलापूर शहर हे जिल्ह्याचे ठिकाण असून मुंबई - मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केंद्र आहे. मध्ययुगीन कालखंडात सोलापूर जिल्ह्याच्या सीमारेषा वेगवेगळ्या राज्यांशी जोडल्या गेल्या होत्या. जिल्ह्याच्या उत्तर पूर्वेकडे हैद्राबादच्या निजामाचे राज्य होते तर सोलापूरच्या उत्तरेला अहमदनगरच्या निजामशाहीचा प्रदेश तसेच पूर्वेकडून अक्कलकोट संस्थानच्या सीमा भिडलेल्या होत्या. सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिणेस भीमा नदी व विजापूरच्या आदिलशाहीचा प्रदेश तसेच सांगलीच्या पटवर्धनांचे संस्थान आणि जाट प्रदेश वसलेला होता. पश्चिमेकडील बाजूस सातारा, पुणे आणि अहमदनगरचा काही भाग येत होता. सध्या सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला विजापूर जिल्हा, आग्नेयस गुलबर्गा जिल्हा, नैऋत्येला सांगली जिल्हा, पश्चिमेस सातारा जिल्हा, वायव्येला पुणे जिल्हा, उत्तरेस अहमदनगर जिल्हा आणि ईशान्येस उस्मानाबाद जिल्ह्याची सरहद्द आहे.

भौगोलिकदृष्ट्या सोलापूर जिल्हा १७°१०° व १८°३२° उत्तर अक्षांश आणि ७४°४२° व ७६°१५° पूर्व रेखांशावर वसलेला आहे. जिल्ह्याचा आकार सर्वसाधारणपणे चौकोनी असून

जिल्ह्याची पूर्व - पश्चिम लांबी २०० कि. मी. आणि दक्षिणोतर लांबी १५० कि. मी. आहे. इ. स. १८३८ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, करमाळा, इंडी, हिप्परगी व मुध्देबिहाळ इत्यादी विभाग एकत्र करून सोलापूर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली होती. परंतू इ. स. १८६९ मध्ये यामध्ये बदल झाला आणि सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, सांगोला तसेच पंढरपूर हे विभाग सोलापूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आले. इ. स. १९४९ मध्ये अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढा या तीन नवीन तालुक्याची निर्मिती करून ते सोलापूर जिल्ह्यास जोडण्यात आले. इ. स. १९५६ मध्ये महाराष्ट्र राज्याची पुनर्रचना केल्यानंतर सोलापूर जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला व इ. स. १९६० पासून हा जिल्हा महाराष्ट्राचा महत्त्वाचा भाग बनला.[१]

सोलापूर जिल्ह्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १८०० फूट असून जिल्ह्यात डोंगररांगाचा अभाव आहे. पावसाचे प्रमाण कमी असले तरी भीमा, निरा, सिना, भोगावती, हरणा, बोरी व मान या नद्यांच्या दुआबातील प्रदेश सुपिक राहिलेला आहे, असे असले तरी सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. सोलापूर जिल्ह्यातील इ. स. १३९६ चा दुर्गादेवीचा दुष्काळ,[२] इ. स. १४६० चा दामाजी पंताचा[३] दुष्काळ प्रसिध्द आहेत. इ. स. १८७६ आणि इ. स. १८९६ मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे सोलापूर जिल्ह्यावर आणि शहराच्या आर्थिक स्थितीवर फारच प्रतिकूल परिणाम झाल्याची नोंद सापडते.[४]

सोलापूर जिल्ह्यात ज्वारी, बाजरी, गहू, मका, उस, कापूस आणि कडधान्याची पिके घेतली जातात. अलीकडील ५० ते ६० वर्षांच्या काळात जिल्ह्यात सिंचनाची व्यवस्था वाढल्याने बागायती पिकावर अवलंबून असणारे अनेक छोटे-मोठे उद्योग वाढण्यास मदत झाली. तसेच सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्धसंस्था व कुकुटपालन केंद्रे यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत बदल झाल्याचे दिसून येते.[५]

शहर व जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने वर्षभर बराच काळ हवा कोरडी वाहते. उन्हाळा हा कडक असतो, फेब्रुवारीच्या मध्यापासून उन्हाळा सुरू होतो तो मे महिन्याच्या अखेरीपर्यंत असतो. जिल्ह्यात पडणाऱ्या अनियमित पावसामुळे येथील हवामान नेहमी कोरडे व उष्ण राहिलेले आहे. इ. स. १८९६ ते इ. स. १९११ या काळातील सोलापूर शहराचे तापमान खालील प्रमाणे राहिलेले आहे.[६]

तक्ता क्र. १

सोलापूर शहराचे तपमान (१८९६-१९११)

सन	जानेवारी		मे		जुलै		नोव्हेंबर	
	कमाल	किमान	कमाल	किमान	कमाल	किमान	कमाल	किमान
१८९६	८९	५२	१११	७१	९५	७०	९६	६२
१९०१	९४	५३	१०९	७१	९६	७०	९४	५०
१९०६	९२	५१	११०	७४	९७	७१	९३	५५
१९११	९४	५२	१११	७४	९७	६८	९६	५९

(संदर्भ : जक्कल वि. न., सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ५.)

सोलापूर जिल्ह्यातील जमिनीचा स्तर, येथील हवामान हे कापसाच्या लागवडीसाठी अत्यंत उपयुक्त असल्याने ब्रिटिश सरकारने इंग्लंड व भारतातील कापड गिरण्यांना कच्च्या मालाचा पुरवठा व्हावा, याकरीता सोलापूर परिसरातील शेतकऱ्यांना कापूस लागवडीसाठी प्रोत्साहन दिले होते. शेतकऱ्यांना बि-बियाणांचा पुरवठा करण्याबरोबरच शेतीस पाणी पुरवठ्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी एकरूख तलवाची निर्मिती केली. त्यामुळे सोलापूरच्या आजुबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कापसाचे पिक घेतले जाऊ लागले. परिणामी गिरण्यांकरीता आवश्यक असणारा कच्चा माल जिल्ह्यातच उपलब्ध झाला.

जिल्ह्यातील शेतीला पाणी पुरवठा व्हावा, यासाठी बार्शी तालुक्यातील कोरेगाव येथे सन १८५५ मध्ये, सोलापूर जवळ एकरूख येथे सन १८७१ मध्ये आणि माढा तालुक्यात आष्टी येथे सन १८८१ मध्ये तलाव खोदले. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात कापसाचे उत्पादन वाढण्यास मदत झाली.[७] कापसाचे उत्पादन वाढल्याने सोलापूर शहरात कापड गिरण्यांची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यामध्ये सोलापूर स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल (जुनी गिरणी) (१८७७), लक्ष्मी कॉटन मिल (१८९६),[८] नरसिंग गिरजी मिल[९] (१८९८), दि जामश्री रणजितसिंगजी स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल (१९०९),[१०] विष्णु कॉटन मिल (१९१०),[११] इत्यादी कापड गिरण्यांचा समावेश होतो. सोलापूर शहरातील कापड गिरण्यातून काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढल्याने हे शहर कामगारांचे शहर म्हणून ओळखले जाऊ लागले. शहरातील या गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक व

आंधप्रदेशातून कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर सोलापूर शहरात येऊन स्थायिक झाला. त्यामुळे या शहरात मराठी - कानडी - तेलगु या भाषा बोलणारांची संख्या वाढली. कापड गिरण्या सुरू झाल्याने सोलापूर शहराच्या आर्थिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकास होण्यास मदत झाली.

१.२ तेलगु - मराठी - कन्नड भाषांचा अणुबंध

सोलापूर शहरात मराठी, कन्नड, तेलगु या भाषा बोलल्या जाऊ लागल्याने त्यांची लिपी, भाषा, साहित्य, संस्कृती, नाट्य, शिल्प, आभूषणे, वृत्तवैकल्ये, लोकगीते आणि लोककथा इत्यादी बाबतीत परस्पर संबंध निर्माण होण्यास मदत झाली. कन्नड, मराठी व तेलगु या गोदावरी नदीच्या काठावर रूढ असलेल्या भाषा आहेत. मराठी, कन्नड आणि तेलगु या लिपीत कमालीचे साधर्म्य आहे. यादव राजा रामदेव यांच्या दरबारातील कवी हेमाद्री याने मराठी भाषेला मोडी नावाची नवी लिपी बहाल केली. सामान्यपणे मोडी ही लिपी शिवकाळापासून मराठी मुलुखात अस्तित्त्वात आहे, मराठीला मोडी लिपी देणारा हेमाद्री कवी हा तेलगु भाषिक होता. तेलगु, कन्नड व मराठी भाषेत उच्चारले जाणारे समानार्थी शब्द पुढीलप्रमाणे आहेत.

मराठी	**तेलगु**[१२]	**कन्नड**[१३]
सान (लहान)	सिन्ना	सण्णा
मामा	मामन्	मामा
बोट	बोटमनेलु	बट्टू
समाचार	समाचारम्	समाचारा
घंटा (तास)	घंटा	घंटे
थंड	तंपु	तंपु
कोंबडा	कोडीरम	कोड्डी

या तिनही भाषेत प्रसंगानुरूप संस्कृत भाषेचा वापर केलेला आहे. तेलगु, मराठी, कन्नड भाषेतील संताचे साहित्य एकमेकांवर प्रभाव टाकणारे आहे. 'गंगा-गौरी संवाद' या शिर्षकाचे लोकगीत मराठी, तेलगु आणि कन्नड भाषेत आढळते. लोककथा देखील या तिनही भाषेत समान

आशयाच्या आढळतात. मराठी भाषिक असलेले कविवर्य द. रा. बेंद्रे यांनी सर्वोत्कृष्ट कन्नड साहित्याची निर्मिती करून ज्ञानपीठ पुरस्कार मिळविला. तसेच सुब्रह्मण्यम या तेलगु भाषिक साहित्यिकाने उत्कृष्ट कन्नड लेखनाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळविला. मुळ मराठी भाषिक असलेल्या पंढरीनाथ नावाच्या कवीने तेलगु भाषेतून रसाळ असे 'पंढरीनाथ रामायण' लिहिले. तेलगु भाषिक असलेले पण सोलापूर शहरात स्थायिक झालेले लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी तेलगु साहित्याबरोबर मराठी भाषेतून साहित्याची निर्मिती केली आहे.[१४]

१.२.१ भाषा

सोलापूर शहरात सर्व जाती धर्माचे लोक मराठी भाषा बोलतात, याचे प्रमाण ७१.५% असे आहे. १२.२% लोक कानडी बोलतात. कर्नाटकातील कानडी भाषेचा प्रभाव सोलापूर शहरावर पडलेला आहे. कर्नाटकात आई या शब्दासाठी 'अव्वा', वडीलांसाठी 'आप्पा' तर वडीलबंधूसाठी 'आण्णा' आणि बहिणीसाठी 'आक्का' या शब्दांचा वापर केला जातो. सोलापूर शहर व ग्रामीण भागात वरील शब्दांचा वापर सर्रास होत असतो. लोकांच्या बोलीभाषेवर या शब्दांचा प्रभाव पडलेला आहे. शहरात असणारे मुस्लिम लोक आपल्या रोजच्या व्यवहारात उर्दूबरोबर मराठी आणि कन्नड भाषेचाही वापर करतात. १६.३% लोक उर्दू भाषा बोलतात, शिवाय हिंदी आणि तमीळ बोलणारे लोकही या शहरात दिसून येतात.[१५] आंध्रप्रदेशातून सोलापूर शहरात आलेल्या लोकांची भाषा तेलगु असल्याने ते तेलगु भाषेलाच प्राधान्य देतात.[१६] परंतू अलीकडील काळात तेलगु भाषिक लोक महाराष्ट्रीयन संस्कृतीशी समरस झालेले आहेत. रामय्या, नरसय्या, यल्लय्या या नावांच्या ऐवजी अलीकडे तेलगु भाषिक लोकांमध्ये विठ्ठल, एकनाथ, पांडुरंग, तुकाराम अशी नांवे पहावयास मिळतात.[१७]

१.२.२ सोलापूर ग्रामनाम

विविध साधनातून सोलापूर शहराच्या नावाबद्दलची माहिती मिळते. सोलापूर ग्रामनामाचा उल्लेख काही ताम्रशिलामधून सोन्नलिगे, सोन्नलगे व सोन्नलपूर असा आढळतो. बाराव्या शतकातील सोन्नलिगे म्हणजेच सोलापूर होय.[१८] श्री सिध्दरामेश्वरांच्या काळात सोन्नलिगे येथे नागप्पा जहागिरदार आणि त्याची पत्नी चामलादेवी राहत होती.[१९] त्यांनीच श्री सिध्दरामेश्वरास गाव वसविण्यासाठी एक कोस प्रदेश दिल्याचा उल्लेख आहे.[२०] गुंजेगाव, अक्कलकोट, तडवळ, कामती खुर्द व आचेगाव इत्यादी ठिकाणी सापडलेल्या शिलालेखात सोन्नलपूरच्या कपिलसिध्द मल्लिकार्जून देवस्थानास दान

दिल्याचा उल्लेख आहे.[२१] पुरातत्त्व उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या तांब्याच्या वस्तू व वस्तूउद्योगाची प्राचीनता महाराष्ट्रातील सोनारांच्या कारागिरीवरून दिसून येते. शिलाहार राजा गंडरादित्य यांचा शके १०५८ च्या कोल्हापूर येथील शिलालेखामध्ये सोनाराने द्यावयाच्या करास सुवर्णकर म्हटले आहे. तशाच स्वरूपात सोन्नलिगे नगरचाही उल्लेख यादवराजा महादेव यांच्या शके ११८६ च्या संगुर लेखात आणि जैतूगी यांच्या तिथीरहित जामगांव ताम्रपटात सापडतो.[२२] यावरूनही सोन्नलिगे स्थलनाम सोनारांचे अस्तित्त्व दर्शविणारे वाटते. इतरही काही साधनातून सोलापूर या नावाबद्दल माहिती उपलब्ध आहे. सोळा गावांचे एकत्रीकरण होऊन 'सोलापूर' हे नांव मिळाले असावे अथवा १६ गावांच्या नावामध्ये अहमदपूर, अदिलपूर, चामलादेव, फत्तेपूर, जामदापूर, काळजापूर,[२३] खाडरपूर, खंडेरावची वाडी, महम्मदपूर, राणापूर, संदलपूर,[२४] शेकापूर, सोलापूर, स्वन्नलगी, सोनापूर, वैदकीवाडी इत्यादी नांवे असून त्यातील 'सोलापूर' या नावावरून पुढे हेच नांव रूढ झाले.[२५]

देवगिरीच्या यादवांच्या शासन काळात सोलापूर परिसरात वीरशैव संप्रदायाचे मोठे केंद्र होते. या काळात सोलापूर विभागामध्ये सोन्नलिगे येथे वीरशैव पंथाचे थोर संत श्री सिध्दरामेश्वर यांचे मूळठिकाण होते. त्यामुळे सोन्नलिगे या ग्रामास वीरशैवांचा पवित्र आणि महत्त्वपूर्ण दर्जा प्राप्त झालेला होता. कवी राघवांक यांनी रचलेल्या 'सिध्दराम पुराणामध्ये' असा उल्लेख आहे की, सिध्दरामेश्वराने सोन्नलिगे येथे तलाव बांधून शिवलिंगाची स्थापना केली. इ. स. ११६० मध्ये होऊन गेलेल्या बसवेश्वरांच्या बहिणीचा मुलगा चन्नबसव याचाही सोन्नलिगे या स्थळाशी संबंध होता.[२६]

प्रसिध्द इतिहास संशोधक ग. ह. खरे यांनी १६ खेडी मिळून सोलापूर हे नांव मिळाले असावे, असे म्हटले आहे.[२७] 'शोळा' म्हणजे सोळा आणि पूर म्हणजे खेडी यावरून शोलापूर, सोलापूर असे नांव प्राप्त झाले.[२८] ज्या सोळा खेड्यापासून सोलापूर शहर बनले त्या सोळा खेड्यात स्वन्नलगी, सोलापूर, सोनापूर या खेड्यांची नांवे सोलापूर शहराच्या नावाशी मिळती जुळती आहेत. स्वन्नलगी म्हणजे 'सुवर्णवल्ली' या शब्दावरून सोलापूर हे सोन्यासारखे सुंदर होते, असा अर्थ प्राप्त होतो. ब्रिटिश राजवटीत सोलापूर या शब्दाचा उच्चार 'शोलापूर' असा केला जात होता. स्वन्नलगीचे स्वन्नलपूर, स्वन्नलपूरचे स्वल्लापूर आणि स्वल्लापूरचे सोलापूर झाले असावे. सन १९७४ मध्ये महाराष्ट्र सरकारने शोलापूर (Sholapur) चे सोलापूर अशी दुरूस्ती करून 'सोलापूर' हे नाव निश्चित केले.[२९]

१.३ सोलापूर शहराची रचना

सोलापूर शहर हे मुंबईपासून २८३ मैल आणि पुण्यापासून १२५ मैल अंतरावर आहे. शहराच्या पूर्वेकडे दावल मलिकचे टेकाड असून उत्तरेस १२ मैल अंतरावर सावरगावचा डोंगर आहे. वायव्येस सुमारे ४ मैल अंतरावर एकरूख तलाव (हिप्परगा) पहावयास मिळतो. शहराचे जुने सोलापूर शहर व नगरपालिका स्थापन झाल्यानंतरचे शहर असे दोन भाग पहावयास मिळतात.

१.३.१ जुने सोलापूर शहर

एकशे पन्नास एकर विस्तार असलेल्या जुन्या सोलापूर शहरामध्ये कसबा पेठ व शुक्रवार पेठेचा समावेश होता.[३०] सोलापूरचे जहागिरदार नागप्पाची पत्नी चामलादेवी हिने श्री सिध्दरामेश्वरास शहराचा विस्तारासाठी आणि मंदिर व तलाव बांधणीसाठी दान दिलेल्या जमिनीत आज आपणास किल्ला, सिध्देश्वर मंदिर आणि सिध्देश्वर तलाव पहावयास मिळतो. किल्ल्याच्या जागेत श्री सिध्देश्वरांनी स्थापन केलेले मल्लिकार्जूनाचे देवालय होते.[३१]

१.३.२ वेशी

जुन्या सोलापूर शहराच्या विविध दिशांना देगांव वेश, बाळी वेश, तुळजापूर वेश, दारी वेश, विजापूर वेश, पाणी वेश, रेवणी वेश व कुंभार वेश एकूण आठ वेशी होत्या. नंतरच्या काळात देगांव वेश, तुळजापूर वेश, कुंभार वेश, दारी वेश आणि विजापूर वेश पाडून कुंभारी वेश ते विजापूर वेशी दरम्यान एक चांगला रस्ता तयार करण्यात आला. नंतरच्या काळात त्यात नवी वेशीची भर पडली. शहरातील नगरपालिकेच्या स्थापनेनंतर सन १८६४ मध्ये कलेक्टर गोल्डफिंच यांनी देगांव वेशीपासून सुमारे २७५ यार्डावर एका नवीन पेठेची स्थापना केली. तेथे पूर्वी नवी वेश अस्तित्त्वात होती. अशा एकूण ९ वेशी सोलापूर शहरास होत्या.[३२] सोलापूर शहरास अडीच मैल लांबीची दगडी व विटांनी बांधलेली ८ ते १० फुट उंच आणि ४ ते ६ फुट रूंद अशी तटबंदी होती.[३३]

१.३.३ पेठा व त्यामधील धार्मिक स्थळे

सुरूवातीच्या काळात शहराचे कसबा आणि जुने शहर असे दोन भाग होते. नंतरच्या काळात गोल्डफिंच पेठेचा त्यात समावेश करण्यात आला. शहरात बापुपेठ, बेगमपेठ, बुधवारपेठ, गणेशपेठ, गुरूवारपेठ, जोडभावीपेठ, मंगळवारपेठ, मरगमपट्टीपेठ, पाच्छापेठ, साखरपेठ, शंकरपेठ,

शनिवारपेठ, शुक्रवारपेठ, सिध्देश्वरपेठ आणि सोमवारपेठ अशा विविध पेठा अस्तित्त्वात होत्या. शहराच्या तटाच्या आत असणाऱ्या शुक्रवार, मंगळवार आणि कसबा या पेठांमध्ये विविध धार्मिक स्थळे असल्याची माहिती मिळते.[३४] नंतरच्या काळात दक्षिण व उत्तर कसबा पूर्व व पश्चिम मंगळवार पेठ, उत्तर व दक्षिण सदर बझार, सिव्हील लाईन, मोदीखाना, न्यु तिऱ्हेगांव, भवानीपेठ, रविवारपेठ इत्यादी पेठांची त्यामध्ये भर पडली.[३५] काही वर्षांनी बापुपेठ, शंकरपेठ, मरगमपट्टीपेठ आणि रेवणीपेठ या पेठा नष्ट होऊन त्या इतर पेठात विलिन झाल्या.[३६]

औरंगजेब बादशहाच्या दक्षिण मोहिमेवेळी ब्रह्मपुरी मुक्कामी असताना सन १६८४ मध्ये तो सोलापूर शहरात नमाजासाठी येत असे त्यावेळी काही दिवस त्याने आपला मुक्काम या शहरात केला.[३७] सोलापूरच्या किल्ल्यात आश्रयाला असताना त्याच्याबरोबर त्याची मुलगी झेब-उ-न्निसा होती. तिच्या मुक्कामाची आठवण म्हणून बादशहाने सोलापूर शहराच्या तटंबदीबाहेर 'पादशहा पेठ'[३८] व 'बेगम पेठ'[३९] या दोन वसाहती निर्माण केल्या. नंतरच्या काळात पादशहा पेठेस पाच्छा पेठ या नावाने ओळखले जाऊ लागले.[४०] सन १६८९ मध्ये बादशहाने लोकांना पेठ वसविण्यासाठी किल्ल्याच्या उत्तरेकडील प्रवेशद्वाराजवळील दिलेली जागा 'रेवणी पेठ'[४१] नावाने ओळखली जाई. याच पेठेत असणारे मारूतीचे मंदिर रेवणी मारूती मंदिर या नावाने ओळखले जाते.

शहराच्या मध्यभागी असलेले मधला मारूती मंदिर हे शहर वेशीच्या बाहेर होते. या मंदिराच्या पिछाडीस जो बाजार भरत असे त्या बाजाराला 'मेनबझार' या नावाने ओळखले जाई.[४२] बाजाराची ही जागा खाजगी जमीनीची व स्मशानभूमीची होती. त्यावेळचे सोलापूरचे मामलेदार उध्दोविरेश्वर यांनी व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी माधवराव पेशव्यांच्या कानावर घातल्याने माधवराव पेशव्यांनी सोलापूर शहरात व्यापारी पेठ निर्माण करण्याची जबाबदारी सावरगावचे रहीवाशी जयदेवाप्पा शेटे यांच्यावर सोपविली. हल्ली ज्या जागेत मंगळवार पेठ आहे ती जागा जयदेवाप्पांनी पसंत केली होती. शेळगी हद्दीतील मोकळया जागेची चतू:सीमा ठरवून सन १७६८ मध्ये बाजारपेठेसाठी त्यांच्या स्वाधिन करण्यात आली. याच जागेवर जयदेवाप्पांनी जी पेठ निर्माण केली त्या पेठेस 'माधवराव पेठ' असे नांव देण्यात आले. मधल्या मारूती मंदिरापासून तुळजापूर वेश दक्षिणोत्तर व कुंभार वेशीपासून बुबणे यांच्या जैन मंदिरापर्यंत पूर्व पश्चिम अशी या पेठेची रचना करण्यात आली होती.[४३] सन १८१८ नंतर इंग्रजांनी महाराष्ट्राचा बराचसा भाग आपल्या वर्चस्वाखाली

आणला. त्यावेळी सोलापूर हे ब्रिटिश आमदानीतील एक महत्त्वाचे व्यापारी शहर म्हणून ओळखण्यात येऊ लागले होते. सोलापूर शहराचा आठवडी बाजार हा या माधवराव पेठेत भरत असे. मंगळवारी आठवडा बाजार भरत असल्याने ब्रिटिशांनी माधवराव पेठेचे नामांतर मंगळवार पेठेत केले.

सन १८६४ च्या सुमारास कलेक्टर गोल्डफिंच यांनी वसविलेली नवीपेठ व्यापाऱ्यांना गैरसोयीची वाटू लागल्याने कुंभार वेशी पलीकडील मोकळी जागा व्यापाऱ्यांना देण्यात आली. या पेठेत दोन विहिरी (बाव) जवळ जवळ असल्याने निर्माण केलेल्या पेठेला जोडबावी पेठ (जोडभावी पेठ)[४४] म्हणण्यात येऊ लागले. सन १८८१ पासून सिध्देश्वर पेठेचा उल्लेख 'शतसावंत्सरिक' या ग्रंथात पहावयास मिळतो.[४५] सोलापूर शहराचा विकास होत असताना १६ गावांपैकी काही गांवे सोलापूर शहर हद्दीत समाविष्ट झाली नाहीत, त्यामध्ये काजळापूर, संदलपूर, भोगापूर, चामलापूर इत्यादी गावांचा समावेश होतो. सन १६८४ मध्ये औरंगजेब बादशहाने ज्या दोन पेठा निर्माण केल्या होत्या त्या पेठामध्ये[४६] काजळापूर, संदलपूर, भोगपूर, चामलापूर ही गांवे समाविष्ट करण्यात आली होती. सन १७६८ मध्ये सोलापूर शहराचे क्षेत्रफळ नव्या पेठेसह २७३ एकर इतके होते.[४७]

१.३.४ सोलापूर नगरपालिकेची स्थापना व शहराचा विस्तार

संपूर्ण हिंदुस्थानात मोठ-मोठ्या गावातील स्थानिक स्वरूपाची कामे स्थानिक कर बसवून पार पाडता यावी व जिल्हाधिकाऱ्यावरील कामाचे दडपण कमी व्हावे, या दुहेरी हेतूने नगरपालिकांची स्थापना करण्यात आली. यासाठी हिंदुस्थान सरकारने सन १८५० चा "मुबई म्युन्सिपालिटी ॲक्ट" हा कायदा केला. या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम निरनिराळ्या जिल्ह्याच्या कलेक्टरकडे सोपविण्यात आले. त्यानुसार सोलापूरचे तत्कालिन कलेक्टर थॉमस चार्लस् लॉफनन यांनी ४ जून १८५१ रोजीच्या आपल्या पत्रात नगरपालिका स्थापन करण्याबद्दल निश्चित योजना सरकारपुढे मांडली. त्यावेळी सोलापूर शहराची लोकसंख्या ३०,००० असल्याने सोलापूर शहरात नगरपालिका स्थापन होणे आवश्यक होते.

लॉफनन यांनी शहरातील प्रमुख नागरिकांकडून सन १८५० च्या "मुबई म्युन्सिपालिटी ॲक्ट" प्रमाणे नगरपालिकेच्या स्थापनेबद्दल निश्चित अशा सूचना अर्जाद्वारे सरकारकडे पाठविल्या. २८ ऑगस्ट १९५१ रोजीच्या या अर्जावर शहरातील १७२ प्रमुख नागरिकांच्या सह्या होत्या. सरकारने शहरातील नागरिकांच्या नगरपालिका स्थापनेबद्दलच्या अर्जाचा विचार करून नगरपालिकेवर कोण

कोणत्या व्यक्ती नेमावयाच्या व त्यांची निवड सर्व जातीमधून कशी करावी, अशा सूचना सरकारने कलेक्टर यांना दिल्या होत्या. त्यानुसार २ जुलै १८५२ रोजीच्या पत्रात नगरपालिका सभासदासाठी नऊ प्रतिनिधींची शिफारस करण्यात आली त्यामध्ये नारायण जनार्दन सोनी, लक्ष्मण नरसु चाटी, नरसु विठ्ठल नखाते (ब्राह्मण), केरोजीराव देशमुख, धर्मराव थोबडे (वाणी), सखाराम खुशाल (गुजर), ठाकुरदास (मारवाडी) हुसेनसाहेब रेशीमगार चिंतो, सखाराम पेन्शनर मामलेदार (मुसलमान) यांचा समावेश होता.

नगपालिकेच्या स्थापनेसाठी चिंतो सखाराम या पेन्शनर गृहस्थानी कलेक्टर यांना सहाय्य केल्यामुळे नगरपालिकेचे पहिले पगारी अंमलदार (सेक्रेटरी) म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. १ ऑगस्ट १८५२ पासून सन १८५० चा २६ वा कायदा[४८] सोलापूर शहर व लगतच्या भागास लागू केला. अशा रितीने १ ऑगस्ट १८५२ पासून सोलापूर शहरात नगरपालिका अस्तित्वात आली.[४९]

सोलापूर नगरपालिका शहर हद्दीसंबंधीचा पहिला जाहिरनामा सन १८६६ मध्ये गॅझेटमध्ये प्रसिध्द केला. त्यानुसार सोलापूर शहराची मोतीबागेपासून ते देगांव नाल्याच्या काठाने व पुढे रेल्वेच्या १४ कमानी पासून शेळगी नाल्यापर्यंत, तुळजापूर रस्त्यापासून हैद्राबाद रस्त्यावरील तिरकस पुलापर्यंत हद्द ठरविण्यात आली. त्यानंतर सन १८७१ मध्ये सोलापूर शहराच्या हद्दी निश्चित करण्यात आल्या. यावेळी शेळगी नाला, जी. आय. पी. रेल्वे, लष्कर, कसबे सोलापूर, मोदीखाना, किल्ल्याच्या पश्चिमेला व दक्षिणेला असलेला परिसर सोलापूर नगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आला. शहराची पहिली हद्दवाढ सन १८७३ पासून लागू झाली. सन १९१३ मध्ये सोलापूर शहराचे क्षेत्रफळ ४१६० एकर होते. सन १९२७ मध्ये शेळगी जवळील ३२७ एकर जमीन त्यात समाविष्ट झाली. पुढील काळात शहराची हद्दवाढ वाढत जाऊन सन १९५३ अखेर श्हराचे क्षेत्रफळ ५५०२ एकर इतके झाले.[५०] सन १९७९ ते १९९२ या काळात तीन वेळा शहराची हद्दवाढ झाल्याचे दिसून येते.

१.४ सामाजिक पार्श्वभूमी

सोलापूर शहर हे विविध जाती-धर्मियांचे शहर आहे. शहरात ब्राह्मण, वाणी, लिंगायत, पद्मशाली, साळी, माळी, कोष्टी, धनगर, मराठा, कुणबी जातींचे लोक वास्तव्यास असून जैन, बौध्द, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी व शीख धर्मियांचेही शहरात वास्तव्य दिसून येते. ब्राह्मण

समाजामध्ये देशस्त, देवरूके, गोलका, गुजराथी, कऱ्हाडे, कायस्त, प्रभु, मुदलियार इत्यादी पोटजातींचा समावेश होतो.

शहरात विविध प्रकारचे व्यापार व उद्योगधंदे करणारा वर्ग म्हणजे आगरवाल, भाटिया, गुजराथी, वाणी, लिंगायत, मारवाडी, कोमटी, काशीकापडी हा आहे. हटकरी, मराठी, कुणबी, माळी हा वर्ग शेती व्यवसाय करीत असून हटकरी समाज हा विजापूर भागातून सोलापूरात येऊन स्थायिक झाला, तर मराठा समाज हा कराड, सातारा येथून आल्याची माहिती मिळते. शहरातील माळी समाज हा शेती व्यवसायाबरोबर पाळीव प्राणी पाळणे हाही व्यवसाय करत. या माळी समाजाची अंबाबाई, जनाई, खंडोबा, महादेव, तुकाई, विठोबा ही दैवते असून धर्मगुरू म्हणून ब्राह्मण वर्गालाच मान होता. माळी समाजाच्या सर्व चालीरिती मराठा जाती प्रमाणेच असून मृत व्यक्तीस पुरणे किंवा जाळण्याची पध्दती आहे.

याशिवाय शहरात कारागिरांच्या अनेक जाती असून त्यामध्ये पेलदार, भांडारी, भुरूड, चांभार, गवंडी, घिसाडी, आतकरी, पाथरवट, पटवेकरी, रंगारी, साळी, सेनागार, सोनार, सुतार, शिंपी, तांबट, तांबोळी, न्हावी, परीट, वादक, घडशी, गुरव, होलार मेंढपाळ, गवळी, धनगर याबरोबरच शहरात बेडर, भामटा, भिल्ल, कैकाडी, काटकरी, फासेपारधी, वडार, वंजारी इत्यादीं भटक्या व विमुक्त जमातींच्या समावेश होतो.

शहरातील मुस्लिमांमध्ये मुसल, पठाण, शेख, सय्यद, सुतार, जोहरी, पेंढारी, बेठबिगार, चिकलगार इत्यादीं उपजातीं आढळतात. जैन समाजात प्रामुख्याने श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ असून उपाध्य, पंचम, आणि चतुर्थ जैन यामध्ये विभागलेला आहे. शिवाय शहरात ख्रिश्चन, पारशी आणि शिख धर्मीयांचेही वास्तव्य काही प्रमाणात आढळते. शहरात राहणाऱ्या या विविध जाती-धर्माच्या लोकांच्या बोलीभाषाही वेगवेगळ्या असल्याने हे शहर बहुजातीय आणि बहुभाषिक शहर म्हणून ओळखले जाते. या विविध धर्मियांच्या बोलीभाषा, पोशाख पध्दती, रूढी-परंपरा, देव-देवता यांच्या मिश्रणांतून तयार झालेली ही सोलापूरची मिश्रसंस्कृती आहे.

शहराच्या विकासात इतर समाजाप्रमाणे रजपूत समाजाचे योगदान महत्तवाचे मानले जाते. इ. स. १४०० पासून हा समाज सोलापूरात वास्तव्य करीत आहे. शहरात जवळपास २५ हजार लोकसंख्या असलेल्या या रजपूत समाजामध्ये विविध पोटजाती पहावयास मिळतात. त्यामध्ये चितोड

रजपूत लोहार ही पोटजात महत्त्वाची आहे. शहराच्या उत्तर व दक्षिण कसबा, चौपाड व पाणीवेश या भागात या समाजाची लोकवस्ती आहे. तसेच चौपाडातील बालाजी मंदिर, सळई मारूती मंदिर, पाणीवेश मारूती मंदिर, सरस्वती मंदिर, मेकॅनिक चौकातील दत्त मंदिर ही देवस्थाने रजपूत समाजाची असून, सोलापूरच्या धार्मिक इतिहासात भर घालतात.[५१]

सन १८४० पासून निजाम संस्थानातून पद्मशाली लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी सोलापूर शहराकडे आकर्षित झाले. प्रारंभीच्या काळात पद्मशाली लोकांना सोलापूरकडे येत असताना त्यांना पोलिसांनी बोरामणी गावाजवळ अडविले होते. तेलगु बोलणारे हे लोक कोणी तरी हेर असावेत, असा पोलिसांचा गैरसमज झाल्याने त्यांना पकडून सोलापूरच्या किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले. पद्मशाली लोकांनी कपडे विणण्यासाठी लागणारे साहित्य बरोबर आणले होते. आम्ही हातमागावर कापड विणणारे विणकर आहोत अशी खात्री पटवून दिल्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले. विजापूर वेशीच्या पूर्वेकडील जोडबसवण्णा चौकापर्यंत मोकळी असणारी जागा त्यांना राहण्यासाठी व घरे बांधण्यासाठी देण्यात आली.[५२]

सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणावर चालणारा हातमाग आणि यंत्रमाग व्यवसाय पद्मशाली लोकांनी सुरू केला. जवळ जवळ ६,००० यंत्रमाग आणि २५,००० हातमाग चालवून त्यांनी शहरास कापड व्यवसायात अग्रेसर बनविले. सोलापूरात हातमागाचा व्यवसाय चांगला चालतो व मजूरांना भरपूर काम मिळते, असे तेलंगणातील लोकांना कळल्यानंतर पद्मशाली समाजाचे लोक सोलापूर शहराकडे येऊ लागले. सोलापूर शहरात आलेले 'फलमारी' हे पद्मशाली समाजाचे पहिले घराणे होय.[५३] या समाजाची संख्या वाढल्याने शहरात आपल्या कुलदैवताचे मंदिर बांधावे या हेतूने पद्मशाली समाजातील लोकांनी प्रयत्न चालविले.[५४]

१.५ लोकसंख्या

पेशवाईच्या अस्तानंतर सोलापूर शहर ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. त्यावेळी हे शहर पुणे कलेक्टोरेटमध्ये समाविष्ट करण्यात आले. सन १८३६ मध्ये शहरांतर्गत व्यवस्था स्थानिक मंडळीच्या हाती सोपविली त्यावेळी शहराची माहिती पुणे कलेक्टोरेटला कळविण्यात आली. सबकलेक्टरने सोलापूर शहरात ३,६०० घरे असल्याची व ३०,००० लोकवस्ती असल्याचेही कळविले होते.[५५] सन १८५१ मधील खानेसुमारीनुसार शहराची लोकसंख्या ३०,८१९ वर आली. शहरात असणाऱ्या पेठवार

लोकसंख्या व घरे यांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे. यावरून प्रत्येक पेठेतून लोकवस्तीची कशी वाढ झाली, हे समजून येते.[५६]

तक्ता क्र. २

सोलापूर शहरातील पेठवार लोकसंख्या (१८६९)

पेठा	घरे	लोकसंख्या	पेठा	घरे	लोकसंख्या
सिध्देश्वर पेठ	५९	४३८	शनिवार पेठ	२४७	१६१४
बेगम पेठ	१९८	१०५५	बुधवार पेठ	१०९	६२२
पाच्छा पेठ	१२५	६४२	साखर पेठ	५३९	३५४४
सोमवार पेठ	१०३	७७७	गुरूवार पेठ	९६	६८९
कसबा पेठ	१६०१	८५१४	शुक्रवार पेठ	६७८	३८४४

(संदर्भ : कुलकर्णी ग. प., (संपा.), शतसांवत्सरिक ग्रंथ, सोलापूर, पृ. ३८.)

सोलापूर शहराच्या वेळोवेळी झालेल्या खानेसुमारीनुसार दर दहा वर्षांनी लोकसंख्येत कसा बदल होत गेला ते तक्ता क्रमांक ३ वरून दिसून येते.

तक्ता क्र. ३

सोलापूर शहराची लोकसंख्या (इ. स. १८५१-१९५१)

अ. क्र.	वर्ष	पुरूष	स्त्रिया	एकूण
१	१८५१	--	--	३०८१९
२	१८६९	--	--	२८६४६
३	१८७२	२७९८६	२५४१७	५३४०३
४	१८८१	३१०८२	३०१९९	६१२८१
५	१८९१	३१७३४	३०१८१	६१९१५
६	१९०१	३८१६३	३७१२५	७५२८८
७	१९११	३१८९१	२९४५४	६१३४५
८	१९११	--	--	८९४२४
९	१९२१	६०२२४	५३७०७	११३९३१
१०	१९३१	७२०७९	६३४९५	१३५५७४
११	१९४१	१०६८२५	९६८६६	२०३६९१
१२	१९५१	१३८८५७	१२७१९३	२६६०५०

(संदर्भ : बी. ए.,सेन्सेस ऑफ इंडिया, डिस्ट्रिक्ट सेन्सेस हँडबुक, सोलापूर, १९४१,

खंड ८, फाईल क्र. आर. १४४१६ / १, पृ. ५३.)

वरील तक्त्यामध्ये सन १८५१ ते सन १९५१ अशा शंभर वर्षांची लोकसंख्या मांडण्यात आली असून सन १८५१ साली सोलापूर शहराची लोकसंख्या ३०,८१९ इतकी होती ती वाढत जाऊन शंभर

वर्षांनी म्हणजे सन १९५१ मध्ये २,६६,०५० इतकी झाली. सन १९११ मध्ये लोकसंख्येचे प्रमाण मागील दहा वर्षांच्या मानाने कमी झाले, कारण या दहा वर्षात सोलापूर शहरात प्लेगने मोठ्या प्रमाणात थैमान घातले होते.[५७] सन १९०१ च्या खानेसुमारीनुसार ७५,२८८ लोकसंख्येपैकी हिंदू ५५,९८८, मुस्लिम १६,१०३, ख्रिश्चन १,६३१ अशी आढळून आली.[५८] लोकसंख्येची आकडेवारी पाहता १,००० पुरूषामागे स्त्रियांची संख्या कमी दिसून येते. सन १८८१ साली १,००० पुरूषामागे ९७५ स्त्रिया, सन १८९१ मध्ये १,००० पुरूषामागे ९७७ स्त्रिया,[५९] सन १९०१ मध्ये १,००० पुरूषामागे ९८६ स्त्रिया, सन १९३१ मध्ये १,००० पुरूषामागे ९३५ स्त्रिया, सन १९४१ मध्ये १,००० पुरूषामागे ९४० स्त्रिया असल्याचे दिसून आले.[६०]

सन १९२६-१९२७ मध्ये प्लेग आणि कॉलऱ्याच्या साथीमध्ये शहरात २०५० माणसे मृत्युमुखी पडली.[६१] सन १९५१ च्या खानेसुमारीनुसार सोलापूर शहरात मराठी भाषा बोलणारे १,२५,२११ लोक होते. कानडी बोलणारे ३९,३५९, उर्दू भाषा बोलणारे ३८,११३, तेलगु बोलणारे ४६,५७८ तर गुजराती भाषा बोलणारे ३,३०५ लोक आढळून आले. त्याचप्रमाणे २,१०,४५६ हिंदु, ४६,४३६ मुस्लिम, ३,२१५ जैन, ख्रिश्चन १,८३६ पुरूष आणि ३,६८६ स्त्रिया अशी शहराची प्रमुख धार्मिक विभागणी होती.[६२] सन १८५१ ते सन १९५१ या शंभर वर्षांच्या लोकसंख्येचा बारकाईने अभ्यास केला असता, असे म्हणता येईल की, सन १८५१ साली ३०,८१९ असलेली लोकसंख्या सन १९५१ मध्ये २,६६,०५० इतकी झाली. म्हणजे शहराच्या लोकसंख्येमध्ये ८.६३२ पटीने वाढ झाली. या वाढीला पहिल्या काही वर्षामध्ये सिध्देश्वर तलाव कारणीभूत ठरला असे म्हणता येईल. सोलापूर नगरपालिकेने एकरूख तलावाचे पाणी शहरात नळाद्वारे आणुन सोय केली. पुढे सन १८८१ साली प्रत्यक्ष नळाने शहराला पाणी पुरवठा होण्यास मदत झाली.

सोलापूर शहरात कापड गिरण्या सुरू झाल्याने आजुबाजूच्या खेड्यातील लोकांना या कापड गिरण्यांमध्ये काम मिळू लागल्याने अनेक लोक शहराकडे आकृष्ट झाले. याचा शहराच्या लोकसंख्या वाढीवर परिणाम झाल्याचे दिसून येते.[६३] परंतू शहराच्या लोकसंख्येवर साथीच्या रोगांचा परिणामही झालेला होता. सन १८७२ ते १८७५ या काळात लोक सिध्देश्वर तलावाचे पाणी पिण्यासाठी वापरत असत. त्यावेळी तळ्यातील अशुध्द पाण्याने कॉलरा आणि मलेरियासारख्या साथीचे रोग मोठ्या प्रमाणावर पसरले. या तलावातील पाणी अशुध्द झाल्याने तत्कालीन महसूल अधिकारी गणेश मार्तंड

(तालुका मामलेदार), सोलापूर याने तुळजापूर वेशीपासून आठ किलोमिटर अंतरावर असलेल्या दहिटणे गावी विहिर खोदून तेथून शहरास पाणी आणण्याची योजना आखली होती.[६४] सन १८७८ साली २,९१७ तर सन १८७९ साली २,५५३ लोक मरण पावल्याची नोंद सापडते. अशा साथीमुळे सन १८८६-१८८७ या वर्षात शहरातील मुस्लिम विणकरांची संख्या ३,००० पर्यंत कमी झाली.

प्लेगमुळे अनेक लोक गाव सोडून गेल्याने सन १९११ च्या खानेसुमारीवर त्याचा फार मोठा परिणाम झाला. सार्वत्रिक खानेसुमारीच्या वेळी प्लेगमुळे गाव सोडून गेलेल्यांची संख्या फार होती, सन १९११ ची लोकसंख्या ६१,३४५ एवढी नोंदविली गेली. ही स्थिती लक्षात घेऊन शहराची पुन्हा खानेसुमारी घेण्यात आली, त्यावेळी शहराची लोकसंख्या ८९,४२४ असल्याचे आढळून आले. म्हणजे २८,०७९ एवढे लोक प्लेगच्या साथीला घाबरून सोलापूर शहर सोडून दुसरीकडे गेले.[६५]

तक्ता क्र. ४

सोलापूर शहराची धर्मनिहाय लोकसंख्या (२०११)

अ. क्र.	धर्म	पुरूष	स्त्रिया	एकूण
१	हिंदू	४८६७३०	४६४५९२	९५१३२२
२	मुस्लिम	११२५३३	१०८१७५	२२०७०८
३	जैन	८१७७	७६१२	१५७८९
४	बौध्द	१२५४३	१२२६३	२४८०६
५	ख्रिश्चन	४०३७	४२९७	८३३४
६	शिख	६८९	५७०	१२५९
७	इतर	१५२४	१५४२	३०६६
८	**एकूण :-**	**६२६२३३**	**५९९०५१**	**१२२५२८४**

(संदर्भ : भारतीय जनगणना रिपोर्ट, २०११, सोलापूर जिल्हा, पृ. १३३.)

वरिल तक्त्यावरून असे दिसून येते की, सोलापूर शहरात २०११ च्या जनगणनेनुसार हिंदूंची लोकसंख्या सर्वात जास्त असून, त्याखालोखाल मुस्लिमांची लोकसंख्या पहावयास मिळते. ख्रिश्चन व शिख धर्मियांची लोकसंख्या फारच अल्प प्रमाणात दिसून येते.[६६]

१.६ सोलापूर शहरातील महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे

सोलापूर शहर हे ऐतिहासिक दृष्टीकोणातून महत्त्वाचे शहर असून, या शहरावर अनेक राजसत्तांनी राज्य केले. त्यांच्या काळात या शहरामध्ये अनेक ऐतिहासिक व धर्मिक स्थळांची निर्मिती

झाली. यामुळेच या शहराचे धर्मिक दृष्टीकोणातून एक वेगळेपण निर्माण झाले. ते आजतागायत टिकून आहे. यापैकी काही स्थळांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.

१.६.१ सिध्देश्वर तलाव

सिध्देश्वर तलावाच्या मध्यभागी, पूर्वाभिमूख सिध्देश्वराचे सुंदर मंदिर उभे राहिल्याने सोलापूर शहराच्या सौंदर्यात अधिक भर पडली. सिध्देश्वर तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस सोलापूरचा भूईकोट किल्ला असून, हा किल्ला बांधण्यापूर्वी तेथे प्रसिध्द असे मल्लिकार्जूनाचे मंदिर होते. मल्लिकार्जून मंदिरात अन्नछत्र उघडल्यानंतर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, म्हणून सिध्दरामांनी आपल्या चार हजार शिष्यांना बरोबर घेऊन मल्लिकार्जून मंदिराच्या पूर्वेकडील बाजूस हा तलाव निर्माण केला. या तलावातील असंख्य पाण्याच्या झऱ्यामुळे तलाव पाण्याने भरला गेला. त्यामुळे या तलावाला नंतरच्या काळात तिर्थाचे स्वरूप प्राप्त झाले.[६७]

छायाचित्र क्र. १



तलावाच्या मध्यभागी असलेले श्री सिध्देश्वर मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

सिध्दरामेश्वरांनी सोलापूर शहराला आणि मल्लिकार्जून मंदिराला दर्शनाला येणाऱ्या लोकांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, म्हणून सन ११३६ च्या दरम्यान हा तलाव खोदण्यात आला. त्यावेळी शहरातील अनेक लोकांनी त्यासाठी आर्थिक मदत पुरविली.[६८] सिध्देश्वर तलावातील पाणी पवित्र मानून शहरातील सर्व जाती धर्माचे लोक या तलावाचे पाणी पित.

तलावातील या पवित्र पाण्याने स्नान करण्यासाठी शहरातील लोक मोठ्या प्रमाणावर गर्दी करीत. या पवित्र स्थानासाठी परगावाहून येणाऱ्या लोकांकरीता गावाच्या वेशीच्या बाहेर म्हणजे पाणीवेशीबाहेर एक धर्मशाळा बांधण्यात आली होती. त्याचप्रमाणे गणपती घाटावरही अशा लोकांसाठी पाच खनाची धर्मशाळा बांधल्याचाही उल्लेख सापडतो. ब्राह्मणलोक स्नानसंध्या करून ब्रह्मकर्मे करण्यासाठी धर्मशाळेतच बसत तर, काही घरामध्ये पुजेसाठी व स्वयंपाकासाठी या तलावातील पाण्याचाच उपयोग करत. तलावामध्ये पाण्याचा साठा वाढावा यासाठी काही विहिरी आणि आड खोदण्यात आले होते.[६९] सन १८५२ ते सन १८६६ या काळात ब्रिटीश सरकारने आणि नगरपालिकेने तलावातील पाणी शुध्द व स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला.[७०]

सन १८७६ साली पडलेल्या दुष्काळामुळे तलावातील पाणी आटल्याने शहरवासियांचे पाण्यामुळे हाल होऊ लागले म्हणून सरकारतर्फे तळ्यातील गाळ व कंजाळ काढण्यासाठी सिध्देश्वर पंचकमिटीने रूपये १,००० ची मदत सरकारला दिली.[७१] सन १८८० पर्यंत सोलापूर गावठाण भागालाही सिध्देश्वर तलावातून पाणी पुरवठा होत होता.[७२] पाणी पुरवठ्याचे हे एकमेव साधन असल्याने नगरपालिकेने सन १८८० मध्ये सिध्देश्वर तलावातील कंजाळ व गाळ काढण्यासाठी उपाययोजना केली.[७३] सन १८८० नंतर १९०९, १९१०, १९२२, १९४०, १९५७ इत्यादी वर्षी तलावातील पाणी आटल्यानंतर गाळ काढण्याचे काम मोठ्या प्रमाणावर करण्यात आले होते. त्यावेळी काही धार्मिक संस्थांनी आर्थिक मदत दिली. १९२२ मध्ये तळ्यातील अतिरीक्त पाणी रस्त्यावर येऊ नये म्हणून सरकारने एक भिंत बांधली. त्यासाठी अमेरिकन मराठी मिशन या संस्थेने सरकारला ८४४ रूपये दिल्याचा उल्लेख आहे.[७४] १५ एप्रिल १९४० मध्ये श्री चन्नवीर स्वामी (बृहन्मठ होटगी) यांच्या हस्ते गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले. त्यावेळी सिद्रामप्पा फुलारी, शिवशंकर उपासे इत्यादींनी पुढाकार घेतला. या वेळीही हजारो सिध्देश्वर भक्तांनी मोठ्या श्रध्देने श्रमदान करून गाळ काढण्याचे काम केले. यासाठी शहरातील नागरिकांनी १३,००० रूपयांची संपत्ती दान केली होती.

या प्रसिध्द तलावास अनेक दगडी घाट बांधण्यात आले आहेत. परंतु हे घाट कधी बांधले याची माहिती मिळत नाही. तळ्याच्या उत्तरेला जो घाट आहे, तो 'गणपतीघाट' या नावाने ओळखला जातो. जुन्या काळात कसबा पेठ हीच शहराची प्रमुख वस्ती असल्याने या घाटाचा नागरिक उपयोग

करीत असत. लक्ष्मी मार्केट जवळील ईशान्येकडील बाजुस विष्णु मंदिराजवळ असलेला घाट 'विष्णुघाट' या नावाने ओळखला जातो. या घाटाच्या जवळच प्रसिध्द असलेला 'बांगडीघाट' आहे. संक्रातीच्या सणाच्या वेळी या घाटावर बांगड्यांची दुकाने थाटलेली असत, तलावाच्या पूर्वेकडील बाजूस असलेला घाट हा 'हत्तीघाट' नावाने प्रसिध्द असून हत्तींना तळ्यात पाणी पिण्यासाठी जाता यावे अशी व्यवस्था या घाटावर आढळते. या घाटाच्याच पूर्वेकडील बाजूस पंचमुखी मारूतीचे मंदिर असून या मंदिराच्या पिछाडीस तळ्यात जाण्यासाठी एक छोटा घाट आहे. हा घाट 'हनुमानघाट' या नावाने ओळखला जातो. मारूतीच्या मंदिराजवळ एकनाथाच्या देवालयाशेजारी 'नाथघाट' आहे. पठाण हॉल व रिपन हॉल बगीचा यामध्ये 'प्रभुघाट' आहे. तळ्याच्या दक्षिणेस शहाजौहरवलीचा दर्गा असून या दर्ग्याच्या पिछाडीस असलेला घाट 'शाहीघाट' या नावाने ओळखला जातो, या घाटाच्या शेजारी असलेल्या समत्तीकट्टा घाटावर सिध्दरामेश्वरांच्या काठ्यांचे लग्न लावले जाते. मल्लिनाथ घाटाच्या जवळच श्री परमेश्वर लिंग हे पवित्र लिंगस्थान आढळते. सिध्देश्वर तलावाची निर्मिती करीत असताना बाहेरच्या नाल्याद्वारे पाणी तलावात यावे म्हणून व्यवस्था करण्यात आली होती. अक्कलकोट रस्त्यावरून उंचवट्याकडून येणारे पावसाचे पाणी इराबत्ती व भैय्या यांचे मळे, जोडबसवण्णा वस्ती, पोलीस हेडक्वॉर्टर, तेलंगी पाच्छा पेठ या भागातून नाल्याद्वारे वाहत येऊन ते सिध्देश्वर तलावात येत असे. दुसरा नाला हा लष्कर भागातील तालुका पोलीस कचेरीकडील उंचवट्यावरून वाहत येऊन तो सरकारी दवाखान्याच्या पाठीमागून मेकॅनिक लॉज, जनाना मिशन, हरिभाई देवकरण प्रशाला व कलेक्टर कचेरीच्या बाजूने तळ्यात मिसळत.[७५]

१.६.२ भूईकोट किल्ला

भूईकोट किल्ल्यामुळे सोलापूर शहराला महत्त्व प्राप्त झाले असून हा किल्ला सिध्देश्वर तलावाच्या पश्चिम किनाऱ्यावर शहराच्या नैऋत्य दिशेस आहे. इ. स. १३१३ मध्ये हसन गंगु खोजा यांनी किल्ल्याच्या बांधकामाची सुरूवात केली. नंतर विजापूरच्या आदिलशहाच्या काळात किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाले.[७६] हा एक किल्ला मध्ययुगिन काळातील महत्त्वाच्या किल्ल्यापैकी एक मानला जातो. सोलापूरच्या या भूईकोट किल्ल्यावर व परिसरावर इस्लामी सत्ताधिशांनी बरीच वर्षे राज्य केले. या भूईकोट किल्ल्याच्या वर्चस्वावरून निजामशाही आणि आदिलशाहीमध्ये काही काळ संघर्ष राहिला. निजामशहाची कन्या चाँदबिबी हिचा विवाह आदिलशाही सत्ताधिशांशी झाल्याने हा संघर्ष थांबला.[७७] त्यावेळी हुसेन निजामशाहाने सोलापूरचा हा किल्ला चाँदबिबीला आंदण दिला.[७८] हा

किल्ला उंचवट्यावर बांधला असून तो ३२० x १७६ यार्ड क्षेत्रफळाचा आहे. १० ते १५ यार्डच्या अंतरावर किल्ल्यास दोन तटबंदी आहेत. तलावाकडील बाजु सोडली असता किल्ल्याच्या तिन्ही बाजूस १०० ते १५० फुट रूंद आणि १५ ते ३० फुट खोल खंदक आहे.[७९] किल्ल्याच्या तटबंदीच्या भिंतीला जागोजागी अनेक बुरूज आहेत, प्रत्येक बुरूजावर तोफा डागण्यासाठी आणि बंदुका झाडण्यासाठी चीरा आहेत. १५ ते २० यार्डवर आतील बाजूची तटबंदी असून बाहेरील तटापेक्षा ती ५ ते १० फुट उंच आहे. किल्ल्यास एक मुख्य प्रवेशद्वार असून अंतर्गत तटबंदीला आणखी दोन प्रवेशद्वारे आहेत.

छायाचित्र क्र. २



सोलापूर शहरातील भुईकोट किल्ल्याचे दुसरे प्रवेशद्वार
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

ब्रिटिश काळात किल्ल्यात जाण्याकरीता एक झडप होती. ब्रिटिशानीच ही झडप काढून त्याठिकाणी ९० x २० असा लाकडी पुल बांधला. हा पुल ओलांडून गेल्यावर किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार लागते. प्रवेशद्वारास असलेल्या दरवाजास हत्ती दरखाजा म्हणून ओळखले जाते. दरवाजाच्या उजवीकडील बाजुस एक शिलालेख होता, त्यावर सातारचे छत्रपती शाहु यांच्या आज्ञेवरून दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी सन १८१० मध्ये आबाजी बल्लाळ या किल्लेदाराकडून हा दरवाजा दुरूस्त करून घेतल्याचा उल्लेख आहे. हा शिलालेख मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स् या वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आला आहे.[८०]

किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ खंडीत वीरगळ आणि भग्न हिंदु देवतांच्या मूर्ती नजरेस पडतात. प्रवेशद्वाराच्या तळाशी देवडीला लागून दोन्ही बाजूस दोन खंडीत मंदिरस्तंभ बसविले आहेत. तटबंदीवरही मंदिराच्या स्तंभाचे अवशेष दिसून येतात.[८१] किल्ल्याचा हा दरवाजा रेवणी पेठेच्या बाजूस असल्याने या दरवाजास 'रेवणी दरवाजा' म्हणतात. रेवणी दरवाजाच्या बाहेरील बाजूस नबीशहाचा प्रसिध्द दर्गा पहावयास मिळतो. ब्रिटिशांनी तयार केलेल्या खंदकावरील लाकडी पुल हा बाजूस असलेल्या दगडी खांबास साखळ दंडाने बांधलेला आहे.[८२] पहिले प्रवेशद्वारातून आत गेले असता दुसरा दरवाजा लागतो त्यास शहर दरवाजा अथवा मधला दरवाजा म्हणतात. या दरवाज्यावर फारशी भाषेतील एक शिलालेख आढळतो. या शिलालेखावर विजापूरच्या दुसऱ्या आदिलशहाने हा दरवाजा बांधल्याचा उल्लेख आहे. हे प्रवेशद्वार चौकोनी असून त्यावर तीन दगडी कमानी आहेत, माथ्याशी तीन झरोका असणारा एक सज्जा आहे.

मंदिराचे अवशेष प्रवेशद्वारासाठी वापरण्यात आल्याचे दिसून येते. या प्रवेशद्वाराच्या आतील डाव्या बाजुस बाळांतीणीची विहिर व बुरूज आहे. या बुरूजाजवळ हत्ती बांधण्याची व उजव्या बाजूस दारूगोळा ठेवण्याची जागा होती. दारूगोळ्यांच्या संग्रहस्थानावर हिंदु मंदिरांचे खंडीत अवशेष बसविलेले आहेत.[८३] महांकाळी प्रवेशद्वाराच्या शेजारी महांकाळेश्वराची दगडी मूर्ती व फुटलेल्या अवस्थेतील नंदी आहे. लोक पाडव्याच्या वेळी या महांकाळेश्वराच्या मुर्तीला शेंदूर लावून पूजा करतात. हा बुरूज सर्वात उंच बुरूज म्हणून प्रसिध्द आहे.[८४]

किल्ल्याच्या बांधकामाच्यावेळी बुरूज ढासळू लागल्याने जोतिषाच्या सांगण्यावरून दर्गो-पाटील घराण्यातील एक गरोदर असलेली जीवंत स्त्री बुरूजाच्या पायाखाली गाडली गेल्याचा उल्लेख आहे. त्याबद्दल या घराण्यास सोलापूर शहराचे पाटीलकीचे वतन वंशपरंपरागत देण्यात आले होते. ज्या बुरूजाखाली स्त्री गाडण्यात आली त्या बुरूजास 'बाळांतीणीचा बुरूज' म्हणून ओळखले जाते. महांकाळी बुरूजाखाली देशमुख घराण्यातील एक मुल गाडल्याने त्या घराण्यास जोशीपणाची वृत्ती देण्यात आली होती.[८५]

किल्यातील मल्लिकार्जून मंदिराशेजारी प्रसिध्द नागबावडी आहे.[८६] किल्ल्याच्या बांधकामानंतर मुस्लिम सत्ताधिशांच्या काळात शिवभक्तांना मल्लिकार्जून मंदिरात दर्शनासाठी जाणे अवघड होऊ लागल्याने मंदिरातील शिवलिंग व मंदिराचे काही अवशेष काढून सध्याचे

बाळीवेशीतील मल्लिकार्जून मंदिर बांधण्यात आले.[८७] तर काही अवशेष किल्ल्यातील बत्तीसखांबी मशिदीच्या बांधकामात वापरले.

छायाचित्र क्र. ३



किल्ल्यातील बत्तीसखांबी मशिदीचे खांब

छायाचित्र क्र. ४



किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिराचे अवशेष
(सौजन्य: जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

सोलापूरचा भूईकोट किल्ला हा काही काळ मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यावेळी सोलापूरच्या किल्लेदाराने पेशवे दरबारला जो पत्रव्यवहार केला होता, त्या पत्रावर किल्लेदाराचा एक गोलाकार शिक्का असे, त्या शिक्क्यावर "श्री सिध्देश्वर चरणी तत्पर" किंवा "श्री सिध्देश्वर चरणी निरंतर" असे लिहून त्या खाली किल्लेदाराचे नाव लिहिले जाई. मिळालेल्या पत्रात रामचंद्र त्रिंबक, विसाजी कृष्ण, उध्दोविरेश्वर इत्यादी किल्लेदारांची नांवे आढळतात.[८९] पेशवाईमध्ये सोलापूर शहराची वसूली देशमुख, देशपांडे करीत असत, त्यांच्याकडे शहरातील जुने विठ्ठल मंदिर आणि रेवणी मारूती मंदिराच्या हिशोबाची माहिती सापडते.[९०] सोलापूर किल्ल्याच्या संदर्भात १० शिलालेख आहेत.[९१] त्यापैकी सहा शिलालेख फारशी भाषेत, तीन देवनागरी लिपीत आणि एक मोडी लिपीत आहे.[९२] या शिलालेखापैकी काही शिलालेख बहामणी काळातील तर, काही शिलालेख आदिलशाही आणि मुघल काळातील आहेत.[९३] या शिलालेखातून सोलापूर शहराच्या धार्मिक इतिहासावर प्रकाश पडतो.

मध्ययुगीन काळातील अनेक घटनावर प्रकाश टाकणारा हा किल्ला इंग्रजांच्या वर्चस्वाखाली आल्यानंतर या किल्ल्यात ब्रिटिशांनी आपली प्रशासकीय केंद्रे, लष्करी व महत्त्वपूर्ण कार्यालये सुरू केली होती. किल्ल्याच्या सभोवताली असणारा खंदक हा हिवतापाचे उगमस्थान बनल्याने इ. स. १८८६ मध्ये इंग्रजांनी हा किल्ला पाडून टाकण्याचे ठरविले होते.[९४] परंतु नगरपालिकेने हा ऐतिहासिक किल्ला जतन करून ठेवण्यासाठी मोठी चळवळ उभी करून इंग्रजांना तीव्र विरोध केला. त्यामुळे मध्ययुगाचा साक्षीदार असणारा हा ऐतिहासिक भूईकोट किल्ला आज आपणांस पहावयास मिळतो.

१.६.३ कंबर तलाव

शहराच्या दक्षिणेकडील बाजूस असणारा महत्त्वाचा तलाव म्हणजे 'कंबर तलाव' होय. या तलावास 'मोतीबाग कंबर तलाव' असेही म्हटले जात. अलिकडील काळात या तलावाचे नामकरण 'धर्मवीर संभाजी तलाव' असे करण्यात आले. या तलावाच्या घाटावर शहरातील धोबी कपडे धुण्यासाठी येतात. त्यामुळे या तलावाला 'धोबी तलाव' या नावानेही ओळखले जाते. ब्रिटिश कालखंडात हा तलाव लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यात होता. रेवणसिध्देश्वर मंदिराच्या पूर्वेस ६८ एकरामध्ये असणाऱ्या या तलावाचे पाणी शहरात आणणे कठीण झाले होते. कारण तलाव लष्कराच्या ताब्यात असल्याने त्यांच्या संमतीशिवाय तलावाचे पाणी शहरात आणणे मोठे जिकरीचे काम होते. तरीही तलावाच्या भरावाच्या पश्चिमेस म्हणजे मोतीबागेत पाण्याचे अनेक झरे होते. त्या

झऱ्यांच्या ठिकाणी ४० फुट व्यासाची व ५० फुट खोल अशी विहिर खणून त्यावर इंजिन बसवून पाईप लाईनद्वारे पाणी गावात आणण्याचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानुसार सन १८५८ च्या डिसेंबरमध्ये सोलापूरचे एक्झिकेटिव्ह इंजिनियरनी या योजनेस मंजूरी दिली. सन १८६३ मध्ये विल्यम ब्लिज व जेम्स् विल्यम मॉटरसेड या दोन युरोपियन गृहस्थांनी पिण्याच्या पाण्यासाठी पाईप लाईन करण्याचा मक्ता घेतला. परंतु त्यांच्याकडून हे काम पूर्ण होऊ न शकल्याने सन १८६४ च्या फेब्रुवारीमध्ये रामस्वामी मुदलिवार यांना हा मक्ता देण्यात आला. सन १८६६ मध्ये त्यांनी हे पाईप लाईनचे काम पूर्ण केले. परंतु लष्करी अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणामुळे या पाईप लाईनद्वारे शहरास पाणी पुरवठा होण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या.[९५] सन १८७६ च्या दुष्काळात या तळ्याचे पाणी मिलिटरी खात्याच्या वस्तीस वापरण्यासाठी कॉन्टनमेन्ट कमिटीने अंदाजे ५,००० रूपये खर्चून हे तळे आणखी खोल करून घेतले.[९६] नंतरच्या काळात ६० एकर जागेतील हा तलाव हळुहळू लहान होत गेल्याचे दिसून येते. या तलावातील पाणी कमळाच्या फुलांसाठी पोषक असल्याने तलावात कमळे फुलत होती. परंतु अलिकडील काळात कपडे धुण्याने तलावातील पाणी दूषित होऊ लागले, त्यामुळे कमळे नष्ट होऊन जलपर्णीची वाढ झाली. असे असले तरी देश विदेशातून वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी या तलाव परिसरात वनविहारासाठी येतात, त्यामध्ये हावीस, कुट्स, शेकाट्या, जांभळ्या रंगाचे मुरहेन, पानकावळा, ब्रान्झ, विंग्ड, ससाणा, बदके, खंड्या इत्यादी पक्षांचा समावेश असतो.[९७] तलावाच्या पश्चिमेस रेवणसिध्देश्वर मंदिर व मुस्लिम पीराचा दर्गाही पहावयास मिळतो.

१.६.४ इंद्रभुवन (सोलापूर महानगरपालिका इमारत)

सोलापूर महानगरपालिकेची इमारत म्हणून ओळखली जाणारी 'इंद्रभुवन' ही वास्तु व्हिक्टोरियन स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे. १५ हजार वर्गफुट बांधकाम असलेल्या या सुंदर इमारतीच्या बांधकामासाठी १३ वर्षांचा कालावधी लागला.[९८] सोलापूरचे प्रसिध्द लिंगायत व्यापारी पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद हे या इमारतीचे निर्माते होते. त्यामुळे ही इमारत 'वारदबंगला' या नावानेही ओळखली जाई.[९९]

या प्रसिध्द वास्तुचे बांधकाम सन १८९९ मध्ये सुरू केले, ते सन १९१२ मध्ये त्यांच्या पश्चात पूर्ण झाले. त्याकाळी जगभरातील उत्कृष्ट इमारतींमध्ये वापरण्यात आलेले अत्याधुनिक बांधकाम

साहित्य या इमारतीसाठी वापरले. आप्पासाहेबांनी स्वतः जगभरातील अनेक देशात दौरे करून इमारतीसाठी लागणाऱ्या सुबक आणि आकर्षक वस्तू आणल्या होत्या. ग्रेनाईट, बेसॉल्ट, शहाबादी इत्यादी दगडांपासून घडविलेल्या या वस्तूंसाठी जगभरातील सर्वोत्कृष्ट स्थापत्य पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.[१००]

छायाचित्र क्र. ५



इंद्रभुवन इमारत
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

वास्तुशास्त्राच्या निकषानुसार बांधलेल्या या इमारतीमध्ये भरपूर सूर्यप्रकाश व हवा यावी अशी सोय करण्यात आली. समोरील बाजूस असणाऱ्या प्रत्येक खांबावर सिंह व वाघाची प्रतिकृती तर कोनाड्यात सुक्ष्म अशी कलाकुसर केलेली दिसून येते. तसेच भिंतीवर विविध देव-दवेता, प्राणी, फुले आणि नृत्य करणाऱ्या महिलांची शिल्पे कोरलेली आहेत. इंद्रभुवन ही इमारत प्राचीन किंवा मध्ययुगीन कालखंडातील कोणत्याही स्थापत्य कलेची प्रतिकृती नसून आधुनिक कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे सात लाख रूपये खर्च झाल्याची माहिती मिळते.[१०१]

सन १९११ मध्ये आप्पासाहेबांचा मृत्यु झाल्याने त्यांचे या वास्तूमध्ये राहण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. सन १९६४ साली सोलापूर नगरपालिकेचे रूपांतर महापालिकेत झाल्यानंतर नवी पेठेतील कार्यालय या इमारतीत हलवले, ते आजतागायत तेथेच आहे. या इमारतीचा गौरव म्हणून सन २००४

साली टपाल खात्याच्या वतीने या इमारतीचे म्हणजेच इंद्रभुवनचे चित्र असलेले टपाल तिकीट काढले. आप्पासाहेबांच्या मृत्युनंतर इमारतीसमोर त्यांचा अर्धाकृती पुतळा बसविलेला आहे.[१०२]

१.६.५ डॉ. द्वारकनाथ कोटणीस स्मारक

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मानवतावादी डॉ. द्वारकनाथ कोटणीस यांचा जन्म १० ऑक्टोंबर १९१० रोजी कोकणातील वेंगुर्ले येथे झाला. कोटणीस कुटुंब मूळचे वेंगुर्ल्याचे, परंतु उदरनिर्वाहासाठी ते सोलापूरात आले. कोटणीस यांचे वडील शांताराम कोटणीस यांनी सोलापूरातील लक्ष्मी-विष्णु गिरणीमध्ये कारकूनाची नोकरी केली.[१०३] सोलापूरातील नॉर्थकोट प्रशालेमध्ये कोटणीस यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन १९३६ साली वैद्यकीय शिक्षण मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून पूर्ण केले. दुसऱ्या महायुध्दाच्या वेळी भारत-चीन वैद्यकीय मोहिमेंतर्गत भारतातून निवड केलेल्या वैद्यकीय पथकात डॉ. कोटणीस यांचा समावेश करण्यात आला होता. चीनी रूग्णांची सेवा करताना अडचणी येऊ नयेत यासाठी डॉ. कोटणीस यांनी चीनी भाषा आत्मसात केली. त्यांनी प्रत्यक्ष रणभूमीवरील जखमीवर उपचार केले. त्यांच्या या कार्याची पावती म्हणून चीनमध्ये आंतरराष्ट्रीय शांततेसाठी उभारण्यात आलेल्या 'बेतहून' रूग्णालयाचे पहिले संचालक होण्याचा मान त्यांना मिळाला. ७ जून १९४२ रोजी त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. प्रत्यक्ष रणभूमीवर जाऊन जखमी सैनिकांवर उपचार करीत असतानाच डॉ. कोटणीस यांचे ९ डिसेंबर १९४२ रोजी निधन झाले. त्यांच्या या कार्यामुळे चीनमध्ये त्यांचा उल्लेख 'काळी आई' असा केला जातो.[१०४]

जात, धर्म, देश यांच्या सीमा ओलांडून केवळ 'मानवधर्म' मानणाऱ्या डॉ. कोटणीस यांचा विवाह चीनमधील परिचारिका शिक्षिका को चिंग लान हिच्याशी झाला. २३ ऑगस्ट १९४२ रोजी को चिंग लानने मुलाला जन्म दिला, त्याचे नाव 'इंगव्हा' ठेवले. 'इंग' म्हणजे 'भारत' आणि 'व्हा' म्हणजे 'फुल' किंवा चीन म्हणजेच भारताचे फुल किंवा भारत व चीन या अर्थाने ठेवलेले हे नांव भारत आणि चीन या दोन देशांमधील प्रेमाचे प्रतिक मानले गेले. डॉ. कोटणीसांनी चीनमध्ये वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी 'जनरल इन्ट्रोडक्शन टु सर्जरी', 'सर्जरी ईन डिटेल' ही पुस्तके चीनी व इंग्रजी भाषेतून लिहिली. डॉ. कोटणीस यांच्या मानवतावादी कार्यामुळेच चीनमध्ये त्यांची भव्य स्मारके व पुतळे उभे केलेले आहेत. त्यांच्या जीवन चरित्रावर चीनी भाषेतून अनेक पुस्तके लिहिली गेली. तसेच त्यांच्या नावाने चीनमध्ये अनेक दवाखानेही उभारण्यात आले आहेत.[१०५] अशा या 'मानवधर्म' मानणाऱ्या

सोलापूरच्या डॉ. कोटणीस यांच्या कार्याचा गौरव म्हणून सन १९४५ मध्ये सोलापूरातील रेल्वे रूग्णालयास डॉ. कोटणीस यांचे नांव देण्यात आले. सन १९८५ साली डॉ. कोटणीस यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त सोलापूर सिव्हील हॉस्पिटलच्या आवारात श्रीमती को चिंग लॉन यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. भैय्या चौकात त्यांचे राहते घराचे नूतनीकरण करून 'डॉ. कोटणीस स्मारक' उभारण्यात आले. या स्मारकाच्या उभारणीसाठी सन १९८७ मध्ये सोलापूर महानगरपालिकेने एक ठराव केला होता. सोलापूर शहरात ९ डिसेंबर १९८५ रोजी पहिल्यांदाच डॉ. कोटणीस यांचा स्मृतीदिन करण्यात आला. यावेळी चीनचे सांस्कृतिक विभाग प्रमुख ली चाओ चेन हे उपस्थित राहिले. सन १९८६ मध्ये पश्चिम बंगालचे तत्कालीन मुख्यमंत्री ज्योती बसू यांनी डॉ. कोटणीस यांच्या भैय्या चौकात असणाऱ्या घराला भेट दिली. चीन सरकारच्या निमंत्रणावरून सन १९८७ मध्ये सोलापूरचे तत्कालीन महापौर बंडप्पा मुनाळे, रविंद्र मोकाशी, रंगाण्णा वैद्य, किशोर देशपांडे, धर्मण्णा सादूल, डॉ. सौ. चितळे यांनी चीनला भेट दिली. या भेटीनंतर डॉ. कोटणीसांच्या भैय्या चौकातील घराचे स्मारकात रूपांतर करण्याचा ठराव करण्यात आला.[१०६]

छायाचित्र क्र. ६



डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

डॉ. कोटणीस यांच्या या स्मारकासाठी राज्य शासनाने १ कोटी ८६ लाख रूपये तर, चीनमधील कामगारांनी दहा हजार अमेरिकन डॉलर्सची मदत दिली. डॉ. कोटणीस यांच्या निवासस्थानाच्या मूळ रचनेत कोणताही बदल न करता हे स्मारक उभारण्यात आले आहे. निवासस्थान व परिसर मिळून १०४०.४० चौरस फुट जागा संपादन केली आहे.

स्मारक परिसरात डॉ. कोटणीस यांच्या जीवनाशी संबंधित विविध वस्तू आणि चित्रे आहेत. या दुर्मिळ छायाचित्रातून डॉ. कोटणीस यांच्या समग्र जीवनाचे दर्शन आपणांस होते. चीन वकीलातीने उपलब्ध करून दिलेली ही चित्रे आणि कृष्ण-धवल छायाचित्रे पाहिल्यानंतर डॉ. कोटणीस यांचे कार्य खरोखरच किती महान व आदर्शवत होते याची आपणांस जाणीव होते. स्मारकाच्या मुख्य इमारतीत काष्टशिल्पाचे सुबक काम केलेले असून इमारतीच्या समोर डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचा सहा फुटी पूर्णाकृती ब्रांझ धातूचा पुतळा बसविण्यात आला आहे.[१०७] हे स्मारक रेल्वे स्टेशन जवळ असल्याने पर्यटकांच्या दृष्टीने अत्यंत सोयीचे असे आहे.

१.६.६ देशमुख वाडा

सोलापूर शहराचा सर्वात जुना आणि मुळ भाग असलेल्या कसबा परिसरात 'देशमुखांचा वाडा' आहे. एक हजार वर्षापूर्वी सोलापूरवर देशमुख यांचे पूर्वज चामलादेवी देसाईची सत्ता होती.[१०८] इ. स. ९३० पासून सोलापूरवर देशमुख घराण्याचा अंमल होता. बहामणी साम्राज्यापासून ते मराठ्यांचा सोलापूर जिल्ह्यात झालेल्या पराभावापर्यंत सोलापूरचे सर्व अधिकार याच देशमुख घराण्याकडे पिढ्यान-पिढ्या राहिले. सोलापूरच्या किल्ल्याचे बांधकाम देशमुख घराण्यातील पूर्वजांच्या देखरेखेखाली झाले होते. पूर्वी देसाई आडनाव असणाऱ्या देशमुख घराण्याला त्यांची जहागिर आणि सोलापूरची वतनदारी यामुळे देशमुख ही पदवी लागली, ती आजतागायत आहे. शहरातील अनेक धार्मिक व सामाजिक उत्सवाची सुरूवात करण्याचा मान या घराण्याकडे आहे. तसेच शहरामध्ये 'गणेचारी' नेमण्याचा अधिकार या घराण्यास होता.[१०९]

तीन एकर परिसरात असणारा आणि तीनशे वर्षांपूर्वी दगड आणि मातीत बांधलेल्या या देशमुखवाड्यात पूर्वी कचेरी, न्यायालय, तुरूंग, घोड्याचा पागा आणि तेथे काम करणाऱ्यांसाठी निवासस्थाने होती. शहरातील सर्व न्यायनिवाडे याच वाड्यात होत आणि आरोपीला शिक्षा झाल्यानंतरही त्यांना या वाड्यात डांबण्यात येत असे.[११०]

अनेक वर्षापूर्वीची परंपरा असलेल्या देशमुख वाड्यातून आजही श्रीशैलला 'कावड' जाते. श्रीशैलला जाणाऱ्या अनेक कावडीमध्ये या देशमुख घराण्याच्या कावडीला पहिला मान आहे. अनेक वर्षापासून सिध्दरामेश्वरांचा योगदंड आजही देशमुख वाड्यात पुजला जातो. सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेली तांब्याची 'गणेश मुर्ती' देशमुख घराण्याचे दैवत आहे. तसेच सिध्देश्वर यात्रेतील पहिली काठी सिध्दरामाची व दुसरी काठी देशमुखांची ही परंपरा अनेक वर्षापासून आजही चालू आहे. जीवंत समाधी घेतलेल्या किरिटेश्वर महाराजांचा तीनशेपन्नास वर्षापूर्वीचा जुना 'किरिट' देशमुख यांच्या वाड्यात जनत करून ठेवला आहे. याच घराण्यातून बाबासाहेब देशमुख नावाचे मल्ल होऊन गेले. शहरातील प्रसिध्द असणाऱ्या श्रध्दानंद तालमीच्या उभारणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता.[१११] असा हा 'देशमुख वाडा' सोलापूरच्या इतिहासात धार्मिक दृष्टीकोनातून भर घालत आहे.

१.६.७ कुंभार वाडा

साडेआठशे वर्षापासूनची परंपरा असलेल्या सिध्दरामेश्वरांच्या यात्रेत या 'कुंभार वाड्याचे' विशेष महत्त्व आहे. या वाड्यातील कुंभार कन्येचा आणि सिध्दरामेश्वरांच्या योगदंडाचा विवाह यात्रा सोहळा म्हणून साजरा केला जातो. हा वाडा उत्तर कसब्यात मल्लिकार्जून मंदिर परिसरात आहे. कुंभार यांच्या घरातील कन्येचा इतिहास महत्त्वाचा असून आठशे पन्नास वर्षापूर्वी योगी सिध्दरामेश्वर ज्या ठिकाणी ध्यानधारणा करायचे, त्याठिकाणी दररोज पहाटे ही 'कुंभारकन्या' गंगाबाई या सडासमार्जन करायच्या. सिध्दरामेश्वरांशी आपला विवाह व्हावा, अशी तिच्या मनात इच्छा होती. ब्रम्हचर्य असलेल्या सिध्दरामेश्वरांनी विवाहास नकार दिला. तिने अधिक हट्ट धरल्यानंतर सिध्दरामेश्वरांच्या योगदंडाशी तिचा विवाह लावण्यात आला आणि तिला सती जाण्याची अट घातली. त्या दिवसापासून हा विवाह म्हणजे चार दिवसांची 'गड्डा यात्रा' होय.[११२]

या वाड्याचे मुळ पुरूष भिमण्णा कुंभार हे होते. परंपरेने यात्रेचा मान सध्या कुंभार यांच्या घरातील बारावी पिढी शिवलिंग कुंभार यांचे पुत्र योगीराज कुंभार यांच्याकडे आहे. सिध्देश्वराची गड्डा यात्रा १० जानेवारीस सुरू होऊन ती १६ जानेवारीला संपते. १० जानेवारी या दिवशी कुंभार यांच्या वाड्यात यात्रेनिमित्त दिवे लावण्यात येतात. याच वेळी छप्पन्न मातीच्या घागरी पुजेसाठी हिरेहब्बु यांच्याकडे देण्यात येतात. १२ जानेवारी रोजी हळदीच्या कार्यक्रमात कुंभार यांच्या वाड्यात गणपतीच्या साक्षीने तेल आणि हळद वाहून पूजा केली जाते. या कलशात जमा झालेल्या तेलाने ६८

लिंगांना 'तैलाभिषेक' घालण्यात येतो. १३ जानेवारी रोजी कुंभार वाड्यात एक गाडगे ठेऊन दुध, दही, तुप, साखर आणि मधाचा अभिषेक घालण्यात येतो. याच दिवशी कुंभार वाड्यातून तेरा 'सुगडांची पुजा' करून मानकऱ्यांना विडे दिले जातात. १४ जानेवारी होम प्रदिपनाच्या दिवशी कुंभार वाड्यातून मातीचा 'तस्त' हिरेहब्बु यांच्याकडे देण्यात येतो. याच दिवशी कुंभारांच्या घरातील महिला पहाटे होम मैदानावर असलेल्या होमकुंडास हळदी, कुंकू वाहून दर्शन घेतात. या सोहळ्याला ब्रिटिशांनी सरकारी यात्रेचा दर्जा दिला असून मानकऱ्यांसाठी काही रक्कम ही मंजूर केली. १८० वर्षापासून या यात्रेचा खर्च एकूण २५१ रूपये ग्राह्य धरला जातो. ही रक्कम शासनाच्या वतीने आजही सिध्देश्वर मंदिर समितीला दिली जाते आणि मंदिर समितीकडून सर्व मानकऱ्यांना रक्कम वाटप करण्यात येऊन त्याची पोहोच घेतली जाते. अनेक मानकऱ्यांपैकी एक असलेल्या कुंभार वाड्यातील सदस्याचा त्यात समावेश आहे.[११३] कुंभार कन्येचा हा वाडा सोलापूरच्या धार्मिक इतिहासात आपली परंपरा जपताना दिसून येतो.

या प्रकरणात सोलापूर शहराच्या भौगोलिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकला असून सोलापूर शहराचा इतिहास, जुने सोलापूर, पेठा व तेथे असणारी धार्मिक व ऐतिहासिक ठिकाणे, वेशी, नगरपालीकेची स्थापना, धर्मवार लोकसंख्या, भाषिक व सांसकृतिक ऐक्य व प्रभाव अशा विविध घटकांचा विचार या ठिकाणी करण्यात आला असून मराठी कानडी आणि तेलगू असा त्रिवेणी सांस्कृतिक समन्वय साधलेला दिसून येतो.

संदर्भ व तळटिपा

१. गॅझिटीयर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १९७७, पृ. १, २.

२. Revenue Department , Vol. III, 1873, P. 3, (B. A.).

दुर्गादेवीचा दुष्काळ - सन १३९६ पासून सन १४०७ पर्यंत दक्षिण भारतात फार मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळात कित्त्येक प्रदेश ओस पडले व हजारो लोक, जनावरे मृत्यूमुखी पडली. या दुष्काळास 'दुर्गादेवीचा दुष्काळ' म्हणून ओळखले जाते.

३. Revenue Department, File Vol. III, 1896, P. 3, (B. A.).

४. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. ७-९.

५. चव्हाण चं. स., सोलापूरची गिरणी कामगार चळवळ (१९००-१९६५), आचार्य जंबूसागर ग्रंथमाला, सोलापूर, २०१३, पृ. १२.

६. जक्कल वि. न., सोलापूर शहराचा इतिहास, सोलापूर समाचार प्रेस, १९२८, पृ. ५.

७. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १८८४, खंड २०, पृ. ४८४, ४८५.

अ) जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. १-३.

ब) सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. ९०.

८. सेन्सेस ऑफ इंडिया, डिस्ट्रिक्ट सेन्सेस हँडबुक, सोलापूर, १९६१, पृ. ४९.

फुटाणे गिरणी - १८९६ मध्ये लक्ष्मी कॉटन मॅन्यूफॅक्चरींग कंपनीच्या कापड गिरणीचे बांधकाम सुरू झाले त्यावेळी शहरात प्लेगच्या साथीने व दुष्काळाने थैमान घातले होते. त्यामुळे बांधकाम करणाऱ्या मजूरांना मजूरीचे पैसे देण्याऐवजी खाण्यासाठी फुटाणे दिले जात असत. यामुळेच या गिरणीला फुटाणे गिरणी या नावानेही ओळखले जाई.

९. कित्ता.

१०. कित्ता, पृ. ५०.

११. कित्ता.

१२. तमिळ - मराठी शब्दकोष, जोशी रमाबाई, जोशी. पु. दी (संपा), म. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, इ. स. १९७६, पृ. २४१, ५२८.

१३. मराठी - कन्नड शब्दकोष, पुंडलीकजी कातगडे (संपा), म. रा. सा. आणि सं. मंडळ मुंबई, १९६९.पृ. १८३, २२८, ४३९, ४९६, ५८८, ५९४.

१४. सिमांत, दिवाळी अंक, सोलापूर, २००८, पृ. ५६.

१५. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. २१६.

१६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, २८ ऑगस्ट २०१२.

१७. कित्ता, ४ ऑगस्ट २०१३.

१८. लिगाडे जयदेवीताई, श्रीसिध्दरामाची त्रिवीधी, कन्नडकोटी प्रकाशन सोलापूर, १९५८, प्रस्तावना पृ ४.

१९. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. २६, २७.

२०. मोगलेवार सुधाकर, विरशैवकोष खंड- १, अ. भा. वी. सा. मं. नागपूर, २००१, पृ. ५४.

२१. संशोधक, (त्रैमासिक), जून २००४, पृ. २१, आनंद कुंभार यांच्या लेखावरून.

२२. महाराष्ट्र राज्य गॅझिटियर इतिहास : प्राचीन काळ, खंड - १, महाराष्ट्र शासन मुंबई, २०१०, पृ. ६६१.

२३. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ४१.

२४. संशोधक (त्रैमासिक), मार्च २००६, पृ. १६.

२५. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड -२०, पृ. ४८५.

२६. महाराष्ट्र राज्य गॅझिटियर इतिहास : प्राचीन काळ, खंड- १, पृ. ६९३, ६९४.

२७. कुलकर्णी ग. प., (संपा.), शतसांवत्सरिक ग्रंथ, सोलापूर, १९५३, पृ. ६.

२८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर , १९७७, पृ. १.

२९. सोलापूर समाचार, १ नोव्हेंबर १९७४, ३० ऑक्टोबर १९७४.

३०. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड -२०, पृ. ४८४, ४८५.

३१. मोगलेवार सुधाकर, उपरोक्त, पृ. ५४.

३२. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड -२०, पृ. ४८८.

३३. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. ९६८.

३४. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड -२०, पृ. ४८८.

३५. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ६.

३६. कुलकर्णी ग. प., (संपा.), शतसांवत्सरिक ग्रंथ, सोलापूर, १९५३, पृ. ३५, ३६.

३७. पुंडे भ. ग (अनु.), औरंगजेबाचा इतिहास, सर सरकार जदुनाथ, मुबई, १९७८, पृ. ५९९.

३८. सोलापूर समाचार, १ मे १९६२.

३९. कित्ता.

४०. सोलापूर समाचार, ३ मार्च १९५९.

४१. ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट ऑफ सोलापूर म्युनिसिपालिटी, १९२०-२१, फाईल नं. एन. ४५९१०, पृ. २.

अ) शतसांवत्सरिक ग्रंथ, पृ. ६६.

रेवणी - सोलापूर शहरात असणाऱ्या भुईकोट किल्ल्याचा खंदक हा १८० फुट रूंदीचा होता. खंदक व जुन्या शहराचा तट यामधील उंचवटयाची जी जमीन होती त्यास 'रेवणी' म्हणत. किल्ल्याच्या उत्तर व पश्चिम बाजूस जी माती उतरणीसारखी टाकलेली होती त्या जागेत एक मारूतीचे मंदिर होते त्यास रेवणी मारूती म्हणून ओळखले जाई.

४२. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ५४.

४३. भारतीय इतिहास संस्कृती मंडळ, त्रैमासिक, वर्ष १८ वे, अंक ४, पृ. ६५.

४४. माने राजा (संपा.), सबकुछ सोलापूर, लोकमत सोलापूर, २०१४, पृ. ९५.

जोडभावी पेठ - शहराच्या नऊ वेशीपैकी असलेल्या कुंभार वेश ही जोडभावी पेठेची प्रमुख ओळख होय. कुंभार वेशमध्ये सध्या असलेल्या चाकोते पेट्रोल पंपाजवळ मंगलकार्यालयाच्या बाजूस दोन विहीरी (बाव) होत्या. या विहीरी जुळया असल्याने या परिसरास जोडभावी पेठ असे नाव पडले. या विहीरी नगरपालिकेने बुजविलेल्या आहेत.

४५. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ३६ ते ५१.

४६. सोलापूर समाचार ज्यूबिली अंक, पृ. १६२.

४७. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. १३५.

४८. Government Dept. Vol. XXV 1860, P. 9, (B. A.).

४९. Bombay Municipal Act.1873, P. 14.

५०. सोलापूर महानगरपालिका स्मरणिका, महापौर सुवर्ण चषक स्पर्धा १९९६,

५१. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर , १९७७, पृ. २१५ - २२२.

अ) दैनिक सकाळ सोलापूर, ३१ मे २०१४.

५२. कुबेर वा. ना., भारताचा स्वातंत्र्यलढाः १९३०-३४, मुंबई, २००२,पृ. २२९.

५३. सोलापूर समाचार ज्यूबिली अंक, पृ. १५९.

५४. इराबत्ती आ. ल., माझ्या आयुष्यातील टिपणे (प्रवास वर्णन व मार्कंडेय चरित्रासह), सोलापूर, १९७१, पृ. ८.

५५. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ४०.

५६. कित्ता, पृ. ५२.

५७. Census of India, Dist. Census Handbook Solapur, 1941, Vol. III, File R.- 14416/1, P. 53, (B. A.).

५८. Census of India, Dist. Census Handbook Solapur, 1911, Vol. II, File No. 31775, P . 105, (B. A.).

५९. Census of India,Dist. Census Handbook Solapur, 1941, Vol. III, File R - 14416/1, P. 20, (B. A.).

६०. Administrative Report of Bombay Presidency, 1926-27, File R - 3106, (B. A.).

६१. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. २०८.

६२. कित्ता, पृ. ४८.

६३. Census of India, Dist. Census Handbook Solapur, 1961, File R ₹ 40016, PP. 49, 50, (B. A.).

६४. जमादार के. एम., इम्पॅक्ट ऑफ अर्बनायझेशन ऑन रूरल लँड युज: अ केस स्टडी ऑफ सोलापूर सिटी अँड इट्स फ्रिंग्झ झोन, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९८२, पृ. ६५.

६५. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ८३.

६६. भारतीय जणगणना रिपोर्ट २०११, सोलापूर जिल्हा, पृ. १६३.

६७. सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत, खंड १, पॉपुलर प्रकाशन मुंबई, १९९३, पृ. २३३.

६८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर , १९७७, पृ. ९७८.

६९. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ८३.

७०. Genaral Dept. File Vol., XVII, 1851,P. 277,(B. A.).

७१. सोलापूर नगरपालिका अहवाल, १९६०, पृ. २०, २१.

७२. सोलापूर समाचार, १४ जानेवारी १९५६.

७३. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४९५.

७४. Genaral Dept. File Vol., XVII, 1851, P. 277, (B. A.).

७५. सोलापूर समाचार, १३ जानेवारी १९५६.

७६. बेंद्रे वा. सि.,(संपा.), महाराष्ट्र इतिहासाची साधने, विभाग १, प्रथम आवृत्ती, १९६७, पृ. १७०.

७७. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ५९.

७८. सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत, खंड १, पॉपुलर प्रकाशन मुंबई, १९९३, पृ. ७८.

७९. गॅझिटीयर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रिक्ट, १९७७, पृ. ७९.

८०. सोलापूर समाचार ज्यूबिली अंक, पृ. ७६.

८१. अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, पृ. ३४.

८२. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४९८.

८३. अकलुजकर लता, उपरोक्त, पृ. २४, २५.

८४. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४९८.

८५. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ५८.

८६. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ४९५.

८७. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ६.

८८. कित्ता.

८९. पेशवा दप्तर पुणे, स. नि. का, पत्र क्र. २९८३.

९०. पेशवा दप्तर पुणे, स. नि. का, पत्र क्र. १९३.

९१. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ५४, ५५.

९२. गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड २०, पृ. ७१ ङ्ग ९४.

९३. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ५४, ५५.

९४. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. १७६.

९५. कित्ता, पृ. ८३, ८५.

९६. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ९.

९७. भूर्के शाम, मुक्काम पोस्ट सोलापूर, १९९४, पृ. ११, १२.

९८. कित्ता, पृ. ८.

९९. कित्ता.

१००. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. ९९५.

१०१. भूर्के शाम, उपरोक्त, पृ. ८.

१०२. माने राजा, (संपा.) सबकुछ सोलापूर, पृ. २०९.

१०३. मोकाशी रविंद्र, थोर आंतरराष्ट्रीय मानवतावादी द्वारकादास कोटणीस सोलापूर, २०११, पृ. २,३.

१०४. दैनिक संचार, सोलापूर, १ जुलै २०१२.

१०५. सिमांत दिवाळी अंक (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मुंबई), सोलापूर, पृ. ४२,४५.

१०६. दैनिक सकाळ, सोलापूर, ९ डिसेंबर २००७.

१०७. दैनिक संचार, सोलापूर, १ जुलै २०१२.

१०८. श्री सिध्देश्वर महात्म्य दर्शन, (प्रकाशक), चनबसवय्या ईश्वरय्या सवामी विभूतीमठ, सोलापूर, पृ. १९.

१०९. सिध्दचेतन स्मरणिका, २००७, गडीनाड साहित्य संमेलन सोलापूर, मराठी विभाग, पृ. १ - ३.

११०. कुलकर्णी स्वराली, सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकांचा टिकात्मक अभ्यास (१२०६-१८०८), अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सोलापूर विद्यापीठ, २००८, पृ. ५५.

१११. माने राजा (संपा.), सबकुछ सोलापूर, लोकमत मीडिया सोलापूर, २०१४, पृ. १६५.

११२. पसारकर, शे. दे. (संपा.), श्री. सिध्देश्वरांची वचने, खंड - १, २०१०, प्रस्तावना, पृ. ११, १२.
अ) श्री सिध्देश्वर चरित्र (संपा.), सुदर्शन सोलापूर, पृ. ५१.

११३. माने राजा (संपा.), उपरोक्त, पृ. १७३.

प्रकरण दुसरे

धर्म व पंथ

अ. क्र	घटक
२.१	**हिंदू धर्म**
	२.१.१ वारकरी संप्रदाय
	२.१.२ दिंडी
	२.१.३ माघवारी पालखी प्रस्थान व रिंगण सोहळा
	२.१.४ सोलापूर शहरातील संत परंपरा
२.२	**वीरशैव (लिंगायत) संप्रदाय**
	२.२.१ महात्मा बसवेश्वर व अनुभव मंटप
	२.२.२ अल्लमप्रभु
	२.२.३ श्री सिध्दरामेश्वर
	२.२.४ वीरशैव पंथाचे आचार व तत्त्वज्ञान
	२.२.५ दासोह
	२.२.६ मठ
	२.२.७ वीरशैव पंथाचे कार्य
२.३	**दत्त संप्रदाय**
२.४	**नाथ संप्रदाय**
२.५	**नागेश संप्रदाय**
२.६	**इस्लाम धर्म**
२.७	**जैन धर्म**
	२.७.१ पंचव्रत व णमोकार मंत्र
	२.७.२ सोलापूर शहरातील जैन धर्म
	२.७.३ सल्लेखना व विविध संस्कार
२.८	**बौध्द धर्म**

२.९	पारशी धर्म
२.१०	ख्रिश्चन धर्म
२.११	शिख धर्म

प्रकरण - दुसरे

धर्म व पंथ

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांच्या सीमेवर असल्याने येथे विविध संस्कृतीचे लोक राहतात. मराठी, तेलगू, कानडी व उर्दू भाषा याठिकाणी बोलल्या जाताता.[१] त्यामुळे विविध भाषा बोलणाऱ्या भिन्नभिन्न संस्कृतींचा मिलाफ येथे पाहावयास मिळतो. ब्रिटीशपूर्व व ब्रिटिश काळात व्यवसायाच्या निमित्ताने आलेल्या मुस्लिम बांधवाचेही वास्तव्य शहरात मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे सोलापूर शहराच्या धार्मिक इतिहासात भाषा, व संस्कृतीने महत्वाचे योगदान दिले आहे.

सांस्कृतिक जीवनाचा एक महत्वाचा घटक म्हणून धर्माला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.[२] धर्म या संकल्पनेला मानवी संस्कृतीच्या इतिहासात सातत्याने महत्त्व दिले गेल्याचे दिसून येते. 'धृ' म्हणजे धारण करणे 'धृ' या धातूपासून धर्म हा शब्द बनला आहे. काळानुसार धर्माच्या अनेक व्याख्या अस्तित्वात आल्या. ऋग्वेदामध्ये 'धृ' या धातूचा अर्थ आधार देणे, पोषण करणे, उचलून धरणे किंवा टिकविणे असा आहे.[३] समाजाचे चांगल्या रीतीने धारण करणारी वागणूक म्हणजे धर्म होय.[४] धर्म हा मानवाचा सर्वत्र सारखाच असतो असे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे मत आहे.[५] ज. वा. जोशी म्हणतात, 'प्रत्येक व्यक्तीमध्ये असणाऱ्या सुप्त ईश्वरी शक्तीला व चैतन्य शक्तीला खऱ्या अर्थाने 'धर्म' प्रतिष्ठा देतो'.[६] समाजाची उन्नती हे धर्माचे साध्य आहे तर धर्म हे साधन आहे. ज्यामुळे समाजाचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष होतो, ते नितीनियम म्हणजे धर्म होय.[७] धर्म आणि मानव यांचे परस्पर संबंध असल्याचे आणि धर्म ही मानवाची सर्वोच्च गरज असल्याचे डॉ. शर्मा यांनी म्हटले आहे.[८] निसर्गातील अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबंध, जीवन व विश्व अथवा निसर्ग अशा अलौकिक शक्तीवर माणसाची श्रध्दा असते. त्या शक्तीचा स्वत:चा अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी, वैयक्तिक अथवा सामाजिक मनप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पध्दती म्हणजे 'धर्म' होय.[९]

महात्मा जोतीबा फुल्यांनी धर्माचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की, 'सत्य ज्याचे कर्म तोच धर्म. धर्म हे संस्कृतीचे सर्वात श्रेष्ठ अंग होय.[१०] राजर्षी छत्रपती शाहू धर्माबद्दल म्हणतात की, देशबंधूची सेवा, परोपकार आणि जनता जनार्दन शोधणे म्हणजे खरा धर्म होय.[११] उदात्त कृत्ये

करण्यासाठी सतत प्रवृत्त असणे म्हणजे धर्म होय, असे स्वामी विवेकानंद म्हणतात.[१२] संत गाडगेबाबांच्या मते ' धर्म सांगायचा नसतो, जगायचा असतो, धर्म ग्रंथात नसतो, जीवनात असतो. ' धर्माचे सार सांगाताना ते म्हणतात की, भूकेल्या जीवाला अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, विवस्त्रांना वस्त्र द्या, बेघरांना आसरा द्या, रोग्यांवर औषधोपचार करा, मुक्या प्राण्यावर दया करा, कष्ट केल्याशिवाय भाकरी खाऊ नका, हाच खरा रांगडा धर्म होय.[१३] ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म अशी टिळकांनी केलेली धर्माची व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही मान्य आहे.[१४]

धर्माचा संबंध हा पवित्र वस्तुंशी असून, धर्माबद्दल आचरणाचे नियम म्हणजे धर्म होय अशी डरखीमची कल्पना होती.[१५] धर्म म्हणजे मानवाची उच्चतम शक्तीबाबतची श्रध्दा होय. या श्रध्देचा अविष्कार, प्रार्थना, भक्ती, सेवा या स्वरूपात होतो तर जीवनव्यापी विश्वनियंत्रक दिव्य तत्त्वाची आराधना म्हणजे धर्म होय.[१६] धर्म भावनेच्या बुडाशी सामाजिकता असते असे मत दुर्गा भागवत यांनी व्यक्त केले आहे.[१७] धर्म म्हणजे समाजाची रचना टिकविण्यासाठी आलेले परंपरागत नियम होय.[१८] धर्म म्हणजे व्रतवैकल्ये, तिर्थयात्रा, भजन पुजन हे नसून यवनांचे पारिपत्य, म्लेच्छांचा उच्छेद आणि स्वराज्याची स्थापना, धर्म म्हणजे समाजाच्या परंपरेचे वैभवाचे रक्षण, लोकांचा उत्कर्ष, मरगळलेल्या मनाला चैतन्य निर्माण करणे, समाजाची आत्मश्रध्दा जागी करणे आणि लोकांना पराक्रमाची विश्वविजयाची प्रेरणा देणे होय.[१९] मनुस्मृतीवरील आपल्या टिकेमध्ये मेघातिथीने वर्णधर्म, आश्रमधर्म, नैमित्तिक धर्म, गुणधर्म अशा प्रकारच्या धर्माचा उल्लेख केला आहे.[२०] तर समर्थ रामदासांनी क्षात्रधर्म, ब्राम्हण धर्म, सेवक धर्म असे भिन्नभिन्न धर्म सांगितले आहेत.

धर्म हे धारण करणारे, जोडणारे, गुंफून ठेवणारे, बांधणारे सूत्र असून हे सूत्र संपूर्ण समाजात सामंजस्य निर्माण करते. धर्माचा संबंध धारणेशी म्हणजे ज्या गुणामुळे, शक्तीमुळे, भावनेमुळे अथवा नियमांमुळे, व्यवस्थेमुळे वस्तूंची धारणा होते, त्याला धर्म म्हणतात.[२१]

हिंदू, बौद्ध, जैन, यहूदी, ख्रिस्त, इस्लाम असे अनेक धर्म अस्तित्त्वात आहेत. या प्रत्येक धर्माची स्वतःची अशी आचारसंहिता तयार झालेली आहे. या आचारसंहितेद्वारे प्रत्येक धर्मसंप्रदायाचे धार्मिक दृष्टीकोन, श्रध्दा, मूलप्रणाली प्रकट होते. या सर्वांमुळे मानवी जीवनाचे नियंत्रण व व्यवस्थापन होते.[२२] वर उल्लेख केलेल्या धर्मातील अनेक पंथ उपपंथाची धार्मिक स्थळे[२३] सोलापूर शहरात दिसून येतात.

२.१ हिंदू धर्म

हा धर्म वैदिक परंपरेतून विकसित झालेला दिसतो, त्यालाच वैदिक, आर्य, वर्णाश्रम किंवा हिंदू धर्म[२४] या नावाने ओळखले जाते. हिंदू धर्मामध्ये अनेक संप्रदाय, पंथ, उपपंथ, धर्मश्रध्दा व सिध्दांत आढळतात. मूर्तीपूजा व यज्ञपुजा, पाठ हा हिंदू धर्मातील महत्त्वाचा भाग असून कुलदेवता, इष्टदेवता इत्यादींचे पुजन हा नित्य आचार धर्माचा भाग मानण्यात येतो. मंदिरांची रचना, मूर्तीची प्रतिष्ठापना, उपासना, सण, उत्सव, दान, व्रत्त-वैकल्ये, तिर्थयात्रा हा हिंदू धर्माचा सामाजिक आविष्कार आहे.[२५] हिंदू धर्मात शैव, वैष्णव, शाक्त, नाथ, महानुभाव, वीरशैव (लिंगायत) असे अनेक संप्रदाय उदयास आले.

सोलापूर शहरातील औद्योगिक प्रगतीनंतर गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि उत्तरेतून उदरनिर्वाहासाठी आलेले लोक या शहरातच स्थायिक झाले.[२६] महाराष्ट्रातील वारकरी पंथाचा प्रभाव अशा या लोकांवर पडल्याशिवाय राहिला नाही.[२७]

२.१.१ वारकरी संप्रदाय

हिंदू धर्मात असलेल्या अनेक भक्ती संप्रदायापैकी वारकरी संप्रदाय हा प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखला जातो. पंढरपूरचा 'विठ्ठल' हे या संप्रदायाचे उपास्यदैवत आहे.[२८] महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडू मधील कानाकोपऱ्यात या संप्रदायाचा प्रसार झाला आहे. वारकरी संप्रदायामध्ये एखाद्या व्यक्तीने गळ्यात तुळशीची माळ घालून वारीचे व्रत स्वीकारले, तर त्यांच्या नंतरच्या पिढ्या हे व्रत सांभाळताना आपणास दिसतात.[२९] महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या तीन प्रांतात भाषाभिन्नता असूनही पंढरपूरचा 'विठ्ठल' या तिनही संस्कृत्यांच्या एकात्मकतेचे प्रतिक असल्याचे दुर्गा भागवत म्हणतात.[३०] वारकरी संप्रदाय म्हणजेच भागवत धर्म होय.[३१]

सोलापूर शहरात विठ्ठल भक्तीची अनेक ठिकाणे आहेत. त्यामध्ये जुने विठ्ठल मंदिर, स्वकुळ साळी समाज विठ्ठल मंदिर, सिध्देश्वर मंदिर परिसरातील विठ्ठल मंदिर, क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर, राधाकृष्ण विठ्ठल मंदिर (काशी कापडी), काकडे विठ्ठल मंदिर, भडंगे विठ्ठल मंदिर, नामदेव समाज विठ्ठल मंदिर, लष्कर विठ्ठल मंदिर त्याचबरोबर विविध मठांचाही समावेश होतो.[३२] सोलापूर शहरात कापड गिरण्यात काम करणारा कामगार वर्ग हा या मंदिर व मठांच्या माध्यमातून या संप्रदायाकडे आकर्षित झाला.[३३]

" वारी " करणारा तो वारकरी होय. ज्ञानदेव व नामदेव यांच्या अभंगातून ' वारीकर ' असा शब्द आला आहे. त्याचेच ' वारकरी ' असे रूप झाले आहे. आले रे आले हरिचे डिंगर। वीर वारीकर पंढरीचे ।।[३४] असे वारीसंदर्भात म्हटले जाते.' वारीकर ' हा निष्ठेने पंढरीची वारी करतो. महाराष्ट्रात जेजूरी, गाणगापूर इत्यादी ठिकाणी नियमितपणे जाणारे लोक आहेत. परंतु त्यांना वारकरी असे म्हटले जात नाही.[३५] राजवाडे यांनी "वारी" या शब्दाशी उत्पत्ती दिली. वारिः - री (प्रवाशांची टोळी) = वारी, पंढरीची वारी म्हणजे पंढरीला जाणाऱ्या प्रवाशांची टोळी. वारकरी म्हणजे वारीला जाणारा प्रवाशी.[३६] अमरकोशात 'वार' या शब्दाचा अर्थ 'समुदाय' अगर संघात असा दिला आहे. यावरून वारकरी म्हणजे वारी करणारा समुदाय होय. ज्ञानेश्वरीत 'वारी' हा शब्द 'फेरा' अगर 'खेप' या अर्थाने आला आहे.[३७] मोल्सवर्थ या शब्दकोशामध्ये 'वारी' शब्दाचा अर्थ "The practice of proceeding regularly at recrning monthly or annual periods on pilgrimage to any sacred place" असा आहे.[३८] प्रतिवर्षी अगर प्रत्येक महिन्याला नियमितपणे पवित्र स्थळांच्या यात्रेस जाण्याची प्रथा म्हणजे 'वारी' होय.

वारकऱ्यांच्या उपासनेचा मार्ग म्हणजे 'वारकरी पंथ' होय.[३९] वारी ही दोन प्रकारची मानली जाते, पंढरीची वारी ही प्रत्येक एकादशीस असते तर दुसऱ्या प्रकारची वारी कार्तिकी एकादशी ही आळंदीची वारी म्हणून प्रसिध्द आहे. या वारीस सोलापूरातून हजारो वारकरी आळंदीस जातात आणि आळंदीहून निघणाऱ्या ज्ञानेश्वराच्या पालखीबरोबर पायी चालत पंढरपूरास येतात म्हणून या वारीस 'आळंदीची वारी' या नावाने ओळखले जाते. यामध्ये पुरूषांबरोबर शहरातील महिला वारकऱ्यांचाही समावेश असतो.[४०] वारकरी पंथाची दीक्षा घेताना लोक गुरूकडून तुळशीची माळ आपल्या गळ्यात घालतात. गळ्यात तुळशीची माळ, कपाळास गोपीचंदनाचा टिळा, बुक्का व खांद्यावर भगवी पताका ही वारकऱ्यांची बाह्यलक्षणे आहेत.[४१]

वारकरी संप्रदायाच्या उपासनेचे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे भजन आणि कीर्तन.[४२] भक्तीसुख साधण्याचा मार्ग म्हणजे भजन होय.[४३] भजन हे भक्तीगीत विविध साधनांच्या सहाय्याने गायले जाते. त्यामध्ये टाळ, वीणा, चिपळ्या या साहित्यांचा समावेश होतो. सर्वसामान्य माणसे भजन गाण्यासाठी एखाद्या मंदिरात एकत्र येतात.[४४] भजन हे मानवी मनाला समाधान देणारे वीणा, टाळ-मृदंगाच्या घोषातील ब्रह्मरस मानले जाते.[४५]

भजनाबरोबरच वारकरी सांप्रदायात नामस्मरणाला व किर्तनालाही तितकेच महत्त्व आहे. नामस्मरण हे नामसंकीर्तन आहे.[४६] वारकरी सांप्रदायात किर्तनाला 'निरूपण' असेही म्हणतात. वारकरी कीर्तन व हरिदासी कीर्तन हे कीर्तनाचे दोन प्रकार आहेत[४७] तर नामस्मरण हे परमात्मा प्रेमाच्या उदयाचे व विकासाचे एकमेव साधन आहे. नामस्मरणात 'स्मरण' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. नामाचाच विस्तार म्हणजे भजन, कीर्तन व वारी होय.[४८] विठ्ठलाच्या नामस्मरणासाठी जाती-पातीचे बंधन नसते. देवापुढे सर्व समान आहेत, सर्वांना ईश्वर भक्तीचा अधिकार आहे.[४९] या विचाराने सोलापूर शहरात या संप्रदायाचे कार्य चालते. शहरात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अनेक किर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक मंडळी होऊन गेली. त्यांनी चालविलेला या संप्रदायाचा वारसा नंतरच्या वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर जपून ठेवला आहे. ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज यांनी 'मुक्ताई वारकरी शिक्षण संस्था' स्थापन करून किर्तनकार व प्रवचनकार निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे.[५०]

किर्तनाबरोबरच वारकरी संप्रदायात भारूडाला अत्यंत महत्त्व आहे. भारूड रचना हे नाथांचे खास वैशिष्ट्य असून नीती व धर्म यांच्या लोकशिक्षणाचे अत्यंत प्रभावी साधन म्हणून नाथांनी ते कुशलतेने वापरले आहे. भारूडातून समाज प्रबोधनाचे कार्य अत्यंत कुशलतेने होते.[५१] शहरातील विविध वारकरी मंडळी भजन व किर्तनाच्या जोडीला भारूडाच्या कार्यक्रमाचे आयोजन करतात. भारूडाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती, वाईट चालीरिती इत्यादीं विषयी प्रबोधन केले जाते. भारूडकारामध्ये देविदास जगताप, नागनाथ पाटील, बजरंग डांगे, गार्गीताई काळे, सरस्वती आगलावे इत्यादी पुरूष व महिलांचा त्यात समावेश होतो.

२.१.२ दिंडी

'दिंडी' या शब्दाचे लहान दरवाजा व पताका असे दोन अर्थ आहेत. भजनी मंडळातील एक व्यक्ती दिंडी नावाचे एक वाद्य (वीणा) वाजवित पुढे जातो व बाकी त्याच्या मागोमाग जातात म्हणून त्या मंडळाला 'दिंडी' असे म्हणतात. दिंडीतील वारकरी दोन रांगा करून समोरासमोर उभे राहतात आणि दिंडी (वीणा) व मृदंग वाजविणारे त्या रांगाच्या बाजूला टाळ घेऊन उभे असतात. टाळ व मृदंग यांच्या साथीवर तोंडाने भजन म्हणत व मागे-पुढे पावले टाकीत ते हळुहळू मार्गक्रमित असतात. मधून-मधून 'विठ्ठल' नामाचा गजरही होतो. हा नाच साधा पण प्रेक्षणिय असतो. दिंड्यामधून

पुरूषांच्या बरोबरीने वारकरी स्त्रियाही सहभागी होतात. हे सर्व वारकरी भजन करीत नाचत पंढरपूरास जातात. वारकरी संप्रदायाच्याद्वारे सोलापूर शहरातून व परिसरातून अनेक दिंड्या पंढरपूरास विठ्ठलाच्या भक्तीच्या ओढीने जातात. पंढरपूरास येणाऱ्या दिंड्या या मोठ्या प्रमाणावर आषाढी, कार्तिकी आणि चैत्री एकादशीस येतात. परंतु सोलापूर शहराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माघवारीस मोठ्या प्रमाणावर दिंड्या पंढरपूरास जातात.[५२]

वारकरी परंपरेत पिढ्यानपिढ्या सेवा करणारे भक्त पाहावयास मिळतात. प्रतिकुल परिस्थितीचा व गैरसोयीचा विचार न करता आपण स्वीकारलेले कर्तव्य निष्ठेने पूर्ण करणे गरजेचे असल्याने प्रत्येकाच्या मुखावर प्रसन्नता दिसून येते. अत्यंत तळमळीने प्रत्येक वारकऱ्याचे लक्ष पालखी प्रस्थान सोहळ्याकडे असते. 'माघवारी पायी दिंडी सोहळा' हा पारंपारिक वारसा सोलापूरला मिळाला आहे. माघवारीला जवळजवळ २५० वर्षांची परंपरा लाभलेली आहे. या परंपरेला ह. भ. प. नाशिककर महाराज यांच्या प्रेरणेने प्रोत्साहन मिळाल्याचे दिसून येते.[५३] ह. भ. प. माधव आप्पाजी वैद्य उर्फ नाशिककर महाराज हे नाशिककर दिंडीचे मूळ पुरूष होते. शहरातील नाशिककर महाराज, ह. भ. प. परशुराम मास्तर, ह.भ.प. औसेकर महाराज व गुंडामहाराजांच्या दिंडीबरोबर हजारो वारकरी पंढरपूरास जात.[५४]

२.१.३ माघवारी पालखी प्रस्थान व रिंगण सोहळा

माघवारीला सोलापूर शहरातील दिंड्या सुरूवातीला स्वतंत्रपणे पंढरपुरास जात. अशा सर्व दिंड्या एकत्रित करून 'पालखी प्रस्थान सोहळ्याचा कार्यक्रम' अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या माध्यमातून ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज व त्यांचे सहकाऱ्यांनी सन २०१० पासून सुरू केला. या कार्यामध्ये ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज चव्हाण, प्रकाश महाराज व्यवहारे, शिवाजी महाराज शिंदे, ज्योतिराम चांगभले, शिवाजी व्हनकडे, बळीराम जांभळे, ह.भ.प. प्रभाकर वाघचौरे, ह.भ.प. नंदू महाराज रणशूर, ह.भ.प. श्रीहरी महाराज वैद्य (नाशिककर) यांचेही सहकार्य लाभते.[५५]

माघ शुध्द षष्टीला सर्व दिंड्या पद्मशाली समाजाचे दैवत मार्कंडेय मंदिरात एकत्रित येतात. तेथून त्या दिंड्या साठे चाळीतील महादेव मंदिरात येऊन, रथसप्तमीला या दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. तिऱ्हेमार्गे जाणाऱ्या या दिंड्यामध्ये सुमारे ४५ दिंड्यांचा समावेश असतो.[५६] सोलापूरहून तिऱ्हे मार्गे पंढरपूरकडे रवाना होणाऱ्या या दिंड्या मार्गावरील कामती, भिमा सहकारी साखर

कारखाना (टाकळी सिकंदर) आणि सुस्ते या ठिकाणी मुक्काम करतात. त्यावेळी मुक्कामाच्या ठिकाणी ग्रामस्थ या वारकऱ्यांची मनोभावे सेवा करतात. याठिकाणी भजन, कीर्तन व भारूडाचा कार्यक्रम आयोजित केला जातो याचा आजुबाजूच्या गावातील हजारो बांधव लाभ घेतात.[५७]

रिंगणसोहळा हे दिंडीचे प्रमुख आकर्षण असून, हे रिंगण 'गोल रिंगण' आणि 'उभे रिंगण' अशा दोन प्रकारचे असते. वारकरी संप्रदायाच्या इतिहासामध्ये फक्त आषाढी वारी मध्ये हा रिंगण सोहळा दिसून येतो. परंतु 'सोलापूर पालखी प्रस्थान सोहळ्याच्या' वतीने माघ वारीला रिंगण सोहळा आयोजित केला जातो. पालखी प्रस्थानापूर्वी म्हणजेच माघ शुध्द "षष्ठीला" शहरातील होम मैदानावर गोल रिंगण सोहळा पार पडतो. पालखी मार्गावर पाठकर वस्ती कुरूल, भिमा सहकारी साखर कारखाना टाकळी सिकंदर व दत्त विद्यालय सुस्ते या ठिकाणी 'गोल रिंगण' सोहळा होतो. बोधले महाराज मठापासून पंढरपूरातील दगडी पुलापर्यंत दशमीला उभे रिंगण होते. यामुळे वारकऱ्यांची मरगळ तर दूर होतेच शिवाय वारकरी संप्रदायाच्या कार्याला उभारी मिळते. रिंगण सोहळ्यासाठी सौदागर जगताप, विठ्ठल मंदिर भजनी मंडळ गवळी वस्ती सोलापूर यांनी स्वतः अश्व खरेदी केले आहेत. ते वर्षभर अश्वांना सांभाळून माघवारी सोहळ्यात सेवाभावातून अश्व हजर करतात.[५८]

शहरातील 'रामकृष्ण हरी वारकरी सांप्रदायिक संकिर्तन दिंडी सोहळ्याचे' आधारस्तंभ ह. भ. प. श्रीनिवास कंदी महाराज यांनी माघवारी पायी दिंडी सोहळा सुरू केला. त्यांच्यानंतर या दिंडीची सर्व जबाबदारी ह. भ. प. रमेश महाराज शिवापूरकर यांच्यावर सोपविण्यात आली. ही जबाबदारी ते निष्ठेने व श्रध्देने पार पाडतात. अनेक अडचणीवर मात करीत शिवापूरकर महाराजांनी प्रत्येक महिन्याची वारी सुरू केली. पंढरपूरास जाणाऱ्या अनेक दिंड्या सोलापूर शहरात येऊनच पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. अनेक वर्षापासून शेगांव येथून येणारी गजानन महाराजांची दिंडी सोलापूर शहरात दोन दिवस मुक्कामी असते. शहरातील उपलप मंगल कार्यालयात जगन्नाथ उपलप व त्यांचे कुटुंबीय या पालखीतील वारकऱ्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करतात. काडादी हायस्कूल या ठिकाणी लिंगायत समाजाकडून पालखीतील वारकऱ्यांची सेवा केली जाते. शहरातील दमाणी नगर भागातील रायचूरकर कुटुंबीय तिसऱ्या दिवशी दिंडीतील लोकांसाठी सकाळच्या जेवणाची व्यवस्था करतात. अनेक वर्षापासून शहरातील नाभिक संघ या दिंडीतील वारकऱ्यांची हजामत व दाढी मोफत करतात. यामध्ये पांडुरंग चौधरी यांची भूमिका महत्त्वाची असते.[५९]

२.१.४ सोलापूर शहरातील वारकरी सांप्रदायाचे कार्य

वारकरी सांप्रदायामुळे येथे संतपरंपरा निर्माण झाल्याचे दिसून येते. नाशिक जिल्ह्यातील लासलगांव येथील सद्‌गुरू माधव महाराज (वैद्य) नाशिककर हे आपल्या माता-पित्याचे २१ वे अपत्य होते. त्यांचे पूर्वज पेशव्यांचे सरदार होते. त्यांचे मुळ आडनांव गाडगीळ परंतु त्यांच्या घराण्यात वैद्यकीय व्यवसाय असल्याने वैद्य आडनाव रूढ झाले. सोलापूर शहरातील वकील श्री पै यांच्यावर त्यांचा प्रभाव पडल्याने त्यांनी बाबासाहेब नाशिककर यांच्याकडून अनुग्रह घेतला. सोलापूर शहरात आल्यानंतर अनेक वर्षे ते चौपाड (सध्याचे चौपाड विठ्ठल मंदिर) भागात राहिले. ते संत वाङ्‌मयाचे गाढे अभ्यासक आणि उत्तम कीर्तनकार व प्रवचनकार होते.त्यांच्या कीर्तनाला शहरातून अनेक लोक गर्दी करत. यामध्ये शहरातील जुन्या मिलचे मालक नरोत्तम शेठ आणि तत्कालीन ब्रिटिश अधिकारी यांचाही समावेश होता.

चौपाड विठ्ठल मंदिर आणि भडंगे विठ्ठल मंदिराच्या स्थापनेमध्ये नाशिककर महाराजांचा मोलाचा वाटा होता. नाशिककर महाराजांनी चौपाड येथे वैशाख शुध्द द्वादशी शके १८५७ रोजी नाम सप्ताह साजरा करून 'श्री विठ्ठल-रूक्मिणी' मूर्तीची प्रतिष्ठापना केली आणि तेथेच आपला शिष्य संप्रदाय वाढविला. नंतरच्या काळात त्यांनी नाशिककर महाराज मठाची स्थापना करून त्याही ठिकाणी 'श्री विठ्ठल-रूक्मिणी' मूर्तीची प्रतिष्ठापना केली. आज या मठाच्या माध्यमातून त्यांचा वारसा त्यांच्या चौथ्या पिढीतील सद्‌गुरू श्रीहरी महाराज नाशिककर हे चालवित आहेत. श्रीहरी महाराज हे 'अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर' या संस्थेचे संपर्क प्रमुख म्हणून कार्य करीत आहेत.[६०]

वडार समाजात जन्माला येऊन शहरात वारकरी संप्रदाय वाढविण्याबरोबरच स्वत:च्या जातीचा उध्दार करून समाज प्रबोधन करण्याचे कार्य ह.भ. प. लक्ष्मण धोत्रे महाराज यांनी केले. मद्यपान व मांसाहाराशिवाय ज्यांनी दुसरा धंदा केला नाही, अशा वडार समाजातील लोकांच्या घरासमोर तुळसी वृंदावन उभारण्याचे कार्य महाराजांनी केले. नेहमीच ढोलकीच्या नादात डुलणाऱ्या वडार समाज बांधवांना त्यांनी हरिभक्तीचा नाच शिकविला. ह. भ. प. लक्ष्मण धोत्रे महाराज हे ह. भ. प. एकनाथ आप्पा वासकर महाराजांच्या फडाचे अनुयायी व उत्तम किर्तनकार होते. त्यांचा संत वाङ्‌मयाचा गाढा अभ्यास होता. व्यसनाधीन असलेल्या लोकांना अध्यात्माचा मार्ग दाखवून सामाजिक सुधारणा करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला. समाजाच्या वतीने मारूतीचे मंदिर व मठ

बांधून लोकांना मंदिराच्या व मठाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाकडे वळविले. माघ वारीच्या दिंडीची परंपरा सुरू करून लोक नेहमी भगवत भक्तीमध्ये कसे रममाण राहतील याचा दीर्घकालीन विचारही त्यांनी केला. लक्ष्मण महाराजांच्या या धार्मिक व अध्यात्मिक कार्यामुळे शहरात असणारा वडार समाज आपली जुनी रूढी, परंपरा विसरुन सद्मार्गास लागल्याचे पहावयास मिळते.[६१]

शहरात स्थायिक झालेल्या पद्मशाली समाजात हातमागाच्या व्यवसायाला जोड म्हणून महिला विड्या वळण्याचा व्यवसाय करीत. विड्या वळताना स्त्रिया काही गीते गुणगुणताना दिसून येतात. ही गाणी तेलगु आणि मराठी संस्कृतीशी मिळती-जुळती असल्याचे दिसते. सन १९०० सालापासून पद्मशाली समाजाचे लोक पंढरपूरास वारीच्या निमित्ताने जाऊ लागले. या समाजातील चिन्नय्याप्पा उडता व कृष्णप्पा गुजर यांनी पंढरपूरास जाणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देण्याचे काम केले.[६२] निरंजन स्वामी आणि नाशिककर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने पद्मशाली समाजाची पहिली दिंडी माघ शुध्द ७ शके १८७६ रोजी पंढरपूरास पायी गेली. या दिंडीत सुमारे १५० ते २०० स्त्री - पुरूष वारकऱ्यांचा समावेश होता. या पवित्र कार्यास प्रोत्साहन म्हणून समाजातील विठोबा सायण्णा भंडारी यांनी चांदीचे पाच तोडे आणि एक कळस दिंडीस भेट म्हणून दिला. तसेच यल्लप्पा गुंडला यांनी मुख्य पताकासाठी एक पितळी काठी दिली, तर अंतम्माबाई मारूतीराव गुंटुंक यांनी या पहिल्या दिंडीकरीता एक तांब्याची घागर दिली. अशा रितीने सुरू झालेली ही पद्मशाली समाजाची दिंडी 'श्री मार्कंडेय पद्मशाली दिंडी' या नावाने आजतागायत चालू आहे.

३५ वर्षापासून सोलापूर शहाराची मानाची ' श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थानाची ' सेवा श्री मार्कंडेय दिंडीकडेच आहे. सदर प्रस्थानास शहरातील विविध भागातून दिंडीचे प्रमुख व वारकरी मोठ्या संख्येने मार्कंडेय मंदिरात उपस्थित राहतात. त्यानंतर रथसप्तमीच्या दिवशी सायंकाळी मार्कंडेय मंदिरातून सर्व दिंड्यांचे पंढरपूरास माघी वारीसाठी एकत्रित प्रयाण होते. मार्कंडेय दिंडीच्या माध्यमातून 'श्रीविठ्ठल रूक्मिणी' आणि 'श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज मंदिर' बांधण्यात आले.

शंभर वर्षापूर्वीची पद्मशाली समाजाची ही दिंडी प्रगतशील होण्यामागे समाजातील अनेक लोकांचे बहुमुल्य असे योगदान राहिले आहे. त्यामध्ये ह. भ. प. तुकाराम वड्डेपल्ली, ह. भ. प. नारायण कोटा, ह. भ. प. एकनाथ संगम, ह. भ. प. राजमल बोमड्याल इत्यादी महाराजांचा त्यात समावेश होतो.[६३] पंढरपूरास जाणाऱ्या पद्मशाली समाजातील वारकऱ्यांची पंढरपूर येथे राहण्याची

व्यवस्था व्हावी म्हणून एक धर्मशाळा बांधली आहे. ही धर्मशाळा बांधण्यामध्ये वारकरी दांपत्य अंतम्मा गुंटुंक व मारूतीराव गुंटुंक यांचा मोलाचा वाटा होता.[६४] या समाजात अनेक किर्तनकार व प्रवचनकार होऊन गेले. त्यामध्ये सिद्रामप्पा सायण्णा सोमा, गोविंदप्पा सिद्रामप्पा सग्गम, एकनाथ तुकाराम सग्गम, बसवय्या मुशन इत्यादींचा समावेश होतो. नरसय्या व्यंकटरामय्या गज्जेली आणि मल्लय्या बोगा हे वेदांतावर प्रवचन करणारे प्रवचनकार म्हणून ओळखले जात.

पद्मशाली समाजातील विडी कामगारांमध्ये भक्तीभाव व सद्भावना जागृत करण्यासाठी विडी कारखान्यात जाऊन किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून लोकजागृती व समाज जागृती करण्याचा प्रयत्न पुरूषांप्रमाणे महिलांही करीत होत्या. यामध्ये प्रभावतीबाई महादेव मॅकल, कमलाबाई अन्नम, राजमनी शिवलिंगप्पा वंगारी, अनुसयाबाई सिद्रामप्पा सारंगी, सुशिला नारायण कुसूर, राधाबाई जिंदम इत्यादी महिलांचा समावेश होता. या महिला काम करणाऱ्या लोकांचा वेळ वाया जाऊ नये व त्यांच्यामध्ये भक्तीभावाबरोबरच लोकजागृती व समाजजागृती व्हावी यासाठी शहरातील निरनिराळ्या विडी कारखान्यात जाऊन धार्मिक प्रवचन करीत असत.[६५] अशा प्रकारे श्रमाबरोबर श्रवण करणाऱ्या या कष्टकरी पद्मशाली समाजात वारकरी संप्रदायाच्या कार्याबरोबरच लोकजागृतीचे कार्य आजही अखंडपणे चालू आहे. मुळात तेलगु असलेला हा समाज आपली मुळची संस्कृती जपत महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीशी एकजीव झाला.

उत्तम किर्तनकार, म्हणून ओळखले जाणारे शहरातील ह. भ. प. अनंत इंगळे महाराज यांनी इ. स. १९८० साली 'संत मुक्ताई भजनी मंडळ' स्थापना करून माघ वारी दिंडी सुरू केली. वडीलांनी सुरू केलेल्या वारकरी सांप्रदायाच्या कार्यात भर घालण्याचे काम त्यांचे पुत्र सुधाकर इंगळे महाराज हे सातत्याने करीत आहेत. आळंदीमध्ये ज्याप्रमाणे वारकरी सांप्रदायाचे शिक्षण दिले जाते त्याच धर्तीवर सोलापूर शहरात सुधाकर महाराजांनी 'संत मुक्ताई वारकरी शिक्षण संस्था' सुरू केली. या संस्थेत १० ते १६ वयोगटातील ५५ बाल वारकरी विद्यार्थ्यांना मोफत अध्यात्मिक शिक्षणाच्या जोडीला मृदंग, टाळ, तबला, वीणा, चिपळी, पेटी ही वाद्ये वाजविण्याबरोबरच अभंग, हरिपाठ, दासबोध, विचार चंद्रोदयाचे श्लोक, संतांचे चरित्र, रूपावली, भजन, किर्तन व प्रवचन यांचे शिक्षण दिले जाते. किर्तन, प्रवचन, गायन, वादन इत्यादीं परीक्षाही या सर्व विद्यार्थ्यांना द्याव्या लागतात. यामुळे अध्यात्मिक शिक्षण संस्थेत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा प्रचलित असलेल्या शिक्षण संस्थेमधील शिक्षणाप्रमाणे धडे

गिरविताना दिसून येतो. भविष्यात सदर विद्यार्थ्यांना अर्थाजनासाठी उपयोग होतो. या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या वारकरी विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रवचन व किर्तन कार्यक्रमांसाठी नेले जाते.

मुक्ताई शिक्षण संस्थेचा दिनक्रम पहाटे पाच वाजल्यापासून सुरू होतो. पहाटे पाच ते सहा मृदंग वादनाचा सराव, त्यानंतर प्राणायाम, जपनाम, ध्यान इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. आठ वाजता श्रीमद्भगवद्गीतेचे पठण, गुरूमंत्र, रामकृष्ण जप, ओंकार पुष्पाजंली, ज्ञानदेव, महादेव, मुक्ताई, विठ्ठल-रूक्मिणीची आरती, विचार चंद्रोदयाचे पठण व प्रवचन होते. ११ ते ५ शालेय शिक्षणाचे वर्ग, संध्याकाळी ६ वाजता हरिपाठ, ७ वाजता गायन भजनाचा सराव, त्यानंतर रात्री दहा वाजेपर्यंत शालेय अभ्यास घेतला जातो. झोपण्यापूर्वी पुन्हा नामस्मरण केले जाते. या संस्थेची सर्व जबाबदारी सुधाकर इंगळे महाराज सांभाळतात. या संस्थेतून भावी वारकरी पिढी तयार होत आहे.[६६]

२.२ वीरशैव (लिंगायत) संप्रदाय

प्राचीन महाराष्ट्रातील शिवोपासक संप्रदायापैकी लिंगायत हा एक संप्रदाय आहे. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सरहद्दीवर बेळगांव, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या परिसरात मोठ्या प्रमाणावर हा संप्रदाय विस्तारलेला आहे.[६७] शिव हे या संप्रदायाचे आराध्य दैवत असून, शिवाची अन्योन्यभक्ती हे या संप्रदायाचे प्रमुख साध्य आहे. दक्षिणेत भक्तीच्या पायावर अधिष्ठित असलेली शिवोपासना किती तरी प्राचीन काळापासून रूढ आहे. वीरशैवांच्या भक्तीमागे विशिष्ट तत्त्वज्ञान, आचार, सामाजिक समता, देशी भाषांचा पुरस्कार इत्यादी बाबतीत एक चौकट निर्माण होऊन ती परंपरेने अखंडपणे चालत राहिली. म्हणून या भक्तीमार्गास संप्रदायाचे स्वरूप प्राप्त झाले.[६८]

वीरशैव आणि लिंगायत या दोन प्रमुख नावानी समाजात परिचीत असलेला हा संप्रदाय लिंगवत, लिंगानुभव, लिंगपंथ, इष्टलिंग, जंगम, शरण, वचन, बसव, शक्ती विशिष्टाद्वैत, षट्स्थळ, आगम, शिवानुभव, शिवपथ, शिवसमय, शिवाद्वैत, शिवाचार, शिवयोग, शिवधर्म अशा विविध नावांनी ओळखला जातो.[६९] अल्लमप्रभुची वीरशैव प्रणाली, रेवणसिध्द, मरूळसिध्द इत्यादींच्या शिष्य परंपरेने बसवेश्वरांपर्यंत आल्यानंतर इ. स. ११६० च्या सुमारास बसवेश्वरांनी वीरशैव (लिंगायत) पंथाला निश्चित स्वरूप दिले.[७०] लिंगायत लोक हे बसवेश्वरांच्या अगोदर क्वचित ठिकाणीच आढळत होते. इतर मतातील लोकांना वीरशैव मतात आणण्याचे काम बसवेश्वरांनी आरंभिले.[७१]

मराठीतील वीरशैवाचे बरेचसे मध्ययुगीन वाङ्मय नष्ट झाले असले तरी काही महत्त्वाचे ग्रंथ शिल्लक आहेत. त्यामध्ये 'सिध्दांत-शिखामणी', 'विवेक चिंतामणी परमरहस्य' आणि 'लिला विश्वंभर' इत्यादी ग्रंथाचा समावेश होतो. या ग्रंथांना 'ग्रंथपंचक' म्हणून मराठी वीरशैवात विशेष महत्त्व आहे. या सर्व ग्रंथामध्ये रेणुकाचार्य लिखित 'सिध्दांत-शिखामणी' हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. कारण या ग्रंथात वीरशैव संप्रदायाची प्राचीनता पहावयास मिळते. वीरशैव संप्रदायाचा धर्मग्रंथ म्हणून प्रसिध्द असलेल्या 'सिध्दांत-शिखामणी' या संस्कृत भाषेतील ग्रंथाचे विविध भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. या ग्रंथाचे मराठी भाषांतर सोलापूरातील श. दे. पसारकर यांनी केले आहे.[७२]

वीरशैव या शब्दातील 'वी' या धातूचा अर्थ व्याकरणकार पाणिनी यांनी 'गती' असा दिला आहे तर काही ग्रंथातून 'वी' धातूचा अर्थ 'विद्या' असा दिला आहे. 'र' चा अर्थ रमणे अर्थात आनंद घेणे असा होतो. 'वी' या शब्दापासून निघणाऱ्या विद्या या अर्थानुसार शिवजीवाचे लिंगाचे एकत्त्व सांगणाऱ्या विद्येत जो शिवभक्त रमतो तोच 'वीरशैव' होय.[७३] शैव पंथातून उदयास आलेल्या शिवाला दैवत मानून त्याचे प्रतिक असलेल्या शिवलिंगाची पूजा करणाऱ्या जहाल स्वरूपाच्या धर्माला 'वीरशैव' म्हणून ओळखले जाते.[७४] वीरशैवांसाठी लिंगायत हा शब्द सर्वत्र वापरला जातो. अंगावर नित्य लिंगधारणा करण्याच्या प्रथेवरून हा शब्दरूढ झाला आहे. लिंगायत या शब्दाची व्याख्या करताना लिंगानंद स्वामीजी म्हणतात की, 'इष्टलिंग धारण करणारा तो लिंगवत'. गुरूने दिक्षाविधीतून दिलेल्या इष्टलिंग धारणेशिवाय कोणालाही लिंगायत म्हणता येणार नाही. लिंगायत या शब्दाचा मुळ अर्थ (लिंग + आयत) लिंगेन आयत 'लिंगायत' म्हणजेच इष्टलिंग धारण करतो तो लिंगायत होय.[७५] लिंगायत पंथांचा ज्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार केला त्यामध्ये श्री बसवेश्वर, श्री अल्लमप्रभु, श्री सिध्दरामेश्वर, चन्नबसवेश्वर आणि अक्कमहादेवी या पाच विरक्तांचा समावेश होतो.[७६]

२.२.१ महात्मा बसवेश्वर व अनुभव मंटप

१२ व्या शतकात कर्नाटक राज्यात तत्कालीन समाज व्यवस्थेच्या विरूध्द विद्रोह करणारे संत बसवेश्वरांचा जन्म सनातनी हिंदु धर्मीय घराण्यात झाला असला तरीही, त्यांनी हिंदु धर्मातील तत्कालीन सामाजिक व धार्मिक वर्णव्यवस्थेला प्रचंड विरोध केला, तसेच होम-हवन, यज्ञ, अग्निपूजा निषिध्द मानली.[७७] बसवेश्वरांना कोणीही वीरशैवाची दीक्षा दिली नाही तर, ते स्वतःच

वीरशैव झाले. त्यांनी नव्या धर्माची स्थापना न करता जुन्या शैववादात क्रांतीकारक बदल घडवून त्याला नवे रूप दिले.[७८]

बसवेश्वर हा बिज्जलांचा मुख्यमंत्री होता, त्यांचा काळ हा वीरशैव संप्रदायाच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.[७९] बिज्जलांची पहिली राजधानी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे ही होती. या ठिकाणच्या राज्यव्यवस्थेची जबाबदारी बसवेश्वरांवर होती. इ. स. ११३२ ते इ. स. ११५३ या काळात ते मंगळवेढा येथे राहत होते.[८०] अंध:विश्वास जोपासणाऱ्या आणि रूढीवादी, धार्मिक, सामाजिक व्यवस्थेला विरोध करणारे महान क्रांतीकारक म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. त्यांनी धर्म, वर्ग, वर्ण, वंश, जात, लिंग, व्यवसाय अथवा अन्य सामाजिक भेदभाव आणि त्यातून निर्माण झालेल्या श्रेष्ठ-कनिष्ठ प्रवृत्तींना निकराचा विरोध केला. स्त्री आणि पुरूष यांची योग्यता समान मानावी, दोघांचे हक्कही सारखेच मानावे, प्रत्येक मानावाला व्यवसाय स्वातंत्र्य असून, कोणताही व्यवसाय हा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असूच शकत नाही. मोक्ष, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, दैव, कर्म यासारख्या गोष्टी अनुभववादी, प्रत्यक्षवादी, विज्ञानवादी दृष्टीकोनातून पाहण्याचा आग्रह बसवेश्वरांनी धरला होता.[८१] बसवेश्वरांच्या या विचारांचा प्रभाव सोलापूर शहरावर पडल्याने पुढील काळात शहरात वीरशैव संप्रदाय वाढीस लागला.

महात्मा बसवेश्वरांनी अठरा-पगड जातीतील स्त्री-पुरूषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी १२ व्या शतकात कर्नाटकातील कल्याणी येथे 'अनुभव मंटप' नावाचे सामाजिक व सांस्कृतिक विचारपीठ निर्माण केले. या अनुभव मंटपात स्त्री-पुरूष मिळून ७७७ सदस्य होते, त्यामध्ये सुमारे ७७ स्त्रिया होत्या. या स्त्रियांनी अनुभव मंटपात राहून वीरशैव पंथाची दिक्षा घेतली होती. या सभासदांमध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, वय, वर्ग, व्यवसाय, भाषा इत्यादींबाबत कोणताही भेदभाव नव्हता या मंटपात सहभागी होणाऱ्या पुरूषांना 'शरण' व स्त्रियांना 'शरणी' असे संबोधले जात.[८२] कल्याणीचा अनुभव मंटप हे शिवभक्तांचे परमार्थाचे, तत्त्वचर्चेचे केंद्र बनले. श्रेष्ठ शिवयोगी अल्लमप्रभु हे सन ११६२ मध्ये या पीठाचे आचार्य होते.[८३] सोन्नलगीचे (सोलापूर) सिध्दरामेश्वर हे सोलापूर वीरशैवांचे प्रथमगण म्हणून ओळखले जातात, ते ही या अनुभव मंटपात होते.[८४] भारताच्या कानाकोपऱ्यातून अनेक शिवभक्त आणि शिवयोगी या मंटपात येऊन शिवभक्तीत समरस होत. हा अनुभव मंटप म्हणजे महात्मा बसवेश्वरांच्या ध्येयदृष्टीचे, कर्तृत्त्वाचे आणि शिवभक्तीचे प्रतिक बनले

होते. याविषयी डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात की, 'अनुभव मंटप म्हणजे १२ व्या शतकातील समतेचे आणि ज्ञानाचे ते धर्मपीठ होते. हे धर्मपीठ देशाला आदर्शभूत झाले. या अनुभव मंटपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांनी स्त्री - पुरूष समानतेची घोषणा केली.'[८५] या अनुभव मंटपाद्वारे सिध्दरामेश्वरांना वीरशैवाचे तत्त्वज्ञान समजल्याने या पंथाचा प्रसार करण्यात सिध्दरामेश्वरांचा मोलाचा वाटा होता.

२.२.२ अल्लमप्रभु

अल्लमप्रभु हे वीरशैव पंथाचे प्रणेते आणि नाथपंथाचे प्रवक्ते गोरक्षनाथ यांचे गुरूबंधू म्हणून ओळखले जात.[८६] सन ११६२ मध्ये अल्लमप्रभु हे बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपाचे आचार्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात वैराग्य होते, सिध्दरामेश्वरांनी त्यांना अनुसरले होते. यावरून अल्लमप्रभुंच्या प्रभावातूनही सोलापूर परिसरात वीरशैव सांप्रदायाचा प्रसार झाल्याचे सूचित होते.[८७] महात्मा बसवेश्वराला 'षट्स्थल सिध्दांत' शिकविणाऱ्या अल्लमप्रभुंनी सर्व प्रकारच्या बाह्य अनुष्ठानाला नाकारून ध्यानप्रधान मोक्षमार्ग अवलंबविण्यावर भर दिला होता.[८८]

२.२.३ श्री सिध्दरामेश्वर

श्री सिध्दरामेश्वरांचा जन्म ' सोन्नलीगे ' येथे मुद्दगौडा व सुग्गलादेवी यांच्यापोटी इ. स. ११२७ मध्ये झाला.[८९] सिध्दरामाचे बालपणीचे नांव धुळीमहंकाळ होते हे नाव सिध्दरामेश्वरांच्या कुलदैवताचे नांव आहे.[९०] बाराव्या शतकाच्या दरम्यान बसवेश्वरांचे समकालीन म्हणून श्री सिध्दरामांना ओळखले जाते, त्यांनी महाराष्ट्रात लिंगायत पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला.[९१] महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात अक्कमहादेवी, अल्लमप्रभु, चेन्नबसवण्णा यांच्याबरोबर सिध्दरामेश्वर होते. श्री अल्लमप्रभु यांनीच सिध्दरामांना कल्याणच्या अनुभव मंटपात नेले होते. चेन्नबसवेश्वरांकडून सिध्दरामांना इष्टलिंगाची धारणा आणि षट्स्थळ ज्ञानाचा बोध झाला.[९२] शैवीमताचे श्री सिध्दाराम यांना वीरशैव सांप्रदायात सामील करून घेण्याच्या अगोदर चेन्नबसवने सिध्दरामांना सांगितले होते की, " दुसऱ्या कोणत्याही देव-देवतांची पूजा करू दिली जाणार नाही. तसेच दुसऱ्या देव-देवतांच्या पुजांमध्ये विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींशी ही संबंध ठेवू नये." [९३]

सोन्नलीगेचे सिध्दरामेश्वर सोलापूरातील वीरशैवांचे प्रथमगण म्हणून ओळखले जातात. त्यांची श्रीशैलच्या मल्लिकार्जूनावर अढळ श्रध्दा होती. त्यांनी श्रमदानातून शहरात सिध्देश्वर

तलावाची निर्मिती केली. दुष्काळात गाई-गुरे दत्तक घेऊन सांभाळली. दिन-दुबळ्यांसाठी अन्नछत्र चालविले. अंगारे-धुपारे देऊन लुबाडणाऱ्या ढोंगी लोकांपासून भक्तांचे संरक्षण केले. सर्व धर्मीय सामुदायिक विवाह घडवून आणण्याचा अभिनव प्रयोग करून त्या काळात सामाजिक क्रांतीतील आपले योगदान नोंदविले. बसवकल्याणच्या अनुभव मंटपात शरणासोबत आपल्या ज्ञानाचे योगदान देण्यात सिध्दरामांचे नांव अत्यंत आदराने घेतले जाई. सोलापूर परिसरातील परम, आदरणीय, प्राणतत्त्व अशी सिध्दरामेश्वरांची ख्याती व अनुभूती होती व आजही आहे.[९४] त्यांनी वीरशैव संप्रदायाच्या प्रसाराबरोबरच ६८ हजार वचने रचल्याचा उल्लेख सापडतो. परंतु यापैकी १३०० वचनेच शिल्लक आहेत. वीरशैव पंथाकरीता सिध्दरामांची ही वचने म्हणजे एक अमूल्य ठेवा आहे.[९५] त्यांनी कानडी भाषेतून धर्म जागृतीचाही प्रयत्न केला. त्यांच्यासारख्या सामर्थ्यशाली तत्त्वचिंतकाचे वास्तव्य महाराष्ट्रात असल्याने या भागातील मराठी लोकांना कन्नडिगांच्या सहवासाने धर्म विचारांचा चांगला परिचय झाला.[९६] सिध्दरामेश्वर हे विजापूर जिल्ह्यातील व्यापारासाठी प्रसिध्द असलेल्या शोलापूर या नगरीचे होते असाही उल्लेख सापडतो. सुरूवातीच्या वीरशैव संप्रदायाच्या अनुयायांमध्ये त्यांना उच्च स्थान प्राप्त झाले होते. कवि राघवांक रचित 'सिध्दरामपुराणामध्ये' सिध्दरामाच्या जीवनाविषयीची संपूर्ण माहिती मिळते.[९७]

२.२.४ वीरशैव पंथाचे आचार व तत्त्वज्ञान

सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वर मंदिराचे पुजारी हिरेहब्बु यांच्यात पूर्वी लिंग धारणेची पध्दत नव्हती. परंतु सोलापूरातील लिंगायत व्यापारी आप्पासाहेब वारद यांनी हिरेहब्बु यांच्यात 'लिंग धारणे' ची पध्दत सुरू केली. तेंव्हापासून हिरेहब्बु घराणे लिंग धारण करीत आहेत. लिंग धारणेचा आचार धर्म समाजात रूजावा, याचा प्रसार व्हावा, यासाठी आप्पासाहेब वारदांनी हजारो रूपये खर्च केले होते.[९८] लिंग पुराणात शैल, रत्नमय, धातुमय, काष्टमय इत्यादी लिंगाचे सोळा प्रकार सांगितले आहेत. लिंगाच्या मूळात ब्रह्मदेव, मध्यात विष्णु तर रूद्राबाहेर महादेव असतात. लिंगाच्या वेदीत त्रियांबिका, महादेवी निवास करते. लिंग कोणत्याही प्रकारचे असो, त्याची भक्तीभावाने पूजा केल्यास शुभ फळाची प्राप्ती होते.[९९] 'लिंगधारणा' हे वीरशैवांचे प्रमुख आचार लक्षण आहे. सद्‌गुरूने दीक्षापूर्वक दिलेले 'इष्टलिंग' हे सोने, चांदी, लाकूड इत्यादींपासून बनविलेल्या सज्जिकेत घालून ते जानव्यासारखे गळ्यात धारण केले जाते.[१००]

कपाळावर व सर्वांगावर भस्मलेपन करणे, 'ऊँ नमः शिवाय' हा गुरूमंत्र मुखाने म्हणणे, अष्टावरण व पंचाचाराचे पालन करणे, हे महत्त्वाचे आचार या पंथात आहेत. गुरु, लिंग, जंगम, विभूती, रूद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद ही 'अष्टावरणे' होत. शिवाचार, लिंगाचार, सदाचार, भृत्याचार आणि गणाचार हे लिंगायत धर्मातील 'पंचाचार' आहेत.[१०१] याबाबतीत चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणतात की, 'सनातन वीरशैव धर्मात अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थळ ही तीन प्रमुख तत्त्वे स्वीकारलेली आहेत. ही तीन तत्त्वे क्रमशः साधकाचे अंग, प्राण व आत्मा म्हणून मान्य केले जातात'.[१०२] सिध्दरामेश्वरांनीही अष्टावरण चिन्हांची महती सांगितली आहे. त्यांच्या अष्टावरण त्रिविधीत १४४ पदे आहेत.[१०३]

रेणुकाचार्यांनी 'सिध्दांत शिखामणी' द्वारा वीरशैव तत्त्वज्ञानाची जी समन्वयात्मक भूमिका मांडली. तीच बसवेश्वरांनी आपल्या अनुभव मंटपाद्वारे प्रस्तुत केली. वीरशैवात वैदिक आणि अवैदिक परंपराशी नाते सांगणाऱ्या अनुक्रमे पंचाचार्य आणि विरक्त या दोन विचारधारा निर्माण झाल्या. महाराष्ट्रातील वीरशैव 'पंचाचार्य' विचारधारेशी समन्वित झाले. कर्नाटकातील वीरशैव 'विरक्त' परंपरेशी संबध्द झाले. सिध्दांत शिखामणीच्या आधारे हा संप्रदाय वैदिक ठरतो. [१०४]

'षट्स्थळ' हे वीरशैवांच्या धर्म आणि तत्त्वज्ञान विषयक व्यवस्थेतील तात्त्विक व अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे तत्त्व आहे. जीव व शीव यांच्या सामरस्य मार्गातील 'षट्स्थळ' हे एक अध्यात्मिक तत्त्व आहे. 'षट्स्थळ' हा वीरशैवांचा ज्ञानमार्ग व ज्ञानयोग आहे.[१०५] सत्, चित्, आनंद या स्वरूपात आढळणारे अद्वितीय परब्रह्म हेच 'शिवतत्त्व' या नावाने ओळखले जाते, त्याचेच दुसरे नाव 'स्थळ' हे आहे. स्थळाचे 'लिंगस्थळ' व 'अंगस्थळ' असे दोन प्रकार पडतात. 'लिंगस्थळ' म्हणजे उपास्यदैवत शिव होय आणि 'अंगस्थळ' म्हणजे उपासक जीव होय. या उपास्य शिवाशी उपासक जीवाचे 'सामरस्य' होणे याला वीरशैव 'लिंगांग सामरस्य' असे म्हणतात. याशिवाय योगांग, भोगांग आणि त्यागांग हे लिंगाचे आणखी तीन भाग सांगितले आहेत. योगांगाने जीवाचा शिवाशी संयोग होतो, भोगांगामुळे जीवाला शिवाशी सायुज्यता प्राप्त होते. त्यागामुळे जीवाची जगाची अनित्यता पटते आणि त्याचा तो त्याग करतो.[१०६]

भक्ती व नीती या तत्त्वांना वीरशैव संप्रदायात विशेष महत्त्व आहे. वीरशैवांनी मूर्तीपूजा व तीर्थयात्रा या रूढ मार्गावर टीका केली असून जंगमालाच जगदीश्वर मानले. पंचसुतकाचे बंधन,

जातीभेद, स्त्रियांची शिवाशिव, अग्निपुजा, प्रेतसंस्कार इत्यादी गोष्टी लिंगायत पंथ मानत नाही.[१०७] 'एकेश्वरवाद' हे वीरशैव शरणांच्या भक्तीचे महत्त्वपूर्ण तत्त्व होते. बसवेश्वराने जगाला ईश्वराचे कार्यागार मानले. जातीभेद संपला पाहिजे, असा जातीविरहित समाजरचनेचा विचार बसवेश्वरांनी मांडला. माणूस जन्माने नव्हे तर त्याच्या कर्माने ओळखला जातो, असे मत त्यांनी मांडले.[१०८]

२.२.५ दासोह

'दासोह' हा शब्द कल्याण नगरीतील अनुभव मंटपात अन्नछत्र किंवा अतिथी पुजनासाठी कानडी भाषेतून रूढ झालेला शब्द आहे. मराठी भाषिक लिंगायत ही 'दासोह' हाच शब्द वापरतात. याशिवाय दासोहसाठी लिंगाराधन किंवा लिंगे घालावयाची अशी ही परिभाषा वापरली जाते. श्रावण महिन्यात दररोज किंवा सोमवारी जंगमांना वगैरे भोजन घालण्याच्या प्रथेस वरील परिभाषा वापरतात. सोलापूर शहरातील आप्पासाहेब वारद यांच्या घरी ही 'दासोही' प्रथा होती.[१०९] 'दासोह' घालणारे सोलापूरातील ते पहिले लिंगायत म्हणून ओळखले जातात. अतिरिक्त संपत्तीच्या वाटपाची कल्पनाच 'दासोह' या नावाने ओळखली जाई असे सोमनाथ रोडे यांनी म्हटले आहे.[११०] आपल्या गरजांची पूर्तता झाल्यानंतर जी संपत्ती उरते ती लोककल्याणासाठी खर्च करावी, हा 'दासोह' चा मुख्य उद्देश आहे. 'दासोह' हा शब्द दान शब्दाशी मिळता-जुळता वाटत असला तरी मुळत: 'दासोह' म्हणजे दान नव्हे, सामान्यत: 'दासोह' म्हणजे 'अन्नसंतर्पण' होय. वीरशैवांमध्ये शिवप्रसाद स्वरूपात 'दासोह' घातले जाते व स्वीकारले जाते, अद्यापि ही अनेक मठांमध्ये दासोह प्रथा प्रचलित आहे. नम्रतेच्या व कृतज्ञतेच्या भावनेतून गरजू समाज बांधवांना दिलेले कोणत्याही प्रकारचे सहकार्य म्हणजे 'दासोह' होय.[१११] सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्दरामेश्वरांच्या मंदिरात कायमस्वरूपी 'दासोह' चालविले जाते. यासाठी अनेक भाविक पैशाच्या किंवा अन्नधान्याच्या स्वरूपात दान देतात.

२.२.६ मठ

आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये वीरशैव संप्रदायाचा प्रसार होण्यापूर्वी लाकुलिश पाशुपत संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालेला होता. या संप्रदायाच्या विद्वान आचार्यांनी सामाजिक कार्याद्वारे अनेक कामे पूर्ण केली. मठ व मंदिरांची उभारणी, अन्नदान, शिक्षण केंद्र चालविणे, जलाशयाची निर्मिती करणे, अशा स्वरूपाच्या कामांचा त्यात समावेश होतो. त्यामुळे कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशात हा संप्रदाय मोठ्या प्रमाणावर प्रसार पावला. मात्र वीरशैव

पंथाच्या उदयानंतर पाशुपत संप्रदाय त्यात विलिन झाल्याने कर्नाटकातील पाशुपत पंथीयांचे संपन्न असे मठ वीरशैवांच्या ताब्यात गेले. वीरशैवांनी त्या मठांच्या गुरूपरंपरा स्विकारून या मठांद्वारे त्यांनी विद्यादानाचे कार्य चालविले आहे.[११२]

महाराष्ट्रात एक हजार वर्षांपेक्षा अधिक प्राचीन वीरशैव मठ आहेत. वीरभद्र, रेवणसिध्देश्वर, सिध्दरामेश्वर इत्यादी वीरशैव धर्मप्रचारकांची मंदिरे रेणावी, वीटा, येडूर, सोलापूर इत्यादी ठिकाणी आहेत.[११३] वीरशैवांची एकूण सहा धर्मपीठे आहेत. या धर्मपीठांतर्गत त्यांचे हजारो मठ देशात स्थापन झालेले आहेत. वीरशैव समाजात मठांचे स्थान अत्यंत उच्च दर्जाचे मानले जाते.[११४]मठ ही वीरशैवांची एक परंपरा आहे. या मठांतर्गत सांस्कृतिक धार्मिक व सामाजिक संस्था चालविल्या जातात. धर्मप्रसार व समाज संघटन या मुळ उद्देशातूनच मठांची निर्मिती झाली. कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश हिमाचल प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये मठ संस्था विखुरलेल्या आहेत. जंगम, स्वामी, हिरेमठ इत्यादी लोक त्या त्या भागातील वीरशैवांचे धर्मविषयक कार्य करतात. वीरशैव धर्म आणि त्यांचे मठ यांचे परस्पर निकटचे संबंध आहेत.[११५]

सिध्दरामेश्वर हे वीरशैव लिंगायत पंथाचे प्रसारक व प्रचारक होते. त्यांच्यानंतर सोलापूर शहर व आसपासच्या परिसरात अनेक वीरशैव मठांची स्थापना झाली. श्री किरिटस्वामी मठ हा उज्जैनी शाखेचा नंदीमठ तीनशे वर्षांपेक्षा जुना असून, ते सोलापूरात येण्यापूर्वीच स्थानिक लिंगायत व्यापाऱ्यांनी या मठाची स्थापना केली. हा मठ शहरात उत्तर कसब्यात आहे.[११६] शिवाय बाळीवेस येथे मल्लिकार्जून मंदिरासमोर 'शिवशरणी श्री रूद्रांबिकादेवी मठ' आहे.[११७] मौजे होटगी यांच्या मठाच्या अनेक शाखा सोलापूर शहर व परिसरात आहेत, त्यामध्ये श्री बृहन्मठ होटगी उत्तर कसबा, बाळीवेस, कुंभारी, श्रीक्षेत्र धोत्री, इत्यादी ठिकाणी या लिंगायत मठाच्या शाखा आहेत. या मठांचा कारभार श्रीशैल पीठाच्या अधिपत्याखाली चालतो. इ. स. ५ व्या शतकात 'श्री बृहन्मठ होटगी' मठाचे अध्यक्ष श्री ष. बृ. मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामीजी यांनी या मठाचा जीर्णोध्दार केल्याची माहिती मिळते. याशिवाय सोलापूर शहर व परिसरात लिंगायत पंथाचे अनेक मठ व आश्रम पाहावयास मिळतात.[११८]

२.२.७ वीरशैव पंथाचे कार्य

महाराष्ट्रातील वीरशैव संप्रदायाच्या प्रसार कार्यातील सोलापूरचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. शहरात असणाऱ्या सिध्दरामेश्वरांच्या चिरंतन स्मारकामुळे व महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रच्या

सीमेवर हे शहर असल्याने ते वीरशैव संप्रदायाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.[११९] कल्याणी येथील अनुभव मंटपातून सिध्दरामेश्वरांबरोबर अनेक वीरशैवी सोलापूर शहर व परिसरात येऊन स्थायिक झाले. नंतरच्या काळात त्यांनी वीरशैव पंथाचा प्रसार केला. सोलापूर जिल्ह्याच्या शेजारी असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यात सिध्दरामेश्वरांसंबंधी १२ शिलालेख सापडले आहेत.[१२०] आनंद कुंभार यांनी अभ्यासलेल्या विविध शिलालेखातून वीरशैव धर्म प्रसाराच्या पाऊलखुणा दिसून येतात. जिल्ह्यात कामती खुर्द, तडवळ, गुंजेगांव, आचेगांव, अक्कलकोट व कुडल या ठिकाणी सापडलेले हे शिलालेख सिध्दरामेश्वरांच्या वीरशैव धर्माच्या प्रसाराची माहिती देतात. यातील बरेचशे शिलालेख हे कन्नड भाषेतील आहे.[१२१] वीरशैव पंथाचा प्रसार करीत असताना श्री सिध्दरामेश्वरांनी कन्नड भाषेत केलेले वाङ्मय महत्त्वाचे आहे.[१२२] मराठी भाषिक लिंगायतांना लिंगायत धर्माचे आचार, विचार समजावेत म्हणून सिध्दरामेश्वरांनी लिहून ठेवलेल्या संस्कृत व कन्नड साहित्याचे आप्पासाहेब वारदांनी जवळपास २५ ते ३० ग्रंथांचे मराठी भाषेत भाषांतर केले.[१२३]

वीरशैव सांप्रदायांच्या प्रमुख अनुयायांमध्ये पुरोहित, व्यापारी, शेतकरी आणि दस्तकार लोकांचा समावेश होतो. पुरोहित वर्गांचे लोक 'जंगम' या नावाने ओळखले जातात ते उपदेश देतात. जंगमातील काही लोकांनी आपल्या आर्थिक सुधारणेकरीता व्यापार व दुकानदारीचा व्यवसाय सुरू केला आहे. वीरशैव सांप्रदायातील जंगम म्हणून ओळखले जाणारे पुरोहित हे मुळ ब्राह्मण पुरोहित वर्गाचाच एक भाग होता. परंतु ज्यावेळी वंशपरंपरागत मंदिराच्या पुजाऱ्यांचे वर्चस्व वाढू लागले, तेंव्हा या वर्गाने आपली जंगम परंपरा चालू ठेवली.[१२४]

वीरशैव पंथाचा प्रसार हा कर्नाटकाबरोबरच महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या राज्यातूनही झाला. महाराष्ट्रातील अनेक शिवमंदिराचे पुजारी आजही जंगम आहेत. तसेच वाणी, कोष्टी यासारखे लिंगायत पंथी व्यावसायिकही महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेले आहेत.[१२५] रमेंद्रनाथ नंदी यांच्या मते वीरशैव सांप्रदायाची स्थापना आणि विकासामध्ये व्यापाऱ्यांची प्रमुख भूमिका असल्याचे स्पष्ट होते. कारण जंगमानंतर या सांप्रदायात व्यापाऱ्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.[१२६] सन १६९० च्या सुमारास सोलापूर हे तेल, भूसार, हळद, तुप इत्यादी मालाचा पुरवठा करणारे केंद्र म्हणून भरभराटीला आले होते. याच सुमारास विजापूरात साथीच्या रोगाने अनेक लोक मृत्युमुखी पडले त्यामुळे तेथील लिंगायत व्यापारी सोलापूरात येऊन राहू लागले. सोलापूरची व्यापारी पेठ कर्नाटकातून आलेल्या

लिंगायत व्यापाऱ्यांच्या हाती गेली. त्यामुळेच शहरात लिंगायतांची वस्ती वाढू लागली. त्या अनुषंगाने मठ व मंदिराचीही निर्मिती झाली.[१२७]

सोलापूर शहर व जिल्ह्यात पंचमशील लिंगायत, गौडा लिंगायत, सदार, पंचाचारा लिंगायत हे शेती व्यवसाय करताना दिसून येतात. बनजिंगा व शिलवंत लिंगायत काही प्रमाणात शेती तर काही प्रमाणात व्यापार करताना दिसतात. लिंगायत ग्यानगा (तेली), लिंगायत गवळी, लिंगायत न्हावी, लिंगायत शिंपी इत्यादी लिंगायत जाती आपापले पारंपरिक व्यवसाय करतात. लिंगायतांमधील मागास जाती गावात पारंपरिक व्यवसाय करतात तर काही शहरात नोकरी करतात. आर्थिक उत्पादनाच्या साधनांवर पंचमशील लिंगायत, गौड लिंगायत, सदार, बनजिंगा या लिंगायतांचे वर्चस्व आहे.[१२८]

- **पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद**

सोलापूर शहरातील प्रसिध्द लिंगायत व्यापारी म्हणून ओळखले जाणारे पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांनी लिंगायत पंथांच्या प्रसार कार्यात भरीव कामगिरी केल्याचे दिसून येते. आप्पासाहेबांनी आपल्या समाजातील जंगम वर्गीयांना संस्कृतमधून धर्मशिक्षण घेता यावे, यासाठी सोलापूर शहरात चैत्र शु.ा प्रतिपदा, शके १८०० या दिवशी 'वारद संस्कृत पाठशाळे' ची स्थापना केली. या शाळेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची सोय स्वतः आप्पासाहेबांनी केली होती.

लिंगायत समाजातील लोकांना आपल्या जातीचे व धर्माचे स्वरूप समजावे, त्यांच्यात उच्च आचार-विचार सुरू व्हावेत, कानडी न समजणाऱ्या महाराष्ट्रीय वीरशैवांना धर्मज्ञान व्हावे. यासाठी त्यांनी कानडी व संस्कृत भाषेतील अनेक धर्म ग्रंथांचे मराठी भाषेत भाषांतर करून ते ग्रंथ लोकांमध्ये मोफत वाटले.

'वीरशैव लिंगी ब्राह्मण' हा भाषांतर मालेतील ग्रंथापैकी एक ग्रंथ होय. तसेच बसववचन ग्रंथ, चन्नबसवेश्वर वचन ग्रंथ, प्रभुदेव वचन ग्रंथ, शिवयोगी रेणुकाचार्यांचा 'सिध्दांत शिखामणी' हा ग्रंथ दोन भागात प्रसिध्द केला. त्रिंबक गुरूनाथ काळे, कृष्णाजी नारायण जोशी आणि रंगाचार्य मुधोळकर इत्यादी मंडळीकडून आप्पासाहेबांनी कन्नड व संस्कृत ग्रंथांचे मराठी भाषेत भाषांतरे करवून घेतली. या ग्रंथ मालेतूनच मराठी लिंगायतास आपल्या धार्मिक आचार-विचारांची जाणीव झाली. आप्पासाहेब वारदांनी सन १९०७ मध्ये सोलापूर येथे पार पडलेल्या वीरशैव महासभेच्या अधिवेशनात

स्वागताध्यक्ष म्हणून भाषण केले तसेच सन १९०९ मध्ये बेल्हारी येथे पार पडलेल्या 'अखिल भारतीय वीरशैव महासभे' च्या पाचव्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. शिवाय सन १९१० मध्ये सातारा येथे पार पडलेल्या वीरशैव अधिवेशनात त्यांनी स्वागतपर भाषण केले.[१२९]

त्यांनी शहरातील जैन आणि ख्रिश्चनांना धार्मिक व सामाजिक कार्यासाठी आर्थिक सहकार्य करून सोलापूरात धार्मिक एकात्मता टिकविण्याचा प्रयत्न केला. अनेक वर्षांपासून शहरातील लिंगायत व जैन लोकांमध्ये सुरू असलेला वाद आप्पासाहेबांच्या प्रयत्नांमुळे पूर्णपणे नाहीसा झाला. त्यांच्या या धर्मसहिष्णु वृत्तीमुळेच 'पुण्यश्लोक' हे त्यांना मिळालेले विशेषण सार्थ ठरते.[१३०] सन १९८५ मध्ये सोलापूर वीरशैव लिंगायतांचे अधिवेशनावेळी डॉ. निलकंठराव कल्याणी यांनी महाराष्ट्रातील वीरशैवांच्या संघटनेची आवश्यकता असल्याचे सांगितले होते.[१३१] वीरशैवांनी शारीरिक श्रमाला महत्त्व देऊन स्त्रीचा सन्मान केला आहे, बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात विचार चिंतनात आणि साहित्यात स्त्रियांना समानसंधी दिली.[१३२]

२.३ दत्त संप्रदाय

महाराष्ट्रातील दत्त संप्रदायाची महत्त्वाची ठिकाणे ही सोलापूर शहरापासून जवळ असल्याने या संप्रदायाचा प्रभाव सोलापूर शहर व परिसरावर पडलेला आहे. ब्रह्म, विष्णु व महेश या देवांचा संयुक्त अवतार म्हणून अनुसया पुत्र दत्तात्रय ओळखले जातात.[१३३]

या संप्रदायाचे उपास्यदैवत दत्त असल्याने दत्ताची उपासना शहरातील अनेक लोकांनी गुरू स्वरूपात सुरु केली. 'श्री गुरूदत्त' किंवा 'श्री गुरूदेवदत्त' हा या संप्रदायाचा जयघोष आहे. दत्त हे गुरूतत्त्वाचे प्रतिक असल्याने या संप्रदायात दत्ताला विशेष महत्त्व आहे. पुराणाच्या अंतिम संस्करणावेळी दत्तात्रयास दैवत्त्व प्राप्त झाले, तो अवधुत जोगी असल्याने अवधुत पंथात परमगुरू म्हणून ओळखला जातो. महानुभव पंचकृष्णात दत्ताचा समावेश आहे.[१३४]

सोलापूर शहरातील प्रसिध्द असलेले संत वाङ्मय अभ्यासक द. का. थावरे हे दत्त संप्रदायाचे वेगळेपण विशद करताना सांगतात की, 'दत्तात्रयाचा अवतार नऊ अवताराहून स्वतंत्र स्वरूपाचा आहे. या अवताराला प्रपंचाचीही घडी बसावी आणि परमार्थही करता यावा, अशी व्यवस्था

आहे'. परमार्थ हे शाश्वत धन असून ते लौकिक स्वरूपाचे आहे. केवळ प्रपंच हे मृत्यु लोकांचे साधन नाही तर प्रपंचाला परमार्थाची जोड हवी तरच जीवन कृतार्थतेच्या वाटेवर येते.[१३५]

दत्त संप्रदायाचा विस्तार हा विशेषत: गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या भागात पाहावयास मिळतो. महाराष्ट्रात नरसोबाची वाडी, औदुंबर आणि माहूर ही दत्त स्थाने प्रसिध्द आहेत. महाराष्ट्र, कर्नाटकच्या सीमा प्रदेशात सोलापूर शहरापासून ८० कि.मी. अंतरावर कर्नाटक राज्यात गाणगापूर हे दत्तात्रयाचे जागृत स्थान म्हणून ओळखले जाते.[१३६] दत्ताचे ठाणे असलेले गाणगापूर हे गांव आज कर्नाटकात असले तरी ते महाराष्ट्रातील विविध जाती-धर्माचे महत्त्वाचे श्रध्दास्थान व उपास्यदैवत आहे. शहर व जिल्ह्यातून अनेक दत्तभक्त दर गुरूवारी व पोर्णिमेस दत्तात्रयाच्या दर्शनासाठी जातात.

गाणगापूरच्या या दत्तात्रयापासून प्रेरणा घेऊन सोलापूर शहरात काही दत्तभक्तांनी दत्त मंदिरे व मठांची उभारणी केली. यामध्ये चौपाड दत्त मंदिर, घोंगडे वस्ती दत्त मंदिर, पूर्व विभाग दत्त मंदिर, नवी पेठ दत्त मंदिर इत्यादी मंदिराचा समावेश होतो. या मंदिरात गुरूवार, अमावस्या व पोर्णिमा या दिवशी दर्शनासाठी भक्त गर्दी करतात. त्याचबरोबर 'दत्त जयंती' हा उत्सव शहरातील दत्त मंदिराबरोबरच इतर मंदिरातूनही मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. रेल्वे स्टेशन परिसरात असलेले 'दंडवते महाराज गुहा' हे दत्त भक्तीचे महत्त्वाचे ठिकाण मानले आहे. भक्तीमार्गाच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी आणि लोकोध्दारासाठी दंडवते महाराजांनी सोलापूर येथे मठाची स्थापना केली.[१३७] दंडवते महाराज यांच्या सोलापूरातील 'दंडवते गुहा' या मठातून दत्त भक्तीचा प्रसार आजही मोठ्या प्रमाणात चालू असून त्यांच्या कार्याची परंपरा त्यांचे नातू सांभाळत आहेत.[१३८]

सोलापूर शहरापासून ३६ कि.मी. अंतरावर असलेले अक्कलकोट हे दत्त संप्रदायाचे महत्त्वाचे ठिकाण आहे. महाराष्ट्राच्या दत्तोपासनेच्या प्रचारात अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या चरित्र ग्रंथांमधून स्वामी समर्थांच्या उच्चकोटींच्या परमार्थिक अवधुत स्वरूप व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.[१३९]

सोलापूर शहर व जिल्ह्यातून अनेक दत्तभक्त दर गुरूवारी व पोर्णिमेस अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी जातात. शहरातील मठातून व विविध दत्ताच्या मंदिरातून दत्त संप्रदायाच्या विविध ग्रंथांची पारायणे होतात. त्यामध्ये सरस्वती गंगाधर यांनी लिहिलेला 'गुरूचरित्र'

हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.[१४०] या ग्रंथाबरोबर दत्त पुराण, दत्त महात्म्य, दत्तात्रय उपनिषध, अवधुत गीता या ग्रंथांची पारायणे होतात.[१४१]

२.४ नाथ संप्रदाय

या पंथाचे आद्य प्रवर्तक आदिनाथ हा असून त्याचे मुळ स्थान अहमदनगर जिल्ह्यातील वृध्देश्वर वा म्हातार देवाचा डोंगर हे ठिकाण मानले जाते.[१४२] या पंथाला सिध्दपंथ, सिध्दमार्ग, योगमार्ग, योगसांप्रदाय, अवधुतपंथ, गोरखपंथ, कानफाटा संप्रदाय अशी विविध नांवे आहेत.[१४३] नाथ पंथामध्ये जोगी, अवधुत व कानफाटे हे तिन उपपंथ आहेत. जोगी हे संपूर्ण भारतभर पाहावयास मिळतात. भैरवास प्रमुख देवता मानणारे जोगी हे स्वत:जवळ असलेली शिंगी किंवा पुंगी वाजवून भोजन करतात. अवधुत हे कमी वस्त्र धारण करणारे व भिक्षेवर उदरनिर्वाह करणारे आहेत. कान विदिर्ण करून घेण्याच्या क्रियेमुळे कानफाटे हा त्यातील एक महत्त्वाचा उपपंथ आहे. लोकांना कानफाटे पंथाची दिक्षा देतानाच त्यांचे कान विदिर्ण करतात. विदिर्ण केलेल्या कानात या पंथाचे लोक कुंडले घालतात. कानफाटे हे गोरक्षनाथांच्या संप्रदायाचे प्रवर्तक किंवा संघटक मानतात.[१४४]

सोलापूर जिल्ह्यात बार्शी तालुक्यातील वैराग हे गाव संतनाथ या नाथपंथीय साधूच्या यात्रेसाठी प्रसिध्द असून श्रावण शुक्ल एकादशी ते वद्य प्रतिपदेपर्यंत वैराग या ठिकाणी मोठी यात्रा भरते. या यात्रेसाठी सोलापूर शहर व जिल्ह्याबाहेर अनेक ठिकाणाहून नाथपंथीय साधू व यात्रेकरून येतात. वैराग्य धारण केलेल्या नाथसिध्दांचा मेळावा फार पूर्वीपासून वैराग येथे भरत असल्याने या ठिकाणास वैराग्य - वैराग असे नांव पडल्याचे सांगितले जाते.[१४५]

सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेले चार काळभैरव शहराच्या चार दिशांना आहेत. त्यामध्ये पहिला पूर्व दिशेस सोलापूर सूतमिल येथे पडगंची मळयात, दुसरा पश्चिमेला बाळे या ठिकाणी, तिसरा दक्षिण दिशेचा काळभैरव देगांव येथे तर उत्तर दिशेला स्थापन केलेला चौथा काळभैरव तुळजापूर वेस येथे आहे, शहराच्या चारही दिशांना स्थापन केलेले हे काळभैरव नाथपंथीयांची श्रध्दास्थाने आहेत. या चारही दिशांच्या काळभैरवांच्या नित्यनैमित्तिक पूजा अर्चा होतात, पुजेच्यावेळी नाथांची आरती म्हटली जाते. रविवार हा काळभैरवाचा मानाचा वार असल्याने या दिवशी सकाळी व संध्याकाळी आरती केली जाते. 'कालाष्टमी' (कार्तिक वद्य अष्टमी) आणि काळभैरवाचा जन्मोत्सव या चारही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.[१४६]

सोलापूर शहर व परिसरात नाथ पंथीयांचे मठ व आश्रमही आहेत. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंडी तालुक्यातील श्री क्षेत्र इंचगिरी या ठिकाणी सन १९०३ मध्ये सद्‌गुरू समर्थ भाऊ महाराज यांनी 'श्री क्षेत्र इंचगिरी मठ' स्थापन केला. या मठाची एक उपशाखा सोलापूर शहरात नेहरू नगर या ठिकाणी 'श्री क्षेत्र इंचगिरी मठ' या नावाने सन १९४४ साली स्थापन केली. हा मठ सोलापूर शहर व परिसरातील नाथ पंथीयांचे श्रध्दास्थान आहे. नाथ सांप्रदायाच्या प्रसाराच्या उद्‌देशानेच सोलापूर शहर व परिसरात या मठाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत.[१४७] त्यामध्ये प्रभाकर महाराज मठ, सोलापूर, सिध्दरामेश्वर मठ, बाळे, जयप्पा महाराज मठ, बाळे, बंथनाळ मठ, आसरा रोड तसेच सेवालाल महाराज आश्रम, सेटलमेंट, सोलापूर याशिवाय देगांव, निलम नगर, तुळजापूर रोड, अक्कलकोट रोडवरील नागतळ्‌ळी इत्यादी शाखांचा समावेश होतो. या मठांच्याद्वारे नाथ पंथांचा प्रसार सोलापूर शहर व परिसरात होत असल्याचे दिसून येते.

२.५ नागेश संप्रदाय

महानुभव व नागेश संप्रदायाचा प्रसार सोलापूर शहर व जिल्ह्यात म्हणावा तितक्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही. हा संप्रदाय सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ या गावाजवळ असलेल्या 'वडवळ' या गावाशी निगडीत असल्याने या संप्रदायाला 'वडवळ नागेश' अथवा 'वडवळसिध्द नागेश' संप्रदाय या नावानेही ओळखले जाते. चौदाव्या शतकामध्ये या संप्रदायाचा उगम झाला असून वीरशैव संप्रदायाचा प्रभाव या संप्रदायावर पडलाचे दिसून येते. या संप्रदायामध्ये नागेश तथा नागनाथ या सिध्द पुरूषाला गुरूस्थानी, आद्यस्थानी मानणारी एक परपंरा 'नागेश संप्रदाय' या नावाने सुपरिचित झाली आहे. हा संप्रदाय वीरशैवांप्रमाणे शिवोपासक असला तरी त्या संप्रदायात पुज्य मानलेल्या १२ ज्योतिर्लिंगांना हा संप्रदाय मानत नाही. अज्ञानसिध्दापासून नागेश संप्रदायाच्या साहित्य निर्मितीला सुरूवात होते. त्यांना नागेश संप्रदायाचे आद्यआचार्य म्हणून ओळखले जाते. त्यांचे मातामह हेगरस हे मोहोळ, जि. सोलापूर येथील राहणारे होते त्यांना नागनाथांचाच अनुग्रह झाल्याने पुढे ते नागनाथाचे वडवळ येथे स्थिर झाले. हेगरसची कन्या अहिल्येच्या पोटी अज्ञानसिध्दांचा जन्म झाला. कालांतरांनी त्यांनी नागनाथांच्या आदेशानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील नरेंद्रपूर (हातकणंगले) येथे अनेक ग्रंथांची रचना केली व मठ उभारले.[१४८]

या संप्रदायाचा प्रसार सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये झाल्याने प्रत्येक महिन्याच्या अमावस्येच्या दिवशी शहरातून व जिल्ह्यातून हजारो भक्तगण नागनाथांचे दर्शन घेण्यासाठी 'वडवळ' या गावी जातात. गुडी पाडव्याच्या अमावस्येला मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी लोक येथे गर्दी करतात. वडवळ हे गाव सोलापूरपासून जवळ असल्याने 'नागेश संप्रदायाच्या' प्रभावामुळेच सोलापूर शहरात डोणगांव रस्त्यावर एक नागनाथाचे मंदिर निर्माण झाले. या ठिकाणीही चैत्र शुध्द प्रतिपदा आणि प्रत्येक महिन्याच्या अमावस्या या दिवशी नागनाथाचे दर्शन घेण्यासाठी भक्तगण गर्दी करतात.

२.६ इस्लाम धर्म

सोलापूर शहरात मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून आदिलशाही काळापासून ब्रिटिश काळापर्यंत धर्मप्रसार व व्यापाराच्या हेतूने अनेक सूफी संत व मुस्लिम लोक शहर व परिसरात येऊन स्थायिक झाले. त्यामध्ये मोगल, पठाण, मोमीन, शेख, पिरजादे इत्यादींचा समावेश होता. मोमीन हे शहरात विणकर व्यवसायात कार्यरत होते. सन १८८१ च्या जणगणनेनुसार मुस्लिमांची लोकसंख्या १४,७८० होती, तर सन १९११ मध्ये ती १८,७८४ इतकी झाली.[१४९]

इस्लाम धर्मात शिया व सुन्नी हे उपसंप्रदाय असून महमंद पैगंबरांना मानणारा सुन्नी हा पंथ होय. सिया पंथीय लोक कुराणातील काही भाग उस्मानने लिहिला असे समजून तेवढाच भाग वगळून कुराणाला मानतात. सुन्नी पंथीय लोक दिवसातून ५ वेळा तर सिया पंथी दिवसातून ३ वेळा आपला नमाज अदा करतात. सुन्नीमध्ये हनिफी, शफियी तर सियामध्ये नूरबक्षीया, अताइलाही, बोहरी, खोजा, इमामशाही, मोमीन, बारभाई, पिराई, सुफी, चिश्तिया, कादरिया, फिरदासिया, अहमदिया, लाहोरी इत्यादी उपपंथ आहेत. इस्लाममध्ये 'कुराण' आणि 'हदिस' हे ग्रंथ बहुमुल्य मानले जातात.[१५०]

तक्वा (धर्मश्रध्दा), इरव्लास (ईश्वरप्रित्यर्थ सद्वर्तन), तवक्कूल (ईश्वरावर पूर्ण विश्वास), सब्र (दृढनिश्चय, सहनशिलता, संतोष), शूक्र (ईश्वराविषयी कृतज्ञता) ही इस्लामची पाच अध्यात्मिक अधिष्ठाने आहेत. ही तत्त्वे माणसाच्या अध्यात्मिक प्रगतीचे टप्पे असून शहरातील मुस्लिम बांधव इस्लामची आचार तत्त्वे पाळतात. त्यामध्ये कलमा पठण करणे, नमाज पडणे, रोजा ठेवणे, जकात देणे आणि हज यात्रा करणे इत्यादींचा समावेश होतो.[१५१] शहरातील मुस्लिमांमध्ये सुगंधी द्रव्य विकणारे अत्तार, दुकानदारी करणारे बेडर, गुरूरगार्स, मणियार, टेलर, रंगारी, सुतारकाम करणारे व्यावसायिकही आहेत, तर बोहरा आणि मोमीन हे गुजरातमधून, लब्बा हे मलबार

विभागातून तर मुकरी हे म्हैसूर विभागातून आले आहेत. अफगाणी आणि पेठारी मुसलमान शहरात तट्टु विक्रीचा व्यवसाय करीत. शहरात असणारे अनेक मुस्लिम बांधव उर्दू भाषेबरोबर मराठी व कन्नड भाषा ही बोलतात. बरूरगार्स हे शहरातील गड्डा यात्रेच्या प्रसंगी शोभेची दारू उडवितात.[१५२]

शहरात मणियार संख्येने कमी असून ते कासाराचा व्यवसायाबरोबरच काच, लाखेच्या बांगड्या व लोखंडी धातूपासून बनविलेल्या वस्तूचीही विक्री करतात. बोहरी यांचा महत्त्वाचा व्यवसाय दुकानदारी असून ते गुजराती भाषेबरोबर उर्दूही बोलतात. शहरात बागवान, धोबी, गवंडी, मोमीन, पकाली, पेंढारी, पटवेगार, चिकलगार, तांबोळी इत्यादी उपजातींचे लोक राहतात. तेही मराठी, कन्नड, व उर्दू भाषा बोलतात आणि आपल्या आहारात शाकाहाराबरोबर मांसाहारही करतात. पुरूष पायघोळ सदरा व गोल टोपी घालतात तर स्त्रिया दुपट्टा, सलवार आणि पडदा पध्दतीचाही वापर करतात. बकरी ईद, रमजान, शब्बे बारात, पैगंबर जयंती, उननबी बराह इत्यादी महत्त्वाच्या सणाबरोबर हिंदुच्या सण व यात्रा उत्सवात सहभागी होतात.[१५३]

मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांची धार्मिक स्थळे निर्माण झालेली आहेत. आदिलशाहीकालीन काळीमशिद व जामा मशिदीत मोठ्या प्रमाणावर नमाज अदा केला जातो. मशिदी, दर्गे या धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी पंचकमिटीतर्फे पार पाडली जाते. जामा मशिदीला आदिलशाहीकाळात काही जमीन वतन म्हणून दान दिल्याचा उल्लेख आहे. मिळणाऱ्या उत्पन्नातून मशिदीचा दिवा बत्तीचा खर्च भागविला जाई.[१५४] अशाप्रकारे सोलापूर शहरातील मुस्लिमसमाज मशिदी, दर्गे आणि ईदगाहच्या माध्यमातून संघटित झालेला आहे. आपापल्या धार्मिक चालीरिती, रूढी, परंपरा जोपासत सोलापूर शहरात इतर धर्मीयांमध्ये मिसळतात.

२.७ जैन धर्म

भारतातील प्राचीन धर्मांपैकी 'जैन धर्म' हा एक प्रमुख धर्म असून अहिंसा, संयम आणि तप ही जैन धर्माची महत्त्वाची तीन अंगे आहेत. 'अहिंसा' हा जैन धर्माचा केंद्रबिंदू असून अहिंसेचा पुरस्कार करणारा हा जगातील पहिला धर्म मानला जातो.[१५५] शरिर, इंद्रिय, मन, वाणी यांना संयमपूर्वक जिंकणाऱ्या व्यक्तींना 'जिन' म्हटले जाते. अशा जितेंद्रिय महापुरूषाची उपासना करणाऱ्या त्यांचे अनुयायीत्त्व स्वीकारणाऱ्या व्यक्तींना 'जैन' असे म्हटले जाते.[१५६] तसेच धर्माचे

निरूपण करणारा सर्वसंग परित्याग करून ज्याने शरिर, इंद्रिय, मन, वाणी यांना जिंकले आहे तो किंवा त्याच्या आदेशाचे आचरण करणारे ते 'जैन' होय.[१५७]

जैन धर्म हा तीर्थंकरधर्म आहे. 'तीर्थ' म्हणजे धर्म, धर्माचे प्रकटीकरण प्रवर्तन करणारे महापुरूष म्हणजे 'तीर्थंकर' होत.[१५८] देवाहून श्रेष्ठ असा जो धर्माध्यक्ष केवलज्ञानी संत म्हणजे 'तीर्थंकर' होय. अर्हत, सर्वज्ञ, वीतराग, केवली या संज्ञांनी जीवनयुक्त महापुरूषांचे वर्णन केले आहे.[१५९] विविध जन्मात प्रगती साधत मानव जन्मात ज्यांनी सर्वश्रेष्ठ ज्ञान प्राप्त केले व पूर्णत्त्व संपादन केले ते 'जिन' म्हणजेच 'तीर्थंकर' होय.[१६०]

जैन धर्मामध्ये उत्तम चारित्र्य, धर्मोपदेश व नैतिक सदाचारांचा आदर्श निर्माण करणारे चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ महापुरूष निर्माण झाले, अशी धर्मशास्त्राची श्रध्दा आहे. वर्धमान महावीरांच्या २५० वर्षापूर्वी होऊन गेलेल्या पार्श्वनाथांनी अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह यावर आधारलेल्या 'चातुर्याम धर्म' विकसित करून 'श्रमण परंपरा' व 'श्रमण संघ' यांचे कार्य दृढमल केले.

२.७.१ पंचव्रत व णमोकार मंत्र

जैन मुनींसाठी तसेच उपासक अथवा श्रावक यांच्यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व परिग्रह असे 'पंचव्रत' सांगितले आहे. हे पंचव्रत सोलापूर शहरातील जैन बांधव आचरण करतात. पंचव्रताबरोबर मोक्ष प्राप्तीचाही मार्ग या पंथात सांगितला आहे, तो मार्ग 'रत्नत्रयी' या नावाने ओळखला जातो.[१६१] शहरातील जैन बांधव णमोकार मंत्राचे नियमित पठण करतात. या मंत्रामध्ये एकाही तिर्थंकाराचे नांव दिसून येत नाही. या मंत्रातील ५ पदे सर्वोत्कृष्ट आदर्शाची प्रतिक असून प्रत्येक पदाची सुरूवात 'णमो' या शब्दाने होते. 'णमो' हा शब्द नमस्कार वाचक शब्द असल्याने या मंत्रास 'णमोकार' मंत्र म्हणतात.[१६२] मुळ अर्धमागधी भाषेत असलेला हा मंत्र तिर्थंकाराच्या दिव्यध्वनीमधून आलेला आहे.[१६३]

२.७.२ शहरातील जैन धर्म

जैन धर्मीयांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'जातीव्यवस्था' हे होय. जैनसमाज अनेक जाती समुदायात विभागलेला आहे. 'जैन कम्युनिटी' या ग्रंथात भारतात जैन धर्मातील प्रमुख ८४ जातींचा

उल्लेख आढळतो.[१६४] सोलापूर शहर हे दक्षिण प्रांतातील जैनाचे विशेषत: हुमड समाजाचे माहेरघर समजले जाते. सुमारे ३०० वर्षांपूर्वी गुजरातमधील निरनिराळ्या भागातून हुमड दिगंबर जैन हे सोलापूर शहरात वास्तव्यास आले आणि वेगवेगळ्या उद्योगामध्ये सामील झाले. सातारा जिल्ह्यातील फलटण येथून आलेल्या जैन मारवाडी व जैन गुजरांची वस्ती शहरात ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणाला पुढील काळात 'फलटण गल्ली' या नावाने ओळखले जाऊ लागले.[१६५] सोलापूर शहरात जैनांचे सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थान महत्त्वाचे अहे. अनेक जैन मुनी दक्षिण भारतातील महत्त्वाच्या जैन धार्मिक ठिकाणांना भेटी देण्यासाठी जात असताना सोलापूर शहरात येऊनच मार्गस्थ होतात. या जैन मुनींच्या बरोबर मध्य प्रदेश व गुजरातमधून आलेले भक्तगण सोलापूर शहरात स्थायिक झाले. अशा भक्तगणांनी आराधना करण्यासाठी सोलापूर शहरात जैन मंदिरे निर्माण झाली.[१६६] सन १८८१ मध्ये सोलापूर शहरातील जैन लोकसंख्या ही १,३८५ होती.[१६७] सन १९११ मध्ये ती फक्त १,३१३ असल्याचे दिसून येते.[१६८] सन २०११ च्या जनगणनेनुसार शहरातील जैनांची लोकसंख्या ही १५,७८९ इतकी असल्याचे दिसून येते.[१६९]

शहरातील जैन धर्मीय समाज हा 'श्वेतांबर' आणि 'दिगंबर' या दोन महत्त्वाच्या पंथामध्ये विभागलेला आहे. श्वेतांबर पंथीय हे पांढरीशुभ्र वस्त्रे परिधान करतात तर, दिगंबर पंथीय हे नग्नावस्थेत असणाऱ्या साधूची पूजा करतात. शिवाय शहरातील जैन समाज हा अनेक उपजातींमध्ये विभागलेला आहे, यामध्ये उपाध्ये व पंचम हे होत. यातील कांही लोक शहरातील जैन मंदिरामध्ये पंडीत (पुजारी) म्हणून सेवा बजावतात तर काही लोक व्यापार व व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत. चतुर्थ जैन हे कासार व तांब्याची भांडी विकण्याच्या व्यवसायाबरोबरच कापड विक्रीचा व्यवसायही करीत असल्याचे दिसून येते. परंतु अलिकडच्या काळात शिक्षणामुळे त्यांच्या पारंपारिक व्यवसायामध्ये बदल झालेला आहे. वरील वर्गातून वैवाहिकसंबंध जोडले जात नाही, परंतु जेवणावळी मात्र एकत्र होतात.

जैनांचे धार्मिक विधी व मंदिरातील पूजा उपाध्ये करतात. उपाध्यांना स्वामी किंवा पंडीत या नावाने ओळखले जाते. मुख्य पुजाऱ्यास 'पट्टाचार्य स्वामी' या नावाने संबोधतात. जैन लोक आपल्या देवतेस 'गंधोधक' अथवा 'तीर्थांचा' अभिषेक करतात व प्रसंगी अग्निपुजाही केली जाते. त्यावेळी पुराण ऐकण्यासाठी शहरातील जैन बांधव जैन मंदिरात एकत्र जमतात. शहरातील जैन

धर्मीय बांधवांची धार्मिक स्थळे ही सामाजिक व धार्मिक दृष्टीकोनातून महत्त्वाची मानली जातात.[१७०] शहरातील जैन लोक मंदिरातील पूजा चार प्रकारे करतात. नित्यपूजा, अष्टमीहिकी पूजा, कल्पपूजा आणि पंचकल्याणी पूजा. नित्यपूजेमध्ये तीर्थकारांच्या मूर्तीवर जलाभिषेक केला जातो तर उत्सव काळात महाअभिषेक केला जातो. हा महाअभिषेक फुलातील मधाने अथवा पंचामृताने केला जातो. या पंचामृतामध्ये पाणी, ऊसाचा रस, साखर, केळी, लोणी, दुध, दही इत्यादी पदार्थांचा समावेश होतो. अष्टमीहिकी पूजा आषाढी पोर्णिमा, कार्तिक पोर्णिमा आणि फाल्गुन पोर्णिमेस होते. प्रत्येक चांद्रमासास, चतुर्थी, अष्टमी, एकादशी, चतुर्दशी, पोर्णिमा, अमावस्या असा दहा दिवसांचा जैन बांधव उपवास करतात व जेष्ठ शुध्द पंचमीला श्रुतदेवीची पूजा करतात. शहरातील जैन मंदिरातून बाहुबली, धर्मचक्र, परमेष्ठी, अरंहत, सिध्दाहास, आचार्य, उपाध्याय आणि साधू यांच्याही मूर्तींची पूजा केली जाते.[१७१]

भाद्रपद उत्सव हा विशेष करून शहरातील जैन बांधवांचा महत्त्वाचा उत्सव असतो. हा उत्सव भाद्रपद शुक्ल ५ मितीस सुरू होऊन भाद्रपद शुक्ल १५ या दिवशी संपतो. या दहा दिवसांच्या कालावधीत सर्व जैन लोक व्यापार व व्यवसाय बंद ठेवून पूजा, शास्त्र, स्वाध्याय, व्रत इत्यादींचे आचरण करतात. विविध जैन मंदिरात रोषणाई करून धर्मोपदेशाची व्याख्याने, किर्तने, पुराणे इत्यादी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दिवसभरातील 'श्री' चे पूजा-अभिषेक संपल्यानंतर जैनांचे मुख्य शास्त्र (तत्त्वार्थ) याचा अर्थ सांगितला जातो. यासाठी शहरातील विविध जैन मंदिरात आचार्य व मुनींचे आगमन होते.[१७२] या जैन मुनींमध्ये ऐल्लक पन्नालाल, आचार्य शांतीसागर महाराज, वृषभसागर महाराज, तरूणसागर महाराज इत्यादींचा समावेश होता.[१७३]

भाद्रपद शुक्ल चतुर्दशीच्या दोन प्रहरी जैन मंदिरात सामग्रींचा व कुंभाचा चढावा होतो. भाद्रपद वद्य प्रतिपदा या दिवशी जलयात्रेनिमित्त पालखी मिरवणुक निघते. सन १९१५ मध्ये जलयात्रेच्या निमित्ताने सोलापूरात काशीचे जैन धर्मीय गुरूवर्य पन्नालाल बाकळी, बाळ पंडीत, प्रसिध्द किर्तनकार तात्या केशव चोपडे, काठेवाडचे शिवाजी देवश्री इत्यादी मंडळी प्रवचन, व्याख्यान व पुराणे इत्यादी कार्यक्रमांसाठी आले होते. त्यावेळी बुबणे जैन मंदिरात जैन पाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी तत्त्वार्थाचा अर्थ सांगीतला. याच मंदिरात मुंबई निवासी श्राविकाश्रमातील कुमारिका श्रीदेवी जैन यांनी स्त्रियांना धर्मोपदेश केला. यावेळी या सर्व महोत्सवाची व्यवस्था शहरातील

'सम्यकवर्धिनी' सभेच्या देखरेखीखाली करण्यात आली होती.[१७४] सण व उत्सव साजरे करण्याबरोबर सोलापूर शहरातील जैन बांधव अनेक जैन धार्मिक स्थळांच्या तीर्थाटनासाठी जातात. दक्षिण काठेवाडातील गिरनार येथील नेमीश्वरा (नेमिनाथ), पावापुरा, राजगृह, वर्धमानस्वामी तसेच पार्श्वनाथ डोंगर गोमटेश्वर (श्रवणबेळगोळ), मुद्दिबडी, बनारस इत्यादी तीर्थस्थानांना भेटी देऊन अनेक ठिकाणी धार्मिक कार्यासाठी आर्थिक सहाय्य देखील शहरातील जैन बांधव करतात.[१७५]

२.७.३ सल्लेखना व विविध संस्कार

'सल्लेखना' हा शब्द संपूर्णपणे जैनाचार प्रक्रियेचा पारिभाषिक शब्द आहे. 'सत्' आणि 'लेखना' अशा दोन शब्दांनी मिळून 'सल्लेखना' हा शब्द तयार होतो. 'सत्' म्हणजे प्रशंसनीय, चांगले, योग्य, यथोचित आणि 'लेखना' म्हणजे कृश करणे. 'रत्नकरंड श्रावकाचार' या ग्रंथात समंतभद्राचार्य यांनी योग्य कारण उपस्थित झाल्यावर धर्माय रत्नत्रय धर्माच्या रक्षणासाठी विधीपूर्वक शरीराचा त्याग करणे म्हणजेच 'सल्लेखना' होय असे सांगितले आहे.[१७६]

सोलापूर शहरात अशा प्रकारे सल्लेखना करणाऱ्या अनेक व्यक्ती होऊन गेल्या. त्यमध्ये क्षु-आदिसागर, रामायणक, क्षु-राजुलमतीजी माता, क्षु-आनंतमतीजी माताजी, क्षु-सुशलमती माताजी, प. पद्मश्री सुमतीबाई शहा इत्यादींचा समावेश होतो.[१७७] सल्लेखनाबद्दल स्वामी समंतभद्राचार्यांचा एक श्लोक प्रसिध्द आहे.[१७८] श्रावक आणि मुनी दोघेही सल्लेखना धारण करू शकतात. सल्लेखना धारण करणाऱ्या साधकाने मृत्यु हा महोत्सव समजून तो यथाविधी पार पाडावा ही भावना मनात रूजवावी म्हणजे विकल्प, वेदना यांचा अंश कमी होऊन निराबाध 'सल्लेखना' पार पडते. सल्लेखना व दिगंबरत्त्व याबद्दल महात्मा गांधीजी म्हणतात की, "गरजांची कपात व आत्मिक गुणांची वाढ म्हणजेच ऐहिक पदार्थांवरील निर्ममत्त्व हीच ती सल्लेखना आणि हेच ते दिगंबरत्त्व." [१७९]

जैन धर्मात संस्कारांना विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्यात वास्तव्य करीत असलेल्या जैन समाजाचे संस्कार, विधी व रितीरिवाज सर्वत्र सारखे नाहीत. दिगंबर व श्वेतांबर पंथीयांमध्ये काही संस्कार वेगळे तर, काही संस्कार एकसारखे आहेत. दिगंबरांच्या दृष्टीने श्रावकाला 'आदिपुराण' या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे ५३ संस्कारातून आपले जीवन व्यतीत करावे लागते. 'आचारदिनकर' या ग्रंथात श्वेतांबर पंथीयांसाठी १६ संस्कार सांगितलेले आहेत.[१८०] या संस्काराबरोबरच पयुर्षणपर्व, चातुर्मास, महावीर जयंती, चैत्रपोर्णिमा, वर्षप्रतिपदा, भाद्रपद उत्सव,

अष्टमी, एकादशी, चतुर्थी, प्रत्येक महिन्याची पार्णिमा व अमावस्या, जेष्ठ शुध्द पंचमी इत्यादी महत्त्वाचे सण व उत्सव सोलापूरातील जैन धर्मीय लोक साजरे करतात.[१८१]

अलिकडच्या काळात जैन धर्माविषयी माहिती सांगणारे अनेक ग्रंथ निर्माण झाले आहेत. हे ग्रंथ संस्कृत तसेच हिंदी व इंग्रजी भाषांमधून पाहावयास मिळतात. सोलापूर शहरातील अनेक जैन लेखकांनी अशा जैन ग्रंथांची निर्मिती केलेली आहे. त्यामध्ये पं. पद्मश्री सुमतीबाई शहा यांनी मराठी, संस्कृत तसेच हिंदी भाषेतून जैन धर्म ग्रंथांचे लिखाण केलेले आहे. त्यामध्ये 'पुण्यार्ध्य' हा जैन ज्ञानकोश अत्यंत महत्त्वाचा असून त्यात जैन धर्मीयांचे आचार-विचार, सण-समारंभ, व्रत-वैकल्ये तसेच उत्पत्ती इत्यादी अनेक विषयांची माहिती मिळते. सुमतीबाई यांनी जैन दृष्टीकोनातून लिहिलेले रामायण, आदिगीता हे खंडकाव्य, समयसार, महापुराण, भावगीता, षट्खण्डागम इत्यादी ग्रंथांचे लिखाण केले. शहरातील महावीर गांधी, सुरेखा शहा, विद्युलता शहा यानीही जैन साहित्याची निर्मिती केलेली आहे.

२.८ बौध्द धर्म

अस्पृश्यांना धार्मिक विषमतेतून गुलाम बनविणाऱ्या हिंदू धर्माबद्दलचा असंतोष व्यक्त करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले. बौध्दीक अभिसरणातून त्यांनी बौध्द धर्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यापूर्वीही काही समाज सुधारकांनी अस्पृश्य उध्दाराचे कार्य केले. त्यामध्ये बाबा पद्मणजी, ज्योतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, भिकोबा दादा चव्हाण, सर रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, वी. रा. शिंदे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज यासारख्या समाज सुधारकांचा त्यात समावेश होतो. दलित समाजाच्या उध्दारासाठी सुरू करण्यात आलेल्या या कार्याला व्यापक चळवळीचे स्वरूप प्राप्त करून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांच्याच अध्यक्षतेखाली सन १९२७ साली सोलापूर शहरात २६ व २७ नोव्हेंबर या दिवशी 'सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषदेचे' दुसरे अधिवेशन पार पडले. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना उद्देशून भाषण केले होते.[१८२] यामध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना खुले व्हावे व महार वतनात सुधारणा होऊन महार वतनदारांची आर्थिक स्थिती कशी सुधारता येईल, याबद्दलचे विचार मांडले होते.

२५ मे १९२९ रोजी के. के. सकट यांच्या अध्यक्षस्थतेखाली सोलापूर शहरात मातंग समाजाची जाहीर सभा झाली. या मातंग सभेस शहरातील अनेक स्पृश्य लोक हजर होते. मुरारजी पेठेतील मांगवाड्यात भरलेल्या या सभेत झालेल्या ठरावानुसार मातंग समाजातील रखवालदारीचे काम करणाऱ्या मातंगाना पडीक जमिन लागवडीसाठी देणे, सुशिक्षितांना नगरपालिकेत नोकऱ्या द्याव्यात, त्यांच्या राहत्या घरावरील कर माफ करावा, मातंग वस्तीत पाण्याची, दिवाबत्तीची व शौचकुपाची सोय करावी, सिध्देश्वर मंदिराजवळ मातंग धर्माशाळा बांधण्यासाठी नगरपालिकेने आर्थिक मदत करावी असे ठरले.[१८३] अशा प्रकारे शहरात अनेक सभा व अधिवेशनांद्वारे अस्पृश्य समाजाच्या धार्मिक व सामाजिक हक्कांबाबत जागृती करण्याचा प्रयत्न झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अस्पृश्य बांधवांना धार्मिक हक्क मिळावेत आणि त्यांना सर्व मंदिरातून प्रवेश मिळावा म्हणून अनेक ठिकाणी मंदिर प्रवेशाची चळवळ उभी करण्यात आली होती. त्याचाच परिणाम म्हणून सन १९३१ मध्ये सोलापूर शहरातील थोरल्या महारवाड्यात पुणे येथील अस्पृश्यांचे पुढारी नथोजी राजभोज यांच्या अध्यक्षतेखाली एक जाहीर सभा झाली. या सभेत सोलापूरचे सिध्देश्वर मंदिर आणि पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यात यावे, असा ठराव पास करण्यात आला. याचाच परिणाम म्हणजे सन १९३२ मध्ये सिध्दरामेश्वर देवालय आणि देवळाभोवती असणारा तलाव अस्पृश्यांसाठी खुला करण्यात आला.[१८४]

सन १९३६ मध्ये सोलापूर शहरात अस्पृश्य परिषदेचे पाचवे अधिवेशन संपन्न झाले. जातीय विषमता नष्ट होऊन समता प्रस्थापित व्हावी यासाठी बनसोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिवेशनानंतर होळी दिवशी प्रतिकात्मक विषमतेची होळी केली.[१८५] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईमध्ये 'समाज समता मंच' नावाची संस्था स्थापन करून या संस्थेतर्फे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी स्पृश्य-अस्पृश्य यांच्या सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणले. त्यावेळी वरिष्ठ वर्णातील नेत्यांनी जाती संस्थेचे निर्बंध दूर सारून समता व बंधुभाव या तत्त्वांचा आम्ही पाठपुरावा करीत आहोत, असे म्हटले.[१८६] अशा प्रकारचा सहभोजनाचा कार्यक्रम सोलापूर शहरात २४ मे १९३६ रोजी हायर प्रायमरी स्कुलच्या इमारतीत शंकरराव पटवर्धन यांनी घडवून आणला. झुणका-भाकर सहभोजनाच्या या कार्यक्रमास सुमारे ८०० च्या वर स्पृश्य-अस्पृश्य बांधव हजर होते. महाराष्ट्रातील सहभोजनाच्या बाबतीत सोलापूर हे दुसऱ्या क्रमांकाचे शहर ठरले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'सोलापूर समाचार' चे

संपादक बाबुराव जक्कल होते. कोल्हापूरच्या 'सत्यवादी' पत्राचे संपादक अनंतराव आणि बाळासाहेब पाटील, सोलापूर येथील गद्रे लक्ष्मी मंदिराचे प्रमुख श्री. गद्रे, पटवर्धन, देशमुख, अंदुरकर इत्यादी मान्यवर मंडळीही हजर होती. या सहभोजनाच्या निमित्ताने सोलापूरचे सुप्रसिध्द कवी कुंजविहारी यांच्या कविता गायनाचा कार्यक्रमही झाला होता.[१८७] अशा प्रकारे सोलापूर शहरात स्वातंत्र्य पूर्व काळापासून स्पृश्य-अस्पृश्यांचे संबंध हे स्नेहाचे व सामोपचाराचे राहिले.

अस्पृश्य समाजात अनेक धर्मभोळ्या कल्पना व रूढी-परंपरा अस्तित्त्वात होत्या. त्यापैकी 'पोतराज' ही रूढी अत्यंत निर्दयतेची समजली जाते. पोतराज हा पांपरिक व सामाजिक प्रथेचा भाग असून तो मरीआईचा उपासक व भक्त आहे. अशा या पांपरिक रूढीचा नायनाट करण्यासाठी शहरातील पोतराजांनी प्रयत्न केले होते. यासाठी आंबेडकर तरूण सेवादलाच्या मार्फत शहरात थोरल्या महारवाड्यात १९ जुलै १९३६ रोजी एक सभा घेऊन या सभेत पोतराजासारखे नृत्य करून उपजीविका करणाऱ्या अनेकांनी यापुढे आम्ही पोतराजकी करणार नाही, असे जाहीर करून १५ ते २० पोतराजांनी ही परंपरा सोडण्याचा संकल्प करुन डोक्यावरील जटा काढून टाकल्या. यामध्ये दादाराम पोतराज, पांडुरंग भालेराव, लक्ष्मण बाळु पोतराज, कळसप्पा पोतराज इत्यादींचा समावेश होतो.[१८८]

शहरात बौध्द समाज बांधवांच्या जवळपास १९ ते २० वस्त्या आहेत. थोरला महारवाडा म्हणून परिचित असलेला हा भाग सध्या मिलींद नगर या नावाने ओळखला जातो. जी. एम. चौक, सम्राट चौक, मड्डी वस्ती, खणी वस्ती, गौतम नगर, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, बुधवार पेठ, न्यु. बुधवार पेठ, आंबेडकर हौसिंग सोसायटी, सेटलमेंट, फॉरेस्ट, हब्बु वस्ती, हौसे वस्ती, मोटे वस्ती, थोबडे वस्ती, रमाबाई नगर, माशाळकर वस्ती, मुकुंद नगर तसेच धाकटा महारवाडा (धाकटा राजवाडा), कुंभार वेस ह्या भागात बौध्द धर्मीयांची मोठया प्रमाणात वस्ती असल्याचे दिसून येते.[१८९]

बौध्द धर्मात नित्य-नैमित्तिक विधींना 'चर्या' म्हटले जाते. या नित्य आचारात चैत्यवंदना, बोधिवंदना, त्रिशरण पंचशील, अष्टशील, परित्राण पाठ इत्यादींचा समावेश होतो. बौध्द धर्मीयांमध्ये अमावस्या, पोर्णिमा, अष्टमी या दिवशी 'उपोसथ' (उपवास) धारण करतात. या काळात अष्टांग मार्गाचा अवलंब करून ब्रह्मचर्य व्रत्ताचे पालन केले जाते. याचबरोबर 'वर्षावास' (चातुर्मास) यासही बौध्द धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. या आचारांबरोबरच महापरिनिर्वाण दिन, बुध्द जयंती, आषाढी

पोर्णिमा, भाद्रपद पोर्णिमा इत्यादी उत्सव शहरातील बौध्द धर्मीय लोक आनंदाने साजरे करतात.[१९०] शहरात बुध्द जयंती, धम्मचक्र प्रवर्तन दिन, विजयादशमी हे सण मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. यादिवशी शहरातील लाखो बौध्द बांधव पांढरी वस्त्रे धारण करून बुध्द मूर्तीची मिरवणूक काढून 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' साजरा करतात. विजयादशमी दिनाचे महत्त्व ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्म स्वीकारून दलित समाजाला स्वाभिमानाचा मार्ग दाखविला, त्याची आठवण म्हणून या दिवशी शहरातील बौध्द बांधव आपल्या घरावर 'धम्मध्वज' लावतात आणि शुध्द मनाने त्रिसरण-पंचशील ग्रहण करून बौध्द धर्माची शिकवण अंगीकारतात.

धम्मचक्र प्रवर्तना दिवशी सोलापूर शहरात सामुहिक बुध्द वंदना होते आणि नंतर सत्र पठणाचा कार्यक्रम होऊन सकाळी ११ वाजता रमाबाई आंबेडकरनगर येथून मिरवणुकीस सुरूवात होते. या मिरवणुकीत बौध्द धर्मीय अबाल-वृध्दांचा समावेश असतो. शहरातील सामाजिक संस्था, तरूण मंडळाकडून मिरवणुकीत लेझिम, झांज, टिपऱ्या आदि खेळ सादर केले जातात. तसेच पथनाट्य, पर्यावरण बचाव, महिलांवर होणारे अन्याय-अत्याचार, स्त्रीभ्रूण हत्या आदि देखावेही सादर करून लोकजागृती केली जाते. बुध्द मिरवणुकीबरोबर शहरात पार्क चौकात असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येते.[१९१]

शहरात एकूण ७५ बौध्द विहारे असून बुधवार पेठ, न्यु बुधवार पेठ हे त्याचे केंद्रबिंदू आहे. या बौध्द विहाराच्या माध्यमातून भन्तेंचे मार्गदर्शन, श्रामणेर शिबीर, महिला उपासिका शिबीर, बालसंस्कार शिबीर, केंद्रीय शिक्षक-शिक्षिका शिबीर, बौध्दाचार्य शिबीर इत्यादी २४ प्रकारची शिबीरे बौध्द महासभेच्या माध्यमातून घेतली जातात. बुधवार पेठेतील मिलींद नगर बौध्द विहार, न्यु बुधवार पेठ येथील बौध्दांचा दानमय बौध्द विहार, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी येथील सिध्दार्थ विहार तसेच विजापूर नाका, कुमठा नाका, मड्डी वस्ती, खणी वस्ती, फॉरेस्ट, रमाबाई झोपडपट्टी इत्यादी ठिकाणी असणाऱ्या बौध्द विहारांमध्ये दररोज बुध्द वंदना घेतली जाते.

२.९ पारशी धर्म

पारशी समाज हा मूळचा इराणचा असून, या समाजाचे काही लोक सोलापूर शहरात स्थायिक झालेले आहेत. शहरात या समाजाची लोकसंख्या कमी असली तरी, प्रामुख्याने या समाजातील लोक दुकानदारी, व्यापारी आणि बांधकाम व्यावसायिक म्हणून कार्य करीत आहेत. सन

१८८१ मधील जनगणनेनुसार शहरातील पारशी लोकांची सेख्या केवळ १२७ होती.[१९२] तर सन १९११ मध्ये त्यांची संख्या ३३७ इतकी झाली.[१९३] अलिकडील काळात शिक्षण, उद्योग व व्यवसायामुळे शहरातील पारशी लोक मुंबई, पुणे येथे जाऊन स्थायिक झाले त्यामुळे सध्या ही संख्या ५० ते ६० वर येऊन ठेपली आहे.[१९४]

सोलापूर शहरात पारशी लोकांची संख्या कमी असली तरी त्यांनी शहरातील लष्कर भागात १७५ वर्षांपूर्वी अग्यारी या धार्मिक स्थळाची स्थापना केली. पतेती व नवरोझ हे पारशी बांधवांचे धार्मिक सण आहेत.[१९५] पारशी बांधव पतेती सणादिवशी नवीन कपडे परिधान करून अग्यारीत येतात. पांढऱ्या रंगाचा रूमाल महिला डोक्याला बांधतात आणि आपल्या कुंटुंबियांसह अग्यारीत येऊन प्रार्थना करतात. या सणाच्या निमित्ताने पारशी बांधवांच्या घरी गोड खीर, शेवई व इतर पदार्थ तयार करून एकमेकांना आलिंगन देऊन नवीन वर्षाचे स्वागत करतात. लष्कर भागातील अग्यारीत पारशी लोकांचा धर्मगुरू दररोज पाचवेळा प्रार्थना व पूजा करतो. अग्यारीत वर्षभर अग्नि तेवत ठेवला जातो. पतेती या सणानिमित्त पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांची पूजा करण्यात येते.[१९६] शहरातील अग्यारीचे व्यवस्थापन पंचकमिटीमार्फत केले जाते.[१९७] सध्या या अग्यारित 'मोबेद' (धर्मगुरू) म्हणून जाल दाबर हे सेवा करीत आहेत.

पारशी समाजात विवाह करणे सक्तीचे असून, संन्यास व ब्रह्मचर्य निषीध्द मानले आहे. या समाजातील लोक जवळच्या नात्यातील विवाहाला अधिक पसंती देतात. त्यामुळे त्यांच्यात चुलत बहिण-भावाचा विवाह लावून दिला जातो. लग्न समारंभ हा वधूच्या घरी सायंकाळी केला जातो त्यावेळी वधूकडील मंडळी वरगृही जाऊन वराला वाजत गाजत घेऊन येतात. लग्न मंडपात वधू-वरांना समोरासमोर बसविले जाते आणि त्यांच्यात अंतरपाट धरला जातो. या अंतरपाटाच्या वस्त्राखालून दोघांचे उजवे हात एकत्र जुळवून ते सुताने बांधून त्याच सुताचे सात पदर आणि एक वस्त्र वर-वधूभोवती गुंडाळले जाते, व वस्त्राला गाठ मारली जाते, या गाठीला 'विवाहग्रंथी' असे म्हणतात. त्यानंतर अग्नित धूप टाकतात आणि नंतर वधू-वर एकमेकांच्या मस्तकावर अक्षता टाकतात. पारशी पुरूष एक पत्नी जीवंत असताना दुसरा विवाह करू शकत नाही. मात्र या समाजात पुनर्विवाह मान्य आहे.[१९८]

पारशी धर्मियामध्ये अंत्यसंस्कार करावयाच्या ठिकाणाला 'शांतीस्थान' म्हणतात. हे लोक मृतदेहाचे दहण किंवा दफन करत नाहीत, तर मृतदेह खास बनविलेल्या विहीरीमध्ये टाकतात. हा मृतदेह पक्षांना दिसेल अशी विहीरीची रचना असते.[१९९] मृतशरीराचा प्रत्येक भाग पक्षांच्या खाण्यात यावा हा यामागील उद्देश असतो. यातून या लोकांची उपयुक्ततावादाची भावना दिसून येते.[२००]

२.१० ख्रिश्चन धर्म

सन १८६२ मध्ये आद्य मिशनरी रेव्ह आणि चार्लस् हार्डिंग हे सोलापूरात ख्रिश्चन धर्माच्या प्रसार कार्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या इतर सहकार्यांबरोबर सोलापूर शहर व सभोवतालच्या भागाचा दौरा करुन सन १८६३ मध्ये बार्शी व कुंभारी येथे शाळा स्थापन केली. सन १८६४ मध्ये सोलापूर शहरात 'पहिल्या ख्रिस्त मंडळीची' स्थापना करून त्यांनी आपल्या धर्मप्रसाराच्या कार्याला सुरूवात केली. शैक्षणिक सुधारणा, दीन-दुबळ्यांची सेवा, कनिष्ठ लोकांना आर्थिक लाभ व सामाजिक प्रतिष्ठा, जाती व्यवस्थेचा नाश करणे, स्त्रियांचा दर्जा उंचावणे, कुष्ठरोग्यांची सेवा करणे इत्यादी कल्याणकारी योजना राबवून मिशन-यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्याचे सूत्र राबविले. यामुळेच सन १८६६ साली कुंभारी येथील ब्राह्मण जातीच्या केसकर बंधूनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला आणि ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या कार्याची सुरूवात केली.[२०१]

सन १८७७ मधील दुष्काळाच्या वेळी सोलापूर शहरात ख्रिश्चन मिशनने गरीबांना अन्नदान करणे, कपडे पुरविणे, रोग्यांना मोफत औषधोपचार करणे, अनाथ मुलांचे संगोपन करणे यासाठी अनाथालयाची स्थापना केली. दुष्काळाच्या वेळी सुमारे ३००० मुलांचे पालनपोषण केले. त्याचबरोबर शहरात डॉ. ओगडेन आणि डॉ. केसकर यांनी महारोग्यांकरीता 'विश्रांतपूरा' नावाची संस्था स्थापन केली होती. त्यामुळे सोलापूर शहर व परिसरात ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या कार्याला चांगलेच बळ मिळून शहरात विविध ख्रिश्चन मिशनरी संस्थांची स्थापना झाली. त्यामध्ये जोसेफाईन किंडरगार्टन शाळा, वोरोनोका मुलींची शाळा, ॲरोव्हर्नाक्युलर स्कुल याच बरोबर उमेदपूर (सध्याचे सेटलमेंट, रामवाडी विभाग) ही औद्योगिक वसाहत इत्यादी संस्थांचा समावेश होतो.[२०२]

सन १८७२ मध्ये शहरात ख्रिश्चनांची लोकसंख्या २३९ इतकी होती, सन १८८१ मध्ये ही संख्या वाढत जावून ५११ वर गेली. सन १९०१ मध्ये १६३१ इतकी झाली.[२०३] सन १९७१ मध्ये ख्रिश्चन धर्मीय स्त्रियांची संख्या २२७६ आणि पुरूषांची संख्या २४१८ इतकी होती.[२०४] पुढे त्यामध्ये वाढ

होऊन ही लोकसंख्या सन २०११ मध्ये ८३३४ इतकी झाली. शहरात असणारे ख्रिश्चन लोक थोड्याफार प्रमाणात युरोपियन होते. या युरोपियनांमध्ये सैनिकांचा समावेश होता, तर काही युरेशियन आणि काही अमेरिकन मराठी मिशनकडून धर्मांतरीत झालेले ख्रिश्चन होते. सोलापूरात या मिशनने सन १८६२ मध्ये आपल्या कार्याला सुरूवात केली होती. त्यावेळी त्यांनी ख्रिश्चन धर्म प्रसारासाठी शाळा स्थापनेबरोबरच ख्रिश्चन धर्माबद्दल माहिती देणारी काही पुस्तके छापून ती लोकांपर्यंत पोहोचहून आपल्या धर्मांचा प्रसार केला. धर्मांतरीत झालेल्या ख्रिश्चनांनी स्वतःचे नांव व आडनावात बदल केला नाही. परंतु आपल्या मुला मुलींची नांवे त्यांनी ख्रिश्चन पध्दतीने ठेवली. सध्या सोलापूरात असणारे अनेक ख्रिश्चन हे धर्मांतरीत ख्रिश्चन असल्याने ते आपल्या जुन्या धर्माप्रमाणे रूढी, परंपरा, चालीरितीनुसारच राहत असल्याचे दिसून येते.[२०५] शहरातील ख्रिश्चन धर्मियांमध्ये रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट हे दोन प्रमुख पंथ असून मेथॉडिस्ट, इस्टर्न ऑर्थेडिक्स् इत्यादी उपपंथही दिसून येतात. प्रत्येक पंथीय व उपपंथीयांचे शहरात वेगवेगळे चर्चस् असून दर रविवारी ते आपापल्या चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करतात.

ख्रिस्ती धर्माचे धार्मिक स्थळ असणाऱ्या 'चर्च' ने धार्मिक, राजकीय तसेच सामाजिक सुधारणेच्या चळवळीत महत्त्वाची भूमिका पार पाडली. शहरातील सेंट जोसेफ ही शाळा रोमन कॅथॉलिक चर्चशी जोडलेली आहे.[२०६] तसेच सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने सिध्देश्वर तलावातील अतिरिक्त पाणी रस्त्यावर येऊ नये म्हणून गणपती घाटाच्या बाजूस एक संरक्षक भिंत बांधली यासाठी अमेरिकन मराठी मिशनने आर्थिक मदत केल्याचा उल्लेख सापडतो.[२०७] नाताळदिवशी शहरातील चर्चमधून प्रार्थना आयोजित केली जाते. यावेळी सर्व ख्रिस्त बांधव प्रार्थनेसाठी हजर राहतात. ख्रिस्ती धर्माचा 'बायबल' या पवित्र धर्मग्रंथामधील तत्त्वानुसार शहरातील ख्रिस्ती समाज धर्माचरण करताना दिसून येतो. रविवार हा दिवश पवित्र मानला गेल्याने या दिवशी चर्चमधून सामुहिक प्रार्थना, उपासना, इसस्तवन आणि दानधर्म केला जातो.[२०८]

२.११ शीख धर्म

सोलापूर शहरामध्ये लोकसंख्येने कमी असणारे शीख धर्मीय लोक पाकिस्तानमधील सिंध प्रांतातून आलेले आहेत. त्यामुळे हे सिंधी शीख म्हणून ओळखले जातात. हे सिंधी लोक आपल्या व्यवसायानिमित्त सोलापूर शहरात स्थायिक झाले.[२०९] फाळणीनंतर अनेक शीख कुटुंबे पंजाब,

दिल्ली, हरियाणा तसेच महाराष्ट्रातील अनेक शहरात ही शीख धर्मीय कुटुंबे स्थायिक झाली.[२१०] गुरूनानक हे शीख धर्मीयांचे आद्य प्रवर्तक होत. प्रारंभी भक्तीमार्गी असलेला आणि पुढील काळात क्षात्रधर्मी बनलेला, पंजाबमध्ये उदयास आलेला हा शीख धर्म महत्त्वाचा धर्म मानला जातो. गुरूनानकांनी एकेश्वर धर्माची स्थापना केली, त्यालाच 'शीख सांप्रदाय' असे नांव मिळाले.[२११] गुरूनानकांच्या शिष्यांना 'शीख' म्हटले जाते, 'शीख' या शब्दाचा अर्थ 'शिष्य' असा होतो. पंजाबमध्ये गुरूमुखी भाषेत शिष्याला 'शिख्ख' (सिक्ख) असे म्हणतात. 'शीख धर्म' हा गुरूपरंपरा मानणारा धर्म आहे. 'गुरूग्रंथसाहेब' हा शीखांचा धर्मग्रंथ महत्त्वाचा असून या ग्रंथाच्या उपदेशाप्रमाणे शीख लोक धर्माचरण करतात.[२१२]

'गुरूद्वार' हे शीख धर्माचे पवित्र स्थळ असून, ते ईश्वराचे निवासस्थान नसून ईश्वराच्या निवासस्थानाकडे जाण्याचा मार्ग आहे. ईश्वराच्या उपासनेने ईश्वराच्या निवासाचा दरवाजा उघडला जातो, अशी शीखांची श्रध्दा आहे. शहरात अंत्रोळीकर नगर येथे शीखांचे धर्मस्थळ 'गुरूद्वार' असून[२१३] गुरूद्वारामध्ये नियमित उपासनेखेरीज सुर्यसंक्रांत, शीख धर्मगुरूचे जन्मदिवस, गुरूपद प्राप्तीदिन, निर्वाणदिन तसेच शेटच्या गुरू गोविंदसिंगांचा बलिदान दिन उत्सव स्वरूपात साजरे केले जातात. कार्तिकी पोर्णिमा हा आद्य गुरू नानकांचा जन्मदिन म्हणजेच त्रिपुरारी पोर्णिमा हा दिवस शहरातील या गुरूद्वारामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जतो. या गुरूद्वाराची सर्व व्यवस्था सरदार रमेशसिंगजी पामनदास वातवानी, रविंद्र सिंगजी आणि प्रदीप सिंगजी तसेच कपिल नानकांनी पाहतात.[२१४] उत्तर भारतातून व पंजाबातून दक्षिण भारताकडे जाणारे शीख शहरातील या गुरूद्वारास भेट देतात. तसेच मालाची वाहतूक करणारे मालट्रक चालक-मालक या गुरूद्वारामध्ये आश्रयास असतात. त्यावेळी त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था सदर गुरूद्वारमार्फत केली जाते.

शीखांमध्ये मृत्यु संस्कार दहनाने होतो. मृत व्यक्तीजवळ बसून नातेवाईक 'ग्रंथसाहेब' मधील काही मंत्राचा उच्चार करतात. मृत्युनंतर आत्यंतिक शोक करण्याला शीखांमध्ये मनाई आहे. अंत्यसंस्कारावेळी विधी करताना मृत व्यक्तीच्या मुलास पांढरा फेटा बांधला जातो. मृत्युनंतर स्मारक उभारणे तसेच श्राध्द घालण्याची प्रथा शीख धर्मात नाही.[२१५]

अशाप्रकारे सोलापूर शहरात सर्व धर्म व पंथाचे अस्तित्व असून, प्रत्येक धर्माची स्वतंत्र आचारसंहिता तयार झालेली आहे. प्रत्येक धर्मसंप्रदायाचे दृष्टीकोन, श्रध्दा, मूलप्रणाली वेगवेगळी

असल्याचे दिसून येते. सामाजिक व धार्मिक जिवनात संत, महंत व साधू-सन्यासी यांना महत्व होते. त्यांच्या आचर-विचारांचा समाजमनावर पगडा होता. असे असले तरी या शहरातील विविध धर्मियामध्ये मोठ्या प्रमाणावर ऐक्य दिसून येते.

संदर्भ व तळटिपा

१. पगडी सेतु माधवराव, महाराष्ट्र - कर्नाटकातील सुवर्णकाळ, १९९०, प्रस्तावना.

२. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १६९.

३. जोशी ज. वा., धर्माचे तत्त्वज्ञान, १९७५, पृ. १.

४. वर्तक प. वि., उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपन, भाग-२, १९९७, पृ. ४१८.

५. शिंदे वि. रा., धर्म जीवन व तत्त्वज्ञान, १७७९, पृ. ४२८, ४२९.

६. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. ११८.

७. जोशी महादेव शास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड-४, १९९४, पृ. ५६९.

८. शर्मा डि. एस., इसेन्स ऑफ हिंदुझम, १९७१, पृ. १.

९. http://www.marathivishwakosh.in, 3/10/2013,VOL.VIII.

१०. सहस्त्रबुध्दे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, १९९४, पृ. ६६३.

अ) सरदार गं. बा., महात्मा फुले व्यक्तित्त्व आणि विचार, १९८२, पृ. ११०.

ब) कीर धनंजय, मालशे स. ग., फडके य. दि., (संपा), महात्मा फुले समग्र वाङ्मय, २००६, पृ. ५७०.

११. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, २०११, पृ. १९६, १९७.

१२. स्वामी विवेकानंद, भारताची अध्यात्मिक विचारधारा, २००६, पृ. ४.

१३. भगत रा. तु., (संपा.), संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, २००४, पृ. ६९०.

१४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, पृ. २६, २७.

१५. गर्गे स.मा., (संपा.), भारतीय समाजविज्ञान कोश, खंड- ३, पृ. २७-२९.

अ) मेहंदळे य. श्री., समाजशास्त्राची मूलतत्त्वे, पृ. २७५, २७६.

१६. www.marathivishwakosh.in, VOL. VIII.

१७. भागवत दुर्गा, धर्म आणि लोकसाहित्य, १९५६, पृ. १.

१८. कर्वे इरावती, संस्कृती, २००६, पृ. ८९.

१९. सहस्त्रबुध्दे पु. ग., उपरोक्त, पृ. ३९८.

२०. काणे पा. वा., (अनु.), धर्मशास्त्राचा इतिहास, १९७०, पृ. १ - ३.

२१. पाठक प्रभाकर, राष्ट्र धर्माचे प्रणेते, २००७, पृ. ६.

२२. कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, २००१, पृ. ७ , ८.

२३. सोलापूरातील धार्मिक स्थळे

मल्लिकार्जून मंदिर, रेवणसिध्देश्वर, सिध्देश्वर, निलकंठेश्वर, शंकरलिंग देवस्थान, मार्कंडेय देवस्थान, व्यंकटेश देवस्थान, जुने विठ्ठल मंदिर, तुकाराम मंदिर, जुने दत्त मंदिर, राम मंदिर पूर्व भाग, रूपाभवानी देवी मंदिर, हिंगुलांबिकादेवी मंदिर, गद्रे लक्ष्मी, शुभराय मठ, बृहन्मठ होटगी, दंडवते गुहा, काळी मशिद, जामा मशिद, पानगल ईदगाह, शहाजहूरवली दर्गा, दिगंबर जैन मंदिर, आदेश्वर श्वेतांबर जैन मंदिर, अमेरिकन मराठी मिशन चर्च इत्यादी.

२४. जोशी तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री, सर्व धर्म समिक्षा, आवृत्ती पहिली, प्रज्ञा पाठशाळा, वाई, १९८४, पृ. १०९.

हिंदु धर्माची लक्षणे - हिंदु धर्माची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये (लक्षणे) दिसून येतात. विशिष्ट प्रकारच्या सामाजिक चालीरिती किंवा समाज रचनेचे विशिष्ट कायदे (जाती संस्था) हे महत्त्वाचे लक्षण असून वर्णसंस्था, जातीसंस्था, विशिष्ट तऱ्हेच्या विवाहादी संस्कार, देशजाती कुळ धर्म, वारसा हक्काचे नियम व एकत्र कुटुंब पध्दती हे त्यांचे घटक आहेत अथवा ही त्याची सामाजिक बाजू आहे.

दुसरे महत्त्वाचे लक्षण म्हणजे परस्परांविरोधी अनेक पारमार्थिक सांप्रदाय होय. हिंदु धर्मात अनेक पंथ, उपपंथ उदयास आले. वारकरी, महानुभव, दत्त, नाथ, समर्थ, वीरशैव आणि नागेश सांप्रदाय होत.

हिंदु धर्मातील प्रमुख सांप्रदाय हे शिव, विष्णु व शक्ती या देवतांना व त्यांच्या अवतारांना मानणारे होते. हिंदु धर्मातील विविध पंथ हिंदु धर्माच्या तत्त्वज्ञानाशी जोडलेले असले तरी हे पंथ आपापसात परस्परांवर टिका करतात. हिंदु धर्मात भक्तीला अत्यंत महत्त्व आहे, भक्ती हे महत्त्वाचे लक्षण आहे.

२५. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १६२-१७१.

२६. सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. १८८-१९९.

२७. सोलापूर दंगल चौकशी व कृती अहवाल, संजय सेठी (प्रका.), २००५ - ०६, पृ. २.

२८. बहिरट, भालेराव, वारकरी सांप्रदायाचा उगम व विकास, पुणे, १९८८, पृ. १.

२९. दैनिक सकाळ, सोलापूर, १७ जुलै २०१३.

३०. भागवत दुर्गा, उपरोक्त, पृ. ३७.

३१. गोसावी र. रा., पाच भक्तिसंप्रदाय, पुणे, २००८, पृ. १७४.

३२. वैभवशाली वारकरी परंपरा, स्मरणिका, सोलापूर, २०१०, पृ. १७.

३३. नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. ७४.

३४. वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. १३.

३५. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. ५.

३६. राजवाडे, वि. का., नामादिशब्दत्यूत्पत्ती कोश, पृ. १८४.

३७. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. २.

३८. Moles Worth Marathi English Dictionary, By Baba Padamanji, 1863, P. 394.

३९. दांडेकर शं. वा., वारकरी संप्रदायाचा इतिहास, पृ. २.

४०. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १०८.

अ) नाईक, म. भि., उपरोक्त, पृ. ६४.

४१. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १०८.

४२. देखणे रामचंद्र, वारी : स्वरूप आणि परंपरा, पुणे, २००७, पृ. ५४.

४३. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १४४.

४४. देव सु. बा., इथे संताचिये नगरी, १९८८, पृ. ७-८.

४५. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १४५.

४६. देखणे, उपरोक्त, पृ. १५१.

४७. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १५१.

४८. कित्ता, पृ. १४६-१४७.

४९. निकम गौतम, संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह, २०१०, पृ. ७.

५०. वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. ४-५.

कितनकार - सोलापूर शहरातील वारकरी सांप्रदायाच्या माध्यमातून अनेक कितनकार होऊन गेले. त्यामध्ये नाशिककर महाराज, बोळकवठेकर गुरूजी, बाजी आण्णा, थावरे द. का., तोडमे

गुरूजी, लक्ष्मण महाराज धोत्रे (वडार समाज), अनंत महाराज इंगळे, भाऊसाहेब शेळके, धोंडोपंत भोरवेकर, सिद्रामप्पा महाराज, जगन्नाथ पुजारी, रंगनाथ बोगा (पद्मशाली), दिगंबर महाराज कैकाडी समाज, सायण्णा आडकी, कृष्णप्पा महाराज, मल्लिकार्जून राऊत (रोहिदास समाज), निवृत्ती दादा लोंढे, सुधाकर इंगळे इत्यादींचा समावेश होतो.

५१. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. ७१-७३.

५२. जोशी महादेव शास्त्री, उपरोक्त खंड-४, पृ. ३५९-३६०.

५३. वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. ३-४.

५४. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. ३००-३०१.

५५. मुलाखत, ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज, अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी मंडळ सोलापूर.

५६. दैनिक सकाळ, सोलापूर, १२ फेब्रुवारी २०१३.

५७. मुलाखत, ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज.

५८. मुलाखत, सौदागर जगताप, विठ्ठल मंदिर, गवळी वस्ती, सोलापूर.

५९. वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. ७०.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, १४ जुलै २०१३.

६०. नाईक म. भि., उपरोक्त, पृ. ५१-६२.

६१. थावरे द. का., जीवनगंगा, ब्रम्हलिंग ह. भ. प. श्री. लक्ष्मण महाराज धोत्रे, २०११,

६२. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १५९.

६३. ईराबत्ती आशण्णा, माझ्या आयुष्यातील टिपणे, १९७१, टिपण नंबर ५२.

६४. दैनिक सकाळ, सोलापूर, ८ जून २००८.

६५. ईराबत्ती आशण्णा, उपरोक्त, टिपण नंबर ५२.

६६. मुलाखत, ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज.

अ) सबकुछ सोलापूर, पृ. १४१.

६७. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास, २००६, पृ. १६६.

६८. गोसावी र. रा., पाच भक्ती सांप्रदाय, १९७४, पृ. ३७७.

६९. घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, २०००, पृ. ६.

७०. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६७.

७१. नालवार जगदीश शास्त्री, वीरशैवांची स्थिती, १९४५, पृ. ४.

७२. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३७८.

अ) दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ३१ जुलै २०१३.

७३. शाबादे रेवण, करूणाघन महात्मा बसवेश्वर, २००९, पृ. ११९.

७४. पाटील एस. एच., कम्युनिटी डिमिनन्स् ॲण्ड पॉलिटिकल मॉडर्नायझेशन, २००२, पृ. ५.

७५. लिंगानंद स्वामीजी, अ ब्लेम ऑफ गॉड, १९७३, पृ. १४.

७६. शेंडे एस. आर., मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८९, पृ. ३४.

७७. निकम गौतम, उपरोक्त, पृ. ७.

७८. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ८४.

७९. रोडे सोमनाथ, सामाजिक क्रांतीचे जनक, महात्मा बसवेश्वर, पृ. १०.

८०. नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार (अनु.), व्यास नरेंद्र, २००८, पृ. १४२.

८१. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६९.

अ) निकम गौतम, उपरोक्त, पृ. ३६-३७.

८२. रोडे सोमनाथ, उपरोक्त, पृ. २२.

८३. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८६.

८४. लिगाडे जयदेवी, श्री. सिध्दरामाची त्रिविधी, १९५८, पृ. ७.

८५. फडकुले निर्मलकुमार, साहित्यातील सौंदर्य, पृ. १३८-१४०.

८६. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६.

८७. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८०.

८८. दासगुप्ता एस. एन., हिस्ट्री ऑफ इंडियन फिलॉसॉफी, १९५५, पृ. ५५.

८९. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. १.

९०. श्री सिध्देश्वर महात्म्य, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी सिध्देश्वर मंदिर, २००९, पृ. ७.

९१. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ३४५.

९२. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. ५-७.

९३. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४७.

९४. शाबादे रेवण, उपरोक्त, पृ. ६७-६८.

९५. पसारकर शे. दे. (संपा.), श्री. सिध्देश्वरांची वचने, खंड-१, २०१०, प्रस्तावना, पृ. १०-१३.

९६. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६-१६९.

९७. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४३.

९८. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, पृ. १२०.

९९. जोशी प्र. ना., लिंग पुराण, १८९२, पृ. १६५.

१००. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८२.

१०१. कित्ता.

१०२. चंद्रशेखर शिवाचार्य, वीरशैव अष्ठावरण विज्ञान, पृ. १.

१०३. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. १०.

१०४. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८१.

१०५. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २१२.

१०६. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८१.

१०७. शेणोलीकर, उपरोक्त, पृ. १६८.

१०८. शाबादे रेवण, उपरोक्त, पृ. ४१-५४.

१०९. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ३६-३७.

११०. रोडे सोमनाथ, उपरोक्त, पृ. २४.

१११. घुगरे सुर्यकांत , उपरोक्त, पृ. १७९-१८०.

११२. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६-१६८.

११३. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८२.

११४. ज्ञानप्रसाद, मासिक, कोल्हापूर, फेब्रुवारी १९७७, पृ. २.

११५. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २६२, २६३.

११६. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. १०-१५.

११७. मुगी सुललिता शंकर, विरदासोही, २००७, पृ. ९१.

११८. श्री वीरतपस्वी विशेषांक, श्री बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर, २००९ (संपा.), रोडगीकर रेवणसिध्द.

११९. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ३५०.

१२०. कित्ता, पृ. ३४७.

१२१. संशोधक, जून २००४, पृ. २१, आनंद कुंभार यांच्या लेखावरून.

१२२. सोलापूर समाचार, सोलापूर, ६ नोव्हेंबर १९५४.

१२३. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ११८-११९.

१२४. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १३७.

१२५. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६.

१२६. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४६.

१२७. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ८, ९.

१२८. देशमुख आप्पासाहेब, सोलापूर जिल्ह्यातील लिंगायत समाजाच्या संघटना, अप्रकाशित शोधप्रबंध (एम. फिल.), पुणे विद्यापीठ, पुणे, ऑगस्ट २००६, पृ. २२.

१२९. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ११८-२३८ व १४२-१४३.

आप्पासाहेब वारदांचे भाषण - दिनांक २३ मे १९१० रोजी वीरशैव धर्म परिषदेचे पहिले अधिवेशन सातारा येथे घाटे यांच्या नाटकगृहात पार पडले. यावेळी आप्पासाहेब वारद हे या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. आपल्या स्वागताध्यक्ष पदाच्या भाषणात त्यांनी म्हटले होते की, "ईश्वर एक असला तरी आपण आपल्या गुणामुळे त्याची अनेक रूपे मानली आहेत. याकरीता धर्मा-धर्मात व भक्ता-भक्तात भिन्न देवतेमुळे द्वेष असण्याचे मुळीच कारण नाही. ज्याने त्याने आपले दैवत पुजावे, आपला धर्म पाळावा व दुसऱ्यासही तसेच करण्यास सांगावे व मित्रत्त्वाने वागावे"

१३०. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. २२६.

१३१. दैनिक संचार, सोलापूर, १७ नोव्हेंबर १९८५.

१३२. शेंडे एस. आर., उपरोक्त, पृ. ३८.

१३३. ढेरे रा. चि., दत्त सांप्रदायाचा इतिहास, १९५८, पृ. ११-१२.

१३४. श्री दत्त गुरूनाथ लहरी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, सोलापूर (संपा.), सुनिल शिणखेडे, पृ. २७.

१३५. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. २६९-२७०.

१३६. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १५४.

१३७. श्री दत्त गुरूनाथ लहरी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, पृ. २, ३.

१३८. दंडवते महाराज चरित्र, दंडवते गुहा, सोलापूर, पृ. १-१४.

१३९. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. २६७-२६८.

१४०. सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रूती, पृ. १३०.

१४१. शेंडे एस. आर., उपरोक्त, पृ. १८.

१४२. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३५-३६.

१४३. जोशी प्र. ना., उपरोक्त, पृ. ११०.

अ) गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ४३.

ब) शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६५.

१४४. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ४०-४३.

१४५. जोशी प्र. ना., उपरोक्त, पृ. १४६-१४७.

१४६. मुलाखत, प्रकाश शंकर चव्हाण, पुजारी, काळभैरवनाथ मंदिर, तुळजापूर वेस, सोलापूर.

१४७. मुलाखत, श्री सुरेंद्रनाथ महाराज, इंचगिरी मठ, नेहरू नगर, सोलापूर.

सोलापूर शहरातील इंचगिरी मठाच्या विविध शाखा - जयप्पा महाराज मठ बाळे, सिध्दरामेश्वर मठ बाळे, प्रभाकर महाराज मठ सम्राट चौक, सेवालाल महाराज मठ सेटलमेंट इत्यादी मठांतून सोलापूर शहरात नाथ सांप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला जातो.

१४८. ढेरे रा. चि., प्राचीन मराठीच्या नवधारा, मोघे प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. ११६.

अ) गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३९१, ३९३.

१४९. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ४१-४२.

१५०. दिव्य कुराण, मराठी अनुवाद, निदान-ए-इस्लाम, मुंबई, २००२, पृ. ५.

अ) खेर संजिवनी, धर्म, पुणे, पृ. ४८.

१५१. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७९.

इस्लामची आचार तत्त्वे - कलमा पठण करणे, नमाज पढणे, रोजा पाळणे, जकात देणे, हज यात्रा करणे ही इस्लाम धर्मीयांची पाच आचार तत्त्वे आहेत.

कलमा पठण करणे : अल्ला आणि पैगंबर यांच्या नावाचे सातत्याने पठण करणे होय. 'लाइलह इल्ल, लह, मुहंमद-उर-रसूल 'ल्लह' या मंत्राचे पठण करणे म्हणजे कलमा होय.

नमाज : दररोज दिवसातून पाच वेळा ईश्वराची प्रार्थना करणे म्हणजे नमाज पढणे होय. आठवड्यातून एकदा तरी शुक्रवारचा नमाज मशिदीत पडावा अशी श्रध्दा इस्लाम धर्मीयांत आहे.

रोजा : इस्लाममध्ये सर्वात पवित्र महिना म्हणजे रमजान होय. रमजानच्या महिन्यात महिनाभर फक्त एकदाच सुर्यास्तानंतर भोजन केले जाते.

जकात : इस्लाम धर्मात सांगितल्याप्रमाणे दान-धर्म करणे, भिक्षा देणे, गरजूंना मदत करणे म्हणजे जकात होय. आपल्या वार्षिक उत्पन्नाचा चाळीसवा हिस्सा दान धर्मात खर्च करणे.

हज : मक्का हे जगातील इस्लाम धर्मीयांचे विशेष पवित्र स्थळ आहे. या ठिकाणी व्यक्तीने आयुष्यात एकदा तरी यात्रेला जावे, असे सांगितले आहे.

१५२. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. १८८-१९९.

१५३. कित्ता, पृ. ९९५-९९६.

१५४. कित्ता, पृ. १९५-२०३.

१५५. दैनिक सकाळ, सोलापूर, ६ एप्रिल २००१.

१५६. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७९.

१५७. कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, पृ. ८१-८२.

१५८. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७९.

१५९. कुलकर्णी पी. के., उपरोक्त, पृ. ८१-८२.

१६०. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १८०-१८२.

१६१. दैनिक सकाळ, सोलापूर, ६ एप्रिल २००१.

१६२. शहा सुमतीबाई, (संपा.), पुर्णाध्य, पृ. २.

णमोकार मंत्र

णमो अरिहंताणं
णमो सिध्दाणं
णमो आइरियाणं
णमो उवज्झायाणं
णमो लोए सव्वसाहूणं ।
एसो पंच णमोयारो सव्वपावप्पणासणो ।
मंगलाणं च सव्वेसि पढमं हवइ मंगल ।

१६३. जामखेडकर अ. प्र., महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ, खंड- १, भाग- २, स्थापत्य व कला (संपा.), डॉ. पाठक अ. श., २००९, पृ. ८५.

पाले येथील जैन शिलालेख- 'णमो अरिहंताणं' हा जैन शिलालेख पाले येथील लहान लेण्यात असून या शिलालेखाच्या अक्षराच्या धाटणीवरून हा शिलालेख ख्रि. पू. पहिल्या शतकातील असावा, असे मत डॉ. साकंलिया आणि डॉ. शोभना गोखले यांचे आहे. हा शिलालेख महाराष्ट्रातील जैन शिलालेखात सर्वाधिक प्राचीन असण्याची शक्यता आहे.

१६४. संगवे विलास, जैन कम्युनिटी, पृ. १०८-१३०.

१६५. सोलापूर समाचार, ज्युबिली अंक, १९३६, पृ. १६५.

१६६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ५ एप्रिल २०१२.

१६७. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ४२.

१६८. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ११.

१६९. सोलापूर शहर जनगणना, २०११, तक्ता क्रमांक ११.७, पृ. १६३.

१७०. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २०३-२०७.

१७१. कित्ता, पृ. २०७.

१७२. सोलापूर समाचार, १२ ऑक्टोंबर १९१५.

१७३. कित्ता, २० डिसेंबर १९४६.

अ) सोलापूर समाचार, १३ फेब्रुवारी १९७४.

१७४. सोलापूर समाचार, १२ ऑक्टोंबर १९१५.

१७५. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २१५.

१७६. कित्ता.

१७७. शहा सुमतीबाई, पूर्णाघ्य, पृ. ६९८-७०७.

१७८. 'सल्लेखना' यादी, श्राविका, संस्थानगर, सोलापूर.

१७९. शहा सुमतीबाई, पूर्णाघ्य, पृ. ६९९.

स्वामी समंतभद्राचार्यांचा प्रसिध्द **सल्लेखना मंत्र**

मंत्र :- उपसर्गे दुर्भिक्षे जरसिरूजायां च निष्प्रतीकारे ।
धर्मायतनुविमोचनमाहू : सल्लेखनामार्या : ।।

अर्थ :- निष्प्रतिकार उपसर्ग आल्यावर दुर्भिक्ष पडल्यावर, वृध्दत्त्व आल्यावर आणि असाध्य रोग झाल्यावर धर्मार्थ शरीर सोडणे यास 'सल्लेखना' म्हणतात.

१८०. शहा वागदरीकर, जैन संस्कृती, पृ. २२४.

१८१. शास्त्री पंडीत वर्धमान, श्री आदिनाथ जैन मंदिर सोलापूर, शत-संवत्सरिक इतिहास, १९४९, पृ. ३४-३६.

१८२. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २०७.

१८३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत आणि मूकनायक महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृ. १५१-१५२.

१८४. कित्ता, पृ. २८७.

१८५. सोलापूर समाचार, ५ डिसेंबर १९३१.

१८६. सोलापूर समाचार, ११ मार्च १९३६.

१८७. पाठक प्रभाकर, राष्ट्र धर्माचे प्रणेते, पृ. ३१४.

१८८. सोलापूर समाचार, १३ मे १९३६.

अ) कित्ता, २६ मे १९३६.

१८९. कित्ता, २५ जुलै १९३६.

१९०. मुलाखत, प्रल्हाद जगन्नाथ चंदनशिवे (भिख्खु), बुध्दाचे दानमय बुध्द विहार, सोलापूर.

१९१. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १८८-१९१.

१९२. दैनिक लोकमत, सोलापूर, १३ ऑक्टोंबर २०१३.

१९३. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ४२.

१९४. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ११.

१९५. दैनिक सकाळ, सोलापूर, १८ ऑगस्ट २०१२.

१९६. दैनिक संचार, सोलापूर, २० ऑगस्ट २०११.

१९७. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. ९९६.

१९८. भारतीय संस्कृती कोश, खंड-५, पृ. ५२६.

१९९. कित्ता, पृ. ५२९.

२००. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७२-१७४.

२०१. करंदीकर सु. द.(प्रकाशक),अमेरिकन मराठी मिशनची दिडशे वर्षे,(१८१३-१९६३) पृ.१५३.

२०२. सोलापूर समाचार, ज्युबिली अंक, पृ. १२१.

२०३. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २४२.

२०४. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ३७-४८.

२०५. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २०३.

२०६. कित्ता, पृ. ९९६.

२०७. PWD, File No. 2877, 1922-23.

२०८. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. २०९.

२०९. मुलाखत, सरदार रमेश सिंगजी पामदास वातवणी, गुरूद्वार व्यवस्थापक, सोलापूर.

२१०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १८ नोव्हेंबर २०१३.

२११. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. २२०.

२१२. कुलकर्णी पी. के., उपरोक्त, पृ. १११.

२१३. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ११६.

२१४. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १८ नोव्हेंबर २०१३.

२१५. मुलाखत, सरदार रमेश सिंगजी पामदास वातवणी, गुरूद्वार व्यवस्थापक, सोलापूर.

२१६. घुगरे सुर्यंकांत, विरशैव व इतर धर्म आणि समाज, पृ. ११७.

प्रकरण तिसरे

सोलापूर शहरातील धार्मिक स्थळे

क्र	घटक
३.१	**हिंदूंची धार्मिक स्थळे**
	३.१.१. शिवमंदिरे
	३.१.२ विठ्ठल मंदिरे
	३.१.३ दत्त मंदिरे
	३.१.४ श्रीराम मंदिरे
	३.१.५ गणपती मंदिरे
	३.१.६ मारूती मंदिरे
	३.१.७ इतर मंदिरे
	३.१.८ शहरातील लोकदैवते
	३.१.९ मातृदेवता मंदिरे
	३.१.१० मठ
३.२	**मुस्लिम धार्मिक स्थळे**
	३.२.१ मशिद
	३.२.२ दर्गे
	३.२.३ ईदगाह
३.३	**शहरातील जैन मंदिरे**
	३.३.१ दिगंबर पंथीय जैन मंदिरे
	३.३.२ श्वेतांबर पंथीय जैन मंदिर
३.४	**बौध्द विहार**
३.५	**पारशी धार्मिक स्थळ**
३.६	**ख्रिश्चन धार्मिक स्थळे**
३.७	**शिखांचे धार्मिक स्थळ**

प्रकरण - तिसरे

सोलापूर शहरातील धार्मिक स्थळे

सोलापूर शहरात हिंदु, मुस्लिम, जैन, बौध्द आणि ख्रिश्चनांची धार्मिक स्थळे आहेत. या धार्मिक स्थळांच्या दरवर्षी होणाऱ्या यात्रा, उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील लाखो यात्रेकरू सोलापूर शहरात येतात. त्यातून सोलापूर शहरात विविध संस्कृतीचा समन्वय झालेला आपणांस पाहावयास मिळतो. या विविध धार्मिक स्थळांमुळे सोलापूर शहराचा विविधांगी दृष्टीकोनातून विकास झाला. सोलापूर शहरातील विविध धर्मियांच्या धार्मिक स्थळांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे. त्यामध्ये शिवमंदिरे विठ्ठल मंदिरे, दत्तमंदिरे, मातृदेवता मंदिरे, जैन मंदिरे आणि विविध मठांचा त्यात समावेश होतो. मुस्लिमांच्या धार्मिक स्थळांमध्ये काळी मशिद, जामा मशिद तसेच ख्रिश्चनांचे प्रोटेस्टंट चर्च, रोमन कॅथॉलिकचे चर्च आणि अमेरिकन मिशनचे चर्च इत्यादी चर्चस् महत्त्वाची आहेत.[१]

भारतीय समाजजीवनात धार्मिक स्थळांना विशेष महत्त्व आहे. मूर्ती पूजेच्या उदयाबरोबर मूर्तीकलेचाही विकास होत गेला. अशा कलांचा संबंध माणसांशी जोडण्यात आल्याने सार्वजनिक देवतांचे अधिष्ठान जनतेला महत्त्वाचे वाटू लागले त्यातून मंदिराची कलपना पुढे आली. मंदिरात असणाऱ्या मूर्तीची पूजा होऊ लागली. मंदिरातील या मूर्ती पूजेमुळे सामाजिक जीवन स्थिर व एकात्म होण्यास हातभार लागला. परमेश्वराच्या गुढ शक्तिची जागा भक्ती मार्गाने घेतली हा मार्ग सोपा असल्याने समाजातील मोठा वर्ग एकत्र आला त्यातूनच ग्रामदैवताची कल्पना उदयास आली. अशा ग्रामदैवतांची विविध धर्मस्थळे अथवा देवालये भारतात मोठ्या प्रमाणावर आढळतात.[२]

भारतीय मंदिर स्थापत्यकलेला कधी व कशी सुरूवात झाली, याचा शोध घेतला असता भारतात आढळलेल्या सर्वाधिक प्राचीन मूर्ती बुध्दाच्या असून, त्या कुषाण काळातील गांधार आणि मथुरा शैलीतील आहेत. त्यामुळे मूर्तीपूजा आणि मंदिर स्थापत्य या गोष्टी ग्रीकांकडून भारतीयांनी स्विकारल्या आहेत असे वाटते. आनंदकुमार स्वामी यांनी या मताच्या विरोधात जोरदार पुरावे सादर करून मूर्तीपूजा आणि मंदिर स्थापत्याची मुळे इतिहास काळाच्या प्रारंभी भारतात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेल्या यज्ञपुजेत होती असे दाखवून दिले.[३] वैदिक काळात यज्ञसंस्था ही समाजाची महत्त्वाची धार्मिक केंद्रे होती. यज्ञसंस्था नामशेष झाल्यानंतर यज्ञसंस्थेची जागा मंदिरांनी घेतली.[४]

जिथे एखाद्या देवतेची मूर्ती बसविलेली असते, असे स्थान म्हणजे देवालय होय. देवालयाचे शिखर हे शीर, गर्भगृह हा गळा, मंडप ही कुस, प्राकार या मांड्या व पिंढऱ्या, गोपूर हे पाय आणि ध्वज शरिरातील अवयव असे देवालयाचे वर्णन अग्निपुराणात वर्णलेले आहे.[५] कोरीव लेण्याचे शास्त्र मागे पडून प्रत्यक्ष मंदिर बांधण्याची कला यादव काळात महाराष्ट्रात रूढ झाली. रामदेव यादवाचा प्रधान हेमाद्री याने मध्यभारतीय वास्तुशिल्प पध्दतीची अनेक मंदिरे महाराष्ट्रात बांधली. म्हणून या शिल्प पध्दतीस 'हेमांडपथी' म्हटले जाते. एकावर एक दगड रचून भिंती उभ्या केल्या जात, बांधकामात चुन्याचा वापर नाही, हे हेमाडपंथी वास्तुशास्त्राचे वैशिष्ट्य होय.[६]

३.१ हिंदूंची धार्मिक स्थळे

यादवकाळानंतर मंदिराच्या स्वरूपात बदल होत गेला. यज्ञकुंडाच्या स्थानी गाभारा व मंडप आले. गाभाऱ्यामध्ये देवमूर्तीची स्थापना होऊ लागली, यज्ञातील आहूतीची जागा नैवद्याने घेतली व युपाचे गरूड खांबात रूपांतर झाले. यज्ञात बळी देण्यात येणाऱ्या पशुला युपाला बांधले जाई, याच युपास म्हणजेच खांबास भक्त नंतरच्या काळात आपली पाठ लावून गरगर फिरू लागले. परिषद भूमीच्या स्थानी सभामंडप आला आणि भारतीय संस्कृतीने मंदिराच्या रूपाने जीवनाला कलात्मकतेचा स्पर्श केला आणि त्यातून मंदिरात अनेक प्रतिके निर्माण झाली. देवमूर्तीपासून थेट बाहेरच्या कासवापर्यंत सर्वच प्रतिकांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. गर्भगृह, अंतराळ, सभामंडप असे मंदिराचे तीन भाग झाले.[७]

काळाच्या ओघात मंदिराच्या रचनेमध्ये नैमित्तिक, धार्मिकविधी व प्रासंगिक उत्सव समारंभ अशा विविध गरजांनुसार विविध दालनांचा समावेश करण्यात येऊ लागला. मंडप आणि गर्भगृह यांच्यामध्ये अंतराळाची योजना करण्यात आली. मंडपामध्ये रंगमंडप (नृतगृह), अर्पणगृह यांची भर पडली. गर्भगृहावर अनेक मजले अभिव्यक्त करणारे शिखर आणि गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजुला द्वारपाल आले. मोठ्या देवालयाच्या आवारात हजार खांबांचा सभामंडप तसेच विवाहादी समारंभासाठी व सण-उत्सव साजरे करण्यासाठी मोठ्या दालनाची भर पडत गेली.[८] देवलयाचा गाभारा हा अंधारयुक्त असतो, येथे एखाद्या दिवळीत समई किंवा पणती मिणमिणत असते. लहानसे प्रवेशद्वार असलेल्या गाभाऱ्याच्या भिंती चिरेबंदी दगडांनी बांधलेल्या असतात. कोणत्याही हिंदु मंदिरातील गाभाऱ्याचे स्वरूप परंपरेने साधारणतः असेच असते. मंदिराचा गाभारा हा छोटासा व

बंदिस्त असला तरी सभामंडप, ओवऱ्या, आवास, देवड्या, पडव्या, कळस, शिखर इत्यादी मिळून बनणारे मंदिर हे भव्य व विस्तीर्ण असते.[९]

३.१.१. शिवमंदिरे

सोन्नलिगे परिसरात सिध्दरामेश्वरांनी ६८ शिवलिंगे आणि १७ मंदिरांची निर्मिती केली.[१०] त्यामध्ये किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिरासह शहराच्या आठ दिशांचे आठ गणपती, चार वेशीवर चार काळभैरव इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय शहरात अनेक शिवमंदिरे, विठ्ठल मेदिरे, दत्त मंदिरे, राम मंदिरे, गणपती मंदिरे, हनुमान मंदिरे, मातृदेवता मंदिरे तसेच विविध पंथीयांचे आश्रम व मठ इत्यादींचा समावेश होतो. यापैकी काही निवडक मंदिरांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.[११] शहरात असणा-या शिवमंदिरामध्ये मल्लिकार्जुन मंदिर, रेवणसिध्देश्वर मंदिर, सिध्देश्वर मंदिर, शंकरलिंग देवस्थान, मार्कंडेय मंदिर, निलकंठेश्वर देवस्थान इत्यादींचा समावेश होतो.

- **किल्ल्यातील मल्लिकार्जुन मंदिर**

सोलापूर शहरातील प्रसिध्द आणि सर्वात जुने धार्मिक स्थळ म्हणून श्रीमल्लिकार्जून मंदिर ओळखले जाते. सिध्दरामेश्वरांनी हे मंदिर सिध्देश्वर तलावाच्या काठी पश्चिमेकडील बाजूस बांधले होते. श्रीशैल पर्वतावर सिध्देश्वर गुरूदर्शनासाठी गेले असता जे दिव्य तेज त्यांना त्या लिंगात दिसले, त्याची या मंदिरात प्राणप्रतिष्ठापना केली. नंतरच्या काळात या मंदिराच्या सभोवताली आज असणारा सोलापूरचा भूईकोट किल्ला बांधण्यात आला. सिध्दरामेश्वरांनी मल्लिकार्जून मंदिरात अन्नछत्राची निर्मिती करून रोज येणाऱ्या भाविकांना अन्नदान केले. मंदिराच्या देखभालीसाठी आणि अन्नछत्रासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी अणदूर विभागातील तीनशे गावातून प्रत्येक घरामागे पायली धान्य गोळा करून काही जिन्नस दान दिल्याचा उल्लेख सापडतो.[१२]

हा किल्ला मुस्लिम सत्ताधिशांच्या ताब्यात असताना शिवभक्तांना मल्लिकार्जून मंदिरात जाणे अडचणीचे होऊ लागले म्हणून सन १८२० मध्ये सोलापूर शहरातील प्रसिध्द लिंगायत व्यापारी श्रीमंत धर्माराव थोबडे यांनी किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिरातील शिवलिंग आणून त्याची शहरातील बाळीवेशीत प्रतिष्ठापना केली. तेच आजचे बाळीवेशीतील प्रसिध्द मल्लिकार्जूनाचे देवालय होय. मल्लिकार्जून मंदिराचे अवशेष आजही किल्ल्यात पाहावयास मिळतात.[१३] किल्ल्यातील

तिसऱ्या महाद्वाराच्या डाव्या बाजूस हे मंदिर होते. या मंदिराची वास्तुशैली ही उत्तर चालुक्य कालीन असावी. मंदिराचे शिखर पूर्णपणे उध्दवस्त झालेले असून शिखराचे काही अवशेष शिल्लक आहेत. त्यावर सुंदर नक्षीकाम केलेले दिसून येते. मंदिराच्या छताचेही काही अवशेष सुंदर नक्षीकामाने मढविलेले होते. मंदिराच्या एका बाजूला असलेल्या कक्षासनाचा मंडप छतासहीत उभा असून कक्षासनाच्या कडेच्या बाजूला व्याल शिल्पाच्या डोक्यावर दोन चौफुलांच्या मध्ये एक कामशिल्प कोरलेले दिसून येते. कक्षासनाच्या पार्श्वभागावर मंदिर शिखरांची आणि शार्दूलांची रूपके कोरलेली आहेत. उत्तर बाजूचे कक्षासन हे चांगल्या स्थितीत असून यावर मंदिर शिखरांच्या रूपकांची, शार्दूलांची व चौफुलांची माळ पाहावयास मिळते.[१४]

छायाचित्र क्र. ७



भुईकोट किल्ल्यातील भग्न अवस्थेतील मल्लिकार्जून मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

इ. स. १८८८ नंतर किल्ल्यातील सदर मंदिर तटाशी समांतर अशी आडवी भिंत बांधल्याने मंदिर कायमचेच अंधारात गाढून टाकले होते. सन १९१७ मध्ये किल्ल्याच्या आतील तटाच्या उत्तरेस असणाऱ्या भिंतीच्या आत बुजले गेलेले एक मंदिर पुरातत्त्व विभागाच्या निदर्शनास आले. भिंतीस असलेल्या झरोक्यातून आतील बाजूस ओळीने खांब असल्याचे तत्कालीन कलेक्टर सिमकॉक्स् यांच्या दृष्टीस पडल्याने त्यांनी सन १९१९ साली गव्हर्नर जॉर्ज लाईड यांच्या मदतीने तेथे उत्खननास सुरूवात केली. उत्खनन पूर्ण झाल्यानंतर उत्खननात मिळालेले मंदिर हे चालुक्यकालीन हिंदू मंदिर

असल्याचे लक्षात आले. मंदिराचे गर्भगृह उत्खननापूर्वीच पाडण्यात आल्याचे आढळून आले. उत्खननात शिवलिंग आढळले नाही, मात्र त्या ठिकाणी एक दगडी नंदी आढळून आला. कारण उत्खननापूर्वीच मंदिरातील शिवलिंग काढून त्याची बाळीवेशीतील मंदिरात प्रतिष्ठापना केल्याचा उल्लेख वर आलेलाच आहे.

उत्खननात मिळालेल्या काही वस्तू, मूर्ती, शिलालेख त्यावेळी मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या स्वाधीन करण्यात आले होते. कालांतराने प्रिन्स ऑफ वेल्स् या वस्तुसंग्रहालयाच्या निर्मितीनंतर वरील वस्तू या संग्रहालयाकडे सुपूर्द करण्यात आल्या. त्यापैकी दोन प्रचंड द्वारपाल, दोन खंडीत (कन्नड) शिलालेख सध्या तेथे अस्तित्त्वात आहेत. प्रिन्स ऑफ वेल्स् वस्तुसंग्रहालयात मल्लिकार्जूनाच्या संबंधी दोन शिलालेख उपलब्ध आहेत. हे शिलालेख कल्याण कलचुरी अथवा देवगिरीच्या यादवांच्या राजवटीतील असावेत. कारण ११ व्या व १२ व्या शतकात या विभागावर त्यांचीच सत्ता होती.[१५]

- **बाळीवेशीतील श्री मल्लिकार्जून मंदिर**

सोलापूर शहरात असणाऱ्या मल्लिकार्जून मंदिराचे शहराच्या धार्मिक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. या देवस्थानच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातून हजारो भाविक येतात. किल्ल्यात असणारे हे मल्लिकार्जून मंदिर हिंदुंना दर्शनासाठी अडचणींचे होऊ लागल्याने याच मंदिरात असणाऱ्या शिवलिंगाची प्रतिष्ठापना शहरात बाळीवेस येथे करण्यात आली. आज सोलापूर शहरातील एक प्रसिध्द धार्मिक स्थळ म्हणून बाळीवेशीतील हे मल्लिकार्जून मंदिर ओळखले जाते. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचे दगडी खांब अत्यंत कोरीव असून मंदिराचा पदविन्यास मुख्यमंडप, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर नगारखाना आहे.

मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर दगडात कोरलेले कासवाचे शिल्प पाहावयास मिळते. सभामंडप कोरीव असून त्यावर नक्षीदार मखर पाहावयास मिळते. मखरावर चारही बाजूनी देव-देवतांच्या मूर्ती व नंदी आहेत. या सभामंडपास २२ खांब असून यातील काही खांब किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिरातून आणलेले आहेत.

छायाचित्र क्र. ८



बाळीवेशीतील श्री मल्लिकार्जून मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

सभामंडपाच्या समोरील भागात काळ्या पाषाणातील एक नंदी आहे, तसेच मुख्य मंदिराच्या सभोवती दगडी ओवऱ्या आणि मध्यभागी हेमाडपंथी पध्दतीचा मंडप आहे. गर्भगृहाच्या पाठीमागील बाजूच्या ओवरीत 'श्री ब्रह्मरांभिका' देवीची मूर्ती असून मंदिराच्या आतील आवारात, गणपती, नवग्रह आणि भग्न झालेल्या शिवापिंडीबरोबरच सिध्दरामेश्वरांनी स्थापना केलेल्या ६८ लिंगापैकी मल्लिकार्जून लिंग, आयलेश्वर लिंग, आनंदेश्वर लिंग आणि उमाक्षेत्रेश्वर लिंग हे चार लिंग आहेत.[१६]

मल्लिकार्जून मंदिरातील शिवलिंगाची नित्यपूजा पहाटे काकडारतीने सुरू होते. दिवसभराच्या पूजेमध्ये रूद्रपुजा, महापूजा आणि सायंकाळची पूजा पार पाडली जाते. आठवड्यातील सोमवारी मल्लिकार्जून शिवलिंगाची मंदिर परिसरात पालखी मिरवणुक निघते.

मंदिराच्या माध्यमातून श्रावण महिन्यात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. महाशिवरात्रीला मंदिरात यात्रा भरते, सिध्देश्वर यात्रेच्या कालावधीमध्ये याच मंदिरापासून नंदीध्वज मिरवणूकीस प्रारंभ होतो. मंदिराच्या पुजाऱ्यांमध्ये हिरेहब्बु, भोगडे, बिराजदार, पाटील, शेटे इत्यादि घराण्यांचा समावेश आहे. या घराण्यांकडे वंशपरंपरेने पूजेचा व व्यवस्थापनाचा अधिकार असला तरी खऱ्या अर्थाने या मंदिराचे व्यवस्थापन सिध्देश्वर पंचकमिटीतर्फे पाहिले जाते.[१७]

- **श्री रेवणसिध्देश्वर मंदिर**

अकराव्या शतकात अनेक मतांचे खंडण करून रेवणसिध्देश्वर आपल्या शिष्यासह फिरत फिरत सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे तालुक्यातील माचणूर या गावी आले. तेथे काही दिवस राहून ते आपल्या शिष्यासह सोन्नलिगे गावी आले. सोन्नलिगेत प्रवेश करताक्षणी आपल्या पायातील खडावा हातात घेऊन गावातील लोकांना नमस्कार करीत ते चालू लागले त्यावेळी शिष्यांनी त्यांना असे करण्याबद्दल विचारले असता, त्यांनी आपल्या शिष्यांना उत्तर दिले की, या गावी एका सिध्दपुरूषाचा जन्म होणार आहे. त्यामुळे हे गाव म्हणजे महापुण्यस्थान आणि मुक्तीचे क्षेत्र होईल. येथे धर्म खूप मोठ्या प्रमाणावर आढळणार आहे, असे म्हणून ते आपल्या शिष्यासह सुग्गलादेवी राहत असलेल्या घरी गेले. सुग्गलादेवीच्या पोटावर हात फिरवून त्यांनी नमस्कार केला, आणि 'तुमच्या पोटी अवतारी पुरूष जन्म घेणार आहे', असे सुग्गलादेवीस सांगून ते आपल्या शिष्यांसह निघून गेले.[१८] सोलापूर शहरामध्ये रेवणसिध्देश्वरांचा प्रथम पदस्पर्श बाळीवेशीतील उत्तर कसब्यातील शिंगारे पुजारी यांच्या वाड्यात झाला. ते सोन्नल्लगी येथे आले असता आज ज्या ठिकाणी रेवणसिध्देश्वरांचे मंदिर आहे त्या ठिकाणी त्यांनीच एका शिवलिंगाची स्थापना केली. नंतरच्या काळात त्या शिवलिंगाच्या ठिकाणी १५० वर्षांपूर्वी काळ्या पाषाणात रेवणसिध्देश्वरांचे प्रसिध्द मंदिर बांधण्यात आले.[१९]

मंदिराची रचना

रेवणसिध्देश्वराचे मुख्य मंदिर छोटेखानी असून, मंदिराला असलेल्या संरक्षक दगडी भिंतीमुळे हे मंदिर बाहेरून विस्तीर्ण स्वरूपात दिसून येते. या संरक्षक भिंतीला तीन प्रवेशद्वारे असून मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला आहे. मंदिराला सभामंडप नसून मंदिराच्या आवारामध्ये विविध देव-देवतांची छोटी-छोटी मंदिरे व पाच ते सहा फुट उंचीची एक दिपमाळ आहे. दिपमाळेच्या पूर्वेस सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांपैकी धुळीमहंकाळ हा तीन नंबरचा गणपती आहे. तसेच सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगापैकी ६४ वे 'श्री कुठार सोमेश्वर लिंग' ही मंदिराच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वाराजवळ आहे. हे शिवलिंग उत्तराभिमुख असून याच्या चौथऱ्याचे बांधकाम सिंधी समाजाचे धर्मगुरू बाबा धानिरामजी शर्मा यांनी केले आहे.[२०] श्रीरेवणसिध्देश्वर मंदिर पायापासून कळसापर्यंत तीन भागात विभागले आहे. मंदिराच्या सर्वात खालच्या भगात म्हणजेच भूयारी गर्भगृहामध्ये मुख्य शिवलिंग ते स्वयंभू मानले जाते. या शिवलिंगावर श्रीरेवणसिध्देश्वरांच्या

मुकुटासहीत पितळी शिवलिंग स्थापन केले आहे. या पितळी शिवलिंगावर पाच पिंडी असून मध्यभागी रेवणसिध्देश्वराचा मुकुट आहे. वीरशैवांच्या बाळेहळ्ळी, उज्जैन, श्रीशैल, वाराणसी व केदार या पंचाचार्य पीठांच्या या पाच पिंडी प्रतिक मानल्या जातात.[२१] मंदिराच्या मधल्या भागात काळ्या पाषाणातील उत्तराभिमुख नंदी असून मंदिराचा शेवटचा भाग शिखराचा आहे. शिखराच्या चारी बाजूला नंदीच्या प्रतिमा व प्रत्येक स्तरावर सुंदर नक्षीकामासहीत विविध देव-देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

नित्यपुजा व वार्षिकोत्सव

दररोज सकाळी जलाभिषेक व महारूद्राभिषेक करून रेवणसिध्देश्वरांची कन्नड भाषेतील आरती म्हटली जाते. हीच आरती संध्याकाळी करून रात्रौ १० वाजता हे मंदिर बंद केले जाते. श्रीरेवणसिध्देश्वरांच्या नित्य पूजेबरोबरच वार्षिक उत्सवही साजरे केले जातात. वार्षिक उत्सवामध्ये मकर संक्रांती, महाशिवरात्री, श्रावणमास आणि रेवणसिध्देश्वरांच्या जयंतीचा समावेश होतो.

श्रावण महिन्यातील प्रत्येक रविवारी जोडभावी पेठेतील छिद्रे वाड्यातून दुपारी एक वाजता श्री रेवणसिध्देश्वरांची पालखी निघते व रेवणसिध्देश्वर मंदिरात आल्यानंतर आरती होऊन दुपारी चार वाजता छिद्रे वाड्यातच विसर्जित होते.[२२] या पालखी उत्सवामध्ये ४०० ते ५०० भक्तगण सामील होतात. पूर्वीच्या सागवानी पालखीचे रूप बदलून ती चांदीची करण्यात आली आहे.

श्रावणातील शेवटच्या रविवारी श्री रेवणसिध्देश्वराचा रथोत्सव साजरा केला जातो.४० फुट उंचीचा हा लाकडी रथ पुजाऱ्यांमार्फत ओढला जातो. मंदिरात पूजाअर्चेचा मान शिंगारे कुटुंबियाकडे आहे. श्रावण महिन्यातील दर रविवारी रेवणसिध्देश्वरांच्या आरतीनंतर 'श्री' ची तांदुळ पूजा होते. या दिवशी आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील हजारो भाविक आपली हजेरी लावतात.[२३] गड्डा यात्रेच्या काळात रेवणसिध्देश्वर मंदिर परिसरात जनावरांचा मोठा बाजार भरविला जातो. रेवणसिध्देश्वर मंदिराचे व्यवस्थापन श्रीसिध्देश्वर पंचकमिटीमार्फत पाहिले जाते.[२४]

- **श्री सिध्देश्वर मंदिर**

सिध्देश्वर तलावाच्या मध्यभागी पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचे बांधकाम ८०० वर्षापूर्वी झाले असून, हे मंदिर महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिरांपैकी एक आहे. महात्मा बसवेश्वरांच्या कल्याण येथील अनुभवमंटपात सिध्दरामेश्वरांनी वीरशैव पंथाचे धडे घेतल्यानंतर त्यांच्या सामाजिक व

धार्मिक कार्यास चालना मिळत गेली. आज ज्याठिकाणी मंदिर आहे, त्याठिकाणी सिध्दरामेश्वरांच्या योगसाधनेची जागा होती. मंदिराच्या बाजूला त्यांचे समाधीस्थळ होते. या स्थळास 'योगसमाधी' अथवा 'योगीनाथ' असे नाव आहे.[२५]

सिध्देश्वर मंदिरात जाण्यासाठी १८ ते २० फुट रूंदीचा एकमेव रस्ता आहे. मंदिराच्या महाद्वाराजवळ एक धर्मशाळा होती. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापुढे पेशव्यांच्या काळात बांधलेला एक लाकडी भव्य सभामंडप होता. सन १९०७ साली वीरशैव महासभा अधिवेशनाच्या निमित्ताने आप्पासाहेब वारद यांनी या लाकडी सभामंडपाच्या जागी भव्य लोखंडी सभामंडप बांधला.[२६] या सभामंडपात भजन, किर्तन, नृत्य, व्याख्यान असे कार्यक्रम पार पाडले जातात. दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये मकर संक्रांतीस १० ते १६ जानेवारीस सिध्देश्वर यात्रा भरविली जाते. या यात्रेचे नियोजन 'सिध्देश्वर पंचकमिटी' मार्फत होते. या यात्रेनिमित्त आणि श्रावण महिन्यात सिध्देश्वराच्या दर्शनासाठी महाराष्ट्र व परप्रांतातून लोक सोलापूर शहरात येतात.[२७]

शंभर वर्षापूर्वी सिध्देश्वर मंदिराला असलेला पितळी दरवाजा अलिकडच्या काळात कसब्यातील किरिट मठाला बसविण्यात आला आहे. पूर्वाभिमुख गर्भगृहात सिध्देश्वराची चांदीची मूर्ती असून त्यावर सोन्याचा मुलामा दिलेला आहे. श्री सिध्देश्वर देवस्थानच्या पूजा-अर्चा, नंदादिप व यात्रेच्या व्यवस्थेकरीता पेशवे सरकारकडून बरीच रक्कम देवस्थानास मिळत होती. ब्रिटिश सरकारकडूनही या यात्रेकरीता दरसाला २०० रूपये व नंदादिपाकरीता २०१ रूपये मिळत. श्री सिध्देश्वराच्या मूर्तीपूजेचा हक्क व मान शहरातील हब्बू घराण्याकडे आहे. त्यांच्यातील प्रमुख घराण्यास हिरेहब्बू असे म्हणतात.[२८]

तलावाच्या चहूबाजूंनी पादचारी मार्ग असल्याने चालत तलावाला किंवा मंदिराला प्रदक्षिणा घालणे शक्य होते. तलावात साधारण मध्यावर एक बेट होते. तलावाचा परिसर भव्य असल्याने मंदिर परिसरामध्ये वाहतूकीचा आवाज व प्रदूषणाचा कसलाही त्रास जाणवत नाही. प्रत्यक्ष मंदिर परिसरात आज आढळणारे बांधकाम हे उत्तर पेशवेकालीन असून बाहेरून कमानीचा आकार असलेली एक बंदिस्त दगडी भिंत चारही बाजूंनी आहे. मंदिरामध्ये पूर्वेकडील तलावाची बाजू सोडली असता भक्त मंडळींना राहण्यासाठी ओवऱ्या आहेत. ओवरीच्या प्रत्येक गाळ्याला दगडी खांबावर तोललेले लांब घुमटाकृती छत आहे.

छायाचित्र क्र. ९



(शंभर वर्षापूर्वीचे श्री सिध्देश्वर मंदिराचे छायाचित्र)
सौजन्यः स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीचे माजी सभापती (कै.) चंद्रशेखर म्हमाणे यांच्या संग्रहालयातील श्री सिध्देश्वर मंदिराचे छायाचित्र

सिध्दरामेश्वरांचे मंदिराचे चौरस सभागृह तीन बाजूंनी वेलबुट्टीदार महिरपी कमानी व लोखंडी खांबांनी बंदिस्त आहे. हे खांब १० फुट उंच असून याचे छत वैशिष्ट्यपूर्ण चौरसाकृती घुमटाचे आहे. हा सभागृह ८० x १०० x २५ असून, यात खाली दगडी फरशी बसविण्यात आली आहे. सभामंडपाचा समोरील भाग हा 'फरशीमंडप' म्हणून ओळखला जातो. हा फरशीमंडप ३० x २५ असा असून सन १९०० ते १९१० या काळात बांधण्यात आला आहे. सभागृहानंतर अंतराळ आणि गाभारा अशी पारंपरिक मंदिररचना आढळते.

संपूर्ण काळ्या बेसॉल्ट दगड व चुन्यात केलेले बांधकाम अतिशय कौशल्याचे व तंत्रशुध्द आहे. मंदिरात सतत दीप उजळल्याने त्याच्या धुराने भिंतीवर काजळी चढली आहे. मंदिराच्या अंतराळात चांदीच्या पत्र्याने मढविलेला पश्चिमाभिमूख नंदी असून गाभाऱ्यात चांदीचा देव्हारा व पिंडीवर चांदीचा सिध्देश्वरांचा मुखवटा आहे या मुखवट्यास विड्याच्या पानांची व फुलांची सजावट केलेली असते.[२९] मंदिराच्या दर्शनी बाजूला सुरूदार खांबावरच्या तीन कमानीवर स्पष्टपणे ब्रिटिश शैलीचा प्रभाव असलेली मध्ये घड्याळ्याचा गोल अन् दोन्ही बाजूला नक्षी असलेली त्रिकोणी रचना दिसते. समोरचा सभामंडप दुहेरी उंचीच्या लोखंडी खांब पत्र्याचे छप्पर असलेला आहे. 'सिध्देश्वर

मंदिर समिती' ने मागील २५ ते ३० वर्षात भक्तांच्या वाढत्या संख्येचा सोयीसाठी अनेक छोटी बांधकामे व समाधीचे सुशोभीकरण केले आहे. मंदिराचा कळस दाक्षिणात्य शैलीत बांधला आहे. मंदिर परिसराच्या चारी बाजूंनी प्रशस्त घाट आणि पाण्यात उतरणाऱ्या पायऱ्या आहेत. अलिकडच्या काळात तलावात गणपती विसर्जनासाठी खास हौद बांधण्यात आले आहेत. मंदिराच्या आवारात मध्यभागी श्री सिध्देश्वरांची समाधी, वीरेश्वर, बिलेश्वर या परिवार देवतांची मंदिरे आहेत.

सदर देवस्थानची व्यवस्था उत्तम रितीने चालावी म्हणून प्रत्येक आयात वस्तूंवर अनेक वर्षापासून 'श्रीसिध्देश्वर धर्मादाय फंड' गोळा केला जातो. शिवाय भक्तांनी आपली स्थावर व जंगम मालमत्ता देवस्थानास अर्पण केल्या आहेत. त्यामध्ये श्रीमंत धर्माराव थोबडे, अळळे, कोटगी व बसवंती, बाबुराव छिद्रे, आप्पाराव निराळी व बाबुराव निराळी, शरणप्पा कोडगी, आप्पासाहेब वादर इत्यादींचा समावेश होतो.[३०] वरील उत्पन्नातून पंचाच्या देखरेखेखाली देवस्थानची बांधकामे, पूजाअर्चा वगैरे होतात. आजपर्यंत या फंडातून कसब्यातील मल्लिकार्जूनाचे भव्य देवालय, श्रीसिध्देश्वरांचे देवळासमोरील भव्य सभामंडप, ओटे, ओवऱ्या तसेच रेवणसिध्देश्वर देवळासभोवती ओवऱ्या बिल्वेश्वराचे देऊळ इत्यादी अनेक कामे केली आहेत.[३१]

'श्री सिध्देश्वर मंदिर देवस्थान संस्था' सन १९३५ च्या मुंबई पब्लिक रजि. ॲक्ट नंबर ५ च्या कलम (३) प्रमाणे सन १९४० मध्ये उदयास आली. त्यानंतर ही संस्था दि बॉम्बे पब्लिक ॲक्ट १९५७ अन्वये पब्लिक ट्रस्ट म्हणून रजिस्टर करण्यात आली. या पंचकमिटीमार्फत श्री सिध्देश्वर देवालय, श्री सोन्नलिगे सिध्देश्वर, रेवणसिध्देश्वर देवालय, यल्लेश्वर देवालय व शहराच्या पंचक्रोशीतील सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेली ६८ लिंगे, अष्टविनायक, काळभैरव, इत्यादी देवतांची नियमितपणे विधीपूर्वक पूजा-अर्चा करण्यात येते.

धार्मिक कार्याबरोबरच मंदिर समितीमार्फत शैक्षणिक कार्याबरोबरच श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल, श्री सिध्देश्वर देवस्थान धर्मार्थ दवाखाना, सिध्देश्वर पंगुत्त्व निवारण कार्य इत्यादी वैद्यकीय कार्यही उत्तम रितीने केले जाते.

सिध्देश्वर महिलाश्रम सोलापूर व भवानी पेठ येथे वृध्द व अनाथ महिलांची जेवणाची व राहण्याची सोय तसेच रूद्रमणी भवानी पेठ येथे लिंगायत समाजाच्या प्रेत निक्षेपासाठी आर्थिक मदत ही या कमिटीमार्फत दिली जाते.[३२]

- **श्री सिध्देश्वर मंदिरातील इतर मंदिरे**

सिध्देश्वर मंदिर परिसरात अनेक देव-देवतांची छोटी छोटी मंदिरे पाहावयास मिळतात. त्यामध्ये सिध्देश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगापैकी श्री अमृतलिंग, श्री पापेश्वर लिंग, श्री परमेश्वर लिंग, श्री योगीनाथ लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री वज्रेश्वर लिंग, श्री ओंकारेश्वर लिंग, श्री आहेश्वर लिंग, श्री माहेश्वर लिंग, श्री अकलेश्वर लिंग अशी दहा लिंगे मंदिर परिसरात आहेत. शिवाय सिध्दरामेश्वरांची योग समाधी, येडूर बिल्लेशाचे मंदिर, अल्लम प्रभुलिंग, पांडुरंग मंदिर, नालतवाड विरविरेश्वर मंदिर इत्यादी मंदिरांचा त्यात समावेश होतो.

- **श्री अमृतलिंग**

सिध्देश्वरांनी स्वन्नलगीच्या कल्याणासाठी १२ व्या शतकात स्थापन केलेल्या ६८ लिंगातील श्री अमृतलिंग हे पहिले लिंग असून हे लिंग सिध्देश्वर मंदिर परिसरातील एका मंदिरात स्थापित आहे. श्री अमृतलिंगाला तैलाभिषेक झाल्याशिवाय सिध्देश्वर यात्रेस प्रारंभ होत नाही.

- **अल्लम प्रभुलिंग**

सिध्देश्वर मंदिराच्या पश्चिमेस तलावालगत अल्लमप्रभुचे मंदिर आहे. मल्लिकापूर या गावामध्ये अल्लम नावाचा एक मृदंग वादक कामलता नावाच्या नृत्यांगणेच्या प्रेमपाशात अडकला होता. ही कामलता विषमज्वराने आजारी पडून मृत्यु पावली तिच्या विरहाने अल्लम वेडा होऊन भटकंती करीत स्वन्नलिगेस आले सिध्दरामेश्वरांनी अल्लमप्रभुस दिक्षा दिली. तेंव्हापासून अल्लमप्रभु 'प्रभुलिंग' या नावाने प्रसिध्द झाले.[३३]

- **येडूर बिल्लेश मंदिर**

शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या योग समाधीच्या पाठीमागील बाजूस येडूर बिल्लेशाचे मंदिर आहे. येडूर गावात बिल्लेश बोमय्या नावाचे गृहस्थ होते. सिध्दरामेश्वरांची ख्याती ऐकून ते स्वन्नलगीस आले. येडूर गावातील सावकारही त्याचा माग काढत स्वन्नलगीस आले व सावकाराने बिल्लेशाला पैशाची मागणी केली. सिध्दरामेश्वरांनी बिल्लेशाला सावकाराचे पैसे देण्यास सांगितले. बिल्लेशाने सिध्दरामेश्वरांची आज्ञा अमान्य केली. तेंव्हा सिध्दरामेश्वरांनी सांगितले की, 'यास हवे

तेथे घेऊन जा आणि पैशाची वसूली करा'. त्याचा अपमान झाल्याने बिल्लेशाने एका शिवालयात जाऊन आत्महत्या केली. सिध्दरामांनी बिल्लेशाने घेतलेल्या सावकाराचे कर्ज दुप्पट धन देऊन चूकते केले. अशा या सिध्देश्वराचा शिष्य 'येडूर बिल्लेशाचे मंदिर' सिध्देश्वर मंदिर परिसरात आहे.[३४]

- **पांडुरंग मंदिर**

सिध्दरामेश्वराच्या मुख्य मंदिराच्या उत्तरेस लागून 'पांडुरंगाचे मंदिर' आहे. आपेगाव येथील गोविंदपंत आणि त्यांच्या धर्मपत्नी बोराबाई कुलकर्णी पांडुरंगाच्या दर्शनास पंढरपूरास निघाले होते. ते पायी चालत स्वन्नलिगेस आले व रात्रीचा मुक्काम येथेच केला. दुसऱ्या दिवशी सकाळी मल्लिनाथाचे दर्शन घेऊन महाप्रसाद घेत सिध्दरामाचा निरोप घेण्यासाठी त्यांच्याजवळ आले. सिध्दरामेश्वरांनी चौकशी केली असता, मी आपेगांवचा कुलकर्णी असून आम्ही दोघे विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला निघालो आहोत. परंतु शरीर फार थकल्यामुळे आम्ही पंढरपूरास पोहोचतो की नाही असे त्यांना वाटते. त्यावेळी सिध्दरामांनी तेथेच विठ्ठलाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून या दाम्पत्याचे पांडुरंग दर्शनाचे स्वप्न पूर्ण केले, तेच सिध्देश्वर मंदिरातील 'पांडुरंग मंदिर' होय.

- **नालतवाड वीरवीरेश्वर मंदिर**

विजापूर जिल्ह्यातील नालतवाड या गावी सन १८४८ साली वीरेश्वरांचा जन्म झाला. सोलापूरचे ग्रामदैवत असलेल्या सिध्देश्वर देवस्थानकडे ते आकृष्ट झाले. घरची परिस्थिती चांगली असतानाही वीरेश्वर आपल्या कुटुंबासह नालतवाड सोडून सोलापूरात आले. येथे एकदा देवीच्या जत्रेत बळी देण्यासाठी आणलेल्या मोठ्या रेड्याच्या मानेवर आपली मान घट्ट ठेऊन ते उभे राहिले. पशूबळी थांबली पाहिजे याबद्दल त्यांचा अट्टाहास होता, सन १९२० मध्ये त्यांना मृत्यु आला. स्वत:च्या भूकेची पर्वा न करता वीरेश्वर यांनी येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांना जीवनभर भोजनाचा प्रसाद देऊन त्यांचा आत्मा तृप्त केला. वीरेश्वरांना धर्माचे ज्ञान अवगत होते. महात्मा बसवेश्वरांसारख्या महापुरूषाचे जीवन चरित्र जाणून घेऊन त्याप्रमाणे सन्मार्गाने जीवन जगण्याचा त्यांनी प्रयत्न केला, त्यांचे चारित्र्य शुध्द होते, ते बोलण्याप्रमाणे वागणारे शरण होते. अंगावर बंडी, एका हातात तांब्या व दुसऱ्या हातात काठी, खांद्यावर ठिगळ लावलेली झोळी, डोक्यवर भगवा शेला, त्याच्यावर काळे घोंगडे ही त्यांची नित्याची वेशभूषा होती. सोलापूरात आल्यानंतर काही दिवस त्यांनी मल्लिकार्जून मंदिरात वास्तव्य केले. आज मल्लिकार्जून मंदिरासमोर असणारा 'रूद्रांबिकादेवी मठ' हे

शिवशरण यांचे राहते घर होते. मृत्युनंतर त्यांची समाधी श्रीसिध्दरामेश्वरांच्या देवळातच व्हावी म्हणून शहरातील काही प्रमुख मंडळींनी प्रयत्न केले. तत्कालीन मॅजिस्ट्रेट चनबसप्पा मडकी यांनी प्रयत्न करून श्रीसिध्देश्वर देवळात शिवशरणाची समाधी करण्यासाठी ब्रिटिश सरकारकडून परवानगी मिळवली. आज ही समाधी श्रीसिध्देश्वर मंदिरात श्रीसिध्देश्वरांच्या संजिवन समाधी समोर आहे.[३५]

- **सिध्दरामेश्वरांची योग समाधी**

सिध्देश्वरांनी आपल्या योग साधनेच्या कर्तृत्त्वावर स्वन्नलिगेमध्ये महत्त्वाची धार्मिक कार्य केली. सिध्देश्वर मंदिरात असणारी त्यांची समाधी 'योगसमाधी' म्हणून ओळखली जाते. ही योगसमाधी तीन भागामध्ये युक्त असून पांढऱ्या संगमरवरी दगडात बांधलेली आहे. समाधीचा पहिला भाग जमिनीपासून तीन फुट उंचीचा असून १५ x १५ चा चौकोनी कट्टा आहे. त्याच चौकोनी कट्ट्याच्यावर दोन फुटावर १२ x १२ चा दुसरा कट्टा असून वरचा मुख्य भाग हा तिसरा टप्पा मानला जातो हा चार फुट उंच असून ८ x ८ असा आहे. या भागावर पितळी जोडलिंग व त्यावर एका धातूच्या भांड्यातून नियमितपणे पाणी पडेल अशी रचना केलेली आहे.[३६]

सिध्देश्वरांच्या नैवद्यात ज्वारीची भाकरी, बाजरीची भाकरी, दही भात, वरीच्या तांदूळाची खीर, बारा भाज्यांचा (भज्जी) समावेश असतो. पूजेच्या वेळी १०८ वेळा '३ॅ नम:शिवाय' हा मंत्र म्हणून शिवलिंगावर बेलपत्र वाहिली जातात.[३७]

- **स्वन्नलिगे मंदिर (श्री सिध्दरामेश्वरांचे जन्मस्थळ)**

'स्वन्नलिगे' आणि सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वर यांचा जवळचा संबंध असल्याचे अनेक पुराव्यावरून दिसून येते. सिध्दरामेश्वरांशी संबंधित मिळालेल्या शिलालेखामधून स्वन्नलिगेचा उल्लेख आल्याचे दिसून येते. हे 'स्वन्नलिगे' म्हणजेच श्रीसिध्दरामेश्वरांचे जन्मस्थळ होय. कवी राघवांक यांनी कन्नड भाषेत लिहिलेल्या सिध्देश्वरांच्या चरित्रावरून सिध्दरामेश्वरांचा जन्म मुद्दगौडा व सुग्गलादेवी या दांपत्याच्या पोटी झाला. या घटनेची साक्ष म्हणून 'सिध्देश्वरांचे जन्मस्थान' या नावाने 'स्वन्नलिगे' हे ठिकाण पवित्र मानले जाते. साखर पेठेत 'सिध्दरामेश्वरांचे जन्मस्थळ' 'स्वन्नलिगे' या नावाने ओळखले जाते.[३८] या ठिकाणी असलेल्या मंदिराचा सभामंडप आधुनिक काळात बांधलेला आहे. मात्र अंतराळ व गर्भगृह मध्ययुगीन काळात बांधले गेले आहेत. संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या या मंदिराच्या सभामंडपात

श्रीसिध्दरामेश्वरांची मूर्ती आणि गर्भगृहामध्ये शिवलिंगावर पितळी पंचमुखी नागासह सिध्दरामेश्वरांचा मुखवटा बसवलेला आहे. सभामंडपास बाहेरून दगडी खांबावर नक्षीयुक्त कमानी आहेत.[३९] मंदिराच्या मागील बाजूस अनेक देव-देवतांची छोटी छोटी मंदिरे पाहावयास मिळतात. श्रावण सोमवारी येथे नंदीध्वजासह पालखी निघते. या देवस्थानास सोलापूर शहराच्या धार्मिक इतिहासात 'जागृत देवस्थान' म्हणून महत्त्वाचे स्थान आहे. आजही अनेक भाविक आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी सिध्दरामाला नवस बोलून साकडे घालतात. या मंदिराचे व्यवस्थापन 'श्री सिध्देश्वर पंचकमिटी' मार्फत केले जाते तर राजशेखर हिरेहब्बु हे मंदिराचे पुजारी म्हणून काम पाहतात.[४०]

- **श्री शंकरलिंग देवस्थान**

सोलापूर शहरात बणगार रंगारी समाजाचे लोक राहतात. हा समाज वीरशैव लिंगायत संप्रदायात मोडतो. या समाजातील लोक कन्नड भाषा बोलातात. या समाजातील लोकांनी एकत्रित येऊन सन १८६८ मध्ये शंकरलिंग देवस्थानची निर्मिती केली. सुरूवातीच्या काळात या मंदिराचा गाभारा बांधण्यात आला. त्यावेळी बसलिंगप्पा शंकरप्पा बिजरगी हे या मंदिराची पूजा-अर्चा करीत. सन १९७६ मध्ये समाजाने देवस्थानचे रजिस्ट्रेशन करून नियमित केले.

दगडी पाषाणातील शिवमंदिराच्या गर्भगृहाचे प्रवेशद्वार पूर्वेला आहे. मंदिरातील शिवलिंग काळ्या पाषाणातील असून त्यावर असलेल्या शेषनागाची प्रतिमा (शंकरलिंगाची) पितळी धातूची आहे. शिवलिंगासमोर पादुका असून सभामंडपात गर्भगृहासमोर काळ्या पाषाणातील नंदी आहे. मंदिराच्या शिखरावर कळस चढविलेला असून सुंदर शिल्पांनी आणि नक्षीकामाने शिखर सजविलेले आहे. शिखराच्या खालच्या भागात महादेवाची मूर्ती असून या मूर्तीच्या दोन्ही बाजूला जय व विजय कोरलेले आहेत. मंदिरात मुखमंडप, सभामंडप, अंतराळ असे पारंपारिक भाग पाहावयास मिळतात. सभामंडपात दानम्मादेवी, गणेश, विरभद्र, हनुमान, शंभुलिग, नागदेवता, नवग्रह इत्यांदीच्या मूर्ती आहेत. या मूर्तींची प्रतिष्ठापना तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी बृहन्मठ होटगी यांच्या हस्ते करण्यात आली.[४१]

सकाळ व संध्याकाळ शंकराची आरती झाल्यानंतर खडी-साखरेचा नैवद्य प्रसाद म्हणून दिला जातो. सोमवार व गुरूवार मंदिरात महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होतो. दरवर्षी जेष्ठ शुध्द पोर्णिमेस शंकरलिंग देवस्थानची यात्रा भरते. या दिवशी सकाळी ६ वाजता शंकरलिंग आणि

मंदिरात असणाऱ्या दानम्मादेवीचा रूद्राभिषेक व महापूजा होते. श्रींची सवाद्य पालखी मिरवणुकही काढली जाते. जेष्ठ शुध्द पोर्णिमेच्या अगोदर ११ दिवस विविध साधूसंतांना 'दासोह' वाटप केले जाते. शेवटी महाप्रसादाने यात्रेच्या कार्यक्रमाची सांगता होते.[४२]

मार्शल लॉच्या काळात हुतात्मा झालेले मल्लप्पा धनशेट्टी हे याच समाजातील होते. त्यामुळे या समाजाचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान राहिलेले आहे. श्री शंकरलिंग तरूणमंडळ मार्शल लॉ काळात सक्रीय असल्याची माहिती सापडते. मंदिरामार्फत सामुदाईक विवाहासारखे विविध धार्मिक कार्यक्रमही पार पाडले जातात. सोलापूर शहरात असणाऱ्या बणगार रंगारी समाजाचे अनेक लोक सोलापूरच्या पूर्वेकडे असलेल्या अक्कलकोट रस्त्यावरील वळसंग या गावीही राहतात. त्यामुळे वळसंग येथेही शंकर लिंगाचे मंदिर पाहावयास मिळते. शंकर लिंगाचे मुळ स्थान नवलगी (इलकल) येथे कृष्णा नदीच्या काठावर आहे.[४३] मंदिरातील पुजाऱ्यांमध्ये बसलिंगप्पा शंकरप्पा बिज्जरगी, गुरूलिंगप्पा गुरूबसप्पा बिज्जरगी, गुरूबसय्या सिध्दप्पा स्वामी, सोमेश्वर गुरूबसय्या स्वामी इत्यांदीचा समावेश होतो.

- **श्री निलकंठेश्वर मल्लिकार्जून मंदिर**

शहराच्या धार्मिक इतिहासात वीरशैव कुरहिनशेट्टी समाजाचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. हा समाज विणकर असल्याने आंध्र आणि कर्नाटकातून महाराष्ट्रात येऊन तो सोलापूर शहरात स्थायिक झाला आहे. मिलमधून आणि हातमागावर पुरूष काम करीत तर स्त्रिया विडी तयार करण्याच्या कामात गुंतलेल्या असत. हा समाज तेलगु भाषिक असून सुमारे १२५ वर्षांपासून या समाजाचे वास्तव्य सोलापूर शहरात आहे. पद्मशाली समाज हा वैष्णवपंथीय आहे तर कुरहिनशेट्टी समाज हा शैवपंथीय आहे. कुरहिनशेट्टी या शब्दाचा अर्थ 'कुऱ्हू' म्हणजे लिंग आणि 'शेट्टी' म्हणजे पुजक होत, म्हणजेच लिंगपुजक होत. कुरहिनशेट्टी समाजात ६६ गोत्र आढळतात. महाराष्ट्रात सोलापूर, पुणे, मुंबई, इचलकरंजी या ठिकाणी या समाजाचे लोक मोठ्या प्रमाणावर आहेत.[४४]

शहराच्या पूर्व भागात साखर पेठेत कुरहिनशेट्टी समाजाचे श्री निलंकठेश्वर मल्लिकार्जूनाचे मंदिर आहे. या समाजातील लोकांकडे कानडी, संस्कृत भाषेतीत निलकंठेश्वर पुराण आहे. या दोन्ही पुराणग्रंथांची मिरवणुक श्रावणातील शेवटच्या सोमवारी काढण्यात येते. सन १९४२ मध्ये या मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले.[४५] या मंदिरात असणारा भव्य नंदी काळ्या पाषाणातील असून अतिशय सुबक

आणि रेखीव आहे. जिल्ह्यातील अनगर या गावाहून मोठा काळा पाषाण आणून १९३५ मध्ये गणपतराव रामजी भगत यांनी हा नंदी घडविला.[४६]

सन १९४२ मध्ये मंदिराच्या गर्भगृहात शिवपिंडीची (निलकंठेश्वर लिंग) प्रतिष्ठापना ही बडगेरी (गदग) येथील रूद्रमनी स्वामी यांच्या हस्ते विधीवत करण्यात आली. यावेळी मद्विरशैव कुरहिनशेट्टी समाजाचे हजारो बांधव हजर होते. सन १९६६ मध्ये मंदिराच्या शिखराचे बांधकाम पूर्ण झाले. २६ जून १९६७ रोजी शिखरावर सुवर्ण कळस बसविण्यात आला. सन १९७० साली देवालयाच्या कमानी बांधण्यात आल्या.[४७] मंदिराच्या बांधकामात संगमनेर, हैद्राबाद येथील समाज बांधवांनी आर्थिक सहकार्य केले आहे. सायण्णा मुल्लीटी संगमनेर यांनी देवालयाच्या बांधकामासाठी ५,००० रूपये तसेच लिंगप्पा चंद्राम बंदगी (हैद्राबाद) यांचेही सहकार्य लाभले. आशप्पा लछमय्या अच्युगटला यांनी देवस्थानसाठी चांदीची पालखी भेट दिली. यांच्या प्रेरणेने सन १९६५ मध्ये माघ महिन्यात पंढरपूरास जाणाऱ्या दिंडीची सुरूवात झाली, ही माघवारीची प्रथा आजही चालू आहे. श्रावण महिन्यात दररोज मंदिरात शिवलिलामृत पारायण, रूद्रपूजा, भजन, किर्तन आणि प्रवचन इत्यादि धार्मिक कार्यक्रम केले जातात व शिवलिंगाला चांदीच्या आभूषणाने सजविले जाते. शंकराची आराधना करीत असताना

।। निलकंठ जगन्नाथो जगद्गुरू, निलकंठ जगज्जेता निलकंठ मिर जगद ।।

या श्लोकाचे पठण होते. श्रावणातील शेवटच्या सोमवारी उत्सव मूर्तीची चांदीच्या रथातून मिरवणुक काढली जाते. हा चांदीचा रथ मोगलप्पण्णा बळीराम पोगुल यांनी मंदिरास भेट दिला आहे. १३ ऑगस्ट २०१२ रोजी निलंकठेश्वर देवस्थानच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.[४८] देवस्थानमार्फत निलंकठेश्वर प्रशाला चालविली जाते.

- **श्री निलकंठेश्वर देवस्थान**

श्री निलकंठेश्वर देवस्थान हे गुरूवार पेठेत राहणाऱ्या कुरहिनशेट्टी समाजाचे आहे. सोलापूर शहरात कुरहिनशेट्टी समाजाच्या कुरहिनशेट्टी समाज गुरूवार पेठ, मध्वीरशैव कुरहिनशेट्टी समाज साखर पेठ, निलकंठ समाज देवस्थान भवानी पेठ आणि कुरहिनशेट्टी कोष्टी समाज वारद या वेगवेगळ्या संस्था पहावयास मिळतात. हा समाज आंध्र व कर्नाटकामधून आलेला

असून विणकाम ही त्यांची कला असल्यामुळे शहरातील विणकर व्यवसाय वाढीस लागल्याचे दिसून येते. गुरूवार पेठेत राहणाऱ्या या कुरहिनशेट्टी समाजाचे २६ मानकरी फंड आहेत. एका फंडात ५० ते १५० कुटुंबाचा समावेश होता. हा समाज एकसंघ राहावा म्हणून फंडाची निर्मिती केली आहे.[४९]

निलकंठेश्वर देवस्थानची निर्मिती १९२९ मध्ये करण्यात आली. या कार्यात ग्यानप्पा आडकी, नारायण गणपा, तिप्पण्णा कामूर्ती यांचे योगदान महत्त्वाचे राहिले. मुखमंडप, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह आणि शिखर हे या मंदिराचे महत्त्वाचे भाग आहेत. गाभाऱ्यात शिवलिंग व शिवलिंगाच्या पिंडीवर निलकंठेश्वराची मूर्ती असून त्यावर नागफणा आहे. सन १९९० मध्ये मंदिरचा जीर्णोध्दार करण्यात आला, मंदिराच्या गर्भगृहावर शिल्पयुक्त शिखर बांधण्यात आले. मंदिराच्या वरच्या मजल्यावर सांस्कृतिक भवन असून या ठिकाणी विवाहासारखे धार्मिक कार्यक्रम पार पाडले जातात. दर सोमवारी मूर्तीची पानपूजा होते, मंदिरात शंकराची आरती म्हटली जाते. श्रावण महिन्यात संपूर्ण महिना धार्मिक उत्सव असतो. धार्मिक कार्यक्रमांबरोबर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात येते. देवस्थान समितीची स्थापना सन १९५२ मध्ये करण्यात आली असून रामकृष्ण व्यंकप्पा बुगडे हे विश्वस्त म्हणून काम करीत आहेत.[५०]

- **श्री नगरेश्वर देवस्थान**

शके १८०६ आषाढ वद्य त्रयोदशी रोजी नगरेश्वर मंदिराची स्थापना वैश्य समाजातील लोकांनी केली. या मंदिराच्या उभारणीमागे वैश्य समाजातील इराप्पा गुमडेल, हणमय्या बच्चुवार,शेठ पंढरीनाथ कवठेकर, पामनी आप्पा सोमशेट्टी, कृष्णप्पा आप्पा रायचूरकर इत्यादी मंडळींचे परिश्रम आहे. शहरातील तुळजापूर वेशीतील हुतात्मा चौकात असलेले 'श्री नगरेश्वर मंदिर' हे पश्चिमाभिमुख असून सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा या मंदिराचा पदविन्यास आहे. मंदिराच्या उजव्या बाजूला मुख्य चौकात 'पश्चिमाभिमुख मारूतीचे मंदिर असून या मारूती मंदिराच्या उजव्या बाजूला श्रीसिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेल्या काळभैरवनाथाचे मंदिर आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूला 'श्रीसद्गुरू गोविंदबुवा मठ' असून हुतात्मा चौकातच मरिआईचे एक मंदिर आहे. या सर्व धार्मिक स्थळांमुळे आणि चौकातील हुतात्मा स्तंभामुळे हा चौक शहराचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो.

श्री नगरेश्वर शिवलिंगाची प्रतिष्ठापना सुब्रम्हण्यम् भास्कराचार्य यांच्या शुभहस्ते शके १८०६, आषाढ वद्य त्रयोदशी रोजी केली. यावेळी सोलापूरातील वेदशास्त्र संपन्न गवई घराण्यातील

नरसिंहभट सखारामभट गवई यांचे सहकार्य लाभले. गवई घराण्यातील प्रल्हादभट, माधवरावभट इत्यादींनी श्री नगरेश्वर मंदिराच्या नित्यनैमित्तिक कार्यास सहकार्य केले. आजही याच घराण्याकडे नित्यनैमित्तिक पूजा-अर्चा करण्याची परंपरा चालत आली आहे. गवई घराणे मंदिराच्या प्रत्येक धार्मिक कार्यात भाग घेवून सर्व कार्यक्रम यथासांग पार पाडतात.

मंदिराच्या सभामंडपाचे बांधकाम शेठ पंढरीनाथ कवठेकर यांनी शके १८१९ मध्ये करून दिले आणि मंदिराचा दर्शनी भाग इरप्पा गुमडेल यांनी बांधून दिला तर हणमय्या बच्चुवार यांनी शके १८२२ मध्ये महादरवाजा बांधून दिला. उत्तरेकडील तीन मजली बांधकाम व देवालयातील आजूबाजूचे इतर बांधकाम समाजातील मंडळींच्या सहकार्याने झाले. मंदिराचा सभामंडप प्रशस्त असून सभामंडपाच्या भिंतीवर विविध देव-देवतांची चित्रे पाहावयास मिळतात. सर्व सोयींनीयुक्त अशा प्रशस्त सभामंडपामुळे मंदिरात विवाहादि मंगलकार्ये पार पडतात. यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाते. या शुल्कातून मंदिराचा विकास केला जातो. मंदिरात लोकमान्य व्याख्यानमाला असते. आषाढ वद्य त्रयोदशीस 'श्री नगरेश्वर मंदिराचा' वाढदिवस साजरा केला जातो. त्यानिमित्त दरवर्षी सहस्त्र ब्राह्मण भोजन होते. श्रावण महिन्यात महिनाभर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सन १९६७ मध्ये नगरेश्वर मंदिरात गोव्याच्या राधाबाई कामत यांचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास शहरातील अनेक भाविक उपस्थित होते. मंदिरात समाजातील लोकांबरोबरच शहरातील इतर समाजाचे लोकही दर्शनासाठी येतात.[५१]

- **श्री मार्कंडेय मंदिर**

पद्मशाली समाजाचे आराध्यदैवत श्री मार्कंडेयाचे सिध्देश्वरपेठेतील मंदिर हे शहरातील प्रसिद्ध देवस्थानापैकी एक आहे. महर्षि श्रीभृगूऋषी हे या समाजाचे आद्यजनक व श्री भवानीऋषी हे या समाजाचे मूळपुरूष मानले जातात. हा समाज जसजसा सोलापूर शहरात येऊ लागला तसतशा त्यांच्या फंडी (विभाग) निर्माण झाल्या. सन १८७९ पर्यंत या समाजाच्या २२ फंडी निर्माण झाल्या. त्यावेळी पद्मशाली समाजाची लोकसंख्या १२,००० च्या वर होती. वरील सर्व फडींनी एकत्र येऊन सन १८८१ साली सिध्देश्वर पेठेत सर्व्हे नंबर ६०५३ ही ८० x ७० फुटाची जागा ६२१ रूपयास विकत घेतली. ही जागा पद्मशाली समाजातील नरसप्पा फलमारी, तिम्मप्पा महांकाळ, तुकाराम गाजुल, हणमंतय्या सोमा, विठोबा शहापूर, पांडोबा केदारी, मुसल्लप्पा जटला, सिताराम ईराबत्ती, सायण्णा

ईराबत्ती, कृष्णप्पा त्यारला व आशण्णा ईराबत्ती अशा दहा पुढाऱ्यांच्या नांवे खरेदी करण्यात आली. तेरा वर्षांनी म्हणजेच सन १८९४ मध्ये मार्कंडेय मंदिराच्या बांधकामाचा पाया रचला. [५२]

सन १८९४ मध्ये मंदिराचा पाया खोदत असताना त्या ठिकाणी एक मोठी विहिर आढळून आली. ती विहिर बुजवणे हे मोठे खर्चाचे काम असल्याने तेथे तळघर बांधून तेथे श्री भावनाऋषी व भद्रावती मातेची मूर्ती बसविली. आर्थिक अडचण निर्माण झाल्याने मंदिराच्या बांधकामाचे काम रखडले गेले. याकामी पैसा उभारण्यासाठी ८ मे १८९९ ला समाजात होणाऱ्या लग्नकार्यामागे ८ रूपये आणि गांधर्व विवाहातून ६० रूपये देवाच्या हक्काचे घ्यावे असा ठराव पंचांच्या बैठकीत घेण्यात आला. शिवाय कारखानदारांकडून प्रत्येक हातमागाप्रमाणे १ रूपया वसूल करण्यात आला. तरीही अनेक आर्थिक अडचणींमुळे सन १८९३ ते सन १९१७ या चोवीस वर्षांत तळघरासह मंदिराचे बांधकाम फक्त २१ फुट उंचीपर्यंतच झाले.

सन १९१८ मध्ये पद्मशाली देवस्थान संस्थेची स्थापना होऊन बाळकृष्ण तुम्मा हे अध्यक्ष आणि तुकाराम कन्ना यांची सचिव म्हणून निवड झाली आणि मार्कंडेय मंदिराचे बंद पडलेले बांधकाम पुन्हा हाती घेण्यात आले. यावेळी कारखानदारांकडून रूपये १०,५७७ जमा झाले आणि सन १९२४ मध्ये मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मार्कंडेयाच्या मूर्तीची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. पद्मशाली संस्थेच्या अधिपत्त्याखाली चालणाऱ्या या मार्कंडेय मंदिराचे अध्यक्ष म्हणून अलिकडच्या काळात जनार्दन कारमपूरी, सरचिटणीस म्हणून अजय दासरी आणि विश्वस्त म्हणून प्रा. पुरणचंद्र पुंजाल, भूमय्या येमुल, रामकृष्ण कोंड्याल, अशोक आडम, भूमय्या गड्डम ही मंडळी आपली जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत.[५३] मार्कंडेय मुनी यांनी 'पद्मपुराण', 'वराह पुराण', 'श्री मार्कंडेय पुराण', 'मार्कंडेय शिवस्तोत्र' आदि रचना मोठ्या विद्वतेने केली. हे ग्रंथ धर्मशास्त्रावर व संस्कार विधीसाठी आजतागायत सर्वत्र आधारभूत मानले जातात. तुळजापूरात अंबाबाईच्या मूर्तीच्या उजव्या बाजूला मार्कंडेय ऋषी पुराण सांगत असल्याचे दाखविले आहे.[५४]

मंदिराची रचना

श्रीसिध्देश्वर मंदिराच्या पूर्वेस सिध्देश्वर पेठेत भव्य व विस्तीर्ण असे दगडी बांधकाम केलेले पद्मशाली समाजाचे मार्कंडेय मंदिर असून या मंदिराचे सोलापूरच्या धार्मिक इतिहासात मोलाचे

योगदान राहिले आहे. हे मंदिर काळ्या पाषाणात बांधलेले असून शहराच्या स्थापत्य कलेमध्ये भर घालणारे असे आहे. पूर्वाभिमुख असलेले हे मंदिर सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखरयुक्त असे आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला व्याघ्रमुख कोरलेले असून उंबऱ्यावर व्याल कोरलेले आहेत. प्रवेशद्वाराचा दरवाजा हा सुंदर कोरीव नक्षीकाम केलेला सागवानी लाकडाचा आहे. सभामंडपामध्ये मंगलकार्य आणि विवाह पार पाडले जातात. गर्भगृह उंच अशा चौथऱ्यावर बांधलेले असून गाभाऱ्यात श्री मार्कंडेय मुनींची काळ्या पाषाणातील मूर्ती व अंतराळात काळ्या पाषाणातील नंदी आहे. या मूर्तीची प्रतिष्ठापना गुरूवार ७ ऑगस्ट १९२४ या दिवशी करण्यात आली.

गर्भगृहाच्या खाली असलेल्या तळघरात श्री भावनाऋषी व भद्रावती मातेची मूर्तीची प्रतिष्ठापना ही मार्कंडेय मुनींच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापने दिवशीच करण्यात आली. या दिवशी विधीसाठी ३७ ब्राह्मणांना पाचारण करण्यात आले होते. यावेळी मच्छलीपट्टण येथून काही समाज बांधव या कार्यक्रमास हजर राहिले. मच्छलीपट्टण येथील श्री बटू सुर्यनारायणदास गारू यांनी मार्कंडेय चरित्रावर किर्तन केले. हजारो लोकांच्या साक्षीने होमहवन, वेद, मंत्र इत्यादींच्या घोषात मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमासाठी एकूण खर्च २९९० रूपये आणि सव्वा सहा आणे इतका झाला. सन १९१९ ते सन १९२४ या पाच वर्षात मार्कंडेय मंदिराचे संपूर्ण बांधकाम करण्यात आले.[५५]

मंदिरामध्ये वर्षभर अनेक धार्मिक कार्यक्रम पार पाडले जातात. त्यामध्ये नुल्लुपुल्लुम (नारळी पोर्णिमा), लक्ष्मीपुजन, दिपावळीपाडवा, नंदीध्वज पूजा, श्री मार्कंडेय जन्मोत्सव, गणेश जयंती, भृगमहर्षि वर्धापनदिन, महाशिवरात्री, श्री भवानी ऋषी जयंती, तुकारामबीज, एकादशी इत्यादी धार्मिक कार्यक्रमांचा समावेश होतो.[५६] शहरातील या पद्मशाली समाजाचे देवस्थान विषयीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तेलगु भाषा बोलणारा हा वर्ग महाराष्ट्रात येऊन येथील मराठी संस्कृतीशी एकजीव झाला.

आज पद्मशाली मंदिर ट्रस्टच्या अधिपत्त्याखाली समाजाची ५७ एकर ८ गुंठे स्मशानभूमी, मार्कंडेय शॉपिंग सेंटर, महालक्ष्मी मंदिर, पद्मशाली भवन, बुर्ला मंगल कार्यालय यासह अनेक वास्तु आहेत. नारळी पोर्णिमेला निघणारा मार्कंडेय रथोत्सव हा मुख्य उत्सव संक्रांतीच्या गड्डा यात्रेप्रमाणेच आकर्षण ठरला आहे.

३.१.२ विठ्ठल मंदिरे

सोलापूर शहरामध्ये वारकरी संप्रदायाची बीजे खोलवर रूजल्याने शहरातून हजारो वारकरी पंढरपूरची वारी नियमितपणे करीत आहेत. विठ्ठल हे सर्व जाती-धर्मांचे दैवत असल्याने विविध जाती-धर्मांत पांडुरंगाचे भक्त पाहावयास मिळतात. शहरातील अनेक विठ्ठलभक्तांनी आपापल्या विभागामध्ये विठ्ठल मंदिरे निर्माण केली आहेत.

- **जुने विठ्ठल मंदिर**

शहराच्या मध्यभागी असलेल्या या विठ्ठल मंदिराच्या पूजा-अर्चेची सनद सन १८७४ मध्ये ब्रिटिशांनी सोलापूर शहरातील जोशी घराण्यास दिली होती.[५७] सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेल्या पानिपतच्या दुसऱ्या लढाईत बहराम खानाच्या बाजूने लढत असलेल्या एका रजपूत सरदारास या मंदिरातील विठ्ठल मूर्ती चंबळ नदीच्या पात्रात सापडली. त्या रजपूत सरदाराने ती विठ्ठल मूर्ती तंजावर येथील तत्कालीन राजास भेट दिली. त्यावेळी सोलापूर परगणा हैद्राबाद निजामाच्या ताब्यात होता. येथे हांडे नावाचे एक सरदार शहराची लष्करी व्यवस्था पाहत होते. हैद्राबादचा निजाम आणि तंजावरकर यांच्यात झालेल्या लढाईमध्ये हांडे यांनी शौर्य गाजविले. त्यावेळी ही विठ्ठल मूर्ती हांडे यांच्या हाती लागली. त्याने ही मूर्ती सोलापूर येथे आणून तिची प्रतिष्ठापना केली.[५८]

मंदिराची रचना

मंदिराच्या नावावरूनच हे मंदिर जुने असल्याचे दिसून येते. मंदिर हे दगडी बांधकामाचे असून मंदिराला दोन मुख्य प्रवेशद्वारे आहेत. मुख्य सभामंडप, अंतराळ, गर्भगृह आणि शिखर असा या मंदिराचा पदविन्यास आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर मंदिराची भव्यता आणि विस्तीर्णता लक्षात येते. सहा हजार चौरस फुट जागेत हे मंदिर बांधण्यात आले असून मंदिरात अनेक देव-देवतांची छोटी-छोटी मंदिरे आहेत. मोठ्या लिंबाच्या झाडाखाली कट्ट्यावर महाबलीचे मंदिर असून या मंदिराच्या जवळ दगडी कट्ट्यावर महारूद्र, नरसिंह, रक्तभैरव, नागोबा, चांदीचे आवरण केलेल्या दत्तपादुका इत्यादी देव-देवतांच्या वालुकामय मूर्ती आहेत. अनेक स्त्रिया वटसावित्री पोर्णिमेस मंदिरात असलेल्या वडाच्या झाडाची पूजा करतात. मंदिराचा सभामंडप भव्य असून सभामंडपातील लेखावरुन सन १८५५ मध्ये सोलापूर शहरातील सराफ मथुराबाई एकनाथराव

मैंदर्गीकर यांनी या सभामंडपातील फरशीकरण केले आहे.[५९] सभामंडपाच्या उत्तरेकडील बाजूस असलेल्या १२ कमानी आणि ओवऱ्याचे बांधकाम सन १९२१ मध्ये नारायणदास भैय्या मारवाडी यांनी तसेच दक्षिणेकडील बाजूच्या सहा खोल्यांचे बांधकाम सन १९४२ मध्ये गणेश बाळकृष्ण जोशी यांनी केले. मंदिराच्या माध्यमातून संस्कृत पाठशाळा चालविली जाई.[६०]

सन १९४३ मध्ये सभामंडपाच्या समोर असणाऱ्या ओवऱ्याचे बांधकाम गंगाधर बाळकृष्ण जोशी यांनी आपली पत्नी गोदावरी गंगाधर जोशी यांच्या स्मरणार्थ बांधून दिल्याचा लेख भिंतीवर पाहावयास मिळतो. या ओवऱ्यामध्ये हनुमानाचे लहानसे मंदिर असून मंदिराच्या समोर काळ्या पाषाणातील शिवलिंग व नंदी आहे. सभामंडपाच्या दक्षिणेकडील भागात गणपतीचे छोटेसे मंदिर असून या मंदिराचा जीर्णोद्धार श्रीमती कलावती आण्णाराव पाटील यांनी आपल्या पतीच्या स्मरणार्थ केल्याचा उल्लेख आहे.[६१]

मंदिराचे अंतराळ व गर्भगृह हे चौथऱ्यावर असून त्यावर छत व कमानीयुक्त ओवऱ्या आहेत. ओवऱ्यांचे बांधकाम सन १९४८ मध्ये गणेश बाळकृष्ण व शंकर मोरेश्वर जोशी यांनी केले. अंतराळास असणाऱ्या कमानीस दोन्ही बाजूस मिळून १२ दगडी खांब व मध्यभागी छताला गोलाकार पध्दतीने कोरलेला पाच फणाचा नागोबा व त्यामध्ये मंदिराची घंटा आहे.

पूर्वाभिमूख गर्भगृहात श्रीविठ्ठल-रूक्मिणीची वालुकामय मूर्ती असून विठ्ठलाची मूर्ती अडीच फुट तर रूक्मिणीची मूर्ती दोन फुट उंच आहे. विठ्ठल मूर्तीच्या डोक्यावर छोटेशे शिवलिंग, पायात दगडी वाळे, हातात मनगट्या आणि मूर्तीच्या छातीवर भृगऋषीच्या पायाचा ठसा कोरलेला आहे. विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती आनंददायी आणि प्रसन्नमुख असून ती भक्तांना नेहमी प्रसन्न ठेवते. मूर्तीच्या पाठीमागे चांदीची नक्षीमय प्रभावळ व प्रभावळाच्या मध्यभागी नागफणा आणि वरील बाजूस व्याघ्रमुख कोरलेले आहे. ही चांदीची प्रभावळ मार्तंडराव वसाजी कणकधर, द्वारकाबाई मार्तंडराव कणकधर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शिवराम मार्तंडराव कणकधर यांनी अर्पण केली. गर्भगृहाचे बांधकाम रामलाल गणपत प्रसाद परांडेकर, कृष्णाबाई रामलाल आणि द्वारकाप्रसाद परांडेकर यांनी केले.[६२]

अलिकडील काळात मंदिराची डागडूजी करण्यात आली असून गंगाबाई विनायक जोशी-कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ लक्ष्मण विनायक जोशी-कुलकर्णी यांनी गर्भगृहात आतील बाजूस पांढरे मार्बल बसविले आहे.[६३]

नित्यपुजा व वार्षिकोत्सव

मंदिराच्या परिसरात ग्रामजोशी परंपरेचा वारसा सांगणारे जोशी परिवाराची ३० ते ४० घरे आहेत. ते त्यांच्या 'हिस्सेरस्सीप्रमाणे' विठ्ठलाची मनोभावे पूजा करतात.[६४] तुकारामबीज, रामनवमी, हनुमानजयंती, नाथषष्टी, गोकुळाष्टमी, ज्ञानेश्वर माऊली जयंती, तसेच विविध संतांच्या जयंती व पुण्यतिथी मंदिरात भक्तीभावाने साजऱ्या केल्या जातात. वर्षातील चार मोठ्या एकादशीस प्रवचने, किर्तने आणि भजनाचे विविध कार्यक्रम होतात. गोकुळाष्टमी वेळी मंदिरात सप्ताह साजरा करण्यात येतो. यावेळी दहीहंडी आणि गुलालाने गोकुळाष्टमीची सांगता होते.[६५]

१ जानेवारी १९३३ या दिवशी रात्री ८ वाजता मंदिरात सनातन धर्माभिमानी लोकांची जाहिर सभा घेऊन या सभेत पटवर्धन यांनी मद्रास कायदे कौन्सिलात डॉ. सुब्बरायन हे मंदिर प्रवेश बिल आणणार असून व्हाईसरॉय साहेबांनी त्या बिलास परवानगी देऊ नये असा ठराव मांडला. त्यावर लऊळ शास्त्री यांनी या ठरावास पाठींबा दिला या सभेला चारशे ते पाचशे लोक हजर होते.[६६] सन १९४९ च्या फेब्रुवारीत सात दिवसाच्या प्रवचनाच्या कार्यक्रमात वेदरत्न महादेव शास्त्री दिवेकर यांचे 'धर्म आणि संस्कृती' या विषयावर, सन १९५१ मध्ये याच मंदिरात त्रिंबकेश्वरचे भारत प्रवचनकार टिल्लु शास्त्री यांचे भारत देशावर, सन १९५४ मध्ये कोपरकर बुवा यांचे किर्तन आणि टिल्लु शास्त्रीचे प्रवचन झाले. यावेळी मंदिरात वडुजकर यांच्या हस्ते या दोघांचा सत्कार करण्यात आला. २७ ऑक्टोंबर १९५४ रोजी मंदिरात पांडुरंग आघोर लिखित 'पुण्यात्मा पांडुरंग' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले होते. सन १९५५ च्या ऑक्टोंबरच्या पहिल्या आठवड्यात नागपूर येथील साहित्याचार्य श्री बाळशास्त्री हरदास यांचे प्रवचनही झाले होते.[६७]

मार्च १९७२ मध्ये महाराष्ट्रातील थोर साहित्यिक अनंतराव आठवले यांच्या शुभहस्ते 'सांगाती' या त्रैमासिकाचे आणि बाबा महाराज आर्वीकरांविषयी असलेल्या विशेषंकाचे प्रकाशन झाले होते. त्यावेळी या मंदिरात सोलापूर समाचारचे त्यावेळचे संपादक बाबुराव जक्कल हे अध्यक्षस्थानी होते.[६८] रामचरितमानस, चतु:शताब्दीनिमित्त सन १९७४ च्या मार्चमध्ये शेवटच्या आठवड्यात 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्रयोदश (१३ अक्षरे) मंत्राक्षराचे याज्ञिक हवन करण्यात आले होते. त्यावेळी 'श्रीरामचरित मानस' या ग्रंथाचे पारायण व पठण करण्यात आले. मागील शंभर वर्षांच्या कारकिर्दीमध्ये अनेक विवाह व इतर विधीं या मंदिरातून पार पाडले आहेत. ३० जुलै १९५२ रोजी

पांडुरंग घुगरदरे-कुलकर्णी यांनी बलभिम खंडेराव चिंचोळकर व विमल गोविंद कुलकर्णी यांचा धर्मविवाह याच मंदिरात लावून दिला होता. सोलापूर शहरात असणाऱ्या विठ्ठल मंदिरापैकी जुने विठ्ठल मंदिर हे अतिशय महत्त्वाचे मानले गेले आहे. या मंदिराच्या माध्यमातून अनेक धार्मिक, सामाजिक आणि संप्रदायिक कार्ये पार पाडली. त्यामुळे सोलापूरच्या धार्मिक इतिहासात जुने विठ्ठल मंदिराचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.[६९]

- **स्वकुळ साळी विठ्ठल मंदिर**

सोलापूर शहरामध्ये मुस्लिम मोहल्ल्यात बेगम पेठेत स्वकुळ साळी समाजाचे दिडशे वर्षापूर्वी बांधलेले विठ्ठल-रखुमाईचे मंदिर आज चांगल्या अवस्थेत पाहावयास मिळते. बेगम पेठेत मुस्लिम बांधव व पद्मशाली बांधव एकोप्याने राहतात हे या मंदिराच्या कार्यावरून दिसून येते. स्वकुळ साळी समाजाच्या धार्मिक परंपरेची साक्ष देणारे मंदिर म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते.

मंदिराचे प्रवेशद्वार हे हेमाडपंथी असून ते पूर्वाभिमुख आहे. या मंदिराचे खास आकर्षण म्हणजे सोलापूर शहरातील प्रसिध्द चित्रकार विष्णुपंत सपार आणि भरत सपार या दोघांनी आपल्या कुंचल्यांनी विविध देवतांच्या चित्रकृती साकारून मंदिर परिसर प्रसन्न केला आहे. सोलापूर शहरातील मुन्सिभाई विडी कारखान्यात मुनीम म्हणून काम करणारे नारायण गणेशे हे सुरुवातीच्या काळात या मंदिराचे अध्यक्ष होते. याच समाजातील गुरूनाथराव चिल्लाळ यांनी अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्षपद भूषविले होते. देवस्थानच्या उन्नतीसाठी कृष्णातराव माळवदकर, ज्ञानेश्वर माळवदकर, रामभाऊ जिंदे, वामनराव सपकाळ महाराज, रामभाऊ गणाचार्य, तुकाराम सरवदे या मंडळींनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.[७०]

या मंदिरातील विठ्ठल-रूक्मिणी मूर्ती भंग पावल्याने १० ऑगस्ट १९६७ या दिवशी नवीन मूर्तीची विधीपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात आली होती. याप्रसंगी जगद्गुरू मुप्पीनार्य महास्वामीजी (समाजाचे जगद्गुरू) तत्कालीन म्हैसूर विधान परिषदेचे सभापती शंकरराव ऐडके, आंध्र प्रदेशातील रामचंद्रराव कल्याणी, महाराष्ट्रातील आमदार गुलाबराव गणाचारी आणि अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष दत्ताराज चिल्लाळ इत्यादी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्वकुळ साळी समाजाचे आद्यपुरूष श्रीजिव्हेश्वर महाराज यांच्या जन्मोत्सवाच्या नामसप्ताहाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.[७१] पंढरपूरचे शिल्पकार काशिनाथ त्रिंबक परदेशी यांनी तयार

केलेल्या विठ्ठल-रूक्मिणी मूर्तीची उंची सव्वा दोन फूट असून विठ्ठल मूर्तीच्या डोक्यावर १११ तोळे चांदीच्या भाराचा मुकुट आहे.[७२]

नागपंचमीच्या दिवशी या मंदिरामध्ये समाजाचे आद्यदैवत श्री भगवान जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव सुरू होतो. या काळात स्वकुळ साळी बांधव मंदिरामध्ये दर्शनासाठी गर्दी करतात. प्रसिध्द गायक पंडीत भीमसेन जोशी, अजित कडकडे यांच्यासह अनेक नामवंतांनी आपली सेवा देऊन धार्मिक परंपरा जपली आहे. येथे जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून हळदी-कुंकु, रूक्मिणी मातेची ओटी भरण व भजनाचे कार्यक्रमही होतात. सध्या या मंदिराचे विश्वस्त म्हणून अध्यक्षा शांताबाई व्यंकटेश केंदाळे आणि सचिव म्हणून जयहारी दत्तोबा साखरे हे काम पाहत आहेत.[७३]

- **मातंग समाज विठ्ठल मंदिर**

सोलापूर बसस्थानक परिसरात असलेले मातंग समाज विठ्ठल मंदिर हे सर्व विठ्ठल भक्तांचे श्रध्दास्थान आहे. या मंदिराची स्थापना २५ मे १७९४ रोजी मातंग समाजातील जेष्ठ नागरिक बाळकृष्ण जाधव यांनी केली, म्हणून या मंदिरास 'मातंग समाज विठ्ठल मंदिर' असे नांव पडले.[७४] बसस्थानक परिसरात पूर्वी मातंग समाजाची वस्ती मोठ्या प्रमाणवर होती. या समाजातील लोकांनी मंदिराची स्थापना केल्यानंतर पूजा-अर्चा करण्यास सुरूवात केली. सुरूवातीला छोटेखानी असणाऱ्या या मंदिराच्या ३० वर्षांपूर्वी जीर्णोध्दार करून विस्तार केला.[७५]

मंदिराची रचना

या विठ्ठल मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला असून सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा पदविन्यास आहे. मंदिराचा सभामंडप हा ४० x ३० फुटाचा असून सभामंडपात उत्तरेकडील बाजूस मारूतीचे एक छोटे मंदिर आहे. यामध्ये काळ्या पाषाणाची मारूतीची मूर्ती आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार पूर्वेला असून ते ४ x ६ फुट आकाराचे आहे. प्रवेशद्वारावर श्रीसाईबाबांची प्रतिमा कोरलेली आहे. गर्भगृहामध्ये काळ्या पाषाणातील विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती असून विठ्ठल मूर्ती दोन फुट उंच आणि रूक्मिणीची मूर्ती दीड फुट उंच आहे. विठ्ठल मूर्तीच्या उजव्या बाजूला काळ्या पाषाणातील एक फुट उंच शंकराची मूर्ती आणि डाव्या बाजूला संगमरवरी ज्ञानेश्वर माऊलींची एक फुट उंचीची मूर्ती आहे. गर्भगृहाचे बांधकाम ह. भ. प. विठ्ठल मारूती चौगुले यांचे स्मरणार्थ शके १९०३ मध्ये केले गेले आहे, असा उल्लेख गर्भगृहावरील असलेल्या लेखावरून दिसून येतो.[७६]

मातंग समाज विठ्ठल मंदिराची दिंडी प्रसिध्द असून ती दरवर्षी माघवारीस पंढरपूरास जाते. या समाजातील परशुराम येताळा यांनी ७५ वर्षांपूर्वी या दिंडीची सुरूवात केली. हीच परंपरा पुढे पांडुरंग सिद्राम साठे, निवृत्ती लोखंडे, बलभिम जाधव, सिताराम कसबे, नामदेव वाघमारे, कृष्णात काळे यांनी चालविली. या दिंडीमध्ये मातंग समाजाचे ५०० ते ६०० वारकरी सहभागी होतात.[७७] मंदिराच्या धार्मिक कार्याची व पूजापाठाची जबाबदारी पुजारी नागनाथ कसबे यांच्याकडे आहे. मातंग समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अमरनाथ जाधव व विश्वस्त चंद्रकांत लोखंडे हे आहेत. हे मंदिर मातंग समाजाचे असले तरी शहरातील सर्व जाती-धर्माचे लोक विठ्ठल-रूक्मिणीच्या दर्शनासाठी हजेरी लावतात व मातंग समाजाच्या धार्मिक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मतेचा धडा गिरवितात.[७८]

- **चौपाड विठ्ठल मंदिर**

सोलापूर शहरातील अनेक प्रसिध्द विठ्ठल मंदिरापैकी महत्त्वाचे असलेले चौपाड विठ्ठल मंदिर शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आहे. १३५ वर्षांपूर्वी स्थापन झालेले हे विठ्ठल मंदिर वारकरी संप्रदायाचे श्रध्दास्थान मानले जाते. मंदिराच्या बांधकामामध्ये जुन्या मिलचे मालक नरोत्तम शेठ यांनी फार मोठे आर्थिक सहकार्य केले. त्यांनीच ह. भ. प. बाबासाहेब नाशिककर महाराज यांना पंढरपूरास नेऊन विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती आणली व तिची प्रतिष्ठापना त्यांच्याच हस्ते केली.[७९] धनगर समाजातील देवकते नावाच्या श्रीमंत शेतकऱ्याने मंदिराचे बांधकाम करण्यासाठी आपली जमीन दान दिल्याची माहिती मिळते.[८०]

पूर्वाभिमुख मंदिराचा सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असा पदविन्यास असून मुख्य प्रवेशद्वारावर 'चौपाड विठ्ठल मंदिर' अशी अक्षरे कोरलेली आहते. दगडी बांधकाम असलेल्या या मंदिराच्या प्रवेशद्वारावर नगारखाना असून प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस गरूड प्रतिमा आणि उजव्या बाजूस हनुमान प्रतिमा कोरलेली आहे. भव्य सभामंडपात उत्तरेला शनि, महादेव, नागनाथ आणि मंगळदेवाची छोटी छोटी मंदिरे आहेत. शनिमंदिरातील शनिदेवाचा मुखवटा हा चांदीचा असून शिवलिंग आणि नागनाथाची मूर्ती ही काळ्या पाषाणाची तर मंगळदेवाची मूर्ती ही तांब्याच्या धातूची आहे.[८१] दुमजली सभामंडपाचे क्षेत्रफळ ३००० चौरस फुट असून वरच्या भागात विवाहासारखे कार्यक्रम पार पाडले जातात.

अंतराळात शेंदूर लावलेली मारूतीची मूर्ती असून या मारूतीला 'डबक्या मारूती' असे नाव आहे. डबक्या मारूतीच्या खाली एक विहिर असून ही विहिर खोदताना या मारूतीची मूर्ती त्यात सापडली असे म्हटले जाते.[८२] मंदिराचे गर्भगृह १० x ८ फुटाचे असून ते शिखरबंदी आहे. ३ फुट उंच असलेल्या चौथऱ्यावर काळ्या पाषाणाची विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती पाहावयास मिळते. मूर्तीच्या मागे असणारे चांदीचे प्रभावळ हे नक्षीमय असून विठ्ठल-रूक्मिणीच्या मधोमध एक शिवलिंग स्थापीत आहे. अलिकडील काळात गर्भगृह हे पांढऱ्या संगमरवर फरशीने सुशोभित केले असून गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर गणपतीची प्रतिमा आणि उंबरठ्यावर व्याघ्रमुख कोरलेले आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस अंतराळात भिंतीवरील देवडीमध्ये गणपती आणि डाव्या बाजूस ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती आहे. ज्ञानेश्वराची ही मूर्ती शामराव कृष्णाजी धावडे यांच्या स्मरणार्थ सुमित्रा दत्तात्रय धावडे यांनी चौपाड विठ्ठल मंदिरास भेट दिली.[८३] गर्भगृहाच्या उत्तरेस लालगिरी महाराजांची समाधी असून या मंदिरात ते किर्तनासाठी येत असत.

मंदिराचे पौरोहित्य अनिल तुळजापूरकर करीत होते. अलिकडील काळात सतीश कुलकर्णी यांच्याकडे या मंदिराचे पौरोहित्य आहे. नेहमी मंदिरात नाशिककर महाराजांचे किर्तन असे. १५ ते २० वर्षे या मंदिरात नाशिककर महाराजांचे कुटुंबिय वास्तव्यास होते.[८४] सन १९१६ मध्ये सोलापूर शहरात प्लेगची भयंकर साथ पसरली त्यावेळी नाशिककर महाराजांनी प्लेग निवारण व्हावे म्हणून या मंदिरात धार्मिक अनुष्ठाने केली. त्यावेळी शृंगेरी विरूपाक्ष पिठाधीश्वर जगद्गुरू बांधानंदस्वामी हे डबक्या मारूतीच्या या चौपाड विठ्ठल मंदिरात अनुष्ठानास बसले होते.[८५] अलिकडील काळात मंदिराचा जीर्णोध्दार झालेला आहे. दत्तात्रय धावडे, रमेश खरात, राजु इटाई, भारत भागानगरे, किरण पवार इत्यादी मान्यवरांनी जीर्णोध्दाराचा खर्चाचा भार उचलला आहे.

वार्षिकोत्सव

इतर मंदिराप्रमाणे चौपाड विठ्ठल मंदिरात प्रवचने, किर्तन, भारूड आणि हरिपाठाचे कार्यक्रम नियमित होतात. कार्तिक महिन्यात पोर्णिमेस मंदिरात दिपोत्सव साजरा केला जातो. श्रावण महिन्यात गोकुळाष्टमीचा अखंड हरिनाम सप्ताह व नवरात्रात १० दिवस हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. गोपाळकाल्याच्या दिवशी मंदिरातून दिंडी निघते. गुरूपोर्णिमा, रामनवमी, शनिजयंती,

मारूतीजन्मोत्सव अशा विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यावेळी चौपाड परिसरातील हजारो स्त्री-पुरूष सहभागी होतात.[८६]

- **क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर**

पूर्व मंगळवारपेठेत २०० वर्षांपूर्वी बांधलेले हे मंदिर सोमवंशीय क्षत्रिय समाजाच्या मालकीचे आहे.[८७] पूर्वाभिमुख प्रवेशद्वारावर मोर आणि पाना-फुलांची नक्षी असलेल्या तीन कमानी व नगारखाना आहे. मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम श्री दादासा भूमकर यांचे चिंरजीव दत्तात्रय दादासा भूमकर यांनी शके १८३४ अश्विन शुध्द मध्ये करून दिले.[८८] मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर आग्नेय दिशेस एक छोटीशी विहिर असून त्यात बारमाही पाणी असते. सभामंडपास दोन्ही बाजूस मिळून १० दरवाजे आहेत. त्यातील उत्तरेकडील पाच दरवाजे दिवसभर खुले असतात. सभामंडपाचे छत हे कमानीयुक्त आहे. गर्भगृहात काळ्या पाषाणातील विठ्ठलाची मूर्ती दिड फुट उंच आणि रूक्मिणीची मूर्ती १ फुट उंचीची आहे. गर्भगृहावर उजव्या बाजूस गरूड आणि डाव्या बाजूस हनुमानाची पितळी प्रतिमा बसविलेली असून वरच्या बाजूस पट्टीवर गणपती कोरलेला आहे.[८९]

मागील ५० वर्षांपासून या मंदिरात भागवत सप्ताहाचे आयोजन केले जाते. किर्तनाच्या कार्यक्रमासाठी बीड, पंढरपूर व महाराष्ट्रातील विविध भागातून किर्तनकार बोलाविले जातात. सन १९४५ मध्ये या मंदिरात श्रावण महिन्यात अमरावतीचे किर्तनाचार्य नरहर शास्त्री कन्हे यांचे किर्तन झाले. धार्मिक कार्यक्रमाबरोबर सामाजिक कार्यक्रमाचेही आयोजन मंदिरात केले जाई.

सोमवंशीय क्षत्रिय समाजात फायसा महाराज नावाचे एक ब्रिटिशकालीन संत होऊन गेले, त्यांची समाधी या मंदिराच्या पाठीमागील बाजूस आहे. फायसा महाराज आपल्या एका छोट्याशा झोपडीत राहून मंदिराच्या माध्यमातून समाजसेवा करीत. मंदिर समितीच्या माध्यमातून फायसा महाराजांचा जन्मोत्सव मार्गशिर्ष महिन्यात साजरा केला जातो. त्यावेळी बोरं, पेरू, डहाळे, काकडी इत्यादींचा महाप्रसाद भक्तांना वाटला जातो. मागील २५ वर्षांपूर्वी मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला असून पूर्वी हे मंदिर दगडी भिंती असलेले आणि वरती लाकडी छत असलेले असे होते. जीर्णोध्दाराच्या वेळी लाकडी छत काढून सिमेंटचे छत घातले आहे. सभामंडपात फरशीचे काम करून मंदिराची रंगरंगोटी करण्यात आली आहे.[९०]

- **राधा-कृष्ण विठ्ठल मंदिर**

सोलापूर शहराच्या उत्तरेकडील भागामध्ये कस्तुरबाई मंडई मार्केटजवळ काशी कापडी गल्लीमध्ये आणि रूपाभवानी मंदिर रस्त्यावरील हुतात्मा स्तंभाजवळ काशी कापडे समाज बांधवांनी एकत्र येऊन या मंदिराचे बांधकाम केले आहे. हैद्राबाद आणि परिसरात असलेल्या 'पुसलोल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या समाजातील काही लोक २०० वर्षांपूर्वी सोलापूर शहरात आले. काशीला जाऊन गंगेचे पाणी आणणे आणि ते पवित्र पाणी लोकांना देऊन लोकांकडून जुने कपडे घेणे व त्या कपड्यांची विक्री करून आपली गुजरान करणे. अशा प्रकारचा व्यवसाय करणाऱ्या या समाज बांधवांना 'काशी कापडे' असे नांव मिळाले.[९१]

काशी कापडे समाजातील बापु भिंगारे, यल्लप्पा कुंदूर, रामचंद्र निरगुणकर, शंकर वाडेकर इत्यादी मंडळींनी एकत्र येऊन सन १९६० मध्ये या मंदिराची स्थापना केली. या समाजातील हजारो बांधव आषाढी व कार्तिकी वारीस विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपूरला जात. वर्षभर विठ्ठलाचे दर्शन घेता यावे, म्हणून वरील समाज बांधवांनी या मंदिराची निर्मिती केली आहे. सन १९९६ मध्ये या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला. प्रत्येक एकादशीस येथे भजन व किर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. सध्या मंदिराचे विश्वस्त म्हणून अनिल भिंगारे काम पाहत आहेत.

- **विठ्ठल गणेश मंदिर**

हे मंदिर सोलापूर शहरातील पूर्वेकडील बाजूस पद्मशाली चौकात आहे. मागील २५ वर्षांपूर्वी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने विठ्ठल मूर्तीची प्रतिष्ठापना करून शहराच्या धार्मिक इतिहासात भर घातली. या मंदिरात आषाढी, कार्तिकी आणि माघवारीला धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मंदिर समितीचे अध्यक्ष नागनाथ अल्ली व त्यांचे सहकारी मंदिर समितीचा कारभार पाहतात.[९२]

- **विठ्ठल-रूक्मिणी मंदिर (रविवार पेठ, जोशी गल्ली)**

संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी भटकंती करणारा जोशी समाज हा भविष्य सांगणारा असल्याने अध्यात्म आणि भक्तीची ओढ या समाजाला आहे. वैष्णव इंचगिरी संप्रदायाला मानणाऱ्या समाजाचे मुळ दैवत पंढरीचा पांडुरंग असून वैष्णव संप्रदायाचा अनुयायी असलेला हा समाज गेल्या

अनेक वर्षापासून सोलापूरात स्थायिक झाला. या समाजातील तुकाराम बाबा जोशी महाराज यांनी स्वत: शहरातील रविवार पेठेत जोशी गल्लीत विठ्ठल-रूक्मिणी मंदिराची स्थापना केली. समाजाला योग्य दिशा देऊन त्यांचा उध्दार करण्यासाठी त्यांनी सत्तर वर्षापूर्वी कार्तिकी एकादशीला पंढरपूरला दिंडी नेण्याची प्रथा सुरू केली ती आजतागायत सुरू आहे. महाराष्ट्रात प्लेगची साथ आली त्यावेळी तुकाराम बाबा जोशी यांनी हातात वीणा घेऊन महाराष्ट्रभर प्लेगवर जनजागृती केली. त्यांनी अनेक अभंग, ओव्या व पाळण्यांचीही रचना केली. भगवे वस्त्र, गळ्यामध्ये शेला, डोक्यावर टोपी व हातात काठी असा वेश धारण केलेल्या ब्रम्हचारी तुकाराम बाबांनी धार्मिक कार्यातून समाजजागृती करण्याचाही प्रयत्न केला. त्यांचे गुरू मंगळवेढ्यातील ह.भ.प. नारायण महाराज म्हैसूरकर हे होते. तुकारामबाबा यांनी स्वत: स्थापन केलेल्या विठ्ठल मंदिरातच १ जानेवारी १९९५ रोजी रात्री १२.४५ मिनीटांनी जीवंत समाधी घेतली. त्यांच्या कार्याची आठवण म्हणून समाजातील मंडळींनी एकत्र येऊन त्याच ठिकाणी आज बाबांचे मंदिर बांधले आहे. जोशी समाज आणि आसपासच्या परिसरातील बाबांचे भक्त नित्यनेमाने बाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. बाबांनी सुरू केलेले कार्य व उत्सव गेल्या १८ वर्षापासून समाजातील विष्णुदास बाबा हे करीत आहेत. श्रावणमास, प्रवचन सोहळा, कार्तिक वारी, दिंडी सोहळा, श्रीराम नवमी, कृष्ण जन्माष्टमी व हरिपाठाचा कार्यक्रम त्याचबरोबर तुकाराम बाबा यांचा समाधी सोहळा ही मंदिरात साजरा केला जातो.[९३]

वारकरी सांप्रदायाचा प्रसार महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर झाला असल्याने लाखो विठ्ठल भक्त पांडुरंगाच्या ओढीने पंढरपूरास जातात. या वारकरी सांप्रदायाचा ठसा सर्व जाती-धर्मांच्या लोकांवर पडल्याने विठ्ठलाची अनेक मंदिरे महाराष्ट्रात निर्माण झाली. अशी छोटी-छोटी मंदिरे ही सोलापूर शहरात पाहावयास मिळतात. काही मंदिरे समाजाच्या नावाने आहेत तर काही मंदिरे व्यक्तींच्या नावाशी जोडण्यात आली आहेत तर काही विठ्ठल मंदिरे शहराच्या विशिष्ट अशा भागात असल्याने त्या त्या भागाची नांवे देण्यात आली आहेत. त्यामध्ये लोणार समाज विठ्ठल मंदिर, भडंगे विठ्ठल मंदिर, नामदेव शिंपी समाज विठ्ठल मंदिर, घोडसे गल्ली विठ्ठल मंदिर, जोशी गल्ली विठ्ठल मंदिर, लष्कर विठ्ठल मंदिर, काकडे विठ्ठल मंदिर, जुनी मिल चाळ विठ्ठल मंदिर, गवळी वस्ती विठ्ठल मंदिर अशा अनेक विठ्ठल मंदिरांचा समावेश होतो.[९४] यातील काही मंदिरे १०० ते १५० वर्षांपूर्वीची असून काही ५० वर्षांपूर्वीची आहेत. प्रत्येक विठ्ठल मंदिराच्या माध्यमातून माघवारीच्या निमित्ताने दिंडीच्या स्वरूपात हजारो भाविक पंढरपूरास जातात. शहरात असणाऱ्या या

विठ्ठल मंदिरामुळे वारकरी सांप्रदायाचा प्रभाव समाजजीवनावर पडलेला दिसून येतो. शहरातील ही विठ्ठल मंदिरे विविध जाती-जमातींची असल्याने प्रत्येक व्यक्ती आनंदाने मंदिराच्या धार्मिक सोहळ्यामध्ये सहभागी होऊन आपले योगदान देते. शहरातील विठ्ठल मंदिराच्या माध्यमातून जातीय सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता टिकून राहण्यास मदत झाली आहे.

३.१.३ दत्त मंदिरे

सोलापूर शहरापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या अक्कलकोट स्वामी समर्थ व कर्नाटकातील गाणगापूर येथील दत्त स्थानाचा प्रभाव सोलापूर शहरातील लोकांच्यावर पडल्याने आणि प्रत्येक वेळी गाणगापूरास जाणे न जमल्याने शहरातील विविध भागातील लोकांनी आपापल्या विभागामध्ये दत्त मंदिरांची स्थापना केलेली दिसून येते. त्यामध्ये श्रीदत्त मंदिर दक्षिण सदर बझार, श्रीदत्त देवालय चौपाड, श्रीदत्त मंदिर नवी पेठ, अमर बागेतील दत्तात्रय देवालय तसेच शहरातील डांगे गल्लीतील गोविंद धोंडो तांबोळी यांच्या मालकीचे असलेले दत्त मंदिर, पूर्व विभाग मंदिर आणि श्रीदत्तात्रय शक्ती मंदिर मड्डीवस्ती अशा अनेक दत्त मंदिरांचा त्यात समावेश होतो.

- **श्रीदत्त मंदिर (दक्षिण सदर बझार, सोलापूर)**

या मंदिराची स्थापना शके १७८१ मध्ये रामचंद्र बुवा नाशिककर यांनी केल्याचा उल्लेख मंदिराच्या प्रवेशद्वारावरील लेखात सापडतो. रामचंद्र बुवा नाशिककर हे श्री प्रभाकर महाराजांचे गुरू होते तर श्री माणिकप्रभुंचे ते शिष्य होते. माणिकप्रभुंना दत्तात्रयाचे चौथे अवतार मानले जाते. सोलापूर शहरात असणाऱ्या लष्कर भागात रामचंद्र बुवा नाशिककर यांची समाधी आहे. सन १९३६ पासून दक्षिण सदर बझार दत्त मंदिरात नारायण जोशी हे पुजारी म्हणून सेवा देत होते. सध्या बाळकृष्ण नारायण जोशी हे या मंदिराचे पुजारी आहेत.[९५]

मंदिराची रचना

दगडी बांधकामातील या मंदिराचे प्रवेशद्वार पश्चिमेला असून मंदिराच्या प्रवेशद्वारावर 'श्रीदत्त मंदिर, श्रीसद्गुरू माणिक प्रभु, स्थापना शके १७८१, जीर्णोध्दार शके १८६१' असे कोरलेले आहे. यावरून मंदिराची स्थापना व जीर्णोध्दाराची माहिती मिळते. गर्भगृहात श्रीदत्तात्रयाची मूर्ती असून समोरच श्री माणिक प्रभुंची धातुची मूर्ती पाहावयास मिळते. दत्तात्रयाची मूर्ती ही अडीच फुट उंच व पांढऱ्या संगमरवरी दगडात घडवलेली आहे. षष्ठभूजा मूर्तीच्या हातात कमळपुष्प, शंख, अक्षयपात्र,

कमंडलू व पोथी अशी आयुधे असून ही मूर्ती रेखीव व प्रसन्न मुद्रेची आहे. गर्भगृहावर एक लहानसे शिखर आहे. गर्भगृहाच्या बाहेरील बाजूस प्रदक्षिणा घालण्यासाठी चौथरा असून हा चौथरा भगवानसिंग बायस यांनी आपले वडील किसनसिंग चौहान यांच्या स्मरणार्थ सन १९३६ मध्ये बांधून दिला आहे.[९६]

दररोज सकाळी या मंदिरात दत्त मूर्तीचा जलाभिषेक होऊन आरती होते. चैत्री, आषाढी, कार्तिकी आणि माघ एकादशीस मंदिरात भजन, किर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. बोळकठेकर गुरूजी यांची अनेक किर्तने या मंदिरात झालेली आहेत. दत्त जयंती, गोकुळ अष्टमी बरोबर डिसेंबर महिन्यात माणिक प्रभुंचा जन्मोत्सव साजरा केला जातो. हा जन्मोत्सव दहा दिवस असतो, या दहा दिवसात गीतापठण, भजन, किर्तन व पारायणासारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.[९७] या मंदिरावर श्री माणिक प्रभु यांच्या 'सकलमत' सांप्रदायाचा पगडा असल्याचे सांगितले जाते. 'सकलमत' म्हणजे सर्व धर्म सारखेच मानणे होय.[९८]

- **श्रीदत्त देवालय (चौपाड)**

शहराच्या मध्यवस्तीतील या दत्त मंदिराची स्थापना शके १७९५ मध्ये रजपूत घराण्यातील मोहनसिंग चौहान यांनी केली[९९] असून सध्याचे वहीवाटदार विजयसिंग चौहान हे आहेत. दगडी बांधकामाच्या उत्तराभिमुख मंदिराच्या प्रवेशद्वारावरावर 'श्रीगुरूदत्त प्रसन्न' व 'श्रीदत्त देवालय' अशी अक्षरे कोरलेली आहेत. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला देवड्या असून गर्भगृह व सभामंडप असे या मंदिराचे दोन विभाग आहेत. गर्भगृहाचा दरवाजा आणि सभामंडपाचे काम शके १८१३ मध्ये विठ्ठलसिंग चौहान यांनी करून दिल्याचा उल्लेख आहे. अलिकडच्या काळात गर्भगृहाचे जुने रूप न बदलता या मंदिराचा जीर्णोध्दार केलेला दिसून येतो. ८ x ८ फुटाच्या गर्भगृहाच्या दोन्ही बाजूला दगडी कमानी आहेत. गर्भगृहात असणारी दत्तात्रयाची मूर्ती अडीच फुट उंचीची असून संगमरवरी पाषाणात कोरलेली आहे. चतूर्भूज मूर्तीच्या गळ्यात व हातात रूद्राक्षाच्या माळा, हातात शंख, चक्र, वेद व कमंडलू ही आयुधे आहेत. मूर्तीच्या चेहऱ्यावर प्रसन्न भाव दिसून येतो. मूर्तीच्या डाव्या बाजूस भिंतीत असणाऱ्या देवडीमध्ये संगमरवरी गणपतीची मूर्ती आणि उजव्या बाजूच्या भिंतीत देवडीमध्ये चतूर्भूज लक्ष्मीची मूर्ती आहे. मुख्य मूर्तीच्या डाव्या बाजूला काळ्या पाषाणातील श्रीकृष्णाची मूर्ती

असून उजव्या बाजूला संगमरवरी पाषाणातील शेंदूर फासलेली हनुमानाची मूर्ती पाहावयास मिळते. अंतराळात कास्य धातूची मोठी घंटा अडकविलेली आढळून येते.[१००]

दररोज सकाळी ६ वाजता मूर्तीस जलाभिषेक करून आरती केली जाते. मंदिर सकाळी ६ ते १२ व संध्याकाळी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत भक्तांना दर्शनासाठी खुले असते. गुरूवार, अमावस्या आणि पोर्णिमेस दत्त मूर्तीस पंचामृताचा अभिषेक घातला जातो. सोलापूर शहरात कमला विजयसिंह चौहान यांचे प्रसिध्द महिला भजनी मंडळ असून या भजनी मंडळाचा कार्यक्रम या मंदिरात आयोजित केला जातो. दत्तजयंती, गोकुळअष्टमी, हनुमानजयंती इत्यादी धार्मिक कार्यक्रम पार पाडले जातात.

सन १९३१ साली या मंदिरातून दत्तजयंतीनिमित्त पालखीची मिरवणुक ही पोलीस बंदोबस्तात काढण्यात आली.[१०१] सोलापूर शहरात हिंदु-मुस्लिमांच्या धार्मिक कार्यक्रमांत नेहमीच सर्व जाती-धर्मांचे लोक सहभागी होतात. सन १९४६ मध्ये दत्तमूर्तीच्या पालखी मिरवणुकीबरोबर शांतता कमिटीचे सदस्य आमदार अब्दुल सत्तार, मुस्लिम लिगचे सेक्रेटरी अहमद अब्बास, पीरसाहेब, बडे साहेब, हबिबुल्ला उस्ताद, बोगडे, डॉ. अंत्रोळीकर, भाई छत्रुसिंह चंदेले शहरातील इत्यादी मान्यवर मंडळी उपस्थित होते. शहरातील पंजाब तालिम व खाटीक मशिदीजवळ मोहल्ला कमिटीचे मुसलमान सभासद व्यवस्था पाहत होते. मिरवणुकीसाठी वापरली जाणारी श्रींची पालखी ही सागवानी लाकडाची व सुंदर नक्षीकाम केलेली आहे.[१०२]

- **श्रीदत्त मंदिर (दत्त चौक)**

शहरात मध्यवर्ती ठिकाणी दत्त चौकामध्ये असलेले हे दत्त मंदिर सुस्थितीत आहे. उत्तराभिमुख असलेल्या या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडी चिऱ्यांचे असल्याचे दर्शनी भागावरून दिसून येते. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर नगारखाना असून त्यावर हिंदु देव-देवतांच्या मूर्ती आहेत तर प्रवेशद्वाराच्या पायथ्याशी किर्तीमुख पाहावयास मिळते. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन दगडी खांब असून त्याचा दरवाजा सागवानी आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर सभामंडपात मध्यभागी गर्भगृह असून ते पूर्वाभिमुख आहे. गर्भगृहाचे छत हेमाडपंथी बांधणीचे व संपूर्ण दगडी आहे. या गर्भगृहात 'एकमुखी' दत्तात्रयाची पितळी दत्तमूर्ती असून मुळ दगडी पादूकांच्या वर पितळी सिंहासनाकृती देव्हाऱ्यावर हा दत्ताचा पितळी मुखवटा बसल्याचे या मंदिराचे पुजारी व मालक श्री अंबलगी यांनी सांगितले. मंदिराचा सभामंडप

२८ सागवानी लाकडी खांबाचा असून त्यावरील छत देखील सागवानी लाकडाचेच आहे. सभामंडप ३६ काचेच्या हंड्या व १८ झुंबरे लावून सजविलेला आहे या हंड्यायमध्ये उत्सवाप्रसंगी दिवे लावले जातात.

गर्भगृहाच्या मागील बाजूस चौथऱ्यावर औदुंबराच्या झाडाखाली दत्तात्रयाच्या पादूका आहेत, येथेच नंदीशिल्पे, नागद्वय व इतर देव-देवतांच्या पादूका आहेत. मंदिराच्या वरील बाजूस छोटेसे पण उठावदार शिखर आहे.[१०३] अशा प्रकारे पेशवेकालीन मंदिराशी साधर्म्य असणारे हे दत्त मंदिर सोलापूरच्या धार्मिक इतिहासाचा केंद्रबिंदू मानले जाते. या मंदिराच्या पश्चिमेस कवि शुभराय मठ, गणपती घाटावर गणपती मंदिर आणि 'पहिली ख्रिस्तमंडळी' चे चर्च आहे तर जवळच गायखाटिक मशिद आहे. त्यामुळे धार्मिकदृष्ट्या या दत्त चौकाला अत्यंत महत्त्व असल्याचे दिसून येते.

- **श्रीदत्त मंदिर (मेकॅनिकी चौक)**

गंगुबाई सेवकराम परदेशी यांनी सन १९२० मध्ये मेकॅनिकी चौकात स्वतःच्या मालकीच्या जागेत 'श्रीदत्तात्रयाच्या' मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून हे मंदिर उभे केले. आजही हे श्रीदत्त मंदिर मंदिर गंगुबाई परदेशी यांच्या धार्मिक वृत्तीची साक्ष देते.[१०४]

- **श्रीदत्तात्रय शक्ती मंदिर (मड्डी वस्ती)**

बहुभाषिक शहर म्हणून सोलापूरची जुनी ओळख आहे. शहरातील भवानी पेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेठेमध्ये मड्डी वस्तीचा समावेश होतो. या वस्तीमध्ये कोळी, जोशी, लिंगायत व इतर अठरा पगड जातींचे लोक आपली विभिन्न संस्कृती जपत वाटचाल करताना दिसून येते. वडार समाजाचे बालाजी मंदिर, लिंगायत समाजाची अक्कमहादेवी, शिवाय विजया अंबाबाई मंदिर, दत्तमंदिर ही येथील नागरिकांची दैवते आहेत. [१०५]

मड्डी वस्तीत असणारे हे दत्त मंदिर दत्त संप्रदायाशी निगडीत आहे. हे मंदिर मल्लिनाथ रूद्रय्या हिरेमठ यांनी स्वखर्चातून व काही देणगीद्वारे बांधले. मंदिराच्या बांधकामासाठी लागणारे दगड सोलापूर शहरापासून ३५ कि. मी. अंतरावर असणाऱ्या मोहोळ परिसरातून आणण्यात आले. मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वेला असून मंदिराच्या बांधकामाचा आकार पिंडीसारखा आहे. मंदिराची संपूर्ण जागा ही ६१७४ चौरस फुट असून इ. स. १९७२ मध्ये मंदिराची पायाभरणी करण्यात आली. सन १९७५ मध्ये मंदिराचे बांधकाम पूर्ण होऊन त्याठिकाणी श्री दत्तात्रयाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली.

मंदिरामध्ये दत्त मूर्तीबरोबर ज्ञानेश्वर, श्रीधर स्वामी, स्वामी समर्थ आणि श्री साईबाबा, तुळजाभवानी, श्रीशंकर, सौंदत्ती यल्लम्मादेवी, गणपती, नवनाथ व तिरूपती बालाजी इत्यादी देव-देवतांच्या मूर्ती पाहावयास मिळतात. दर्शनासाठी आलेल्या भक्ताला दत्तात्रयाच्या दर्शनाबरोबर वरील सर्व देव-देवतांचे दर्शन होते. मंदिराच्या शिखरावर समोरील बाजूस दत्त महाराज व मागील बाजूस शंकर, त्रिशूळ व डमरू असून कळसावर त्रिशूळ, डमरू व पताका आहे. मंदिरातील समोरील भागात यज्ञकुंडातील भस्म भक्तांना प्रसाद म्हणून दिले जाते. मंदिरात उंबराचे झाडाखाली शिवलिंग व पादुका पाहावयास मिळतात. विशेष म्हणजे या मंदिरात गोशाळा असून आठ ते दहा गाईंचे मंदिराच्या माध्यमातून संरक्षण केले जाते.

मंदिरातील नित्यपूजा आणि वार्षिक उत्सवाच्या निमित्त मुंबई, मिरज, सांगली व कर्नाटकातूनही अनेक दत्त भक्त दर्शनासाठी येतात. नित्यपूजा व वार्षिक धार्मिक विधी श्री आनंद मल्लिनाथ हिरेमठ हे करतात. मंदिराच्या भिंतीवर दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, चिदंबरा चिदंबरा शिवहर चिदंबरा, श्रीराम जयराम जयजयराम, नमो भगवते वासुदेवाय नमः असे विविध मंत्र पाहावयास मिळतात. या मंदिरातील धार्मिक वातावरण हे भाविकांना अत्यंत प्रिय वाटते. त्यामुळे या मंदिराच्या माध्यमातून सोलापूर शहराच्या धार्मिक इतिहासामध्ये भर पडल्याचे दिसून येते.[१०६]

३.१.४ श्रीराम मंदिरे

- **जुने श्रीराम मंदिर**

शहराच्या मध्यवस्तीत असणाऱ्या या जुन्या श्रीराम मंदिराची स्थापना सन १७५५ मध्ये पेशवेकाळात राघोबा दादांनी केल्याचे मंदिराचे पूजारी व वहीवाटदार वासुदेव धोंडोपंत पूजारी हे सांगतात. पूर्वाभिमुख मंदिराच्या प्रवेशद्वारावर 'जुने श्रीराम मंदिर' असे लिहिलेले असून प्रवेशद्वारावर पडझड झालेला नगारखाना आहे. ४८ सागवानी खांबावर लाकडी छत असलेला सभामंडप असून या सभामंडपात रामेश्वर, काशी, वीरेश्वर व दासमारूती या देवतेंची छोटी मंदिरे आहेत. १० x १० च्या दगडी बांधकाम असलेल्या गर्भगृहात राम-लक्ष्मण-सीता या देवतांच्या संगमरवरी दगडाच्या मुख्य मूर्ती असून त्यांची उंची अनुक्रमे २ फुट, १.७५ फुट आणि १.५० फुट अशी आहे. या मूर्तींच्या डाव्या बाजूला नरसिंह, शंकर, रेणुकादेवी व शालीग्राम तर उजव्या बाजूला मारूती व गोपाळकृष्ण यांच्या

मूर्ती आहेत. गुंडो रामचंद्र आवसेकर (सराफ) यांनी शके १८४७ मध्ये या मंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा चांदीने मढवून दिल्याची माहिती मिळते.[१०७] नित्य-नैमित्तिक पूजा विधींबरोबरच वर्षभर धार्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. रामनवमीला श्रींची पालखी निघते. या काळात एक महिनाभर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम होतात. मिरवणुकीत शहरातील ७०० ते ८०० भाविक सहभागी होतात महाप्रसादाच्या वाटपाने मिरवणुकीची सांगता होते. या राम मंदिरावर रामदासी संप्रदायाचा प्रभाव असल्याचे मंदिराचे पूजारी व वहीवाटदार यांनी सांगितले.[१०८]

- **श्रीराम मंदिर (नवी पेठ, सोलापूर)**

सन १८६४ मध्ये कलेक्टर गोल्ड फिंच यांनी व्यापाऱ्यांना दुकाने वसविण्यासाठी नवी पेठेची स्थापना केली. त्यामुळे या पेठेला 'गोल्डफिंच पेठ' असेही म्हटले जाते. या पेठेत व्यापाऱ्यांच्या दुकानाबरोबरच रहीवाशांची घरे ही आहेत. अशा वर्दळीच्या ठिकाणी शके १८३९ मध्ये श्रीनिवास गोविंद जवळगेकर यांनी दत्त मंदिराची स्थापना केली. हे श्री गोंदवलेकर महाराजांचे शिष्य होते. त्यांच्याच प्रेरणेने त्यांनी या मंदिराची स्थापना केली.[१०९]

उत्तराभिमुख असणाऱ्या मंदिराचा पदविन्यास सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असा आहे. मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडी असून ते ४० x ८० फुट इतके आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावर गणेशपट्टीवर दोन कोरीव दगडी फुलांमध्ये 'श्रीराम स्थापना शके १८३९' अशी अक्षरे कोरलेली दिसतात. सभामंडपाच्या तिन्ही बाजूंनी लाकडी कठड्याचा सज्जा असून सभामंडपातच हनुमान मंदिराच्या उजव्या बाजूला एक लोखंडी गोलाकार जीना आहे. या लोखंडी जीन्याचा उपयोग सज्जात जाण्यासाठी होतो.

या मंदिराचे कौलारू छत लाकडी तुळ्या, खांडे व दांडे यांच्यावर आधारलेले आहे. मंदिरात सुंदर लाकडी कोरीव काम केलेले असून वरील मजल्यावर पुजाऱ्यांना राहण्यासाठी तीन खोल्या आहेत. गर्भगृहाच्या मागील बाजूस दक्षिणेस एक छोटासा दरवाजा आहे. अंतराळ व गर्भगृह उंच चौथऱ्यावर असून अंतराळात एक ओवरी आहे. या ओवरीवर सुंदर नक्षीयुक्त खांबाची एक रांग असून या खांबावर महिरूपी कमानी आहेत. दोन कमानींच्यामध्ये लक्ष्मी, सरस्वती व मारूती या देव-देवतांच्या प्रतिमा कोरलेल्या असून दोन्ही बाजूला लाकडी खांबावर द्वारपाल कोरलेले आहेत. गर्भगृह घडीव दगडाचे असून गर्भगृहात चौथऱ्यावर खालील बाजूस पंचधातूची 'श्रीराम पंचायतन' प्रतिमा

आणि वरील भागात श्रीराम-लक्ष्मण-सीता यांच्या संगमरवरी पाषाणातील सुंदर मूर्ती आहेत या अनुक्रमे अडीच फुट, दोन फुट आणि दीड फुट उंचीच्या आहेत.[११०]

नित्यनैमित्तिक कार्यक्रमांबरोबरच रामनवमी, हनुमान जयंती, गोकुळाष्टमी, दिवाळी पाडवा इत्यादी महत्त्वाचे वार्षिक सण येथे साजरे केले जातात. या राम मंदिरात अनेक मान्यवर किर्तनकारांची किर्तनेही होतात. ६ नोव्हेंबर १९४५ रोजी दिवाळी पाडव्यानिमित्त दासगण महाराज यांचे शिष्य तुकाराम बुवा आजगांवकर यांच्या किर्तनाचा कार्यक्रम झाला होता.[१११] २२ नोव्हेंबर १९५५ या दिवशी दिवाळीच्या गोपाष्टमीनिमित्त गोमातेची भव्य मिरवणुक काढण्यात आली होती. यावेळी गोमातेची षोडषोपचारे पूजा करून वस्त्रांलकारांनी व फुलांनी गाईंना सजविण्यात आले होते. भाविकांना प्रसाद वाटप करून या मिरवणुकीची सांगता करण्यात आली. यावेळी गोसेविका छबुताई यांनी घुगरदरे व कवी कमलराम यांचा श्रीफळ देऊन सत्कार केला होता.[११२]

धार्मिक कार्याबरोबर सामाजिक कार्यातही या मंदिराचा महत्त्वाचा वाटा आहे. १ ऑक्टोंबर १९५७ रोजी रात्री ८ वाजता मंदिरात वि. रा. पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली एका ख्रिश्चन कुटुंबाचा शुध्दीकरण समारंभ पार पाडण्यात आला होता. हा शुध्दीकरण समारंभ पंडीत जोशी, वासुदेवराव गोरे, भास्करराव गवई व आर्य समाजाचे पं. मन्साराम यांनी केला. सन १९४४ साली एका पादरी ख्रिश्चन मिशन-याने या कुटुंबास ख्रिश्चन धर्माची दिक्षा दिली होती. हे कुटुंब माढा तालुक्यातील अंजनगावचे हरिजन कुटुंब होते. त्यामध्ये महादेव भाऊ देवकुळे व शांताबाई देवकुळे आणि त्यांची मुले चंद्रकांत, शकुंतला व कालिदास अशा पाच व्यक्तींचा समावेश होता. या समारंभास शहरातील अनेक लोक उपस्थित होते.[११३] श्री प्रभाकर महाराज या राम मंदिरात ध्यानस्थ बसत. सम्राट चौकातील त्यांच्या समाधीच्या बांधकामासाठी या मंदिरातील काही दगड नेलेले होते.[११४]

- **श्रीराम मंदिर (दक्षिण सदर बझार, सोलापूर)**

शहरातील प्रसिध्द राम मंदिरांपैकी दक्षिण सदर बझार येथे असलेले हे मंदिर भाविकांचे श्रध्दास्थान आहे. या मंदिराच्या स्थापनेबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. परंतु गेल्या ५५ वर्षांपासून या मंदिरात दैनंदिन पुजा-अर्चा करणारे श्री मधुकर जोशी (पुजारी) सांगतात की, हे राम मंदिर दिडशे वर्षांपूर्वी मारवाडी समाजातील एका संन्याशी व्यक्तीने स्थापन केले आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर 'राजमल रामचंद्र राठी' यांनी देवालयाचा सर्व जीर्णोध्दार करून बांधून दिले व 'संवत्

१९९३ मित्ती अश्विन वद्य १३ शके १८५८, दिनांक ११/११/१९३६' अशी अक्षरे कोरलेली आहेत. यावरून या राम मंदिराचा जीर्णोध्दार राजमल रामचंद्र राठी यांनी केल्याचे स्पष्ट होते.[११५]

उत्तराभिमुख असलेल्या या राम मंदिराचा सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असा पदविन्यास असून सभामंडपाचे छत ४ लोखंडी खांबावर आधारलेले आहे. २० x ३० फुटाच्या सभामंडपात पूर्वेला ४ x ४ फुटाच्या तळघरात ध्यानमंदिर असून तळघरात खाली उतरण्यासाठी पायऱ्या व वरून जाळीचे झाकण आहे. या ध्यानमंदिरात एक व्यक्ती ध्यानासाठी बसू शकेल एवढी जागा आहे. जुन्या काळातील फडताळीप्रमाणे दिसणारे हे ध्यानमंदिर पाहणाऱ्याच्या चटकन लक्षात येत नाही. गर्भगृह हे उत्तराभिमुख असून त्यामध्ये सुमारे ४ फुट उंचीच्या चौथऱ्यावर पंचधातूच्या 'श्रीराम पंचायतन' प्रतिमा आहेत तर चौथऱ्यावर खालील बाजूस काळ्या पाषाणातील 'विठ्ठल-रूक्मिणीच्या' मूर्ती आहेत. गर्भगृहाच्या समोर सभामंडपात छोटेसे दक्षिणमुखी मारूती मंदिर आहे. गर्भगृहाचा प्रदक्षिणा मार्ग हा 'साधार' पध्दतीचा आहे. गर्भगृहाच्या पाठीमागे काळ्या पाषाणातील पितळी आवरण केलेले दोन पूर्वाभिमुख शिवलिंग असून त्यांच्या बाजूला दोन फणा असलेली नागोबाची पाषाणमूर्ती आहे.

नित्यनैमित्तिक पूजा-विधीबरोबरच मंदिरात रामनवमी, हनुमानजयंती, गणेशजयंती तसेच जेष्ठ महिन्याच्या पहिल्या दिवशी सुरू होणारा 'दशहरा दिन' हा दहा दिवसांचा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडतो. या काळात गंगेची पूजा केली जाते व शेवटच्या दिवशी भाविकांना प्रसाद वाटप करून या उत्सवाची सांगता केली जाते. रामनवमी उत्सव काळात श्रींच्या मूर्तीस 'महाभिषेक' करून दिवसभर भजन, किर्तन, होम-हवन इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतात आणि महाप्रसाद होतो. नवरात्रात दहा दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.[११६]

- **श्रीराम मंदिर (पूर्व विभाग, सोलापूर)**

शहराचा पूर्व विभाग हा विणकर वस्ती अर्थात तेलगु लोकांचे वास्तव्य असलेला भाग म्हणून ओळखला जातो. या विभागात दाजी पेठेत असणाऱ्या बालाजी मंदिराबरोबरच पूर्व विभाग राम मंदिरानेही आपले वैशिष्ट्य जपले आहे. दाक्षिणात्य पध्दतीचे हे मंदिर प्रत्येकाच्या नजरेत भरते. सन १९५५ पूर्वी या राम मंदिराच्या जागी कृष्णाहरी कोटा यांनी छोटेसे दक्षिणमुखी मारूती मंदिर उभारले होते. पुढे याच ठिकाणी इथल्या कारखानदारांच्या कल्पनेतून या राम मंदिराची निर्मिती झाली. १९ मार्च १९५६ या दिवशी या मंदिरात श्री राम-लक्ष्मण-जानकी आणि हनुमान या चारही मूर्तींची विधीपूर्वक

स्थापना करण्यात आली. आजही या ठिकाणी पाठीमागील बाजूस मारूती मंदिर आपणांस पाहावयास मिळते.[११७] दाक्षिणात्य वास्तुशिल्पकाराच्या दोन वर्षांच्या परिश्रमानंतर राम मंदिराच्या शिखर बांधकामाचे कार्य पूर्णत्त्वाला आले. या अद्वितीय कलापूर्ण शिखराची उंची ३७ फुट उंच असून शिखराच्या चारही बाजूला श्रीरामचंद्राच्या चरित्रावर आधारित ३२० कोरीव मूर्ती आहेत. या शिखराचे बांधकाम तामिळनाडूचे वास्तुशिल्पकार के. मारिआप्पा यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. महाराष्ट्रात या दाक्षिणात्य शैलीचे शिखर फारच क्वचित आढळून येते.[११८]

पूर्व विभाग श्रीराम मंदिर देवस्थानच्या स्थापनेसाठी सिद्रामप्पा चिप्पा, नरसय्या चाटला, दुबय्या राजण्णा, कृष्णहारी कोटा, व्यंकटेश गुल्लापल्ली या मंडळींनी महत्त्वाचे योगदान दिले. सध्या लक्ष्मीनारायण बीरू हे काम पाहत असून पौरोहित्याची जबाबदारी श्रीनिवास चिप्पा यांच्याकडे आहे. या मंदिरात दररोज गीता पारायणाबरोबर वर्षभरातील सर्व उत्सव साजरे करण्यात येतात. मंदिर बांधकामासाठी देणगी दिलेल्या देणगीदारांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

बाब		**देणगीदारांची नावे**
प्रवचन करण्यासाठी लागणारे व्यासपीठ	:	श्री. पवार आर. एस.
महाद्वार बांधकामासाठी	:	श्री. राजाराम बाबाजी यमवार
मुर्तीकरीता	:	श्री. चिप्पा सिद्रामप्पा राजण्णा, श्री. कुरापाटी राजय्या दुबय्या, श्री. नक्का विरय्या व्यंकटनरसय्या, श्री. आडम राजय्या नरसय्या, श्री. रामचंद्र लालचंद मर्दा
सिंहासनासाठी	:	श्री. नरसय्या भूमय्या कटकम
शिखरावरील कळस	:	श्री. पुलगम नरसप्पा आणि गणपा एकनाथ

याशिवाय समाजातील अनेक बांधवांनी या मंदिराच्या बांधकामासाठी व विकासासाठी आपापल्या परीने देणग्या दिलेल्या आहेत.[११९]

दिनांक २० एप्रिल १९६४ रोजी झालेल्या श्रीराम जन्मोत्सवाप्रसंगी शहरातील हजारो लोकांनी या मंदिरात दर्शन घेतले. यावेळी शहरातील महिलांनी श्रीसिध्देश्वर तलावातून पाणी आणून राम मंदिरात शतघटा अभिषेक केला. जन्मोत्सवानिमित्त मंदिरात भंडाऱ्याचा कार्यक्रम झाला या

भंडाऱ्याचा सर्व खर्च सेंट्रल टॉकीजचे मालक श्री मंठाळकर यांनी केला.[१२०] दाजी पेठेत असणारे हे श्रीराम मंदिर पूर्व भागातील लोकांचे आराध्यदैवत मानले जाते.

३.१.५ गणपती मंदिरे

भारतीयांचे प्रियदैवत श्रीगणेशाला विद्येची देवता आणि विघ्नहर्ता म्हणून ओळखले जाते. मंगलकार्याच्या आरंभी गणपतीची आद्यपूजा केली जाते.[१२१] प्रत्येक देवतेच्या मंदिराच्या चौकटीवर गणेशाची प्रतिमा पाहावयास मिळते, म्हणूनच या चौकटीवरील पट्टीला 'गणेशपट्टी' असे नांव आहे.[१२२] सुरूवातीच्या काळामध्ये गणेशाची मूर्ती द्विभूज असलेली दिसून येते. या मूर्तीच्या एका हातात परशू व दुसऱ्या हातात मुलक (मुळा) दाखविलेला आहे. नंतरच्या कालखंडात या मूर्तीच्या स्वरूपात बदल होऊन दोन हाताऐवजी चार, आठ, दहा, सोळा असे हात असल्याचे आढळते. ज्ञानदेवांनी गणेशाचे स्तवन करीत असताना गणेशास 'षड्भूजा' असे म्हटल्याचे दिसून येते.[१२३]

महाराष्ट्रामध्ये इतर देवतांप्रमाणे गणेशाची उपासना सातवाहन काळापासून रूढ झाली असावी. याच काळात गणेशाच्या मूर्ती तयार केल्या जात. चौकामध्ये गणपतीचे देऊळ बांधण्याची पध्दत यादव काळात होती. परंपरेने चालत आलेल्या गणेश उपासनेचे महत्त्व पेशवाईमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसून येते. त्यामुळेच पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी गणपतीची मंदिरे निर्माण झाली.[१२४] सोलापूर शहरामध्ये गणेश भक्तांनी गणपतीची उपासना करण्यासाठी गणपती मंदिराची निर्मिती केली. त्यात श्रीसिध्दरामेश्वरांनी शहराच्या बाहेर आठ दिशांना स्थापन केलेली आठ गणपती मंदिरे, गणपती घाटावरील श्रीगणेश मंदिर, मोदीखाना गणेश मंदिर, दाते गणपती मंदिर, इत्यादींचा समावेश होतो.

- **श्रीमश्रृम गणपती मंदिर (तळे-हिप्परगा, सोलापूर)**

सोलापूर शहरापासून ५ कि.मी. अंतरावर सोलापूर-तुळजापूर रस्त्यावर तळे-हिप्परगा या गावातील 'श्रीमश्रृम गणपती' मंदिर प्रसिध्द आहे. इ. स. ११३० च्या दरम्यान सोलापूरचे ग्रामदैवत श्रीशिवयोगी सिध्दरामेश्वरनी शहरावर विघ्ने, आपत्ती, संकटे येऊ नयेत म्हणून शहराच्या आठ दिशांना आठ गणपतींची म्हणजेच अष्टविनायकांची स्थापना केली. त्यापैकी सोलापूरच्या उत्तरेला 'श्रीमश्रृमगणपतीं' हा सातवा गणपती म्हणून प्रसिध्द आहे. 'मश्रृम' (मश्रृण) हा कन्नड शब्द असून

याचा अर्थ दह्यासारखा स्निग्ध पदार्थ असा होतो. 'मसूर' म्हणजे दही व 'ऊर' म्हणजे खाणारा, म्हणून हा दही खाणारा गणपती होय. त्यामुळे या गणपतीला रोज दह्याने अभिषेक केला जातो.[१२५]

सभामंडप, गर्भगृह व शिखर असा या मंदिराचा पदविन्यास आहे. सभामंडप हा २४ x ३६ व गर्भगृह १५ x १५ आहे. गर्भगृहाच्या पाठीमागे सभामंडपाच्या भिंतीवर श्रीसिध्देश्वरांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांची नांवे त्यांच्या चित्रासहीत कोरलेली आहेत. त्यामुळे या मंदिरात जाणाऱ्या भक्ताला सोलापूरातील अष्टविनायक कोठे आहेत, हे पटकन ध्यानात येते. सन १९६१ मध्ये दगडोबा भडंगे व पंढरीनाथ भंडगे यांनी स्वःखर्चाने गाभाऱ्याचे बांधकाम करून दिले. या गर्भगृहात मुख्य मूर्ती ही श्रीमश्रृम गणपतीची असून तिची उंची सव्वा तीन फुट व रूंदी सव्वा दोन फुट आहे, मूर्ती सुंदर रेखीव आहे. इ. स. १९८२ मध्ये भोजप्पा म्हमाणे यांनी सभामंडप बांधून दिला आहे. मंदिराची देखभाल व मूर्तीची पूजा ही किसनराव मास्तर पतंगे यांच्याकडे वंशपरंपरेने आहे, त्यांची चौथी पिढी सध्या मंदिरात सेवा देत आहे.

नित्यपूजा विधी व वार्षिक उत्सव

दररोज पहाटे ५ वाजता मंदिर उघडले जाते. पहाटे ५.३०, सकाळी ८.३०, संध्याकाळी तिन्ही सांजेच्या वेळी आणि रात्री ८.३० वाजता 'श्रीं' ची महाआरती होते व रात्री ९ वाजता मंदिर बंद केले जाते. दर महिन्याच्या संकष्टीला मंदिरात 'श्रीं' च्या दर्शनासाठी भक्तांची मोठी रांग लागलेली असते. गणेशोत्सवामध्ये रोज षोडशोपचारे महापूजा करून यजमान उभयतांकडून महाभिषेक, विनायक चतुर्थीला होम केला जातो. माघ महिन्यातील गणेशजयंतीला मंदिरात उत्सव असतो. या दिवशी इतर ठिकाणाहूनही भक्त 'श्रीं' च्या दर्शनासाठी आवर्जून उपस्थित राहतात. या दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

शिस्त, व स्वच्छतेने नटलेले हे गणपती मंदिर सोलापूर-तुळजापूर रस्त्यावर असल्याने तुळजापूर, लातूर, उस्मानाबाद येथील भक्त आवर्जून येथे थांबतात व 'श्रीं' चे दर्शन घेऊनच पुढे जातात. 'नवसाला पावणारा' अशी ख्याती असलेल्या या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे ज्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील लाखो भक्त लोक कोजागिरी पोर्णिमेला तुळजापूरला पायी जातात. त्याप्रमाणे या गणपतीला तुळजापूर, उस्मानाबाद येथून हजारो भक्त दरवर्षी श्रावण संकष्टी चतुर्थीला पायी येतात. दरवर्षी श्रावणशुध्द प्रतिपदेपासून अनंत चतुर्दशीपर्यंत रोज 'श्री' स अथर्वशीर्ष मंत्राने १००८ शमीची पाने वाहून पूजा केली जाते.

जीर्णोध्दार

सन १९६१, १९८२ आणि २००१ मध्ये या मंदिराचा जीर्णोध्दार व सुवर्ण कलशारोहणाचा उत्सव करण्यात आला. गौडगांवचे डॉ. जयसिध्देश्वर महाराजांच्या हस्ते मंदिरावर २५ तोळे सोन्याचा कलश स्थापन केला. सन २००३ साली श्रींच्या मूर्तीस २५ तोळे सोन्याचा रेखीव सुवर्णहार करण्यात आला. मंदिराच्या मागील बाजूस 'श्रीलक्ष्मी मंदिर' आहे, त्यावरही ५ तोळे सोन्याचा कलश बसविण्यात आला. हा सर्व विकास भक्तांच्या नवसातून आलेल्या वस्तुतून व लोकवर्गणीतून करण्यात आला.[१२६]

- **श्रीगणेश मंदिर (गणपती घाट, सोलापूर)**

सिध्देश्वर तलावाच्या चारही दिशांना विविध घाट असून उत्तरेकडील बाजूस असलेल्या घाटास 'गणपती घाट' असे नांव आहे. या घाटावर गणपतीचे मंदिर असल्याने या घाटास गणपती घाट' हे नांव मिळाले आहे. हे मंदिर थोरल्या माधवराव पेशव्यांच्या काळात बांधले आहे. हे मंदिर मराठेकालीन असल्याने तत्कालीन स्थापत्यकलेची वैशिष्ट्ये या मंदिराच्या माध्यमातून दिसून येतात. पूर्वाभिमुख मंदिराचे सभामंडप व गर्भगृह असे भाग आहेत. मंदिर लहान-लहान दगडी चिऱ्यांनी बांधलेले असून मंदिरावरील छत सपाट आहे. मंदिराचा दर्शनी भाग हा लाकडाची सुबक नक्षी असलेला दिसून येतो.[१२७] मंदिराचे गर्भगृह ३.५ सेंमी व ५.४० सेंमी लांबीचे असून मंदिराचा सभामंडप हा ३.१५ सेंमी लांब व ५.६८ सेंमी रूंद असा आहे. गर्भगृहामध्ये सिंहासनावर गणपतीची मूर्ती आहे. मंदिराच्या समोरील बाजूस दगडी बांधकामात केलेली एक दिपमाळ दिसून येते. सोलापूरातील ग्रामस्थ या मंदिरात येऊन आपल्या शुभकार्याची सुरूवात करतात. या मंदिराचे पुजारीपण शहरातील जोशी घराण्यांकडे परंपरेने आहे.[१२८]

- **दाते गणपती मंदिर (दक्षिण कसबा)**

शहरातील दक्षिण कसबा परिसरात असलेले दाते पंचागकर्ते यांचे 'दाते गणपती मंदिर' सोलापूरकरांचे श्रध्दास्थान आहे. दाते पंचागकर्ते धुंडीराज शास्त्री दाते यांच्या पणजोबांनी शके १७२९ फाल्गुन शुध्द त्रयोदशी या दिवशी या गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली. गणेश मूर्ती कोरीव व देखणी असून ती काळ्या पाषाणात बनवलेली शेंदूरविलेपित आहे. चतुर्भूज मूर्तीची उंची अडीच फुट असून वरील दोन हातापैकी एका हातात परशू व दुसऱ्या हातात फूल आहे. खालील एका हातात मोदक व दुसरा हात वरदहस्त आहे. मूर्तीच्या स्थापनेनंतर शके १८४० मध्ये मंदिराचे तळ आणि

सभामंडपाचे बांधकाम झाले. दाते परिवाराने या मंदिराचे मुळ स्वरूप आजही जपले आहे.[१२९] पेशव्यांनी सोलापूरातील अनेक धार्मिक स्थळांना वर्षासने सुरू केली होती. त्यामध्ये दाते गणपती मंदिराचाही समावेश होतो ते आजतागायत सरकारकडून या गणपती मंदिराला वर्षासन दिले. हे मंदिर पूर्णपणे दाते पंचागकर्ते यांच्या मालकीचे असून स्थापनेपासून आजतागायत या मंदिराच्या सेवेत त्यांची सातवी पिढी कार्यरत आहे. सध्या मोहन दाते व त्यांचा परिवार या मंदिराच्या सेवेत आहे. दाते पंचागामुळे देशभर व परदेशातही नावलौकिक मिळविलेले दाते घराणे गणेशाचे उपासक आहेत.[१३०] या भक्तीतूनच दाते घराण्याने या गणपती मंदिराची उभारणी केली. माघ महिन्यात दाते गणपतीचा पाच दिवस उत्सव साजरा केला जातो. त्यानिमित्त पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.[१३१]

- **श्री गणपती मंदिर (मोदीखाना)**

सन १८७१ साली मोदीखाना विभाग सोलापूर शहर हद्दीत समाविष्ट करण्यात आला.[१३२] त्यावेळी या भागात तुरळक लोकवस्ती होती. मोदी विभागामध्ये सुमारे दिडशे वर्षापूर्वी स्थापना झालेले श्रीगणपती मंदिर असून या मंदिराची स्थापना मद्रास येथील शमातम्मा नावाच्या एका महिलेने केलेली आहे. या मंदिराची देखभाल 'सार्वजनिक पंचकमिटी मोदी' या संस्थेच्या वतीने केली जाते. विलास देशमुख या कमिटीचे सध्याचे अध्यक्ष आहेत. पुजारी गणेश रामचंद्र भावार्थी यांच्या सुनबाई किशोरी श्रीपाद भावार्थी या गणपती मंदिरात नित्यपूजा व धार्मिक उत्सवाचे कार्यक्रम पार पाडतात.

मंदिराची रचना

या मंदिरास पूर्वी पत्र्याचे शेड होते. सन १९८० मध्ये पंचकमिटीने जीर्णोध्दार करून सभामंडप बांधून फरशीकरण केले. सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा या मंदिराचा पदविन्यास आहे. मंदिराची संपूर्ण जागा सुमारे चार हजार चौरस फुट आहे. मंदिराला पूर्व आणि उत्तरेस अशी दोन प्रवेशद्वारे आहेत. सभामंडपाला दगडी भिंतीचे कंपाऊंड आहे. सभामंडपाचा ८ खांबावर असून समोर काळ्या पाषाणातील शिवलिंग आहे. या मंदिराचे गर्भगृह ४ x १० फुट असून वर छोटेसे शिखर आहे. गर्भगृहात काळ्या पाषाणातील २ फुट उंचीची गणपतीची मूर्ती असून मूर्तीच्या उजव्या बाजूला संगमरवरी दत्त मूर्ती आणि डाव्या बाजूला श्रीविठ्ठल-रूक्मिणीची काळ्या पाषाणाची मूर्ती आहे. या दोन्ही मूर्ती सन १९८०-१९८५ च्या दरम्यान जीर्णोध्दार काळात प्राणप्रतिष्ठापना केल्या आहेत. गर्भगृहाला असणारा प्रदक्षिणा मार्ग हा 'साधार' पध्दतीचा आहे.[१३३]

दररोज सकाळी 'श्रीं' च्या मूर्तीबरोबर इतर मूर्तींची शोडषोपचारे पूजा-अर्चा व आरती होते. दररोज संध्याकाळी परिसरातील महिला मंदिरात येऊन भजन व हरिपाठ करतात. रात्री आरती करून १० वाजता मंदिर बंद केले जाते.[१३४] गणेश जयंतीउत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी 'श्रीं' स अभिषेक, सहस्त्र अवर्तन, 'गणेशयाग' (होम) व किर्तनाचा कार्यक्रम होतो. सन २०१३ साली झालेल्या गणेशोत्सवाच्या वेळी श्री शंभुमहाराज पंढरपूरकर यांचे 'गणेशजन्म' या विषयावर किर्तन झाले होते.[१३५] याचबरोबर श्रीकृष्णजयंती, दत्तजयंती, तुकारामबीज इत्यादी वार्षिक उत्सवांचे आयोजन केले जाते. दर चतुर्थीला मंदिरात भक्तांची दर्शनासाठी गर्दी होते. अनेक भक्त या दिवशी गणपतीस अभिषेक ही करतात. अशा प्रकारे मोदीखाना परिसरात असणाऱ्या गणपती मंदिर गणेश भक्तांच्या श्रध्देचे स्थान बनले आहे.

३.१.६ मारूती मंदिरे

- **काळजापूर मारूती**

शहरातील अनेक जुन्या मंदिरांपैकी प्रसिध्द असलेले 'काळजापूर मारूती मंदिर' हे पूर्वी शहराच्या तटाबाहेर होते. कुंभकोणी कुटुंबियाच्या जागेत हे मंदिर असून या मंदिराचे बांधकाम कुंभकोणी परिवाराने केले आहे. शहरातील प्रसिध्द कायदेतज्ञ गोपाळराव रंगनाथ कुंभकोणी यांच्यानंतर अरविंद कुंभकोणी आणि अलिकडच्या काळात अशोक कुंभकोणी या मंदिराची देखभाल करीत आहेत. हा मारूती 'काजळापूरचा मारूती' म्हणूनही प्रसिध्द आहे. सोलापूर शहर हे सोळा गावांनी मिळून बनलेले आहे, त्यापैकी 'काजळापूर' हे एक नाव होते.[१३६]

हे मंदिर पश्चिमाभिमुख असून या मंदिराचे सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असे विभाग आहेत. विस्तीर्ण बांधकाम असलेल्या या मंदिरात सोलापूर शहरातील सर्व जाती-धर्मांचे लोक दर शनिवारी दर्शनासाठी गर्दी करतात. काळजापूर मारूतीची मूर्ती ही शेंदूर फासलेली असून ती सुमारे ४ फुट उंचीची व २ फुट रूंद अशी आहे. मूर्तीवर 'श्रीराम' अशी अक्षरे कोरलेली आहेत.

- **श्री रानडे मारूती मंदिर**

नवी पेठेतील नामदेव चिवड्याच्या इमारतीजवळ असलेल्या या मारूती मंदिराची स्थापना सन १७६५ च्या सुमारास झाली.[१३७] सोलापूर शहराच्या देगांव वेशीवर असलेला हा मारूती 'स्वयंभू मारूती' म्हणून ओळखला जातो. आज ज्या ठिकाणी मंदिर आहे त्या ठिकाणी असणाऱ्या विहिरीमध्ये

मारूतीची मूर्ती सापडली. ही विहिर रानडे यांच्या जागेत होती रानडे यांनी ही विहिर बुजवून त्या ठिकाणी पूर्वाभिमुख मंदिर उभारले व त्या मंदिरात मारूतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. मारूतीचे मंदिर पूर्वाभिमुख असले तरी मूर्ती ही उत्तराभिमुख असून ती चार फुट उंच आहे. गणफुले यांच्या चौथ्या पिढीतील विद्या प्रभाकर गणफुले या मंदिराचे व्यवस्थापन व पुजारी म्हणून काम पाहतात. हे मंदिर नव्या पेठेतील रानडे यांच्या जागेत असल्याने 'रानडे मंदिर' म्हणून ओळखले जाते.[१३८] हा मारूती चिवडेवाल्याच्या घराजवळील मारूती म्हणून ही ओळखला जातो.[१३९]

- **उत्तरमुखी हनुमान मंदिर (बाळीवेस)**

शहराच्या बाळेवेशीवर असणाऱ्या या पूर्वाभिमुख मंदिरातील हनुमानाची मूर्ती ही उत्तरमुखी असल्याने हे मंदिर 'उत्तरमुखी हनुमान मंदिर' म्हणून ओळखले जाते. अडीचशे वर्षांपूर्वीच्या या मंदिराची रचना गर्भगृह, सभामंडप व शिखर अशी आहे. गर्भगृहातील हनुमानाची मूर्ती साडे तीन फुट उंच आहे. मंदिराचे पुजारीपण पतंगे घराण्याकडे असून सध्या गणेश मारूती पतंगे हे पुजारी आहेत. अलिकडील काळात ब्रिजनारायण कावरा यांनी या मंदिराचे नूतनीकरण करून दिले आहे.[१४०]

- **तुळजापूर वेस मारूती मंदिर**

या मंदिराची स्थापना दोनशे वर्षांपूर्वी झालेली असून तुळजापूर वेशीवरील मारूती म्हणून या मारूतीची ओळख आहे. पश्चिमाभिमुख मंदिरात मारूतीची मूर्ती साडे तीन फुट उंच आहे. मंदिराच्या दक्षिणेस नगरेश्वराचे तर उत्तरेस काळभैरवनाथाचे मंदिर आहे.

- **रेवणी मारूती**

सोलापूर शहरातील किल्ल्याच्या उत्तरेकडील बाजूस नव्या पेठेला लागून असणारे हे मारूतीचे मंदिर 'रेवणी मारूती' म्हणून ओळखले जाते. हे मंदिर जुन्या काळात रेवणी पेठेत असल्याचे आढळते. किल्ल्याचा खंदक व जुन्या शहराचा तट या दरम्यान बरीच उंच अशी जमिन होती, त्यास 'रेवणी' म्हटले जाई. याच जागेत हे मारूती मंदिर असल्याने ते 'रेवणी मारूती' या नावाने ओळखले जाते.[१४१] या मंदिरातील काळ्या पाषाणातील शेंदूर लावलेली मारूतीची मूर्ती ही अडीच फुट उंच आहे. मूर्तीसमोर लहान स्वरूपात चांदीच्या पादुका व कासव प्रतिमा पहावयास मिळते.

मंदिर उत्तराभिमुख असून शनिवार, अमावस्या आणि पोर्णिमेस दर्शनासाठी लोक गर्दी करतात.[१४२] हनुमान जयंती हा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. मंदिराचे पुजारी धोंडीबा गणपत बारंगुळे हे आहेत.

- **मधला मारूती**

शहराच्या मध्यवर्ती असलेले हे मारूतीचे मंदिर 'मधला मारूती' म्हणून प्रसिध्द आहे. मंगळवार पेठेची निर्मिती झाली, त्यावेळी हा मारूती वेशीबाहेर होता. मारूतीची ही मूर्ती एका शिलालेख असलेल्या दगडावर कोरलेली असून सदर शिलालेखाचे वाचन झालेले नाही. या शिलालेखाचा दगड उलटा करून शिलालेखाच्या विरूध्द अंगाला त्याच दगडावर मारूतीची मूर्ती कोरण्यात आलेली आहे. शिलालेखाची सुरूवात तळापासून झालेली असून शेवट मारूतीच्या मूर्तीच्या डोक्याकडील बाजूस झाला आहे. मारूतीची मूर्ती मुळ सोलापूर कसबा वसविण्याच्या वेळची किंवा त्यापूर्वीची असावी हे शिलालेखाचे वाचन झाल्यावरच समजू शकेल.[१४३] सध्याची मंगळवार पेठेची चतू:सीमा मधल्या मारूतीपासून तुळजापूर वेशीपर्यंत (दक्षिण-उत्तर) व कुंभार वेशीपासून ते बुबणे यांच्या जैन मंदिरापर्यंत (पूर्व-पश्चिम) होती.[१४४]

हा मारूती शहराच्या मध्यवर्ती असल्याने स्वातंत्र्य चळवळीतील घडामोडी याच परिसरात मोठ्या प्रमाणावर घडून आल्या. स्वातंत्र्य चळवळीच्या अनुषंगाने झालेल्या अनेक सभा या मधला मारूती चौकातच झाल्या. ६ ऑगस्ट १९४१ रोजी सायंकाळी ५.३० वाजता काँग्रेसचे कार्यकर्ते बाबासाहेब शांतीनाथ बागेवाडीकर यांनी या चौकात घोषणा देऊन गांधीजींच्या आज्ञेनुसार या दिवशी सत्याग्रह करण्याची नोटीस डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटकडे पाठविले होते.[१४५]

मंदिराचा गाभारा हा पूर्वी लाकडी स्वरूपाचा असल्याची माहिती मिळते. या लाकडी गाभाऱ्यास २४ फेब्रुवारी १९३४ रोजी आग लागल्याने ही आग विझवण्याचे कार्य मलकण्णा वॉटर वर्क्स इंजिनियर यांनी केले. त्यावेळी मंदिराचे दोनशे ते तिनशे रूपयाचे नुकसान झाल्याचा उल्लेख सापडतो.[१४६] मधला मारूती चौकात अनेक व्यापाऱ्यांनी आपली दुकाने थाटल्याने हा चौक नेहमीच गजबजून जाऊ लागला. लोकांची गर्दी वाढल्याने व या पेठेला शहराची मुख्य बाजारपेठेचे स्वरूप आल्याने नंतरच्या काळात चौकाच्या मध्यवर्ती असलेल्या या मारूतीचे मंदिर पाडून चौकाच्या उत्तरेकडील बाजूस छोटेसे मंदिर बांधून त्या ठिकाणी या मारूतीची पुनर्प्रतिष्ठापना करण्यात आली.

- **दक्षिणमुखी हनुमान मंदिर (जोडभावी पेठ)**

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या मंदिराची स्थापना सन १९४१ मध्ये झाली असून शहराच्या जोडभावी पेठेमध्ये मंगळवार बाजार शेजारी मुख्य रस्त्यालगत हे मंदिर आहे. मंदिराची जागा तीन हजार चौरस फुट असून सन १९९७ मध्ये या हनुमान मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. पश्चिममुखी प्रवेशद्वार असलेल्या या मंदिरातील हनुमानाची मूर्ती दक्षिणमुखी असून ती साडे तीन फुट उंच आहे. गर्भगृहात या मूर्तीच्या उजव्या बाजूला छोटेसे शिवलिंग आणि गर्भगृहासमोर सभामंडपात काळ्या पाषाणातील २ फुट उंचीची नंदीची मूर्ती आहे. यावरून या मंदिरावर शैव पंथीयांचा पगडा असल्याचे जाणवते. मंदिराच्या पाठीमागील बाजूस पिंपळाच्या झाडाखाली शंकराची व चौडेश्वरी देवीची काळ्या पाषाणातील मूर्ती आहेत. या मंदिराचे व्यवस्थापन ट्रस्टमार्फत केले जाते. सध्या या ट्रस्टचे अध्यक्ष महादेव मल्लिकार्जून गंभीरे आणि सचिव डी. जी. चिवरी हे आहेत.[१४७]

- **श्री मारूती मंदिर (मोदीखाना)**

मोदीखाना परिसरात असणारे हे मारूती मंदिर सुमारे दिडशे वर्षांपूर्वी याच परिसरात राहणारे भूमय्या शिवय्या संगमवार यांच्या मद्रास येथील स्नेही शमातम्मा नावाच्या महिलेने स्थापन केले. या मंदिराची सर्व व्यवस्था 'सार्वजनिक देवस्थान पंचकमिटी, मोदीखाना' ही संस्था पाहते. मंदिराचा जीर्णोध्दार सन २०१२ मध्ये पंचकमिटी मार्फत केला. पश्चिमाभिमुख प्रवेशद्वार असलेल्या या मंदिराला छोटे शिखर, सभामंडप, गर्भगृह व अंतराळ आहे. गर्भगृह आतून संपूर्ण पांढऱ्या ग्रेनाईट फरशीने सुशोभित केलेले असून, त्यात मारूतीची शेंदूर लावलेली ३ फुट उंच मूर्ती आहे. सुमारे १० x १० फुट गर्भगृहाला प्रदक्षिणा मार्ग 'साधार' पध्दतीचा आहे.[१४८] 'श्रीं' च्या मूर्तीस दररोज जलाभिषेक करून मारूतीची आरती होते. मंदिरात दर मंगळवारी व शनिवारी दर्शनासाठी भाविकांची गर्दी असते. श्रीं' च्या मूर्तीस या काळात महाभिषेक करून विशेष पूजा केली जाते. हनुमान जयंतीचा उत्सव मंदिरात दरवर्षी मोठ्या उत्साहात होता

- **सोन्या मारूती मंदिर**

दत्त चौक ते जुनी फौजदार चावडीच्या मार्गावर हे मंदिर उभारलेले आहे. सन १९४७ मध्ये येथे म्हसोबाचे मंदिर होते, तेथे कालांतराने मंदिराला क्षती निर्माण झाल्याने म्हसोबाच्या ऐवजी तेथे

सन १९७६ साली काळ्या पाषाणातील मारूती मूर्तीची प्रतिष्ठापना पंढरपूर येथील रामबाग महाराज यांच्या हस्ते करण्यात आली. त्याकाळात पुण्यातील सोन्या मारूती हा खुप जागृत असल्याची श्रध्दा होती. त्यामुळेच या मारूतीलाही सोन्या मारूती असे नाव दिले गेले. हे मंदिर स्थापन करण्यात माणिकराव महिंद्रकर व धर्मवीर वि. रा. पाटील व प्रल्हाद शिरवाडकर यांचे योगदान मोठे होते.

- **दक्षिणमुखी मारूती मंदिर (उत्तर कसबा)**

हे मंदिर उत्तर कसब्यातील जुने विठ्ठल मंदिराजवळ आहे. १०० वर्षाहून अधिक जुने असलेल्या या मारूतीला 'तेल्या मारूती' असेही म्हणतात. दक्षिणमुखी मारूती हे मंदिर पिंपळाच्या झाडाखाली स्थापले आहे, पूर्वी याठिकाणी कुस्त्या होत असत. मंगळवारी व शनिवारी मोठ्या संख्येने भक्त दर्शनाला येतात. [१४९] या प्रसिध्द मारूती मंदिराशिवाय शहरात अनेक लहान-लहान मारूती मंदिरे आहेत. त्यामध्ये शिवहनुमान मंदिर, पंचमुखी हनुमान देवस्थान, अशोक चौक वडार समाज मारूती मंदिर, गवंडी समाज मारूती मंदिर, उत्तर कसबा स्वकुळ साळी मारूती मंदिर बेगम पेठ, श्रीब्रम्हानंद हनुमान मंदिर, शनिवार पेठेतील रत्न मारूती मंदिर, वारद चाळीतील मारूती मंदिर, लक्ष्मी-विष्णु चाळीतील मारूती, सळई मारूती मंदिर, श्रीहिरा मारूती देवालय भद्रावती पेठ, सोमवार पेठ मारूती मंदिर, राजेंद्र चौक मारूती मंदिर, कामठीपुरा मारूती मंदिर, विठ्ठल पेठेतील मारूती देवालय इत्यादी मारूती मंदिरांचा समावेश होतो. या मारूती मंदिरामध्ये नित्यनैमित्तिक पुजेबरोबरच हनुमान जयंती, रामनवमी व इतर वार्षिक उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. वार्षिक उत्सवाच्या वेळी या मंदिरांमधून प्रसादाचे वाटप केले जाते, याचा लाभ त्या त्या परिसरातील भक्त घेतात. सोलापूर शहराच्या धार्मिक इतिहासात भर घालण्याचे महत्त्वाचे कार्य या मंदिरातून घडून येताना दिसते.

३.१.७ इतर मंदिरे

- **श्री लक्ष्मी-नारायण मंदिर (पश्चिम मंगळवार पेठ)**

शहराच्या मध्यवर्ती भागात मंगळवार पेठेत असणारे श्रीलक्ष्मीनारायण मंदिर हे मारवाडी समाजाचे असून हा समाज रामाणुज संप्रदायी आहे. या मंदिराची स्थापना १८ एप्रिल १८९५ रोजी धार्मिक विधीविधानानुसार करण्यात आली.[१५०] लक्ष्मीनारायण हे एक संयुक्तरूप आहे. ही मूर्ती कशी घडवावी याबद्दल 'विश्वकर्मा वास्तुशास्त्रात' सांगितलेले आहे. लक्ष्मीनारायण संयुक्त उजव्या अंगी

विष्णु, डाव्या अंगी लक्ष्मी, लक्ष्मीचा उजवा हात विष्णुच्या गळयात, डाव्या हाती कमळ, विष्णुचा डावा हात लक्ष्मीच्या कमरेला विळखा घालून जवळच चरवी धारण करणारी सिध्दी विष्णुच्या पाठीकेवर खालच्या अंगी गरूड, पुढे शंख चक्रधारी दोन पुरूष हे अलंकृत पण ठेंगु असावेत. ब्रह्मा आणि शिव हे विष्णूचे उपासक या नात्याने हात जोडलेल्या अवस्थेत पुढे असावेत. भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये काहीशी भग्न झालेली अशा प्रकारची लक्ष्मीनारायणाची मूर्ती आहे.[१५१] या मंदिरात असणारी लक्ष्मी-नारायणाची मूर्ती ही संयुक्त नसून वेगवेगळी आहे. या मूर्ती स्थानक असून अचल आहेत. सुंदर व रेखीव असलेल्या संगमरवरी पाषाणातील या मूर्ती जयपूरहून आणलेल्या असून संपूर्ण धार्मिक विधी-विधानानुसार या मूर्तीची स्थापना पंढरपूरचे श्रीराम वाटीका पिटस्थ श्री १५१ रामानुजाचार्याजी स्वामीजी महाराजांच्या शुभहस्ते झालेली आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिणेस असून मुख्यमंडप, सभामंडप व गर्भगृह असा मंदिराचा पदविन्यास आहे. सभामंडप भव्य व सुंदर नक्षीकाम केलेला असून या सभामंडपात मंदिरातील धार्मिक उत्सवाबरोबरच समाजाचे वैयक्तिक धार्मिक उत्सव पार पाडले जातात.

मंदिरात पूजा-अर्चा व व्यवस्था पंच व विश्वस्तांमार्फत होते. नेमलेला पुजारी ठरलेल्या पध्दतीप्रमाणे म्हणजे पांचरात्र शास्त्राप्रमाणे तिंगल श्रीशैलेश पध्दतीने पूजा-अर्चा करतो. पूजेच्या व तिर्थप्रसादाच्या वेळी तिंगल पध्दती प्रमाणे ठरलेले मंत्रश्लोक व स्तोत्र म्हणण्याची पध्दत आहे. सकाळी सुप्रभात, विश्वरूप दर्शन व द्रविड भाषेत स्तोत्र म्हटले जातात, नंतर शृंगार करून शृंगार आरती केली जाते. दिवसातून तीन वेळा या मंदिरात आरती होते. दररोज श्रींच्या मूर्तीस खिराण्णाचा नैवद्य असतो. तुलसी पत्र, साखर, लोणी, दूध, तांदुळ यांचे एकत्रित मिश्रण म्हणजे खिराण्ण होय. मंदिरात प्रत्येक पूजेच्या नंतर भक्तांना तिर्थ व तुळशी पत्र दिले जाते.[१५२] श्रीलक्ष्मीनारायण मंदिरात सव्वा दोनशे दिवस वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम होतात, यापैकी धोला उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. मारवाडी समाजातील लोक मंदिरात पाठ वाचन करतात. भजन, किर्तन, वेदपारायण, श्रीनारायण महायज्ञ, श्रींस अर्चना, श्रीमद्भगवद्गीता, रामायण, इत्यादी ग्रंथांची पारायणे होतात. दरवर्षी जानेवारी महिन्यात धनुर्मासात देवाची पालखी निघते.[१५३]

या समाजातील लोकांत तिंगल व बंडगल हे दोन पंथ असून तिंगल पंथीय लोक त्रिशूल आकाराचे व त्याखाली एक उभी लाल रेघ ψ असा गंध लावतात तर बंडगल पंथीय लोक इंग्रजी U

व त्यात लाल रेषा अशा पध्दतीने सिंहासन विहरित गंध लावतात. लक्ष्मीनारायण या देवाचे गंध तिंगल पंथीय आहे. शांतता कमिटीच्या आदेशानुसार या मंदिरात २६ जून १९४७ रोजी प्रार्थनात्सोव साजरा करण्यात आला होता. या दिवशी देवाची आरती, वेद, पारायण, भजन, व्याख्यान, प्रवचन इत्यादी कार्यक्रम झाले होते.[१५४]

- **श्री द्वारकाधिश मंदिर (फलटण गल्ली)**

सव्वाशे वर्षे जुने असणाऱ्या श्रीद्वारकाधिश मंदिराची रचना सभामंडप व गर्भगृह अशी आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिणेला असून गर्भगृहाचे प्रवेशद्वार पूर्वेला आहे. येथे असलेल्या गोशाळेत १० गाई व १० वासरे आहेत. या गाई-वासरांना भक्त लोक चारा आणून देतात. सभामंडपात एक छोटीशी विहिर असून या विहिरीचे पाणी देवपूजेसाठी वापरले जाते. गर्भगृहातील स्थानक स्वरूपातील द्वारकाधिशाची (श्रीकृष्णाची) मूर्ती संगमरवरी असून या मूर्ती स्थापनेला नुकतीच १२१ वर्षे झाली आहेत.[१५५]

या मंदिरात नित्यनैमित्तिक जे विधी होतात त्यास पूजा न म्हणता 'दर्शन' म्हणतात. दिवसातून देवाचे सात दर्शन होतात. या सातही वेळी देवाची सात वेगवेगळी रूपे असतात. त्यामध्ये मंगला दर्शन, श्रीशृंगार दर्शन, राजभोग दर्शन हे तीन दर्शन सकाळी होतात. संध्याकाळी उत्थापनदर्शन, भोगदर्शन, संध्याआरती, शयन दर्शन इत्यादींचा समावेश होतो. या सात दर्शनाच्या वेळी वेगवेगळे सात भोग असतात व प्रत्येक वेळी नैवद्य वेगळा असतो. या देवळात प्रत्येक वेळी होणारी पूजा ही सोहळ्यात होते. हा पूजेचा मान फक्त या देवळातील पुजाऱ्यांना असतो. मंगला, भोग, संध्या आणि शयन या चार वेळी द्वारकाधिशाची आरती होते व यावेळी 'बाळा द्वारकाधिश की जय' असा उद्घोष केला जातो.

कृष्ण जन्माष्टमी, नंदोत्सव (आनंदोत्सव), श्रावणात झुला उत्सव, दिवाळी पाडवा (अनकुट उत्सव) इत्यादी वार्षिक उत्सव मंदिरात होतात. अनकुट उत्सवाप्रसंगी ५६ भोग देवाला देतात. देव गर्भगृहातून कधीही बाहेर काढला जात नाही. त्यामुळे होणारे वार्षिक उत्सव मंदिरातच होतात. बाहेरच्या वस्तू देवाला अर्पण केल्या जात नाहीत. द्वारकाधिश मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या लोकांमध्ये गुजराती मारवाडी व राजस्थानी मारवाडी समाजाचे प्रमाण जास्त आहे. हे लोक कपाळावर U आकाराचा व त्यात लाल रेषा असा तिलक करतात. देवळात मारवाडी समाजाच्या

लोकांचे किर्तन व भजनाचा कार्यक्रम होतो. देवाची आरती केली जात नाही तर देवाची स्तुती केली जाते. भक्तांना प्रसाद म्हणून खडीसाखर व पेढा दिला जातो.[१५६] मंदिराचे व्यवस्थापन मुंबई येथील ट्रस्टीमार्फत चालते. देवळात सेवा देणारी चेतन विठ्ठलदास त्रिवेदी यांची चौथी पिढी आहे.

- **श्रीकृष्ण मंदिर (भवानीऋषी पेठ)**

शहरातील वालचंद महाविद्यालय मार्गावर न्यु पाच्छा पेठेजवळ छोटीशी भवानीऋषी पेठ वसली आहे. या पेठेत तेलगु भाषिकांनी ३० वर्षापूर्वी ' श्रीकृष्ण मंदिराची' स्थापना केली. या मंदिर स्थापनेसाठी नारायणराव कटकम, भूमय्या येमूल, रामचंद्र कोटा, लक्ष्मीपती दासरी, नारायण गाली व रामय्या कटकम यांनी पुढाकार घेतला. गुढीपाडवा, रामनवमी, संक्रांत इत्यादी सण व उत्सवाच्या दिवशी येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

दर एकादशीला श्रीकृष्ण मूर्तीस 'पाडुरंगाच्या' अवताराने सजवले जाते. गोकुळाष्टमीनिमित्त १० दिवस मत्स्य, बालाजी, राम असे वेगवेगळे अवतार साकारले जातात. या दिवशी जन्मोत्सव व दहीहंडी कार्यक्रम होतो. विश्वस्तांमार्फत या मंदिराची व्यवस्था केली जाते सध्या लक्ष्मीनारायण कटकम, श्रीनिवास गाली हे काम पाहतात.

याच पेठेतील दत्तनगर परिसरातील दत्त मंदिर भाविकांचे श्रध्दास्थान मानले जाते. सन १९५८ साली लक्ष्मीनरसु विरय्या सिंगम, कोमय्या रामय्या देवसानी, सत्तय्या यल्लम्मा, कामुनी, व्यंकट नरसु सिंगम, मार्कंडेय फलमारी इत्यादी लोकवर्गणीतून या मंदिराची उभारणी केली. दत्त जयंतीला १० दिवस मोठा उत्सव केला जातो. आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्रातील नामवंत प्रवचनकार इथे आपली सेवा रूजु करतात. आरती, अर्चना, प्रसाद या गोष्टी नित्योपचारात चालतात. दसरा, दिवाळी पाडवा इत्यादी सणांच्या वेळी विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सध्या रामचंद्र कोमरय्या हे अध्यक्ष आहेत.

अशोक चौकात असणारे वडार समाजाचे व्यंकटेश्वर देवस्थान हे सन १९३२ साली काशिराम लिंबोळे यांनी स्थापन केले. ते सन १९३४ ला दर्शनासाठी खुले झाले. या पेठेतील हे सर्वात जुने मंदिर असून काशिराम यांनी पंढरपूरातही या समाजाचा मठ उभारला व माघी वारीसाठी दिंडी सोहळा सुरू केला.[१५७]

- **श्रीकृष्ण देवस्थान (रविवार पेठ)**

संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या या मंदिराचे प्रवेशद्वार दक्षिणेला असून मुख्यमंडप, सभामंडप व गर्भगृह असा या मंदिराचा पदविन्यास आहे. या मंदिराचे क्षेत्रफळ सुमारे एक हजार चौरस मिटर आहे. ३३ x ३३ चा सभा मंडप असून सभा मंडपात ह. भ. प. आण्णाप्पा महाराज यांची समाधी आहे. सभामंडपातच पूर्वाभिमुख छोटेसे गर्भगृह असून या गर्भगृहात मुख्य मूर्ती श्रीकृष्णाची आहे. काळ्या पाषाणात घडविलेल्या मूर्तीची प्रतिष्ठापना इ.स. १९७० साली केली असून ती तिरूपतीहून आणलेली आहे. २.७५ फुट उंच असलेली ही मूर्ती मुरलीधारी व किरिट मुकुटधारी अशी आहे. मूर्ती घडविताना त्यावर विविध अलंकार कोरलेले असून मूर्तीच्या गळ्यात अनेक माळा तसेच कानात कर्णकुंडले आहेत. मंदिराचे बांधकाम इ. स. १९८६ मध्ये पूर्ण झाले. या मंदिराच्या बांधकामासाठी लागणारा दगड हा हिप्परगा खाणीतून आणला असून मंदिर बांधकामासाठी सुमारे ५ लाख रूपये खर्च आल्याचे लक्ष्मण सरप्पा पुजारी यांनी सांगितले. वडार समाज बांधवांनी स्व:कष्टांनी या मंदिराचे बांधकाम केले. या मंदिराचे सर्व व्यवस्थापन देवस्थानसमिती मार्फत चालते.

दररोज दिवसातून दोन वेळा मंदिरात आरती होते 'श्री'स दररोज खडीसाखर किंवा पेढा याचा नैवद्य असतो. विशेष प्रसंगी शिरा, गोड खिचडी, लापशी, पुरण-पोळींचा नैवद्य असतो. देवस्थानतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी, गुढीपाडवा, गोपाळकाला आणि आण्णाप्पा महाराजांची पुण्यतिथी साजरी केली जाते. श्रीकृष्ण जन्माष्टमीला यात्रा भरते, या दिवशी पालखी मिरवणुक काढून प्रसाद म्हणून लापशी वाटली जाते. गुढीपाडव्याच्या दिवशी आण्णाप्पा महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त महाप्रसादाचे वाटप होते. दरवर्षी माघ महिन्यात एकादशीस पंढरपूरास जाण-या दिंड्यामध्ये श्रीकृष्ण देवस्थान वडार समाजाची दिंडी असते. ही दिंडीची परंपरा आण्णाप्पा महाराजांनी सुरू केली ती परंपरा आजतागायत चालू आहे. मंदिर समितीमार्फत आण्णाप्पा महाराज प्राथमिक शाळा चालविली जाते.[१५८]

- **श्री बालाजी मंदिर (चौपाड)**

चौपाड परिसरातील बालाजी मंदिराची एकूण जागा पाच हजार चौरस फुट असून १५० वर्षांपूर्वीचे हे मंदिर संताबाई यांचा दत्तक मुलगा दत्तुसिंह चौहान याने दिनांक २० सप्टेंबर १९२३ रोजी 'रजपूत पंच सोलापूर' यांना बक्षिस पत्र करून दिले. सध्या या मंदिराचे अध्यक्ष म्हणून संजयसिंह प्रतापसिंह चौहान हे काम पाहत आहेत.[१५९] पूर्वाभिमुख मंदिर दगडी बांधकामाचे असून प्रवेशद्वारावर

'श्री. बालाजी मंदिर चौपाड' अशी अक्षरे कोरलेली आहेत. मंदिराचे प्रवेशद्वार सन १९२० मध्ये रतनबाई गजरासिंह हैद्राबादकरीन यांनी करून दिले.[१६०] सभामंडप हा सागवानी लाकडांनी युक्त असून लाकडी खांबावर आधारलेले आहे. सभामंडपात उजव्या बाजूस पद्मावतीचे छोटेसे मंदिर सन १९७५ मध्ये बांधण्यात आले. या पद्मावतीच्या मंदिराचे बांधकाम किसनसिंह बंडूसिंह चौहान, प्रतापसिंह बंडूसिंह चौहान आणि दिलीपसिंह बंडूसिंह चौहान या तिघा भावांनी आपल्या मातोश्री भागीरथी बंडू चौहान यांच्या स्मरणार्थ केले.[१६१]

गर्भगृहात काळ्या पाषाणातील दोन फुट उंचीची वाराणसी येथून आणण्यात आलेली बालाजीची मूर्ती आहे. बालाजी मंदिराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी मंदिरातून रंगगाड्यांची मिरवणुक काढली जाते. ही परंपरा अनेक वर्षापासून आजतागायत अखंड चालू आहे. मिरवणुकीमध्ये धुलीवंदनाच्या वेळी फक्त पुरूषच सहभागी होतात. शहरातून रंगगाड्यांची मिरवणुक काढून शहरातील इतर बांधवांच्या बरोबर रंगाची उधळण केली जाते. ही मिरवणुक शहरातील विविध मशिदीवरून वाद्य वाजवित नेली असता कधीही संघर्ष झाल्याचे दिसून येत नाही. गोकुळाष्टमी, झुलाउत्सव, वसंतपंचमी असे धार्मिक कार्यक्रम या मंदिरात साजरे केले जातात. वसंतपंचमीला समाजातील महिला बालाजी मंदिरात एकत्र येऊन गुलाल खेळतात. समाजातील कमल चव्हाण या आपल्या महिला भजनी मंडळाचे कार्यक्रम या मंदिरात साजरे करतात.[१६२]

- **श्री व्यंकटेश मंदिर (दाजी पेठ)**

श्रीव्यंकटेश्वर देवस्थान संस्थेमार्फत श्रीव्यंकटेशाचे मंदिर शहराच्या पूर्व भागात दाजी पेठ सिटी सर्व्हे नंबर १०४२९ या ठिकाणी बांधण्यात आले आहे. या मंदिराचा पायाभरणी समारंभ इ. स. १९७१ मध्ये कोल्हापूरचे संन्याशी दत्ता बाळ यांच्या हस्ते झाला तर देवस्थानची स्थापना दिनांक १२ मे १९७३ रोजी करण्यात आली. शहरात असणारे व्यंकटेशाचे हे मंदिर प्रसिध्द असून मंदिर उत्तराभिमुख आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावर जय आणि विजय यांच्या मूर्ती कोरलेल्या असून सभामंडप, यज्ञमंडप, अंतराळ व गर्भगृह असे मंदिराचे विभाग पाहावयास मिळतात. यज्ञमंडपाच्या समोर पद्मावतीचे छोटे मंदिर आहे. या मंदिराच्या बाजूला 'कल्याण मंडप' असून मंदिराचे सर्व धार्मिक विधी व विवाह या मंडपात पार पाडले जातात. सभामंडपात विविध देव-देवतांची चित्रे असून समोरील बाजूस गरूडाची सुबक मूर्ती व तेथेच शेजारी नवगृहाचे मंदिर आहे. अंतराळावर कोरीव शिल्पकाम केलेले पाहावयास

मिळते. मंदिराच्या गर्भगृहात महाबलीपुरम येथून आणलेली तिरूपती मंदिरातील मूर्तीप्रमाणेच व्यंकटेशाची मूर्ती ही काळ्या पाषाणाची असून ती ४.५ फुट उंचीची आहे.[१६३]

रोज अनेक पुष्पहारांनी व रत्नहारांनी मूर्ती सजवितात. व्यंकटेशाच्या अलंकारात तीन इंच व्यासाचा एक पाचू आहे. रत्नजडीत सुवर्ण मुकुट, दोन हातात शंख, चक्र, कानात सोन्याची मकरकुंडले, दोन वाघ नखांची माळा, दोन बाहूवर रत्नखचीत सोन्याची नागभूषणे, लक्ष्मीच्या १०८ प्रतिमा असलेली माळा, सोन्याच्या कोंदणात बसविलेल्या तुळशीमाळा, शालीग्रामची माळ, सोन्याचे विविध हार, वरद व कटीवर ठेवलेल्या हातासाठी रत्नखचीत सोन्यांची आच्छादणे, सोन्याचे जाणवे, पायांना सोन्याची आवरणे, दशावतार कोरलेला कमरपट्टा त्यात लटकावलेली सोन्याची सुर्यकट्यार, छातीवर उजव्या व डाव्या बाजूना कोंदणीत बसविलेल्या श्रीलक्ष्मी व पद्मावतीच्या प्रतिमा इत्यादी अलंकारांनी व्यंकटेशाची मूर्ती सजलेली दिसून येते.[१६४]

वार्षिक उत्सव

व्यंकटेश देवस्थानातर्फे मंदिरात वर्षभर विविध कार्यक्रम साजरे केले जातात. त्यामध्ये ब्राह्मोत्सव, आषाढी, कार्तिकी, माघी एकादशी, नरसिंह जन्मोत्सव, नवरात्र, रामनवमी, हनुमान जयंती, कृष्णजयंती इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होतो. ब्राह्मोत्सव हा सात दिवसांचा उत्सव तिरूपती देवस्थानम येथील परंपरेनुसार साजरा करण्यात येतो. ब्राह्मोत्सवाच्या काळात स्वस्तीवाचन, पुण्यवाचन, मत्सगृहणम, अंकुशरोपण, होमहवन, अभिषेक, कल्याणोत्सव, रथोत्सव, महापूर्ण आहूती इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पूजा व प्रसादासाठी भक्तांकडून फुले, हार, केळी, दुध, नारळ, तुप, तांदुळ, साखर, गुळ, रवा इत्यादी वस्तू स्विकारल्या जातात. रथोत्सवाच्या वेळी रथाच्या मार्गावर भक्तगण आपल्या घरासमोर अंगणात रांगोळी सडा घालतात. शहरातील विविध भागातून रथांची मिरवणुक काढली जाते.

व्यंकटेशाचे दर्शनासाठी दर शुक्रवारी मंदिरात गर्दी असते. मंदिरातील सर्व कार्यक्रम हे तिरूपती देवस्थानम वेदपाठशाळा पंचरात्र आगम पंडीत, श्रीमान चिलकापाटी तिरूमल चार्यालू स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली साजरे होतात. या मंदिराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या देवस्थानतर्फे गोशाळा चालविली जाते. या गोशाळेत आठ ते दहा गाई व वासरे आहेत. गायी-वासरांचा सांभाळ हा भक्तगणांकडून मिळालेल्या देणग्यातून केला जातो.[१६५]

- **श्रीकाळभैरवनाथ मंदिर (तुळजापूर वेस)**

श्रीसिध्दरामेश्वरांनी सोलापूर शहराच्या चार दिशांना चार स्थापना केलेल्या काळभैरवांपैकी शहराच्या उत्तर दिशेचा काळभैरव म्हणजे तुळजापूर वेशीतील 'काळभैरव' होय. हे शहरातील नाथ पंथीयांचे श्रध्दास्थान आहे. सुरूवातीला हे काळभैरवनाथाचे मंदिर बलिदान चौकात मध्यभागी होते. परंतु शहराची वाढ होत गेल्याने हे मंदिर चौकात एका बाजूला बांधले. मंदिराच्या दक्षिणेस मारूती मंदिर आणि उत्तरेस मरिआई मंदिर असून पूर्वेस हुतात्मा स्तंभ आहे.

१५० चौरस फुट जागेत दक्षिणाभिमुख असलेले हे काळभैरव नाथाचे मंदिर जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. काळ्या पाषाणातील २ फुट उंच काळभैरवनाथाच्या मूर्तीच्या डाव्या बाजूला शिवलिंग व त्रिशूल असून उजव्या बाजूला पितळी अश्व आहे, काळभैरवाची ही मूर्ती उग्र स्वरूपाची आहे. मंदिरात भिंतीवर काळभैरवाची आरती व काळभैरवाचे अष्टक आहे. मंदिराच्या डाव्या बाजूला पिंपळाचे झाडाखाली महांकाळेश्वरचे छोटसे मंदिर आहे.

छायाचित्र क्र. १०



काळभैरवनाथ मंदिरातील मुर्ती
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

या मंदिरात भिक्षूक घराण्यातील प्रकाश शंकरराव चव्हाण हे नित्यपूजेचे काम करतात. दररोज सकाळी 'श्रीं' ची शोडषोपचारे पूजेनंतर दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत मंदिर बंद केले जाते. रविवार व मंगळवार या देवतेचे मानाचे वार असल्याने यादिवशी 'श्रीं' च्या मूर्तीस पंचामृताचा

अभिषेक करून दोन वेळा आरती व विशेष पूजा केली जाते. रविवारी प्रसाद म्हणून भक्तांना गुळ दिला जातो. या दिवशी भक्तांकडून 'श्रीं' स मेदूवड्याचा नैवद्य दाखविला जातो. कार्तिक वद्य अष्टमीला कालाष्टमी साजरी करुन या काळात पाच दिवस यात्रा व पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. भजन, किर्तन, प्रचवन, भारूड, गोंधळी गीते, नाथांची गीते इत्यादी कार्यक्रम येथे होतात. होमहवन, भजनाचा कार्यक्रम व भाविकांना महाप्रसादाचे वाटप होते. दरवर्षी हनुमान जयंतीला या मंदिरातून कोल्हापूर येथे ज्योतिबाला जाण्यासाठी निघणाऱ्या पदयात्रेमध्ये १००- १५० लोकांचा सहभाग असतो. शहरातील प्रसिध्द जागृत देवस्थान म्हणून काळभैरवनाथाची ख्याती असून दररोज सुमारे ४०० ते ५०० लोक दर्शन घेतात.[१६६]

- **श्री शनैश्वर मंदिर (रेल्वे स्टेशन परिसर)**

शनि हा नऊ ग्रहांमधील महत्त्वाचा ग्रह असल्याने सुर्यमालेत त्याचे स्थान अनन्य साधारण आहे. शनिच्या गुणकर्मावरून त्याला शनैश्वर, मंद, रौद्र, कृष्ण अशी विविध नांवे आहेत. शनि हा ग्रह पापग्रह मानला असल्याने तो प्रत्येक राशीत अडीच वर्षे वास करतो. शनिची साडेसाती ही माणसाला वाईट असते असे म्हटले जाते. दिर्घकाळ टिकणारे विकार, विघ्न, वैफल्य नष्ट होते, म्हणून शनिची पिडा दूर करण्यासाठी त्याची पूजा केली जाते. शनिप्राप्तीसाठी उडीद, तिळ, तिळाचे तेल, कृष्णवस्त्र, लोखंड, काळी गाय आणि पादत्राणे या वस्तु दान द्याव्यात. शनिवारी शनिची पूजा केली जाते असे वर्णन जातकशास्त्रात आले आहे.

शहरामध्ये रेल्वे स्टेशन परिसरात असणारे हे शनिमंदिर केंव्हा स्थापन करण्यात आले याची माहिती मिळत नाही. शनिचे सोलापूरातील हे स्थान सिध्दरामेश्वरांच्या काळापूर्वीचे असावे कारण सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगापैकी दोन शिवलिंगे या शनि मंदिरातच आहेत. सन १९६० पर्यंत शनिमंदिराच्या रस्त्याने जात असताना सोबत लहान मुले असतील तर त्यांना झाकून नेले जाई आणि शनि मंदिराकडे न पाहता लोक घाबरत घाबरत रस्त्याने जात. सन १९६० पर्यंत शनिच्या दर्शनास येणाऱ्या लोकांची संख्या फारच कमी होती.

मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वेला असून दर शनिवारी शनि मंदिराचा परिसर भक्तांनी फुललेला असतो. सन १९६५ पर्यंत शनिदेवाची मूर्ती ही उघड्यावर होती. सन १९६५ मध्ये मंदिराची पायाभरणी झाली व सन १९७८ पर्यंत गर्भगृहाचे बांधकाम करून योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते

गर्भगृहात शनि मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. पूर्वीची शनिची जुनी मूर्ती दगडाला शेंदूर लावलेली होती. त्या मूर्तीच्या ठिकाणी सन १९७८ मध्ये पंढरपूर येथून आणलेली काळ्या पाषाणातील शनिमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. ही मूर्ती अडीच फुट उंचीची गरूडावर बसलेली चतूर्भूज असून मूर्तीच्या हातात गदा, त्रिशूळ, कमंडलू अशी आयुधे व एक हात वरदहस्त मुद्रेत आहे. शनि देवाच्या मूर्तीला अभिषेक करून सकाळ व संध्याकाळ शनि देवाची आरती म्हटले जाते.

नियमित पूजेप्रमाणेच काही वार्षिक उत्सवही साजरे केले जातात. वैशाख अमावस्येस शनि जयंती उत्सवास महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रमधून भाविक येतात. रूईच्या पानांचा व फुलांचा हार करून, तेल व श्रीफळ शनि देवाला अर्पण केले जाते. प्रसाद म्हणून खडीसाखर व तीर्थ दिले जाते. दर शनवारी मंदिराच्या समोर अनेक भिक्षुक भिक्षेच्या आशेने बसलेले असतात. दर्शनासाठी येणारे भक्तगण व यात्रेकरू अशा या भिक्षुकांना अन्नदान व कपड्यांचे दान देतात. आजपर्यंत या मंदिराला गणाचार्य कुटुंबाची सहावी पिढी सेवा देत असून सध्या कल्लय्या पंचय्या गणाचार्य स्वामी हे शनि मंदिराचे पुजारी म्हणून सेवा करीत आहेत.[१६७]

- **सत्यनारायण मंदिर (मंगळवार पेठ)**

टिळक चौकातून मधला मारूती मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आतील बाजूला मंगळवार पेठेत 'खत्री समाजाचे' वंशज देवाशंकर खत्री यांनी दोनशे वर्षापूर्वी 'सत्यनारायण मंदिराची' स्थापना केली. सध्या हे मंदिर ट्रस्टच्या अधिपत्याखाली असून मंदिरात नित्यपूजा विधीबरोबरच दर पोर्णिमेला अभिषेक तसेच धनुर्मास, दिवाळीत अन्नकुट, झुलाउत्सव साजरा होतो. पूर्वी श्यामसुंदर राधाकिसन दायमा हे पुजारी होते १० वर्षांपासून त्यांचे पुत्र मनिष दायमा हे काम पाहतात. त्यांनी हिंगोली येथे ही अशाच प्रकारचे एक मंदिर बांधल्याचे सांगितले. सोलापूरातील हे एकमेव मंदिर असून महाराष्ट्रात हिंगोलीनंतर दुसरे मंदिर असल्याचे मनिष दायमा सांगतात.

- **संत तुकाराम महाराजांचे मंदिर (अशोक चौक)**

शहरात तुकाराम महाराजांचे एकमेव मंदिर असून ते संत तुकाराम चौक (अशोक चौक) येथे आहे. या मंदिराची उभारणी सन १९३२ साली थोर वैष्णव ब्रम्हलीन शिवरामबुबा महाराज मोरे यांनी केली. सध्या त्यांची पाचवी पिढी चैतन्य महाराज मोरे हे संत तुकाराम महाराज मंदिरच्या सेवेत कार्यरत आहे. सोलापूर

शहरात वारकरी सांप्रदायाचे निष्णात भावाने सेवा करून वारकरी धर्मवर्धिष्णू करण्यासाठी शिवरामबुबा महाराज मोरे यांनी आपले जीवन वेचले. संत तुकाराम महाराजांबद्दलची त्यांची भक्ती श्रेष्ठ होती, त्यांनी जन्मभर पंढरीची वारी केली, ते निष्ठावंत वारकरी होते, शिवरामबुबा मोरे यांनी सुरू केलेला भक्तिमार्ग त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र श्रीरंगबुवा यांनी पुढे चालू ठेवला. सध्याचे उपासक विष्णुबुवा महाराज मोरे, हरिहर मोरे हे गेली अनेक वर्षे तुकारामबीजेनिमित्त सप्ताह आयोजित करतात. माघ महिन्यात तुकोबारायांची पालखीसह दिंडी पंढरीला नेली जाते. मंदिरात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम घेतले जातात. रामनवमीनिमित्त सप्ताह, मुख्य एकादशी व महाशिवरात्रीला भजन, किर्तन आणि संपूर्ण कार्तिकमध्ये काकडा असतो. संत तुकाराम महाराज मंदिरामुळेच येथील चौकाचे 'संत तुकाराम महाराज चौक' असे नामकरण करण्यात आल्याचे विष्णुपंत मोरे यांनी सांगितले.[१६८]

३.१.८ शहरातील लोकदैवते

प्रस्थापित प्रमुख धर्मांशी संबंध नसलेली पण विशिष्ट लोक समुहाने श्रध्देने आपली मानलेली दैवते म्हणजेच लोकदैवत होत. निरनिराळ्या लोक समुहांची निरनिराळी दैवते असतात. हे लोकसमुह प्रस्थापित प्रमुख धर्मांपैकी एखाद्या धर्माचे अनुयायी असू शकतात पण वेगवेगळ्या कारणांमुळे त्या धर्माच्या छत्राखालील विविध लोकसमुहात त्यांची वेगवेगळी लोकदैवते निर्माण झालेली असतात. ग्रामीण भागात नागरिकणाचे व औद्योगिकरणाचे संस्कार मनावर न झालेले अशा लोक समुहात जी लोकदैवते आकाराला येतात ती हळुहळू त्या लोक समुहापुरती प्रस्थापित आणि प्रतिष्ठित होतात. त्यानंतर त्या लोकसमुहावर किंवा त्या समुहांपैकी काही व्यक्तींवर काळाच्या ओघात नागरी संस्कार झाले तरी त्याने पूर्वापार घडविलेल्या आणि पूजिलेल्या लोकदैवतांबद्दल त्याला वाटणारी श्रध्दा आणि आदर नष्ट होत नाही. परंपरेने त्या देवता त्याच्या जीवन जाणिवांत खोलवर रूजतात.

ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे जीवन शेतीशी संबंधित असल्याने त्यातूनच भावनिक गरजानुसार लोकदैवते आकाराला येतात. विविध ठिकाणचा निसर्ग आणि तेथील हवामान यामध्ये फरक असल्याने त्या त्या ठिकाणचे लोक आपापल्या वसतिस्थानाला अनुरूप अशी पवित्र स्थाने, दैवते निर्माण करतात. निर्झर, गुहा, पर्वत, शिखरे, नदीचे काठ, काही विशिष्ट झाडे यांना देवत्त्व देऊन त्याची आराधना केली जाते. निसर्ग रूपाशिवाय काही अव्यक्त, अमुर्त शक्ती अनुकूल वा

प्रतिकुल कार्य करतात ह्या श्रध्देतूनही त्या शक्तींचे दैवतीकरण होते. लहान मुलांना होणारे रोग किंवा आकस्मिक आजार यांचा वैज्ञानिक कार्यकारण संबंध माहित नसताना उपर्युक्त, अव्यक्त, अमूर्त शक्तींच हे आजार आणतात या समजूतीतूनच त्या शक्ती उग्रदेवता म्हणून जनमाणसात आकार घेतात. कित्येक निसर्गवस्तूंना लोकदेवतांचे स्थान मिळालेले असले तरी त्यांचेच प्रतिकात्मक मुर्तीकरण होऊन त्यांना मानवी रूपही दिले जाते. माणसांचे दैवतीकरण करणे आणि देवतांना मनुष्यरूप देणे ही मानवामधील प्रवृत्तीच लोकदेवतांना मनुष्यरूप देते. निरनिराळ्या गावांच्या संरक्षक देवता त्या ग्रामदेवता म्हणून ओळखल्या जातात ती दैवते ही लोकदैवत होत.[१६९]

जाखाई, जोखाई, मरिआई, तुकाई, खोकलाई, सटवाई, पोशम्मा, यल्लम्मा, मातंगी इत्यादी स्त्री देवतांबरोबरच वेताळ, भैरवनाथ, खळनाथ, म्हसोबा इत्यादी पुरूष देवतांचाही समावेश लोकदेवतांमध्ये होतो. या देवतांचे पुजारी हे गुरव, वाघे, महार, मांग, कुणबी आहेत. या देवतांच्या उपासनेमुळे त्या संतुष्ट होऊन रोग व संकटे निवारण करतात, अशी समजूत असल्याने यांच्या वार्षिक जत्रेत पशुबळी दिला जातो. ताडी, माडी, भांग, गांजा, तंबाखु, रक्ताने कालविलेला भात हे या देवतांचे आवडते पूजाचार असतात.[१७०]

- **खंडोबा मंदिर (बाळे)**

मणी आणि मल्ल या दोन दैत्यांचा संहार करण्यासाठी शिवाने मल्हारी खंडोबाचा अवतार धारण केला, अशी कथा 'मल्हारी महात्म्य' या ग्रंथात सापडते. त्याचे सैन सात कोटी होते, 'सात' संख्येला कानडीत 'येळ' म्हणतात. खंडोबा हा देव मुळचा कर्नाटकातील असल्याने त्याच्या सात कोटी सैन्याचा जयजयकार 'येळकोट' या कानडी शब्दाने केला जातो. शिव-शक्तीचा थोरला मुलगा स्कंद कार्तिकेय म्हणजेच महाराष्ट्राचा कुलदैवत 'खंडोबा' होय. जुन्या काळी स्कंदचा उत्सव ज्या दिवशी होत असे त्या दिवसाला मार्गशिर्ष शुक्ल षष्ठी म्हणतात. त्याच दिवशी खंडोबाचा उत्सव होतो तोच आज आपण चंपाषष्ठी या नावाने ओळखतो. स्कंदाला दक्षिणेत देवसना आणि वल्ली या दोन बायका होत्या तसेच खंडोबालाही म्हाळसा आणि बाणाई या दोन बायका होत्या.[१७१] जेजुरीचा खंडोबा हा मुळ ग्रामदेवता होता तो मुळ द्रविड आदिवासींचा देव पण आज तो सर्व जाती-धर्मांचा कुलदैवत म्हणून नैवद्याचा मानकरी ठरला.

महाराष्ट्रात खंडोबा या देवतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. खंडोबा या देवतेला ब्राह्मणांपासून अस्पृश्यांपर्यंत सर्व जातींकडून कुलदेवतेचा मान मिळालेला आहे. एवढेच नव्हे तर

मुस्लिम समाजातही या देवतेला मानणारे भक्त आहेत. सोलापूर परिसरातील बाळे याठिकाणी असलेले हे खंडोबा देवस्थान प्रसिध्द असून या खंडोबाचे स्थान ६०० वर्षापूर्वीचे जुने असल्याचे सांगितले जाते. हे देवालय मोठे व भव्य असून ते गावाच्या एका टेकडीवर आहे. पूर्वी या देवालयाच्या जागेवर पाटलाचा वाडा होता या पाटील घराण्यातील एका भक्ताने नळदूर्गहून खंडोबा देवतेची मूर्ती आणून या ठिकाणी स्थापन केली. काही जण ही स्वयंभू असल्याविषयीची दंतकथा ही सांगतात.[१७२]

या मंदिराचे प्रवेशद्वार भव्य स्वरूपाचे असून प्रवेशद्वारावर 'जय मल्हार' ही खंडोबाच्या जयघोषाची अक्षरे लिहिली आहेत. सभामंडप प्रशस्त असून याचे बांधकाम इ. स. १९२१ मध्ये लक्ष्मण नरसिंह नाईक यांनी करून दिले आहे. सभामंडपासमोरील पटांगणात दोन मोठे दिपस्तंभ तसेच गजानन व बजरंगबली यांची छोटी मंदिरे आहेत. छोटे पण टूमदार शिखर असलेल्या या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडामध्ये केलेले असून ते भक्कम आहे. मंदिरात दररोज भूपाळ्या, काकडारती, स्तुती, पंचारती, आरत्या, भजन, शेजारती व खंडोबाचा जयजयकार इत्यादी विधी होतात.[१७३]

मार्गशिर्ष शुध्द प्रतिपदेपासून पाच दिवस खंडोबाचे नवरात्र सुरू होते व हे नवरात्र चंपाषष्ठीला संपते. चंपाषष्ठीच्या दिवशी भगवान शंकराने मार्तंड भैरवाचा अवतार घेऊन मणी व मल्ल या दोन दैत्यांचा संहार केला म्हणून मार्गशिर्ष महिन्यातील या दिवसाला खंडोबा देवतेच्या नवरात्रात महत्त्वाचे स्थान आहे.[१७४] या दिवशी खंडोबाला भरीत, रोडगा, कांद्याची पात व लसूण याचा नैवद्य दाखविला जातो. चंपाषष्ठीपासून पुढे महिनाभर प्रति रविवारी खंडोबाची जत्रा भरते या जत्रेला महत्त्व असून या काळात खंडोबा मंदिरात वाघ्या-मुरळींचा जागरण-गोंधळ, वारू नाचवणे, लंगर तोडणे, खड.ग पूजन इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतात. मंदिरात सुमारे ४०० वर्षांपूर्वीची ३५ किलो वजनाची तलवार असून ती पंचधातूची आहे. उत्सव काळात पुजनासाठी ती बाहेर काढली जाते. जेजुरी गडावर ४० किलोचा खडग आहे हुबेहूब त्यासारखीच दिसणारी ही तलवार आहे.[१७५]

डिसेंबर २०१३ साली झालेल्या खंडोबा यात्रेच्या वेळी पहिल्यांदाच खंडोबा मंदिरावर यात्रा काळात विमानातून पुष्पवृष्टी करण्यात आली होती. हे दृश्य पाहण्यासाठी मंदिर परिसरात भक्तांनी गर्दी केली होती. सोना माणिक प्रतिष्ठान, खंडोबा अन्नछत्र मंडळ, नागेश करजगी युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही पुष्पवृष्टी करण्यात आली होती. या यात्रेत पालखीसोबत नंदीध्वजाची मिरवणुक काढली जाते. यात्रेशिवाय वर्षभर दर रविवारी भक्तांची मंदिरात गर्दी असते. मंदिराची

नित्यपूजेची व यात्रेची व्यवस्था पुजारी यशवंत ढेपे, चंद्रकांत पुजारी, हनुमंत पुजारी, विनय ढेपे, कलेश्वर पुजारी इत्यादी पाहतात. सोलापूर व परिसरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेले हे खंडोबा दैवत नवसाला पावणारे दैवत म्हणून प्रसिध्द आहे.[१७६]

- **खंडोबा मंदिर (साखर पेठ सोलापूर)**

बाळे येथील खंडोबा मंदिराशिवाय सोलापूर शहराच्या पूर्व भागात साखर पेठत एक खंडोबा मंदिर असून या मंदिरातील खंडोबा मूर्ती ही स्वयंभू असल्याचे मंदिराचे पुजारी शकुंतला अमोगसिध्द माळगे यांनी सांगितले. या मंदिराच्या स्थापनेबद्दल माहिती मिळत नाही. परंतु मंदिराचा सभामंडप आणि सभामंडपातील फरशी घालण्याचे काम दिनांक १ नोव्हेंबर १९४७ मध्ये श्री मल्लय्या नरसय्या गुर्रम यांनी करून दिल्याची माहिती सभामंडपातील फरशीमध्ये कोरलेली आहे.

मंदिराचे गर्भगृह छोटे पण शिखरयुक्त आहे. गर्भगृहात घोड्यावर बसलेली दैत्याला मारणारी खंडोबाची काळ्या पाषाणातील मूर्ती असून याठिकाणी खंडोबा मूर्ती सोबत पत्नी म्हाळसादेवीचीही काळ्या पाषाणातील मूर्ती आहे. मार्गशिर्ष महिन्यातील नवरात्र येथे केले जातात. तसेच चंपाषष्ठीपासून एक महिनाभर यात्रा भरते. यात्रेच्या शेवटच्या दिवशी छबिना मिरवणुक व लंगरही तोडला जातो.[१७७] खंडोबा मंदिराच्या समोर एक छोटे म्हसोबाचे मंदिर आहे. मंदिराच्या शेजारीच एक तळे होते ते आज अस्तित्त्वात नाही. हे तळे 'खंडोबा तळे' या नावाने ओळखले जात होते. तळ्याचा उपयोग शहरातील लोक कपडे व गुरे धुण्यासाठी करीत असल्याने यातील पाणी लोकांच्या आरोग्यास अपायकारक होते. त्यामुळे महानगरपालिकेकडून हे तळे बुजविण्यात आल्याची माहिती मिळते.[१७८]

- **म्हसोबा**

म्हसोबा किंवा म्हस्कोबा ही एक क्षुद्र देवता असून याची गणना ग्रामदेवतेत केली जाते. म्हसोबा हा शब्द महिषासुराचा अपभ्रंश असावा. याची मूर्ती असत नाही तर एखादा गोल किंवा उभट दगड घेऊन त्याला शेंदूर फासून एखाद्या जागी बसवला की तो म्हसोबा बनतो. महाराष्ट्रात प्रत्येक गावाच्या शिवेवर आणि शेताच्या बांधावर याचे स्थान असते. गावात रोगराई उत्पन्न झाली तर म्हसोबाला बकरी, कोंबडा, नारळ इत्यादी वस्तू अर्पण करतात.[१७९] म्हसोबाला भूतांचा अधिपती मानतात म्हणून त्याचे सामर्थ्य वेताळाइतकेच असते. शहरात अनेक ठिकाणी म्हसोबाची स्थापना

केल्याचे दिसून येते. चौकात एका कोपऱ्यात दगडाला शेंदूर फासलेला म्हसोबा पाहावयास मिळतो. मरिआई मंदिराच्या बाजूलाही म्हसोबाची स्थापना केली जाते. शहरातील लोक या देवतेला मरिआई सोबत आषाढ महिन्यात, प्रत्येक अमावस्या, मंगळवार व शुक्रवारी नैवद्य दाखवून पुजतात. पूर्व भागात साखर पेठेत एक म्हसोबा असून तो तेथील खंडोबा मंदिराच्या पूर्वीपासून असल्याची माहिती मिळते. तसेच दमाणी नगर येथील आप्पा सवाळकर बागेत आणि मरिआई चौकात मरिआई शेजारीही म्हसोबा असून याच्या स्थापनेबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. परंतु लक्ष्मी-विष्णु मिल आणि जाम मिलच्या स्थापनेपूर्वीपासून दोन्ही ठिकाणी म्हसोबा असल्याचे सांगितले जाते. याशिवाय भवानी पेठेत पोतराज समाजाने एक छोटेसे म्हसोबा मंदिर निर्माण केले आहे.

शहरापासून चौदा कि. मी. अंतरावर तिऱ्हे या गावात म्हसोबाचे मंदिर असून याठिकाणी असलेला म्हसोबा हा शेंदूर फासलेल्या उंच उभ्या दगडाचा असून तो दगड मध्ये वाकलेला असल्याने या म्हसोबास 'म्हातारा म्हसोबा' म्हणून ओळखले जाते. येथे मंदिर नसून याच्या बाजूने चौथरा बांधलेला आहे. या देवाची दरवर्षी वैशाख महिन्यात मोठी यात्रा भरते. त्यावेळी बकरे, कोंबडे यांचा बळी दिला जातो. हा नवसाला पावणारा देव म्हणून सोलापूर परिसरात प्रसिध्द आहे. सोलापूर शहरातील अनेक लोक या म्हसोबाला नवस बोलतात आणि तो पूर्ण झाल्यानंतर बकरे किंवा कोंबडे कापून त्याचा नैवद्य दाखवितात.[१८०]

- **वेताळ**

वेताळ हा एक शिवगण असून भूत प्रेत पिशांचाचा अधिपती मानतात, याच्याबद्दल संस्कृती कोषात कथा पाहावयास मिळतात. महाभारताच्या शल्यपर्वात याला शस्त्रधारी स्कंदानुचर म्हटले आहे. त्याच्या आईस वेताळ जननी स्कंदानुचरी मातृका म्हटले आहे. भागवत, मत्स्य पुराण, ब्रम्हांड पुराण इत्यादी ठिकाणी वेताळाचा उल्लेख शिवगण म्हणून येतो. वेताळाचे शरीर वर्णन आढळत नाही पण महाभारतात स्कंदानुचरांची शारीरिक वर्णने दिली आहेत. त्यानुसार काही अनुचरांना जनावरांची मुखे होती, काहींची तोंडे खांद्यावर, काहींची पोटावर तर काहींची कमरेवर, कांही महोदर, दिर्घ कर्ण, विकृत पायांचे, काहींच्या दाढा, विक्राळ व नेत्र पिंगट, काहींनी चामडे पांघरलेले होते. ब्रम्हांडानुसार वेताळ क्रूर नेत्रांचा व एक आयुत रूंद आहे. वेताळ सदैव युध्दोद्यत व शस्त्रधारी सैनिक असल्याने युध्दप्रसंगी त्याची उपस्थिती असल्याचे उल्लेख भागवत मत्स्य पुराणात आढळतात. मराठी संत

वाङ्मयातही वेताळ आणि त्याचे अनुचर युध्दप्रसंगी आढळतात. वेताळाला आग्या वेताळ, ज्वाला वेताळ किंवा प्रलय वेताळ असेही म्हणतात. शिवाने वेताळा पिशाच्याच्याचे अधिपत्य दिले. कामनापूर्तीसाठी वेताळाला नवस बोलला तर तो नवसाला पावतो अशी लोकांची श्रध्दा आहे. वेताळ ही देवता फार प्राचीन असल्याने त्याची मंदिरे भारतभर पाहावयास मिळतात. महाराष्ट्र गोमंतक कर्नाटक इत्यादी ठिकाणी वेताळाची मंदिरे आहेत.[१८१]

सोलापूर शहरात डफरीन चौकात, डफरीन हॉस्पिटलच्या समोर आतील बाजूस वेताळाचे मंदिर आहे. हे मंदिर 'भूताळसिध्द', 'वेताळसिध्द' या नावाने शहरात प्रसिध्द आहे. शहरातील वेताळाचे एकमेव मंदिर असून या मंदिराचा परिसर एक एकर आहे. याच परिसरात वेताळाबरोबरच अमोगसिध्द आणि महासिध्दाचेही मंदिर आहे. एका मोठ्या चौथऱ्यावर काळ्या पाषाणाची साडे चार फुट उंच वेताळसिध्दाची मूर्ती बसविलेली असून शेंदूर फासलेल्या या मूर्तीच्या गळ्यात रूद्राक्ष, हातात कडे, दंडा व रूद्राक्ष अशी आयुधे आहेत. भारतीय संस्कृती कोषात वेताळाची मूर्ती या काष्ठाच्या किंवा पाषाणाच्या सांगितल्या आहेत. या मूर्तीच्या हातात त्रिशूल किंवा दंडा असतो.

छायाचित्र क्र. ११



वेताळ देवस्थान
(सौजन्य: जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

या वेताळाच्या समोरच अमोगसिध्द आणि महासिध्दाचे मंदिर आहे. अमोगसिध्दाच्या मंदिरात चौकोनी काळ्या पाषाणावर मूर्ती कोरलेली असून त्यावर उत्सवप्रसंगी पितळी मुखवटा

चढविला जातो. तसेच महासिध्द मंदिरात एकाच मोठ्या काळ्या पाषाणात महासिध्द व त्याची पत्नी गौराबाईची मूर्ती असून या मूर्तीलाही उत्सवप्रसंगी पितळी मुखवटा चढविला जातो. या मंदिरासमोर काळ्या पाषाणातील नंदी असून त्याच्या कपाळावर विभूती कोरलेली आहे. या मंदिरासमोर एक दगडी दिपमाळ असून उत्सवकाळात या दिपमाळेवर दिवे लावले जातात. वेताळ, अमोगसिध्द व महासिध्द या तिनही देवतांचा उत्सव परंपरेने गणेश चतुर्थी हरतालिका उपवासाच्या दिवशी केला जातो. या दिवशी पालखी उत्सव होऊन भक्तांना महाप्रसाद दिला जातो. या मंदिर परिसरात एक नागोबाचे मंदिरही पाहावयास मिळते. या मंदिराची स्थापना सिध्देश्वर मंदिराच्या पूर्वी झाल्याचे मंदिराचे पुजारी व वहीवाटदार संतोष महादेव पुजारी सांगतात. आज या मंदिरास त्यांची आठवी पिढी सेवा देत आहे. शहरातील वेताळाचे हे एकमेव मंदिर आहे. वेताळ या शब्दाचा कन्नड अर्थ 'महाभूत' पिशाच्च, द्वारपाल असा सांगितला आहे. 'वेताळ' हा भूतांचा नायक असल्याने कोणत्याही भूताचा कसल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून अनेक जण त्याची पूजा करतात.[१८२]

३.१.९ मातृदेवता मंदिरे

लोकदेवतांपैकी मातृदेवता ह्या कुलस्वामिनी म्हणून मान्यता पावलेल्या आहेत. त्यांचे अनघड तांदळ्या 'स्वयंभूमुर्ती' म्हणून जनमाणसात स्थिर झालेल्या असल्याने त्यांच्या उपासना पिढ्यान-पिढ्या चालू आहेत. जनसमुहाचे स्थलांतर झाल्यानंतर मूळ कुलदेवतेची ठाणी स्थलांतरित भूप्रदेशात नव्याने निर्माण केली जातात.[१८३] मातृदेवता ही मानवी संस्कृतीच्या इतिहासातील आद्यशक्ती आहे. तिला मानवाने विविध रूपात पाहिले, विविध नावांनी संबोधले आणि विविध प्रकारात पुजिले. ऋग्वेदातील आदितीपासून ते आजही दारी येणाऱ्या गोंधळ्या भूत्यांच्या गीतातील भवानी - रेणुकेपर्यंत शक्तीचे मोठेपण ऐकायला मिळते. सिंधु संस्कृतीपासून आजही मातृदेवतांच्या उपासनेचे सातत्य आढळते.[१८४]

मातृदेवतेचा क्रोध भयावह असतो, अशी लोकांची श्रध्दा आहे. त्यातून मातृदेवतेची पूजा होऊ लागली. देवी, उपासमारी, महामारी, पटकी, गोवर, कांजण्या, नायटा, खरूज यासारखे रोग मातृदेवतेच्या क्रोधामुळे उत्पन्न होतात अशी लोकांची धारणा असते. या मातृदेवतांचे उत्सव वर्षातून एकदा असतात. याप्रसंगी या देवतांना प्रसन्न करण्यासाठी गोड नैवद्याबरोबरच कोंबडे, बकरे, रेडा इत्यादींचा बळी देण्याची प्रथा परंपरेने चालत आलेली आहे.

दुर्गा भागवत यांनी भूदेवता आणि जलदेवता या दोन प्रकारच्या रोगनिवारक देवता सांगितल्या आहेत.[१८५] धरतीमाता आणि तिच्याशी संबंधित साऱ्या देवता या भूदेवता होय. एकविस भूदेवता पैकी सात बहिणींची प्रतिष्ठा सर्वात मोठी आहे, त्या रोगकारिणी देवता म्हणून प्रसिध्द आहेत. वऱ्हाडात सात आसरा प्रसिध्द असून त्या पाण्याशी संबंध असणारे रोग उत्पन्न करतात, असा समज आहे. ते रोग म्हणजे मुत्ररोग, गर्भाशयाचे रोग, जलोदर, छातीचे रोग, संधीवात, ताप, डोळे येणे, पू होणे, संग्रहणी व देवी इत्यादी होत. महाराष्ट्रात कोकणपट्टीपासून ठाणे जिल्ह्यापर्यंत प्रसिध्द असणाऱ्या बायकांच्या गाण्यांमध्ये 'देवीचे फोड' म्हणजे या सात बहिणींची मोत्याची लेणी असा उल्लेख आहे. सोलापूर, सातारा, नाशिक परिसरात कुणबी, वंजारी, महार, मांग इत्यादी लोकांत या सात बहिणी समुद्रकाठच्या राहणाऱ्या असून त्या देशावर फिरायला जातात असा समज आहे. सोलापूर शहरात असणाऱ्या मातृदेवता मंदिरामध्ये शितलादेवी आणि हिंगुलांबिका देवी मंदिरांचा समावेश आहे. कर्नाटक, तेलंगण व तामिळनाडू या प्रांतात सात बहिणींचे महात्म्य आहे. या बहिणी तामसी, रक्तलोलुप व रोगांच्या अधिष्ठाता देवता आहेत.[१८६]

सोलापूर शहराची ग्रामदेवता रूपाभवानी मातेच्या मंदिराबरोबरच शहरात राहणाऱ्या वेगवेगळ्या लोक समुहाच्या वेगवेगळ्या लोकदेवतांची मंदिरे अस्तित्त्वात आहेत. त्यामध्ये भावसार समाजाची हिंगुलांबिका, तोगटवीर समाजाची चौडेश्वरी, निलगार समाजाची कालिका देवी इत्यादी मातृदेवता मंदिराबरोबर काही रोगनिवारक देवतांची मंदिरे शहरात पाहावयास मिळतात. त्यामध्ये मरिआई, पोशम्मा, खोकलाई, शितलादेवी, लक्ष्मी इत्यादींचा समावेश होतो.

- **श्री रूपाभवानी माता मंदिर**

श्रीतुळजाभवानी माता ही आदिशक्ती, आदिमाया भवानी जगदंबेचे रूप आहे. दुर्गम असूराच्या संकट निवारणासाठी हे रूप जगदंबेला धारण करावे लागले. देवी भवानी जगदंबेचा संचार अनेक ठिकाणी आहे. वेगवेगळ्या ठिकाणी देवीची विविध रूपे व विविध नांवे आहेत. ही सर्व ठिकाणे सोलापूर शहरापासून सुमारे चाळीस ते पन्नास किलोमिटर अंतरावर आहेत, ती ठिकाणे करमाळा - कमलादेवी, माढा - माढेश्वरी, जगदंबा देवी, मार्डी - यमाई देवी आणि सोलापूर - रूपाभवानी अशी आहेत.[१८७] तुळजापूरच्या तुळजाभवानीचे प्रतिरूप आणि सोलापूरचे आराध्यदैवत व ग्रामदेवी म्हणून रूपाभवानी देवीची ख्याती आहे.[१८८] शहराच्या उत्तरेकडील बाजूस तुळजापूर रस्त्यावर, तुळजापूर

वेशीशेजारी पाणी गिरणीजवळ श्रीरूपाभवानी देवीचे मंदिर आहे. दिडशे वर्षांपूर्वी हा भाग पूर्णपणे गावाच्या बाहेर होता. या परिसरात केवळ शेती होती, त्यावेळी या परिसरात रूपा भवानीचे छोटेसे मंदिर होते. सुमारे सतराव्या शतकात या मंदिराची स्थापना करण्यात आली असावी, अशी माहिती मिळते.[१८९]

छायाचित्र क्र. १२



श्री रूपाभवानी मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

श्रीरूपाभवानी मातेचे रूप तुळजाभवानीशी मिळते-जुळते असल्याने या देवीला रूपाभवानी व अंबाबाई या नावानेही ओळखले जाते.[१९०] सुरूवातीला अगदी छोट्या जागेत असलेले देवीचे मंदिर आज दिड एकर परिसरात पहावयास मिळते. या मंदिराचा पायाभरणी समारंभ मार्गशिर्ष शुक्ल ३, शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर १९६८ रोजी श्री. श. ब्र. तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी बृहन्मठ होटगी यांच्या हस्ते करण्यात आला.[१९१]

सभामंडप, अंतराळ, गर्भगृह, शिखर व महाद्वार असणारे हे मंदिर पूर्वाभिमुख असून महाद्वारावर पाना-फुलांची सुंदर नक्षी कोरलेली आहे. सभामंडपात असणारी ३ फुट उंचीची संगमरवरी दगडाची सिंहमूर्ती सोलापूर शहरातील चुरमुऱ्याचे व्यापारी व भोईराज समाजाचे कार्यकर्ते सुगनलाल उत्तमराव कांबळे यांनी आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ सन १९७४ मध्ये रूपाभवानी मंदिरास भेट दिली.[१९२]

पन्नास वर्षांपूर्वी व्यंकप्पा वडजे आणि त्यांच्या सहकार्यांनी वर्गणी गोळा करून, मोहोळ येथून मागविण्यात आलेल्या काळ्या दगडातून मंदिराचा जीर्णोध्दार केला. त्यानंतर सोलापूरचे माजी महापौर तात्यासाहेब भिमाशंकर घोंगडे यांनी सन १९७५ मध्ये स्वखर्चातून सभामंडप बांधून दिला. सन १९९७ साली महापालिकेच्या वतीने तत्कालीन स्थायी समितीच्या सभापती प्रभावती मसरे यांच्या प्रयत्नातून मंदिरास भव्य प्रवेशद्वार बांधण्यात आले.[१९३] १ आक्टोंबर १९९८ रोजी कळसारोहणाचा कार्यक्रम झाला. गर्भगृहात काळ्या पाषाणातील श्रीरूपाभवानी मातेची अडीच फुट उंच मूर्ती असून ती चतूर्भूज आहे. मूर्तीस मुखवटा बसवून साजशृंगार केला जातो. सन १९७४ मध्ये दैनिक सोलापूर समाचारच्या संपादकांनी देवीच्या मुखवट्यासंबंधी निवेदन केले होते की, मंगळवार, शुक्रवार, अष्टमी व पोर्णिमा या काळात रूपाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविक गर्दी करतात. त्यामुळे या काळात देवीला नवीन मुखवटा ठेवावा कारण जुना मुखवटा फारच झिजलेला आहे. नवीन मुखवटा हा छत्रीसह असल्याने तो फारच सुबक आहे.[१९४]

गर्भगृह व मंदिराचा काही परिसर हेमाडपंथी प्रकारातील आहे. मंदिर परिसरात विविध देव-देवतांची छोटी-छोटी मंदिरे असून मंदिराच्या डाव्या बाजूला अवंतीमाता, मारूती, संकटाई तर उजव्या बाजूला शिवलिंग व गणपतीची काळ्या पाषाणातील मूर्ती आहे. होमहवन करण्यासाठी मंदिराच्या समोर एक होमकुंड असून या होमकुंडाच्या बाजूला एक दिपमाळ आहे. दिपमाळेच्या शेजारी श्रीतुळजाभवानी मातेच्या काळ्या पाषाणात कोरलेल्या पादुका आहेत. मंदिराच्या शिखरावर विविध देव-देवतांच्या प्रतिमा व देवीची विविध रूपे यांची शिल्पे कोरलेली असून शिखरावर सोन्याचा कलश आहे. मंदिराच्या शेजारीच 'कल्लोळ' आहे.[१९५]

नित्यपूजा व वार्षिकोत्सव

श्रीरूपाभवानी मातेच्या नित्यपूजा विधीमध्ये दररोज सकाळी चरणतीर्थ आरतीने मंदिर भक्तांसाठी खुले केले जाते. सकाळी ११ ते दुपारी १ च्या दरम्यान महापुजा, रात्री ९ वाजता शेजारती होऊन मंदिर बंद केले जाते. दर मंगळवारी व पोर्णिमेला वरील प्रमाणेच पूजा व आरती होऊन रात्री देवीच्या छबिना निघतो. या छबिन्यावेळी पूर्वजांनी बनविलेली देवीची मूर्ती पालखीत ठेवून मंदिर प्रदक्षिणा घातली जाते.[१९६] प्रतिवर्षी अश्विन शुध्द प्रतिपदेस घटस्थापना होऊन नवरात्र महोत्सव सुरू होतो. अश्विन शुक्ल अष्टमी या दिवशी होमहवन होते. पूर्वी रूपाभवानी मातेसमोर बलिहार अर्पण करीत परंतु हल्ली ही प्रथा बंद झाली आहे.

नवरात्रात या मंदिरात मसरे आणि पवार कुटुंबातर्फे विविध धार्मिक विधी केले जातात. पहाटे ४ वाजता चरणतीर्थ आरती व सकाळी ६.३० वाजता महापूजेनंतर घटस्थापना केली जाते. तसेच रथअलंकार, ललितपंचमी, मुरलीअलंकार, शेषशाहीअलंकार, भवानीतलवार, दर्गाष्टमीपूजा, महिषासुरमर्दिनी अलंकारपूजा, महानवमीपूजा अशा विविध प्रकारच्या पूजा करण्यात येतात.[१९७] नवरात्रोत्सवात दररोज छबिना मिरवणुक काढण्यात येतो. या छबिन्यात घोडा, हत्ती, गरूड आणि सिंह या वाहनांचा वापर होतो. अष्टमीला गरूड वाहन व पोर्णिमेस सिंह वाहनाचा मान असतो. घटस्थापनेच्या दिवशी देवीच्या दर्शनासाठी सोलापूर शहर व जिल्ह्यासह महाराष्ट्र तसेच कर्नाटकमधून हजारो भाविक व देवीमंडळे ज्योत घेऊन मातेच्या दर्शनासाठी येतात. घटस्थापनेच्याआदल्या रात्री १२ वाजता निघणारी ही विविध मंडळे घटस्थापनेच्या दिवशी देवीचे दर्शन घेतात आणि त्यानंतर आपापल्या गावी जावून घटस्थापना करतात. नवमीलाही काही मंडळे हाती मशाल घेऊन अनवाणी पायाने दर्शनासाठी येतात. या विविध मंडळामध्ये शहर व जिल्ह्यासह कर्नाटकातील मंडळाचाही समावेश असतो. यात्रा काळात रात्री १२ वाजेपर्यंत मंदिर दर्शनासाठी खुले असते. यावेळी मंदिर परिसरात रस्त्याच्या दुतर्फा विविध दुकाने थाटलेली असतात. त्यामुळे शहराची आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणावर होते. सन १९५२ साली रामण्णा मसरे यांच्याअध्यक्षतेखाली रूपाभवानी ट्रस्ट स्थापन करण्यात आले. सन १९८८ साली श्रीरूपाभवानी देवस्थान भक्त व तरूण मंडळाची स्थापना करण्यात आली. सध्या पुजारी म्हणून पवार यांच्या तिसऱ्या पिढीचे बंडु पवार हे सेवा करीत आहेत.

दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन मिरवणुकीवेळी प्रथेनुसार 'आई राजा उदो उदो' च्या जयघोषात श्रीरूपाभवानी देवीची पालखी मिरवणुक मंदिरापासून पार्क मैदानाजवळ असलेल्या शमी वृक्षापर्यंत काढण्यात येते. श्रीरूपाभवानी माता मंदिरात 'श्रीदेवीची निद्रावस्था' ही पध्दत नसल्याने सीमोल्लंघनानंतर पोर्णिमेपर्यंत नेहमीप्रमाणे पूजापाठ होतात. पोर्णिमेला सायंकाळी मंदिराभोवती छबिना मिरवणुक निघते. यात गोंधळी, वाजंत्री, आराधी व भाविक मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. प्रदक्षिणा संपल्यावर शेजारती होऊन मंदिर बंद करून नवरात्रोत्सवाची सांगता होते. कोजागिरी पोर्णिमेला शहरातील तरूण मंडळातर्फे मोठ्या प्रमाणात भाविकांना प्रसाद वाटप केले जाते.[१९८] श्रीरूपाभवानी देवी ही नवसाला पावते, असा लोकांचा समज आहे. त्यामुळे अनेक भक्त देवीला नवस बोलतात हा नवस फेडण्यासाठी देवीला नारळाची ओटी, साडी, चोळी व चांदीचे नाक, डोळे, कान अशा जुजबी वस्तु अर्पण करतात.

छायाचित्र क्र. १३



श्री रूपाभवानी मंदिरासमोरील दिपमाळेवरती अर्पण केलेल्या वस्तू
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

सन १९६५ साली श्रीरूपाभवानी देवी पंचांच्या परवानगीने सोलापूरातील राधाबाई बाळ आराधीन व मंजूबाई हक्के या दोघी आराध्यांनी पाऊस पडावा म्हणून रूपाभवानी मंदिरात अनुष्ठान केले होते. अठरा मानकरी आराध्यांनी अनुष्ठानासाठी या दोघींची निवड केली होती.[१९९]

- **श्रीहिंगुलांबिका (हिंगलाज माता) देवी मंदिर (गणेश पेठ)**

हिंगलाजनीची कथा रेवा संस्थानातील असून ती सात बहिणींपैकी सर्वात लहान व सर्वात सुंदर होती. पिरी देशाई ही सर्वात वडील तिचे लग्न मधोगडच्या मुर्रादेवाशी झाले. मुर्रादेवाचे मन हिंगलाजनीच्या रूपाने बेहोश झाले व त्याने तिच्याबोबर संभोग केला. हे कळताच पिरी देशाई संतप्त झाली आणि तिने परशु घेऊन मुर्रादेवाच्या सर्व सैनिकांची मुंडकी छाटली. नंतर या सर्व बहिणी जगभर हिंडून रोगराई पसरवू लागल्या त्यांच्यापासून रोगाच्या एकविस बहिणींची उत्पत्ती पिरीने केली आणि त्या देवतांना तिने जगभर हिंडायला सांगितले. हिंगलाज ही धरित्री देवता असून तिची पूजा सिंध व मुंबई प्रांतात आढळते [२००]

शहरातील गणेश पेठेत भावसार क्षत्रिय समाजाची कुलस्वामिनी 'श्रीहिंगुलांबिका देवी' चे मंदिर व्हावे म्हणून बापुराव दुधनकर, मारूती क्षिरसागर, विठोबा क्षिरसागर इत्यादी पंचमंडळींनी

पुढाकार घेतला होता. भावसार लोक दक्षिण गुजरात व महाराष्ट्रात आढळतात. मराठा भावसार हे मुळचे अहमदनगर भागातील आहेत. बनछोड, लाळे, लोखंडे, मोडगरे, पारपती अशी आडनावे आहेत. हे लोक मराठी भाषा बोलतात, लुगड्यावर खडी काढणे, चिटे छापणे, कपडे रंगविणे, गावोगावी जाऊन कापड विणणे व शिवणे असे धंदे करतात. छिपा, शिंपा, रंगारी, दर्जी अशी नावे या धंद्यावरून पडली आहेत. याशिवाय मेवा-मिठाई करणे व भांडी विकण्याचा धंदाही ते करतात. हिंगलाज, बालाजी, अंबाजी या यांच्या उपास्य देवता आहेत.[२०१]

छायाचित्र क्र. १४



हिंगुलांबिका देवी मुर्ती
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

हिंगुलांबिकादेवीची प्रतिष्ठापना मिती अश्विन वद्य पंचमी, शके १८२२ रोजी करण्यात आली. देवीची ही मूर्ती पंढरपूर येथून आणलेली आहे. सुंदर मनोहर आणि लावण्यशक्ती किरीट कुंडले, नाकी नथ झळकती शस्त्रास्त्र धरिता माता विक्राळ दिसती ।। असे हिंबुलांबिका देवीचे वर्णन केले जाते. गर्भगृहात काळ्या पाषाणातील विविध अलंकारांनी नटलेली 'श्रीहिंगुलांबिकादेवी' ची मूर्ती असून तिचे प्रभावळ चांदीचे आहे. अष्टभूजा देवीची ही मूर्ती वरदहस्त मुद्रेतील सिंहावर बसलेली महिषासुर मर्दिनी आहे. तिच्या हातात शंख, चक्र, गदा, पद्म, खडग, त्रिशूळ, तलवार अशी आयुधे

आहेत. जगदंबा हेच हिंबुलांबिका देवीचे रूप आहे.[२०२] पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराचे बांधकाम पल्लवशैलीतील असून उत्तरेस व दक्षिणेस दोन प्रवेशद्वारे आहेत. ही प्रवेशद्वारे नवरात्रात उघडली जातात. मुख्यमंडप, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा पदविन्यास असून मंदिराची एकूण जागा पाच हजार चौरस फुट आहे. मुख्यमंडपातून देवीचे दर्शन होते. ४० x ६० च्या सभामंडपात काळ्या पाषाणातील सिंहाची मूर्ती असून अंतराळात भाविकांना दर्शनासाठी रांगा करता याव्यात अशी रचना केली आहे.

नित्यपुजाव उत्सव

मंदिर पहाटे ५ वाजता उघडले जाते. 'श्रीं' स अभिषेक व नित्योपचार करून पहाटे ६ वाजता पहिली आरती व 'श्रीं' स नैवद्य होतो. नैवद्यामध्ये केशरभात, घुगऱ्या (हरभरा), दही-भात, शिरा इत्यादींचा समावेश असतो. मंगळवार व शुक्रवार हे देवीचे मुख्य वार असल्याने यादिवशी विशेष अलंकार पूजा असते व दररोज कुंकूम अर्चना होते. दिवसातून तीन वेळा देवीची आरती करुन प्रसादात भात दिला जातो.[२०३] अष्टमी, नवमी, पोर्णिमा तसेच शांकभरी, चैत्री व अश्विनी नवरात्र असे उत्सव साजरे केले जातात. सहस्त्रनाम महाकुंकूम अर्चना, नित्य अभिषेक करण्यात येतो. सहस्त्रनाम कुंकूम अर्चनेत सुमारे ४ ते ५ हजार महिलांचा सहभाग असतो. देवीला नऊ दिवस दुर्गा देवी, रेणुका देवी, कोल्हापूर महालक्ष्मी, सप्तश्रृंगीदेवी, कालिकादेवी, महिषासुर मर्दिनी अशा नऊ रूपात सजविण्यात येते. नित्य रात्री जागरण गोंधळाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. नृत्य, वेशभूषा, रांगोळी इत्यादी स्पर्धाचेही आयोजन नवरात्रात मंदिराच्या वतीने साजरे केले जाते.[२०४]

जीर्णोध्दार

सन १९९२ साली मंदिराचा जीर्णोध्दार करून समाजातील लोकांसाठी व देवस्थानच्या कार्यासाठी सांस्कृतिक भवन बांधण्यात आले. सांस्कृतिक भवन व मंदिर मिळून तेरा हजार चौरस फुट जागा मंदिर संस्थेची आहे. 'श्रीहिंगुलांबिकादेवी' ही भावसार समाजाची देवी असूनही विशेष करून शहरातील पद्मशाली समाजाची या देवीवर जास्त श्रध्दा आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून ओळखली जाते. नवस फेडण्यासाठी देवीला श्रीफळ व इतर फळे, चांदीचे डोळे, पाळणा, हात अशा जुजबी वस्तू अर्पण करतात तसेच भाविक देवीस देणग्या देऊन मानाच्या पूजा घेतात. सन १९६७-१९६८ साली देवीला पुजा-अर्चा करण्याचा मान खालील लोकांनी लिलावातून घेतला होता. होमाची

पूजा २०५ रूपयास सिद्राम शेषगिरी बेळमकर, देवीची महाओटी १५१ रू. रामचंद्र बासूतकर, ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त सिद्राम बेळमकर यांनी ५१ रूपयास होमाच्या पुजेचा मान व देवीची ओटी, शंकरराव दत्ता महिंद्रकर व गोरखनाथ महादेव क्षिरसागर यांनी ५५ व ४५ रूपयास आरती करण्याचा मान घेतला ५२५ रूपयास अभिषेकाचा मान लाळप्पा अच्चुगटला, नारायण सिध्दीगीर्ध्दीनी ६८१ रूपयास, मल्लप्पा रामय्या पल्ली यांनी ७०५ रूपयास तर अमावस्येच्या पुजेचा मान ५५१ रूपयास नागप्पा धायफुले यांनी घेतला. वस्त्र प्रावरणाचा लिलाव करून २८३ रूपये जमा झाले. अशा रितीने सन १९६७ साली हिंगुलांबिका देवीस देणग्या व मानाच्या पूजा घेतल्या होत्या.[२०५]

मूळस्थान

ज्याठिकाणी भावसार समाज त्याठिकाणी या देवीचे मंदिरे आहेत. हिंगलाज (मालेगाव), मुंबई, पुणे, बेंगलोर, कर्नाटकात हुबळी, धारवाड, विजापूर, गुलबर्गा इत्यादी ठिकाणी श्री. हिंगुलांबिका देवीची मंदिरे आहेत. हिंगुलांबिका देवीचे मूळस्थान सिंधू नदीच्या मुखापासून १२२ किलोमिटर पश्चिमेस व अरबी समुद्रापासून १८ किलोमिटर उत्तरेस पहाडातील अंधाऱ्या गुहेत आहे हिला 'हिंगुलाजमाता' असे संबोधण्यात येते. हे शक्तीपीठ ५१ शक्तीपीठांपैकी एक प्रमुख पीठ मानले जाते. पाकिस्तानातील कराचीत हिंदु-मुस्लिम या देवीचे भक्त आहेत. इतकेच नव्हे तर मंदिरातील पुजारी मुस्लिम समाजातील आहेत. दरवर्षी भरणाऱ्या या देवीच्या यात्रेस मुस्लिम भक्तगण 'नानीका हज' असे म्हणतात. यात्रा काळात देवीला लाल कापड, अत्तर आणि अगरबत्ती वाहतात.[२०६]

- **श्रीसरस्वती देवी मंदिर (सरस्वती चौक)**

महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात श्रीसरस्वती देवीची मंदिरे फारच कमी प्रमाणात आढळतात. सोलापूर शहरात ६५ वर्षापासून सरस्वती चौक, मुरारजी पेठ येथे 'श्रीसरस्वती देवीचे मंदिर' आहे. या मंदिरामुळेच शहरातील या चौकाला 'सरस्वती चौक' असे नाव मिळाले. शहरातील लोक हे धार्मिक वृत्तीचे असून त्यांच्या या धार्मिक वृत्तीमुळे शहरात विविध धर्मियांची प्रार्थना स्थळे व मंदिरे उभारण्यात आली आहेत.

शहरातील धार्मिक वृत्तीच्या महिला कौशल्याबाई जवाहिरलाल कलवार यांनी या सरस्वती मंदिराची स्थापना करुन २ डिसेंबर १९४७ रोजी या मंदिरात सरस्वती देवी मुर्तीची विधीपूर्वक स्थापना केली. कौशल्याबाईंनी आपल्या मातोश्री गंगुबाई सेवकराम परदेशी यांचा आदर्श

डोळ्यासमोर ठेवला होता. गंगुबाई यांनी सन १९२० मध्ये मेकॅनिकी चौकात स्वतःच्या मालकीच्या जागेत 'श्रीदत्तात्रयाच्यामुर्तीची' प्राणप्रतिष्ठापना करून एक मंदिरही उभे केले. आज हे मंदिर गंगुबाई परदेशी यांच्या धार्मिक वृत्तीची साक्ष देते.[२०७]

मंदिरासाठी लागणारी जागा त्यांच्या वडीलांनी त्यांना बक्षिस पत्र म्हणून दिली होती. श्रीसरस्वती देवीची मूर्ती जयपूर शहरात घडविली असून सुमारे चार फुट उंच व संगमरवरी पाषाणातील आकर्षक, सुबक व स्मितवदना अशी आहे. भक्तगण या देवीस हंसवाहिनी, मयूरवाहिनी, ब्रह्मकुमारी, वाग्देवी, भारती, विद्यादेवी इत्यादी नावाने संबोधतात. या देवीला भोगीपुजा, साडी, चोळी, ओटी व अभिषेक करतात. [२०८] सुलभा खानविलकर व भाविकांनी दिलेली देणगी मिळून सव्वा लाख रूपये सरस्वती मंदिराला मिळाले या देणगीतून १९९४ साली मंदिराच्या कळसाचे बांधकाम, सभामंडपातील फरशीकरण व रंगरंगोटी केली.

सरस्वती मंदिरात नित्यनैमित्तिक पूजा विधीबरोबरच नवरात्र महोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. घटस्थापनेच्या दिवशी मयुरवाहिनी, दुसऱ्या दिवशी बोणाधारी, तृतीयेस सिंहवाहिनी, चतुर्थीस हंसवाहिनी, पंचमीस श्रीलक्ष्मी, षष्ठीस शेषनारायणी, सप्तमी ब्रह्मनंदिनी, अष्टमी अष्टभूजा दुर्गावतार आणि नवमीस नवदुर्गा असे नऊ दिवस नऊ अवतारात देवीची पूजा करून दहाव्या दिवशी विजयादशमीस देवीची सवाद्य पालखी मिरवणुक काढली जाते व सीमोल्लंघनास पालखी नेली जाते. पहाटे काकड आरती, उपासना, प्रार्थना, सायंकाळचे भजन व रात्री शेजारती असा सलग नऊ दिवस कार्यक्रम चालू असतो. अष्टमीला विविध समिधा अर्पण करून होमहवन केले जाते.

अशा रितीने नवरात्रात विविध कार्यक्रम देवस्थानकडून साजरे होतात. संक्रांतीच्या काळात या मंदिरात सार्वजनिक तिळगुळ समारंभ केला जातो. सन १९५५ मध्ये श्री. घुगरदरे कुलकर्णी यांनी मंदिरात सार्वजनिक तिळगुळ समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी या कार्यक्रमास शहरातील अनेक मान्यवर मंडळी हजर होते.[२०९]

श्रीसरस्वती मंदिर हे कलवार कुटुंबियांच्या खाजगी मालकीचे असून आज कलवार कुटुंबियाची चौथी पिढी उषाकिरण आनंदनारायण कलवार सिमोरिया या मंदिराची देखभाल करीत

आहेत. साखरपुडा, लग्न, मुंज तसेच आपल्या शुभकार्याच्या प्रसंगी भक्त लोक देवीस अभिषेक पूजा करून साडी, चोळी आणि ओटी अर्पण करतात.[२१०]

- **श्रीबनशंकरी (चौडेश्वरी) देवी देवस्थान (साखर पेठ)**

सोलापूर शहरात असणाऱ्या मातृदेवता मंदिरांपैकी 'श्रीबनशंकरी (चौडेश्वरी) देवी' चे महत्त्वाचे मंदिर आहे. बनशंकरी देवी ही देवांगकोष्टी समाजाची ग्रामदेवता आहे. शहराच्या पूर्व भागात हा कोष्टी समाज राहतो. या समाजाचे लोक कर्नाटक राज्यातून येऊन येथे स्थायिक झालेले असून शहरात या कोष्टी समाजाची लोकसंख्या सुमारे एक लाख इतकी आहे. कोष्टी समाजाचे दुसरे महत्त्वाचे दैवत म्हणजे देवांगऋषी हे होय.

शहरातील अनेक जुन्या मंदिरांपैकी असलेल्या या मंदिराची स्थापना सुमारे २५० वर्षापूर्वी जगद्गुरू शंकराचार्यांच्या हस्ते झाली. साखर पेठेत असलेल्या या मंदिराचे काही बांधकाम हेमाडपंथी स्वरूपाचे आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराची मुख्यमंडप, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर अशी रचना आहे. सभामंडपात भिंतीवर विविध देव-देवतांची रंगीत चित्रे रेखाटलेली पाहावयास मिळतात. १० x १० च्या गर्भगृहात काळ्या पाषाणातील अडीच फुट उंचीची श्रीचौडेश्वरी देवीची मूर्ती असून ही कर्नाटक राज्यातील बागलकोट जिल्ह्यातील बदामी येथील श्रीबनशंकरी देवीची प्रतिकृती आहे. चांदीचे किरिटमुकूट धारण केलेली ही चौडेश्वरी देवी चतूर्भूज असून तिच्या उजव्या हातात त्रिशूळ व खड ग, डाव्या हातात नागडमरू व अक्षयपात्र आहे तर कानात कर्णकुंडले आणि पायात तोडे आहेत. सर्व अलंकारयुक्त अशा या चौडेश्वरी देवीच्या बाजूला काळ्या पाषाणातील चतूर्भूज गणपती व दुसऱ्या बाजूला शिवलिंग आहे.

मंदिराचे मुख्य आकर्षण म्हणजे शिखर असून ३० फुट उंच असलेल्या या शिखराचे चार टप्पे आहेत. कळसाकडून पहिला टप्पा नवग्रह, दुसऱ्या टप्प्यावर दशावतार, तिसरा टप्पा देवतांची विविध रूपे आणि चौथ्या टप्प्यात चौडेश्वरीदेवीची विविध रूपे कोरलेली आहेत. मंदिराचा सुवर्ण कलश हा विविध अलंकारांनी सजलेला असल्याने तो अतिशय मनमोहक व सुंदर दिसतो.[२११] चौडेश्वरी देवीच्या नित्यपूजा विधीबरोबर इतर धार्मिक उत्सवही साजरे केले जातात. त्यामध्ये माघशुध्द पोर्णिमा व नवरात्र (दसरा) हे महत्त्वाचे उत्सव आहेत. या दोन्ही उत्सवाच्या वेळी देवीची पालखी मिरवणुक व नंदीकोळ (काठ्या) यांची सवाद्य मिरवणुक निघते. नवरात्रात मंदिरात घटस्थापना करून

अश्विन शुा. प्रतिपदा ते अश्विन शुा. पोर्णिमेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पोर्णिमेस या देवीस 'शाकभाज्या' चा नैवद्य (६० प्रकारच्या भाज्या) दाखविला जातो. देवीच्या शरीरातून अकाल काळात शाकभाज्या म्हणजेच साठ भाज्या मिळाल्याने या देवीला शाकांभरी किंवा बनशंकरी देवी हे नांव मिळाले अशी अख्यायिका सांगितली जाते. बनशंकरी देवी ही शाकाहारी असल्याने या ठिकाणी बळी दिला जात नाही. उत्सवाप्रसंगी व विशेष पुजेप्रसंगी बनशंकरी देवीस पानाचे मकर तयार केले जाते. या चौडेश्वरी (बनशंकरी) देवीचे मूळ स्थान बदामी येथे असून या मंदिराच्या आजुबाजूला नारळ, केळी, पानाचे मळे असल्याने या देवीला बनशंकरी देवी हे नाव मिळाल्याचे पुजारी रायचूरकर सांगतात. या मंदिराचा सर्व कारभार श्रीबनशंकरी (चौडेश्वरी) देवी देवस्थान या ट्रस्टमार्फत चालविला जातो. सध्या अशोक गंगाधर यरगल हे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत तर मंदिराचे पुजारी म्हणून रामदास व्यंकप्पा रायचूरकर हे सेवा करीत आहेत. सध्या रायचूरकर कुटुंबाची ही तिसरी पिढी आहे.[२१२]

- **श्री चौडेश्वरी देवी मंदिर (वरप्रासादिक तोगटवीर क्षत्रिय समाज सोलापूर)**

तोगटवीर क्षत्रिय समाज आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू इत्यादी प्रांतात मोठ्या संख्येने वास्तव्यास आहे. मूळच्या हातमागावर वस्त्रे विणण्याचा व्यवसाय करणारा हा समाज सन १७५० ते सन १७८५ च्या दरम्यान आंध्रप्रदेशातून सोलापूरात स्थलांतरीत झाला. प्रामुख्याने उदगिरी, डक्का, चिला, पुजारी, ननगी, फलमारे, कोंतम, परूड, कंदी, हब्बा, चिंता, गट्टी, सोमनाथ, बडगंची, यरझल, पोला, मंचल, चारगुंडी, संकारप इत्यादी घराणे प्रथमतः सोलापूरात आले. त्याकाळी माधव पेठ (सध्याची पूर्व मंगळवार पेठ), गुरूवार पेठ, गणेश पेठ, साखर पेठ येथे तोगटवीरांची वस्ती होती. हातमागावर सुती साडी, धोतर, शेला, पागोटे इत्यादी वस्त्रे विणण्याच्या कलेवर आपली उपजीविका चालवित होते. या समाजाची मातृभाषा तेलगु आहे.

सोलापूरातील तोगटवीर क्षत्रिय समाज

१९४० सालापर्यंत सोलापूरात या समाजाच्या आठ फंडी होत्या, त्यामध्ये गंट्टीफंडी, चिल्लाळफंडी, नंगीफंडी, डक्काफंडी, पेद्दीफंडी, फलमारीफंडी, श्रीचौडेश्वरीफंडी, नलगेरीफंडी इत्यादी फंडीचा समावेश होतो. या समाजाने सन १९३१ साली श्रीचंडीका वरप्रासादिक तोगटवीर तरूण समाज मंडळाची स्थापना केली. सन १९४१ साली हे नांव बदलून श्रीचौडेश्वरी वरप्रासादिक

तोगटवीर क्षत्रिय समाज हे नांव दिले. शहरात हा समाज स्थिरस्थावर झाल्यानंतर या समाजाने चौडेश्वरी देवीचे मंदिर बांधण्यासाठी जोडभावी पेठेत १०,२०० चौरस फुट जागा समाज बांधवांच्या वर्गणीतून खरेदी केली.[२१३]

नंदवरम् हे चौडेश्वरी देवीचे मुख्य ठिकाण मानले जाते. चौडेश्वरी देवीला शास्त्रानुसार पुजेच्या वेळी काशीशांभवी असे म्हटले जाते. सोलापूरातील हा समाज 'श्रीक्षेत्र नंदवरम्' येथे देवीच्या ज्योती उत्सवात सहभागी होण्यासाठी जात असे. त्यामुळे समाजाच्या स्थापनेनंतर चौडेश्वरी देवस्थानच्या उभारणीसाठी या समाजातील अनेकांनी पुढाकार घेतला. सन १९३९ मध्ये सुरू झालेले देवालयाचे बांधकाम सन १९५४ मध्ये पूर्ण झाले. श्रीचौडेश्वरी देवीचे मूळस्थान हे कर्नाटकात नंदवरम् जिल्हा, कर्नूल तालुक्यातील लंगानपल्ली या गावी असून गुजरातमध्ये नवसारी, महाराष्ट्रात भिवंडी व सोलापूरात चौडेश्वरी देवीची मंदिरे आहेत.

या देवीचे मूळ स्वरूप उग्र आहे परंतु सोलापूरात असणाऱ्या देवीचे मुळ वैशिष्ट्य तशीच ठेवून रूप सौम्य बनविले आहे.[२१४] सौम्य स्वरूपातील श्रीचौडेश्वरी देवीची मूर्ती काशी येथील जंगमवाडीचे शिल्पकार श्री भोलानाथ मिस्त्री यांनी बनवून दिली. सन १९३९ मध्ये श्री क्षेत्र जगद्गुरू श्री शंकराचार्य यांच्या शुभहस्ते चौडेश्वरी देवीच्या मंदिराचे भूमी पुजन व पायाभरणी समारंभ पार पडला. मुख्यमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असा मंदिराचा पदविन्यास आहे. या मंदिराला पूर्व व पश्चिम अशी दोन महाद्वारे असून २५ x ६० लांबीच्या सभामंडपाला १४ खांब आहेत. सभामंडपाचे बांधकाम सन १९५४ साली श्री नामदेवप्पा हणमय्या उदगिरी यांनी आपल्या पित्याच्या स्मरणार्थ करून दिले. सभामंडप चारी बाजूंनी खुला असून मुख्य गाभाऱ्याच्या समोर संगमरवरी दगडातील सिंहाची मूर्ती आहे. मंदिराचे गर्भगृह हे २५ x १५ असून गर्भगृहात १७ किलो चांदीचा देव्हारा आहे. या देव्हाऱ्यासाठी हणमय्या यशवंतप्पा उदगिरी यांनी आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ ११ किलो चांदी दिली तर मल्लिकार्जून तुकाराम भगीरथ यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ ६ किलो चांदी दिला. गर्भगृहातील मुख्य मूर्ती ही श्रीचौडेश्वरी देवीची असून तिची प्रतिष्ठापना ५ ऑगस्ट १९५४ रोजी समाजाचे अध्यक्ष नरसप्पा तुकाराम चिंता यांच्या शुभहस्ते करण्यात आली.

प्रतिष्ठापनेचा हा सोहळा पाच दिवस चालू होता. पहिल्या दिवशी प्रासाद वास्तु व देवी स्थापनेच्या संकल्पाबरोबर नवचंडी विधानाचाही संकल्प करण्यात आला होता. दहा ब्राह्मणांनी

सप्तशती चंडीपाठ म्हटले, त्याबरोबर श्रीचामुंडेश्वरी देवीच्या तांब्याच्या धातूच्या पत्रावर कोरण्यात आलेल्या श्री यंत्रावर पूजा संस्कार करून त्या यंत्रावर निर्वाण मंत्र "ओम ऐं-हीं क्लीम चामुंडाये विच्छे" या मंत्राचा जप करण्यात आला. दहा ब्राह्मणांनी नवचंडीचे दहा पाठ व नवदुर्गाचे पाठ म्हटले. नंतर दुर्गा सप्तशतीच्या पाठाचे हवन करण्यात आले, या विधीस नवचंडी विधान असे म्हणतात. पाच दिवस चाललेला हा सोहळा पार पाडणारे श्री गोपाळशास्त्री उर्फ पंडीत श्रीधर जोशी यांना समाजातर्फे मानवस्त्रे देण्यात आली.

श्रीचौडेश्वरी देवीची ही मूर्ती नंदवरम् येथील मूळ मूर्तीच्या फोटोवरून बनवलेली आहे. काळ्या पाषाणातील साडे तीन फुट उंचीची चौडेश्वरीदेवीची मूर्ती चतूर्भूज असून उजवीकडील एका हातात तलवार तर दुसऱ्या हातात तक्षक नागपाश व त्रिशूळ आहे. डावीकडील दोन भूजांपैकी एका हातात अक्षयपात्र असून तो हात मांडीवर टेकविलेला आहे व दुसऱ्या हातात कर्कोटक नागपाश व डमरू आहे. उजवा पाय आसनावर मुडपून ठेवून डावा पाय खाली सोडून देवी अर्धसिध्दासन स्थितीत बसलेली आहे. शिरावरील किरिटावर आदिशेषाची फणा तर मागील अर्धचक्राकार महिरपीत महिषासुराच्या पत्नीचे शिर दाखविले आहे.

शिखर व कळसारोहण

चौडेश्वरी मंदिराच्या शिखराचे बांधकाम तामिळनाडूतील कुंभकोणम येथील शिल्पकार के मारीयप्पा स्थापती यांनी केले. शिखराच्या संपूर्ण बांधकाम व शिल्पाकृती मुर्तीसह २१,००० रूपयांचे मानधन त्यांना देण्यात आले होते. चौरसाकृती गाभाऱ्यावर हे शिखर बांधले असून त्यासाठी विटा, वाळु व सिमेंट यांचा वापर केला आहे. शिखराची संपूर्ण उंची गाभाऱ्याच्यावर कळसासह २८ फुट असून त्यावर आदिशक्तीच्या विविध रूपातील महाकाली, महालक्ष्मी, सरस्वती, महिषासुर मर्दिनी, गायत्रीदेवी, कंचीकामाक्षी, कनकदुर्गा व अष्टलक्ष्मीच्या मूर्ती बसवलेल्या आहेत. शिखराच्या चारही कोपऱ्यावर देवकन्या व अप्सरा यांच्या मूर्ती असून शिखराच्या पूर्वेकडील बाजूस श्रीनंदीवरम चौडेश्वरी देवीची मूर्ती बसवलेली आहे. शिखराच्या तळास चारी कोपऱ्यात दक्षाचे शिर कोरण्यात आले आहे व चारही कोपऱ्यास देवीचे वाहन सिंह बसविलेले आहे. मंदिराचा कळस हा ४ फुट उंचीचा असून त्यावर सोन्याचा मुलामा दिलेला आहे, त्यासाठी १० तोळे सोने वापरण्यात आले. त्यापैकी ७ तोळे सोने श्री रामकृष्ण बिसप्पा उदगिरी यांनी दिले.[२१५] दिवसातून ३ वेळा शंखनाद करून देवीची आरती केली जाते, कुंकूम अर्चना पूजा होते. प्रसादात भात, शिरा, लाडू असतो.

मंगळवार, शुक्रवार व पोर्णिमेस देवीची विशेष पूजा केली जाते. मंदिरात अखंड दीप चालू असतो. देवीच्या नैवद्यात बोनमू, मीठ नसलेल्या हिरव्या पालेभाज्या, दही व नैवद्याच्या ताटाबरोबर हळद, कुंकू, मोगऱ्याची फूले (मल्ले पुव्वूलू) किंवा त्यांचा हार, पान-सुपारी, लिंबू व नारळ इत्यादी साहित्य असते. समाज बांधव या प्रकारचा नैवद्य पोर्णिमेस व इतर सणाच्या दिवशी देवीस अर्पण करतात.[२१६]

श्रीचौडेश्वरी देवी प्रतिष्ठापना षष्ठी उत्सव, श्रीचौडेश्वरी ज्योती उत्सव, नवरात्र महोत्सव तसेच गणेशोत्सव इत्यादी वार्षिक उत्सव देवस्थानतर्फे साजरे केले जातात. ज्योती उत्सवात अजबळी देऊन 'महाआरती' होते व प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता होते. मिरवणुकीसाठी तयार केली जाणारी ज्योत ही रवा, मैदा, साखर, तुप, तांदूळ, पीठ, गुळ यापासून तयार केली जाते. या सर्वांचे एकत्रिकरण करून त्यास चौडेश्वरी देवीचा आकार दिला जातो व त्यामध्ये सूताची ज्योत करून त्याची मिरवणुक काढली जाते.[२१७] या उत्सवामध्ये बहुसंख्येने लोक सहभागी होतात.

श्री चौडेश्वरी देवी मंदिराचे पुजारी

पुजारी		कालावधी
श्री. कुचप्पा कृष्णप्पा डक्का	:	१९५४ ते १९५६
श्री. रंगप्पा तुकाराम उदगिरी	:	१९५६ ते १९५६
श्री. मल्लप्पा आपय्या पोळा	:	१९५६ ते १९५७
श्री. तिप्पण्णा विठोबा दासरी	:	१९५७ ते १९६०
श्री. कुचप्पा कृष्णप्पा डक्का	:	१९६० ते १९६९
श्री. तिप्पण्णा विठोबा दासरी	:	१९६२ ते १९६४
श्री. सिद्रामप्पा लछमय्या सोमनाथ	:	१९६४ ते १९६५
श्री. नरसप्पा सिद्रामप्पा भिमरथी	:	१९६५ ते १९६५
श्री. विठ्ठल केशव उदगिरी	:	१९६५ ते १९६७
श्री. सिद्रामप्पा रंगप्पा उदगिरी	:	१९६७ ते १९८९
श्री. रामचंद्र नागप्पा द्यावरकोंडा	:	१९८९ ते १९९५
श्री. श्रीनिवास चौडप्पा पेद्दी	:	१९९५ पासून २००५
श्री. गोवर्धन मेकॅल	:	सध्याचे पुजारी

मंदिर ट्रस्टतर्फे बाल मंदिर, प्राथमिक व माध्यमिक शाळा चालविली जाते. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन देवीचे चिन्ह असलेली ट्रॉफी देऊन गौरविले जाते. ट्रस्टतर्फे समाजासाठी सांस्कृतिक भवन उभारले असून या ठिकाणी लग्न, मुंज, वाढदिवस व विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होतात. यावेळी नाममात्र शुल्क घेतले जाते.मंदिर ट्रस्टच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या पतसंस्थेतून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी व्याज दरात आर्थिक सहाय्य केले जाते.[२१८]

- **गद्रे लक्ष्मी मंदिर (दत्त चौक परिसर)**

शहरातील मातृदेवता मंदिरामध्ये गद्रे लक्ष्मी मंदिर हे महत्त्वाचे मंदिर असून याचे बांधकाम व मुर्तीची प्रतिष्ठापना थोरल्या माधवराव पेशव्यांनी केली आहे. दगडी बांधकाम असलेल्या मंदिराच्या चारी बाजूंनी दगडी तटबंदी आहे. या तटबंदीस एक लहान झरोका असून या झरोक्यातून बाहेरून महालक्ष्मीचे मुखदर्शन होते. मंदिराच्या लाकडी दरवाजावर सुंदर नक्षीकाम केलेले असून त्यामध्ये ॐ, श्री, स्वस्तिक आणि कलश अशी प्रतिके पाहावयास मिळतात. गर्भगृहात महालक्ष्मीची काळ्या पाषाणातील चतुर्भूज मूर्ती आहे. तिच्या हातात गदा, चक्र, कलश आणि श्रीफळ अशी आयुधे पाहावयास मिळतात.[२१९] गर्भगृहाला असणारे दगडी स्तंभ व त्यावरील अश्वमुखांची शिल्पे ही मराठेकालीन बांधकाम पध्दतीची वैशिष्ट्ये येथे स्पष्ट दिसून येतात.[२२०] दगडी स्तंभावर उत्कृष्ट नक्षीकाम असून प्रत्येक दोन खांबाच्या मध्ये कमानी आहेत. तसेच आतमध्ये दिवे लावून ठेवण्यासाठी काचेच्या हंड्याही आहेत.

- **कालिका देवी (विश्वब्राम्हण सोनार समाज, शुक्रवार पेठ)**

विश्वब्राम्हण सोनार समाजाचे कालिका देवीचे मंदिर शुक्रवार पेठेत आहे. सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या यात्रेमध्ये चौथ्या नंबरच्या नंदीध्वजाचा मान या सोनार समाजाला आहे. अनुबाई रावजी दिंडेगावकर यांनी सन १८८९ मध्ये मंदिरासाठी जागा दिली. या जागेवर त्र्यंबक जडे, सिद्राम हलाले, गोपाळराव म्हसवडकर, सदाशिव कामेगांवकर, ज्ञानोबा बाणकर, ज्ञानोबा विजापूरकर यांच्या पुढाकारातून मंदिराची उभारणी करण्यात आली.

चैत्र शुध्द पंचमी शके १८३५ रोजी ब्रम्हश्री बाळशास्त्री क्षिरसागर यांच्या पौरोहित्याखाली श्रीकालिका देवीची स्थापना करण्यात आली. ही देवीची मूर्ती कुरूंदवाडचे रामभाऊ वाघोलीकर

(पोतदार) यांनी स्वःहस्ते घडविली आणि मुरलीधर पोतदार (बोरगांवकर) यांनी ती विश्वब्राम्हण सोनार समाज संस्थेला अर्पण केली. गर्भगृहात सिंहासनावर कालिका देवीची अष्टभूजा मूर्ती असून तिच्या हातात शंख, चक्र, गदा, परशु, तलवार, त्रिशूळ आहे. काळ्या पाषाणात घडवलेली चार फुटी अत्यंत देखणी असणारी ही मूर्ती सोनार समाजाची कुलदेवता आहे. मंदिराचा जीर्णोध्दार सन १९८२ ते सन १९९२ या काळामध्ये करण्यात आला. विश्वब्राम्हण समाज कालिका सेवा मंडळ ट्रस्टच्या मार्गदर्शनाखाली मंदिराची देखरेख केली जाते. ट्रस्टी अध्यक्ष बाळासाहेब कुमठेकर हे आहेत. कालिका देवीचे मुळ स्थान कर्नाटक राज्यातील शिरसंगी जि. बेळगांव येथे आहे.

कालिका मंदिरात नवरात्रात घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अश्विन शुध्द पंचमीला कुंकूमार्चन विधी, महाअष्टमीला नवचंडी यज्ञ, होमहवन तसेच घागरी फुंकण्याचा कार्यक्रम होतो. विजयादशमीला विशेष महापूजा करून देवीची अलंकार महापूजा मांडण्यात येते. नवरात्रीच्या काळात श्रीदुर्गासप्तशती ग्रंथाचे पारायण तसेच भजनी मंडळाचा कार्यक्रम केला जातो. दरवर्षी फाल्गुन कृष्ण चतुर्दशी ते चैत्र शध्द पंचमी या कालावधीत कालिका महोत्सव साजरा केला जातो. याशिवाय वर्षभरात हळदी-कुंकू, श्रावणी, गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, श्रीमद्‌भागवत सप्ताह, कोजागिरी पोर्णिमा, गीताजयंती, विश्वकर्मा जयंती, संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी साजरी केली जाते.[२२१]

- **श्रीकालिका देवी मंदिर (तेलंगी पाच्छा पेठ)**

शहराच्या पूर्व भागात राहणाऱ्या निलगार समाजाची कुलदेवता 'श्रीकालिका देवी' मंदिराचा अणि मंदिर परिसरातील श्रीविष्णु-लक्ष्मी मंदिराचा भूमीपुजन समारंभ १३ मे १९६४ रोजी माण्यप्पा गुंडप्पा दुबास यांच्या शुभहस्ते झाला. २ नोव्हेंबर १९६९ या दिवशी श्रीकालिका देवीची रौप्य अभिषेक मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात केली. इ. स. १९९८ मध्ये केशव अंबाजी आडकी व त्यांच्या पत्नी नरसम्माबाई यांच्या शुभहस्ते मंदिराचा जीर्णोध्दार कार्यक्रम करून दाक्षिणात्य शैलीतील शिल्प कामे असलेले मंदिर बांधले गेले. तामिळनाडू येथील त्रिची परिसरातील श्री एन. नटराजन या खास शिल्पकाराकडून हे काम करवून घेतले. यासाठी लागणारा दगड ओंटिपुली अंकम्मा कट्टुबडीवारी पालेम, जि. गुंटूर (आंध्र प्रदेश) येथून आणला.[२२२]

दाक्षिणात्य शैलीतील दगडी शिल्पकाम असलेल्या या मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला असून या मंदिराचा पदविन्यास सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा आहे. मंदिराच्या सभामंडपाचे व

शिखराचे बांधकाम टेम्पल आर्किटेक्चर पी. आर. राममोहन यांच्या मार्गदर्शनाने झाले, यांच्याच मार्गदर्शनाने कालिका मंदिरातील श्रीविष्णु-लक्ष्मी मंदिराचा सभा मंडप व शिखराचे बांधकाम झाले. या दोन्ही बांधकामाचा शुभारंभ दिनांक १६ नोव्हेंबर २००० गुरूवारी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष व्यंकप्पा नागप्पा माणेकरी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. श्रीकालिका मंदिराच्या सभामंडपाच्या बांधकामावर सभोवताली ब्राह्मी नारायणी माहेश्वरी, चामुंडा, कौमारी, अपराजिता, वाराही, नारसिंही व दक्षिणकाली या देवता आहे.

गर्भगृहात असणारी कालिका देवी मुर्तीची प्रतिष्ठापना दिनांक ८मार्च २००२ रोजी श्रीनिवास काटकर व त्यांच्या पत्नीच्या शुभहस्ते करण्यात आली. मंदिराचे गर्भगृह प्रथम स्तर, चित्रवनम्, जगती, कुमुदकम, कंठपट्टीका, वेदिका, स्तंभवर्गम्, वूदमपालका, वीरकंठम, अेलूडकम, कोतकम व व्यालम् या नावाने संबोधल्या जाणाऱ्या विविध स्तरात घडविले आहे. गर्भगृहात कालिका देवीची दक्षिणाकाली पीठासह आठ मूर्ती प्रतिष्ठापित केल्या आहेत. श्रीकालिका देवी मूर्तीच्या पाया खालच्या भागात इच्छा, ज्ञान, क्रिया, कामिनी, कामदायिनी, रती, रतिप्रिया, नंदा व उन्मन्यै या नवमातृका कोरलेल्या आहेत. श्रीकालिका देवीचे प्रभावळ हे १४ किलो चांदीचे असून त्यावर सुंदर व कलात्मक नक्षीकाम केले आहे. वरच्या बाजूस गणपती, काळभैरव, बटुक भैरव व देवीच्या दोन्ही अंगास दशमहाविद्या अवतारांची चित्रे कोरलेली आहेत. हे प्रभावळ समाज बांधव श्री शाम संगप्पा सिडगिद्दी परिवाराने जनगाम येथील कुशल धातू शिल्पकार श्री मोहनचारी यांच्याकडून बनवून देवीस अर्पण केले आहे. प्रभावळीच्या या दशमहाविद्या अवतारांमध्ये प्रभावळीत काली, कपालिनी, कुल्ला, कुरूकुल्ला, विरोधिनी, विप्रचिता, उग्रा, उग्रप्रभा, दीप्ता, नीला, घना, बलाका, मात्रा, मुद्रा आणि मिता या पंधरा मातृका कोरलेल्या आहेत.[२२३]

कालिका देवीची मूर्ती ही कृष्णवर्णीय चतूर्भूज असून उजव्या बाजूचा खालचा हात हा शत्रस आव्हानात्मक असून वरचा हात वरदहस्त आहे. डावीकडील खालच्या हातात नरमुंड आणि वरच्या हातात खड.ग आहे. मुर्तीचे डोळे लाल व जीभ बाहेर आलेली लळलळीत अशी आहे. दक्षिणकाली स्वरूपातील ही मूर्ती प्रसन्न मुद्रेची आहे.[२२४] गर्भगृहात दक्षिणेस माहेश्वरी (कालिका) पश्चिमेस वैष्णवी (लक्ष्मी) आणि उत्तरेस ब्राह्मी (सरस्वती) आहे. या मंदिराच्या गर्भगृहास साधार पध्दतीचा प्रदक्षिणापथ असून गर्भगृहावर सुंदर शिल्पयुक्त शिखर आहे. शिखराच्या पहिल्या स्तरावर श्रीकाली,

धुमावती, छिन्नमस्ता, त्रिपूरभैरवी, षोडशी, तारा, कमला, महाकाळभैरव, बटुक भैरव या देवता आहेत आणि दुसऱ्या स्तरावर वक्रतुंड गणपती, दशभुजा महाकाली, अष्टभूजा महालक्ष्मी, अष्टभूजा महासरस्वती तर तिसऱ्या स्तरावर चतूर्भूजा महालक्ष्मी, चतूर्भूजा महाकाली, श्रीमहाकाली, श्रीचतूर्भूजा महासरस्वती अशा एकूण २९ मुर्ती बसविण्यात आल्या आहेत.[२२५] दररोज श्रीकालिका व विष्णु रौप्यअभिषेक मुर्तीची नित्यनैमित्तिक व अभिषेक पुजा-अर्चा करण्याची जबाबदारी पंडीजती श्री. नागप्पा व्यंकप्पा माणेकरी यांनी इ. स. १९६९ ते सन १९९३ पर्यंत पार पाडली. सन १९९३ ते सन २००२ पर्यंत श्री श्रीनिवास पांडुरंग माणेकरी यांनी ही जबाबदारी मोठ्या भक्तीभावाने पार पाडली.

- **श्रीकालिका देवी मंदिर परिसरातील श्रीविष्णु-लक्ष्मी मंदिर व देव-देवता**

पूर्वाभिमुख असणाऱ्या या मंदिरचा पदविन्यास सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा आहे. सभामंडपातील खांबावर विविध शिल्पे कोरलेली असून ७ फुट गर्भगृहात श्रीविष्णु-लक्ष्मी मूर्ती स्थापित आहेत. या मूर्ती पीठमसह अनुक्रमे ३ फुट व २.५ फुट आहेत. या मंदिराच्या शिखरावर ८ गरूड, १६ सिंह, ४ कोष्टमूर्ती अशा २८ देव-देवतांच्या मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आल्या आहेत. श्रीविष्णु-लक्ष्मी मंदिराच्या शेजारी 'श्रीज्ञानसरस्वतीचे' छोटे मंदिर पंचवृक्षाच्या शमीकट्ट्यावर श्रीवरदविनायक गजाननाची मूर्ती बसविण्यात आली आहे. मंदिर संकुलातील सर्व मूर्ती महाबलीपुरम येथे शास्त्रशुध्दरित्या घडविण्यात आल्या आहेत. तिन्ही मंदिराच्या दगडी प्रांगणात घडीव पायऱ्या व पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस दगडी सिंह आहेत.

श्रीकालिका मंदिराच्या सभा मंडपासमोर पंचेचाळीस फुट अखंड सागवानी लाकडाचा असून हा ध्वज स्तंभ पितळी धातूने मढविलेला आहे. पांडय्या रासूर परिवाराने जनगाम येथील धातू शिल्पकार मोहनचारी यांच्याकडून हे पितळी कवच तयार करवून देवीस अर्पण केले. या कवचावर दशमहाविद्येच्या स्वरूपाची चित्रे कोरलेली आहेत.[२२६] दररोज सकाळी मंदिरातील सर्व 'श्रीं' च्या मूर्तीस जलाभिषेक करून त्यांची शोडषोपचारे पुजा-अर्चा केली जाते. गुरूवार, शुक्रवार, मंगळवार, अमावस्या व पोर्णिमेच्या दिवशी श्री महाभिषेक होतो. श्रीदक्षिण काली मातेस शुक्रवारची राहूकाळ अतिशय प्रिय आहे. ही अचर्ना दर शुक्रवारी सकाळी वाजेपर्यंत विधीपूर्वक संपन्न होते. काही देणगीदारही 'श्रीं' स अभिषेक घालतात. प्रसाद म्हणून पिवळा भात, खडीसाखर, पेढा व तीर्थ दिले जाते. रोज संध्याकाळी ७ वाजता आरती करून रात्री १० वाजता मंदिर बंद होते.

वार्षिक उत्सव

श्रीकालिका देवी मंदिरात आषाढ शुध्द पोर्णिमेस शाकंभरी महोत्सव, अश्विन शुध्द प्रतिपदा ते अश्विन शुा १५ पोर्णिमेपर्यंत श्रीदक्षिणकाली शारदीय नवरात्र महोत्सव साजरा होतो. या उत्सव काळात रोज सकाळी ६ वाजता श्रीकालिका पूर्णाभिषेक, ९ ते ९.३० पर्यंत महापुजा, गणपती पुजा, ध्वजारोहण, कलश स्थापना, कलशाभिषकसहीत पूर्णाभिषेक, शाकंभरी अलंकरणा, महापूजा नैवद्य, आरती, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ६.३० वाजता श्रीसर्वसामान्य मेधाकाली स्वरूप, ककारत्म सहस्त्रनाम कुंकुमार्चना व रात्री आरती करण्यात येते. या काळात कालिका देवीस विविध अलंकारपूजा करण्यात येते आणि देवाची शाकभाज्याने वैशिष्ट्यपूर्ण सजावट करण्यात येते.[२२७] मंदिर प्रासाद व मूळमूर्ती प्रतिष्ठापना दिन, चैत्री नवरात्र, दरवर्षी फाल्गुन वद्य ११ एकादशीस उत्सव केला जातो इत्यादी वार्षिक उत्सवाशिवाय मंदिरात श्री.कालिका देवीस दर महिन्याच्या शुध्द व वद्य अष्टमी शुध्द पोर्णिमा व वद्य अमावस्या या चार तिथींना मूळमूर्ती पूर्णाभिषेक होतो. श्रीविष्णु-लक्ष्मी देवतांचा मूलमूर्ती पूर्णाभिषेक दर महिन्याच्या शुध्द व वद्य प्रतिपदा शुध्द व वद्य द्वादशी आणि पोर्णिमा या तिथींना होतो.[२२८] मंदिरात 'श्रीं' ची नित्यपुजा-अर्चा व वार्षिक उत्सवप्रसंगी धार्मिक कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी श्री नागप्पा व्यंकप्पा माणेकरी (पंडीतजी) आणि श्री श्रीनिवास पांडुरंग माणेकरी (पुजारी) यांच्यावर आहे.

जीर्णोध्दार काळात भक्तांकडून मिळालेल्या देणग्या

श्रीकालिका मंदिरातील देवीच्या मूर्तीच्या हातातील खडग चांदीने मढविण्याचे कार्य श्री. रामय्या यंबय्या पुलगम यांनी केले. श्री सागर डाकप्पा पोट्टीगार यांनी देवीसच्या मूर्तीस चांदीचा कमरपट्टा अर्पण केला तर श्री दिपक दासी यांनी देवीच्या हातांना चांदीची आवरणे अर्पण केली. पादुकांना चांदीचे आवरण घालण्याचे काम श्री विठ्ठल मल्लिकार्जून कोनापूरे यांनी २५सप्टेंबर २००९ रोजी केले. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. नरसप्पा निलप्पा मिराणम यांनी कालिका मातेस ६० ग्रॅम सोन्याची मोहनमाळ अर्पण केली. याचबरोबर डॉ. व्यंकटेश अंबादास बोल्ली यांनी श्रीविष्णु-लक्ष्मी मंदिरास 'लक्ष्मी-नरसिंहाची' सुमारे दोन किलो वजनाची चांदीची मूर्ती अर्पण केली.[२२९] सद्गुरू श्रीनिवास काटकरसर यांनी विष्णु-लक्ष्मी मंदिरात 'श्रीविष्णुच्या वराह' अवतारातील सुमारे दोन किलो वजनाची चांदीची मूर्ती आणि कालिका मातेस १०७ चांदीची व एक सोन्याचे नाणे

अर्पण केले. याशिवाय श्रीकालिका मंदिर जीर्णोध्दारासाठी करनकोट, चिंचोळी, मलकापूर, तांडूर, कोंडगल, महिबुब नगर, सदाशिव पेठ, टेकूळपल्ली, मोमीन पेठ, विकाराबाद, संगारेड्डी, शंकर पेठ, नारायण खेड, बिदर, बसवकल्याण, हल्लीखेड, लिंगमपल्ली, रामचंद्रपुरम, मुखेड, देगलूर, कंधार, लोहा, कुंडलवाडी, नांदेड, सोनखेडा, अहमदाबाद येथील समाज बांधवांकडून ही देणग्या मिळाल्या.[२३०] बांधकामातील वेगळेपणामुळे आणि दक्षिणकाली मूर्तीमुळे सोलापूरच्या धार्मिक इतिहासात भर टाकण्याचे काम 'श्रीकालिका मंदिर' करीत आहे. या मंदिर परिसरात असणारी 'निलगार समाज शिक्षण प्रसारक मंडळाची शिक्षण संस्था' समाजातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोलाची कामगिरी बजावत आहे.

- **श्रीजगदंबा मंदिर (शुक्रवार पेठ)**

श्रीजगदंबा मंदिर हे शुक्रवार पेठेतील जुन्या मंदिरापैकी एक मंदिर होय. ज्यावेळी शहराचा विस्तार फक्त कसबा व शुक्रवार पेठ इतका होता, त्यावेळी या देवस्थानची व्यवस्था सत्राम अवबा तेली काटकर (कोलाटकर) हे करीत असत. ३१ ऑगस्ट १८६१ या दिवशी देवीची व्यवस्था त्यांनी देवबा तेली यांच्याकडे सोपविली. तेंव्हापासून श्रींची यात्रा, नवरात्र उत्सव हे तेली घराणे करीत आले आहेत. या मंदिरात प्रतिवर्षी अश्विन शुध्द प्रतिपदेस घटस्थापना होऊन नवरात्र महोत्सवास सुरूवात होते. विजयादशमीनिमित्त देवीच्या मंदिरातून देवीची काठी (विजय ध्वज) व पालखी मिरवणुक होम मैदानावर सिमोल्लंघनाकरीता जाते.[२३१]

सन १९५८ सालापासून मध्यवर्ती शक्तीपूजा मंडळातर्फे निघणाऱ्या सार्वजनिक मिरवणुकीत या देवीची पालखी समाविष्ट केली. नवरात्रोत्सवानंतर अश्विन पोर्णिमेला तुळजापूरच्या देवीच्या दर्शनासाठी शुक्रवार पेठेतील या शिवलाड तेली समाजाच्या दोन काठ्यांना विशेष मान असतो. सध्या या काठीचे नेतृत्त्व रामकृष्ण मंठाळकर करतात तर समाजाच्या वतीने निघणाऱ्या काठीचे नेतृत्त्व विष्णु जगन्नाथ मंठाळकर करतात.[२३२]


- **किल्ल्यातील पद्मावती मंदिर**

सोलापूरचा भूईकोट किल्ला उभारणीसाठी दर्गो-पाटील घराण्यातील पद्मावती या गरोदर स्त्रिचा बळी देण्यात आला. कुंभारी हे या पद्मावती स्त्रीचे माहेरघर होते, गर्भवती असताना या

पद्मावतीस पूर्वेकडील तटाच्या अंतर्बुरूजामध्ये एक खोली बांधून देण्यात आली. अन्न, धान्य, कापडलत्ता, बाळासाठी पाळणा वगैरे वस्तूची पूर्तता करण्यात आली. तेथेच असणाऱ्या छोट्या तळ्यातून खापरी नळीच्या मदतीने पाण्याची व्यवस्था करण्यात आली. पद्मावती राहत असलेली खोली बंदिस्त करून हवेसाठी झरोका ठेवण्यात आला होता. अशा या बलिदान दिलेल्या पद्मावतीचे छोटेखानी मंदिर किल्ल्यात आहे.[२३३]

याबद्दल पाटलास पुढे पाटीलकीचे वतन चालू ठेवले गेले. जिथे स्त्री गाडली त्या बुरूजास 'बाळंतिणीचा बुरूज' म्हणून आजही ओळखले जाते. दरवर्षी प्रतिपदेस त्या घराण्याकडून तेथे लुगडे-चाळी, धोतर-रूमाल बाळंतिणीच्या नावाने चढविण्यात येतो.[२३४]

छायाचित्र क्र. १५



भुईकोंट किल्ल्यातील महांकाळेश्वर बुरूजखालील महांकाळेश्वर मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

किल्ल्यात एक महांकाळेश्वराचे मंदिर असून त्याठिकाणी एक मुंजा बळी देण्यात आला आहे. या बलिदानाबद्दल आदिलशहाने जोशी घराण्यास जमिनी व वार्षिक नेमूणका दिल्या. किल्ल्यातील दुसऱ्या मोठ्या दरवाजाजवळ असणाऱ्या बुरूजाखाली एक दगडाची मूर्ती आहे, बाहेरच्या बाजूला एक फुटका नंदी आहे. या मुर्तीला तेल व शेंदूर लावून लोक पूजा करतात.[२३५] सिध्देश्वरांच्या घराण्याचे कुलदैवत धुळीमहांकाळ हे असून हेच नांव सिध्देश्वरांच्या बालपणी त्यांच्या आई-वडीलांनी ठेवले होते.

- **कन्यका परमेश्वरी देवी**

नगरेश्वर मंदिरात कन्यका देवीचे एक छोटेसे मंदिर आहे. कन्यका देवीची मूर्ती ही १९६१ रोजी जयपूरहून आणलेली असून यासाठी समाजातील गंगाराम बदगूल, वासुदेवण्णा सोमशेट्टी, शंकरराव गुमडेल, प्रभु आप्पा आकूल, रंगप्पा शेट्टी इत्यादी व्यक्तींचे सहकार्य लाभले.[२३६] नवरात्रात कन्यका देवीला नऊ दिवस नऊ रूपात पूजा केली जाते. तसेच नवरात्रानिमित्त नगरेश्वर मंदिरात विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते. दररोज कुंकुमअर्चना, अभिषेक, महापूजा व महाआरती करण्यात येते. याबरोबर मंदिरात दिपोत्सव, सीमोल्लंघन इत्यादी कार्यक्रमही होतात. नवरात्रानिमित्त मंदिरातर्फे दांडिया, रांगोळी, कथाकथन इत्यादी स्पर्धांचेही आयोजन केले जाते. या कार्यक्रमात महिला व तरूणींचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो.[२३७]

- **श्री भवानी मंदिर (भारतीय चौक)**

बुधवार बाजारलगत असलेल्या भारतीय चौकात असणारे 'भवानी मातेचे' मंदिर हे 'भारतीय चौक नवरात्र महोत्सव' मंडळाच्या अखत्यारीत येते. हे मंदिर उभारण्यासाठी विठ्ठलराव चित्तमपल्ली, सखाराम सुरवसे, नामदेव पवार, तुकाराम चौधरी, सदाशिव पिसे, विजयभाई पटेल या मंडळींनी स्वत:च्या पैशातून अकराशे चौरस फुट जागा मंदिरासाठी खरेदी करून हे भवानी मातेचे मंदिर बांधण्यात आले. सध्या प्रा. पुरणचंद्र पुंजाल हे या मंदिराचे अध्यक्ष आहेत.

पश्चिमाभिमुख मंदिराचा सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असा पदविन्यास असून मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचा दरवाजा सागवानी नक्षीकाम केलेला आहे. सभामंडपात सोलापूरातील प्रसिध्द चित्रकार विष्णु सपार यांनी काढलेली देवीच्या विविध अवतारातील चित्रे आहेत. या चित्रांमुळे मंदिराच्या वैभवात भर पडलेली आहे. सभामंडपात गर्भगृहाच्या उजव्या बाजूला काळ्या पाषाणातील उजव्या सोंडेच्या गणपतीचे छोटे मंदिर आहे आणि डाव्या बाजूला 'भवानीमाता' देवीची उत्सव मूर्ती आहे. या मुर्तीची प्रतिष्ठापना सन १९७४ मध्ये झालेली आहे.

८ x १० च्या गर्भगृहात श्रीभवानी मातेची सौम्य स्वरूपातील मूर्ती आहे. मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना ४ जुलै १९९१ रोजी करवीर पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य विद्याशंकरजी यांच्या शुभहस्ते झाली. तामिळनाडूतील चेंगोटा येथून आणलेली ही मूर्ती साडे पाच फुट उंच असून अखंड काळ्या पाषाणातून घडवलिली, स्थानक ,सिंहवाहिनी अष्टभूजा देवी आहे. तिच्या वरील डाव्या

हातात शंख व उजव्या हातात पद्म, मधल्या डाव्या हातात धनुष्य व उजव्या हातात बाण, त्याखालील डाव्या हातात तलवार व उजव्या हात वरदहस्त, खालच्या शेवटच्या डाव्या हातात गदा आणि उजव्या हातात तलवार अशी आयुधे आहेत. डोक्यावर किरिटमुकूट, कानात कर्णकुंडले व गळ्यात विविध आभूषणे घातलेली आहे. देवीचे प्रभावळ नक्षीमय मध्यभागी नागफणा असलेले, तांब्याचे असून त्यावर सोन्याचा मुलामा असून प्रभावळाच्या दोन्ही बाजूला गजमुख आहेत. देवीच्या हातातील आयुधे आणि गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराची चौकट चांदीची असून त्यावर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. अंतराळातून भाविक दर्शन घेतात गर्भगृहास प्रदक्षिणा पथ सांधार पध्दतीचा आहे. सन १९९६ मध्ये या मंदिराचा कळसारोहण कार्यक्रम झाला.[२३८]

उत्सव मुर्तीच्या प्रतिष्ठापनेपासून बाबुराव बासुतकर हे नित्य पुजा-अर्चा करीत होते. त्यांच्यानंतर त्यांचे शिष्य बालाजी साभा हे सन १९९१ ते सन २००९ त्यांच्यानंतर सन २००९ पासून आजतागायत अनिल बाबुराव बासुतकर हे या मंदिराचे पुजारी आहेत. नवरात्र उत्सव, शाकंबरी उत्सव, तसेच चैत्री नवरात्रोत्सव इत्यादी धार्मिक उत्सव केले जातात. नवरात्र उत्सव काळात देवीची नऊ दिवस नऊ रूपात पूजा करून महाआरती होते. या तिन्ही उत्सव काळात मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी असते. हैद्राबाद, मुंबई, पुणे, कोल्हापूर या ठिकाणाहूनही भाविक नवरात्रात दर्शनासाठी येतात. सन १९९६ पासून आतापर्यंत चार वेळा सामुदायिक विवाह सोहळ्यांचे यशस्वीपणे आयोजन करून मंदिर ट्रस्टने सामाजिक बांधिलकी जपली आहे.[२३९]

- **दुर्गादेवी मंदिर (भवानी पेठ)**

सन १९६० साली आंध्रातून आलेला वैदू समाज शहराच्या भवानी पेठ परिसरात स्थायिक झाला व तो इथेच स्थिरावला. या समाजाने वैदूवाडी, वैदू वस्ती या नावाने आपले खास वैशिष्ट्य जपले आहे. अडीच हजार लोकसंख्या असलेल्या या समाजातील महिला दिवस उजाडण्याआधीच शहर व खेड्यात सर्वसामान्यांना आवश्यक असलेल्या वस्तू विक्रीसाठी बाहेर पडतात. दिवसभराच्या कमाईवर त्यांचे घर चालते, पुरूष मंडळी गॅस, स्टोव्ह, प्रेशर कुकर दुरूस्त करण्याचे काम करतात. मात्र घराची जास्त जबाबदारी या महिलांवर असते. मुळ तेलगु भाषिक समाज मराठी, हिंदी, कन्नड चांगल्या प्रकारे बोलतात. यांची भांडणे कधीही पोलीसात नेली जात नाहीत तर हे तंटे जात पंचायतीमध्येच सोडविले जातात. अशा या समाजाचे 'दुर्गादेवी' मंदिर भवानी पेठेत आपणांस पाहावयास मिळते.[२४०]

- **शितला माता (भांडे गल्ली)**

टिळक चौकात भांडे गल्लीत शितला मातेचे मंदिर असून या मंदिरात असणारी मूर्ती ही शाडूची सौम्य स्वरूपातील आहे. या मंदिराची स्थापना भांडे गल्लीतील गुजर व मारवाडी समाजातील व्यापाऱ्यांनी केली आहे. भांडे गल्लीतील गुजराती व मारवाडी लोकांचे प्रमाण जास्त असल्याने देवीच्या दर्शनासाठी या समाजाचे लोक जास्त प्रमाणात येतात. या मंदिरातच एक पोतराजाचेही छोटेखानी मंदिर पाहावयास मिळते.

दुर्गा भागवत यांनी सांगितलेल्या चौलकालीन सात देवतांमध्ये शितला देवीचा समावेश आहे. दक्षिणेत मरि किंवा शितला ही सात बहिणीत सर्वात मोठी समजली जाते. ही देवीच्या रोगाची आणि महामारीची देवता असून अनेक साथीच्या रोगांची अधिष्ठात्री आहे. उत्तरेत शितलेचे महत्त्व अधिक असून ती सौम्य व तारक आहे. बालकांना अभय देणारी जलप्रिय असणारी अशी आहे. शितला पूजा ही उत्तरेकडून दक्षिणेकडे आली असावी आणि नंतर दक्षिणेच्या ग्रामदेवतांशी संलग्न झालेली असावी. हिच्या पूजेचे उपचार शितल असतात आणि तिला शितल पदार्थ आवडतात म्हणून तिला 'शितला' हे नांव मिळाले असावे. उजाली, बसंतबुढी, सेडल माता, चेचक माता, मसानी, जगदम्मा, मोठीबाई अशी तिची प्रदेशपरत्त्वे भिन्न नांवे आहेत. बाराव्या शतकात राजस्थान व गुजरातमध्ये शितलेच्या अनेक मूर्ती आढळल्या. दक्षिण भारतातील मूर्ती आसनस्थ असून चतुर्भूज आहे, तिच्या हातात त्रिशूल, डमरू व ब्रम्हदेवाच्या पाचव्या शिराची कवटी, चौथा हात वरदमुद्रेत आहे. महाराष्ट्रात ही मूर्ती चतुर्भूज, उभी असून एक हात वरदमुद्रेत व तीन हातात कमळ, कलश व सिताफळ या वस्तु आहेत. पुष्कळदा एखाद्या खडबडीत दगडालाच शितलादेवी समजतात. हिचे ठाणे गावाबाहेर एखाद्या घुमटीत लिंबाच्या किंवा पिंपळाच्या झाडाखाली असते[२४१]

शितलेची पूजा नित्यनैमित्तिक असून मंगळवार, शुक्रवार किंवा सोमवार असते. बंगाल, महाराष्ट्र व सिंध प्रांतात तिची शेणाची मूर्ती करून पुजतात. महाराष्ट्रातील शहरी लोक शितलेला दही-भाताचा नैवद्य दाखवून, ओले हरभरे किंवा फुटाणे वाहतात व खणा-नारळाने ओटी भरतात. शितलेला शिळे अन्न प्रिय असते अशी समजूत असल्याने तिच्या पर्वदिवसाच्या आदल्या दिवशी शिजवून ठेवलेले अन्न तिला देतात व स्वत:ही तेच खातात. हीच प्रथा सोलापूर शहरातही दिसून येते. गोकुळाष्टमीच्या सप्तमीला शहरातील मारवाडी व गुजराती समाजातील लोक आदल्या दिवशी करून

ठेवलेल्या शिळ्या अन्नाचा देवीला नैवद्य दाखवून स्वतः ते शिळे अन्न खातात. गोकुळाष्टमी, नागपंचमी तसेच आषाढ महिन्यात देवीचा उत्सव असतो. तसेच मंगळवार, शुक्रवार, अमावस्या व पोर्णिमेला मंदिरात गर्दी असते. या देवीला शितल पदार्थ अर्पण केले जातात, या देवीला अजबळीची प्रथा नाही. धानप्पा सिद्राम तळभंडारे हे देवीचे वंशपरंपरागत पुजारी आहेत.[२४२]

- **यल्लम्मा / एल्लम्मा**

एल्लम्मा ही तेलंगणातील सात बहिर्णींच्या देवतायनांपैकी एक आहे. पेदम्मा, इसोदम्मा, मरेअम्मा, अंकलम्मा, नकुलम्मा, एल्लम्मा व अरिकम्मा या तेलंगणातील सात बहिर्णींपैकी एक एल्लम्मा देवी होय.[२४३] भारतीय संस्कृतीकोषात हिच्या नावाच्या उत्पत्तीबद्दल काही कथाही पाहावयास मिळतात. 'यल्ल' म्हणजे सर्व आणि 'अम्मा' म्हणजे आई सर्वांची आई किंवा जगदंब्बा होय. कर्नाटकात सप्तमातृकांना योळुअम्मा म्हणतात. यल्लम्मा हा त्या योळुअम्माचाच अपभ्रंश असावा आणि यल्लम्मा हिच रेणुका आहे. रेणुकेचे मुख्य स्थान बेळगांवजवळील सौंदत्ती येथे आहे. यल्लम्मेच्या उपासकांना जोगती व जोगतीण असे म्हणतात.[२४४] साखर पेठेत यल्लम्माचे मंदिर असून या मंदिरात यल्लम्माची मूर्ती बसलेल्या स्थितीतील उग्र स्वरूपाची ही देवी चतुर्भूज असून तिच्या हाती डमरू, त्रिशुल, पाश आणि ब्रम्हकपाल ही आयुधे आहेत. तिच्या डोक्यावर मुकूट असून देवीच्या बाजूला जमदाग्नी, रेणुका, परशुराम इत्यादी मूर्ती आहेत. या देवीची यात्रा आषाढ महिन्यात भरते. तसेच संकटाच्या वेळी भक्ताकडून तिला कोंबडे किंवा बकरे बळी देतात. मंगळवार, शुक्रवार, अमावस्या व पोर्णिमेसही मंदिरात दर्शनासाठी गर्दी असते.

- **मरिआई मंदिर**

शहरात महत्त्वाच्या चौकात मरिआईची मंदिरे पाहावयास मिळतात. त्यामध्ये देगांव रस्त्यावरील मरिआई चौकातील मरिआई मंदिर, तुळजापूर वेशीतील मरिआई मंदिर, पत्रा तालिम येथील मरिआई मंदिर, याशिवाय भैय्या चौक, निराळे वस्ती, जुनी पोलीस लाईन, बुधवार पेठ, भारतीय चौक, घोंगडे वस्ती, मोदी, लष्कर इत्यादी मरिआई देवी मंदिरांचा समावेश होतो. या सर्व मंदिरात प्रत्येक शुक्रवार, मंगळवार, अमावस्या या दिवशी लोक देवीची पूजा करतात. मरिआईची मूर्ती ही दगड-गोट्याची असते. मरिआई ही साथीच्या रोगांची देवता असून तिला प्रसन्न करण्यासाठी

आषाढ महिन्यात लोक दही-भाताच्या नैवद्याबरोबरच कोंबडा, बकरे व रेडा इत्यादिंचा बळी देतात. अलिकडच्या काळात शहरातील अशा मंदिरासमोर पशूहत्येस बंदी असल्याने फक्त देवीस मांसाहाराचा नैवद्य दाखविला जातो व हा बळी गावाबाहेर दिला जातो. मरिमातेला बळी दिला जाणारा रेडा हा तिच्या पतिचे प्रतिक मानले जाते.[२४५] ही एक क्षुद्र देवता असून स्वभवाने क्रूर व उग्र आहे. मरिआईचे देऊळ सामान्यपणे गावाच्या कडेला असते, तिच्या पुजा-अर्चेची व्यवस्था महार, मांग यांच्याकडे असते. मरिआईच्या कोपाने देवी, पटकी, कांजण्या इत्यादी साथींचे रोग उद्‌भवतात अशी समजूत आहे.[२४६]

छायाचित्र क्र. १६



तुळजापूर वेशीतील मरिआई देवी मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

दक्षिणेत मरि किंवा शितला ही देवीच्या रोगांची आणि महामारीची देवता असून ती साथींच्या रोगांची अधिष्ठात्री आहे. तसेच तेलंगणातील ही मरेअम्मा, तामिळनाडूतील पोलेरम्मा या मरिच्याच प्रतिमा आहेत.[२४७] मरिआईच्या उपासनेत रेडा बळी देण्याचा उग्र विधी असतो त्यामध्ये त्याचे शिर देवीपुढे पुरतात आणि धडाचे मांस महार, मांग शिजवून खातात. सामान्यतः हा विधी आषाढ महिन्यात केला जातो.[२४८] मरिआईच्या उपासनेत कडूलिंबाच्या पाल्याला महत्त्व असून तिच्या नैवद्यावर कडूलिंबाची डहाळी ठेवतात. याबद्‌दल भारतीय संस्कृतीकोषात एक कथा पाहावयास मिळते. प्रसिध्द तमिळ कवि तिरूवल्लूवर हा परिया जातीचा होता, त्याची पत्नी मरिअम्म हिला देवीच्या रोगाने पछाडले होते. ती गावात भिक्षा मागताना हातात लिंबाचे डहाळे घेऊन अंगावरील माशा मारीत असे. पुढे लोक तिलाच देवीच्या रोगाची देवता समजून भजू लागले आणि तिच्या उपासनेत लिंबाचा पाला वापरू लागले.

पोतराज हा मरिआईचा उपासक असल्याने लोक त्याच्या मध्यस्थीने देवीला प्रसन्न करून घेतात. सामान्यतः पोतराज हे महार, मांग या जातीतील असतात. त्याला कडकलक्ष्मी अथवा मरिआई या उपास्य देवतेच्या नावानेही ओळखतात.[२४९] यांच्या पोषाखात विविध रंगाच्या चोळीच्या खणांचा घागरा, त्यावर पांढरा सदरा, डोक्यास लांब केस वाढवून त्याचा अंबाडा, पायात खुळखुळी असते. त्याच्या बायकोच्या डोक्यावर गोल लाकडी देव्हाऱ्यात देवीची मूर्ती असते. हे लोक ढोल वाजवून अंगावर आसूड मारून घेणे, सुपात दाणे घेऊन सुप उभे धरून फिरविणे, लिंबे फिरविणे, आपल्या दंडाला घट्ट दोरी बांधून दंडाच्या स्नायुत तिक्ष्ण दाभण घुसवून रक्त काढतात.[२५०]

जेंव्हा गावात पटकीची साथ सुरू होते तेंव्हा मरिआईचा गाडा गावाबाहेर घालविण्यासाठी पोतराजाला आमंत्रण दिले जाते. पोतराज एका छोट्या गाड्यावर मरिआईची मूर्ती बसवून तो गाडा गावसीमेपलिकडे नेऊन सोडण्याचा विधी करतो. हा गाडा व त्यामधील देवीची मूर्ती ही आंब्याच्या लाकडाची बनवितात. मंगळवारी किंवा शुक्रवारी हा गाव बांधण्याचा विधी केला जातो. गांव बांधणे म्हणजे गावात शिरणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर नारळ व अंडी पुरून त्या जागी एक खुंटी ठोकणे होय. हा विधी झालनंतर मरिआईचा गाडा डोक्यावर घेऊन पोतराज व इतर महार मंडळी 'मरिआईचा चांगभले' असा घोष करीत देवीची गाणी म्हणतात. देवीच्या उपासनेतील मरिआईची गाणी, तिच्या कथा-गाथा व विधी-विधानांचे पौरोहित्य करण्याचे अधिकार पोतराजास असतात.[२५१]

- **पोशम्मा**

मरिआई प्रमाणेच पोशम्मा देवीचा उत्सव केला जातो, शहरातील पद्मशाली लोक हे मरिआईलाच 'पोशम्मा' असे म्हणतात. या देवीच्या सर्व उपासना पध्दती व उत्सव मरिआई प्रमाणेच करून तिला बळी देण्याची प्रथा आहे. पोशम्मा देवीची मूर्ती ही काळ्या पाषाणातील असून तिचे स्वरूप उग्र आहे. चतुर्भूज असलेल्या या देवीच्या हातात नरमूंड, त्रिशूळ, गदा, अक्षयपात्र अशी आयुधे पाहावयास मिळतात. शहरातील बुधवार पेठ, लष्कर, भैय्या चौक, साखर पेठ, हैद्राबाद नाका, बोरामणी नाका, विडी घरकुल, अशोक चौक, भारतीय चौक, गांधी नगर, तुळजापूर वेस इत्यादी भागात पोशम्मा देवीची मंदिरे असून भारतीय चौकातील पोशम्मा देवीचे मंदिर हे शहरातील सर्वात जुने असल्याची माहिती मिळते. शहरातील पद्मशाली हे पोशम्मा देवीबरोबरच मरिआईचीच उपासना करतात व तिला ही 'पोशम्मा देवी' म्हणूनच संबोधतात.[२५२]

- **मातंगी**

महाराष्ट्रात सातारा, सोलापूर, कोल्हापूर या भागात ग्रामदेवतेच्या स्वरूपात मातंगी देवीची पूजा केली जाते, सुलभ प्रसुतीसाठीही तिची आराधना करतात.[२५३] एक तांत्रिक व क्षुद्र देवता, श्याम वर्ण, मस्तकी चंद्र, त्रिनेत्र, रत्नसिंहासनस्थ आणि चतुर्भूजात दंड, कृपाण, पाश व अंकुश धारण करणारी मातंगी हे दुर्गेचेच रूप मानले जाते. कन्नड भाषेत मातंगीदेवीला महारीण किंवा रामाने मारलेली एक स्त्री असा अर्थ कन्नड शब्दकोशात पहावयास मिळतो.[२५४] प्राचीन काळापासून देवी 'मातंगी' या नावाने ती कधी रेणुकेशी समरूपता साधून तर कधी एकरूपता साधून वास करीत आल्याचे आढळते. मातंगीचे उपासक स्वत:स 'गोपाळ' म्हणवितात, अशी महानुभवी ग्रंथात नोंद आहे. मरिआई देवता ही निर्मिती आणि संहार या दोहोंनाही कारण असल्याची व्यापक श्रध्दा जनजीवनात रूजलेली आढळते. मारी हा दक्षिणी (तामिळ) शब्द वर्षावाचक असून जी पर्जन्य देवाला वर्षणशील बनविते ती मारी असे तिच्या नावाचे स्पष्टीकरण देता येते. धरणीचे पुत्र म्हणविणारे 'महार' ज्या मरिआईचे उपासक आहेत ती मरिआईच धरणी देवी आहे. ती जिथे मातंगी या नावाने नांदते तिथे तिचे पुजारी हे महार व क्वचित मांगही आहेत. महाराष्ट्रात पेरणीच्या वेळी मांगीणीची ओटी भरण्याची प्रथा आहे हे यावरून ध्यानात येते. माहूर येथेअसणारी रेणुका देवी ही मातंगी देवी या नावाने ओळखली जाते. हे स्थान आज महाराष्ट्रात असले तरी आंध्र प्रदेशाला अगदी लागून असल्याने माहुर येथील मातंगीच्या उपासनेचा प्रसार आंध्र-कर्नाटकात झाला आहे.[२५५] सोलापूर हे आंध्र आणि कर्नाटकच्या सिमेवरील शहर असल्याने येथे या देवतेचे सर्व जाती-धर्मातील भक्त पाहावयास मिळतात. नवरात्रात अंबाबाईच्या परडीबरोबर मातंगी परडी आणि खंडोबा देवतेचा कोटंबा भरण्याचा प्रघात शहरात दिसून येतो.

- **म्हैसम्मा देवी**

शहराच्या भवानी पेठ परिसरात अशोक चौक येथे म्हैसम्मा देवीचे मंदिर आहे. ही एक क्षुद्र देवता असून महाराष्ट्रात वऱ्हाड भागात हिची स्थाने आहेत. महिसम्मा किंवा म्हैसम्मा हिला संसर्गजन्य रोगाची देवता मानली आहे. हिचा तांदळा (दगड) शेंदूर फासलेला असून मराठा वर्गातील व्यक्ती तिचा पुजारी असतो. गावात रोगाची साथ आली की वर्गणी जमा करून हिची जत्रा भरविली जाते.[२५६] म्हैसम्मा देवीला मंगळवार, शुक्रवार आणि आषाढ महिन्यात लोक दही-भाताच्या नैवद्याबरोबरच मांसाहाराचा नैवद्य दाखवितात.

- **सटवाई देवी**

सटवाई देवी ही ज्योतिबाच्या सान्निध्यातील परिवार देवता असून सटवाई किंवा षष्टी ही दक्षिणेतील क्षेत्रपाल देवाचा केंद्रबिंदू असलेल्या स्कंदाची पत्नी म्हणून सर्वपरिचित आहे.[२५७] शहरात पत्रा तालिम, टिळक चौक आणि जोशी गल्ली इत्यादि ठिकाणी सटवाईची मंदिरे आहेत. सटवाई देवी ही बाळाचे नशिब लिहून ठेवते, अशी धारणा असल्याने सटवाई पुजनाला महत्त्व आहे. शहरातील सर्व जाती-धर्मांच्या महिला आपल्या बाळाला घेऊन सटवाई पुजण्यासाठी जातात. यावेळी देवीला नारळ, गोड भात, पुरण-पोळी, गोड खिचडा, ओटी, साडी, चांदीचे नाक, डोळे, कान इत्यादी जुजबी वस्तूही अर्पण करतात. सटवाई ही प्रसुतीवर अधिराज्य गाजविणारी देवता असल्याने बाळाच्या जन्मानंतर तिच्या पुजनाला महत्त्वाचे स्थान आहे.

शहरात विविध जाती-धर्मांचे लोक राहतात, त्यांच्या सटवाई पूजनाच्या प्रथाही वेगवेगळ्या प्रकारच्या असल्याचे दिसून येते. हिंदु धर्मीय लोक सटवाईचे मंदिर उपलब्ध नसेल तर एखाद्या झ ाडाच्या बुंद्याजवळ सटवाईचे प्रतिक म्हणून छोटे-छोटे पाच दगड मांडून त्याची पूजा करतात. गुजर मारवाडी हे बाळाच्या उशाला पेन व कागद ठेवून त्याची पूजा करून खिचड्याचा गोड नैवद्य दाखवितात. या कागदावर सटवाई बाळाचे नशीब लिहून ठेवते, असा त्यांचा समज आहे. शहरात राहणारे पद्मशाली समाजातील स्त्रिया सटवाई पुजनाला 'छटी माँ' असे म्हणतात. या पुजेमध्ये घरातच 'चिपटे' हे माप ठेवून त्याच्या बाजूला पाच पत्रावळीवर गव्हाचे पीठ, कच्च्या भाज्या, कच्चे बोंबील, ज्वारी, ओला हरभरा यांची मांडणी करून पूजा करतात.

सटवाई पूजनाचे विधी जरी वेगवेगळे असले तर त्या मागे बाळाला चांगले आयुष्य लाभू दे हाच एक दृष्टीकोन असल्याचे स्पष्ट होते.[२५८]

- **खोकलाई देवी (होम मैदान परिसर**

खोकलेआई ही रोग निवारण देवता मानली जाते. होम मैदानाच्या पश्चिमेकडील बाजूस असणारे शहरातील हे खोकले आईचे एकमेव मंदिर आहे.

या ठिकाणी मंगळवार, शुक्रवार अमावस्या, पोर्णिमा व आषाढ महिन्यात भक्तांची गर्दी असते. व्यंकटेश लछमय्या बेरकल्लू हे गेल्या पन्नास वर्षापासून या देवीचे भक्त आहेत, त्यांचा या

देवीवर विश्वास असल्याचे ते सांगतात. या मंदिरात सरूबाई दगडु कसबे या मागील पन्नास वर्षापासून पुजारीन म्हणून देवीची सेवा करीत आहेत. तत्पूर्वी त्यांची आई येथे सेवा देत होती. सुरूवातीच्या काळात खोकलाई देवीचे हे मंदिर होम मैदानावर होते. पण सोलापूरचे आयुक्त रमानाथ झा यांच्या काळात शहरातील अनेक मंदिराबरोबरच या मंदिराचेही स्थलांतर करण्यात आल्याचे सरूबाई यांनी सांगितले.[२५९]

छायाचित्र क्र. १७



होम मैदानावरील खोकलाई देवी मंदिर
(सौजन्य: जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

शहरात श्रीकसबादेवी भोगडे गल्ली, श्रीअंबाबाई मंदिर शुक्रवार पेठ, श्रीनवदुर्गा भवानी पेठ, स्वयंभू कालिका धनलक्ष्मी विजापूर रोड, श्रीमहालक्ष्मी महालक्ष्मी नगर विजापूर रोड, संतोषी माता शिवगंगा नगर, वैष्णवी देवी सैफुल, त्रिकुटा वैष्णवी देवी, तुळजाई देवी जाई-जुई नगर, श्रीमहालक्ष्मी अक्कलकोट रोड, वरदायिनी अष्टभूजा माता अशोक नगर, श्रीदानम्मा देवी विजापूर रोड, आदिमाया आदिशक्ती इंदिरा नगर, श्रीमहालक्ष्मी लिमयेवाडी, शितलछायेची माता बुधवार पेठ, आदिशक्ती मुत्यालमा साखर पेठ, शिवगंगा माता शिवगंगा नगर, महालक्ष्मी मंदिर सिव्हील हॉस्पिटल, शेतकऱ्यांची अष्टभूजा देवी (कृषि उत्पन्न बाजार समिती), सैफुलची वैष्णवी देवी इत्यादी देवींची लहान लहान मंदिरे आहेत.

➢ **कवडी आणि परडी**

रेणुका, यल्लम्मा, मातंगी, मरिआई, भवानी, महालक्ष्मी इत्यादी नावांनी प्रसिध्द असणाऱ्या देवींच्या उपासनेत कवडी आणि परडीचे असाधारण महत्त्व आहे. गोंधळी, भुत्ये, पोतराज, मातंगी, जोगती, जोगतीण हे देवीचे उपासक वर्ग आपल्या अंगा-खांद्यावर कवड्यांचे विविध प्रकारचे अलंकार परिधान करतात. यांच्या गळ्यात कवड्यांच्या माळा असतात, भुत्ये कवड्यांनी मढविलेली टोपी घालतात. प्रत्यक्ष देवीलाही कवड्यांचा श्रृंगार प्रिय असल्याची धारणा देवीविषयक लोकगीतांतून वारंवार व्यक्त झालेली आहे. माळ आणि परडी ही देवीच्या उपासकांची प्रधान लांछने समजली जातात. यापैकी माळ ही कवड्यांचीच असते आणि परडी ही (बांबुच्या कामट्यांची टोपली - वंशपात्र) कवड्यांनी सजविलेली असते. कवडी ही जीवनदायी, संतानदात्री आणि सौभाग्यदात्री मानली गेली आहे.[२६०] शहरातील देवीचे अनेक उपासक माळ व परडी घेऊन मंगळवार व शुक्रवारी, अमावस्या, पोर्णिमा आणि नवरात्रात जोगवा मागताना दिसून येतात.

गोंधळी

गोंधळी हे देवीचे पुजारी असून त्यांनी परंपरेने करावयाचा कार्यक्रम म्हणजे गोंधळ होय. हे गोंधळी देवीची मनोभावे आराधना करून आपल्या भाषेत श्रोत्यांना संबळ व तुणतुण्याच्या साहाय्याने कथानक सांगतात. हा गोंधळाचा कार्यक्रम घरात लग्नकार्य पार पडल्यानंतर केला जातो. या गोंधळाच्या कार्यक्रमांमध्ये काकडा पेटवून देवीची पारंपारिक गीते व आरत्या म्हटल्या जातात. इतर वेळी हे गोंधळी गावोगाव संबळ व तुणतुणे वाजवून भिक्षा मागतात.[२६१]

३.१.१०. मठ

शहरातील हिंदु धार्मिक स्थळांमध्ये मंदिरांच्या जोडीला अनेक स्वतंत्र मठ अस्तित्त्वात आहेत. धार्मिक स्थळांमध्ये या मठांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. जुन्या काळात प्रवाशांना अनोळखी ठिकाणी धर्मशाळेप्रमाणे मठ हे आश्रयाचे स्थान होते. अशा मठातून विद्यादान होत असे, कित्येक मठात अन्नछत्र असत. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी निरनिराळ्या पंथांच्या स्वामींचे मठ पाहावयास मिळतात.[२६२] सामान्यत: ब्रम्हचारी, साधू, संन्यासी, बैरागी, भिक्षुक इत्यादी प्रकारच्या स्त्रिया व पुरूष यांच्या निवासस्थानास मठ म्हटले जाते. संस्कृतमध्ये 'मठ' म्हणजे वास्तव्य करणे, 'इनसायक्लोपिडीया ब्रिटानिका' मध्ये मठाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "Monastery is the

home of a religious community. The world is commonly used only of houses of men, but in what follows houses of women religious, widely though not properly known as convents will also be considered"[२६३]

'मोनाथेइन' या ग्रीक शब्दापासून 'मोनॅस्टरी' हा शब्द आला आहे. याचा अर्थ एकाकी राहणे, एकांतवासात जगापासून अलिप्त राहणे. भारतीय संस्कृतीमध्ये मठ, दर्गा आणि आश्रम यांचा संबंध जीवनाच्या अखेरच्या पर्वाशी जोडला आहे. सर्वसंगपरित्याग करून मानव ज्यावेळी चतुर्थ आश्रमात प्रवेश करतो त्यावेळी तो मठांचा आश्रय घेतो.[२६४]

सोलापूर शहर आणि परिसरामध्ये विविध संप्रदायाचे मठ अस्तित्त्वात आहेत. पंढरपूर, अक्कलकोट आणि कर्नाटकातील गाणगापूर याठिकाणी विठ्ठल, स्वामी समर्थ आणि दत्तात्रयाच्या मंदिरांना जोडून अनेक मठ अस्तित्त्वात आलेले आहेत. या धार्मिक स्थळांना भेटी देणारे भक्त त्या त्या ठिकाणी असणाऱ्या मठांमधून आपले वास्तव्य करीत आहेत. वरील धार्मिक स्थळे सोलापूर शहरास अत्यंत जवळ असल्याने अशा धार्मिक स्थळांचा व त्या अनुषंगाने असणाऱ्या मठांचा प्रभाव सोलापूर शहरावर पडलेला दिसून येतो. त्यामुळेच सोलापूर शहरात विविध संप्रदायाचे अनेक मठ निर्माण झाले. यामध्ये श्रीब्रहन्मठ होटगी, किरिटेश्वर महाराज मठ, नाशिककर महाराज मठ, राघवेंद्र स्वामी मठ, प्रभाकर महाराज मठ, इंचगिरी मठ, कवि शुभराय महाराज मठ, रूद्रांबिकादेवी मठ, बाजीआण्णा मठ, गोविंदबुवा मठ, दंडवते महाराज गुहा, फराळेश्वर मठ, सिध्दारूढ मठ, उदासी मठ, कुंटोजी मठ,व्यंकटेश मठ, लक्ष्मण महाराज वडार समाज मठ, शिवानंद स्वामी मठ, हुच्चेश्वर मठ, जयशंकर आश्रम, श्रीराजराजेश्वरी श्रीवीरहनुमान मंदिर व ऋषी आश्रम, दत्त मठ घोंगडे वस्ती इत्यादी मठांचा समावेश होतो.

- **श्रीबृहन्मठ होटगी**

सोलापूर शहरालगत मौजे होटगी येथील 'श्रीबृहन्मठ होटगी' हा मठ जुन्या काळातील असून 'श्रीशैलपीठाच्या' अधिपत्याखाली या मठाचा कारभार चालतो. इ. स. ५ व्या शतकात या मठाचे अध्यक्ष श्री मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामीजींनी या मठाचा जीर्णोध्दार केला. संपूर्ण भारतातील पंचाचार्य वीरशैवांचे काशी, उज्जेन, रंभापूरी, केदार आणि श्रीशैल ही पंचपीठे आहेत. पंचाचार्यांच्या मठामध्ये 'श्रीबृहन्मठ होटगी मठ' हा मठ वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. मौजे होटगी येथे असणारा हा मठ

गावाच्या पश्चिमेस असून अनेक वेळा या मठाचा जीर्णोध्दार झालेला आहे. या मठाचे महाद्वार लाल दगडात सुंदर कलाकृतीमध्ये निर्माण केले आहे. येथे १०० x ४० चौरस फुटाचा विशाल मंडप असून आजुबाजूला १५ ओवऱ्या आहेत. मठाच्या उत्तर भागात जगद्‌गुरू रेणुकाचार्य व वीरतपस्वी चन्नवीर महास्वामीजींचे मंदिर असून मठाच्या दक्षिण भागात विस्तीर्ण असे भक्तनिवास पाहावयास मिळते.

या मठाच्या माध्यमातून धार्मिक शिक्षण देण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. 'शिक्षण आणि धर्म' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे येथील मठाधिपतीचे म्हणणे आहे. हा मठ प्राचीन असला तरी आधुनिक काळात या मठाचा विस्तार झालेला आहे. सन १९२३ मध्ये या मठाच्या गादीवर वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी आरूढ झाले होते. ते कुशाग्र बुध्दीचे व धार्मिक प्रवृत्तीचे होते, भक्तगणांचे दारिद्र्य पाहून त्यांचे मन कळवळून येत असे. धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी खुप प्रयत्न केले. काही दिवस सोलापूर शहरातील फराळेश्वर मठात राहून त्यांनी अध्यात्मिकतेचे धडे लोकांना दिले. धार्मिक कार्य करण्यासाठी सोलापूर शहरात आपले वास्तव्य असावे, या हेतूने काही भक्तांनी कसबा परिसरात बृहन्मठ होटगी संस्थेच्या शाखेच्या एका मठाचे बांधकाम केले. याच मठात ते कायमस्वरूपी वास्तव्य करून राहिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी, म्हणून त्यांनी घोंगडे वस्ती भवानी पेठ येथे भव्य अशा 'सिध्दलिंगाश्रम' नावाचा मठ निर्माण केला. या आश्रमात विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी 'मद्विरशैव गुरूकुल' नावाची संस्कृत पाठशाळा चालू केली. या गुरूकुलात शिक्षण घेऊन अनेक बटू तयार झाले. त्यामध्ये केदारपीठाचे जगद्‌गुरू भिमाशंकरलिंग शिवाचार्य व काशीपीठाचे जगद्‌गुरू चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचा समावेश हेातो. बृहन्मठ होटगी मठाचे स्वामी वीरतपस्वी शिवाचार्य हे ६ फेब्रुवारी १९५६ रोजी शिवैक्य झाले. त्यानंतर या मठाच्या गादीवर तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी आरूढ झाले. त्यांनी सन १९५८ मध्ये बृहन्मठ होटगी मठाचे ट्रस्ट स्थापन करून अनेक शिक्षण संस्था चालू केल्या.

या मठामार्फत योगीराजेंद्र महास्वामीजींनी ५३ श्रावणमास तपो अनुष्ठान, ५३ धनुर्मास तपोनुष्ठान, ५३ नवरात्र अनुष्ठान केलेले आहेत. बृहन्मठ होटगी मठातर्फे शहर आणि शहराबाहेर अनेक मठांची निर्मिती केली आहे. पुज्य महास्वामीजींनी दिल्ली येथे संगम विहार या ठिकाणी भारतीय वीरशैव होटगी मठाची स्थापना केली आहे. त्यांचे जन्मस्थळ तलवारगिरी (जि. गुलबर्गा) येथे होटगी मठाची शाखामठ स्थापन करून वीरतपस्वी मंदिर बांधले. त्याचबरोबर श्रीक्षेत्र आळंद,

श्रीक्षेत्र धोत्री, श्रीक्षेत्र हणमगांव, अशा विविध ठिकाणी बृहन्मठ होटगी मठाच्या शाखा स्थापन करून धार्मिक क्षेत्रात भर घालण्याचा प्रयत्न केला आहे.

महास्वामीजींनी सोलापूर शहरात अक्कलकोट रोडवर मठाच्या माध्यमातून मठांची संकल्पना साकार करून महादेवाची पिंड, मंदिर आणि महाद्वार बांधकाम केले, येथे ध्यानमंदिर वीरतपस्वी मंदिर व आचार्य मंदिर या तिनही मंदिरांची निर्मिती अतिशय कलात्मकतेने केली आहे. वीरतपस्वी मंदिरात पूर्वेला १४ छोटी देवालये व पश्चिमेला १४ छोटी देवालये निर्माण केलेली आहेत. शिवाय बारा ज्योतिर्लिंग, शनिमंदिर, हनुमान मंदिर याठिकाणी पाहावयास मिळतात. सोलापूरच्या चन्नवीर नगरमध्ये श्रीवीरतपस्वी मंदिर हे एक अध्यात्मिक केंद्र व प्रेक्षणिय स्थळ म्हणून पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. सोलापूरातील नव्हे तर महाराष्ट्रातील उत्कृष्ट वास्तुकलेचा एक अद्‌भूत नमुना म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते.[२६५] या मंदिर व मठामार्फत प्रतिवर्षी गुरूपोर्णिमा, श्रावणमास, श्रीवीरतपस्वी आत्मज्योत रथोत्सव इत्यादी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाशिवरात्रीस होटगी व सोलापूर येथील मठातून यात्रा भरते. प्रत्येक गुरूवारी रात्री आठ वाजता श्री वीरतपस्वी पालखी निघते. मंदिरातील शिवलिंगाचे व वीरतपस्वी महास्वामीजींच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची प्रचंड गर्दी होते.

- **किरिटेश्वर मठ**

सोलापूरात सुमारे दोनशे पंचाहत्तर वर्षापूर्वी आपल्या तपोबलाने असंख्य भक्तगणांना पुनीत करून जीवंत समाधी घेणारे महाशिवयोगी किरिटेश्वर महाराज यांच्या नावाने हा मठ आहे. किरिटेश्वर म्हणजेच चन्नबसवेश्वर होय. त्यांचा जन्म सन १६९१ मध्ये कर्नाटकातील सुरपूर या गावी झाला. चन्नबसवेश्वरांनी आपले शिक्षण गुरूगृही राहून घेतले. सुरपूरहून ते सोलापूर शहरात श्रीशिवानंद स्वामी यांच्याकडे येऊन राहिले. बालपणापासूनच हुशार बुध्दीमत्ता असल्याने आपल्या तपोबलाने ते उच्चकोटीस पोहचले. शहरात आल्यानंतर मुगली स्वामींचे सान्निध्यही त्यांना लाभले. मुगली स्वामी आणि चन्नबसवेश्वर काशी येथे जात असताना तुळजापूरच्या भवानी मातेच्या दर्शनास गेले. तेथे ध्यानस्थ बसले त्यावेळी चन्नबसवेश्वरांनी आपल्या गळ्यात कवड्याची माळ घातली. ही कवड्याची माळ चन्नबसवेश्वर भक्तीभावयुक्त 'किरिट' करून वावरू लागले. तेंव्हापासून श्रीमहायोगी चन्नबसवेश्वर हे 'किरिटेश्वर' नावांनी प्रचलित झाले. किरिटेश्वर महाराज काशीहून सोलापूरास परत आले, मात्र मुगली महाराज काशी येथेच थांबले.

किरिटेश्वराच्या एका शिष्याने किरिटेश्वरांना सहजपणे विचारले की, आपला देह विसर्जन केंव्हा होणार आहे. तेंव्हा किरिटेश्वरांनी उत्तर दिले की, 'ज्यादिवशी मुगली स्वामी यांचे देहावसन होईल, त्यादिवशी मी जीवंत समाधी घेणार आहे'. शिष्याने परत त्यांना विचारले की, मुगली महाराजांचा मृत्यु झालेला आपणांस कसा कळेल ? तेंव्हा किरिटेश्वर म्हणाले की, ' जेंव्हा दोन पक्षी मठातील झाडावर एकत्र येऊन बसून बऱ्याच वेळाने निघून जातील, त्यादिवशी आम्ही जीवंत समाधी घेणार आहे.' सन १७६५ च्या चैत्र शुध्द प्रतिपदेस असे दोन पक्षी एकत्र मठाच्या झाडावर बसले आणि बऱ्याच वेळाने ते उडून गेले आणि त्याच दिवशी किरिटेश्वरांनी जीवंत समाधी घेतली. किरिट स्वामींनी ज्याठिकाणी जीवंत समाधी घेतली ते ठिकाण शहरातील उत्तर कसब्यात असून याच स्थळी श्रीरेवणसिध्द पालखीतून उतरले होते.[२६६]

किरिट स्वामी सोलापूरात येण्यापूर्वी शहरातील लिंगायत लोकांनी गुरूपीठाची अर्थात हिरेमठाची स्थापना केली होती. हाच हिरेमठ उज्जैयनी शाखेचा 'नंदीमठ' होय. हा मठ साडे तीनशे वर्षापूर्वीचा जुना दिसतो. कारण या मठाच्या जागेच्या मानपान व इनामाचे प्रकरण विजापूरच्या आदिलशाही काळात उद्‌भवले होते. त्याचा निकाल शके १५६३ कार्तिक शुध्द त्रयोदशीस लागला, अशाप्रकारचे आदिलशाही शिक्क्यांचे कागदपत्र सोलापूरच्या नंदीमठात उपलब्ध असल्याची माहिती मिळते.[२६७] सोलापूरचे पाटील, देशमुख व लिंगायत घराणे चारशे वर्षापूर्वीची असल्याचे या कागदपत्रातून दिसून येते. १७ व्या शतकापूर्वी मराठी भागात लिंगायत धर्मगुरूंचे मठ स्थापन होऊ लागले होते. शहरात किरिटेश्वरांचे उत्तर कसबा आणि भवानी पेठेतील मठा असे दोन मठ पाहावयास मिळतात.[२६८]

किरिटेश्वर मठाची परंपरा पाहिली असता या मठाच्या गादीवर अनेक स्वामी येऊन गेले. त्यामध्ये श्री वीरस्वामी, नागलिंग स्वामी, विरूपक्ष स्वामी, निरंजन निजगुण स्वामी, मुधोळ मृत्युंजय स्वामी इत्यादींचा समावेश होतो. निजगुण स्वामी वयाच्या ९६ व्या वर्षी शिवैक्य झाले. सन १९५५ साली पाचवे मठाधिपती म्हणून म. वि. मुधोळकर स्वामी महाराज झाले. मुधोळकर महाराजांचा जन्म सन १९११ मध्ये इंगळगी ता. मुधोळ येथे झाला. सन १९३० साली काशी येथे जावून त्यांनी वेदांताचार्य आणि विद्यावाचस्पती या पदव्या धारण केल्या. त्यांनी या मठाची धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक परंपरा टिकवली. त्यांनी विविध धार्मिक व शैक्षणिक संस्थांना मठाच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य

दिले. किरिटेश्वर मठाच्या माध्यमातून बसवेश्वर कॉलेज, लातूर या संस्थेस एक लाख रूपये, जनता कॉलेज, धारवाड पस्तीस हजार रूपये, बेल्लारी कॉलेज बेल्लारी पंचवीस हजार रूपये, दावनगिरी लिंगेश्वर देवस्थानास बांधकामासाठी एक लाख रूपये, बेळगांव, अक्कलकोट, मुरगुड, चित्तापूर, लिंगसूर इत्यादी ठिकाणच्या शिक्षण संस्थांना व वसतिगृहास आर्थिक सहकार्य केले. उच्चशिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या मठातर्फे पंचवीस हजार रूपये मदत दिली जाई. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था या मठामध्ये करण्यात येत असे. मुधोळकर स्वामींनंतर मृत्युंजय स्वामी सन १९५५ मध्ये या मठाचे मठाधिश झाले.[२६९] मृत्युंजय स्वामींनंतर या मठाची धुरा त्यांचे शिष्य स्वामीनाथ महास्वामीजी यांच्यावर आली. सध्या हेच या मठाचे मठाधिपती आहेत तर पुजारी म्हणून या मठामध्ये बिदरकोटी यांची सहावी पिढी शिवानंद कल्लप्पा बिदरकोटी हे आहेत.[२७०] या मठाच्या माध्यमातून विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून मठाची परंपरा जपण्याचा प्रयत्न स्वामीनाथ महास्वामीजी करीत आहेत.

- **संत कवी शुभराय महाराज मठ**

शहरात दक्षिण कसब्यात दत्त चौक परिसरात संत कवी शुभराय महाराजांचा मठ आहे. संत कवी शुभराय यांचा जन्म इ. स. १७५० मध्ये मद्रास राज्यातील पसुकोट प्रांतात मालूर या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव पन्नाम्मा व वडीलांचे नाव गिरिधरराय होते. कवी शुभराय यांचे घराणे सुसंस्कृत, धर्मनिष्ठ व व्यवहारकुशल होते. शुभराय महाराजांचे मूळचे नांव 'सुबराव' किंवा 'सुब्राव' असे होते. ते म्हैसूर संस्थानात बंगलूर येथे टिपु सुलतानच्या काळात दुय्यम दिवाणाच्या पदावर होते. त्यांच्या हुशारीने टिपुच्या दरबारात त्यांना पालखी पदस्थाचा मान मिळाला होता.[२७१]

कर्नाटक प्रांतात म्हैसूर येथे टिपू सुलतानाच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक अंदाधुंदीच्या काळात शुभराय महाराज घरदार सोडून फिरत फिरत पंढरपूर येथे आले. पंढरपूर मुक्कामी असताना त्यांना श्रीसद्गुरू चिमप्पा 'रामदासी' हे गुरु म्हणून लाभले. शके १७०६ मध्ये शुभराय सोलापूर शहरात आल्यानंतर त्यांचे वास्तव्य हे बेगम पेठेत 'हत्ती बावडी' च्या ओवरीत होते.[२७२] या विहिरीचे पाणी हत्तीकडून काढीत म्हणून त्यास 'हत्ती बावडी' असे नांव दिले गेले होते. या ठिकाणी त्यांचा विरक्त व परमार्थाविषयी लौकिक वाढू लागला. याच पेठेत राहणारे हिरण्णा पाणीभाते व लक्ष्मण पाणीभाते यांनी शुभराय महाराजांचे प्रथम शिष्यत्त्व पत्करले आणि त्यांनी बेगम

पेठेत महाराजांसाठी एक छोटेसे विठ्ठल मंदिर बांधून दिले. त्यावेळी महाराजांकडे त्यांनी घरातून निघताना आणलेली तांब्याची हनुमानाची मूर्तीही होती. आज या हनुमानाच्या मूर्तीची उपासना डफरीन चौकातील काळजापूर मारूती जवळील कुंभकोणी घराण्याकडे आहे. महाराजांच्या शिष्य परिवारात शिंपी, साळी, सराफ, खेत्री, जंगम, गवळी, शास्त्री इत्यादी विविध जाती-धर्मांच्या लोकांचा समावेश होता.[२७३] शिष्य परिवारातील सोलापूरचे किल्लेदार आबासाहेब कुंडले यांच्या विनंतीवरून इ. स. १७८५ साली शुभराय महाराज या मठाच्या जागेत वास्तव्यास आले.[२७४] या मठाच्या बांधकामासाठी महाराजांच्या अनेक शिष्यांनी मदत केली. शिष्य परिवारातील बाबा जाईल यांनी मठातील काही बांधकाम करून दिले, तसेच चिमा नायकीण हिने मठाच्या अग्रभागी असलेला तट बांधून दिला, तो दिवस त्रिपूरी पोर्णिमेचा होता. तेंव्हापासून दर त्रिपूरी पोर्णिमेस या तटावर दिवे लावून तटाची पूजा केली जाते. या पूजेमुळे चिमा नायकीण अमर बनली.[२७५] सोलापूर नगरपालिकेच्या पहिल्या नऊ सभासदांपैकी नरसिंह नखाते यांनी मठाच्या बांधकामास आर्थिक मदत केली. बाळकृष्ण रणसुभे यांनी मठास चांदी-तांब्याची भांडी व पोशाख दिला.[२७६]

छायाचित्र क्र. १८



शुभराय महाराज मठातील विठ्ठल मूर्ती
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

शुभराय मठाची स्थापना झाल्यानंतर आषाढी व कार्तिकी एकादशीस रथयात्रा काढाण्याची परंपरा शुभराय महाराजांनी सुरू केली. आजही आषाढी, कार्तिकी एकादशीस मठातून रथ मिरवणुक निघते. त्या रथामध्ये राळेरासकर यांच्या घराण्यातील श्रीकृष्णाची मूर्ती ठेवण्याची वहीवाट चालू आहे. चातुर्मासात ही मूर्ती शुभराय मठात असते व नंतर ती राळेरासकरांच्या घरी पाठविली जाते. त्यांचे शिष्य शेटे यांना चंद्रभागेच्या पात्रात सुंदर, सुरेख व प्रसन्न ध्यानमुद्रा असलेली वालूकामय स्वयंभू विठ्ठलाची बालमूर्ती सापडली. तिची प्राणप्रतिष्ठापना मठात केली तो दिवस आषाढी एकादशीचा होता.[२७७] याप्रमाणे शुभराय महाराजांनी आपल्या मठात विठ्ठल मूर्तीची स्थापना करून सोलापूरकरांना पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन सोलापूरातच करवून दिले.

मठाची व्यवस्था

महाराजांनी मठाचे उत्तरदायित्त्व रावजी बुवा बारामतीकर या शिष्याकडे सोपविले. ती आजतागायत त्यांच्याच वंशात चालू आहे. आज त्यांच्या पाचव्या पिढीतील जयकृष्ण जनार्दन उर्फ मधुकर बुवा इथे वास्तव्यास आहेत तर त्यांची कन्या शुभांगी बुवा या आज मठाची सर्व व्यवस्था पाहतात. बुवा हे मुळचे बारामती भागातील त्यांचे पूर्वज मुजूमदार होते. रावजीबुवा हे सोलापूरात सराफी व्यवसाय करीत होते. महाराजांच्या सहवासात आल्यानंतर त्यांनी अनुग्रह घेतला. कडक वैराग्य, निस्सीम भक्ती, नि:स्पृह वृत्ती आणि परोपकार या सर्व गुणांनीयुक्त असे श्रीशुभराय महाराज ३६ वर्षे सोलापूरात राहिले. इ. स. १८२० मध्ये ते मृत्यू पावले.[२७८]

संत शुभराय महाराज यांना संस्कृत, तेलगु, कन्नड, उर्दू व मराठी या भाषा अवगत होत्या. ते एक उत्तम कवी, गायक व चित्रकार होते. त्यांना नृत्यकलाही अवगत होती व वेदशास्त्राचा चांगला अभ्यास होता. त्यांनी स्वत: काढलेली सुमारे पाचशे चित्रे आज सोलापूरात बुवा परिवाराकडे उपलब्ध आहेत. या चित्रातील रेखांकन सफाईदार असून झाडापासून खलून बनवलेले जलरंग या चित्रात वापरलेले आहेत. दोनशे वर्षापूर्वीची ही चित्रे व त्यातील रंग अजूनही सुस्थितीत आहेत. त्यांच्या चित्रांचे विषय प्रामुख्याने रामायण, महाभारत व कृष्णभक्ती हे होते. या चित्रांच्या प्रथम प्रदर्शनाचे उद्घाटन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते ह. दे. प्रशालेच्या मुळे हॉलमध्ये झाले होते. सोलापूर महानगरपालिकेनेही शुभरायांच्या कलेचा आदर करून मुंबईच्या आर्ट गॅलरीप्रमाणे शहरात आर्ट गॅलरी बांधून त्यास 'शुभराय आर्ट गॅलरी' असे नांव दिले.[२७९]

शुभरायांच्या भजन, पुजन, किर्तन, पुराण, प्रवचनाचा सोलापूरच्या समाजमनावर चांगला प्रभाव पडला. मठातील सर्व नित्यनैमित्तिक उत्सव समारंभ जनता जनार्दनाच्या कृपेवर व भिक्षेवर चालत. पेशव्यांनी दिलेली देणगी देखील त्यांनी गोर-गरीबांना वाटून टाकली. मठात मारूती, नरसिंह, नागनाथ, राम, लक्ष्मण, सीता व नवग्रहांच्या मूर्ती तसेच खडावा व महाराजांचे एक जुने चित्र आहे.[२८०] रामनवमी, नृसिंह जयंती, वसंत पूजा (वसंत पंचमी), आषाढी व कार्तिकीस रथोत्सव, गोपाळकाला, रथसप्तमी इत्यादी सर्व ऋतूतील उत्सवांचा समावेश होतो. तसेच महाराजांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम ही मोठ्या भक्तीभावाने साजरा होतो. आषाढी व कार्तिकी एकादशीस शुभराय मठातर्फे दरवर्षी रथ मिरवणुक काढली जाते. ही मिरवणुकीची परंपरा शुभराय महाराजांनीच सुरू केली. २३० वर्षांपासून शुभराय मठात ही परंपरा बुवा परिवाराने अखंडपणे जपली आहे.[२८१]

- **श्री प्रभाकर महाराज मठ (सम्राट चौक)**

शहराच्या उत्तरेकडील बाजूस कारंबा रोडवर श्री प्रभाकर महाराजांचा प्रसिध्द मठ असून त्यांचे शिष्य नागप्पा दौलताबाद यांनी मठासाठी जागा दिली. ज्याठिकाणी प्रभाकर महाराजांनी आपला देह ठेवला त्याच ठिकाणी महाराजांची समाधी आहे.

छायाचित्र क्र. १९



प्रभाकर महाराज समाधीस्थळ व मठ
(सौजन्य: जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

धारवाड जिल्ह्यातील बंकापूर या गावी विठ्ठलपंत आणि तुळसाई या दाम्पत्याच्या पोटी प्रभाकर महाराजांचा जन्म झाला. वयाच्या सातव्या वर्षी ते गृहत्याग करून विजापूरी आले. विजापूर येथे ११ वर्षे पाण्यात उभे राहून त्यांनी हनुमानाची उपासना केली आणि श्री गुरूबसव्वा स्वामीकडे गेले. लिंगायत गुरूंनी ब्राम्हण शिष्यास मुसलमानी मंत्र देऊन निजामुद्दिन अवली या दर्ग्यात तो मंत्र सातत्याने अठ्ठाविस वर्षे म्हणण्याचा आदेश दिला. हा मंत्र 'या अल्लाह हो काफी, या अल्लाह हो शाफी, या अल्लाह हो माफी' । असा आहे. प्रभाकर महाराज विजापूर येथे निजामुद्दिन अवली या दर्ग्यात गेल्यानंतर त्यांना फकीर वेशात श्रीदत्त प्रभुचे दर्शन झाले. नंतर गदगच्या जंगलात महाराजांनी कंदमुळे व झाडपाला खाऊन कडक साधना केली. नंतरची सहा वर्षे प्रभाकर महाराज हे इंचगिरी येथे भाऊसाहेब उमदी महाराज यांच्याकडे राहिले. तेथील साधना पूर्ण झाल्यानंतर सन १९१० च्या सुमारास ते सोलापूरात आले. त्यावेळी त्यांचे वय पन्नासीच्या पुढे असावे, पाचव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलेले प्रभाकर महाराज यांची मातृभाषा कानडी होती. त्यांच्यावर इंचगिरी येथील भाऊसाहेब उमदी महाराज, तिकोटीकर स्वामी महाराज, गुरूबसय्या स्वामी महाराज यांचा प्रभाव होता.[२८३]

शहरात आल्यानंतर प्रभाकर महाराजांनी सिध्देश्वर मंदिर परिसरात कांही दिवस जप केला. नंतर दक्षिण कसब्यातील रामचंद्र फुलारी यांच्या वाड्यात सतरा वर्षे त्यांचे वास्तव्य होते, आजही फुलारी यांच्या वाड्यात देवघरात महाराजांच्या 'पादुकांचे' पूजन केले जाते.[२८३] महाराजांच्या शिष्यवर्गात हिंदु, मुसलमान, पारशी व इतर सर्व जमातींच्या लोकांचा समावेश असे, प्रभाकर महाराजांचा नामजपावर विश्वास होता ते प्रत्येकास जपमाळ देऊन जप करावयास सांगत. महाराज उत्कृष्ट धन्वंतरी होते, त्यांच्या औषधांनी कित्येक लोक व्याधीमुक्त झाले. कर्म, भक्ती व ज्ञान यांचा मनोहर संगम प्रभाकर महाराजांच्या जीवनात दिसून येतो. आत्मज्ञानाचा उपयोग ते शिष्यास देत असल्याने त्यांनी जाहिरपणे प्रवचन, किर्तन, कधीही केले नाही. बालपणापासून महाराजांचे सारे आयुष्य साधना करण्यात गेले. शिष्यांना भजनाचा नेम लावून दिला. १५ फेब्रुवारी १९५७ रोजी प्रभाकर महाराजांनी आपला देह ठेवला.[२८४] प्रभाकर महाराजांच्या मृत्युनंतर त्यांच्या असंख्य भक्तांनी सम्राट चौकात कारंबा रोडवर त्यांचे 'समाधी मंदिर' बांधून भव्यदिव्य अशी वास्तु निर्माण केली. ही वास्तु म्हणजेच 'प्रभाकर महाराजांचा मठ' आहे. या मठात असणारी महाराजांची पालखी व चांदीचा रथ पाहण्यास हजारो भक्तगण गर्दी करतात. मठामध्ये जमिनीच्या तळघरात 'ध्यानमंदिर' निर्माण केले आहे. या ध्यानमंदिरातून शहरातील हजारो लोक ध्यानस्थ बसलेले दिसून येतात.[२८५]अशा प्रकारे शहरातील प्रभाकर महाराज मठ हा धार्मिक दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

- **श्रीक्षेत्र इंचगिरी मठ (नेहरू नगर)**

या मठावर नाथ सांप्रदायाचा प्रभाव असून कर्नाटकामधील विजापूर जिल्ह्यातील इंडी तालुक्यात श्रीक्षेत्र इंचगिरी येथे सन १९०३ मध्ये सद्‌गुरू समर्थ भाऊ महाराजांनी या मठाची स्थापना केली. या मठाचीच सोलापूर शहरातील ही उपशाखा सन १९४४ मध्ये स्थापना करण्यात आली. इंचगिरी सांप्रदायाचा उगम श्रीसद्‌गुरू समर्थ गुरूलिंग जंगम महाराज यांच्यापासून झाला. या सांप्रदायाचा मुख्य आधार 'दासबोध' हा ग्रंथ आहे.

सन १९४४ मध्ये सोलापूर शहरात स्थापन करण्यात आलेला हा मठ लक्ष्मण महाराज यांनी आपल्या पंचावन्न वर्षाच्या कारकिर्दीत विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांनी विस्तारीत केला. शहरात असणाऱ्या या इंचगिरी मठाचे मठाधिपती म्हणून सन १९९९ पासून आजतागायत श्री सुरेंद्रनाथ महाराज आपली सेवा बजावित आहेत. हा मठ नाथ सांप्रदायाचा प्रसार करणारा असून या मठाच्या सोलापूर शहराच्या विविध भागात १३ शाखा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. हा मठ नाथ सांप्रदायाचा असला तरी विविध जाती-जमातींचे मठाधिपती इंचगिरी येथील मठामध्ये होऊन गेले. त्यांनी आपल्या अध्यात्म सेवेद्वारे मठाची परंपरा जपण्याचा प्रयत्न केला.[२८६]

मठाच्या माध्यमातून नित्यनैमित्तिक कार्यक्रमांबरोबरच वार्षिक कार्यक्रमांचे ही आयोजन केले जाते. त्यामध्ये सद्‌गुरूंच्या जयंती व पुण्यतिथी, रामनवमी, गुरूपोर्णिमा, श्रावण शुध्द प्रतिपदा, दत्त जयंती इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होतो. माघ शुध्द द्वितीया आणि तृतीया या दरम्यान भाऊसाहेब महाराज, गिरीमल्लेश्वर महाराज, गुरूपुत्रेश्वर महाराज यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. यावेळी कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र, गोवा इत्यादी राज्यातून हजारो भक्त या मठात हजेरी लावतात. दिंडी, पालखी घेऊन ते सोलापूरातील या मठात येतात. कार्यक्रमांबरोबरच सामाजिक कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते. स्त्रीजागृती व्हावी, यासाठी हुंडाविरोधी चळवळ, सामुहिक विवाह, अंतरजातीय विवाह, विधवा विवाह, दारूबंदी यासारखे सामाजिक कार्यक्रमही मठात राबविले जातात.[२८७]

- **श्रीगुरूनाथ दंडवते महाराज गुहा मठ (जुना एम्प्लॉयमेंट चौक)**

सोलापूर शहरात रेल्वे स्टेशनपासून जवळच असलेले दत्त सांप्रदायाचे महत्त्वाचे ठिकाण 'प. पू. गुरूनाथ बाबा दंडवते महाराज गुहा' हे होय. सोलापूरचे दंडवते महाराज हे दत्तसंप्रदायी होते. त्यांनी गायत्री पुरश्चरणाने साक्षात्कार करून घेतला. गाणगापूर, सोलापूर आणि हैद्राबाद याठिकाणी

त्यांचे मठ आहेत.[२८८] हैद्राबाद निवासी रामराव व सीतामाई या दाम्पत्याच्या पोटी गाणगापूर या ठिकाणी ३१ जानेवारी १९०७ गुरूनाथ महाराजांचा जन्म झाला. त्यांचे बालपण व शिक्षण हैद्राबाद येथेच गेले. उस्मानिया विद्यापीठातून ते बी. ए. उत्तीर्ण झाले व वयाच्या चोविसाव्या वर्षी त्यांनी हैद्राबाद येथील वारकारी सांप्रदायिक सत्पुरूष बापुराजा यांच्याकडून अनुग्रह घेतला. आईच्या इच्छेखातर गुरूनाथ यांनी आपल्या आईला कावडीमध्ये बसवून हैद्राबाद ते पंढरपूरची वारी पायी केली. गुरूनाथांनी हैद्राबाद संस्थानात राजे शामराज बहाद्दूर यांच्या दरबारात १७ वर्षे मानाची नोकरी केली. सुरूवातीपासूनच परमार्थाकडे कल असलेल्या गुरूनाथ यांची वैवाहितक आपत्तीमुळे वैराग्यवृत्ती वाढत गेली. त्यांनी संस्थानातील नोकरी सोडून परमार्थी सेवा सुरू केली.

गुरूनाथांनी १११ वेळा श्रीसत्यनारायण महापुजा, १०८ वेळा भागवत सप्ताह वाचन करून गायत्री पुरश्चरणाचा श्रीगणेशा केला. एक पुरश्चरण म्हणजे '२४ लाख जप' व्हावयास हवा. त्यांनी ठाणे येथे वरदविनायकाची व सोलापूरात दंडवते महाराज गुहा येथे श्रीमारूती आणि नवग्रहांची प्राणप्रतिष्ठापना केली. त्यांनी हैद्राबाद ते तिरूपती ५३२ मैल दंडवत घालून व्यंकटेशाचे दर्शन घेतले. त्यानंतर गाणगापूर, पंढरपूर, धरणी नृसिंह व शेवटी बद्रीनाथ या ठिकाणी दंडवत पूर्ण केले म्हणून लोक त्यांना 'दंडवते महाराज' म्हणून ओळखू लागले. ३२ वर्षे पायी प्रवास करून वस्त्या, खेडी, सोलापूर, पुणे, ठाणे, मुंबई अशी मोठ-मोठी शहरे इत्यादी ठिकाणी राहणाऱ्या भक्तजनांशी त्यांनी स्वत:हून जवळीक साधली. भक्ती मार्गाच्या प्रचारासाठी व जनउध्दारासाठी महाराजांनी गाणगापूर, सोलापूर, पंढरपूर, मांजरी (पुणे) व ठाणे या ठिकाणी आश्रमांची स्थापना केली.[२८९]सोलापूर शहरातील जुना एम्प्लॉयमेंट चौकातील 'प. पू. गुरूनाथ दंडवते महाराज गुहा' हे गुरूनाथांच्या दत्तभक्तीतून आणि गायत्री उपासनेतून साकारलेला मठ आहे. या स्थानात 'श्रीदत्ताचे मंदिर' असून हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. सन १९३८ मध्ये कावड यात्रेच्या निमित्ताने दंडवते महाराज सोलापूरात आले. तसेच हैद्राबाद ते पंढरपूर ही दंडवत यात्रा महाराजांनी सन १९५६ मध्ये सुरू केली होती. 'दंडवत' यात्रा आळंदीमार्गे अक्कलकोट व नंतर कार्तिक अखेर सोलापूरला पोहोचली. गणपती घाटावर आठ दिवस त्यांचे वास्तव्य होते. या काळात त्यांनी दररोज अन्नसंतर्पण, चक्री भजन श्री. दत्त मंदिरात दंडवत घालत दर्शन असे नित्य कार्यक्रम केले. या आठ दिवसांच्या कालावधीत शहरातील अनेक भाविकांनी अनुग्रह घेऊन त्यांचे शिष्यत्त्व पत्करले. नंतर महाराज बाळे मार्गे दंडवत घालीत वडवळ येथे नागनाथ मंदिरात गेले व तेथून दंडवत यात्रा करीत पंढरपूरी पोहचले.

हैद्राबाद - पंढरपूर ही त्यांची पहिली दंडवत यात्रा होती. पांडुरंगाचे दर्शन घेऊन परत महाराज भक्तांच्या इच्छेनुसार सोलापूरास आले. सोलापूरात रामभाऊ शिरसीकरांनी महाराजांना राहण्यासाठी गणपती घाटावर एक झोपडी घातली होती. यावेळी गणपती घाटावर ११११ 'श्रीसत्यनारायण' पुजनाचा कार्यक्रम व अन्नसंतर्पणही केले. या धार्मिक कार्यक्रमानंतर सोलापूरात महाराजांच्या अनुष्ठानासाठी जागेचा शोध सुरू झाला आणि 'काळजापूर मारूती मंदिर' परिसरात दादा देशपांडे या भक्ताच्या प्रयत्नाने महाराजांना जागा मिळाली. आज ज्या ठिकाणी 'श्रीगुरूनाथ गुहा' आहे हीच ती जागा होय. इ. स. १९६२ साली महाशिवरात्रीच्या शुभदिनी गुहेवर कोटिलिंगेश्वर व नंदीची स्थापना केली आणि औदुंबराच्या झाडास 'श्रीपादतीर्थ' असे नामाभिदान केले. सन १९६३ मध्ये कोटिलिंगेश्वरास ब्राह्मणांकडून १०८ रूद्राभिषेक केला. इ. स. १९६२ मध्ये सोलापूर स्थानी 'श्रीदत्त जयंती' सुरू केली. सन १९६८ साली सोलापूरातील या गुहेत प्रासादिक दत्त मूर्तीची विधीयुक्त प्राणप्रतिष्ठा केली. ही दत्त मूर्ती संगमरवरी असून ती जयपूरहून आणलेली आहे.[२९०]

गुहेचे स्वरूप व जीर्णोध्दार

पूर्वाभिमुख असलेल्या या मठाची मूळ जागा सहा हजार चौरस फुट आहे. जुन्या वास्तूचा सन २०१० मध्ये दंडवते महाराजांचे नातू गोविंदराज महाराज यांनी जीर्णोध्दार केला. या गुहा मंदिराची रचना सभामंडप व गर्भगृह तसेच तळघरात गुहा अशी आहे. तळघरात ध्यानधारणेसाठी गुहा, वरील मजल्यावर दत्त मंदिर, गर्भगृह तसेच इतर देव-देवतांची छोटी-छोटी मंदिरे, भव्य सभामंडप, पार्किंग, पाकगृह, बाहेरील बाजूस दोन दुकान तसेच दुसऱ्या मजल्यावर मोठा सभागृह, व तिसऱ्या मजल्यावर काही खोल्या, स्वच्छतागृह, स्नानगृह व पाण्याची टाकी आहे.[२९१]

नित्य काकडारती, जप, माधुकरी, महिलांचे नित्य भजन, दररोज सकाळी ९ वाजता दत्ताला नैवद्य व आरती होऊन माधुकरी दिली जाते. रात्रीची पंचपदी दर एकादशीस एकादशी महात्म्य, वाचन, गीतापठण असा या ठिकाणी नित्यक्रम असतो. हा नित्यक्रम व सेवा श्रीमती मंगलाताई शेटे यांचा नातु मंगेश शेटे हा करीत आहे. सुरूवातीला भूमीपुजनापासून श्रीमती मंगलाताई दिगंबर शेटे या ठिकाणी सेवा करीत होत्या. दत्त जयंती उत्सव, गुरू पोर्णिमा, दर महिन्याची संकष्टी चतुर्थी तसेच प्रभुराज महाराज जयंती उत्सव साजरे केले जातात. दत्त जयंती हा सात दिवसाचा उत्सव येथे साजरा केला जातो. या काळात अखंड वीणा, गुरूचरित्र, एकोपारायण व वैयक्तिक पारायण, किर्तन, भजन,

प्रवचन, संगीत दरबार इत्यादी कार्यक्रम होतात. कणबसकर यांची चौथी पिढी या स्थानात पौरोहित्याची सेवा देत आहे.[२९२] अनेक भक्तांच्या प्रेरणेने दंडवते महाराज गुहे समोरील एम्प्लॉयमेंट चौकापर्यंतच्या रस्त्याचे 'प. पू. गुरूनाथ बाबा दंडवते महाराज पथ' असे नामकरण झाले.[२९३]

- **श्रीसद्‌गुरू गोविंद बुवा मठ (पूर्व मंगळवार पेठ)**

सोलापूर शहरात वारकरी सांप्रदायाच्या मठांपैकी एक महत्त्वाचा मठ म्हणून 'श्रीसद्‌गुरू गोविंद बुवा मठ' ओळखला जातो. सुमारे १०० वर्षापूर्वी ह. भ. प. श्रीगोविंद बुवा महाराजांनी या मठाची स्थापना केली. गोविंद बुवा विठ्‌ठलाचे निस्सिम भक्त व पंढरपूरचे वारकरी होते ते नियमित पंढरीची वारी करीत. या भक्तीतूनच त्यांनी शहरात वारकरी संप्रदायाच्या या मठाची स्थापना केली. सोलापूरातील विश्रांती चौकात श्रीसद्‌गुरू गोविंद बुवा यांची समाधी आहे.

या मठाचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेला असून प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर समोर एक छोटेसे मंदिर पाहावयास मिळते. या मंदिरात विठ्‌ठल-रूक्मिणीची वालूकामय मूर्ती असून मूर्ती गोविंद बुवा यांना सापडल्याचे सांगितले जाते व त्यांनीच या ठिकाणी या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. मठात सन १९४० पासून दैनंदिन पूजा-अर्चा व वार्षिक धार्मिक उत्सव करण्याचे काम जोशी घराण्याकडे आहे. हे जोशी घराणे मुळचे कर्नाटकातील आहे. दत्तात्रय लक्ष्मण जोशी सन १९४० पासून या मठात सेवा करीत होते. त्यांच्यानंतर पद्‌माकर दत्तात्रय जोशी आणि महेश पद्‌माकर जोशी हे या मठात सेवा करीत आहेत. या जोशी परिवाराला 'दत्तम्‌ भटजी' परिवार म्हणून ओळखले जाते. हा मठ आज जोशी घराण्याचे निवासस्थान आहे. मठातील विठ्‌ठल मूर्ती दिड फुट उंच आणि रूक्मिणी मूर्ती सव्वा फुट उंच आहे, या मूर्ती मनमोहक आहेत.

दररोज सकाळी मठात नित्यपूजा होते मूर्तीस जलाभिषेक आरती होते, प्रत्येक एकादशीस महाभिषेक व विशेष पूजा केली जाते. आषाढ महिन्यात आषाढ वद्य अष्टमी ते चतुर्दशी सप्ताह आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे अमावस्येला मठात काला किर्तन होते कार्तिक महिन्यात एकनाथ षष्ठी, चिदंबरम षष्टी, कोजागिरी पोर्णिमा ते कार्तिक वद्य सप्तमीपर्यंत दररोज संध्याकाळी ७ वाजता दिप आराधना व पोथी वाचन होते. या पोथीमध्ये देवी महात्म्य, हरतालिका पोथी, गणपती, ऋषीपंचमी व वटसावित्री इत्यादी पोथ्यांचा समावेश असतो.[२९४] या मठात होणाऱ्या कार्यक्रमांचा सर्व खर्च स्वत: जोशी घराण्याकडून केला जातो.

- **श्रीराघवेंद्र स्वामी मठ (मुरारजी पेठ)**

आंध्रप्रदेशातील मंत्रालय येथे असलेले राघवेंद्र स्वामीजींचे स्थान सोलापूरातही मठाच्या रूपाने पाहावयास मिळते. डिसेंबर १९७३ मध्ये या मठाची उभारणी झाली. सुरूवातीला गाभारा बांधून राघवेंद्र स्वामींच्या वृंदावनाची प्रतिष्ठापना झाली. आंध्रप्रदेशात कर्नुल जिल्ह्यात यम्पिगनुर तालुक्यात तुंगभद्रा नदीच्या काठावर महाक्षेत्र मंत्रालय येथे राघवेंद्र स्वामींचा मठ आहे. कृष्णदेव रायाच्या दरबारात तिम्मण भट हा सेवेत होता. तिम्मण भटाची पत्नी गोपाबा ही परम साध्वी होती, हिच्या पोटी राघवेंद्राचा जन्म झाला. त्यांनी शके १५४५ मध्ये तंजावर येथे सुधींद्रनिर्धांच्याकडून संन्यास स्वीकारला. राघवेंद्र स्वामींनी संजिवनी समाधी घेऊन ३४३ वर्षे पूर्ण झाली. राघवेंद्र स्वामींचा मठ सोलापूर शहरातील मुरारजी पेठेत असून त्याचे क्षेत्र तीन हजार चौरस फुट आहे.

वर्षभरामध्ये या मठात विविध धार्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. आषाढ वद्य पंचमीला टीकाचार्य पुण्यतिथी, श्रावण वद्य प्रतिपदेला आराधना महोत्सव, चैत्र वैशाखात वसंत पुजा,अक्षय तृतीयेस राघवेंद्र स्वामीजींच्या वृंदावनाला गंधलेपन, कार्तिक पोर्णिमेस सहस्त्र दिपोत्सव, पौषवद्य अमावस्येला पुरंदर दासाची पुण्यतिथी, माघ शुध्द नवमीला श्रीमध्वाचार्यांची आराधना इत्यादी कार्यक्रम साजरे केले जातात. मध्वाचार्य हे राघवेंद्र स्वामींचे गुरू मानले जातात, या मठाचा सर्व कारभार मंत्रालयाच्या (आंध्र प्रदेश) मार्फत चालतो. शहरातील सर्व समाजातील १५ हजाराहून अधिक भक्तगण दर गुरूवारी, पोर्णिमा व सणांना येथे येऊन श्रध्देने दर्शन घेतात. येथे व्यवस्थापकासह अन्य कर्मचारी मंत्रालयामार्फत नेमले जातात व त्यांना वेतनही त्यांच्याकडूनच अदा केले जाते हे या मठाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या मठाची दुसरी शाखा सोलापूर शहरातील काळजापूर मारूतीच्या पाठीमागे आहे.[२९५]

- **नाशिककर महाराज मठ (चौपाड)**

शहरातील चौपाड विठ्ठल मंदिराच्या जवळ असलेला हा मठ वारकरी संप्रदायाचे श्रध्दास्थान असून ह.भ.प. बाबासाहेब नाशिककर महाराज यांनी या मठाची स्थापना केली. त्यांनीच सोलापूरकरांना 'माघवारी' दिंडीचा वारसा दिला हा वारसा आजतागायत सोलापूरकरांनी चालू ठेवला आहे. नाशिककर महाराजांनी आपल्या मठात विठ्ठल-रूक्मिणी मूर्तीची प्रतिष्ठापना करून वारकरी सांप्रदायाचा प्रसार व प्रचार केला. चौपाड विठ्ठल मंदिरात दररोज त्यांचे किर्तन चाले.

चौपाड विठ्ठल मंदिर व भंडगे विठ्ठल मंदिरातील मूर्तीची प्रतिष्ठापना बाबासाहेब नाशिककर महाराजांच्या हस्तेच करण्यात आली. सोलापूर शहरात त्यांचा शिष्य परिवार मोठा होता. त्यामध्ये शंकर भडंगे, हरयेनमः महाराज, बाबासाहेब भडंगे, कृष्णाहरी भडंगे, परशुराम मास्तर, बाजी आण्णा, शिव राम बुवा, श्रीपतबुवा काटे इत्यादींचा समावेश होतो. या आपल्या शिष्यांना सोलापूर शहरात स्वतंत्र मठ व फड काढण्याची परवानगी देखील नाशिककर महाराजांनी दिलेली होती. त्यामुळे सोलापूर शहरात बाजी आण्णा यांनी मठाची स्थापना केली आणि तोच मठ पुढे 'बाजी आण्णा मठ' म्हणून ओळखला जाऊ लागला. या मठाद्वारे वारकरी संप्रदायाच्या कार्यास हातभार लावण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. नाशिककर मठाच्या माध्यमातून त्यांचे हे कार्य त्यांची चौथी पिढी श्रीहरी महाराज नाशिककर हे चालवित आहेत.[२९६]

- **रूद्रांबिका देवी मठ**

बाराव्या शतकात स्त्रियांना पुरूषांप्रमाणे हक्क आणि अधिकार नव्हते तर सामाजिकदृष्ट्या त्यांचा दर्जा कनिष्ठ होता. त्यामुळे स्त्रियांवर अन्याय होत हे ओळखून बसवेश्वरांनी स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी, शिक्षणासाठी प्रयत्न चालविले होते. त्यांचा हा दृष्टीकोन महत्त्वाचा असल्याने त्यांच्या काळात व नंतर अनेक स्त्रियांनी शिक्षण घेऊन वचने लिहिलेली दिसून येतात. अशा स्त्रियांमध्ये अक्कमहादेवी, नागम्मा, मुक्ताक्का, गंगांबिका, निलांबिका, लष्कामा इत्यादींचा समावेश होतो. स्त्रियांमध्ये लेखन, वाचन, स्वातंत्र्य, श्रमनिष्ठा निर्माण व्हावी म्हणून बसवेश्वरांनी प्रयत्न केले होते.[२९७] त्यांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपामध्ये अनेक शरणांबरोबर शरणींचाही समावेश होता. अनुभव मंटप या धर्म परिषदेच्या अनेक स्त्रिया सदस्य होत्या.

श्रीमल्लिकार्जून मंदिराच्या समोर असणारा 'रूद्रांबिका देवी मठ' हा शहरातील एकमेव स्त्रिच्या नावाने असलेला मठ आहे. हा मठ म्हणजे नालतवाड वीरेश्वर महाराज यांचे राहते घर होते. नालतवाड यांची श्रीसिध्देश्वर मंदिरात समाधी असून शिवशरणी रूद्रांबिका ही या नालतवाड शिवशरणांची कन्या होती. नालतवाड हे श्रीसिध्दरामेश्वर यांचे निस्सिम भक्त होते. त्यामुळे उपजतच रूद्रांबिकेला हा वारसा आपल्या पित्याकडून मिळाला होता. रूद्रांबिका मातेच्या चेहऱ्यावर शिवाचे तेज होते, संसारात दृढ होऊन स्थिर राहिल्या. भगवे वस्त्र परिधान करून, गळ्यात रूद्राक्ष माळा, कानात रूद्राक्षाची कर्णफुले आणि कपाळावर भस्म धारण करीत. भक्तांनी वीरेश्वरांच्या घराचे

रूपांतर मठात केले होते व या मठात रूद्रांबिका एकट्याच शिवाच्या सान्निध्यात राहत होत्या. त्यांनी शरणांच्या त्यागमय जीवनाचे अनुकरण केले होते. लौकिक भाग्याचा त्याग करून शिवलिंगालाच पती समजून जीवन जगत होत्या. पिता वीरेश्वर यांच्यावर दृढ श्रध्दा ठेवून सत्याच्या मार्गाने त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून रूद्रांबिका यांनी वीरशैव समाजामध्ये सामाजिक व धार्मिक कार्यास योगदान दिले. त्यासाठी त्या आपल्या मठात पुराण, पुण्यकथा, प्रवचन व किर्तने असे कार्यक्रम चालवित.

अनेक मंगल कार्यक्रमांबरोबरच बसवेश्वरांच्या जन्मदिनी पाळण्याचा कार्यक्रम त्या करीत. त्यामूळे शहरात बसवराज अशी नांवे ठेवलेली अनेक मुले होती. शिवशरणांचे संस्कार बालमनावर ठसावे म्हणून बसव जयंतीच्या वेळी त्या लहान मुलांकडून नाटके करून घेत. याचबरोबर आपल्या पित्याकडून आलेला 'दासोह' चा प्रघात त्यांच्या मठात चालू होता. दासोहसाठी कोणत्याही भक्तांकडून त्यांनी देणगी मागितली नाही. त्या स्वतः प्रसाद तयार करीत, शेकडो लोक या दासोहमध्ये प्रसाद घेण्यासाठी येत असत. वीरेश्वर शरणांच्या पश्चात जवळ जवळ पन्नास वर्षे त्यांनी आपल्या मठात दासोह चालविले. अशा या वीरेशैव शरणी १३ डिसेंबर १९७७ रोजी सोलापूरातील या मठामध्ये शिवैक्य झाल्या.[२९८]

याच मठात तळघरात त्यांची समाधी आहे तर वरच्या मजल्यावर त्यांचा फोटो आहे. कर्नाटकातील कुरूतकोट (गदगजवळ) येथील बसवांबिका माता सन १९७७ पासून आजतागायत या मठात आपली सेवा बजावित आहेत सिध्दय्या स्वामी हिरेमठ हे येथे पुजारी म्हणून काम पहातात. मठामध्ये बसव जयंती, श्रावण, दसरा, रूद्रांबिका पुण्यतिथी, महाशिवरात्री इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतात. 'रूद्रांबिका' भजनी मंडळामार्फत दररोज संध्याकाळी येथे भजनाचा कार्यक्रम होतो. या मठाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त असल्याचे शांताबाई रामलिंग माळगे या ज्येष्ठ महिला सांगतात.

३.२ मुस्लिम धार्मिक स्थळे

मध्ययुगीन कालखंडातील सोलापूर शहर हे कधी आदिलशाही तर कधी निजामशाहीच्या वर्चस्वाखाली होते तर काही काळ येथे मुघल बादशहा औरंगजेबानेही आपली सत्ता प्रस्थापित केली होती. सोलापूर शहरावर मुस्लिमांच्या राजकीय सत्ता प्रस्थापित झाल्यामुळे धार्मिक जीवनावर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून येते. मुस्लिम सत्तांबरोबर अनेक मुस्लिम लोक व संत सोलापूर शहरात

येऊन स्थायिक झाले. त्यांनी शहरात अनेक धार्मिक स्थळे निर्माण केली. त्यामध्ये मशिदी, ईदगाह, पीरांच्या समाधी आणि मदरसा इत्यादींचा समावेश होतो. या धार्मिक स्थळांमुळे शहराच्या धार्मिक इतिहासात भर पडल्याचे दिसून येते.

३.२.१ मशिद

इस्लाम धर्मात प्रार्थनास्थळाला 'मशिद' म्हटले जाते. मशिदीची रचना ही साधारणपणे चौरसाकृती किंवा आयताकृती असून मशिदीमधील उघड्या जागेला 'सहन' म्हणतात. सहनाच्या मधोमध पाण्याचा हौद असतो, मशिदमध्ये प्रार्थनेपूर्वी हात-पाय स्वच्छ धुण्यासाठी (वजू करण्यासाठी) या हौदातील पाण्याचा उपयोग होतो. मशिदीच्या मक्केच्या दिशेकडील भिंतीला 'किल्ला' असे म्हणतात. या भिंतीत मध्यभागी असलेल्या अर्धगोलीय कोनाडयास 'मेहराब' असे म्हणतात. मेहराबच्या उजवीकडे जवळच इमामाच्या धर्मोपदेशासाठी एक चबुतरा निर्माण केला जातो, त्यास 'मिंबर' म्हटले जाते. मिंबर हा लाकूड, हस्तीदंत, संगमरवर अथवा अन्य प्रकारच्या पाषाणात, कोरीव काम करून बनविलेला असतो. भिंतीला लागून एक मंडप असतो, त्यास 'लिबान' असे म्हणतात. राजघराण्यातील लोक अथवा स्त्रियांसाठी असणाऱ्या खास जागेस 'मक्सूरा' म्हणतात. सहनाच्या इतर भिंतीना कमानपंक्तीयुक्त ओवऱ्या असतात, त्यांना 'रिबाक' या नावाने ओळखले जाते. मशिदीना तीन प्रमुख प्रवेशद्वारे असून बाहेरील बाजूस पायऱ्यांचे रूंद जिने असतात. नमाजासाठी बाग देणाऱ्या मुअज्जीनचा आवाज लांबवर पोहचावा या दृष्टीने मिनारची रचना केलेली असते. लिबान हा रिबाकपेक्षा उंच असतो तर मिनार हा लिबानपेक्षाही उंच असतो. मशिदीत इमामास महत्त्वाचे स्थान असते. तो मशिदीतील प्रार्थनेचा प्रमुख असतो, हा 'इमाम' काबाच्या दिशेला तोंड करून नमाज पडतो तर बाकीचे मुस्लिम बांधव त्याच्या पाठीमागे राहून त्याच्या कृतीचे अनुकरण करतात. काबाची दिशा समजून येण्यासाठी मशिदीच्या मक्केकडील भिंतीमध्ये असलेल्या 'मिहराब' (कोनाडा) कडे तोंड करून नमाज अदा केला जातो. सोलापूर शहरातील मुस्लिम बांधव मशिदी, दर्गे अथवा ईदगाहमधून नमाज अदा करतात. [२९९]

- **किल्ल्यातील ३२ खांबी मशिद**

सन १४६० च्या दरम्यान दुसरा महमद शहा बहामणी याच्या काळात सोलापूरचा भूईकोट किल्ला बांधला. या किल्ल्याच्या आतील भागात असणाऱ्या मशिदीस ३२ खांब असल्यामुळे ती '३२ खांबी मशिद' म्हणून ओळखली जाते. बारकाईने निरीक्षण केले असता या मशिदीचे निर्माणात हिंदु

मंदिराचे स्तंभ असल्याचे स्पष्ट होते. किल्ल्यामध्ये उध्दवस्त अवस्थेत असलेल्या मल्लिकार्जून मंदिराचे दगडी खांब व या मशिदीचे स्तंभ यामध्ये फारच साम्य आहे. उत्तर चालुक्यकालीन मंदिरातील स्तंभांप्रमाणेना हे स्तंभ आहेत. शिवाय या मशिदीच्या बांधकामात मधोमध चौरसाकृती दगडी फुलांची नक्षी असलेले खंडीत भाग बसविलेले दिसतात. यावरून किल्ल्याच्या बांधकामानंतर किल्ल्यातीलच इमारतीचे सुटे भाग घेऊन आदिलशाही काळात ही मशिद बांधली गेली असावी.

पूर्वाभिमुख असलेल्या या मशिदीचे छत सपाट असून त्यावर एक गोलाकार घुमट बांधलेला आहे. तळाशी सर्वच स्तंभ चौकोनी दगडी आसनावर उभे आहेत, तीन अष्टकोनाचे थर व त्यामध्ये दोन गोल थर अशी स्तंभाची कंबर आहे तर या स्तंभाचे धड चौकोनी आहे. मानेच्या जागी एक अष्टकोन व तीन वर्तुळाकृती कडी आहेत. तसेच स्तंभाच्या कंठस्थानी थाळीच्या आकाराची दगडी शिळा आहे. खांबाचा शिर्षभाग दगडी तबकामध्ये चौरसपुष्ठा ठेवल्याप्रमाणे आहे. या स्तंभ शिर्षकाशी नागबंद कोरलेले आहेत, प्रत्येक खांब वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्तंभावरील नक्षीमध्ये विविधता आढळते. मशिदीचे छत उभ्या-आडव्या लांब दगडी शिळांनी बांधलेले आहे. स्तंभ किंवा छताच्या बांधकामात दगडांना खाचा घेऊन हे दगड एकमेकांत घट्ट बसविलेले आहेत यास 'लॉकिंग पध्दत' म्हणतात.

छायाचित्र क्र. २०



भुईकोट किल्ल्यातील बत्तीसखांबी मशिद
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

चालुक्य काळात व यादव काळात मंदिर किंवा इमारती बांधत असताना दगडी शिळा एकमेकांमध्ये घट्ट बसवूनच बांधकाम केले जाई. मशिदीच्या अंतर्गत भागातील भिंतीवर मत्स्य

शिल्पे, कमळ शिल्पे, चंद्रकोर इत्यादी सुबक नक्षीकाम आढळते. स्तंभांना देखील अधून मधून टपोऱ्या मोत्यांची माळ घातल्याप्रमाणे नक्षीकाम केलेले आहे. ही ३२ खांबी मशिद १८ मि. २५ सेंमी. लांब आणि ७ मि. ४५ सेंमी. रूंद आहे. बऱ्याच काळापर्यंत या मशिदीमध्ये मुस्लिम समाज नमाज पडत असे आधुनिक काळात प्रार्थना स्थळ म्हणून या मशिदीचा वापर होत होता.[३००]

- **जामा मशिद**

सोलापूर शहरातील शुक्रवार पेठेत असलेली जुम्मा (जामा) मशिद ही विजापूरचा आदिलशहा पहिला याच्या कालखंडात बांधल्याचा उल्लेख सापडतो. आदिलशाहीच्या अधिपत्त्याखाली ज्यावेळी सोलापूर शहर होते, त्यावेळी सोलापूर परगण्यासाठी आदिलशाही दरबारातून पाठवण्यात आलेले फारशी भाषेतील फरमाने महत्त्वाची आहेत.[३०१] आदिलशाहीच्या काळात बांधण्यात आलेल्या या जामा मशिदीची माहिती सोलापूरच्या किल्ल्याच्या तिसऱ्या दरवाजावर बसवलेला फारशी भाषेतील आठ ओळीमध्ये असणाऱ्या क्रमांक ३ च्या शिलालेखवरून स्पष्ट होते. या शिलालेखामध्ये १५८८-८९ सालातील आदिलशाही सुलतान अलिआदिलशहा व त्याचा अधिकारी बाबाजी जाबित खान यांनी ही मशिद बांधल्याचा उल्लेख आहे. म्हणून या मशिदीला 'आदिलशाहीकालीन मशिद' या नावाने ओळखले जाते.[३०२]

शहरात असणाऱ्या अनेक मशिदीपैकी ही मशिद सर्वात मोठी असून मशिदीच्या देखभालीसाठी अलि आदिलशहाकडून खतिब साहेब, बुवा साहेब फरास व दाऊद साहेब इत्यादींना जमिनी इनाम मिळाल्याची माहिती सापडते.[३०३] या मशिदीमध्ये नमाज अदा करण्यासाठी औरंगजेब बादशहा ब्रम्हपूरीहुन सोलापूर शहरी येत असे. त्यामुळे ही 'जुम्मा मशिद' आदिलशाही व मुगल काळात प्रसिध्द होती. औरंगजेबाच्या एका नातवाचे लग्न या मशिदीमध्येच झाल्याचे समजते, त्यावरुन त्याची ही नातवधू 'सोलापूरी बेगम' म्हणून ओळखली जात होती.[३०४] मशिदीच्या व्यवस्थापनासाठी मुत्तवली असत, सन १९३२ मध्ये जाफरसा हाजी कादर मुंढेवाडी यांनी वफ्क कायद्याप्रमाणे मशिदीच्या जमा-खर्चाचा हिशेब सादर न केल्यामुळे शहरातील मुस्लिम बांधवांनी त्यांच्या विरोधात तक्रार अर्ज दिला होता.[३०५] यावरून असे दिसते की, मशिदीच्या जमा-खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम हे मुत्तवली करीत असत. सध्या या मशिदीची देखभाल पाच मुत्तवलीमार्फत केली जाते. त्यामध्ये अय्युब मंगलगिरी, इसाक शेख, लियाकत बेसकर, अनिस दुरक्कर इत्यादींचा

समावेश होतो. सध्या या मशिदीचे 'इमाम' म्हणून मुम्ती अब्दुल हमीद सेवा देत आहेत. मशिदीचे क्षेत्र पाच एकर असून मशिदीच्या समोरील बाजूस 'हौसी हजरत मलिक अंबर' यांची कबर आहे.[३०६]

- **काळी मशिद**

सोलापूर शहरात आदिलशहा, कुतुबशहा आणि औरंगजेब बादशहा अनेक वेळा येऊन गेले. त्यांनी सोलापूर किल्ल्याचे किल्लेदार, मनसबदार नेमले. या काळात बांधलेल्या अनेक मशिदीपैकी उत्तर कसब्यातील 'काळी मशिद' (कानी मशिद) ही होय. या मशिदीचे मुळ नांव 'मशिद-ए-फैज-ए-आम' असून ३२० वर्षापूर्वी बादशहा औरंगजेबाचा सरदार मुहम्मद अली यांनी ही मशिद स्थापन केली.[३०७] बांधकाम केल्यानंतर नमाज पढण्याच्या ठिकाणी किंचित तिरपे बांधकाम झाल्याने या मशिदीला 'कानी' (तिरपी) मशिद म्हणून संबोधण्यात येऊ लागले. पुढे 'कानी' ऐवजी 'काळी मशिद' असेच नांव रूढ झाले.

विजापूरहून सोलापूरास आलेले 'फैज-अली-शहा' बाबा नावाचे संत या मशिदीत वास्तव्य करीत होते. त्यामुळे या मशिदीला 'मशिद-ए-फैज' असे नांव पडले. त्यांच्या मृत्युनंतर याच मशिदीत त्यांचा दर्गाही बांधण्यात आला. बारा हजार वर्गफुटापेक्षा जास्त परिसर असलेल्या या मशिदीत पूर्वी तालिम होती, सध्या ती बंद करण्यात आली आहे. वजू करण्यासाठी दोनशे वर्षापूर्वीचा जुना हौद आणि त्यातील हिरवेगार पाणी लक्षवेधक आहे. सन १९९८ साली मशिदीच्या दगडी बांधकामावर लोखंडाची जाळी लावून गिलावा करण्यात आला. मशिदीचा घुमट अतिशय सुंदर असून त्यावर नक्षीकाम केलेले आहे.[३०८] या मशिदीची देखभाल पंचकमिटीमार्फत पाहिली जाते.[३०९]

- **पानगल मशिद**

शनिवार पेठेत धार्मिक उत्सव आणि धर्मस्थळांची परंपरा मोठी आहे. जुन्या मंदिराप्रमाणे या भागात मशिदी आणि दर्गेही आहेत. शहराच्या या भागामध्ये हिंदु आणि मुस्लिम बांधव आपापले उत्सव भक्तीभवाने साजरे करतात. शनिवार पेठेत असलेली ही 'पानगल मशिद' पानगल कुटुंबियांनी सुमारे तीनशे वर्षापूर्वी स्वःखर्चाने बांधली. नंतरच्या काळात शहरातील अनेक मुस्लिम बांधवांनी पुढाकार घेऊन या मशिदीचा विस्तार केला. यामध्ये मरहुम अब्दुल्ला पानगल, घुडूभाई आलीम, अब्दुल रहेमान इरकल, महम्मद अली मोहोळकर, बाबुमियाँ चंडरकी इत्यादींचा समावेश होतो. या

मशिदीच्या व्यवस्थापनासाठी ट्रस्ट असून खाजाभाऊ नालबंद हे सध्या या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत.[३१०] औरंगजेब बादशहाने सन १६९२ मध्ये पानगल मशिदीच्या प्रांगणात 'शाही आलमगीर' नावाचा 'ईदगाह' बांधला. या ईदगाहला आजही मुस्लिम समाजात मानाचे स्थान आहे.[३११]

- **हाजी हजरत खान मशिद**

शहरात चार हुतात्मा पुतळा परिसरात असलेली 'हाजी हजरत खान मस्जिद' होय. हाजी हजरत खान यांनी सन १९२० साली जागा विकत घेऊन या ठिकाणी ही मस्जिद बांधली. याच मस्जिदीच्या मागील बाजूस मुस्लिमांसह सर्वधर्मिय समाजासाठी चाळही बांधण्यात आली. मस्जिदीच्या स्थापनेनंतर काही वर्षांनी सर अब्दुल लतिफ खान यांनी या मस्जिदीत धार्मिक शिक्षण देण्यासाठी मदरसा आणि अनाथाश्रम सुरू केले. पुढे मदरशाला 'लतिफीया मदरसा' असे नांव देण्यात आले. या मस्जिदीचे पहिले धर्मगुरू अब्दुल्ला मदनी हे होते. या मदरशातून आजपर्यंत बारा धर्मगुरू तयार झालेले आहेत. केवळ कुराण आणि हदिस यांना मानणाऱ्या अहिल हदिस (वहाबी) जमातीचा पाया सोलापूर शहरात घालण्यात हाजी हजरत खान आणि अब्दुल्ला मदनी यांचा सिंहाचा वाटा आहे. मस्जिदीच्या स्थापनेपासून हाजी हजरत खान घराण्याकडे या मस्जिदीच्या देखभालीची जबाबदारी आहे. दर शुक्रवारी अनेक मुस्लिम बाधव नमाजासाठी या मस्जिदीत येतात. शहराच्या मध्यवर्ती भागात ही मस्जिद असल्याने सरकारी कार्यालये व परिसरात खाजगी नोकरीत असलेले मुस्लिम बांधव दुपारच्या नमाजासाठी येथे येतात. नमाजाबरोबरच दर शुक्रवारी प्रवचनही होते. येथे असलेल्या मदरशामध्ये मौलाना सत्तार हे मुलांना अरबीतील अक्षरे शिकवितात. अब्दुल्ला मदनी यांच्यानंतर दुसरे मौलाना म्हणून मौलाना महमंद इस्माईल यांनी तब्बल ४० वर्षे जबाबदारी पेलली होती. त्यांचे नातू सत्तार हे सध्या मौलाना म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.[३१२]

- **बाबा कादरी मशिद**

शहरातील उत्तर कसब्यामध्ये एकशे साठ वर्षापूर्वी बांधलेली 'बाबा कादरी मशिद' महत्त्वाची मशिद असून या मशिदीत 'संत सय्यद शा बुशा कादरी' यांचे वास्तव्य होते. संत कादरी यांच्या मृत्युनंतर त्यांचा दर्गाही येथेच बांधण्यात आला. सय्यद युसुफअली खतीब यांनी मशिदीचा जीर्णोध्दार

व विस्तारीकरण केले. धर्मस्थळाच्या परंपरेप्रमाणे या मशिदीतही जुनी तालिम होती. सध्या मशिदीचे अध्यक्ष सय्यद याकुबअली खतीब हे आहेत.[३१३]

- **एकरार अल्ली मशिद**

साखर पेठेत असलेली एकरार अल्ली मशिद ही एकशे तीस वर्षापूर्वी बांधण्यात आली आहे.[३१४] इब्राहिम अब्दुल गफुर लालकोट हे मुस्लिम संत या मशिदीत होते. ही मशिद अक्कलकोट रस्त्यावर असल्याने बाजारासाठी आलेले लोक इब्राहिम अब्दुल गफुर लालकोट या मुस्लिम संताकडे येत असत. या मशिदीचे प्रवेशद्वार दक्षिणेकडे असून ४२ x २५ असा मशिदीचा परिसर आहे. या मशिदीमध्ये अंजुमन मदरसा नावाने एक मदरसा चालविला जातो, या मदरशामध्ये २० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[३१५]


- **नुरानी मशिद**

सोलापूर शहराच्या पाच्छापेठ परिसरामध्ये दोनशे वर्षापूर्वीची प्रसिध्द 'नुरानी मशिद' असून पन्नास वर्षापूर्वी या मशिदीचा विस्तार करण्यात आला. या मशिदीच्या जवळच 'जिंदा शहा मदार दर्गा' असून मुळ उत्तर प्रदेशातील मख्खमपूरचे संत शाह बद्रोद्दिन जिंद शहा मदार देशभर मुस्लिम धर्माचा संदेश देत सोलापूरात वास्तव्यास आले, त्यांच्याच नावाने हा दर्गा आहे. याच परिसरात सन १९२० सालापासून 'अब्दुल रहिम अन्सारी बाबांचा दर्गा' ही आपणांस पाहावयास मिळतो. नुरानी मशिदीमध्ये इतर मशिर्दींप्रमाणे तालिम आहे. याठिकाणी प्रशिक्षण घेतलेले हसन अकबर शेख, अल्लीशेर बडेपीर, मकबुल बडेपीर या नामवंत पैलवानांनी जिल्ह्यात अनेक कुस्त्या जिंकल्या होत्या.[३१६]

- **गाय खाटीक मशिद (कुरेशी मशिद)**

दक्षिण कसब्यात सोन्या मारूती मंदिरासमोर असलेली ही गाय खाटीक मशिद सन १८७८ मध्ये बांधण्यात आली.[३१७] या परिसरात पूर्वी सर्व जाती-धर्मांचे लोक राहत. त्यामध्ये खाटीक समाजाचे लोकजास्त प्रमाणात होते. विशेष म्हणजे जुन्या गिरणीचे उद्घाटन ज्या दिवशी झाले त्याच दिवशी या मशिदीची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. १३५ वर्षापूर्वीच्या या मशिदीमध्ये संत हाजीमाई यांचे वास्तव्य होते. त्यांच्या मृत्युनंतर त्यांना याच परिसरात दफन करण्यात आले.[३१८]

छायाचित्र क्र. २१



गायखाटीक (कुरेशी) मशिद
(सौजन्य: जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

- **गौसिया मशिद**

याच परिसरात आणखी एक महत्त्वाची मशिद म्हणजे 'गौसिया मशिद' होय. शंभर वर्षापूर्वी स्थापन झालेल्या या मशिदीत अरबी 'मदरसा' चालविला जातो. अलिकडील काळात पाच्छा पेठेतील मुलांना हिंदी, अरबी आणि उर्दू भाषांचे प्रशिक्षण मिळावे, यासाठी याच मशिदीत 'हजरत फातिमा मदरसा' स्थापन करण्यात आला आहे.[३१९]

- **मक्का मशिद**

सन १९५७ मध्ये विजापूर वेस भागात सिध्देश्वर पेठेत मक्का मशिदीची स्थापना करण्यात आली असून मशिदीचे क्षेत्र तीन हजार फुट आहे. येथे रमजान ईद, बकरी ईदवेळी नमाज अदा केला जातो, त्याचबरोबर धार्मिक प्रवचनेही या मशिदीमध्ये आयोजित केली जातात. मुस्लिम बांधवांचे हे श्रध्दास्थान असल्याने सोलापूरच्या धार्मिक इतिहासात मक्का मशिदीस महत्त्व प्राप्त झाले आहे.[३२०] शहरातील मोठ्या मशिदींप्रमाणे मुस्लिम मोहल्ल्यातून अनेक लहान मशिदी पाहावयास मिळतात. शहराच्या विविध भागामध्ये ज्या ज्याठिकाणी मुस्लिम बांधवांनी आपली वसाहत केली, त्या

त्याठिकाणी अशा मशिदींची व दर्ग्यांची बांधकामे केली आहेत. अशा मशिदीचे स्वरूप लहान असले तरी मुस्लिमांचे धर्मस्थळ म्हणून त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.[३२१]

इस्लाममध्ये मूर्ती पूजा निषिध्द असल्याने मशिदीत प्रतिमा अथवा मूर्ती आढळत नाहीत. सामुहिक प्रार्थनेच्या वेळी गरीब-श्रीमंत असा भेदभावही केला जात नाही. स्त्रियांना मशिदीतून नमाज पडण्याची मनाई नसली तरी स्त्रिया आपल्या घरीच नमाज अदा करतात.

३.२.२ दर्गे

मुसलमान साधूंच्या समाधीला 'दर्गा' असे म्हणतात. भारतातील मुस्लिम बांधवाप्रमाणे हिंदुदेखील या दर्ग्यांची उपासना करतात. या दर्ग्यांना कशिद्याचे ध्वज, पांढरे कोंबडे, साखर, वेलदोडे, मातीचे घोडे, छोटे पाळणे, रूदार कपडे, मिठाई, अन्न, बकरे इत्यादी वस्तु वाहतात. संताच्या दर्ग्याचे उरूस म्हणजे ईश्वर व भक्त यांचा संयोग मानला जातो. दर्ग्यांची व्यवस्था ही पीरांच्या वंशजाकडे व इतरांकडे ही असते, सुन्नी पंथीयांना दर्गापूजा मान्य नाही. सोलापूर शहरामध्ये ज्याप्रमाणे मशिदींच्या वास्तु निर्माण झाल्या त्याचप्रमाणे अशा मशिदींच्या आश्रयाला आलेल्या मुस्लिम संतांचे दर्गे पाहावयास मिळतात. अशा पीरांचा (संतांचा) ज्या ठिकाणी मृत्यु झाला तेथेच नंतरच्या काळात लोकांनी त्या त्या पीरांचे दर्गे अथवा समाधीची निर्मिती केली. अशा दर्गांमध्ये शहाजौरवली दर्गा, मस्तान बाबा दर्गा, मलंगपीर बाबा दर्गा, पीरहाजी फरिद्दोद्दिन चिश्ती दर्गा होटगी, हजरत सय्यद जल्लालुद्दिन बुखारी कादरी चिश्ती अलविला दर्गा, हाजी हजरत खान दर्गा, जाबीदखान दर्गा, पीर महिबुब सुबहानी दर्गा, गौस मोहियोद्दिन मुल्ला बाबा दर्गा इत्यादींचा समावेश होतो.

- **हजरत पीर पठाण शहाजोहरवली बाबा दर्गा**

सोलापूर शहरातील सिध्देश्वर तलावाच्या दक्षिणेकडील काठावर हा दर्गा आहे. शहाजोहरवली हे सत्पुरूष मुळ सिंध प्रांतातील मुलतानचे राहणारे होते. हे सिध्देश्वरांच्या समकालीन असावेत असे वाटते. या सत्पुरूषास अलि आदिलशहा बादशहाकडून सोलापूरपैकी बरीच जमिन इनाम म्हणून मिळाली होती. त्यांनी सोलापूर शहरामध्ये जीवंत समाधी घेतली, त्यांची कबर सिध्देश्वर मंदिराच्या वेशीस लागून आहे.[३२२] शहाजोहरवली यांच्या दर्ग्याचे बांधकाम आदिलशाहीच्या काळात झाले असून या दर्ग्यावर असणारा नगारखाना हा औरंगजेबाने बांधून या दर्ग्यास त्याने काही जमिनीही

दान दिलेल्या होत्या.[३२३] या दर्ग्यामध्ये असलेले शिलालेख भंगलेल्या अवस्थेत आहेत. दर्ग्याची रूंदी व लांबी ४.५७ मीटर, दर्ग्याच्या कमानीची उंची ३.४ मीटर व रूंदी १.८२ मीटर आहे.[३२४] दर्ग्याचे प्रवेशद्वार हे चांदीचे असून सोलापूर शहरातील धातु शिल्पकार दत्तात्रय येरकोल्लु यांनी बनविलेले आहे. उर्दू भाषेतील कठीण आयती असलेले हे शिल्प बनविण्यास येरकोल्लु यांना दोन वर्षे लागली.[३२५] या दर्ग्याची देखभाल व्यवस्थापन विश्वस्तांमार्फत होते, सध्या अब्दुल गफ्फार हे विश्वस्त आहेत. दरवर्षी मुसलमान सफर महिन्याच्या १०, ११ व १२ या तारखेस पीर शहाजहोरवलीचा उरूस साजरा केला जातो. उरूसामध्ये संदलची मिरवणुक मोठ्या प्रमाणावर निघते. पूर्वी ही मिरवणुक गॅसबत्त्यांच्या उजेडामध्ये काढली जाई. सन १९३२ साली पाचशे ते सहाशे लोक मिरवणुकीमध्ये सामील झाले होते. मिरवणुकीमध्ये ताशा, वाजंत्री, बॅण्ड, चौघडा इत्यादी वाद्ये व दारूकामही मोठ्या प्रमाणावर होत असे. या मिरवणुकीत हिंदु-मुस्लिमांचा समावेश असतो.[३२६]

- **पीर हाजी फरिद्दोद्दिन चिश्ती दर्गा**

सोलापूर परिसरातील होटगी येथे असणारा हा प्रसिध्द दर्गा असून या दर्ग्यास आदिलशहाकडून जमिन इनाम मिळाली होती. पीर हाजी फरिद्दोद्दिन चिश्ती हे विजापूर येथील सुप्रसिध्द खाजा अमिनोद्दिन यांच्या वंशातील होते. आपल्या धर्मगुरूबरोबर औरंगाबाद येथून धर्मगुरूंच्या आज्ञेनुसार सोलापूरातील होटगी येथे वास्तव्यास आले. आपल्या चमत्कारांनी त्यांनी अनेक गोर-गरीब रोग्यांना बरे केले असे सांगण्यात येते. याच हेतूने विजापूरच्या आदिलशहाने त्यांच्या मुजावरांना दर्ग्याच्या उत्सवाकरीता जमिन इनाम म्हणून दिली होती. पीर चिश्ती यांचा मृत्यु हिजरी सन १०८२ मध्ये होटगी येथे शाबान तारीख १५ रोजी झाला. त्यांचा दफनविधी आणि दर्ग्याच्या आजुबाजूचे कंपाऊंड भिंत आदिलशाहीच्या खर्चातून केले होते.[३२७]

- **हजरत हाजीमाही दर्गा**

सोलापूर शहरातील प्रसिध्द दर्ग्यामध्ये या दर्ग्याचा समावेश होतो. या दर्ग्याचा घुमट सुंदर असल्याने यास 'साहब-ए-घुम्बंद' असेही म्हटले जाते. शहरातील दत्त चौकात असणारा हा दर्गा तुर्क संताचा दर्गा असून त्यास 'हजरतमाही दर्गा' असे म्हणतात. या सुफी संतांच्या नावावरून तेथील चौकास 'हाजीमाही चौक' असे नांव रूढ झाले आहे.

'हजरत हिदायत शहा सरमरत' असे त्याचे पूर्ण नाव असून त्यांनी अनेक वेळा हज यात्रा केली होती. त्यांचा मृत्यु हिजरी १०५२ मध्ये झाला. त्यांच्याबरोबर आलेले त्यांचे शिष्य 'पीरशहा' यांचा मृत्यु हजरतमाही यांच्या मृत्युनंतर अवघ्या पाच दिवसांनी झाल्याने या दोन्ही सुफी संतांच्या 'मदारी' एकाच घुमटाखाली पाहावयास मिळतात. या दर्ग्याची लांबी ६.९६ मीटर व रूंदीही तेवढीच आहे. दरवाजाची रूंदी ७५ सेंमी. असून उंची १.२१ सेंमी. इतकी आहे. नवी पेठेत असणारा हा दर्गा 'जानिशेरे दर्गाह' या नावाने परिचित आहे. या दर्ग्याची देखभाल विश्वस्तांमार्फत केली जाते.[३२८]

- **जाबिदखान दर्गा**

बाबाजी जाबिदखान हा आदिलशाही काळातील हवालदार होता. सोलापूर शहरातील गुरूवार पेठेत त्याचा दर्गा आहे. शहरातील भूईकोट किल्ल्यातील शिलालेख क्रमांक २, ३, ६, ७ व ८ वरून जाबिदखानाच्या सोलापूरातील कार्याची माहिती मिळते. शिलालेख क्रमांक २ हा किल्ल्यामध्ये पूर्वेस असलेल्या तटाच्या एका बुरूजावर आहे. याठिकाणी तटबंदीच्या आत एक तळे असून तेथेच हा शिलालेख आढळतो. फारशी लिपीमध्ये असणारा हा शिलालेख इ. स. १५७५-७६ सालात कोरला गेला आहे. विजापूरचा अलिआदिलशहाच्या काळातील या शिलालेखामध्ये त्याचा अधिकारी बाबाजी जाबिदखान याने किल्ल्यात केलेल्या बांधकामाची माहिती आहे. याने आपल्या सुलतानासाठी किल्ल्यामध्ये एक सुंदर वास्तू निर्माण केली होती, ती वास्तू आज अस्तित्त्वात नाही. शिलालेख क्रमांक ३ हा देखील जाबिदखानाची माहिती देतो. हा शिलालेख किल्ल्याच्या तिसऱ्या दरवाजावर बसविलेला असून आठ ओळींचा फारशी भाषेत असलेला हा शिलालेख इ. स. १५७८-७९ सालचा आहे. या शिलालेखात अलिआदिलशहा व त्याचा अधिकारी बाबाजी जाबिदखान यांचा व संदलापूर म्हणजेच सोलापूर हा स्थळाचा उल्लेख आला आहे. याच बाबाजी जाबिदखानाने अलिआदिलशहाच्या नावाने मशिद, बाजारपेठ, बाग आणि पाण्याचा हौद निर्माण केला होता. तथापि या कोणत्याही वास्तुचे अवशेष आज किल्ल्यात सापडत नाहीत.[३२९]

किल्ल्याच्या हनुमान बुरूजावर जो चौथा शिलालेख आहे तो पाच ओळीचा असून या शिलालेखामध्ये अलिआदिलशहाने नायब गैबत बाबाजी जाबितखान याची नेमणुक किल्ल्यातील काही इमारती बांधण्यासाठी केला असल्याचा उल्लेख आहे. दा (जा) बितरखान हा अलिआदिलशहा (प्रथम) (इ. स. १५५८-१५८०) व इब्राहिम आदिलशहा (द्वितीय) (इ. स. १५८०-१६२९) या दोघा

सुलतानाच्या कारकिर्दीत अधिकारी म्हणून कार्यरत होता. तो ऐहिक व धार्मिक इमारती आपल्या देखरेखीखाली निर्माण करणारा एक कर्तबगार अधिकारी म्हणून अहसनाबाद (गुलबर्गा) व संदलापूर (सोलापूर) येथे सोळा वर्षे सेवेत होता. या शिलालेखावरून त्याचा काळ हिजरी सन ९७८ ते ९९४ (इ. स. १५८०-८६) असा आहे. जाबितखान सामान्य पदापासून चढत जाऊन आपल्या कर्तबगारीने नायब पदापर्यंत पोहोचला होता, अशी माहिती जामा मशिद शिलालेखावरून समजून येते.[३३०] अलिआदिलशहा याने बाबाजीस दा (जा) बितरखान हा किताब दिला असावा असे वाटते.

समाचार चौकाजवळ पूर्व दिशेला एका बोळात आदिलशाही कालीन एक इमारत आहे, ती 'काळगुंबद' म्हणून ओळखली जाते. या इमारतीच्या जवळ जाबितखानाचे थडगे पाहावयास मिळते. मुळ थडगे खालील बाजूच्या खोलीत आहे, त्याच्या वरील भागात काळ्या पाषाणाची फरसबंदी करून खालील थडग्याच्या बरोबर वरील बाजूस दर्शन थडगे मोठ्या काळ्या शिळेमध्ये निर्माण केले आहे यालाच 'तावीज' म्हणतात. दर्शनी भागाच्या तावीजावर सुंदर असे नक्षीकाम केले आहे. थडग्यावरील फारशी व अरबी भाषेतील लेखावरून हे थडगे जाबितखानाचे आहे हे समजून येते.[३३१]

- **तीन दर्गे (जिल्हा परिषद परिसर)**

सोलापूर जिल्हा परिषद परिसरात तीन सुफी बंधूचे दर्गे आहेत. त्यामध्ये हजरत पीर ऐतेकाद अलीशहा वलीबाबा, हजरत पीर मंगलशहा वलिबाबा आणि हजरू सय्यद रसुल शहा वलीबाबा यांचा समावेश होतो. हे तीन बंधू अफगाणिस्तानातून शाहजोहरवलीबाबा यांच्याबरोबर आले असावेत. या तीनही सुफी संतांनी आपल्या शुभसंदेशाद्वारे अनेकांना रोगमुक्त केले होते. या तीनही दर्ग्याचा उरूस १५ फेब्रुवारीस साजरा केला जातो. उरूसाच्या दिवसात गरीब लोकांना शाकाहारी भोजन दिले जाते, याचा लाभ ४,००० ते ५,००० लोक घेतात. शहरातील अनेक दानशूर व्यक्तींकडून तांदुळ, गहू, साखर इत्यादीधान्य स्विकारले जाते. या पिरांच्या उरूसाला आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील हजारो बांधव हजेरी लावतात. उरूसाच्या वेळी लाकडी रथात चादर आणि संदल ठेऊन शहरातून मिरवणुक काढली जाते.[३३२]

- **हजरत सय्यद जलालुद्दिन बुखारी कादरी चिश्ती अल्वी दर्गा**

शहरात असणाऱ्या अनेक दर्ग्यांपैकी हा एक महत्त्वाचा दर्गा असून सन १९४२ मध्ये या दर्ग्याचे बांधकाम करण्यात आले. अलिकडच्या काळात म्हणजेच सन १९९२ मध्ये भिवंडी येथील श्री

प्रकाश वाघमारे यांनी या दर्ग्याचे घुंबज बांधून दिले. हजरत सय्यद जलालुद्दिन बुखारी यांचा जन्म बुखारा या ठिकाणी झाला. त्यांचे गुरू हजरत निजामुद्दिन अवलीया यांची समाधी दिल्ली येथे आहे. बाबा बुखारा हे प्रथम दिल्ली येथे आले, तेथून ते विजापूरास आले. सन १५७९ मध्ये सोलापूरात आल्यानंतर ते जामा मशिदीचे 'इमामत' बनले, येथेच त्यांना मृत्यु आला. शहरातील मुस्लिम बांधवांनी त्यांचा हा दर्गा विजापूर रोडवरील कंबर तलावानजीक मोतीबागेत बांधला. पूर्वी या ठिकाणी कबरस्तान होते, त्यामुळेच या तलावाला 'कंबर तलाव' हे नाव पडले असावे,असे वाटते. औरंगाबादकडील वक्फ बोर्डाकडून परवानगी घेऊन येथे एका खाजगी ट्रस्टची नोंदणी केली, हा नोंदणी क्रमांक १७६ असा आहे. प्रत्येक वर्षी ऑक्टोंबर महिन्यात बाबा बुखारा दर्ग्याचा उरूस साजरा केला जातो. झेंडा लावणे, संदल मिरवणुक काढणे, चिराग, नंगर, कव्वाली आणि कुराणाच्या अध्ययनाचे वाचन होते. उरूसाच्या शेवटच्या दिवशी 'जियारत' हा कार्यक्रम सादर केला जातो. या उरूसाला सोलापूर शहरातील सर्व जाती-धर्मांचे लोक हजेरी लावतात. एवढेच नव्हे तर दर्गा ट्रस्टतर्फे मुस्लिम संतांचे प्रवचन होते. तसेच गरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते.[३३३]

३.२.३ ईदगाह

सोलापूर शहरामध्ये पाच महत्त्वाचे ईदगाह असून ईदच्या दिवशी या ठिकाणी सामुहिक नमाज अदा केला जातो. यामध्ये आलमगीरशाही ईदगाह (पानगल प्रशाला), होटगी रस्त्यावरील नवीन आलमगीर ईदगाह, जुनी मिल कंपाऊंडमधील आदिलशाही ईदगाह, आसार मैदानातील आसार मैदान ईदगाह आणि रंगभवन परिसरातील अहले हदिस ईदगाह इत्यादी ईदगाहचा समावेश होतो. अलिकडच्या काळात मुस्लिम बांधवांच्या संख्येत वाढ झाल्याने ईदगाहची जागा नमाजासाठी कमी पडू लागल्याने ईदगाहच्या समोरील रस्त्यावरही नमाज अदा केली जाते. ईदगाह मैदानावरील स्वच्छतेचे कार्य महापालिकेच्या वतीने केले जाते.[३३४] औरंगजेब बादशहाने ईदचा नमाज अदा करण्यासाठी सोलापूर शहरात एक ईदगाह बांधल्याचा उल्लेख सापडतो, यास 'शाही आलमगीर ईदगाह' असे नाव आहे. पानगल प्रशालेच्या मैदानात असलेला या ईदगाहला आजही मुस्लिम समाजात मानाचे स्थान आहे.[३३५]

शहरातील मुस्लिमांची ही धार्मिक स्थळे सोलापूर शहराच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासातही मोठ्या प्रमाणावर भर घालतात. शहरातील मशिदीमध्ये मुलांना धार्मिक शिक्षण देणाऱ्या पाठशाळा चालतात. या पाठशाळांना 'मक्तब' आणि 'मदरसा' या नावाने ओळखले जाते. 'मक्तब'

म्हणजे प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा या मशिदीशी संलग्न असतात. या मक्तबमधून लेखन, वाचन आणि अंकगणिताबरोबर पवित्र कुराणाचे पाठ शिकविले जातात. 'मदरसा' या उच्च शिक्षण देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या असतात.

सोलापूर शहरात मुस्लिमांच्या धार्मिक सण आणि उत्सवांमध्ये हिंदु मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. त्यातूनच धार्मिक बाबी, सामाजिक चालीरिती, आहार, कला, स्थापत्य या क्षेत्रात एकमेकांचा प्रभाव परस्परांवर पडलेला दिसून येतो. पिरांच्या पंजाच्या मिरवणुकीमध्ये हिंदु लोक मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. पिरांचे उरूस, पिरांची उपासना या सर्व बाबींवर हिंदु पध्दतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

एकशे पन्नास वर्षापूर्वी मंगळवेढ्याहून एक हिंदु स्त्री पाच पंजे घेऊन सोलापूरात आली होती. हे पाच पंजे रजपूत समाजाने ताब्यात घेऊन उत्तर कसब्यातील थोरला मंगळवेढा तालिम परिसरात त्याची स्थापना केली. दरवर्षी मोहरमच्या महिन्यात पाचव्या दिवसापासून दहाव्या दिवसापर्यंत पाच दिवसाचा उत्सव आयोजित करण्यात येतो. यामध्ये हिंदु आणि मुस्लिम समाजाला समान मान दिला गेला आहे. पहिल्या दिवशी पंजाचे पुजारी असलेले मुजावर यांच्या हस्ते धनगर समाजातील झुंजार यांच्या घरात ठेवलेली 'कुदळ' मारून उत्सवाचा प्रारंभ केला जातो. उत्सवापूर्वीच लोणारी समाजाचा चुना देवालयाला मारला जातो आणि गवंडी समाजातर्फे दुरूस्तीचे काम केले जाते. पहिल्या दिवशीच्या दर्शनाचा मान वडार आणि दलित समाजाला असतो. दुसऱ्या दिवशीच्या दर्शनाचा मान रजपूत समाजातील दीक्षित कुटुंबियांला असतो. या समाजातर्फे खिचडी आणि गुळाचा नैवद्य देवाला दाखविला जातो. तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी मुस्लिम समाजातर्फे नैवद्य दाखविण्यात येऊन मोहरमच्या दहाव्या दिवशी भव्य मिरवणुक काढली जाते. मिरवणुकीत हिरवा आणि भगवा हे दोन्ही झेंडे हिंदु - मुस्लिम ऐक्याचे प्रतिक दर्शवितात. वीरशैव गवळी समाज पूर्वीपासून या पिराला मानत असल्याने त्यांच्या कुटुंबात लग्नकार्य झाल्यानंतर दोन दिवस या ठिकाणी मुक्कामास येण्याची परंपरा अनेक वर्षापासून आजतागायत चालू आहे. ऐंशी वर्षापूर्वी पाच्छा पेठेतील संत रहिम बाबा यांनी या पिराला गालिचा दिला तो आजही मोहरमच्या दिवशी तक्ताच्या मागे लावण्यात येतो.[३३६] यावरून असे दिसते की, शहरातील हिंदु आणि मुस्लिम समाजामध्ये जीवनाच्या वेगवेगळ्या अंगामध्ये परस्पर संबंध, संयोग, आचार-विचारांची देवाण-घेवाण अखंडपणे चालू आहे.

३.३ शहरातील जैन मंदिरे

जैन धर्म हा वैराग्य, तप व मोक्ष या तीन गोष्टींना महत्त्व देणारा आहे. जैन श्रमन किंवा यती हे सर्व संसारिक गोष्टीपासून अलिप्त राहून वैराग्याचे जीवन जगतात आणि मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न करतात. परंतु 'श्रावक' नावाचा दुसरा वर्ग गृहस्थाश्रमी असून तो उद्योग व व्यापारात गुंतलेला आहे. मिळालेल्या पैशातून हा वर्ग जैन धर्माच्या प्रसाराला बळ देतो. त्यामुळे श्रावकांना जैन धर्मात आदराचे स्थान प्राप्त झाले आहे. या श्रावकामुळेच जैनांच्या सांस्कृतिक परंपरेत विविध मंदिरांना व मूर्तीकलेला स्थान मिळत गेले. या कलेद्वारेच लोकांची अध्यात्मिक भावना जागरूक ठेवण्याचे कार्य जैनांनी सदैव आपल्या डोळ्यापुढे ठेवले. त्यातूनच त्यांनी धार्मिक उपासनेसाठी सुंदर व कलात्मक मंदिरे निर्माण केली.[३३७] भारतात कित्येक ठिकाणी जैन मंदिराचे भग्नावशेष सापडले आहेत. या मंदिरात नागर व द्रविड या दोन्ही शैलींचे शिल्पकाम आढळते. मंडपाचे स्तंभ व छतावर मूर्ती व कथाप्रसंग कोरलेले आहेत. मंदिराच्या चारी बाजूंना लहान देवळ्या बांधल्या असून त्यात तीर्थकरांच्या प्रतिमा बसविलेल्या असतात. अशा मंदिराच्या समोर उभारलेले स्तंभ हे जैन शिल्पकलेचे एक महत्त्वाचे अंग होय. ही स्तंभप्रथा विशेषत: दिगंबर जैनांमध्ये आहे. दक्षिण व मध्य भारतात असे स्तंभ अनेक ठिकाणी आढळतात, पैकी मुडबिद्री येथील मानस्तंभ हा सर्वोत्कृष्ट स्तंभ मानला जातो. या स्तंभाचे ब्रह्मस्तंभ व मानस्तंभ असे दोन प्रकार असतात. ब्रह्मस्तंभावर ब्रह्म देवाची मूर्ती असते तर मानस्तंभावर एक वेदी व तिच्यावर चतुर्मूख जिनमूर्ती असते. [३३८] मंदिराच्या शिखर कलशावर असलेला एक हात उंच ध्वज आरोग्य प्रदान करतो, दोन हात उंच सुपुत्रादि संपत्ती, तीन हात उंच धान्य-संपत्ती, चार हात उंच राजाला वृध्दि, पाच हात उंच सुभिक्ष व राजवृध्दी प्रदान करणारा असतो. [३३९] स्वस्तिक चिन्ह हे जैन धर्माचे 'आदिचिन्ह' असून शुभ कार्यात जैन समाज नेहमी स्वस्तिक चिन्हाची पूजा करतो. [३४०]

सोलापूर शहर हे पश्चिम महाराष्ट्रातील कर्नाटक सीमेलगतचे शहर असल्याने जैन मुनी नेहमी पायी विहार करताना ते दक्षिण भारताकडे निघाले असता येथे आवश्य येत. सोबत त्यांचे भक्तगण असत, त्यापैकी अनेक श्रावक गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश येथून येऊन सोलापूरात स्थायिक झाले. त्यांनी आराधनेसाठी सोलापूरात जैन मंदिरांची स्थापना केली. शहरात जैन समाजात मुख्यत: दिगंबर व श्वेतांबर असे दोन पंथ आहेत. सोलापूर जिल्ह्यात अनेक जैन मंदिरे आहेत,

शहरात सामाजिक समिती संचलित मुख्यत: १३ जैन मंदिरे असून त्यापैकी दहा दिगंबर पंथीय व तीन श्वेतांबर पंथीय आहेत. शिवाय श्वेतांबर पंथीयांची ९ वैयक्तिक मंदिरेही आहेत.[३४१]

३.३.१ दिगंबर पंथीय जैन मंदिरे

- **श्रीचिंतामणी पार्श्वनाथ महाराज दिगंबर जैन (कासार) मंदिर (भुसार गल्ली)**

श्रीचिंतामणी पार्श्वनाथ महाराज दिगंबर जैन (कासार) मंदिराच्या स्थापनेबाबत निश्चित अशी माहिती मिळत नाही. परंतु सोलापूर शहरातील ८०० वर्षं जुने जैन मंदिर म्हणून या मंदिराची ओळख आहे.[३०८] भुसार गल्लीतील या पार्श्वनाथ (पारसनाथ) मंदिराचे बांधकाम इ. स. १८५० च्या सुमारास झाले. मंदिराच्या बांधकामासाठी सुमारे दीड लाख रूपये खर्च आला असून अनेक वर्षे या मंदिराची व्यवस्था तात्या शेटे यांचे वंशज पाहत होते. नंतर स्वत: तात्या गोपाळ शेटे यांनी अनेक वर्षे पार्श्वनाथ मंदिराची सेवा केली. नंतरच्या काळात त्यांनीच या मंदिराचा कारभार पंचांच्या ताब्यात दिला.[३४३] या मंदिराचे बांधकाम बारामती येथील पारसनाथ मंदिराप्रमाणे केले आहे. संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या उत्तराभिमुख मंदिराचा पदविन्यास सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा असून सभामंडपाला आठ खांब व अंतराळ तीन खांबावर आहे, अंतराळाला दगडी छत आहे. गर्भगृहाच्या बाहेरील बाजूस देवडीत पद्मावती मातेची मूर्ती व छात्रपाल आहे. मुळनायक पार्श्वनाथाची पितळी मूर्ती ही अलंकाराने मढविलेली असून ही ३ फुट उंच आहे. बाजूस असलेल्या पार्श्वनाथाच्या दोन मूर्ती काळ्या पाषाणातील असून एक मूर्ती दिगंबर पंथीय आणि एक मूर्ती श्वेतांबर पंथीय दिसून येते, जयपूर येथून आणलेल्या या मूर्ती काळ्या पाषाणातील आहेत. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम लतिकाबाई मनोहर मोहोळकर यांच्या स्मरणार्थ सन १९४६ मध्ये बांधून दिले आहे. हे मंदिर खांबानी युक्त असून खांबावर चुन्याच्या कणखर (मजबूत) बांधकामातील छत आणि कमानी असलेले असे होते.[३४४]

जीर्णोध्दार

सन १९५७ मध्ये चंद्रकांत बिष्टप्पा वनकुद्रे हे या मंदिराचे अध्यक्ष होते. सुरूवातीला छोटेखानी असणारे हे मंदिर अतिशय जीर्ण झाले होते. त्यामुळे मंदिराच्या जीर्णोध्दाराबरोबरच त्यागी वर्गासाठी एक निवासस्थान, सभागृह, गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आणि समाज कार्यासाठी

मंगलकार्यालय या गोष्टी समितीने निर्माण केल्या. या जीर्णोध्दारासाठी फक्त सोलापूरातील भक्तांबरोबरच मुंबईचे शेठ श्री मोटूमल यांनी पार्श्वनाथ मंदिराला १२००० रूपयांची देणगी देऊन सहकार्य केले. सन १९६५ साली भाईचंद ताराचंद गांधी व हिराचंद्र नेमचंद गांधी यांच्या शुभहस्ते श्री पार्श्वनाथ मंदिराच्या मंडपाचा पायाभरणी समारंभ झाला. यावेळी भाईचंद गांधी यांनी २६ हजार रूपयांची देणगी पार्श्वनाथ मंदिराला दिली.

पार्श्वनाथ मंदिराच्या शिखरामध्ये एक काच मंदिर असून या काच मंदिरात मुळनायक भगवान शांतिनाथ, अरहनाथ व कुंतुनाथ यांच्या मूर्ती आहेत. म्हणून या मंदिराला 'रत्नत्रय' मंदिर असे म्हणतात. शिखरामधील या जिनमुर्तीची प्राणप्रतिष्ठापना सन १९९० मध्ये आचार्य पू. श्रीलक्ष्मीसेन भट्टारक महाराज (कोल्हापूर) यांच्या शुभहस्ते करण्यात आली.[३४५] वनकुद्रे यांच्या प्रयत्नामुळे व चिकाटीमुळे पार्श्वनाथ मंदिराचा कायापालट झाला. केवळ त्यांनी मंदिराचा जीर्णोध्दाराच केला असे नाही तर त्यांनी पार्श्वनाथ मंदिरात पुजा, अभिषेक, महाअभिषेक, कुंभमेळा, जलयात्रा, चढाव इत्यादी कार्यक्रम करून धर्मभावना चांगल्या प्रकारे जोपासली.[३४६]

- **श्रीमाणिकस्वामी महाराज दिगंबर जैन मंदिर (पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर)**

पूर्व मंगळवार पेठेत असणाऱ्या या जैन मंदिराची स्थापना सन १८४५ मध्ये श्री गांधी रामचंद्र हेमचंद दलजी यांनी केली. सोलापूर शहरातील सर्वात जुन्या व प्रसिध्द जैन मंदिरांमध्ये या मंदिराचा समावेश होतो. संपूर्ण दगडी बांधकाम असलेले हे विस्तीर्ण मंदिर सोलापूरच्या धार्मिक इतिहासात मोलाची भर टाकते. प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर उजव्या व डाव्या बाजूला ओवऱ्या पाहावयास मिळतात. सभामंडप, अंतराळ, गर्भगृह व शिखर असा या मंदिराचा पदविन्यास आहे. मंदिराचा सभामंडप हा बारा खांब व तीन कमानीवर उभा असून याचे संपूर्ण छत दगडी आहे व गर्भगृह शिखरबंदी आहे. पूर्वाभिमुख गर्भगृह १५ x १५ चे असून गर्भगृहात मुळनायक श्रीमाणिकस्वामींची काळ्या पाषाणाची मूर्ती आहे.[३४७]

मंदिराच्या बांधकामादरम्यान पाया खणत असताना श्री माणिकस्वामींची मूर्ती सापडली. श्रीमाणिकस्वामी हे जैन तीर्थंकर परंपरेतील नसतानाही या मंदिरात सापडलेल्या मूर्तीचीच मुळनायक म्हणून प्रतिष्ठापना केल्याचे पंडीत श्री अरविंद उपाध्याय यांनी सांगितले. मुळनायक मूर्ती व्यतिरिक्त गर्भगृहात अनुक्रमे वृषभनाथ, पार्श्वनाथ व अनंतानाथ भगवंताच्या मूर्ती आहेत. या तीन मूर्ती

पितळेच्या असून त्यांचे प्रभावळही पितळी आहे. या तीनही मूर्तींची उंची सुमारे तीन फुट आहे. त्याचबरोबर गर्भगृहात या तीर्थंकर मूर्तीच्या समोर पद्मावती मातेची व क्षत्रपालाचीही स्थापना केलेली आहे. मानस्तंभ हा लोखंडी असून त्यावर कोणत्याही प्रकारची मूर्ती आढळत नाही.

मंदिरात सेवा देणारे पंडीत अरविंद बाहुबली उपाध्याय यांची ही तिसरी पिढी आहे. त्यांचे आजोबा पंडीत जयकुमार चंदप्पा उपाध्याय व वडील पंडीत बाहुबली जयकुमार उपाध्याये यांनी ही या मंदिराची सेवा केलेली आहे. पंडीत अरविंद बाहुबली उपाध्याय हे पेशाने डॉक्टर असूनही ते मंदिरात सेवा देण्याचे काम करतात. श्री माणिकस्वामी मंदिरात अष्टमी, चतुर्थीला विशेष पूजा व महाअभिषेक केला जातो. दशलक्ष्मण पर्व (गणेश चतुर्थी) चातुर्मास, पर्यूषण पर्व, महावीर जयंती, महावीर निर्वाण दिन असे विविध सण चिंतामणी जैन मंदिरात साजरे केले जातात. महावीर निर्वाण दिनादिवशी पहाटे महावीर प्रतिमेस 'निर्वाण लाडू' चढविला जातो. हा निर्वाण लाडू फक्त साखरेचाच असतो.[३४८]

- **श्रीआदिनाथ जैन मंदिर (शुक्रवार पेठ)**

शहरातील प्रसिध्द असणाऱ्या जैन मंदिरांमध्ये 'श्रीआदिनाथ जैन मंदिराचा' समावेश होतो. हे मंदिर दिगंबर पंथीयांचे श्रध्दास्थान असून जैन स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या मंदिराच्या बांधकामामध्ये हरिभाई देवकरण, नथुराम देवकरण व रामचंद्र हरिभाई यांचा सिंहाचा वाटा होता. आदिनाथ जैन मंदिराद्वारे सोलापूर शहरातील देवकरण घराण्याने सामाजिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान दिल्याचे दिसून येते. शहरातील 'हरिभाई देवकरण हायस्कूल' या संस्थेस त्यांनी सुमारे सदतीस हजार रूपये देणगी दिली त्यामुळे या संस्थेत दरवर्षी कमीत कमी २० गरीब जैन विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची कायमची सोय झाली.[३४९]

पश्चिमाभिमुख प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस मंदिर स्थापनेचे वर्ष व मंदिराचे नांव पाहावयास मिळते. या मंदिराला लागूनच उत्तरेला 'रत्नत्रय दिगंबर' जैन मंदिर आहे. आज ही दोन्ही मंदिरे एकत्र केली असून या दोन्ही मंदिराला 'जोडमंदिर' म्हणून ओळखले जाते. मंदिराच्या गाभाऱ्यात मूळनायक आदिनाथाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. हे मंदिर सुंदर, भव्य व शिखरबध्द आहे, मंदिराच्या गर्भगृहात असणारी मूळनाथ आदिनाथाची मूर्ती मनोवेधक व आल्हाददायक असून ती श्वेतवर्णीय आहे.[३५०] मध्यभागी मूळनायक आदिपरमेश्वराची कृष्णवर्गीय भव्य व मनोहर प्रतिमा

आहे. उजव्या बाजूस श्रीआदिनाथ आणि डाव्या बाजूस श्रीचंद्रप्रभु तीर्थकरांची श्वेतवर्णीय प्रतिमा आहते. गर्भगृहातील मंदिर निर्मितीबद्दलची माहिती देणारा शिलालेख गर्भगृहात आहे.[३५१]

मंदिराच्या भूयारी भागात एक मंदिर असून त्या ठिकाणी श्रीपार्श्वनाथ भगवंताच्या विशाल प्रतिमेची स्थापना संवत् १९०५ मध्ये म्हणजेच मूळ मंदिराच्या प्रतिष्ठापनेच्या वेळीच झाली आहे.[३५२] सभामंडप हा तीन कमानीचा दगडी मंडप असून इ. स. १८५५ मध्ये या सभामंडपाचे बांधकाम झाले. या मंडपावर मंदिराचे शिखर असून या शिखरावर हरिभाई देवकरण यांनी सन १८६१ मध्ये सुवर्ण कलशाची स्थापना केली. आदिनाथ मंदिराचा विकास करण्यासाठी सन १८८४ मध्ये श्री. माणिकचंद मोतीचंद आणि त्यांचे बंधू अमीचंद मोतीचंद या साकळा बंधूंनी मंदिरात सर्वात पुढचा कलात्मक व मनमोहक लाकडी मंडप बांधून दिला दरवर्षी मंदिराचा ध्वज साकळा घराण्याकडूनच चढविला जातो. गांधी यांनी आदिनाथ मंदिरास पंचवीस हजार रूपयाचा श्वेतवर्ण घोडे असलेला चांदीचा कलापूर्ण रथ व चांदीचा एक पंचमेरू मंदिरास अर्पण केला. दरवर्षी माघ वद्य पंचमीस श्री. आदिनाथ मूर्ती स्थापनेनिमित्त या रथाची शहरातून मिरवणूक काढली जाते. संपूर्ण भारतात असा कलापूर्ण व सुंदर रथ फक्त मुंबई व कलकत्ता या दोनच शहरात होता. यानंतर सोलापूर शहरात असा रथ आहे.[३५३]

रावजी कस्तुरचंद यांनी संवत् (१९६१) मध्ये आदिनाथ मंदिरात उजव्या बाजूला संगमरवरी 'श्री सहस्त्रकूट जिनमंदिराची' प्रतिष्ठापना केली. या सहस्त्रकूट मंदिरावर सुवर्णमय कलश असून या कलशावर या सहस्त्रकूट निर्माणासंबंधीचा लेख आपणांस पाहावयास मिळतो.[३५४] जैन मंदिर निर्माण कलेमध्ये विशेषत: दिगंबर पंथीयांमध्ये मानस्तंभाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हा मानस्तंभ श्रीआदिनाथ मंदिराच्या मागील बाजूस असणाऱ्या अनंतनाथ स्वामीजींच्या मंदिरासमोर आहे या मानस्तंभावर चतूर्भूज श्रीपार्श्वजिनबिंब आहे.

स्वाध्यायप्रेमी लोकांसाठी शास्त्र भांडाराची व्यवस्था असून या स्वाध्याय मंदिरामध्ये मुद्रित व हस्तलिखित ग्रंथांचा मोठा संग्रह केलेला आहे. १७० हस्तलिखिते असून जवळ जवळ १० हजार पुस्तकांचा संग्रह या स्वाध्याय मंदिरात उपलब्ध आहेत. ही सर्व पुस्तके (शास्त्र) हिंदी, संस्कृत व इंग्रजी भाषेतील असून स्वाध्याय प्रेमी वाचकांसाठी ती उपलब्ध करून दिली जातात.[३५५] आदिनाथ दिगंबर जैन मंदिरात पर्युषण पर्व, महावीर जयंती, अक्षय तृतीया, अष्टान्हिक पर्व, पार्श्वनाथ जयंती, दिवाळी पाडवा, वीरशासन जयंती, श्रुतूपंचमी, मौना एकादशी, चैत्र, पोर्णिमा, चातुर्मास, कार्तिक

शुध्द पंचमी इत्यादी जैन धर्मीयांचे वार्षिक सण व उत्सव मंदिरात साजरे होतात. अनेक जैन आचार्य व मुनींनी या मंदिरास भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये शांतीसागर महाराज, विमलसागर महाराज, वीरसागर महाराज, आचार्य पायसागर महाराज इत्यादींचा समावेश होतो. आचार्य ज्यावेळी मंदिराला भेटी देतात त्यावेळी समाजामार्फत त्यांचे मिरवणुकीने स्वागत होते. आचार्य श्रीपायसागर महाराजांचे सोलापूरात ५फेब्रुवारी १९५५ रोजी आगमन झाले. यावेळी त्यांची प्रचंड मिरवणुक काढली होती. या मिरवणूकीचा मार्ग आदिनाथ मंदिरातून मार्कंडेय चौक, कन्ना चौक, कुंभार वेस, भूसार बाजार, लोखंड गल्ली, माणिक चौक असा होता. आचार्य पायसागर महाराज हे ९ फेब्रुवारी १९५५ पर्यंत मंदिरात होते, यावेळी त्यांचे दररोज सकाळ, संध्याकाळ मंदिरात प्रवचन होत असे.[३५६]

छायाचित्र क्र. २२



आदिनाथ व श्रीरत्नत्रय दिगंबर जैन मंदिर (जोडमंदिर)
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

मंदिराची देखभाल देवस्थान समितीतर्फे केली जाते. सन १९५७ मध्ये श्री आदिनाथ मंदिराची जनरल बोर्डाची सभा रतनलाल नानचचंद गांधी (हरिभाई देवकरण) यांच्या अध्यक्षतेखाली होऊन चॅरिटी कमिशनर यांच्याकडे पाठवावयाची घटना पास झाली. त्यानुसार ४ ऑगस्ट १९५७ रोजी हरिभाई देवकरण यांची अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली होती.[३५७] सुनिल गांधी हे सध्या आदिनाथ मंदिर व्यवस्थापनाचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात.

- **श्रीरत्नत्रय दिगंबर जैन मंदिर (शुक्रवार पेठ)**

श्रीआदिनाथ जैन मंदिराला लागूनच उजव्या बाजूला 'श्रीरत्नत्रय दिगंबर जैन मंदिर' आहे. या मंदिराचे बांधकाम शेठ हिराचंद सखाराम गांधी यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ संवत् १९४५ ला केले. या मंदिरात शांतिनाथ, कुंतुनाथ आणि अरहनाथ या तीन तीर्थंकरांच्या मूळ मूर्ती असल्याने हे 'रत्नत्रय' नावाने प्रसिध्द आहे. या मूळ मुर्तींच्या दोन्ही बाजूला छत्रपालाच्या मूर्ती आहेत. श्रीरत्नत्रय मंदिराचे व्यवस्थापन सध्या देवस्थान समिती ' श्रीआदिनाथ दिगंबर जैन मंदिर' कडे आहे. त्यामुळे या मंदिराची सर्व देखभाल या देवस्थान समिती मार्फतच होते. श्रीआदिनाथ मंदिरात ज्या पुजा-अर्चा केल्या जातात, त्या सर्व पूजा या मंदिरातही केल्या जातात. या मंदिरात पंडीत म्हणून 'श्रीआनंद चिंतामणी पंडीत' हेच काम पाहतात. रत्नत्रय मंदिराच्या वरच्या मजल्यावर किरण मोतीचंद गांधी यांनी दिलेली वृषभनाथ (आदिनाथ) अजितनाथ व चंद्रप्रभु या तीर्थंकरांच्या मूर्ती प्रतिष्ठापित केलेल्या आहेत.[३५८]

- **श्री आदिनाथ महाराज सैतवाल दिगंबर बुबणे जैन मंदिर (चाटी गल्ली)**

शहरातील जैन धर्मीयांच्या धार्मिक स्थळांमध्ये दिगंबर जैन पंथीयांचे श्रध्दास्थान असणारे हे बुबणे जैन मंदिर चाटी गल्ली येथे असून दत्तात्रय आण्णा बुबणे परिवाराने सन १८९४ मध्ये या मंदिराची स्थापना केली.[३५९] 'सैतवाल' ही दिगंबर जैन पंथामधील एक उपजात असून महाराष्ट्रात ती सर्वत्र पाहावयास मिळते. 'सैतवाल' म्हणजे स्वत:चे हित जपणारे, 'स्वहितवाल' या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'सैतवाल' हा शब्द रूढ झाला असावा.

संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या या जैन मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार उत्तरेस असून सभामंडप भव्य आहे. सभामंडपात उजव्या बाजूला छात्रपाल (शनिदेव)आहे. अंतराळात देवड्यांमध्ये पद्मावती माता व इतर जिन मुर्ती आहेत. गर्भगृहात जयपूरहून आणलेली मुळनायक श्रीआदिनाथाची ३३ फुट उंचीची पितळी मूर्ती आहे. मुळनायक मूर्तीच्या उजव्या बाजूला पांढऱ्या पाषाणातील 'श्रीमहावीर भगवान' व डाव्या बाजूला 'श्रीशांतिनाथ भगवान' यांच्या जिन मूर्ती आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर द्वारपाल, गजमुख व खालील बाजूस 'ओम' कोरलेले आहे. शिखरामध्ये असणाऱ्या गर्भगृहात मुळनायक अरहनाथांची पांढऱ्या पाषाणातील मूर्ती आहे. या जिनमंदिरात लहान-मोठ्या एकूण २६ जिनमूर्ती आहेत.[३६०]

जीर्णोध्दार

हर्षवर्धन बुबणे यांनी या मंदिराचा जीर्णोध्दार केला. मंदिरात महावीर जयंती, महावीर निर्वाण दिन, पर्युषण पर्व, अष्टान्हिक पर्व, चातुर्मास इत्यादी जैन धर्मीयांचे सण साजरे होतात. तसेच मंदिराचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा होतो. बुबणे मंदिरात ५० वर्षांपूर्वी आदिसागर महाराजांचे अनेक दिवस वास्तव्य होते.[३६१]

- **श्री. भ. १००८ बाहुबली भगवान दिगंबर जैन मंदिर (नेहरू नगर)**

नेहरू नगर या ठिकाणी असणारे बाहुबली जैन मंदिर हे दिगंबर पंथीयांचे श्रध्दास्थान आहे. सन २००२ मध्ये आचार्य देवनंदी महाराजांच्या शुभहस्ते मंदिराची स्थापना झाली. या मंदिराचे विश्वस्त व कार्यकारी मंडळ हे भगवान बाहुबली जनकल्याण प्रतिष्ठान, सोलापूर हे आहेत. १४ नोव्हेंबर २००२ रोजी जैन साधू आचार्य देवनंदी महाराज यांच्या हस्ते भगवान बाहुबली दिगंबर जैन मंदिराची स्थापना करण्यात आली.

मंदिरातील मूळनायक मूर्ती ही श्रीभगवान बाहुबलीची असून तिची उंची ८'-३" आहे. या पूर्वाभिमुख मंदिराच्या बांधकामाचे क्षेत्रफळ ४० x ६० असून तीन मजली बांधकाम असलेल्या या मंदिरात सर्वात खालच्या मजल्यात 'श्री १००८ भगवान मुनिसुव्रतनाथ' (शनिदेवता) २० वे तीर्थकर यांची मूळनायक मूर्ती आहे. दुसरा मजला हा मुळ मंदिराचा असून या ठिकाणी मुळनायक मूर्ती श्री. भगवान बाहुबलीची आहे. मुळनायक मूर्तीच्या उजव्या बाजूस क्षेत्रपाल देव आणि धरनेंद्रदेव आणि डाव्या बाजूस पद्मावती माता आणि जिनवाणी माता यांचे जिनबिंब आहेत. यापैकी धरनेंद्रदेव आणि पद्मावती माता यांच्या डोक्यावर फणाधारी सर्प आहे. तिसऱ्या मजल्यावर शिखर असून या शिखरांमध्ये पार्श्वनाथाची मूर्ती आहे. शिखरातील या पार्श्वनाथ मूर्तीला दररोज प्रथम जलाभिषेक केला जातो व नंतर दूध-दह्याचा अभिषेक करून आरती केली जाते. बाहुबली मंदिराच्या समोर संगमरवरी मानस्तंभ असून या मानस्तंभावर श्रीभगवान बाहुबलीची चतुर्मूख मूर्ती आहे.[३६२]

भाद्रपद (दशलक्षण पर्व) या काळात बाहुबली मंदिरात दररोज आचार्य मुनींची व्याख्याने होतात. नवरात्रात पद्मावती देवीस अभिषेक व पूजा केली जाते. महावीर जयंती, महावीर निर्वाण कार्यक्रम (दिवाळी अमावस्या), १४ नोव्हेंबर या दिवशी मंदिराचा स्थापना दिन साजरा केला जातो. अनंत चतुर्दशीनंतर भाद्रपद पोर्णिमेस पालखी मिरवणुक असते. पालखीत अध्यात्मशास्त्र स्वरूपाचे

ग्रंथ ठेवले जातात, आषाढ महिन्यात पोर्णिमेपासून कार्तिक पोर्णिमेपर्यंत जैन मंहिला रविवारचे व्रत करतात. या काळात दर रविवारी महिला मंदिरात येऊन पोथी, प्रार्थना, खारीक, नारळ, बदाम व विविध फळे पाटावर मांडून पूजा करतात. भगवान बाहुबली मंदिर ट्रस्टच्या वतीने सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भाद्रपद दशलक्षण पर्वात विद्यार्थ्यांसाठी मेहंदी, वक्तृत्त्व, चित्रकला, रांगोळी, हस्ताक्षर इत्यादी स्पर्धांचे आयोजन करून स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिस दिले जाते. बाहुबली मंदिरास अनेक जैन आचार्यांनी भेट दिली. त्यामध्ये आचार्य देवानंदजी महाराज, आचार्य कल्पवृक्ष महाराज, आचार्य धर्मानंद सागर, आचार्य सिध्दांत सागर इत्यादींचा समावेश होतो.[३६३]

- **भगवान महावीर कमल मंदिर (श्राविका आश्रम)**

श्राविका संस्थानगर, सम्राट चौक हे धार्मिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे केंद्र आहे, येथे शिक्षण संस्थेतून धार्मिकतेचे धडेही दिले जातात. याच परिसरात पद्मश्री सुमतीबाई शहा यांनी सन १९६० साली भगवान महावीर कमल मंदिराची स्थापना केली. जयपूरहून आणलेल्या श्रीभगवान मुर्तीची प्रतिष्ठापना प्रसिध्द उद्योगपती साहू श्रेयास प्रसादजी यांच्या हस्ते करण्यात आली.[३६४]

- **महावीर दिगंबर जैन मंदिर (बाळीवेस)**

४ एप्रिल १९३५ मध्ये धर्मवीर रावजी सखाराम दोशी यांनी बाळीवेशीत दिगंबर जैन बोर्डींग च्या आवारात श्रीमहावीर मंदिर बांधून दिले. त्याचवेळी मंदिरासमोर माणिकचंद मोतीचंद आळंदकर यांनी मानस्तंभ बांधून दिला. हा मानस्तंभ संगमरवरी पाषाणात बांधलेला आहे. वर्षातून एकदा या मानस्तंभावर अभिषेक केला जातो. मंदिरात भगवान महावीराची काळ्या पाषाणाची मूर्ती आहे. गाभाऱ्याशिवाय वेगवेगळ्या चित्रांनी चित्रीत केलेला मंडप पाहावयास मिळतो.[३६५]

३.३.२ श्वेतांबर पंथीय जैन मंदिरे

- **शांतिनाथ श्वेतांबर जैन मंदिर (जुनी मिल कंपौंड)**

शहरातील प्रमुख तीन श्वेतांबर पंथीय जैन मंदिरामध्ये शांतिनाथ, आदिश्वर आणि शंकेश्वर पार्श्वनाथ श्वेतांबर जैन मंदिरांचा समावेश होतो. जुनी मिल परिसरातील शांतिनाथ श्वेतांबर जैन मंदिर हे सर्वात जुने असून या मंदिराची स्थापना सन १८९५ मध्ये झाली आणि सन २०१० मध्ये या मंदिराचा जीर्णोध्दार झाला.

छायाचित्र क्र. २३



शांतिनाथ श्वेतांबर जैन मंदिर
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

- **श्रीआदिश्वर जैन श्वेतांबर मंदिर (जोडभावी पेठ)**

सन १९२० मध्ये पाबूदानजी निमानी, रायचंदजी दोशी, चुनिलालजी शाह या धर्मप्रेमींनी भगवान आदिश्वराची मूर्ती आणून जोडभावी पेठेत मंदिराची निर्मिती करून त्यामध्ये या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. आदिश्वर जैन श्वेतांबर मंदिरात मुळनायक आदिश्वर भगवान यांची संगमरवरी मूर्ती आहे. या मंदिरात चातुर्मास, पर्युषण पर्व इत्यादी धार्मिक उत्सव साजरे केले जातात. या मंदिरात चातुर्मासानिमित्त महानैवद्य, महापाळ अर्पण केला जातो त्यामध्ये समावेश होतो. या प्रसंगी मारवाडी, राजस्थानी, गुजराथी, कच्छी, महाराष्ट्रीयन, केरळी इत्यादी २८६ प्रकारच्या पदार्थांचा समावेश असतो.[३६६] या मंदिरातील पाठशाळेत विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण मोफत दिले जाते. या मंदिराचे पुजारी म्हणून शाम भगवान हे आपली सेवा बजावतात.[३६७]

- **श्री शंकेश्वर पार्श्वनाथ मंदिर (सम्राट चौक)**

सम्राट चौकात असणारे हे शंकेश्वर पार्श्वनाथ मंदिर श्वेतांबर पंथीयांचे श्रध्दास्थान आहे. या मंदिराची स्थापना सन १९९७ मध्ये झाली असून मंदिराची व्यवस्था ट्रस्टीमार्फत होते. तिलोकचंदजी निमाणी हे या मंदिर ट्रस्टीचे अध्यक्ष आहेत. सम्राट चौकातील या जैन मंदिराचे तळघर, मुख्य मंदिर व शिखर असे विभाग असून या मंदिराचे तळघरापासून शिखरापर्यंतचे बांधकाम सहा हजार स्क्वेअर फुट इतके आहे. पश्चिमाभिमुख असणाऱ्या या श्वेतांबर जैन मंदिराचे गर्भगृह हे विविध रंगांच्या व

आकारांच्या काचांचा उपयोग करुन संपूर्ण काचेने मढवलेले असल्याने 'काचमंदिर' म्हणूनही ओळखले जाते. हा काचेचा गाभारा ८ x ८ असून या गर्भगृहात सुमारे तीन फुट उंचीची मूळनायक 'शंकेश्वर पार्श्वनाथाची' मूर्ती आहेत. मंदिराचे तळघरापासून शिखरापर्यंत संपूर्ण बांधकाम संगमरवरी दगडामध्ये झालेले आहे. तळघराचा उपयोग ध्यानासाठी व मुनींच्या प्रवचनासाठी केला जातो. मंदिराचे शिखरावर विविध प्रकारचे नक्षीकाम आहे. हे जैन मंदिर श्वेतांबर पंथीय असल्यामुळे या ठिकाणी मानस्तंभ पाहावयास मिळत नाही.

आचार्य भगवत् श्री. कलापूर्ण, आचार्य भंद्रकर विजय, आचार्य भव्यचंद्र विजय, आचार्य रवि शेखरजी, आचार्य तत्वेश सागर, आचार्या सौम्यापूर्णा श्रीजी, आचार्या सौम्यापूर्णाश्रीजी या सोलापूरातील दीक्षा घेतलेली कन्या आहेत, यांचे या मंदिरात नेहमी व्याख्यान होत असते.[३६८] वरील तिनही मंदिर एकाच ट्रस्टमार्फत चालविले जातात, त्याचे अध्यक्ष तिलोकचंदजी निमानी हे आहेत.

- **श्री लोद्रवा पार्श्वनाथ जिन मंदिर (सम्राट चौक)**

सम्राट चौकात असणारे हे जिन मंदिर श्वेतांबर पंथाचे असून मोहनलाल कोठारी यांनी या मंदिराची स्थापना केली आहे. लोद्रवा जिन मंदिराबरोबरच याठिकाणी कोठारी यांचे गुरू, कुशलगुरू दादावाडी श्रीशांतीगुरू यांचे 'गुरूमंदिर' आहे. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम पांढऱ्या संगमरवरी पाषाणात केलेले आहे. मंदिरांचा पायाभरणी समारंभ ४ डिसेंबर १९९३ रोजी श्रीमद् विजयजी महाराज यांचे हस्ते झाला. ९ फेब्रुवारी १९९८ रोजी फलोदी निवासी शंकरलालजी व त्यांची पत्नी सोनीबाई कोठारी यांचे सुपुत्र भैरूलाल प्रविण कुमार, महावीर चंद, अशोक कुमार इत्यादी परिवारांच्या शुभहस्ते या दोन्ही मंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आली. मंदिर प्रतिष्ठापने प्रसंगी कछवागड येथील प. पूज्य आचार्य भगवंत् श्रीमद् विजय कनकसुरीश्वरजी, प. पूज्य कंचन विजयश्री, आचार्य भगवंत् श्रीमद् विजय कलापूर्ण सुरीश्वरजी, श्री. किर्तीचंद विजयजी, मुनीवर्य श्री. कल्पतरू विजयजी इत्यादी शिष्य-साधू-साध्वी उपस्थित होते.

सभामंडपात श्रीपार्श्वयज्ञ, श्रीपद्मावती देवी, श्रीचंकेश्वरी देवी, श्रीमणिभद्र देव इत्यादी जिनबिंब आहेत. मंदिराच्या गर्भगृहात मुळनायक 'श्रीलोद्रवा पार्श्वनाथ भगवान' असून त्याच्या एका बाजूला श्रीआदिश्वर भगवान व श्रीमहावीर भगवान यांच्या जिनमूर्ती आहेत. मुळनायक जिनमूर्ती ही काळ्या पाषाणातील असून तिला काळ्या पाषाणाचे नक्षीमय प्रभावळ आहे.

मंदिराच्या शिखरामध्ये असलेल्या गर्भगृहात सीमंधर स्वामीजी आणि गणांच्या मूर्ती आहेत. शिखरावर विविध शिल्पाकृती आहेत. या मंदिराला लागूनच गुरूमंदिर आहे, या गुरूमंदिरात श्री जिनकुशल सुरेश्वरजी दादावाडी आणि आबु येथील योगीराज श्रीमद् विजय शांती सुरीश्वरजी यांची मूर्ती आहेत. मंदिराच्या पाठीमागील बाजूस एक त्यागी भवन आहे. या त्यागी भवनात बाहेरून येणारे जैन आचार्य साधू, साध्वी इत्यादींसाठी राहण्याची सोय केली जाते. महावीर जयंती, महावीर निर्वाण दिन, चातुर्मास, पर्युषण पर्व, अष्टान्ह पर्व इत्यादी धार्मिक उत्सव मंदिरात साजरे होतात.[३६९]

- **श्री वासूपूज्य श्वेतांबर जैन मंदिर (गांधी नगर)**

श्रीवासूपूज्य श्वेतांबर जैन मंदिर हे कांतिलाल शंकरलाल शहा यांच्या स्व:मालकीचे असून या मंदिराची स्थापना इ. स. २००५ मध्ये झाली आहे. मंदिराचे भूमीपुजन पंडीत कुणूभाई शहा यांच्या शुभहस्ते तर मूर्तीची प्रतिष्ठापना परमपूज्य भव्यचंद्र महाराज यांच्या शुभहस्ते झाली. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम संगमरवरी दगडात केले आहे. या शिरबंदी जैन मंदिराचे प्रवेशद्वार उत्तरेला आहे. मंदिराचे संपूर्ण बांधकाम क्षेत्र हे तीन हजार चौरस फुट असून सभामंडप १० x २० आणि गर्भगृह ६ x ८ आहे. मंदिरात मुळनायकाची मूर्ती 'श्री वासूपूज्य भगवानाची' आहे. ही मूर्ती संगमरवरात असून ती आसनस्थ आहे. मुळमूर्तीच्या उजव्या बाजूला श्री मुनीसुव्रत स्वामींची मूर्ती आणि डाव्या बाजूला श्री शांतिनाथ भगवानाची मूर्ती आहे. पर्युषण पर्व, दिवाळी (महावीर जयंती), चातुर्मास इत्यादी सण साजरे होतात. या मंदिराला आचार्य रविशेखर महाराज, आचार्य रत्नशेखर महाराज इत्यादी साधूंनी भेट दिलेली आहे.[३७०]

जैन मंदिरातील नित्यनैमित्तिक उपचार व वार्षिक उत्सव

दररोज सकाळी ६ वाजता मंदिर उघडले जाते, सकाळी ६.३० वाजता प्रथम जलाभिषेक करून आरती होते. सकाळी ९.१५ वाजता श्रीं च्या मूर्तीस लघुअभिषेक होतो. यामध्ये पाणी व दूधाचा समावेश होतो आणि महाअभिषेकामध्ये पाणी, गुळ, साखर, तुप, हरभरा, डोळ, खोबऱ्याचा खिस, दूध, दही, केशर व चंदन इत्यादी पदार्थांचा समावेश असतो. विशेष प्रसंगी श्रींस महाअभिषेक होतो. फक्त अमावस्येला मंदिरात नारळ फोडतात, इतर दिवशी श्रींस नारळ चढवला जातो. धार्मिक कार्यक्रमाच्या वेळेस मात्र मंदिर दिवसभर खुली असतात. पर्युषण पर्व, महावीर जयंती, अक्षय तृतीया, अष्टान्हिक पर्व, पार्श्वनाथ जयंती, दिवाळी पाडवा, वीरशासन जयंती, श्रुतूपंचमी, मौना एकादशी, चैत्र, पोर्णिमा, चातुर्मास, कार्तिक शुध्द पंचमी इत्यादी जैन धर्मीयांचे वार्षिक सण व उत्सव मंदिरात साजरे होतात.

३.४ बुध्द विहार

- **विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी**

बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्युनंतर त्यांच्या कार्याची चिरंतन स्मृती राहून सोलापूरातील काही मंडळींनी त्यांच्या अस्थि आणून त्याद्वारे एका बौध्द विहाराची निर्मिती केली आहे. हा बौध्द विहार "अस्थिविहार" या नावाने प्रसिध्द असून या अस्थिविहाराच्या तळमजल्यावर ध्यान मंदिर, पहिल्या मजल्यावर अस्थिकलश आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थ पुतळा आहे.

मुंबई, नागपूर, नाशिकनंतर सोलापूरात असलेला हा अस्थिविहार सोलापूरच्या धार्मिक इतिहासात मोलाची भर घालताना दिसून येत आहे. बुध्द जयंती आणि बाबासाहेबांच्या जन्मदिवशी या अस्थिविहारामध्ये लोक मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात.[३७१]

याशिवाय शहरात ७५ बुध्द विहारे आहेत त्यामध्ये मिलींदनगर बुध्दविहार, प्रबुध्दभारत बुध्दविहार, राजगृह बुध्दविहार, जी. एम. ग्रुप बुध्दविहार, आईसंग बुध्दविहार, मरिआई चावडी बुध्दविहार, बुध्ददर्शन बुध्दविहार, भिक्षु बुध्दविहार, बुध्दाचे दानमय बुध्द विहारांचा बुध्दविहारांचा समावेश होतो.

३.५ पारशी धार्मिक स्थळ

पारशी समाजाच्या धार्मिक स्थळाला 'अग्यारी' या नावाने ओळखले जाते. सुरूवातीच्या काळात खा. ब. दस्तूर हे सोलापूर शहरात आले होते. शहरात पारशी धर्मीय लोक संख्येने कमी असले तरी त्यांनी आपल्या धार्मिक भावना व्यक्त करण्यासाठी सन १८८९ साली लष्कर भागात अग्यारीची स्थापना केली. या अग्यारीची सर्व व्यवस्था पारशी समाजाकडे आहे. काही काळ या समाजाचे अध्यक्ष डॉ. इ. एफ. सेतना हे होते.[३७२] लष्कर भागातील या अग्यारीत पारशी लोकांचे धर्मगुरू दररोज पाच वेळा प्रार्थना व पूजा करतात. अग्यारी म्हणजे अग्निमंदिर होय.[३७३]

अग्यारीत वर्षभर अग्नी तेवत ठेवला जातो, येथे मोबेद (धर्मगुरू) म्हणून जालदाबट हे सेवा करीत आहेत. पारशी सणाच्या निमित्ताने शहरातील सर्व पारशी बांधव या अग्यारीत येवून प्रार्थना करतात. यामध्ये महिलांचाही सहभाग उल्लेखनिय असतो.

३.६ ख्रिश्चन धार्मिक स्थळे

ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी अनेक ख्रिश्चन पादरी महाराष्ट्रातील विविध शहरातून विखुरले होते. त्यांनी ख्रिश्चन धर्म प्रसाराबरोबर शैक्षणिक व सामाजिक कार्य मोठ्या प्रमाणावर केले आहे. सोलापूर शहरात तीन प्रकारची चर्चेस पाहावयास मिळतात, त्यामध्ये रोमन कॅथॉलिक प्रोटेस्टंटीय आणि अमेरिकन मराठी मिशन या तीन मिशनचा समावेश होतो.[३७४] नंतरच्या काळात मेथॉडिस्ट चर्च, पेन्टिकॉस्टल चर्च, ख्राईस्ट चर्च इत्यादी चर्चची भर पडली गेली. सन १८६२ मध्ये आद्य मिशनरी रेव्ह आणि चार्लस हार्डिंग सोलापूर शहरात आले. सन १८६४ मध्ये त्यांनी शहरात पहिल्या ख्रिस्त मंडळीची स्थापना केली.[३७५] शहरात असणाऱ्या एकूण लोकसंखेच्या प्रमाणात सन १९०१ मध्ये ०.२४, सन १९६१ मध्ये ०.३० आणि सन १९७१ मध्ये ०.२९ ख्रिश्चन होते. शहरातील ख्रिश्चन धर्मीयांची लोकसंख्या कमी असल्याने शहरात त्यांची धार्मिक स्थळे फारच कमी प्रमाणात आढळतात.[३७६]

- **रोमन कॅथॉलिक चर्च**

हे चर्च १४० वर्षांपूर्वीचे जुने असून सुरूवातीला ते हेड पोस्ट ऑफिसजवळ होते. सदरचे चर्च या पंथांच्या लोकांना राहण्यापासून लांब पडू लागल्याने रे. फादर डिसुझा यांनी हे चर्च स्टेशनच्या बाजूस शिडीच्या बंगल्याजवळ मोठ्या जागेत नेले. याच चर्चच्या परिसरात सेंट जोसेफ ही शिक्षण संस्था चालू आहे. या चर्चचे व्यवस्थापन रे. फादर सी. डायस हे पाहत होते.[३७७]

- **प्रोटेस्टंट धर्मीयांचे चर्च**

हे चर्च हेड पोस्ट ऑफीसवरून मोतीबागेकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे, या चर्चचा परिसर फार मोठा असल्याचे दिसून येते.

- **अमेरिकन मिशन चर्च**

पहिली ख्रिस्त मंडळी या संस्थेचे हे चर्च सन १८६४ मध्ये स्थापन केले असून गणपती घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आणि श्रीदत्ताच्या देवालयाजवळ होते. शहराच्या मध्यभागातील हे चर्च समाज बांधवांची संख्या वाढल्याने सन २००५ मध्ये रंगभवन चौकात सात रस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्याकडील बाजूस मोठ्या जागेत गॉथिक शैली पध्दतीचा वापर करून नूतनीकरण केले आहे.

छायाचित्र क्र. २४



पहिली ख्रिस्त मंडळी चर्च (गणपती घाट)
(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

सध्या या संस्थेचे काम याच इमारतीमधून होत आहे. चर्चच्या कमानीच्या वर बेलटॉवर आहे. सिध्देश्वर तलावातील जादा झालेले पाणी नाल्याद्वारे शहराबाहेर सोडले जाई. हा नाला या मिशनच्या जवळ वाहत होता. पावसाळ्यात हा नाला भरून वाहत असे, नाला भरल्यानंतर या नाल्याचे पाणी अमेरिकन मिशनच्या बाजूकडील रस्त्यावर येत असे. यासाठी सरकारने या नाल्याची दुरूस्ती करून एक भिंत आडवी बांधून पाणी रस्त्यावर येणार नाही याची काळजी घेतली. ही भिंत बांधण्यासाठी अमेरिकन मिशनने त्यावेळी ८४४ रूपये सरकारात जमा केल्याचा उल्लेख सापडतो.[३७८] अमेरिकन मराठी मिशनचे पहिले ख्रिस्त भजनी मंडळ सन १९४८ साली बेंजामिन बगाजीराव आंग्रे यांनी स्थापन केले. सध्या या भजनी मंळाचे प्रमुख श्री मोहन आंग्रे हे असून ते शहरातील इतर ख्रिश्चन मुलांनाही भक्ती गीते शिकवितात. 'चर्चक्वायर' या नावाने त्याचा हा ग्रुप प्रसिध्द आहे.[३७९]

३.७ शिखांचे धार्मिक स्थळ

शिख धर्मात गुरूद्वारास अत्यंत महत्त्व आहे. या ठिकाणी 'गुरूग्रंथ साहेब' या धार्मिक ग्रंथाची स्थापना केलेली असते. सोलापूर शहरात शिखांची लोकसंख्या अल्प प्रमाणात असल्याने गुरूद्वाराची निर्मिती उशीरा झाल्याचे दिसून येते. शहरात असणारे सिंधी शिख कुटुंबिय रमेशसिंग पमनदास वतवानी यांनी सन १९९० मध्ये आपल्या राहत्या घरात एका छोट्या खोलीत गुरूद्वाराची निर्मिती केली होती. सन १९९८-१९९९ मध्ये अंत्रोळीकर नगर भागात सहा हजार चौरस फुट जागा खरेदी करून या

गुरूद्वाराचे स्थलांतर त्या जागेत केले. तीन मजली बांधकाम असलेल्या मधल्या मजल्यावर 'गुरूग्रंथ साहेबांची' स्थापना केली आहे. या ठिकाणी दररोज दोन तास नित्यनैमित्तिक पाठ व किर्तन होते.

गुरूद्वारामध्ये ईश्वराची मूर्ती नसून त्या ठिकाणी कमी उंचीच्या एका चौरंगावर 'गुरूग्रंथसाहेब' या ग्रंथांची प्रतिष्ठापना केलेली आहे. या गुरूद्वाराची व्यवस्था व गुरूग्रंथ साहेबांची नियमित उपासना तसेच उपदेश करण्यासाठी एका पुरोहिताची नेमणुक केलेली असून शीखांच्या या पुरोहिताला 'ग्रंथी' असे म्हणतात. या ठिकाणी रोज सकाळी समारंभपूर्वक गुरूग्रंथ उघडून त्याचे वाचन केले जाते.

गुरूद्वारात सकाळी व संध्याकाळी स्त्री-पुरूष सामुहिकरित्या प्रार्थना म्हणतात. तसेच 'वाहे गुरू' हा शीखांचा चार अक्षरी मंत्रही जपला जातो. या गुरूद्वारात गुरूनानक जयंती, गुरू गोविंदसिंग जयंती, गुरू अर्जूनदेव शहिद दिवस इत्यादी वार्षिक उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. या उत्सवात गुरूद्वारातर्फे सर्व धर्मीयांसाठी लंगरचा कार्यक्रम आयोजित केला जातो. नांदेड, बिदर, गोवा इत्यादी ठिकाणाहून येणाऱ्या शिख समाजातील व सिंधी समाजातील लोकांच्या जेवणाची व राहण्याची सोय या गुरूद्वारात केली जाते.[३८०] अशा प्रकारे गुरूद्वाराच्या माध्यमातून शिख समुदायास सोलापूरात एकत्र आणण्याचे काम चांगल्या पध्दतीने होत आहे.

माणसाच्या मनात असणाऱ्या अलौकिक शक्तीचे मूर्त स्वरूप म्हणजे देव होय. अशा देवतेची पूजा-अर्चा करून मनुष्य आपले हित साधताना दिसून येतो. ईश्वरोपसनेसाठी माणसानी मंदिर, मशिद, गुरूद्वार, चर्च इत्यादी धर्म स्थळांची निर्मिती केली. मध्ययुगीन कालखंडातील धर्म स्थळांबरोबर अलिकडील काळात काही नवीन धार्मिक स्थळेही शहरात निर्माण झालेली आहेत. मानवाच्या जीवनात देव-देवळे यांना महत्वाचे स्थान असून, त्यांचा मानवाच्या सर्वांगिन जीवनावर प्रभाव पडलेला दिसून येतो. शहरातील विविध धार्मिक स्थळांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की धार्मिक स्थळांच्या यात्रा-उत्सवात व धार्मिक कार्यात सर्व जाती-धर्माचे लोक आनंदाने सहभागी होऊन सामाजिक व धार्मिक ऐक्य जोपासण्याचा प्रयत्न करतात.

संदर्भ व तळटिपा

१. Gazetteer of the Bombay Presidency, Solapur Dist., Vol. XX, 1997, P. 494.

२. जोशी महादेव शास्त्री, भारताची मुर्तीकला, १९८०, पृ. ७.

अ) गर्गे स. मा., (संपा.), भारतीय समाजविज्ञान कोश, खंड - ३, पृ. ५१२-५१३.

३. पाठक अ. शं. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर, महाराष्ट्र : इतिहास - प्राचीन काळ, स्थापत्य व कला, खंड-१, भाग-२, मुंबई, २००९, पृ. ९७.

४. कुलकर्णी वि. य., भारतीय कला उद्‌गम आणि विकास, पूणे, १९९६ पृ. २५ - २६.

५. जोशी प्र. न., अग्निपुराण, पुणे, १९८२, पृ. ९०-९६.

६. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास,पूणे, २००६, पृ. ११५.

७. कुलकर्णी वि. य., उपरोक्त, पृ. २६ - २७.

८. कृष्णदेव, उत्तर भारतातील मंदिरे, वैद्य गो. वि., (अनु.), नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, १९७०, पृ. २.

अ) पाठक श. अ. (संपा.) उपरोक्त, पृ. ९९-१००.

९. कृष्णदेव, उपरोक्त, पृ. २.

१०. श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, गीत सिध्देश्वर,सोलापूर, १९७१, पृ. २५.

अ) श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, श्री सिध्दरामेश्वरांची वचने, खंड-१, सोलापूर, १९९८, पृ. १० (प्रस्तावना) .

११. श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, श्री सिध्देश्वर महात्म्य, सोलापूर, २००९, पृ. २३.

१२. कुंभार आनंद, संशोधन तरंग, १९८८, पृ. ७०. (शिलालेख क्रमांक १, ओळ क्रमांक ९) (मल्लिकार्जून देवरिगे अणदूर मुन्नुर शेळगे बिट्‌ट आय मोनुगोम्मान्न भः).

१३. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, १९४९, सोलापूर, पृ. ३४.

१४. अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, सोलापूर, २०१३, पृ. २८ - ३१.

१५. कुलकर्णी ग. पं., (संपा.), सोलापूर नगरपालिका शतसावंत्सरिका ग्रंथ, १९५३, पृ. ६.

१६. उदगिरी विनायक, सोलापूर गाईड, पृ. १० - ११.

अ) दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, २० जुलै २०१२.

ब) श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, श्रीसिध्दरामेश्वर महात्म्य, पृ. ९१.

१७. मुलाखत, हिरेहब्बू राजशेखर, पुजारी, मल्लिकार्जून मंदिर, सोलापूर.

१८. श्री सिध्दरामेश्वर महात्म्य, पृ. ४.

रेवणसिध्देश्वरः आंध्रप्रदेशातील कोल्लीपाकुल स्थानावरील शिवलिंगामधून स्वयंभू प्रकट झालेले सिध्दपुरूष म्हणजे रेवणसिध्देश्वर होय. कोल्लीपाकुल हे तिर्थक्षेत्र हैद्राबादपासून ८० कि.मी. अंतरावर असून हे गाव कोलनुपाक या नावानेही आज ओळखले जाते. रेवणसिध्देश्वर हे श्रीसिध्दरामेश्वरांचे गुरू होते.

१९. दैनिक संचार, सोलापूर, २२ ऑगस्ट २०११.

२०. श्री कुठारसोमेश्वर लिंगाच्या चौथऱ्यावरील लेखावरून, मल्लिकार्जून मंदिर, सोलापूर.

२१. मुलाखत, मल्लिनाथ रेवणसिध्देश्वर शिंगारे (पुजारी), मल्लिकार्जून मंदिर, सोलापूर.

२२. दैनिक सकाळ, सोलापूर, १२ ऑगस्ट २०१३.

२३. मुलाखत, मल्लिनाथ रेवणसिध्दप्पा शिंगारे (पुजारी), मल्लिकार्जून मंदिर, सोलापूर.

अ) दैनिक संचार, सोलापूर, २२ ऑगस्ट २०११.

तांदुळ पूजा - या पुजेमध्ये मुळ लिंगावर ८० किलो तांदुळ ओतून त्याभोवती सुताच्या दोरीने बांधून तांदळाची पिंड तयार केली जाते. यामध्ये वरील बाजूस ९ किलो मसूर दाळ आणि ९ किलो मुगदाळ घालून त्यावर रेवणसिध्देश्वरांचा पितळी मुकुट ठेवला जातो.

२४. कोसंदर प. रे., संस्था नि संस्थापक आणि पन्नास वर्षापूर्वीचे व्यापारी, सोलापूर क्षत्रिय प्रकाशन,पृ. २.

२५. Gazetteer of India, Maharashtra State, Solapur Dist., 1977. पृ. ९८५.

२६. बामणगांवकर ना. रा., पृ. २१६.

२७. जक्कल वि. न., सोलापूर शहराचा इतिहास, सोलापूर, १९२८, पृ. ३९.

२८. बसवपथ, त्रैमासिक, २००७, बसव समिती, बेंगलोर, पृ. ६४.

२९. Solapur Dist Gazetteer, १९७७, पृ. ९८५-९८६.

३०. सुदर्शन (संपा.), सिध्दरामेश्वर चरित्र, सोलापूर, पृ. ७०.

३१. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ३९-४०.

३२. कोसंदर प. रे., (संपा.), उपरोक्त, पृ. १ ते ४.

३३. श्री सिध्दरामेश्वर महात्म्य दर्शन, प्रकाशक, चन्नबसव्वा ईश्वरय्या स्वामी, विभुती मठ, सोलापूर, पृ. ६९.

३४. दैनिक तरूण भारत, सोलापूर, १५ जानेवारी २०१२.

३५. विरदासोही नालतवाड, शिवशरण चरित्र, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, सोलापूर, २००७ पृ. २-४, ८४-८५.

३६. Solapur Dist. Gazetteer, १९७७, पृ. ९८५.

३७. कित्ता, पृ. ९८७.

३८. माने राजा (संपा.), सबकुछ सोलापूर, लोकमत मीडिया सोलापूर, २०१४, पृ. ११.

३९. कुलकर्णी स्वराली, सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकांचा टिकात्मक अभ्यास (१२०६-१८०८), अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सोलापूर विद्यापीठ, २००८, पृ. ५०-५१.

४०. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ सोलापूर, पृ. ११.

४१. कार्यक्रम पत्रिका, २००९, श्री शंकरलिंग देवस्थान, गुरूवार पेठ, सोलापूर.

४२. दैनिक सकाळ, सोलापूर, २३ जुन २०१३.

४३. मुलाखत, मल्लप्पा बसप्पा धनशेट्टी, अध्यक्ष, श्री शंकरलिंग देवस्थान समिती, सोलापूर.

४४. सोलापूर समाचार, १२ ऑगस्ट १९७४.

४५. कित्ता, ३ सप्टेंबर १९७२.

४६. कित्ता.

४७. मुलाखत, धुळम दिनानाथ विठ्ठल, अध्यक्ष, देवस्थान पंचकमिटी, श्री निलकंठेश्वर देवस्थान, साखर पेठ, सोलापूर.

अ) सोलापूर समाचार, २६ जुन १९६७

४८. दैनिक सकाळ, सोलापूर, १ ऑगस्ट २०१२.

अ) दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १४ ऑगस्ट २०१२.

४९. मुलाखत, शिवकुमार कृष्णहरी बंडा, अध्यक्ष, मंदिर समिती, श्री निलकंठेश्वर मंदिर, गुरूवार पेठ, सोलापूर.

५०. कित्ता.

५१. सोलापूर समाचार, ९ ऑगस्ट १९६१.

५२. ईराबत्ती आशण्णा, माझ्या आयुष्यातील टिपणे, (प्रवास वर्णन व श्री मार्कंडेय चरित्रासह), सोलापूर, १९७१, पृ. ६, ७, ८.

५३. दैनिक लोकमत, सोलापूर, ८ नोव्हेंबर २०१३.

५४. ईराबत्ती आशण्णा, उपरोक्त., पृ. ६, ७, ८.

५५. कित्ता. पृ. ८, १०, ११ - १७.

५६. ५९ वा वार्षिक अहवाल, पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर, २०१०-२०११, सोलापूर, पृ. १ - ३.

५७. मुलाखत, किरण जोशी, पुजारी, जुने विठ्ठल मंदिर, सोलापूर.

५८. अघोर भ. वा., पुण्यात्मा पांडुरंग, सौभाग्य लक्ष्मी प्रकाशन, सोलापूर, १९५५, पृ. ७६ - ७७.

५९. जुने विठ्ठल मंदिरावरील असणाऱ्या फरशीवरील लेख, १८५५.

६०. जुने विठ्ठल मंदिरातील असणाऱ्या कमानीवरील लेख, १९२१.

६१. जुने विठ्ठल मंदिरातील असणाऱ्या छोट्या गणपती मंदिरावरील लेखावरून, १९४३.

६२. जुने विठ्ठल मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या भिंतीवरील लेखावरून.

६३. जुने विठ्ठल मंदिराच्या सभा मंडपतील खांबावरील कोरलेले लेख, २०१३.

६४. दैनिक तरूण भारत, सोलापूर, २६ जुन २०१२.

६५. सोलापूर समाचार, सोलापूर, १ सप्टेंबर १९४५.

६६. कित्ता, ४ जानेवारी १९३३.

६७. अघोर भ. वा., उपरोक्त, पृ. २३, ४३, ४६, ७०.

६८. सोलापूर समाचार, सोलापूर, २९ मार्च १९७२.

६९. अघोर, उपरोक्त, पृ. ३२.

७०. मुलाखत, धनराज एडके, सदस्य, स्वकुळ साळी विठ्ठल मंदिर समिती, बेगम पेठ, सोलापूर.

७१. सोलापूर समाचार, सोलापूर, ११ ऑगस्ट १९६७.

७२. प्रत्यक्ष भेट, स्वकुळ साळी विठ्ठल मंदिर, सोलापूर.

७३. दैनिक लोकमत, सोलापूर, ६ नोव्हेंबर २००३.

७४. मंदिरातील फलकावरील माहितीवरून, मातंग समाज विठ्ठल मंदिर, सोलापूर.

अ) दैनिक तरूण भारत, सोलापूर, २९ जुन २०१२.

७५. दैनिक सकाळ, सोलापूर, १८ जुलै २०१३.

७६. मंदिराच्या गर्भगृहावरील लेखावरून, मातंग समाज विठ्ठल मंदिर, सोलापूर.

७७. स्मरणिका, वैभवशाली वारकरी परंपरा, अखिल भारतीय वारकरी संप्रदाय, सोलापूर, २०१०, पृ. ६१.

७८. मुलाखत, नागनाथ सिताराम कसबे, पुजारी, मातंग समाज विठ्ठल मंदिर, सोलापूर.

७९. नाईक म. भि., धन्य ते संसारी, सोलापूर, पृ. ५५.

८०. दैनिक सकाळ, सोलापूर, १५ जुलै २०१३.

८१. प्रत्यक्ष भेट, चौपाड विठ्ठल मंदिर, सोलापूर.

८२. मुलाखत, यशवंत कोळेकर, सदस्य, चौपाड विठ्ठल मंदिर समिती, सोलापूर.

८३. चौथऱ्यावरील लेखावरून, चौपाड विठ्ठल मंदिरातील.

८४. नाईक म. भि., उपरोक्त, पृ. ५९.

८५. सोलापूर समाचार, सोलापूर, ५ डिसेंबर १९१६.

८६. मुलाखत, सतीश कुलकर्णी, पुजारी, चौपाड विठ्ठल मंदिर.

८७. दैनिक तरूण भारत, सोलापूर, २९ जुन २०१२.

८८. क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर प्रवेशद्वारावरील लेख, सोलापूर.

८९. प्रत्यक्ष भेट, क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर.

९०. मुलाखत, पोपट रावसाहेब इंगळे, क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिराचे पुजारी, सोलापूर.

९१. मुलाखत, अनिल भिंगारे, राधा-कृष्ण विठ्ठल मंदिर विश्वस्त, सोलापूर.

९२. मुलाखत, नागनाथ अळ्ळी, अध्यक्ष, विठ्ठल - गणेश मंदिर समिती, सोलापूर.

९३. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ सोलापूर, पृ. २३.

९४. दैनिक लोकमत, सोलापूर, १८ मार्च २०१४.

९५. मुलाखत, शिरीष बाळकृष्ण जोशी, पुजारी, श्रीदत्त मंदिर, दक्षिण सदर बझार, सोलापूर.

९६. चौथऱ्यावरील लेख, श्रीदत्त मंदिर, दक्षिण सदर बझार, सोलापूर.

९७. नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. ३२, ३४.

९८. मुलाखत, बाळकृष्ण नारायण जोशी, पुजारी, श्रीदत्त मंदिर, दक्षिण सदर बझार, सोलापूर.

९९. मंदिराच्या प्रवेशद्वारावरील लेख, श्रीदत्त देवालय, चौपाड, सोलापूर.

१००. प्रत्यक्ष भेट, श्रीदत्त देवालय चौपाड, सोलापूर.

१०१. सोलापूर समाचार, ८ फेब्रुवारी १९३१.

१०२. कित्ता, १२ डिसेंबर १९४६, १० डिसेंबर १९६७.

१०३. कुलकर्णी स्वराली, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, उपरोक्त, पृ. ३३-३४.

१०४. दैनिक सकाळ, सोलापूर, १३ ऑक्टोंबर २०१२.

१०५. दैनिक लोकमत, सोलापूर, २ ऑक्टोंबर २०१३.

मड्डी वस्तीः ज्या ठिकाणी मड्डी वस्ती आहे तिथे असलेली जमीन नापिक असल्याने जुनी मंडळी त्याला कन्नड भाषेत 'मड्डी' असे म्हणत. पुढे तीच ओळख कायम राहिली आणि मड्डी वस्ती हे नांव रूढ झाले.

१०६. मुलाखत, मल्लिनाथ रूद्रय्या हिरेमठ, पुजारी, श्रीदत्त मंदिर, मड्डी वस्ती, सोलापूर.

१०७. दरवाजावरील लेख, जुने श्रीराम मंदिर, सोलापूर.

१०८. मुलाखत, वासुदेव धोंडोपंत पुजारी, जुने श्रीराम मंदिर, सोलापूर.

१०९. प्रवेशद्वारावरील लेख, श्रीराम मंदिर, नवी पेठ, सोलापूर.

११०. दैनिक संचार, सोलापूर, १२ मे २०१३.

१११. सोलापूर समाचार, ८ नोव्हेंबर १९४५.

११२. घुगरदरे, पुण्यात्मा पांडुरंग, पृ. ७१.

११३. सोलापूर समाचार, ३ ऑक्टोंबर १९५७.

११४. मुलाखत, प्रकाश मित्रगोत्री पुजारी, श्रीराम मंदिर, नवी पेठ, सोलापूर.

११५. प्रवेशद्वारावरील लेख, श्रीराम मंदिर, दक्षिण सदर बझार, सोलापूर.

११६. मुलाखत, मधुकर अनंत जोशी, पुजारी, श्रीराम मंदिर, दक्षिण सदर बझार, सोलापूर.

११७. सोलापूर समाचार, २६ ऑगस्ट १९५६.

११८. दैनिक लोकमत, सोलापूर, १५ ऑक्टोंबर २०१३.

११९. सोलापूर समाचार, २६ ऑगस्ट १९५६.

१२०. कित्ता, २३ एप्रिल १९६४.

१२१. ढेरे रा. चि., लोकदेवताचे विश्व, पद्मागंध प्रकाशन, पूणे, २००७, पृ. १२.

१२२. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १५१.

१२३. जोशी म. शास्त्री, भारतीय मूर्ती कला, पृ. ४३.

१२४. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १५१.

१२५. कातगडे पुंडलिक, (संपा.), कन्नड-मराठी शब्दकोश मुंबई १९६९, पृ.४९१.

१२६. मुलाखत, धनंजय किसन पतंगे, पुजारी, मश्रुम गणपती, तळे-हिप्परगा, सोलापूर.

१२७. माटे एम. एस., मराठा आर्किटेक्चर (१६५०-१८५०), पृ. ९४-१०९.

१२८. कुलकर्णी स्वराली, पीएच. डी. प्रबंध, उपरोक्त, २००८, पृ. ३१.

१२९. सिमांत दिवाळी अंक, सोलापूर, २००८, पृ. १४-१५.

१३०. नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. २३.

१३१. दैनिक संचार, सोलापूर, १२ सप्टेंबर २०१२.

१३२. कुलकर्णी ग. प., (संपा.) सोलापूर नगरपालिका शतसवंत्सरिका ग्रंथ, १९५३, पृ. ४१.

१३३. मुलाखत, शकुंतला पापाराव मल्लेलवार, मंदिर सेवक, मोदीखाना गणपती मंदिर, सोलापूर.

१३४. मुलाखत, किशोरी प्रसाद भावार्थी, पुजारी, मोदीखाना गणपती मंदिर, सोलापूर.

१३५. गणेश जयंती उत्सव कार्यक्रम पत्रिका, २०१०, मोदीखाना गणपती मंदिर, सोलापूर.

१३६. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ सोलापूर, पृ. २१३.

१३७. सोलापूर समाचार, १५ एप्रिल १९६५.

१३८. मुलाखत, विद्या प्रभाकर गणफुले, पुजारी, रानडे मारूती मंदिर, सोलापूर.

१३९. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. २६१.

१४०. मुलाखत, गणेश मारूती पतंगे, पुजारी, हनुमान मंदिर, बाळीवेस, सोलापूर.

१४१. सोलापूर समाचार, ९ मार्च १९३९.

१४२. मुलाखत, धोंडीबा गणपत बारंगुळे, पुजारी, रेवणी मारूती मंदिर, सोलापूर.

१४३. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. ३४-३५.

१४४. कित्ता, पृ. ३५.

१४५. सोलापूर समाचार, ३ ऑगस्ट १९४१.

१४६. कित्ता, २६ फेब्रुवारी १९३४.

१४७. मुलाखत, चिवरी डि. जी., सचिव, जोडभावी पेठ हनुमान मंदिर, सोलापूर.

१४८. प्रत्यक्ष भेट, मोदीखाना हनुमान मंदिर.

१४९. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, २५ एप्रिल २०१३.

१५०. कार्यक्रम पत्रिका, २०१०, श्री लक्ष्मी-नारायण मंदिर, सोलापूर

१५१. जोशी पं. म. शास्त्री, भारतीय मुर्तीकला, पृ. ५७.

१५२. मुलाखत, लक्ष्मीनारायण रघुनाथराव सोमानी, अध्यक्ष, श्रीलक्ष्मी-नारायण मंदिर समिती, सोलापूर.

१५३. सोलापूर समाचार, १४ सप्टेंबर १९७४.

१५४. कित्ता, २५ सप्टेंबर १९५३.

१५५. मंदिरास प्रत्यक्ष भेट, द्वारकाधिश मंदिर, सोलापूर.

१५६. मुलाखत, शशि दायमा, पुजारी, द्वारकाधिश मंदिर, सोलापूर.

१५७. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. ११४.

१५८. मुलाखत, सायप्पा सिद्राम पाटील, ट्रस्टी, श्रीकृष्ण देवस्थान, वडार समाज, सोलापूर.

१५९. मिळकत दप्तर, श्री बालाजी मंदिर, चौपाड, सोलापूर.

१६०. श्री बालाजी मंदिर, चौपाड, सोलापूर प्रवेशद्वारावरील लेख.

१६१. श्री बालाजी मंदिरातील पद्मावती मंदिरावर असलेला लेख.

१६२. मुलाखत, संजयसिंह प्रतापसिंह चौहान, अध्यक्ष, मंदिर समिती, बालाजी मंदिर, चौपाड.

१६३. मुलाखत, कोंडा गोविंदराव बाळकृष्ण, अध्यक्ष, मंदिर समिती व्यंकटेशअध्यक्ष, मंदिर.

१६४. जोशी पं. म. शास्त्री, भारतीय मुर्तीकला, पृ. ५३.

१६५. कार्यक्रम पत्रिका, ३९ ब्रह्मोत्सवम्, २०११, व्यंकटेश मंदिर, सोलापूर

१६६. मुलाखत, श्री प्रकाश शंकर चव्हाण, पुजारी, काळभैरव मंदिर, बलिदान चौक, सोलापूर.

१६७. जोशी पं. म. शास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, खंड-९, पृ.२१२-२१५.

अ) मुलाखत, कल्लय्या पंचय्या गणाचार्य, पुजारी, शनिमंदिर, सोलापूर.

१६८. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ सोलापूर.

१६९. www.marathivishwakosh.

१७०. शेंडे एस. आर. मराठेकालीन धार्मिक जिवन, सोलापूर, २०१२, पृ. १३७.

१७१. ढेरे रा. चि., लोकदैवतांचे विश्व, पूणे, २००७, पृ. १९१-१९२.

१७२. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १४६.

अ) सोलापूर समाचार, १० डिसेंबर १९६७.

१७३. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. २९.

अ) सोलापूर समाचार, १७ डिसेंबर १९६७.

१७४. B. A., File No. R-40016, P. 234.

१७५. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ७ डिसेंबर २०१३.

१७६. दैनिक सकाळ, सोलापूर, ९ डिसेंबर २०१३.

१७७. खंडोबा मंदिर, साखर पेठ, फरशीवरील लेखावरून, सोलापूर.

अ) मुलाखत, शकुंतला माळगे, पुजारी, खंडोबा मंदिर, साखर पेठ, सोलापूर.

१७८. जक्कल वि. न., सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ९.

अ) कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. १६६.

१७९. भारतीय संस्कृतिकोष, खंड ७, पृ.

१८०. ढेरे रा. चि., लज्जागौरी, पृ. १८९.

१८१. भारतीय संस्कृतिकोष, खंड ९, पृ. ५९-६०.

१८२. मुलाखत, संतोष महादेव पुजारी, पुजारी, वेताळसिध्द मंदिर.

अ) मराठी - कन्नड शब्दकोष, पुंडलीकजी कातगडे (संपा), म. रा. सा. आणि सं. मंडळ मुंबई, १९६९. पृ. ५६५.

ब) सुगम मराठी शब्दकोष, बनहट्टी, धर्माधिकारी,(संपा.), सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८८, पृ. ३८५

१८३. www.marathivishwakosh.

१८४. ढेरे रा. चि., लज्जागौरी, पृ. १९.

१८५. भागवत दूर्गा, धर्म आणि लोकसाहित्य, मुंबई, १९७५,पृ. २८.

१८६. कित्ता, पृ. २९-३३.

१८७. पाटोळे अरविंद, श्री तुळजाभवानी महात्म्य (साडे तीन शक्तीपीठापैकी एक शक्तीपीठ), पुणे, २००५, पृ. ४२.

१८८. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १६, १७ ऑक्टोंबर २०१२.

१८९. पाटोळे अरविंद, उपरोक्त, पृ. ४३.

१९०. उदगिरी विनायक, सोलापूर गाईड, पृ. १०.

१९१. गर्भगृहातील भिंतीवरील लेख, रूपाभवानी मंदिर, सोलापूर.

१९२. सोलापूर समाचार, १९ ऑक्टोंबर १९७४.

१९३. दैनिक लोकमत, सोलापूर, ५ ऑक्टोंबर २०१३.

१९४. सोलापूर समाचार, १३ सप्टेंबर १९७४.

१९५. जावळे सोपान (संपा.), सोलापूर शहर व परिसराचा इतिहास, २०१२, पृ. ९४.

१९६. कार्यक्रम पत्रिकेतील मजकूरावरून, रूपाभवानी देवी यात्रा, २००६, सोलापूर.

१९७. सोलापूर समाचार, २० ऑक्टोंबर १९६४.

१९८. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १७ ऑक्टोंबर २०१२.

१९९. सोलापूर समाचार, १२ डिसेंबर १९६५.

२००. भागवत दूर्गा, उपरोक्त, पृ. २३-२४.

हिंगलाजः 'हिंगलाज' ही देवता भात्यात राहणारी आगरिया लोक भात्याला हिंगलाज म्हणतात, या देवीला 'हिंगलाज माता' असेही स्थानपरत्त्वे म्हणतात. कोणी तिला 'सुपाची देवता' म्हणतात (शेतीशी संबंध असलेली देवता).

२०१. भारतीय संस्कृती कोश, खंड-६, पृ. ५०५-५०६.

२०२. सोलापूर समाचार, २३ ऑक्टोंबर १९६७.

२०३. मुलाखत, किशोर कटारे, उद्योगपती, कटारे स्पिनिंग मिल, सोलापूर.

२०४. दैनिक सकाळ, सोलापूर, १६ ऑक्टोंबर २०१२.

२०५. सोलापूर समाचार, २२ ऑक्टोंबर १९६७.

२०६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १७ ऑक्टोंबर २०१२.

२०७. दैनिक सकाळ, सोलापूर, १३ ऑक्टोंबर २०१२.

२०८. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १६ मे २०१३.

२०९. कल्पतरू, सोलापूर, ५ फेब्रुवारी १९५५.

२१०. सोलापूर समाचार, १ फेब्रुवारी १९५५.

२११. दैनिक तरूण भारत, सोलापूर, १४ ऑक्टोंबर २०१२.

२१२. मुलाखत, रामदास व्यंकप्पा रायचूरकर, पुजारी, श्री बनशंकरी (चौडेश्वरी) देवी, साखर पेठ.

२१३. स्मरणिका, अमृत महोत्सवी वर्ष, २००६, श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर क्षत्रिय समाज, सोलापूर, पृ. ८-१०.

२१४. मुलाखत, श्री बाबुराव दत्तात्रय कोंतम, अध्यक्ष, श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर क्षत्रिय समाज, सोलापूर.

२१५. स्मरणिका, अमृत महोत्सवी वर्ष, २००६, श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर क्षत्रिय समाज, सोलापूर, पृ. ११-१२.

२१६. कित्ता, पृ. २८.

बोनमू म्हणजे गुळ, सुवासिक तांदुळ, तूप यापासून बनविलेला पदार्थ

२१७. मुलाखत, सुभाष विनोद चिलवेरी, सदस्य, श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर समाज संस्था, सोलापूर.

२१८. स्मरणिका, अमृत महोत्सवी वर्ष, २००६, उपरोक्त, पृ. २४.

२१९. कुलकर्णी स्वराली, उपरोक्त, पृ. ३६-३७.

२२०. माटे म. श्री., मराठा आर्किटेक्चर, पृ. ८२-९५.

२२१. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १३ ऑक्टोंबर २०१३.

२२२. स्मरणिका, सुवर्ण महोत्सवी वर्ष, १९६०-२०१०, निलगार ज्ञाती संस्था, सोलापूर.

२२३. कित्ता, पृ. २६-३२.

२२४. दैनिक तरूण भारत, सोलापूर, १४ ऑक्टोंबर २०१२.

२२५. नवरात्र महोत्सव माहिती पत्रक, कालिका देवी मंदिर, निलगार इस्टेट, सोलापूर.

२२६. स्मरणिका, सुवर्ण महोत्सवी वर्ष, निलगार इस्टेट.

२२७. दैनिक सकाळ, सोलापूर, ३० जून २०१२.

२२८. मुलाखत, मल्लिकार्जून चिंताकिंदी, अध्यक्ष, कालिका मंदिर देवस्थान समिती, सोलापूर.

२२९. स्मरणिका, निलगार इस्टेट, पृ. ३२-३३.

२३०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १९ ऑक्टोंबर २०१२.

२३१. कित्ता, १८ ऑक्टोंबर २०१२.

२३२. सोलापूर समाचार, १९ ऑक्टोंबर १९६१.

२३३. दैनिक लोकमत, सोलापूर, २५ मार्च २०१२.

२३४. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ५८.

किल्ल्याचे बुरूज बांधत असताना ते वारंवार ढासळू लागल्याने जोतिषाकडून एका गरोदर स्त्रिचा बळी द्यावा, असा उपाय सूचविला गेला, सोलापूरच्या पाटलावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. त्याच्या सुनेने म्हणजे पद्मावतीने मोठ्या श्रध्देने बलिदानाची तयारी दर्शविली.

२३५. कित्ता, पृ. ५३.

२३६. सोलापूर समाचार, ९ ऑगस्ट १९६१.

२३७. दैनिक सकाळ, सोलापूर, १८ ऑक्टोंबर २०१२.

२३८. कार्यक्रम पत्रिका, २००६, नवरात्र श्रीभवानी मंदिर, भारतीय चौक, सोलापूर.

२३९. मुलाखत, अनिल बासुतकर, पुजारी, श्री भवानी मंदिर, भारतीय चौक, सोलापूर.

२४०. माने राजा (संपा.), उपरोक्त, सब कुछ, सोलापूर, पृ. ८७.

२४१. भागवत दूर्गा, उपरोक्त, पृ. ३२-३४.

शितलादेवीः शितलादेवीला पाणी, फुल, फळे अशा सुंदर व थंड वस्तु अर्पण केल्या जातात तर मरिला पशूबळी लागतो. शितला ही मरिहून अर्वाचिन देवता मानली जाते. शितलादेवी कोपली तर माणसांना देवी रोग होतो. तिला शांत केल्याने त्या रोगाचा उपशम होतो, अशी समजूत आहे.

२४२. जावळे सोपान, उपरोक्त, पृ. ९५-९६.

२४३. भागवत दूर्गा, उपरोक्त, पृ. ३४.

२४४. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ.५८५-५८६.

२४५. जावळे सोपान, उपरोक्त, पृ. ९५-९६.

अ) भागवत दूर्गा, उपरोक्त, पृ. ३४.

२४६. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. ८६-८७.

२४७. भागवत दूर्गा, उपरोक्त, पृ. ३३-३४.

२४८. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. ८६-८७.

२४९. ढेरे रा. चि., लज्जागौरी, पृ. १७७.

२५०. नाडगोंडे गुरुनाथ, ग्रामिण समाजशास्त्र, पूणे, १९७६, पृ. १६५-१६६.

अ) मुलाखत, भानुदास वाघमारे, पोतराज, मरिआई मंदिर, मरिआई चौक, सोलापूर.

२५१. ढेरे रा. चि., उपरोक्त, पृ. १७७.

२५२. मुलाखत, स्वामी चंद्रय्या बडगू, सोलापूर.

२५३. ढेरे रा. चि., उपरोक्त , पृ. ५९-६६.

२५४. कातगडे पुंडलिकजी (संपा.), मराठी-कन्नड शब्दकोश, साहित्य आणि संसकृति मंडळ, मुंबई, १९६९, पृ. ४९५.

२५५. ढेरे रा. चि., उपरोक्त , पृ. ५९-६६.

२५६. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. २५७.

म्हैसंम्मा देवीस बळी देण्याचा विधी : यावेळी देवीला शंभर बकऱ्यांचा व दोन रेड्यांचा आणि डुकरांचा बळी देऊन गावाच्या चारही दिशांना चार जीवंत डुकरे पुरण्याचा विधी होतो. यात्रेच्या वेळी एक ओटा तयार करून त्यावर रेडा बळी देतात. रेड्याचे शिर गावपाटलाच्या घरासमोर पुरतात तर त्याचे मांस महार व मांग वाटून घेतात. त्याच्या रक्तात दाणे भिजवून ते दाणे शेतात टाकतात. यामुळे पिक चांगले येते ही त्यामागची भावना आहे.

२५७. ढेरे रा. चि., उपरोक्त, पृ. १३५.

२५८. मुलाखत, सपना रवी बडगू, सोलापूर.

२५९. मुलाखत, सरुबाई दगडू कसबे, पूजारी ,खोकलेआई मंदिर, सोलापूर.

२६०. ढेरे रा. चि., उपरोक्त, पृ. ६७-६९.

२६१. नाडगोंडे गुरुनाथ, उपरोक्त, पृ. १६३.

२६२. भारतीय संस्कृती कोश, खंड-६, पृ. ६७०.

मठः साधू, संन्यासी व बैरागी यांच्या निवासस्थानाला 'मठ' अशी संज्ञा आहे. आद्य शंकराचार्यांचे मठ भारताच्या विविध विभागात अस्तित्त्वात आहेत. दक्षिण भारतात शैव व

वैष्णव स्वामींचे आणि आचार्यांचे अनेक मठ आहेत. हे मठ कित्येकदा मंदिरांना लागून असत किंवा मंदिरे मठांना जोडलेली असत.

२६३. द न्यू इन सायक्लोपेडिया ब्रिटानिका, इन्डेक्स एल. झेड, १५ वी आवृत्ती, पृ. २२४.

२६४. कदम विकास, पंढरपूरातील सांप्रदायिक मठाचे स्वरूप, परंपरा व कार्य, सोलापूर, २०११, पृ. १-५.

२६५. वीरतपस्वी विशेषांक, २००९, श्री बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर.

वीरतपस्वी मंदिर - वीरतपस्वी मंदिराच्या बांधकामाची सुरूवात सन १९९० मध्ये झाली. हे मंदिर पूर्ण होण्यासाठी २० वर्षे लागले. या मंदिरास १०८ फुट उंचीचे विशाल महाद्वार असून कळसापर्यंतची उंची १०८ फुट आहे. या मंदिराचा ध्वज ४१ फुटाचा असून २.५ कोटी रूपये या मंदिराच्या बांधकामासाठी खर्च झाले आहेत. या मंदिरात १,००० लोक बसतील एवढे मोठे ध्यानमंदिर आहे.

२६६. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, पृ. १५.

२६७. कित्ता, पृ. १०.

२६८. सोलापूर समाचार, ४ एप्रिल १९५७.

२६९. कित्ता, ७ एप्रिल १९६७.

२७०. मुलाखत, श्री स्वामीनाथ महास्वामीजी, किरिट मठाचे मठाधिश.

२७१. श्री सद्‌गुरू शुभराय महाराज चरित्र, श्री शुभराय महाराज मठ, सोलापूर, पृ. ५.

२७२. भूर्के शाम, मुक्काम पोस्ट, सोलापूर, १९९४, पृ. १५.

२७३. सोलापूर समाचार, २३ सप्टेंबर १९६२.

२७४. जक्कल वि. न., कवि शुभराय महाराज चरित्र, सोलापूर, १९२१, पृ. ५.

२७५. भूर्के शाम, उपरोक्त, पृ. १५.

चिमा नायकीण ही कवी रामजोशी परिवारातील होती, तिने शुभराय महाराजांकडून अनुग्रह घेतला होता. उत्सव काळात ती मठात गाणी म्हणण्याकरीता येत असे.

२७६. कुलकर्णी ग. प., उपरोक्त, पृ. २८-३०.

२७७. जक्कल वि. न., कवि शुभराय महाराज चरित्र, पृ. ८.

२७८. श्री संत कवि शुभराय, १७५०-१८२०, शुभराय महाराज मठ, सोलापूर, पृ. १३.

२७९. उदगिरी, सोलापूर गाईड, पृ. ८.

२८०. भूर्के शाम, उपरोक्त, पृ. १६.

२८१. सोलापूर समाचार, १६ सप्टेंबर १९४१, २५ मार्च १९४२, १८ एप्रिल १९४८.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, १२ जुलै २०१२.

ब) दैनिक पुढारी, सोलापूर, १२ जुलै २०१२.

२८२. प्रभाकर महाराज चरित्र ग्रंथ, पृ. १ ते ४, २२.

२८३. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. १९६.

२८४. प्रभाकर महाराज चरित्र ग्रंथ, पृ. १३०.

जपमंत्र - प्रभाकर महाराजांजवळ सगुण व निर्गुण अशा प्रकारचे मंत्र, त्यांच्या गुरूंनी त्यांना दिलेले मंत्र, आकाशवाणीतून मिळालेले मंत्र, दृष्टांतरूपाने मिळालेले मंत्र, याशिवाय विविध देव-देवतांनी दिलेले मंत्र असा मंत्र संग्रह त्यांच्याजवळ होता.

२८५. सोलापूर समाचार, ७ फेब्रुवारी १९७४.

२८६. इंचगिरी मठ, नेहरू नगर शाखा, मठाच्या कागदपत्रावरून.

२८७. मुलाखत, सुरेंद्रनाथ महाराज, मठाधिपती, इंचगिरी मठ, नेहरू नगर, सोलापूर.

२८८. सोलापूर समाचार, २६ नोव्हेंबर १९७४.

२८९. प. पु. गुरूनाथ दंडवते महाराज चरित्र, पृ. १९७४.

२९०. स्मरणिका, श्री दत्त गुरूनाथ लहरी, सुनिल शिणखेडे, पृ. २-२५.

२९१. कित्ता, पृ. १-१३.

२९२. मुलाखत, रूक्मिणी गोविंदराज दंडवते, दंडवते गुहा प्रमुख, सोलापूर.

२९३. स्मरणिका, श्री दत्त गुरूनाथ लहरी, पृ. ७-१०.

२९४. मुलाखत, महेश पद्माकर जोशी, मठप्रमुख, श्री सद्गुरू गोविंदबुवा मठ, सोलापूर.

२९५. गोडसे, राघवेंद्र स्वामी चरित्र, पृ. ५-८, ११, १२, २९.

अ) माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. १४०.

२९६. नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. ५१-६२.

२९७. रोडे सोमनाथ, महात्मा बसवेश्वर, लातूर पृ. १७.

२९८. घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, साधना बुक स्टॉल, गडहिंगलज, २०००. पृ २९२.

अ) वीरदासोही उपरोक्त, पृ.८७-८९.

२९९. www.marathivishwakosh.

मशिदः या ठिकाणी सामुहिक नमाज पठण केले जाते. 'मशिद' हा शब्द 'मस्जिद' या अरबी शब्दापासून बनला असून 'मस्जिद' म्हणजे 'सजदा' करणे होय. 'सजदा' करणे म्हणजे मस्तक व गुडघे जमिनीला टेकवून प्रणाम करण्याची जागा होय. दिवसातून पाच वेळा 'सजदा' करण्याची पध्दत मुस्लिम समाजामध्ये दिसून येते. ईश्वराची प्रार्थना करण्यासाठी फक्त मशिदच अपरिहार्य नाही तर इतर ठिकाणी ही नमाज अदा केला जातो.

३००. अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, पृ. ३१-३२.

३०१. सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. ९९५.

अ) ऐतिहासिक फारसी साहित्य खंड-६, विभाग-२, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संशोधन मंडळ, मुंबई, पृ. ७८-११२.

३०२. संशोधक, मार्च २००६, पृ. १२-१४, आनंद कुंभार यांच्या लेखावरून.

३०३. जक्कल, सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ४६.

अ) सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. ९९५-९९६.

३०४. पगडी सेतु माधवराव, मोगल दरबाराची बातमी पत्रे, खंड-१, १९७८, पृ. १४०-१५३.

अ) संशोधक, मार्च २००३, पृ. १०.

३०५. सोलापूर समाचार, २ ऑगस्ट १९३२.

३०६. मुलाखत, मुम्ती अब्दुल अ. हमीद, जामा मशिदीचे इमाम, सोलापूर.

३०७. सोलापूर, तारिखे-आईनेमे, इलाहि व फ्लाही तनजीम, फारूक सय्यद व नसीम, सोलापूर, १९९९, पृ. ५९-६०.

अ) जक्कल, सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ४६.

३०८. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. १७७.

३०९. सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. ९९६.

३१०. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. ८४.

३११. कुंभार आनंद, संशोधनाची वाटचाल, पृ. ५७.

३१२. दैनिक सकाळ, सोलापूर, ३१ जुलै २०१३.

३१३. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. १७७.

३१४. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ४७.

३१५. मुलाखत, महमद इसाक फकरूद्दिन मकानदार, इमाम, इकरार अलि मशिद, सोलापूर.

३१६. माने राजा (संपा.), उपरोक्त, सब कुछ, सोलापूर, पृ. १०६.

३१७. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ४६.

३१८. माने राजा (संपा.), उपरोक्त, सब कुछ, सोलापूर, पृ. १७७.

३१९. मुलाखत, इस्माईल नालवार, मशिद ट्रस्टी, गौसिया मशिद, सोलापूर.

३२०. शितोळे, ह. अ. (संपा.), १९८०, सोलापूर दर्शन, पृ. १३-१४.

३२१. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ४६-४८.

३२२. कित्ता, पृ. ३५.

३२३. सोलापूर तारिखे-ऐनेमें, उपरोक्त, पृ. ५९-६०.

३२४. कुंभार आनंद, उपरोक्त, पृ. ५८.

३२५. माने राजा (संपा.), उपरोक्त, सब कुछ, सोलापूर, पृ. १८१.

३२६. उदगिरी, उपरोक्त, पृ. १५.

अ) सोलापूर समाचार, ७ जून १९३३.

३२७. सोलापूर समाचार, १० डिसेंबर १९६५ (महमद इसाक यांच्या लेखावरून).

३२८. कुलकर्णी स्वराली, उपरोक्त पृ. १८९.

३२९. संशोधक त्रैमासिक, मार्च २००६, पृ. १५-१६.

३३०. जामा मशिदीतील शिलालेख.

३३१. संशोधक, उपरोक्त पृ. १२-१३.

३३२. मुलाखत, महमद सलिम अब्दुल गफुर, मुजावर, जिल्हा परिषद परिसरातील तीन दर्गे.

३३३. Rewriting and Rethinking of Indian History, National Level Conference, Vitthalrao Shinde Arts College, 3, 4 February 2014, P. 58-59.

३३४. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ८ ऑगस्ट २०१३.

३३५. कुलकर्णी स्वराली, उपरोक्त पृ. १८९.

३३६. माने राजा (संपा.), उपरोक्त, सब कुछ, सोलापूर, पृ. २०२.

३३७. जोशी पंडित महादेव शास्त्री, भारताची मूर्ती कला, १९८०, पृ. २०-२१.

३३८. कित्ता, पृ. २७-२८.

अ) शहा सुमतीबाई, (संपा.), पूर्णाध्य (जैन ज्ञानकोश) पृ. ८०४-८०५.

३३९. शहा सुमतीबाई, उपरोक्त पृ. ७२.

ध्वजः वस्त्रांनी बनविलेला तसेच चारी बाजूला फडफडणारा ध्वज राज्यात यश, किर्ती व प्रताप विकीर्ण करणारा असतो. हा ध्वज शेतकरी, बालक, गोरक्षक व स्त्रिया इत्यादींची समृध्दी करणारा व शासनासाठी धान्य, ऐश्वर्य, सुख इत्यादी प्रदान करणारा आहे.

३४०. कित्ता, पृ. ११,१३.

स्वस्तिकः जैन धर्माच्या ग्रंथ व मंदिरामध्ये हे चिन्ह मोठ्या प्रमाणावर पाहावयास मिळते. स्वस्तिक चिन्हात नारकी, तिर्थच, मनुष्य व देवता या जीवांच्या चार श्रेणी दाखविलेल्या आहेत.

३४१. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ५ एप्रिल २०१२.

३४२. कित्ता.

३४३. अतिशय क्षेत्र श्री. पार्श्वनाथ स्वामींचे चरित्र व मंदिराचा इतिहास, पृ. ४.

अ) जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. १८५.

३४४. सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. ९९४.

अ) सोलापूर समाचार, ज्युबिली अंक, पृ. ८१.

३४५. सोलापूर समाचार, २२ जानेवारी १९६०.

अ) कित्ता, ५ जानेवारी १९६५.

ब) पार्श्वनाथ मंदिराचा इतिहास, पृ. ४-६.

३४६. पार्श्वनाथ मंदिराचा इतिहास, पृ. ७.

३४७. श्री माणिकस्वामी महाराज दिगंबर जैन मंदिर, प्रवेशद्वारावरील लेखावरून, सोलापूर.

३४८. मुलाखत, अरविंद बाहुबली उपाध्य, पंडित, माणिकस्वामी मंदिर, सोलापूर.

३४९. आदिनाथ शतसंवत्सरिका इतिहास (संपा.), पृ. ३९-४०.

३५०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ५ एप्रिल २०१२.

३५१. आदिनाथ जैन मंदिराच्या गर्भगृहावर असलेल्या लेखावरून.

३५२. आदिनाथ शतसंवत्सरिका इतिहास, पृ. ४५.

अ) भूयारी मंदिरावरील लेख.

३५३. कित्ता, पृ. ४५-५७.

३५४. सोलापूर समाचार, १ एप्रिल १९५६.

३५५. आदिनाथ शतसंवत्सरिका इतिहास, पृ. ६०-६६.

३५६. सोलापूर समाचार, १० फेब्रुवारी १९५५.

३५७. कित्ता, ३ ऑगस्ट १९५७.

३५८. मुलाखत, आनंद चिंतामणी उपाध्य, पंडित, आदिनाथ जैन मंदिर, सोलापूर.

३५९. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ५ एप्रिल २०१२.

३६०. बुबणे हर्षवर्धन (प्रकाशक), सोलापूरचे श्री आदिनाथ महाराज सैतवाल दिगंबर बुबणे जैन मंदिर इतिहास आणि परिचय, पृ. २३-३२.

३६१. मुलाखत, बुबणे हर्षवर्धन, अध्यक्ष, बुबणे जैन मंदिर, सोलापूर.

३६२. श्री. भ. १००८ बाहुबली भगवान दिगंबर जैन मंदिरातील भिंतीवरील लेखावरून, सोलापूर.

३६३. मुलाखत, श्री फुलचंद पार्श्वनाथ आळंद, पंडित, बाहुबली भगवान दिगंबर जैन मंदिर, सोलापूर.

३६४. शहा सुमतीबाई, माझी जीवन गाथा, १९८९, पृ. ७५.

३६५. अमृत गाथा, गांधीनाथ जैन बोर्डींग, अमृत महोत्सवी वाटचाल, १९०८-१९८३, सोलापूर.

३६६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १४ ऑक्टोंबर २०१२.

३६७. मुलाखत, मुनिलाल डुगरसी लोराया, मुनिम, आदिनाथ श्वेतांबर जैन मंदिर, सोलापूर.

३६८. मुलाखत, श्री भगवानदास शर्मा, पंडित, श्री शंकेश्वर पार्श्वनाथ श्वेतांबर जैन मंदिर, सोलापूर.

३६९. मुलाखत, भरत पुजारी, लोद्रवा पार्श्वनाथ श्वेतांबर जैन मंदिर, सोलापूर.

३७०. मुलाखत, श्री सुधीर रमणिकलाल गांधी, वासुपुज्य श्वेतांबर जैन मंदिर, सोलापूर.

३७१. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. ५८.

३७२. जक्कल वि. न., सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ४९.

३७३. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. ९९६.

३७४. कित्ता.

३७५. अमेरिकन मराठी मिशनची दिडशे वर्षे, मुंबई, १९६६, पृ. १५३.

३७६. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. ११७.

३७७. माने राजा (संपा.), उपरोक्त, सबकुछ, सोलापूर, पृ. २१७.

३७८. Genaral Dept. File Vol., XVII, १८५१, पृ. २७७. (B. A.)

३७९. मुलाखत, मोहन आंग्रे, पहिली ख्रिस्त मंडळी संस्था, सोलापूर.

३८०. मुलाखत, सरदार रमेशसिंग पमनदास वातवाणी, गुरूद्वार, सोलापूर.

प्रकरण चौथे

धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव

अ. क्र	घटक
४.१	**धार्मिक जीवन**
४.२	**सोलापूर शहरात दिसून येणारे धार्मिक ऐक्य**
४.३	**धर्मांतर प्रक्रिया**
४.४	**धार्मिक स्थळांचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव**
	४.४.१ खाद्य संस्कृती
	४.४.२ कानडी भाषेचा प्रभाव
४.५	**सण आणि उत्सव**
	४.५.१ संक्रात व गड्डा यात्रा
	४.५.२ दसरा (नवरात्र महोत्सव)
	४.५.३ गणेशोत्सव
	४.५.४ शुभराय महाराज रथयात्रा
	४.५.६ मार्कंडेय रथ मिरवणुक
	४.५.७ मुस्लिमांचे सण व उत्सव
४.६	**धार्मिक कार्यात महिलांचा सहभाग**
४.७	**धार्मिक स्थळांचा आर्थिक प्रभाव**

प्रकरण - चौथे

धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव

धर्म हा कोणत्याही मानवी समुहाच्या जीवनातील कलेच्या विकासाचा पाया असतो असे ग्रूनवेडेल यांनी आपल्या 'बुध्दीस्ट आर्ट इन इंडिया' या ग्रंथात ह्मटले आहे. असेच विचार डेला सेट या लेखकाने 'रिलीजन अँड आर्ट' या ग्रंथात मांडले आहेत. या दोघानींही भारतीय धर्म व कला यांचे नाते अतूट असल्याचे दर्शविले आहे. जगातील विविध धर्मातील आपापल्या प्रतिकात्मक देवदवतांच्या पूजेतून मूर्तिकलेचा व मंदिराचा विकास झाला. कौटुंबिक जीवन, जातीव्यवस्था, सामाजिक व आर्थिक जीवन अशा अनेक गोष्टी धार्मिक परंपरानीच कमी अधिक प्रमाणात नियंत्रीत केलेल्या आहेत. या धार्मिक परंपरा जतन करण्यासाठी विविध धार्मिक स्थळांची निर्मिती करण्यात आली. हीच धार्मिक स्थळे प्राचीन काळापासून भारतीय समाजाचे एक महत्त्वाचे अंग बनली आहेत. या धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने अनेक यात्रा, उत्सव, सण, समारंभ याद्वारे आपल्या रूढी परंपरा जपण्याचा प्रयत्न समाज करतो. त्यामुळेच अशा धार्मिक स्थळांचा समाजजीवनावर प्रभाव पडलेला दिसून येतो.

४.१ धार्मिक जीवन

प्राचीन भारतात निर्माण झालेल्या हिंदू, जैन आणि बौध्द धर्माचा प्रभाव एकमेकांवर पडलेला आहे. भारतातील विविध धर्म, पंथ आणि भाषा व त्यांचे रितीरिवाज वेगवेगळे आहेत. भारतीय समाजाचे महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे येथे निर्माण झालेली जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था होय.[१] मध्ययुगीन भारतात हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये जीवनाच्या वेगवेगळ्या अंगामध्ये परस्पर संबंध, संयोग व मिलाफाची प्रक्रिया अखंडपणे चालू होती.

शिल्पकला व भाषा या क्षेत्रात हिंदू-मुस्लिम मिलाफामूळे एक नवीन निर्मिती होण्यास मदत झाली. मुस्लिम समाज हिंदू समाजाच्या सानिध्यात राहू लागल्याने एकमेकांच्या संस्कृतीचा प्रभाव परस्परांवर पडलेला दिसून येतो. सामाजिक चालिरिती आचार, विचार, नाणेपध्दती, कला व स्थापत्य या क्षेत्रात विचारांची देवाणघेवाण, समाधीवर दोऱ्या बांधण्याची पध्दत, भिक्षा मागणाऱ्या फकीरांचा पंथ, विशिष्ट धार्मिक समारंभात मुल्ला मौल्लवींचा प्रभाव, सर्वत्र होणारी पिरांची उपासना या सर्व बाबींवर हिंदुंचा प्रभाव पडलेला दिसून येतो.[२]

महाराष्ट्राची धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी अत्यंत समृध्द आणि संपन्न आहे. येथे सर्व धर्म शतकानुशतके एकत्र राहत आहेत. अशा विविध धर्मात हिंदू, मुस्लिम, जैन, बौध्द, ख्रिश्चन, पारशी, शीख, ज्यू, इत्यादी धर्म व पंथांचा समावेश होतो.[३] मध्ययुगीन महाराष्ट्रात इस्लामी राजवटीत देव-देवतांच्या संख्येत भर पडत गेली. खंडोबा, विठोबा, भवानी, महालक्ष्मी, गणपती, मारूती इत्यादी देव-देवताप्रमाणे वीर, झोटींग, वेताळ, खंकाळ, मेसको, मैनाळ, मेसाबाई, जानाई, जोखाई, मरिआई, लक्ष्मीआई इत्यादी देव-देवतांची विविध ठिकाणी स्थापना करून अशा देव-देवतांना नवसापोटी बकरे, कोंबडे, रेडा बळी देण्याची प्रथा सुरू झाली. हिंदू लोक मुस्लिम पिरांची भक्ती करू लागले आणि पिरांच्या उरूसात भाग घेऊ लागले. मुस्लिमही हिंदुंच्या देवतांना भजू लागले. शहा मुंतोजी बामणी हा सहजानंद स्वामीचा शिष्य होता. पुढे तो विठ्ठलाचा उपासक बनला त्याने 'पंचकिरण' नावाचा हिंदीतील ग्रंथ लिहीला असून हिंदु धर्मातील कितीतरी लोक मुंतोजीचे अनुयायी बनले होते.[४]

धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने सामाजिक व धार्मिक जिवनात अभिसरण प्रक्रिया झालेली दिसून येते. धार्मिक स्थळे व देवदेवतांच्या यात्रा-उत्सवाच्यावेळी विविध धर्माचे लोक एकत्रित येऊन आचार-विचारांचे अभिसरण घडवून आणतात. ही धार्मिक स्थळे लोकसंग्रहाची महत्त्वाची ठिकाणे असली तरी, त्या ठिकाणी हेणाऱ्या आर्थिक उलाढालीतून होणारे बदल धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने होणारे आर्थिक अभिसरणच होय. देव-देवता, मंदिरे, मठ, मशिदी, दर्गे, या ठिकाणी प्रवचन, किर्तन, भारूड, व्याख्याने, कव्वाली इत्यादिंच्या माध्यमातून विचारांचे अभिसरण होण्यास मदत होते. त्यामुळे माणसांच्या मनातील पारंपरिक विचारात बदल झालेले दिसून येतात.

सोलापूर शहर आणि परिसरात विविध धर्माचे लोक मोठ्या प्रमाणावर राहतात. हिंदु धर्मात वारकरी, दत्त, नाथ, लिंगायत आणि नागेश संप्रदायाचे लोक मोठ्या प्रमाणावर आहेत. मुस्लिमांमध्ये सिया व सून्नी, जैनामध्ये श्वेतांबर व दिगंबर अशा पंथीयात लोक विभागले आहेत. 'कल्पतरू' या वृत्तपत्राच्या वर्णनावरून सोलापूर शहरात मराठा, लिंगायत, वाणी यांचा भरणा जास्त होता. ब्राह्मणांची संख्या कमी होती. पद्मशाली आणि मोमीन लोकांची वस्ती मोठ्या प्रमाणावर या शहरात आढळून येते.[५] शहरात अस्पृश्यता पाळली जाई, शिवाशिव, विटाळ, चांडाळ याचे प्रस्थ होते. आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी चांभार लोक चपल्या विकण्यासाठी ऐन बाजारात बसत. शिवाशिव होऊ नये म्हणून त्यांना बाजाराच्या एका बाजूला बसविल्याची उदाहरणे सापडतात. शहरातील ब्राह्मण

लोक शहर व परिसराच्या गावातून धार्मिक विधी पार पाडीत. लिंगायत व जैन लोक व्यापारात अग्रेसर होते तर पद्मशाली लोकांनी आपल्या बरोबर आणलेल्या विणकराचा व्यवसाय सोलापूर शहरात भरभराटीस आणला होता.[६]

पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे आद्यपीठ जिल्ह्यातच असल्याने सोलापूर शहरात वारकरी संप्रदायाचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून आला. सर्व जाती धर्माचे लोक वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत. उपास-तापास, यज्ञ-याग, अनुष्ठाने अशा कर्मकांडापासून हा पंथ दूर असल्याने विठ्ठलाच्या निस्सिम भक्तीमुळे सोलापूर शहरात या पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते.[७] वारकरी पंथाचे अनेक मठ आणि फड अस्तित्त्वात आहेत, या मठाशी, फडाशी तसेच दिंडीशी शहरातील लोक संलग्न आहेत. शहरातून दरवर्षीच्या माघवारीस जवळजवळ १०० दिंड्या पंढरपूरास जातात. चैत्री, आषाढी, आणि कार्तिकी वारीसही हजारो वारकरी पंढरपूरास जातात. शहरातील नाशिककर महाराजांनी सुरू केलेली माघवारी दिंडीची परंपरा आजही अखंडपणे चालू आहे. नाशिककर महाराजांच्याच काळात श्री ढगे, बाजी आण्णा महाराज, सावता बाबा इत्यादींनी शहरात वारकरी संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. त्यांच्या प्रभावाने शहरातील हजारो लोक या संप्रदायाकडे वळले.[८]

देवगिरीच्या यादवांच्या काळात सोलापूर परिसरात वीरशैव संप्रदायाचे महत्त्वाचे केंद्र होते. या पंथाचे थोर संत श्री सिध्दरामेश्वर यांचे मूळ ठिकाण सोन्नलगीस वीरशैव पंथीयांचे महत्त्वाचे ठिकाण म्हणून प्रसिध्दी मिळाली होती. श्री सिध्दरामेश्वरांचे वीरशैव पंथाच्या प्रसाराचे कार्य महत्त्वाचे असून, त्यानी त्यासाठी शहराच्या सभोवती ६८ शिवलिंगाची केलेली स्थापनाही तितकीच महत्त्वाची वाटते. सन ११६० मध्ये होऊन गेलेल्या बसवेश्वरांच्या बहिणीचा मुलगा चन्नबसव यानीही वीरशैव पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. श्री सिध्दरामेश्वर आणि चन्नबसव यांनी केलेला वीरशैवाचा प्रसार सोन्नलगी व परिसरात झाला.[९] मूळातच सोलापूर शहर हे महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्याच्या सीमेवरील शहर असल्याने कर्नाटकात स्थापन झालेल्या या पंथाचा प्रभाव शहरावर पडल्याने[१०] शहरात लिंगायताची अनेक धार्मिक स्थळे निर्माण झाली. त्यामध्ये सिध्देश्वर देवस्थान, मल्लिकार्जून मंदिर, रेवणसिध्देश्वर मंदिर, बृहन्मठ होटगी, नंदीमठ, किरिटस्वामी मठ, रूद्राबिंका मठ इत्यादी धार्मिक स्थळांचा समावेश होतो. कन्नड ही वीरशैव पंथीयांची धर्मभाषा आहे. या भाषेने

वीरशैव धर्माच्या प्रसार कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सोलापूर शहरात ही भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण जवळजवळ ११.५% आहे.[११]

हिंदू धर्माप्रमाणेच जैन, इस्लाम, ख्रिश्चन, पारशी आणि बौध्द धर्मियही शहरात स्थिरावले. इस्लाम संप्रदायाच्या प्रसारानंतर शहरात अनेक ठिकाणी मशिदी, दर्गे आणि पिरांच्या समाधी बांधून त्यांची भक्तीभावाने उपासना सुरू झाली. व्यापारासाठी आलेले जैन, मुस्लिम, गुजर, मारवाडी इत्यादींनी आपापल्या धार्मिक स्थळांची निर्मिती केली. अशा या धार्मिक स्थळांचा पगडा शहरातील लोकांवर पडल्याने सामाजिक जीवनात राष्ट्रीय एकात्मता रूजण्यास मदत झाली.[१२]

४.२ सोलापूर शहरात दिसून येणारे धार्मिक ऐक्य

डरखाईमच्या मते 'एका वंशाचे लोक एकत्र जमल्यानंतर त्यांच्यात धार्मिक भावना निर्माण होतात. आदर्श समाज रचनेमध्ये धर्माचे महत्वाचे स्थान असते. धर्मामुळे व्यक्तीला समाज प्रतिष्ठा प्राप्त होते. समाजात धर्म मानवाच्या अस्तित्त्वाला अर्थ प्राप्त करून देतो.' प्रत्येक धर्मातील चांगले संस्कार जाती-जातीतील, पंथा-पंथातील कडवेपणा नष्ट करणारे असतात. आपापल्या धार्मिक स्थळाबाबत धर्म संस्काराप्रमाणे प्रत्येक धर्मियांना वर्तन करण्याची परवानगी असली तरी इतर धर्मियांच्या बाबतीत सहिष्णूवृत्ती असल्याचे दिसून येते. धार्मिक एकतेबाबत मूर्तिपूजेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मूर्तिपूजेमूळेच सामाजिक जीवन स्थिर व एकात्म होण्यास मदत होते.[१३]

शहरात हिंदु-मुस्लिम पंथीयाचे उत्सव दोन्ही धर्मातील लोक आनंदाने एकत्रीतपणे साजरे करतात. रमजान आणि बकरी ईद सणाच्यावेळी हिंदु-मुस्लिम बांधव एकमेकांना अलिंगन देतात. तर दिवाळी, दसरा या हिंदुच्या सणात मुस्लिम बांधव सहभागी होतात. त्यामुळे सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणावर धार्मिक ऐक्य साधनाचा प्रयत्न झालेला आहे. लिंगायत पंथाचा प्रभाव असलेल्या सिध्दरामेश्वरांच्या यात्रेप्रसंगी शहरातील सर्वधर्मिय बांधव एकत्रित येऊन मोठ्या उत्साहाने यात्रेत सहभागी होऊन धार्मिक एकतेचे प्रदर्शन करतात. गौतम धर्मसूत्रात सांगितल्याप्रमाणे सोलापूर शहरात सर्वधर्मसमभाव दिसून येतो. ज्ञानेश्वरांच्या पसायदानातून, कुराणाच्या सूरूतिहामध्ये, जैन धर्मियांच्या पंचनमस्कारात, बुध्दाच्या प्रार्थनेत आणि बसवेश्वराच्या वचनातून जे धार्मिक विचार आलेले आहेत त्यातून शहरात धार्मिक ऐक्य साधलेले दिसून येते.

दिगंबर पंथीय जैन साधू धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी शहरातून नग्नावस्थेत फिरत हे लिंगायतांना मान्य नव्हते. त्यामुळे या दोन पंथीयामध्ये संघर्ष होता. सन १८२५ मध्ये जैन समाजाने शहरात व्यापाराच्या माध्यमातून आपले बस्तान बसविले असताना वरील संघर्षामुळे जैन लोकांच्या लग्नाच्या व देव-देवतांच्या मिरवणूका दिवसा निघत नसत. सन १८४० पासून यात बदल झाला. जैन महायती ऐल्लक पन्नालाल हे चातुर्मासाकरीता सोलापूर शहरात आले होते. यावेळी त्यांचा केशलोचनाचा कार्यक्रम आयोजीत केला होता. या कार्यक्रमाला आप्पासाहेब वारदाना निमंत्रित करण्यात आले होते. शहरातील जैन बांधवांना हा केशलोचनाचा समारंभ नवीन होता. त्यामुळे या कार्यक्रमास शहरातील जैन लोक मोठया संख्येने उपस्थित होते. केशलोचन म्हणजे हातानेच डोक्याचे व दाढीचे केस सहज लिलेने लोचने (उपटणे) होय. याप्रसंगी जैन लोकांविषयी सहिष्णूतता प्रकट करून आप्पासाहेब वारदांनी जैन संस्थेस ५०० रूपयाची देणगी दिली.[१४] आप्पासाहेबांनी या कार्यक्रमास हजेरी लावल्याने जैन व लिंगायत पंथीयातील वाद संपुष्टात आला.

पहिल्या महायुध्दाच्या वेळी ब्रिटीश सरकारला युध्दात विजय मिळावा म्हणून शहरात सार्वजनिक उपासना करण्यात आली. हिंदू धर्मियाचे धर्माधिकारी, ग्रामजोशी, वैदिक मंडळी इत्यादींच्या नेतृत्त्वाखाली कसब्यातील विठ्ठल मूर्तीस, सिध्देश्वर मंदिरातील सिध्देश्वर मूर्तीस, गणपतीस आणि त्रिपूरातंकेश्वरास अभिषेक करण्यात आले होते. नव्या पेठेतील राम मंदिरातील रामाची, काळजापूरच्या मारूतीची, रजपूत मठातील मारूतीची पूजाअर्चा करण्यात आली. तसेच चौपाडातील डबक्या मारूतीजवळ, हिंगुलांबिका देवी मंदिरात आणि शहरातील विविध मंदिरातून भजनाचे कार्यक्रम करण्यात आले. शुभराय मठ व जुने राममंदिरात पूराणे वाचण्यात आली. कालिकादेवी मंदिरात पांचाळ सोनाराची सभा भरवून पटवर्धन व शिलवंत वकीलानी आपल्या भाषणातून ब्रिटीशांनी पहिल्या महायुध्दात विजय मिळवला हे लोकांना सांगितले होते. शहरातील मुस्लिम बांधवानीही युध्दात ब्रिटिशांना विजय प्राप्त व्हावा म्हणून प्रार्थना व नमाज अदा केले. जामा मशिद, मक्का मशिद येथे खान बहादूर पीर अहमद, जाफरसाहेब, फक्रूद्दीन लाडलेसाहेब यांनी प्रार्थना केल्या. शहरातील मोदीखान्याच्या मारूती मंदिरात, आदिनाथ जैन मंदिर, सिध्देश्वर मंदिर आणि जामा मशिदीमध्ये लोक एकत्रीत आले आणि त्यावेळी भजन, किर्तन व प्रार्थनेद्वारे ब्रिटिशांचा विजय व्हावा हे मनोमन इच्छिले. सोलापूर शहराचे तत्कालिन कलेक्टर बहादूर साहेब व पोलीस अधिकारी प्रभू तिवडे इत्यादी सरकारी अधिकारी याप्रसंगी हजर होते.[१५] यावरून असे दिसून येते की,

शहरातील सर्वधर्मिय लोक राष्ट्रीय आपत्ती, भारतीय स्वातंत्र्य लढा अथवा सामाजिक प्रसंगावेळी एकत्रीतपणे सहभागी होतात.

उरूस व यात्रेच्या अनुषंगानेही शहरातील सर्वधर्मिय लोक एकत्र येतात. शहरात ज्यावेळी पिरांचे उत्सव साजरे केले जातात त्यावेळी मुस्लिमांबरोबर हिंदू धर्मियही सहभागी होतात. रेल्वे स्टेशनजवळील भैय्या चौकात असणाऱ्या जंग बहादूर सलाबतखानबाबा पीराच्या उत्सवाप्रसंगी हिंदू बांधवही सहभागी झाले होते. मोदीतील नारायण लेझीम पार्टीने यात सहभाग घेतला होता. शहरातील मिल कामगाराचे पुढारी भिमराजे, तसेच बसप्पा विभूते, रामलू भैय्या, हनिप तांबोळी या प्रतिष्ठीत लोकांबरोबर शहरातील तीन ते चार हजार सर्वधर्मिय लोक या उत्सवात सहभागी झाले होते. बडे मौलाली पिराच्या ताबूताच्या मिरवणूकीत मशाल धरण्याचा मान अदिलशाही काळापासून आजतागायत गुरू सिध्दाप्पा शेटे या हिंदू घराण्याकडे आहे.[१६]

सन १९४३ मध्ये जानेवारी महिन्यात मोहरम व सिध्देश्वराची यात्रा एकत्र असल्याने मोहरम व काठ्यांची मिरवणूक एकाच दिवशी काढण्यात आली होती. यावेळी शहरात शांतता नांदावी म्हणून कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली जबाबदार हिंदू-मुस्लिम समाजातील निमंत्रित नागरीकांची बैठक घेण्यात आली होती. वरील मिरवणूकीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून दोन्ही समाजातील पुढाऱ्यांनी आपापल्या धार्मिक अडचणी व मिरवणूकीचे रस्ते बदलण्याचे प्रश्न यावर चर्चा करून मिरवणूकीच्या वेळा आणि मार्ग बदलण्यास अनुमती दर्शविली होती.[१७]

सन १९४६ मध्ये साखर पेठेतील पीराच्या सवारीच्या मिरवणूकीमध्ये हिंदू व शांतता कमिटीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. मुस्लिम लिगचे नॅशनल गार्डस् व काँग्रेसच्या राष्ट्र दलाच्या सैनिकांनी मिरवणूकीची चोख व्यवस्था ठेवली होती त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.[१८] ५ डिसेंबर १९४६ रोजी मौलाली पंजाच्या अभूतपूर्व मिरवणूकीत मुस्लिमबरोबर हिंदूंचाही सहभाग होता. त्याचवेळी काढण्यात आलेल्या मौलाली अकबर अली व घोडेपीर पंजाच्या मिरवणूकीत शेवटपर्यंत शांतता कमिटीचे हिंदू आणि मुस्लिम सभासद हजर होते. अकबर अलीच्या पंजापुढे लिगचे व काँग्रेसचे झेंडे एकत्र फडकत होते. मुस्लिम लिगचा झेंडा गांधी टोपी घातलेल्या व्यक्तीने धरला होता. तर काँग्रेसचा झेंडा मुस्लिम व्यक्तीने धरला होता. हिंदू आणि मुस्लिम हे आपापल्या धार्मिक भावना बाजूस ठेवून एकमेकात मिसळत असत.[१९]

शहरात सर्वत्र शांतता नांदावी यासाठी सोलापूरचे तत्कालीन सेवानिवृत्त मामलेदार मा. कृ. शिंदे यांनी आपल्या निवेदनात म्हटले होते की, 'शहर व मोहल्ला शांतता कमिट्यांना तसेच सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांना सर्वधर्मिय पुढाऱ्यांनी वेळोवेळी

ईश्वर अल्ला तेरे नाम । सबको संमती दे भगवान ।

मज्जीद मंदिर तेरे धाम । सबको संमती दे भगवान ।

या भजनाचा व किर्तनाचा अर्थ पटवून देऊन लोकांच्या मनाचे परिवर्तन घडवून आणावे त्यासाठी सर्वधर्मियांनी एक कमिटी स्थापन करावी. मंदिर वा मज्जिद असो किंवा चर्च ही सर्व परमेश्वराची वसतीस्थाने आहेत. सबब हिंदूंनी मशिदीस व मुस्लिमांनी मंदिरास पूज्य मानावे व एकमेकांचा आदर करावा व धार्मिक भावनाना राजकीय स्वरूप देऊ नये. धर्मात राजकारण घुसडले तर बेबनाव होतो'.[२०] अशा प्रकारे शहरात शांतता नांदावी म्हणून प्रयत्न केले जात होते.

सोलापूर शहरात सर्वधर्मसमभाव दिसून येतो त्याचेच एक उत्तम उदाहरण म्हणजे निलमनगर भागातील नल्ला कुटुंबीय होय. त्यांच्या घरात दरवर्षी नवरात्रात भवानी देवीची पूजा, गणेशोत्सवात गणपतीची प्रतिष्ठापना आणि मोहरम सणाच्या उत्सवाप्रसंगी मुस्लिम धर्मियांच्या रितीरिवाजाप्रमाणे मौलाली पंजाची प्रतिष्ठापना करून सवारीची मिरवणूकही काढली जात. याप्रसंगी हिंदू आणि मुस्लिम समाजातील लोक सहभागी होतात. उत्सव काळानंतर वर्षभर भवानी माता, गणपती आणि मौलाली पंजाचे वास्तव्य नल्ला यांच्यात घरात असते.[२१]

गड्डा यात्रेच्या वेळी नंदीध्वजाच्या मिरवणूकीत शहरातील सर्व जाती धर्माचे लोक सहभागी होतात. यात सात नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. पहिला नंदीध्वज हा सिध्देश्वर देवस्थानचा, दूसरा कसब्यातील देशमुखांचा, तिसरा लिंगायत माळी समाजाचा, चौथा ब्राह्मणांचा, पाचवा सुतार समाजाचा, सहावा मातंग समाजाचा व सातवा दलित समाजाचा अशा प्रकारे प्रत्येक जाती धर्मातील लोकांना या नंदीध्वजाचा मान मिळालेला आहे.[२२] ही सर्वधर्मसमभावाची महत्त्वाची उदाहरणे आहेत.

४.३ धर्मांतर प्रक्रिया

हिंदू धर्म सोडून गेलेल्यांना परत हिंदू धर्मात घेण्याची कांही प्रकरणे सोलापूर शहरात घडून आली आहेत. संबंधीत व्यक्तीला स्वधर्मात येण्यासाठी प्रायश्चित घ्यावे लागे. तिर्थ, प्रदक्षिणा घालणे,

तीर्थस्नान करणे इत्यादी उपाय सुचविलेले होते.[२३] १९३३ साली शहरात स्थायिक झालेले अमरावतीचे रा. रा. जॉन शामनाथ जोशी या ख्रिश्चन गृहस्थास हिंदू महासभेच्यावतीने शुध्दी संस्कार देऊन हिंदू करून घेण्यात आले. हा शुध्दीकरणाचा कार्यक्रम २७ जानेवारी १९३३ रोजी शहरातील नव्या पेठेतील राम मंदिरात पार पडला.[२४] सन १९४१ मध्ये मि. आणि मिस लिलि (इटालियन) यांचाही या राम मंदिरात शुध्दीसमारंभ करून त्यांना हिंदू धर्मात घेण्यात आले. शुध्दी समारंभानंतर त्यांची नावे शरणसिंग आणि लिलावती अशी ठेवण्यात आली आणि हिंदू पध्दतीने त्यांचा विवाह पार पाडला. त्यावेळी पौरोहित्याचे काम आर्य समाजाचे पंडित वसंतराव गंगाराम आर्य यांनी केले.[२५] वधू वरांना भगवद्गीतेची प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. अशाप्रकारचा शुध्दीसमारंभ वाडीया हॉस्पिटलमधील डॉ. बी. धनकवडे व नर्स माणिकबाई जयंतराव रानडे या दोन ख्रिश्चन धर्मियांना हिंदू धर्माची दीक्षा देऊन शुध्दीकरणानंतर त्यांचाही विवाह लावून देण्यात आला. तसेच १९४३ मध्ये शहरातील साखर पेठेत राहणारे दत्तात्रय आशण्णा पूठ्ठा या पद्मशाली युवकाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता परंतू अवघ्या २० दिवसात त्याचेही शुध्दीकरण करून त्यास हिंदू धर्मात घेण्यात आले. यावरून असे दिसते की, शहरात धर्मांतरण प्रक्रिया या धार्मिक स्थळामध्ये पार पाडल्या जात.

४.४ धार्मिक स्थळांचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव

धार्मिक स्थळांचा आणि मानवी जीवनाचा अतिशय जवळचा संबंध आहे. धार्मिक स्थळे ही निसर्गाच्या सानिध्यात नद्यांच्या उगमस्थानी, नद्यांच्या संगमावर, गिरी शिखरावर, गुहामध्ये आणि सागर किनारी पहावयास मिळतात. भारतीय लोक धार्मिक स्थळाशी निगडीत आहेत. सोलापूर शहरात असणाऱ्या सर्व जाती धर्माच्या धार्मिक स्थळांमध्ये यज्ञयाग, उत्सव, मंगलकार्य, अन्नदान, सामुदायिक विवाह सोहळे पार पाडले जातात. एवढेच नव्हे तर पाठशाळा, गोशाला आणि बालसंगोपन करण्याचे कार्यही पार पाडले जाते. नृत्य, संगीत, चित्रकला इत्यादी कलांना मंदिरात आश्रय दिला जातो. समाजाची अभिरूची उच्च दर्जाची व्हावी म्हणून या कलांना अध्यात्मिक साधना मानले जाई. पहाटे सनई चौघडे, रात्रीची आरती यामुळे सारा गाव अध्यात्मिक बने. त्यामूळे ही धार्मिक स्थळे समाजाच्या विविध अंगांना स्पर्श करणारी केंद्रे होती.[२६] सामाजिक चालीरिती, आचार विचार, रूढी परंपरा, सामाजिक संस्था, श्रध्दा, मूल्य, निष्ठा इत्यादीचा समावेश संस्कृतीच्या अध्यात्मिक अंगात होतो. अशा संस्कृतीच्या घडणीमध्ये धार्मिक स्थळांचा फार मोठा वाटा आहे.

धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने संस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न समाजाकडून होत असतो, समाजाची ती आदर्श जीवन पध्दती असते.[२७] सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर कळत नकळत प्रभाव पडलेला दिसून येतो.

शहरातील लोकांवर मराठी, कानडी, तेलगू संस्कृतीचा असणारा प्रभाव हा आचार-विचार अन्न-वस्त्र, बोली भाषेचे वळण, सण-समारंभ इत्यादी घटकामधून दिसून येतो. कर्नाटक प्रांतातील महिला इरकली साडी आणि चोळी वापरतात. पुरूष धोतर व कुर्ता वापरतात. स्त्रिया आपल्या केसांचा आंबाडा घालतात क्वचीत प्रसंगी त्या वेणी घालतात. असा पेहराव सोलापूर जिल्ह्यात स्त्रि-पुरूषांच्या बाबतीतही पहावयास मिळतो.[२८] ब्रिटिशांच्या आगमनानंतर शहरातील ब्राह्मण लोकांच्या वेशभूषेत फरक पडत गेला. ब्राह्मण मंडळी आपल्या शेंडीबरोबर सजांप राखत व गालमिशा ठेवत. सन १८९९ ते १९१८ या काळात रा. सा. पित्रे हे सोलापूर येथे मुख्याधिकारी होते. त्यांनी सन १९०२ मध्ये मिशा काढण्याच्या पध्दतीला सर्वप्रथम चालना दिली. वेशभूषेच्या बाबतीत त्यावेळचे शहरातील ब्राह्मण डोक्यावर पुणेरी पागोटे, अंगात बाराबंदी, त्यावर पेशवाई पध्दतीचा लांब अंगरखा, नागपूरी पंचाचे उपरणे आणि पायात पूणेरी जोडा घालत. शहरात पहिल्यांदाच बुटाचा वापर व विडी ओढण्याची सुरूवात बापूसाहेब किर्लोस्कर यांनी केली. सिगारेट आणि चहाचा मागमूसही तत्कालीन जनतेला माहित नव्हता.

स्त्रिया कपाळावर कुंकू लावीत व केसांच्या वेण्याही घालत. चुकून जर कुणी केसांचा आंबाडा बांधला तर अशा स्त्रियांना कुणबीणी म्हणून लोक दोष देत. स्त्रिया नारायण पेठची लुगडी, महेश्वरी पुणेरी लुगडी आणि नागपूरी पातळे वापरत, दंडापर्यंत चोळी असे. जोडवे, विरूदे, मंगळसुत्र, वेणीतील अगरफूल आणि कुंकू इत्यादी सौभाग्य अलंकारही वापरत. शहरातील लिंगायत लोक लिंगायत पध्दतीची पगडी, अंगात बाराबंदी आणि सणावारास लांब अंगरखा घालीत. तसेच कपाळावर भस्म लावत.[२९] लिंगायत समाजात सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाणी भरताना घागरीवर फडके झाकून पाणी आणले जाई.[३०] मुस्लिम लोक धोतीऐवजी पांढरा सूती पायजमा, लांब अंगरखा आणि डोक्यास जिना टोपी घालत व स्त्रिया सलवार आणि कमीज वापरत.[३१]

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात वडार समाजातील स्त्रिया चोळीचा वापर करीत नसत. परंतू शहरातील विविध धार्मिक संस्कृतीच्या प्रभावामूळे यामध्ये बदल घडून येण्यास सुरूवात झाली. वडार

समाजातील पाथरवट घराण्यातील शिवराम बंदपट्टे या तरूणाने अक्षय तृतीयाच्या मूहूर्तावर चोळी न घालण्याची परंपरा मोडीत काढली. अशा प्रकारची परंपरा मोडीत काढल्याने वडार समाजातील पंचायतीने शिवराम बंदपट्टे यास धर्म बहिष्कृत करून त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्यास ५० रूपये दंडाची शिक्षा ठेवली होती. यामुळे बंदपट्टे यांनी आपल्यावरील हा अन्याय दूर व्हावा म्हणून १६ जुलै १९४२ पासून अन्न सत्यागृह करण्याचे जाहीर केले होते. त्याचाच परिणाम म्हणून सोलापूर शहरामध्ये वडार समाजातील स्त्रियांनी चोळीचा वापर करावा या हेतूने न्यू पाच्छा पेठेतील मारूती मंदिरात समाजातील नेते काशिनाथ लक्ष्मण लिंबोळे यांनी जाहीरपणे स्त्रियांना चोळीदानाचा (घालण्याचा) समारंभ पार पाडला. हा समारंभ फक्त सोलापूर शहरातील वडार समाजातील स्त्रियांसाठी नव्हता तर विजापूर जिल्ह्यातील अंजुरगी, कन्नूर, आगणसाळ, गिरगावी व होटगी येथील वडार समाजातील स्त्रियांचाही त्यात समावेश होता. या जाहीर चोळीदानाच्या समारंभामुळे या समाजात बरीच खळबळ माजली होती.[३२] शहरातील वडार समाजातील स्त्रिया आज आपल्या पेहरावामध्ये अंगात चोळीचा वापर करीत आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, समाजातील विविध गट पहिल्यापासून काही विशिष्ट सांस्कृतीक आदर्श मानत आल्याने त्यांच्यात सांस्कृतिक एकात्मेची भावना टिकून राहिलेली आहे.

४.४.१ खाद्य संस्कृती

महाराष्ट्र आणि कर्नाटकात ज्वारीचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. त्यामुळे ज्वारीची भाकरी लोकांच्या जेवणात असते. ज्वारीची व बाजरीची कडक भाकरी, शेंगदाणा चटणी, लसून चटणी, झुणका, तूरदाळ-भात, निरनिराळया पालेभाज्या व दुग्धजन्य पदार्थांचा जेवणात समावेश असतो. ब्राह्मण, जैन, लिंगायत हे शाकाहारी जेवण घेतात, तर मुस्लिम लोक मांसाहार करतात.[३३] कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील लोकांच्या जेवणात हुग्गी, चित्रान्न, शेंगाची पोळी, भात व मसलपप्पू या पदार्थांचा मोठया प्रमाणात समावेश असतो. असेच अन्नपदार्थ सोलापूर शहरातील लोकांच्या जेवणातही असतात.[३४] कर्नाटकप्रमाणे सोलापूर शहर व जिल्ह्यातही अनेक पुरूष व स्त्रियाही तंबाखू, भांग, अफु, गांजा अशा मादक पदार्थांचे सेवन करतात.[३५]

४.४.२ कानडी भाषेचा प्रभाव

सोलापूर शहरावर कर्नाटकातील कानडी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. कर्नाटकात आई या शब्दासाठी 'अव्वा', वडीलासांठी ' आप्पा', वडीलबंधूसाठी 'आण्णा' व बहीणीसाठी 'आक्का' या

शब्दांचा वापर केला जातो. सोलापूर शहर व परिसरातही वरील शब्दांचा वापर सर्रास होतो. लोकांच्या बोलीभाषेवर या शब्दाचा प्रभाव जाणवतो. शहरात असणारे मुस्लिल लोक उर्दू बरोबरच मराठी आणि कन्नड भाषेचा दैनंदीन व्यवहारात वापर करतात.[३६]

४.५ सण आणि उत्सव

सण आणि उत्सव हे भारतीय संस्कृतीमधील महत्त्वाचे घटक आहेत. सण, उत्सव, कूळधर्म, कूळाचार हे आपल्या पूर्वजांनी, ऋषीमुनींनी आचरणात आणल्याने त्याचा प्रभाव मानवी जीवनावर पडलेला आहे. सण, उत्सव आणि यात्रा इत्यादीच्या माध्यमातून माणसांच्या आचार विचाराची देवाण घेवाण होते व समाज संघटीत होण्यास मदत होते.[३७] सोलापूर शहरात सर्व धर्मीय लोक आपापले सण साजरे करतात. गुढी पाडवा, दिवाळी, दसरा, संक्रांत, होळी, रमजान, बकरी ईद, मोहरम, नाताळ, पतेती इत्यादी सणांचा त्यात समावेश होतो.[३८] शिवाय शहरातील विविध धार्मिक ठिकाणी असणाऱ्या देव-देवताचे उत्सवही साजरे होतात. मूर्तीपूजेच्या सार्वजनिक स्वरूपामुळे त्या त्या क्षेत्राच्या ठिकाणी विविध प्रांतातून लोक येतात. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वराची गड्डा यात्रा मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.[३९] या यात्रेस महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील विविध प्रांतातून लोक हजेरी लावतात. त्यामुळे या यात्रेस राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.[४०]

४.५.१ संक्रात व गड्डा यात्रा

संपूर्ण भारतभर संक्रांतीचा सण साजरा केला जातो. या सणात तिळास महत्त्व आहे, तिळगूळ हे स्नेहाचे प्रतिक मानले जाते. सामाजिक जीवनात स्नेहभाव रूजावा, लोकांनी सुखाने व आनंदाने राहावे, एकमेकांविषयी आपल्या मनात राग, व्देष धरू नये आणि प्रेम व मैत्री वृद्धींगत व्हावी हीच या सणामागची उदात्त भावना आहे. सोलापूर शहरात हा सण हा मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. या सणाच्या जोडीला सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर देवस्थानची यात्रा मोठ्या प्रमाणावर साजरी होते. मकरसंक्रांती हा यात्रेचा मुख्य दिवस असल्याने या यात्रेस महत्त्व प्राप्त झाले आहे.[४१] ८०० वर्षाची परंपरा असलेल्या या यात्रेत नंदीध्वजाची मिरवणूक, तैलाभिषेक (यण्णा मिज्जन) अक्षता सोहळा, होम प्रतिपद असे धार्मिक विधी होतात.[४२] नंदीध्वज मिरवणूकीपूर्वी ३० ते ४० दिवस नंदीध्वज पेलण्याचा सराव केला जातो. त्यास मन एकाग्र करावे लागते, शिवाय आहारात बदाम, अंजीर, थंडाई, फळे, दूध, जोडगव्हाची खीर आदी पौष्टिक खुराक असतो.

सिध्देश्वर मंदिर परिसरातील मातीच्या टेकड्याला 'गड्डा' ह्मणतात. याच परिसरात पूर्वी आणि आजही सिध्देश्वराची यात्रा भरते म्हणून या यात्रेस 'गड्डा यात्रा' म्हणतात.[४३] ही यात्रा १० जानेवारीस प्रारंभ होऊन ती १५ जानेवारीपर्यंत चालते. यात्रेच्या वेळी मिरवणूकीसाठी नंदीध्वज (काठ्या) निघतात, मुख्य काठ्यांना हळद, लोणी, तीळ, चंदन लावून स्नान घालतात व काठ्यावर तूडूप हारडे, पाटल्या, कळस, भगवा ध्वज, खेळणे व जरीचा पटका चढवून नंदीध्वजांना यात्रेच्या आदल्या रात्री साज चढविण्याचा कार्यक्रम होतो. याकाळात शहरात पेशव्यांची मुख्य कचेरी व चावडी लक्ष्मीच्या देवळाजवळील कलवडे यांच्या वाड्यात होती. त्याचठिकाणी नंदीध्वजास पेशवे सरकारकडून आहेर होत. आजदेखील त्याठिकाणी असणाऱ्या पसारे यांच्या वाड्यात जुनी फौजदार चावडीजवळ नंदीध्वजास 'फडी' बांधण्याचा कार्यक्रम साजरा होतो. ब्रिटिशांच्या काळात नंदीध्वजास फडी बांधण्याचा कार्यक्रम सोलापूरचे कलेक्टर अथवा मामलेदार यांच्या उपस्थितीत होत असे. आजही ती प्रथा चालू आहे.[४४]

पाच दिवस चालणाऱ्या या यात्रेची सुरूवात तैलाभिषेकाने (यणा मिज्जन) होते. तैलाभिषेक म्हणजे नंदीध्वजास आडवे करून तेलाने त्यावर अभिषेक केला जातो. नंदीध्वज्यांच्या मानकऱ्यांच्या घरी पाच दिवस अखंड दिवे तेवत ठेवले जातात.[४५] 'भोगी' हा यात्रेचा दुसरा दिवस असून यादिवशी सिध्देश्वर मंदिर परिसरातील समंती कट्याजवळ अक्षता सोहळा समारंभ होतो. 'समंती' वाचण्याचा मान शहरातील कसबा पेठेतील शेटे घराण्याचा असून तो अद्यापही चालू आहे. समंती म्हणजे श्रींच्या आज्ञा होय. आज्ञा वाचण्याचे जूने हस्तालिखीत या शेटे घराण्याकडे आहेत. यावेळी लग्न संस्कारातील सर्व विधी होतात. कल्पित वधू वरास बाशिंग बांधण्यात येते. संक्रांत हा यात्रेचा तिसरा दिवस असून यादिवशी सकाळी समंती कट्याजवळ योगदंड, पालखी व नंदीध्वजांना करमूटगी (हळद, तीळ, एखंड, ज्येष्ठ मध इत्यादी मिश्रण) लावून स्नान घालण्यात येते. याच दिवशी रात्री ९ वाजता होम मैदानावरील होम कुंडात धार्मिक पूजा झाल्यावर होम प्रज्वलन कार्यक्रम सुरू होतो. नंतर देशमुखाकडे असणाऱ्या वासराची सिध्देश्वर मंदिरासमोर प्रथेप्रमाणे पूजा होते आणि नंतर भाकणूकीचा कार्यक्रम होतो. भाकणूकीवेळी वासरापूढे विविध धान्य ठेवले जाते. वासरू ज्या धान्यास तोंड लावेल ते धान्य स्वस्त होते, वासराने जर त्या जागेवर मूत्र विसर्जन केले तर त्यावर्षी पाऊस चांगला पडतो असा येथील लोकांचा समज आहे.

'किक्रांत' या यात्रेच्या चौथ्या यादिवशी रात्री होम मैदानावर १० ते ११ या वेळेत शोभचे दारूकाम होते. यामधून लोकजागृतीचे धडे दिले जातात. पर्यावरण, मुली वाचवा, एडस्, महागाई, भ्रष्टाचार अशा विविध विषयांचा संदेश शोभेची दारू उडवताना दिसून येतो. यात्रेच्या पाचव्या दिवशी देशमुखांच्या वाड्यात योगदंडाची पूजा होते. रात्री बाळीवेशीत मल्लिकार्जून मंदिराला नंदीध्वजाबरोबर फेऱ्या होऊन 'कपडकळळीचा' कार्यक्रम साजरा होतो. कपडकळळीचा कार्यक्रम म्हणजे नंदीध्वजाला जो साज चढविला जातो तो साज उतरविण्याचा कार्यक्रम होय.[४६] यात्रेचे मुख्य आकर्षण नंदीध्वज असून यास श्री सिध्दरामेश्वराच्या काठ्या अथवा योगदंड म्हणण्याचा प्रघात आहे. योगदंडाचे प्रतिक म्हणून नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. योगदंडाचा मान शहरातील विविध जातीतील लोकांना मिळालेला आहे.[४७]

महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक राज्यतून लाखो भक्तगण सिध्दरामेश्वरांच्या यात्रेत सहभागी होतात त्यामुळे ही यात्रा महत्त्वाची मानली गेली आहे. या यात्रेच्या निमित्ताने सांस्कृतिक देवाण-घेवाण होऊन धार्मिक एकात्मता टिकून राण्यास मदत होते. यात्रेच्या निमित्ताने पाळणे, लहान मुलांचे मनोरंजनाचे खेळ, हॉटेल्स्, संसारोपयोगी साहित्य, चित्तथरारक खेळ, शेतकी प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, जनावरांचे प्रदर्शन, कुस्त्यांचे फड अशा विविध घटकांचे प्रदर्शन करून लोकांना यात्रेकडे आकर्षित केले जाते. यामधून फार मोठी आर्थिक उलाढाल होते

गड्डा यात्रेच्यावेळी शहरातून सिध्दरामेश्वराच्या काठ्यांची सवाद्य मिरवणूक काढली जाते. प्रसंगी शहरातील हिंदू-मुस्लिमामध्ये काही संघर्ष घडून आल्याची उदाहरणे आहेत. १९२५ मध्ये संक्रांतीच्यावेळी काठ्याची मिरवणूक मशिदीवरून सवाद्य नेल्याने हिंदू व मुस्लिमांमध्ये संघर्ष घडून आला होता. सन १९३० च्या मार्शल लॉ च्या प्रसंगात मलप्पा धनशेट्टी (लिंगायत), श्रीकिसन सारडा (मारवाडी), जगन्नाथ शिंदे (मराठा) आणि कुर्बान हुसेन (मुस्लिम) यांना देशद्रोही ठरवून १२ जानेवारी १९३१ रोजी या चौघांना फासावर लटकावल्यामुळे सिध्दरामेश्वराच्या यात्रेवर दु:खाचे सावट पसरले होते. तरीही अनेक वर्षाची परंपरा चालू राहावी म्हणून तरूण मंडळीच्या मतांचा विचार न करता सिध्देश्वर पंचकमिटीने धार्मिक प्रथा बंद होऊ नये म्हणून काठ्याची मिरवणूक काढली परंतू त्यादिवशी दुपारी अडीच वाजता शहरात १४४ कलम पुकारण्यात आल्याने निघालेली काठ्यांची मिरवणूक रद्द करून त्या काठ्या सिध्देश्वर मंदिरातच ठेवण्यात आल्या.[४८] आजही सोलापूर शहरात १२ जानेवारी हा दिवस 'हुतात्मा दिन' म्हणून पाळला जातो.

४.५.२ दसरा (नवरात्र महोत्सव)

शहरात दसरा (विजयादशमी) हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. शहरातील पार्क मैदानाजवळील शमी वृक्षाला प्रदक्षिणा घालून सोलापूरकर सीमोल्लंघन साजरे करतात. जुन्या काळात रेवणी मारूतीजवळ सीमोल्लंघनाचा कार्यक्रम साजरा केला जाई. नंतरच्या काळात शाहीर राम जोशी यांच्या शेतामध्ये असणाऱ्या शमी वृक्षाजवळ हा कार्यक्रम पार पाडला जाई. आज पार्क मैदानावर असणारा शमीचा वृक्ष हा शाहीर राम जोशींच्या शेतातीलच शमीचा वृक्ष आहे. या ठिकाणच्या शमी वृक्षाजवळ सीमोल्लंघन करण्यासाठी येणाऱ्या भाविकांची सेवा करण्याचा मान ग्राम जोशी यांच्या घराण्याकडे आजही आहे. समस्त ग्राम जोशीकडून सीमोल्लंघनासाठी येणाऱ्या भक्तांना मंत्रोच्चारात गंध लावून आपट्याची पाने दिली जातात.

पार्क मैदानावरील शमी वृक्षाजवळ सीमोल्लंघन करण्यासाठी रूपाभवानी मातेची पालखी, शुक्रवार पेठेतील शिवलाड तेली समाजाच्या श्री आंबाबाई मंदिरातील तुळजापूरास जाणारी मानाची पालखी, हिंगुलांबिका देवीची पालखी व नंदीध्वज, शहरातील सार्वजनिक नवरात्र मंडळांच्या मूर्ती सवाद्यासह मिरवणूकीने येतात. एकमेकांना सोने देवून स्नेह वृध्दींगत केला जातो. शहरातील सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन विजयादशमी सण साजरा करतात.[४९]

या काळात घराघरात, देवी मंदिरातून व सार्वजनिक ठिकाणी नऊ दिवस देवीचे घट बसविले जातात. नऊ दिवस घटाशेजारी फुलांची माळ चढत्या क्रमाने लावून चौकातून विविध मंडळाद्वारे देवीची उत्सवमूर्ती बसवून प्रतिष्ठापना केली जाते. दरम्यानच्या काळात होमहवन, सप्तशतीपीठ, नवचंडी याग इत्यादी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.[५०]

नवरात्र म्हणजे शक्तीदेवीचा उत्सव, या नऊ दिवसात देवी-देवतांचे स्मरण, मनन, चिंतन केले जाते. सोलापूरची कुलस्वामीनी व ग्रामदेवता रूपाभवानीदेवी एक शक्तीस्थळ म्हणून ओळखली जाते. घटस्थापना केल्यापासून कोजागीरी पौर्णिमेपर्यंत रूपाभवानी मातेचा उत्सव साजरा केला जातो. शहर व शहराबाहेरील हजारो भक्तगण रूपाभवानीमातेचे दर्शन घेऊनच तुळजापूरास अंबाबाईच्या दर्शनास जातात.[५१] नवरात्र काळात नित्यनियमाने नऊ दिवस देवीची नऊ प्रकारची पूजा बांधण्यात येते. दसऱ्याच्या दिवशी परंपरेनुसार रूपाभवानी देवीची पालखी मिरवणूक काढली जाते.[५२] विविध प्रांतातून सोलापूर शहरात येऊ न स्थायिक झालेल्या अनेक जाती-धर्माच्या लोकांनी आपापल्या

कुलस्वामीनीची धार्मिक स्थळे शहरात निर्माण केली आहेत. त्यामध्ये गद्रे लक्ष्मी मंदिर, हिंगूलांबिका देवस्थान, चौडेश्वरीदेवी मंदिर, बनशंकरीदेवी मंदिर, कालिका माता आणि अंबाबाईदेवी मंदिरांचा समावेश होतो. या सर्व मातृदेवता मंदिरातून नवरात्र महोत्सवाच्या वेळी घटस्थापना करून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या शक्तीदेवतांच्या मंदिराप्रमाणे शहरात विविध चौका-चौकातून शक्तीदेवीची उपासना म्हणून शक्तीदेवीची प्रतिष्ठापना करून नवरात्र सार्वजनिक मंडळामार्फत विविध धार्मिक कार्यक्रम केले जातात.

२१ ऑक्टोंबर १९०२ रोजी नवरात्र महोत्सवात गद्रे यांच्या लक्ष्मी मंदिरात नायकीणींचा गाण्याचा कार्यक्रम झाला होता. गणेशपेठेतील भावसार शिंपी समाजाची कुलदेवता हिंगूलांबिका देवी मंदिरात नवरात्रानिमित्त मेळ्यांचे कार्यक्रम झाल्याचा उल्लेख सापडतो.[५३] शहरात आझाद हिंद चौक, जयहिंद चौक, काडादीचाळ, तुळजापूर वेस, साखर पेठ, मधला मारूती आणि फौजदार चावडी इत्यादी ठिकाणी असणारी मंडळे नवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करीत.[५४] शहरातील चारशे ते साडे चारशे नवरात्र मंडळे देवीसमोर विविध देखाव्याचे सादरीकरण करून लोकजागृती करतात.

४.५.३ गणेशोत्सव

शहरात गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाज जागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येते. गणेशाची उपासना सातवाहन काळापासून रूढ झाली. याच काळात गणेशाच्या मूर्ती तयार केल्या जात. यादवांच्या काळात शहरात मोठ्या चौकात गणपतीचे देऊळ बांधण्याची पध्दती असावी. ज्ञानेश्वरीत चौकातील गणपतीची माहीती मिळते. परंपरेने चालत आलेल्या गणेश उपासनेचे महत्त्व पुढे पेशवे काळात मोठ्या प्रमाणावर दिसून येते.[५५]

सन १९०० मध्ये पंढरपूर आणि १९०३ मध्ये सोलापूर शहरात हा उत्सव सार्वजनिक स्वरूपात सुरू झाल्याची माहिती मिळते.[५६] परंतू १९०२ मधील वृत्तपत्रावरून सोलापूर शहरात गणेशोत्सवानिमित्त पान-सुपाऱ्या, आरास, किर्तने, सप्ते व धार्मिक कार्यक्रम शहरात विविध ठिकाणी होत असत. कसबा पेठेतील सार्वजनिक गणपतीसमोर लेले वकील यांचे पुरूष सूक्तावरील किर्तन झाले होते.[५७] सन १९०३ मध्ये शहरात सार्वजनिक गणपतीची संख्या २० होती आणि त्याअनुषंगाने भरणारे मेळे हे १० होते. किराणा गल्लीचा गणपती, नरसिंग गिरजी मिलचा गणपती, मल्लप्पा

स्वामीचा गणपती व मेळा, खेत्री गल्लीचा गणपती व मेळा रामदासी गणपती, थोबडे गल्लीतील गणपती व मेळा, रावजी गल्लीतील गणपती, गणेश पेठेतील गणपती, साखर पेठेतील गणपती व मेळा, शनिवार पेठ, मिठ गल्ली, फौजदार चावडी गणपती इत्यादी गणेश मंडळे गणपतीची प्रतिष्ठापना करीत. गणेश विसर्जनाच्यावेळी शहरातून मिरवणूका काढल्या जात. या प्रसंगी मल्लखांब, भालाफेक, छडीपट्टा, दांडपट्टा, चक्कर फिरविणारे, लेझीम, ताशे, डफडे, शिंगाडे मिरवणूकीत सामील होत.[५८] गणेश विसर्जनाच्या मिरवणूका रात्री आठपर्यंत चालत त्यावेळी विजेची सोय नसल्याने गॅसबत्यांचा वापर होत असे. हे विसर्जन पाणीवेशीत असणाऱ्या विहिरीत आणि सिध्देश्वर तलावात गणपती घाटाकडील बाजूस होत असे.

सन १९०५ मध्ये शहरात सार्वजनिक गणपती मंडळाची संख्या २५ आणि मेळ्यांची संख्या १६ होती. गणेशोत्सवाच्या काळात असंघटीत लोकांना संघटीत करून त्यांच्यात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जाई. तसेच प्रवचन, किर्तन, व्याख्यानाद्वारे हा सण राष्ट्रीय वृत्ती जोपासण्याचे एक महत्त्वाचे साधन बनले होते. ब्रिटिशांच्या विरोधी डावपेच रचण्याची ही एक महत्त्वाची केंद्रे होती. पहिल्या महायुध्दाच्या काळात युध्दजन्य परिस्थिती आणि राजकीय पेचप्रसंगामुळे सोलापूरचे तत्कालीन डिस्ट्रीक्ट मॅजेस्ट्रेट यांनी एका आदेशान्वये गणपती मिरवणूकीस परवानगी नाकारली होती. त्यावेळी शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाने गणपती मूर्तींची विनावाद्य नेऊन प्रतिष्ठापना केली.[५९] शहरातील शांततेस बाधा येऊ नये म्हणून १८ सप्टेंबर १९४५ या दिवशी काढलेल्या आदेशात गणपती विसर्जनाच्या होणाऱ्या मिरवणूकीत कोणीही इसमास सोटे, काठ्या, बंदूका, पिस्तूल, चाकू, सुऱ्या, तलवारी, सोडा वाटरच्या बाटल्या जवळ बाळगण्यास मनाई केली होती.[६०]

अलिकडील काळात गणपती उत्सव मंडळाचे स्वरूप बदलेले आहे. शहरात १३०० च्या वर गणेशमंडळे असून या उत्सवासाठी सरकारी परवानगी घेणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे. मेळावे नष्ट होऊन त्याठिकाणी लेझीम संघ, डॉल्बी, लाऊडस्पीकर आले. परंतू गणेशोत्सवाचे महत्त्व कमी झाले नाही. सर्व जातीधर्माचे लोक या उत्सवात सहभागी होतात. काही गणेश मंडळांचे अध्यक्ष हे मुस्लिम समाजातील आहेत. उत्सवाच्या दरम्यान धार्मिक देखाव्याबरोबर अंधश्रध्दा निर्मूलन, मुली वाचवा, पर्यावरण, महागाई, भ्रष्टाचार, विज्ञानाचे फायदे-तोटे असे देखावे दाखविण्यात येऊ लागले त्यामुळे शहरात लोकजागृती झाल्याने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यास मदत झाली.

४.५.४ शुभराय महाराज रथयात्रा

शहरातील अनेक विठ्ठल मंदिराबरोबरच विठ्ठल भक्तांचे मुख्य ठिकाण संतकवी शुभराय महाराज मठ हे होय. आषाढी व कार्तिकी एकादशीस शुभराय महाराज यांनी रथांमध्ये कृष्णाची मूर्ती ठेऊन रथयात्रा काढण्याची परंपरा चालू केली. आज ही प्रथा बुवा परिवाराकडे आहे.[६१] या रथाचे मानकरी सोमवंशीय क्षत्रिय बांधव, क्षेत्रबंध, गवळी, मंदे, दास हे परिवार आहेत. सोमवंशीय आर्यक्षत्रीय समाज बांधव दशमीला या रथाची बांधणी करतात.[६२] मिरवणुकीसाठी वापरला जाणारा हा रथ लाकडाचा असून लाकडी पट्ट्यावर सुरेख नक्षी कोरलेली आहे. पाच फुट दिसणारा हा रथ संपूर्णपणे घडींचा असून जोडल्यानंतर चोवीस फुट उंच होतो. हा रथ ओढणाऱ्यांमध्ये हरिजनांचा समावेश असतो.[६३]

रथाच्या मिरवणुकीत शहरातील विविध धर्मांचे लोक, अनेक भजनी मंडळे, हातात भगवा ध्वज व डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या स्त्रियाही रथ मिरवणुकीत सहभागी होतात. सन १९४६ मध्ये कार्तिकी एकादशी व बकरी ईद हे दोन्ही सण एकाच दिवशी आले असता शुभराय महाराज रथाच्या मिरवणुकीत माणिक चौकातील मगरबी दर्ग्यातर्फे मि. इमारम साहेब फरशा यांनी रथाला पुष्पहार घातला होता.[६४]

४.५.६ मार्कंडेय रथ मिरवणुक

श्री मार्कंडेयऋषी हे पद्मशाली समाजातील लोकांचे कुलदैवत मानले जाते. हा समाज शहरात स्थिर झाल्यानंतर समाजाचे मार्कंडेय मंदिर स्थापन करण्यात आले.[६५] मार्कंडेय मुनीची रथ मिरवणूक ही श्रावण शुध्द पोर्णिमेस निघते. या मिरवणुकीच्या उत्सवास पद्मशाली लोक 'नुल्लूपुल्लम' या नावाने ओळखतात. गेल्या अनेक वर्षांपासून या रथ मिरवणुकीची परंपरा चालू आहे. या दिवशी मंदिरात पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनास गर्दी होते. पहाटे ४ वाजता मार्कंडेयांस पानपूजा व नंदीपूजा होऊन उत्सवास प्रारंभ होतो. श्रींच्या दर्शनानंतर समाज बांधव पुरोहिताकडून विधीवत यज्ञोपावित व सुताची राखी हातावर बांधून घेतात. या रथोत्सवात शहरातील अनेक भजनीमंडळे, सामाजिक संस्था, लेझीम संघ उत्साहाने सहभागी होतात.[६६] सकाळी १० वाजता सुरू झालेली ही मिरवणुक ठरल्याप्रमाणे रात्री १० वाजता मार्कंडेय मंदिरात विसर्जित होते. उत्सव काळात मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. रथोत्सवासाठी वापरला जाणारा रथ हा संपूर्णपणे

चांदीचा असून बैलजोडीच्या सहाय्याने तो ओढला जातो. नारळी पोर्णिमेस होणारा हा 'नुल्लूपुल्लम' सण पारंपारिक पध्दतीने रथोत्सवाच्या माध्यमातून साजरा केला जातो.[६७]

श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरे होतात. स्वकुळ साळी समाजाचे कुलदैवत श्री भगवान जिव्हेश्वर यांचा जन्म श्रावण महिन्यातील तिथी त्रयोदशीस झाला. महादेवाच्या जीभेपासून त्यांचा जन्म झाला अशी आख्यायिका सांगितली जाते. भगवान जिव्हेश्वराचा उत्सवानिमित्त शहरातील बेगम पेठेत स्वकुळ साळी विठ्ठल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याच मंदिरातून जिव्हेश्वराचा जयजयकार करीत जिव्हेश्वराच्या पालखीची मिरवणुक काढली जाते.[६८] शहरातील पाच्छापेठेत चिमटेश्वरांचे मंदिर असून हे तेलगु नाभिक समाजाचे कुलदैवत आहे. नागपंचमी दिवशी श्री चिमटेश्वराचा उत्सव साजारा होतो. यावेळी मंदिरात होम हवन, महापूजा असे कार्यक्रम होतात. शेकडो समाज बांधव आपली दुकाने बंद ठेवून या रथोत्सवात सहभागी होतात.[६९]

कुरूहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या वतीने गुरूवार पेठेतील निलकंठेश्वर मंदिरातून रथोत्सवास सुरूवात होते. चांदीच्या रथातून निलकंठेश्वरांची मिरवणुक काढली जाते. याचबरोबर परीट समाजाचे दैवत श्री वीरशैव मडिवाळेश्वर माचदेव यांची पालखी व रथोत्सव मिरवणुक कन्ना चौकातील श्री मडिवाळेश्वर माचदेव मंदिरातून निघते. यावेळी तेलगु गीतांवर लेझीम आणि डान्स पथक आपली कला सादर करतात.[७०] श्रावणातील दर रविवारी सिध्दरामेश्वरांचे गुरू रेवणसिध्देश्वर यांची पालखी मिरवणुक रेवणसिध्देश्वर मंदिरातून निघते. श्रावणातील शेवटच्या रविवारी रथाची मिरवणुक काढली जाते. शहरात बसवेश्वर जयंती उत्सव आणि अक्कमहादेवी जन्मोत्सव साजरे केले जातात. बसवेश्वर जयंतीस महात्मा बसवेश्वरांच्या मूर्तीची मिरवणुक काढली जाते. अक्कनबळगच्या (महिला संघटना) वतीने शहरात अक्कमहादेवीचा जन्मोत्सव साजरा केला जातो.

मरिआई, सटवाई, भैरोबा, म्हसोबा, खंडोबा, खोकलाई इत्यादी लोकदैवतांची मंदिरे शहरात आहेत. दर मंगळवारी, शुक्रवारी, अमावस्या व पोर्णिमेस या देवतांना लोक भजतात. कोंबड्या व बकऱ्याचा नैवद्य या देवतांना अर्पण करतात. शहरात पूर्व भागात साजरा होणारा तेलगु भाषिकांचा महत्त्वाचा उत्सव म्हणजे पोशम्मा उत्सव होय. हा उत्सव १५ दिवस चालतो. लोक पोशम्मा देवीस

पालेभाजी, दहीभात, नारळ आणि कोंबड्या, बकऱ्याचा नैवद्य अर्पण करतात. महाराष्ट्रातील मरिआई उत्सवासारखे आंध्रप्रदेशात पोशम्मा देवीच्या उत्सवास महत्त्व आहे.[७१]

सुमारे १४० वर्षांपूर्वी आंध्रप्रदेशातून मादगी समाज, उत्तरप्रदेशातून वाल्मिकी समाज आणि गुजरातमधून गुजराती परमार समाज हे सोलापूर शहरात येऊन बुधवार पेठेत स्थायिक झाले. सोलापूर नगरपालिकेच्या स्थापनेनंतर शहराच्या साफ-सफाईची जबाबदारी या तिन्ही समाजाने उचलली. नगरपालिकेने त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन सन १९५८ साली बुधवार पेठेत ५४ घरांची पक्की वस्ती बांधून दिली. सध्या या भागाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मादगी व वाल्मिकी नगर असे आहे. आंध्रातून आलेल्या 'मादगी' समाजाचे दैवत 'पोशम्मा देवी' हे असून आषाढ महिन्यात या देवीचा उत्सव साजरा होतो. उत्तर प्रदेशातून आलेल्या 'वाल्मिकी लालबिगी' समाजाचे श्रीरामाचे आणि जाहरवीर गोगाजींचे मंदिर या समाजाचे दैवत आहे. दरवर्षी गोकुळाष्टमीच्या दिवशी 'जाहरवीर गोगाजी' यांच्या जन्मोत्सवानिमित्त शहरात समाजाच्या वतीने मिरवणूक काढण्यात येते. शहरातील लष्कर, बेगम पेठ या परिसरातही काही प्रमाणात हा वाल्मिकी समाज राहतो. म्युन्सिपल कॉलनीत राहणारा 'गुजराती परमार समाज' हा शितलादेवीची आराधना करण्याबरोबरच गोकुळाष्टमी, नवरात्रोत्सव व गणेशोत्सव हे सार्वजनिक उत्सव साजरे करतात. गोकुळाष्टमीला या समाजात एक अनोखी प्रथा आहे. श्रावण महिन्यातील सप्तमी आणि अष्टमी या दिवशी या समाजात चूल पेटत नाही. या काळात दोन दिवसांपूर्वी बनविलेले शिळे अन्न खाल्ले जाते. सफाई कामगार वसाहतीत राहणाऱ्या या तिन्ही समाजाचे काम जरी एकसारखे असले तरीही हे लोक मराठी, तेलगु, हिंदी व गुजराती या चारही भाषेत एकमेकांशी संवाद साधतात. त्यामुळे याठिकाणी महाराष्ट्रासह, आंध्रप्रदेश, गुजरात आणि उत्तरप्रदेश या चार राज्यांचा सांसकृतिक संगम दिसून येतो.

सोलापूर शहरात इतर देवतांप्रमाणे नागोबाची काही मंदिरे आहेत. सोलापूर जिल्ह्यात मोहोळ आणि वडवळ या ठिकाणी नागेश संप्रदायाचा प्रसार झाला या संप्रदायाचा प्रभाव सोलापूर शहरावरही पडलेला आहे. रेवणसिध्देश्वर मंदिरात असणारे नागोबाचे छोटेखानी मंदिर, शहराच्या पश्चिमेकडे असलेले डोणगांव रस्त्यावरील नागोबाचे मंदिर ही मंदीरे महत्त्वाची आहेत. नागपंचमीस या मंदिरातून महिलांची गर्दी होते. घराघरामध्ये नागोबाचे चित्र काढून त्याची पूजा करतात. शहरातील महिला नागोबाची पारंपरिक गाणी म्हणून उत्सव साजरा करतात.

४.५.७ मुस्लिमांचे सण व उत्सव

मध्यकाळ आणि ब्रिटिश काळात शहरात विविध पेठांची स्थापना झाली. दक्षिणेतून आलेले मुस्लिम व्यापारी शहरातील बुवा कादरी मस्जिद, शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, विजापूर वेस, पाच्छा पेठ, शास्त्री नगर, मौलाली चौक, सिध्देश्वर पेठ, बारा इमाम चौक, पेंटर चौक या भागात स्थायिक झाले. त्यात मोमीन, विणकर, सगर, आळंद, धाराशिव, आवसे इत्यादी जाती व उपजातींचा समावेश होतो. हे लोक व्यापार व कारागिरी बरोबर आपले सण व उत्सव साजरे करू लागले. इस्लाममध्ये मोहरम, रमजान, बकरी ईद इत्यादी सणात चंद्राला विशेष महत्त्व असल्याने प्रत्येक महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेची चंद्रकोर (हिलाल) पवित्र मानली जाते. शुक्रवार हा दिवस पवित्र मानून या दिवशी मशिदीत नमाजाचे पठण केले जाते. महत्त्वाच्या पीरांचे, फकिरांचे स्मृति-उत्सवही साजरे करतात, त्यास उरूस ह्मणतात. मुस्लिम संताच्या समाधीला दर्गा म्हणतात. या दर्ग्याच्या ठिकाणी धुप, दिप लावून प्रार्थना म्हटल्या जातात.[७२]

- **मोहरम**

मोहरम हा मुसलमानी वर्षाचा पहिला महिना असून या महिन्याच्या पहिल्या दहा दिवसात 'मोहरम' हा सण साजरा केला जातो. या उत्सवात ताबुताला महत्त्व असते. इराकमध्ये 'करबला' या ठिकाणी हुसेन मारला गेला, तिथेच त्याची कबर बांधण्यात आली. त्या कबरीची प्रतिकृती तयार करून बसविली जाते, त्यास ताबुत (ताझिया) म्हणतात. एका भिंतीशी मक्केकडे तोंड करून ताबुताची स्थापना करून ताबुताशेजारी 'धीमजलीस' (शोकगीत) गाण्याचा कार्यक्रम होतो. शेवटी छातीवर हात मारून हसन-हुसेन यांच्या नावाचा आक्रोश केला जातो. हसन आणि हुसेन यांना मारल्यामुळे मुस्लिम लोक व्यथित होऊन सर्व सुखाचा त्याग करून व्रतस्थ होतात. कांही जण दिवसभर पाण्याचा थेंबही घेत नाहीत, उत्सवाच्या शेवटच्या दिवशी शहरातील सर्व ताबुतांची मिरवणूक काढली जाते., ताबुतांबरोबर चालणारे अनवानी लोक दु:खद प्रसंगाचे वर्णन करतात. शहरातील अनेक हिंदू बांधव या मिरवणुकीत सहभागी होऊन त्याची पूजा करून नवस बोलतात. काही हिंदू लोकांच्या अंगी पीराचा संचार होतो, ते दूल्हा-दूल्हा म्हणून नाचत असतात. सवारी म्हणजे एका लाकडी दांडक्यात चांदीचा नाल किंवा पंजा लावून त्यावर नवीन वस्त्र बांधले जाते. त्यालाही ताबुतासमोर नाचवितात, सवारीची मिरवणूक संपल्यानंतर सर्व ताबुत गावाबाहेर कब्रस्थान नेऊन पुरतात त्यानंतर श्रीमंत लोक गरीबांना कपडे, अन्न, द्रव्य दान करतात.[७३]

शहरात मोहरम सणापूर्वी दोन महिने ताजिया (ताबुत) तयार करण्यासाठी हजारो रूपये खर्च केले जातात. हा सण पवित्र असून जिकडे तिकडे पीरांच्या सवाऱ्या बसविल्या जातात. सन १९०२ मध्ये सोलापूर शहरात हिंदु-मुस्लिमांनी मोहरम सण मिळून साजरा केला होता. शहरामधील मौलालींची सवारी, मुसलमानांची सवारी, बडे अब्बासअलीची सवारी, अकबर कासिम यांची सवारी, तरवार पंजाची सवारी, विजापूर वेस, पीर बारा इमामची सवारी, दरवेशाचा पंजाची सवारी अशा प्रकारे अनेक सवाऱ्यांची मिरवणुक शहरातून काढली जाते.[७४]

शहरात १९० ठिकाणी पंजे बसविले जात. या पंजाच्या मिरवणुकीत गॅसबत्त्या, झुंबर, टेंबे, मशाली असत. मुस्लिम धर्मानुसार विविध धार्मिक विधी करून सवारीस प्रारंभ होत असे. मिरवणुकीत ढोल, ताशा, हलग्या, बॅण्ड पथक, जुन्या काळातील वाघ, मेळे इत्यादीद्वारे मिरवणुकीत हिंदु-मुस्लिमांसहित आशीकल मैदानामार्गे साखर पेठ विहिर, महिबुब सुबानी दर्गा, बुजुर्गअली, गुरूवार पेठ दर्गा, हाजीमाई चौक, नवी पेठ, दत्त चौक, माणिक चौक, विजापूर वेस आणि शेवटी बाराइमाम चौकात सवारीचा समारोप होत असे.[७५] मोहमद पैगंबरासमवेत काम करणाऱ्या बारा इमामाच्या नावे महापालिकेने १९६८ मध्ये या चौकाचे नामकरण बाराइमाम चौक असे केले. सर्व सवाऱ्या रात्रीच्या वेळी करबळीच्या ठिकाणी थंड होण्यास जातात. याच दिवशी सगळीकडे 'दुला दुला' हा आवाज ऐकू येतो. सवाऱ्या थंड होऊन परत आल्यावर रात्री १२ च्या सुमारास विजापूर वेशीत हाजुमाई व बारा इमाम यांच्या ताबुतांची भेट होते.[७६] शेवटी आसार मैदानावर सर्व ताबुत भेटीसाठी येतात. भक्तिचा हा सोहळा अनुभवण्यासाठी हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात. या सवारी बसविताना शहरातील अनेक हिंदु भाविक वर्गणी देतात [७७]

रमजान (ईद - उल - फित्र)

सोलापूर शहरात मोहरमप्रमाणे रमजान व बकरी ईद यासारखे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. 'ईद' हा अरबी शब्द असून याचा अर्थ अतिप्रसन्नता व अत्यानंद होय. नवनवीन कपडे घालणे, स्वादिष्ट पक्वान्न शिजविणे हे ईदचे बाह्यस्वरूप आहे. ईद आपल्याला संयम, समानता, सहानुभूती, करूणा, स्नेह, ममत्त्व आणि प्रेमाचा संदेश देते. रमजान हा मुस्लिम महिन्याचा नववा महिना असून या महिन्याच्या शेवटी मुस्लिम बांधव रमजानचा सण साजरा करतात. रमजान हा मुस्लिमांचा 'रोजे' करण्याचा महिना होय.[७८] या संपूर्ण महिन्यात दर दिवशी सुर्योदय ते सूर्यास्तापर्यंत

रोजा ठेवला जातो. रोजा हा इस्लामच्या पाच स्तंभापैकी एक महत्त्वाचा स्तंभ असून त्यामध्ये नमाज, रोजा, जकात, हज आणि कलमा इत्यादींचा समावेश होतो. धार्मिक वृत्तीचे मुसलमान या महिन्यातील काही दिवस मशिदीमध्ये घालवितात. रमजान हा पवित्र महिना मनुष्याला स्वतःच्या इंद्रियावर नियंत्रण ठेवण्याची शिक्षा देतो आणि मानवतेचा धर्म पाळण्याचा संदेश देतो. रमजानचे रोजे करणारा प्रत्येक जण आपल्याला वाईटापासून दूर ठेवून पावित्र्य पाळण्याचा प्रयत्न करतो. नमाजात एकाग्रता महत्त्वाची असून दिवसातून पाच वेळा नमाज अदा केला जातो. फजर, जोहर, मगरीब आणि इशा इत्यादी नावाने नमाज ओळखला जातो.[७९]

रमजानचा पूर्ण महिना रोजे ठेवल्यानंतर चंद्रदर्शन झाले की, रमजान ईद येते. चंद्रदर्शनावरच ईदचा दिवस अवलंबून असतो. या पवित्र महिन्याच्या अंतिम शुक्रवारनंतर शेवटच्या तारखेला ईदचा चंद्र दिसल्यानंतर आनंद व्यक्त करून ईदचा सण साजरा करतात.[८०] रमजान हा इस्लाम धर्मातील सर्वात महत्त्वाचा सण असून यालाच "ईद-उल-फित्र" असेही म्हणतात. हा सण साजरा करताना साधे परंतू स्वच्छ कपडे परिधान करून त्यावर अत्तर लावणे अनिवार्य असते. त्याद्वारे साधे जीवन जगण्याचा संदेश दिला जातो. सोलापूर शहरात हा सण मोठ्या प्रमाणावर साजारा होतो. "ईद-उल-फितर" हा अरबी शब्द असून 'ईद' या शब्दाचा अर्थ 'आनंद' आणि 'फितर' या शब्दाचा अर्थ 'दान' करणे होय. त्यामुळे या काळात अन्नदान आणि संपत्तीदान महत्त्वाचे मानले जाते. रमजानच्या महिन्यात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत नाश्ता अथवा जेवण करणे वर्ज्य आहे. मात्र ईदच्या दिवशी सकाळी नमाजापूर्वी नाश्ता म्हणून मिष्ठान्न खाल्ले जाते. तसेच अल्लाचे आभार व्यक्त करण्यासाठी ईदगाहमध्ये सामुहिक नमाज पठण होते.[८१] या दिवशी शहरातील मुस्लिम बांधव उत्तम पोशाख करून अलंकृत होऊन एकमेकांना आलिंगन देतात त्यामुळे या काळात शहरात सर्वत्र आनंदी वातावरण असते.

शहरातील रंगभवनजवळील अहले अलिश ईदगाह, जुनी मिल कंपौंडमधील ईदगाह, आसार मैदान ईदगाह, होटगी रस्त्यावरील नबी आलमगीर ईदगाह व पानगल प्रशालेतील शाही आलमगीर ईदगाह इत्यादी ईदगाह मैदानात रमजानच्या नमाजाचे पठण होते. याठिकाणी महिलांना नमाज अदा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केलली असते. या दिवशी शहर काझी अमजद अली, मौलाना अब्दुल सलाम रजवी, काझी शकिल हाजी शब्बीर, हुसेन मौलवी, मौलाना ताहेर बेग इत्यादी काझी व मुल्ला,

मौलवी खुत्बा सांगतात. ते एक प्रकारचा कौटुंबिक, सामाजिक आणि अध्यात्मिक कर्तव्याचा उपदेश करतात. नंतर सामुदायिक प्रार्थना होते. १५००० पासून ५०००० पर्यंत मुस्लिम बांधव प्रत्येक ईदगाहमध्ये सामुहिक नमाज अदा करतात.[८२] रमजान सणाच्या माध्यमातून एकमेकांना आलिंगन देऊन आनंद व्यक्त करण्यासोबत आपापसातील भांडणे, कलह विसरून एकोप्याने राहण्याचा संकल्प केला जातो. त्यामुळे सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण होते. सकाळची प्रार्थना झाल्यानंतर गोड आणि मिष्ठान्न पदार्थ तयार केले जातात त्यासाठी शेवयाची खीर, बदाम, काजू, पिस्ता, आक्रोड, विलायची, साखर, दूध, तुप इत्यादी पदार्थ वापरतात त्यास 'शिरखुर्मा' म्हणतात. यादिवशी हिंदू-मुस्लिम बांधव एकमेकांना भेटून 'ईद मुबारक' देतात.[८३]

मुस्लिम समाजात कोणीही गरीब राहू नये, सर्वांना दोन वेळचे जेवण मिळावे, यासाठी जकात सुरू करण्यात आली. ज्या व्यक्तीची आर्थिक स्थिती चांगली आहे, अशा व्यक्तीनी फितरा (दान धर्म) करणे अनिवार्य मानले जाते. घरात जेवढे सदस्य आहेत त्या प्रत्येक सदस्याने पावणे दोन किलो गहू आणि साडे तीन किलो खजूर किंवा साडे तीन किलो बेदाणे दान देणे बंधनकारक मानले जाते. हा फितरा रमजान ईदच्या नमाजापूर्वी दिला जातो, एवढेच नव्हे तर काही लोकांनी साडे सात तोळे सोने किंवा पन्नास तोळे चांदी व तेवढ्याच किंमतीच्या संपत्तीपेक्षा अधिक संपत्तीवर २.५% जकात (दान) देणे आवश्यक असते. रमजान सणातील या पध्दतीमुळे गरजूंच्या अडचणी सोडविल्या जातात आणि प्रत्येकाच्या घरी हा सण आनंदाने साजरा व्हावा हा उद्देश असतो.शहरात साजरा होणाऱ्या रमजान सणामध्ये मुस्लिम बांधव हिंदु बांधवांना सण साजरा करण्यासाठी आमंत्रण देतात, रमजान सणाच्या शुभेच्छा देतात. एकमेकांस आलिंगन देऊन घरी केलेले गोड आणि मिष्ठान्न जेवणाचे आमंत्रणही देतात. रमजानचे रोजे काही हिंदु धर्मियही ठेवतात. त्यामुळे हिंदू-मुस्लिमांमध्ये सलोखा टिकून राहण्यास मदत होते. यावरून असे दिसते की, मुस्लिमांच्या या रमजाण सणात हिंदुचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. माणूस माणसासाठी आहे व माणसाने माणसासाठी सहकार्याचा हात पुढे करावा, हा संदेश या सणाच्या माध्यमातून दिला जातो.

- **बकरी ईद**

बकरी ईद हा कुर्बानीचा सण म्हणून ओळखले जातो. हा सण इस्माईल जबीलल्ला आणि इब्राहिम खालील्ला यांची आठवण करून देणारा सण म्हणून ओळखला जातो.[८४] त्यांची आठवण

राहावी म्हणून शहरातील मुस्लिम लोक बकरी ईद सण साजरा करतात. या दिवशी सकाळी ईदगाहमध्ये नमाज पठण होते. बकरी अथवा बैलाचा बळी दिला जातो, त्याच्या मांसाचे तीन भाग करून, एक भाग स्वत:कडे, दुसरा नातेवाईकांना व तिसरा भाग गरीबांना दिला जातो. अशा प्रकारे शहरात हा सण साजरा केला जातो.[८५]

सन १९७४ मध्ये मुस्लिमांचा बकरी ईद, हिंदुचा गीताजयंती आणि ख्रिश्चनांचा नाताळ हे सण एकाच दिवशी आले होते. या तीनही धर्माचे सण एकत्र येण्याचा हा योग अत्यंत महत्त्वाचा होता. हे तीनही सण धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे असले तरी शहरातील हा धार्मिक त्रिवेणी सणांचा संगम उत्साहाने पार पडला.[८६]

महमंद पैगंबरांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने शहरातील विजापूर वेशीत विद्युत रोषणाई करण्यात येते. त्या दिवशी 'मशाई' (कविता), 'कशिदे' (परमेश्वराच्या स्तूतीपर कविता) आणि रात्री 'वाज' (प्रवचन) इत्यादी कार्यक्रम होतात. पैगंबरांच्या चरित्रावर आधारित भाषणे आणि कव्वालीचे कार्यक्रमही केले जातात. सन १९३७ मध्ये हैद्राबादचे मौलाना महमंद कासीम, अरबस्तानातील मौलाना शास्त्री साहेब, सोलापूरातील मुर्शद हबीबुल्ला साहेब यांचे 'वाज' (प्रवचन) झाले होते.[८७]

- **उरूस**

पैगंबरांचा जन्मदिवस व मृत्युदिन या महत्त्वाच्या सणाव्यतिरिक्त मुस्लिम बांधव विविध पीरांच्या व फकिरांचे स्मृती उत्सव साजरे करतात. मुस्लिम पीरांचा हिंदु समाजावर प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे पीरांच्या उरूसात अनेक हिंदुही सहभागी होतात. पीरांच्या उरूसाचे महत्त्व असल्याने शहरात तो ही उत्सव साजरा होतो, उरूसादिवशी त्यांच्या मजारवर फुलांची किंवा कपड्यांची चादर घालतात. पीरांच्या या समाधीला दर्गा म्हणतात. अशा दर्ग्याच्या ठिकाणी धूप दीप लावून प्रार्थना म्हटली जाते व या काळात दर्गे विद्युत रोषणाई व फुलानीं सजवले जातात.

सोलापूर शहरात अनेक महत्त्वाचे दर्गे आहेत, त्यामध्ये हजरत हबशी मलिक अंबर, इकरार अली दर्गा, बंबईवाले बाबा, बशीर इनामदार दर्गा, सय्यद फकिर बाबांचा दर्गा, बाबा फकरोद्दिन शहा, हजरत पीर ऐतेकार अली शहा वली बाबा, हजरत मलंगशहा वली बाबा, हजरत सय्यद रसूल शहा वली बाबा, हजरत पीर पठाण शाहवली बाबा दर्गा, सय्यद बुखारी, गैबीपीर शहाजूर मुल्ला बाबा,

रहिम बाबा, अहमद अली शहा, बुजरू अली जावीद बाबा, हजरत शहाजहूर वली कादरी दर्गा, हजरत शहाजहूर नुरानी दर्गा, भैय्या चौकातील पीर जंग बहादूर सलावनखाँ बाबा दर्गा इत्यादिंचा समावेश होतो. या पीरांच्या उरूसात हिंदू-मुस्लिम भक्तीभावाने सामील होतात.[८८]

४.६ धार्मिक कार्यात महिलांचा सहभाग

सोलापूर शहरातील महिलांचा धार्मिक स्थळांशी जवळचा संबंध आहे. शहरात धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने वर्षभर अनेक कार्यक्रम होतात. मठ अथवा मंदिर या ठिकाणी होणाऱ्या भजन, प्रवचन, किर्तन आणि भारूड इत्यादी कार्यक्रमात महिला सहभागी होऊन प्रत्यक्षात त्यामध्ये रूची निर्माण करतात. भजन आणि किर्तनच्या माध्यमातून स्त्रियांनी धार्मिक विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. काही धार्मिक स्थळांच्या निर्मितीमध्ये महिला अग्रभागी आहेत. श्रीमती गंगुबाई सेवकराम परदेशी यांनी सन १९२० मध्ये शहरातील मेकॅनिक चौकात स्वतःच्या मालकीच्या जागेत दत्त मंदिराची निर्मिती केली. त्यांनी निर्माण केलेल्या या दत्त मंदिराची परंपरा पुढे महिलांनीच चालविली आहे. त्यांचे हे कार्य त्यांच्या कन्या कौशल्याबाई जवाहिरलाल कलवार यांनी पुढे चालविले. कलवार यांनी आपल्या आईकडून मिळालेल्या धार्मिक संस्कारामुळे सरस्वती चौकात सरस्वती मातेचे एक मंदिर बांधले. या मंदिराची स्थापना २ डिसेंबर १९४७ मध्ये करण्यात आली. या सरस्वती देवी मंदिरामुळे तेथे असणाऱ्या चौकाचे नामकरणही सरस्वती चौक असे करण्यात आले आहे. सध्या या मंदिराची देखभाल कलवार यांच्या चौथ्या पिढीतील महिला उषाकिरण आनंदनारायण कलवार या करीत आहेत.[८९]

शहरातील अनेक महिलांनी धार्मिक व अध्यात्मिक साहित्यातून आपला ठसा उमटविलेला आहे. यात सुमतीबाई शहा, विद्युलता शहा, जयदेवीताई लिगाडे, शशिकला मडकी, शुभांगी बुवा, डॉ. स्वर्णलता भिशीकर, अपर्णा कल्याणी, सुरेखा शहा, मयुरा शहा, इत्यादी महिलांचा समावेश होतो.

- **पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा**

सोलापूर शहरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या पंडिता सुमतीबाई शहा यांचा जन्म ९ जानेवारी १९१२ रोजी दिगंबर जैन घराण्यात झाला.[९०] त्यांना लहानपणापासूनच धार्मिकतेचे धडे मिळाले. आचार्य शांतीसागर महाराज आणि मुनी समंतभद्र

महाराज यांची मौलिक प्रेरणा सुमतीबाईंना लाभली.[११] मराठी, इंग्रजी, संस्कृत, हिंदी आणि गुजराती इत्यादी भाषांवर प्रभुत्त्व असणाऱ्या सुमतीबाईंनी वयाच्या १९ व्या वर्षी आचार्य श्री शांतीसागर महाराजांकडून ब्रह्मचर्य वृत्ताची दीक्षा घेतली होती. या ब्रह्मचर्य वृत्ताचा वसा त्यांनी जन्मभर पाळला. धार्मिकतेने, सचोटीने तिर्थयात्रा व चारीसंघांना दान देणाऱ्या सुमतीबाईंनी आपल्या धार्मिक कार्याची सुरूवात सन १९२३ मध्ये श्राविकाश्रमाची स्थापना करून केली. स्त्रियांना आधुनिक काळात शिक्षणाबरोबर धार्मिकतेचे ही धडे मिळावेत, ही यामागची प्रेरणा होती.[१२] धर्म ही श्रध्देची बाब असली तरी ते मनशांतीचे प्रभावी साधन आहे, हे विचार सुमतीबाईंच्या मनावर त्यांचे इंग्रजीचे शिक्षक पटवर्धन सरांनी बिंबवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच त्यांना धर्मग्रंथ वाचण्याची आवड निर्माण झाली. 'समाधीशतक' या ग्रंथातील अनेक श्लोक त्यांच्या मुखोद्‌गत होते.[१३] गिरनार सिध्द क्षेत्रावर दोन वर्षे राहून त्यांनी मौनवृत्त आचारून आत्मसाधना केली होती.

पंडिता सुमतीबाईंनी सोलापूर शहरात स्थापन केलेल्या श्राविकाश्रमाच्या माध्यमातून धार्मिक कार्याबरोबर फार मोठे सामाजिक कार्य केले. परित्यक्त्या, विधवा, अनाथ आणि निराधार महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिवणकाम, भरतकाम, टंकलेखन इत्यादी व्यावसायिक धडे दिले. एवढेच नव्हे तर त्यांना नैतिकतेचे आणि धार्मिकतेचे बळ दिले. यासाठी त्यांनी श्राविकाश्रमात 'भगवान महावीर' मंदिराची निर्मिती केली. या मंदिराच्या माध्यमातून महावीर पाठशाळा, श्राविका सांस्कृतिक केंद्र आणि ध्यान मंदिराचा प्रसार चालविला.[१४] याबरोबरच जैन धर्माचे तत्त्वज्ञान, आचार, विचार यांची समाजाला ओळख व्हावी, यासाठी त्यांनी प्रशिक्षण वर्ग चालविले.

अनेक संस्थांशी पंडिता सुमतीबाईंचा जवळचा संबंध होता. सन १९४६ साली कोल्हापूर येथे भरलेल्या "दक्षिण महाराष्ट्र जैन महिला परिषदे" च्या त्या अध्यक्षा होत्या. सन १९५६ मध्ये टोकिओ येथे भरलेल्या विश्वधर्म परिषदेत त्यांनी जैन धर्मावर व्याख्यान दिले. अमेरिकेतील जागतिक शाकाहार परिषदेत 'India Day' या दिवशी शाकाहार या विषयावर त्यांनी आपले मौलिक विचार मांडले होते. त्यावेळी त्यांनी भारतीय महिलांचे नेतृत्त्व करून भारतीय संस्कृती, धर्म आणि योग या विषयांचे महत्त्व जगाला पटवून दिले होते.[१५]

पंडिता सुमतीबाईंनी धार्मिक ग्रंथांचे लिखाण केले आहे. 'पुणार्ध्य' हा जैन वाङ्मयावरील ज्ञानकोष प्रसिध्द असून शिवाजी विद्यापीठाने तो पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ठेवलेला आहे. जैन

धर्मीय दृष्टीकोनातून लिहिलेले रामायण ज्ञानगीता, भावगीता, अमरभारती, समयसार, सुवर्णरेखा, आदिगीता, चामुंडराय करविले (बाहुबलीचे चरित्र), भावपल्लवी, षटखण्डागम, सुमती प्रज्ञा, सुमती वाणी हे गीत जीवनाचे आणि माझी जीवनगाथा इत्यादी २५ ग्रंथांचे लेखन व प्रकाशन केले आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना विदूषीरत्न, महिलारत्न व साहित्याचार्य अशा पदव्याने गौरविले. १९ एप्रिल १९७० रोजी भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते 'पद्मश्री' हा किताब बहाल करून सन्मानित केले. ७ जुलै २००० या दिवशी 'सल्लेखना' पध्दतीने त्या स्वर्गवाशी झाल्या.[९६]

- **विद्युलता शहा**

श्राविका संस्थेच्या माध्यमातून सुमतीबाई नंतर धार्मिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या विद्युलता शहा यांचे कार्य महत्त्वाचे आहे. विद्युलता शहा या पंडिता सुमतीबाईंच्या विश्वासू सहकारी आहेत. आपल्या आईकडून धार्मिकतेचे धडे मिळालेल्या विद्युलता यांनी आचार्य शांतीसागर महाराजांकडून ब्रह्मचर्य वृत्ताची दीक्षा घेतली. श्राविका संस्थेच्या भरभराटीत त्यांचा फार मोलाचा वाटा आहे. श्राविकाश्रमात असलेल्या भगवान महावीर मंदिराची व त्या माध्यमातून होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाची जबाबदारीही विद्युलता यांच्यावर आहे. मंदिरातून होणारे धार्मिक कार्यक्रम, विधी आणि उत्सव त्या आनंदाने पार पाडत आहेत. श्राविकाश्रमाला भेट देणाऱ्या मूनींची सेवा मनोभावे करतात. विद्युलता शहा यांनी सुमतीबाईबरोबरच 'पुर्णार्ध्य' या ग्रंथाचे प्रकाशन व 'जिनसहस्त्रनाम भगवान महावीर संस्कृत परिचय' या ग्रंथाचे लिखान केले. त्यांना महाराष्ट्र सरकारने सन २००४ मध्ये 'कवि कालिदास संस्कृत साधना' पुरस्कार व भारत गौरव आचार्य रत्न देशभूषण पुरस्कार समिती दिल्ली या संस्थेकडूनही सन २००४ मध्ये 'धर्मचंद्रिका' पुरस्कार देऊन गौरविले.[९७]

- **जयदेवीताई लिगाडे**

महाराष्ट्र व कर्नाटकात धार्मिक व सामाजिक कार्याने अमर झालेल्या जयदेवीताई लिगाडे यांचा जन्म २३ जून १९१२ रोजी सोलापूर शहरात 'इंद्रभुवन' या ठिकाणी झाला. जयदेवीताई शिवभक्त होत्या. त्या आपले रोजचे दोन तास शिवलिंगपूजेत घालवित. त्यांचे आराध्यदैवत श्री सिध्देश्वर असल्याने दररोज सिध्देश्वरांचे दर्शन घेत व दर सोमवारी त्या मौनव्रत आचरत.

जयदेवीताईंच्या मनावर वीरशैव धर्माचा पगडा होता. बसवराज देवरगळे, प्रभुलिंग लेले, सिध्दाराम चरित्र अशा विविध धर्मग्रंथांचे त्या वाचन करीत. गौर वर्ण, कांतीयुक्त डोळे, कपाळावर भस्म, हातात व गळ्यात रूद्राक्षाच्या माळा, खादीची पांढरी शुभ्र साडी असा त्यांचा वेश होता.

सन १९३८ मध्ये हुबळी येथे भरलेल्या अखिल भारतीय वीरशैव महासभेच्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. मराठी भाषेतून त्यांचे शिक्षण होऊनही कन्नड भाषेवर त्यांचे प्रभुत्त्व होते. सन १९५० मध्ये मुंबई येथे संपन्न झालेल्या कन्नड साहित्य संमेलनात महिला चर्चासत्राच्या त्या अध्यक्षा होत्या.[९८] ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांनी गायलेल्या 'येळय्या येळय्या येळय्या सिध्दरामा' या कन्नड भूपाळीची रचना जयदेवीताईंनी केलेली आहे, त्यांनी लिहिलेले २५ ग्रंथ प्रसिध्द असून त्यामध्ये महावीर राणी, जयगीत, सिध्दलिंगवाणी (सिध्दरामेश्वर वचनाचा मराठी अनुवाद), महायोगिनी (अक्कमहादेवी वचनाचा मराठी अनुवाद), सिध्दरामाची श्रीविधी, तारक तंबूरी, बसव दर्शन आणि सिध्देश्वर पुराण इत्यादींचा समावेश होतो. 'सिध्देश्वरपुराण' या काव्य रचनेतून वीरशैव धर्माचे अंग, प्राण, आत्मा, अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थळांचे सौंदर्य पाहावयास मिळते. हे काव्य त्यांनी त्रिपदी छंदस्यू (तीन पदांच्या ओवीमध्ये) लिहिले आहे. या रचनेसाठी त्यांना धारवाड विद्यापीठाने 'डॉक्टरेट' पदवी देऊन सन्मानित केले. जयदेवीताईंनी महाराष्ट्र आणि कर्नाटकात अनेक ठिकाणी 'अक्कनबळग' ची स्थापना केली. काटेकोरपणे धर्माचरण पाळणाऱ्या जयदेवीताईंनी आपले उर्वरीत आयुष्य बसवकल्याण येथे घालविले. याच ठिकाणी २५ जुलै १९८६ रोजी त्या लिंगैक्य झाल्या.[९९]

वीरशैव धर्माचा प्रचार आणि प्रसार त्यांनी आपल्या कार्यातून आयुष्यभर केला. त्यांच्या कार्याचा वारसा त्यांच्या ज्येष्ठ कन्या शशिकला मडकी यांनी चालविला. त्यांनीही मराठी व कन्नड भाषेत २७ धर्मग्रंथांची निर्मिती केली. "परमपुज्य महातपस्वी श्रीकुमार स्वामीजींचे जीवन आणि साहित्य" या त्यांच्या मराठी भाषेतील ग्रंथाचा हिंदीमध्ये अनुवाद करण्यात आला आहे. "श्री सिध्दरामेश्वर वचनसुधा" या त्यांच्या ग्रंथास महाराष्ट्र प्रदेश बसव समिती, मुंबई या संस्थेने पुरस्कृत केले आहे. सोलापूर शहरात असणाऱ्या "प्रार्थना योग महिला मंडळ, सोलापूर" या संस्थेच्या त्या संस्थापक अध्यक्षा आहेत तसेच त्या उत्कृष्ट गायिका आणि कवयत्रीही आहेत.[१००]

सोलापूर शहरात विविध धर्मिय व पंथीयांची धार्मिक स्थळे मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा धार्मिक स्थळांच्या माध्यमातून एकादशी, कृष्ण जन्माष्टमी, राम नवमी, दत्त जयंती, गुरू पोर्णिमा,

श्रावणातील सण, चातुर्मास इत्यादी प्रसंगी शहरातील अनेक महिला किर्तन, भारूड, व्याख्याने, प्रवचनाद्वारे लोकजागृतीचे कार्य करताना दिसून येतात. शहरातील दक्षिण सदर बझार येथील दत्त मंदिरात ह. भ. प. हणुमंत बोळकवठेकर गुरूजी हे मुली आणि महिलांना भगवत्गीतेचे पाठ शिकवित. त्यांनी जवळ जवळ एक हजार मुलींना व स्त्रियांना भगवत्गीता शिकविली. यातूनच रंजना क्षिरसागर या अंध मुलीने संपूर्ण गीता तोंडपाठ करून ती इतरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले.[१०१] रत्नप्रभाताई सहस्त्रबुध्दे या महिलांना भजन, किर्तन, भारूड, गीता इत्यादींचे प्रशिक्षण देतात. त्यांच्या किर्तनात धर्म, रूग्णसेवा, एडस् जागृती, स्वातंत्र्य सैनिक असे विषय असतात.[१०२]

शहरात अनेक महिला भजनी मंडळे असून धार्मिक स्थळांच्या प्रभावाने ही मंडळी लोकजागृतीचे कार्य करताना दिसून येतात.[१०३] शहरातील विविध महिला भजनी मंडळे कवी शुभराय मठात आषाढी व कार्तिकी एकादशीला एकत्र येऊन भजन, किर्तनाचा कार्यक्रम करतात.[१०४] शुभराय मठाच्या माध्यमातून शुभांगी बुवा यांनी ८ मे २००३ रोजी 'पाखर संकुल' या नावाने सोलापूर शहरात दत्तक विधानासाठी काम करणाऱ्या संस्थेची उभारणी केली.[१०५] धार्मिक स्थळाच्या माध्यमातून शुभांगी बुवा समाजकारणाचे धडे गिरवताना दिसून येतात. दंडवते महाराज गुहा (मठ) या ठिकाणी लहानपणापासून कार्य करणाऱ्या श्रीमती ताराबाई चिंचोळकर यांनी अभंगाची रचना केली असून दंडवते महाराजांच्या जीवन चरित्रावर त्यांनी अनेक किर्तनेही केलेली आहेत. दंडवते मठाच्या निर्मितीपासून सेवेत असणाऱ्या श्रीमती मंगलाबाई दिगंबर शेटे त्याचबरोबर गोविंद महाराज यांच्या पत्नी रूक्मिणीबाई यांनी वकील असूनही धार्मिक कार्याला वाहून घेतले आहे.[१०६]

एकविसाव्या शतकात महिलांनी सर्वच क्षेत्रात आपल्या कामगिरीचा ठसा उमटविलेला आहे. सोलापूर शहरात पुरोहित म्हणून कार्य करणाऱ्या आणि समाजातील महिलांना ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून पौराहिताचे प्रशिक्षण देणाऱ्या डॉ. स्वर्णलता भिशीकर या सोलापूरातील पहिल्या महिला पुरोहित म्हणून ओळखल्या जातात. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरही महिलांना पौराहित्याचे प्रशिक्षण देण्याचे काम त्या करीत आहेत. त्यांच्या या कार्यात अपर्णा कल्याणी, मेघना फडके, गायत्री सेवक, प्रज्ञा जेरे इत्यादी महिला सहकार्य करीत आहेत.[१०७] डॉ. स्वर्णलता यांचे कार्य सोलापूर शहरापुरते मर्यादित राहिले नाही तर त्यांनी ४५ महिलांच्या पथकासहीत राजस्थानात जावून १० दिवस विविध शहरात किर्तनाच्या माध्यमातून सतीविरोधी आवाज उठविला होता. अमेरिकेत "मराठी संस्कृती व

सण" या विषयावर दोन दिवसीय अधिवेशनात त्यांनी याच विषयावर आपले विचार मांडले.[१०८] अपर्णा कल्याणी यांनी 'अशी करा भगवती आराधना' या धार्मिक ग्रंथाचे लेखन व 'श्रीदुर्गासप्तशती' मधील श्लोकांचे परिच्छेद व अर्थासह संकलन व संपादन केले आहे. त्यांच्या पौराहित्य शिबीरामध्ये विविध जाती-धर्मांतील स्त्रियांबरोबर पुरूषांचाही सहभाग असतो.[१०९]

अलिकडील काळात महिला अत्याचारात वाढ झालेली दिसून येते, महिलांवरील अत्याचार कमी व्हावेत, म्हणून सन २०१३ या वर्षाच्या पहिल्या दिवशी शहरातील हिंदु आणि मुस्लिम समाजातील महिलांनी एकत्र येऊन सिध्देश्वर मंदिर आणि शहाजहूरवली दर्ग्यात सामुहिक प्रार्थना केली. यावेळी शहाजहूर वली दर्ग्यात हिंदु स्त्रियांनी 'वजू' करून इस्लामी पध्दतीने प्रार्थना केल्याचा उल्लेख सापडतो. यातून महिलांच्या बाबतीतही सोलापूर शहरातून राष्ट्रीय एकतेचा संदेश समाजाला दिल्याचे दिसून येते.[११०]

जात्यावर गायील्या जाणाऱ्या ओव्या, सण, उत्सवाची गीते, न्हानावळी, डोहाळे आणि बारसे इत्यादी वेळी गायलेली स्त्रीगीते यामधून समजाचे दर्शन होते. पहाटे उठून जात्यावर दळण दळताना गाणे म्हणणारी स्त्री आज जरी दिसून येत नसली तरी दळण, कांडण, सडा-सारवण, बाळाची अंगाई गीते इत्यादी गाणी ओवीबध्द आहेत.[१११]

सोलापूर हे जरी शहर असले तरी ग्रामीण भागातून शहरात जीवन जगण्यासाठी आलेल्या लोकांचा फार मोठा भरणा आहे. त्यामुळे या शहराची ग्रामीण जीवनाशी नाळ जोडलेली आहे. सणवार, जत्रा, लग्नकार्य इत्यादींची वर्णने लोकगीतातून पाहावयास मिळतात. बैलपोळा, अक्षय तृतिया, खंडोबाची यात्रा, पंढरीची वारी, धनगरी गीते, गोंधळी गीते इत्यादी गाणी ओव्यातून दिसून येतात.[११२]

सोलापूर शहराचा ग्रामीण जीवनाशी घनिष्ठ संबंध असल्याने शहरातील अनेक महिलांनी स्त्रीगीतांची व लोकगीतांची परंपरा जतन करून ठेवली आहे. वारकरी पंथाचा प्रभावामुळे महिलांनी विठ्ठलाविषयीची गाण्याची रचनाही केल्याचे दिसून येते. लक्ष्मीबाई शिवलिंग व्हटकर यांनी लोकगीतांचा संग्रह निर्माण करून सामाजिक व धार्मिक चळवळीस चालना दिली. त्या विठ्ठलभक्त असल्याने विठ्ठल व एकादशी याविषयी त्यांनी काव्य रचना केलेली आहे. त्यांच्या काव्यातील काही पंक्ती खालीलप्रमाणे आहेत.

विना आई बापाची नार जन्मली अशी
ब्रह्मा-विष्णुने नाव ठेविले तुझ एकादशी
एकादशी बाई तुझा निर्मल धंदा
नेणता राणू माझा हरी गुंतला तुझ्या छंदा ।। १ ।।
एकादश बाई नाव तुझं रंभा ।
विठ्ठलाच्या फराळीला खडी साखर पिवळा अंबा ।।
एकादश बाई नाव तुझं सरस ।
केळीच्या पानावर देव सोडीतो बारस ।। २ ।।

अशा प्रकारची पांडुरंगाची भक्तीची अनेक गीते लक्ष्मीबाई यांनी रचलेली आहेत.[११३] शहराच्या पूर्व भागात विड्या वळणाऱ्या पद्मशाली समाजाच्या स्त्रिया आपल्या कामाचा शीण घालविण्यासाठी हाताने विड्या वळताना ओठातून तेलगु भाषेतील सुंदर स्त्रीगीते म्हणताना दिसून येतात. यातून या महिलांनी सोलापूर शहरात राहून आपली तेलगु संस्कृती टिकवून ठेवल्याचे दिसून येते.

४.७ धार्मिक स्थळांचा आर्थिक प्रभाव

प्राचीन काळापासून धार्मिक स्थळांना सामाजिक व आर्थिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान राहिले आहे. धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने न्यायनिवाडे, धार्मिक उत्सव होत असत. तसेच राजेरजवाड्यांकडून धार्मिक स्थळांना गांवे, जमिनी, रोख रक्कम किंवा वस्तूच्या स्वरूपात इनामे किंवा दाने दिली जात. अशा दानातून धार्मिक स्थळांची देखभाल होत असे. राजेरजवाडे यांनी दिलेली दाने जनतेला माहिती व्हावीत, म्हणून ती शिलालेखाच्या माध्यमातून कोरली जात. शिलालेख हे कधीही नष्ट न होणारे इतिहासाचे साधन असल्याने या शिलालेखावरून दिलेली दाने कोणत्या राजाने, कोणाला, केंव्हा व कोणत्या स्वरूपात दिली याची माहिती आपणांस मिळते.

बाराव्या शतकात सोलापूरचे थोर संत व वीरशैव शिवशरण श्री सिध्दारामेश्वर यांनी तत्कालीन सोन्नलिगे ग्रामामध्ये श्रीशैल मल्लिकार्जून देवाचे एक मंदिर उभारले व त्यास 'कपिलसिध्द मल्लिकार्जून' असे नांव दिले.[११४] सन १८१९ साली किल्ल्यातील उत्खननात दोन खंडित शिलालेख सापडले.[११५] या शिलालेखातील मजकूरावरून मंदिराच्या देखभालीसाठी आणि चालविण्यात येणाऱ्या अन्नछत्रासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी कांही गांवे व त्या गांवातील धान्य मंदिरासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे. अनेक ठिकाणाची व भिन्न भिन्न वृत्ती व्यवसायाची बरीच प्रतिष्ठित माणसे एकत्र जमून

सोन्नलिगे कपिलसिध्द मल्लिकार्जूनास अणदूर विभागातील ३०० गावातून प्रत्येक घरामागे पायली धान्य गोळा करून व काही जिन्नस दान रूपाने दिल्याचा उल्लेख या दोन खंडित शिलालेखात सापडतो. या धान्याचा विनियोग कपिलसिध्द मल्लिकार्जून मंदिरात चालणाऱ्या अन्नदानासाठी केला जात असावा असे वाटते. यावरून मिळालेल्या दानातून बाराव्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणावर अन्नदान करण्याची पध्दती होती. संबंधित पुराव्यावरून अन्नछत्र चालविण्याची ही पध्दत सिध्दरामेश्वरांच्या काळापासून असल्याचे दिसते.[११६] मंदिराच्या योगक्षेमासाठी ग्रामदान-भूदान आणि द्रव्यदान आदी अनेक तऱ्हेची दाने कोरीव लेखातून दिसून येतात. परंतु एखाद्या राजकीय विभागातून घरटी पायली धान्य गोळा करून मंदिरास अर्पण करणे, असाही दानाचा प्रकार त्या काळात चालत होता हे यावरून सिध्द होते.

श्रीसिध्दरामेश्वर देवस्थानास पेशव्यांच्या काळात नैवैद्य, पुजा-अर्चा, नंदादीप व यात्रेकरीता काही रक्कम मिळे. ब्रिटिश सरकारकडून सिध्देश्वराच्या गड्डा यात्रेकरीता दरवर्षी २५० रूपये, नंदादीपाकरीता २०१ रूपये व श्रावण रूद्राभिषेकाकरीता श्रीधर माधव माळगी यास १५ रूपये, ब्राह्मण पंच यास ७१ रूपये आणि श्री गवई यांना ही काही रक्कम दिली जाई.[११७] ही प्रथा आजतागायत चालू आहे. प्रतिवर्षी नक्त नेमणूकी रक्कम २०१ रूपये मे. तहसिलदार उत्तर सोलापूर यांचेमार्फत सिध्देश्वर देवस्थानास दिली जाते.[११८] मंदिराबरोबर पेशव्यांच्या काळात मठांनाही देणग्या दिल्या जात असत. पेशवाईत कवि शुभराय यांनी आपल्या मठास मिळालेली आर्थिक मदत गोर-गरीबांना वाटल्याचा उल्लेख आहे.[११९]

भूईकोट किल्ल्याच्या बांधकामाच्या वेळी जोतिष्याच्या सांगण्यावरून बुरूजाखाली पद्मावती नावाची एक स्त्री बळी दिली. ही स्त्री दर्गो-पाटील घराण्यातील असल्याने सोलापूरच्या पाटीलकीचे वतन दर्गो-पाटील घराण्याला वंशपरंपरेने दिले गेले. पद्मावतीच्या नावाने एक छोटे मंदिरही किल्ल्यात उभारण्यात आले.[१२०] किल्ल्याच्या आत असणाऱ्या तिसऱ्या प्रवेशद्वाराजवळील बुरूजाखाली एका बालकाचा बळी देण्यात आला.[१२१] हा बालक सोलापूरचे प्रसिध्द शाहिर, किर्तनकार व लावणीकार कविराय रामजोशी यांच्या पूर्वापिढीतील असल्याचे सांगितले जाते. याबद्दल रामजोशी घराण्याकडे जोशीपणची वृत्ती देण्यात आली होती. तसेच सरकारातून १५ रूपयांची दरसाल नेमणूक करून दिली होती, ती आजतागायत रामजोशी घराण्याकडे आहे. या

बालकाच्या नावे किल्ल्याच्या तिसऱ्या प्रवेशद्वाराजवळ 'महांकाळेश्वराचे' छोटेखानी मंदिर पाहावयास मिळते. या मंदिराची पुजा-अर्चा याच जोशी घराण्याकडे आहे.[१२२] रामजोशी यांचे वडील जगन्नाथपंत जोशी यांना कुटुंबाच्या योगक्षमासाठी श्रीमंत बाळाजी बाजीराव यांनी सन १७५८ मध्ये सोलापूर येथे २० बिघे जमिन बक्षिस म्हणून दिल्याची नोंद आहे.[१२३] तसेच कविराय रामजोशी यांनाही दुसऱ्या बाजीरावाने स्वहस्ते गोकुळाष्टमीस पुणे येथील शुक्रवार वाड्यात कथा केली म्हणून १०० रूपये दक्षिणा दिल्याचा उल्लेख मिळतो.[१२४]

मोगल बादशहा औरंगजेबाचा सोलापूर शहराशी आलेला संबंध हा सोलापूरच्या धार्मिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. ब्रह्मपूरी येथे छावणी असताना औरंगजेब अनेक वेळा सोलापूरातील जामा मशिदीत नमाज पडण्यासाठी येत असे. त्यावेळी त्याच्याबरोबर अनेक मुस्लिम बांधवही आले होते. तेव्हां त्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी यासाठी औरंगजेबाने शहरात पाच्छा पेठ व बेगम पेठ या दोन पेठांची निर्मिती केली.[१२५] सन १६९२ मध्ये सोलापूरात ईदचा नमाज अदा करण्यासाठी औरंगजेबाने 'आलमगीर ईदगाह'चे बांधकाम करविले. आज आपणांस हा ईदगाह शहरातील पानगल हायस्कुलच्या मैदानात पाहावयास मिळतो.[१२६] सिध्देश्वर तलावाला लागून असलेल्या हजरत शहाजहूरवली दर्ग्याच्या प्रवेशद्वारावरील नगारखानाही औरंगजेबाने बादशहाने बांधून दिल्याचा उल्लेख आहे. तसेच या दर्ग्यास त्याने जमिनही दान दिली होती.[१२७] विजापूरच्या आदिलशहाने सोलापूर नजीक असणाऱ्या होटगी येथील पीर हाजी फराद्योद्दीन चिश्ती या प्रसिध्द दर्ग्याच्या उत्सवाकरीता जमीन दान दिल्याचीही माहिती मिळते.[१२८]

शहरातील व्यापाऱ्यांकडून 'देवस्थान धर्मादाय' नावाचा कर वसूल केला जाई. त्यावेळचे पुढारी मल्लेशप्पा वीरप्पा जम्मा हे शहरातील काही व्यापाऱ्यांच्या अनुमतीने हा कर वसूल करत. परंतु जरूर पडेल तेंव्हा देवस्थानप्रित्यर्थ, देवालय, घाट, तलाव, अन्नछत्र इत्यादींकरीता स्वखुशीने काही लोक खर्च करीत. शहरातील दानशूर व्यक्ती श्रीमंत धर्मराव थोबडे यांनी बाळीवेशीतील श्रीमल्लिकार्जूनाचे मंदिर स्वखर्चाने बांधले. सिध्देश्वर मंदिरातील संमती कट्ट्याच्या दक्षिणेकडील चिरेबंदी कमानीचे बांधकामही त्यांनी स्वखर्चाने केले. श्री कोडगी व श्री बसवंती या दोघांनी दुकानाच्या मिळणाऱ्या देवस्थान धर्मादायकराच्या आधारे सिध्देश्वर मंदिराचे महाद्वार बांधले. सिध्देश्वर तलावाच्या काठी असलेले एकनाथाचे देऊळ व त्यामागील घाट बाबुराव चिट्टे यांनी

जोडभावी पेठेतील व्यापाऱ्यांकडून बांधून घेतले. आप्पाराव निराळी व बाबुराव निराळी यांनी आदलिंगी धर्मशाळा बांधून घेतली. सन १९०७ मध्ये आप्पासाहेब वारद यांनी वीरशैव महासभा अधिवेशनाच्या निमित्ताने स्वखर्चाने सिध्देश्वर मंदिरासमोरील भव्य सभामंडपाचे काम केले. वीरशैव महासभेचे तिसरे अधिवेशन त्याच वर्षी या मंडपात भरविण्यात आले होते. हा सभामंडप मंदिराच्या समोर असणारा तलाव हटवून बांधल्याचा उल्लेख आहे.[१२९]

शहरात भरणाऱ्या गड्डा यात्रेच्या आणि विविध उत्सवांच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते.[१३०] सोलापूर ही एक मोठी बाजारपेठ बनण्याचे गड्डा यात्रा हे एक महत्त्वाचे माध्यम होते. या यात्रेत वेगवेगळी दुकाने थाटली जातात. या दुकानांच्या माध्यमातून सिध्देश्वर पंचकमिटीला दरवर्षी कराच्या स्वरूपात लाखो रूपये मिळतात. या यात्रेत धान्यांचे, कपड्यांचे व जनावरांचे बाजार भरतात. रेवणसिध्देश्वर मंदिराच्या समोरील मैदानात गड्डा यात्रेच्या निमित्ताने जनावरांचा फार मोठा बाजार भरतो, या बाजारात लाखों रूपयांची उलाढाल होते. यात्रेच्या निमित्ताने सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीमार्फत विविध प्रदर्शने भरविली जातात.[१३१] यात्रेचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे शोभेची दारू उडविणे हे आहे. पूर्वी हे दारूकाम पाहण्यासाठी प्रौढास चार आणे व मुलांना दोन आणे तिकीट असे. त्यामुळेही सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीस मोठ्या प्रमाणावर अर्थप्राप्ती होत असे.[१३२] मात्र अलिकडील ४० वर्षांच्या काळात ही पध्दत बंद करण्यात आली आहे.

आषाढ आणि श्रावण महिन्यात शहरात अनेक उत्सव साजरे केले जातात. यावेळी शहरात पूजेच्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. जानेवारी महिन्यात संक्रांती सणाला तिळगुळाची विक्री होते तर सिध्देश्वरांच्या यात्रेच्या वेळी महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकातून आलेले भाविक श्री सिध्देश्वरास नारळ वाहतात. या नारळाच्या माध्यमातून व्यापारी वर्गास फार मोठी अर्थप्राप्ती होते. सन १९४२ च्या श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी शहरात सुमारे तीस हजार नारळाची विक्री झाल्याची नोंद आहे. चार पैशास मिळणारा नारळ त्यावेळी नऊ पैशास झाला होता. अशा प्रकारची नारळाची विक्री सन १९४२ पूर्वी कधीही झाली नव्हती.[१३३] आषाढ आणि श्रावण महिन्यात विविध धार्मिक उत्सवामुळे सन २०१२ मध्ये १ लाख नारळ विकले गेले होते.[१३४]

शहरात गणेशोत्सव काळात २०० ते ३०० गणेश मंडळे गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना करतात. नवरात्रात रूपाभवानी मातेची यात्रा १५ ते २० दिवस चालते. रमजानच्या काळात भरविण्यात येणारा

'मीना बाजार' एक महिना असतो. रमजानचे रोजे सोडण्यासाठी लागणारी खजूर इराक, इराण, सौदी अरेबिया इत्यादी देशातून आयात केली जाते. मुंबईहून विविध शहरात खजूर पाठविली जाते.[१३५] अशा विविध धार्मिक उत्सवाच्या काळात लोक मोठ्या प्रमाणात अनेक प्रकारच्या वस्तू खरेदी-विक्री करतात त्यामुळे शहरात मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते.

धार्मिक स्थळांमुळे लोकसंग्रह, लोकशिक्षण, सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य, धार्मिक ऐक्य, आचार-विचार व सांस्कृतिक ऐक्य मोठ्या प्रमाणावर घडून येते. शहरात असणाऱ्या धार्मिक स्थळांच्या उत्सवासच्या प्रसंगी विशिष्ट अशा धर्माचे लोक असत नाहीत तर अशा प्रसंगी सर्वधर्मिय त्यामध्ये सहभागी होतात. यातून आचार-विचारांची देवाण-घेवाण होण्यास मदत होते. देव-देवतांच्या उत्सवाच्या प्रसंगी मिरवणूका काढल्या जातात. यावेळी विविध चित्तथरारक खेळ, मल्लखांब, काठी फिरविणे, मशाल प्रदर्शन, लेझिम, उड्या इत्यादींचे प्रदर्शन केले जाते. विविध वेशभूषेतील विद्यार्थी यामध्ये भाग घेऊन लेझिम, ढोल, ताशा, विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम व कवायतीचे प्रकार सादर करतात. अलिकडील काळात पर्यावरण, मुली वाचवा, पाणी वाचवा, व्यसनमुक्ती, स्त्री अत्याचार, एड्स जनजागृती, अपघात नियंत्रण, वाहतूक नियम, अंधश्रध्दा निर्मूलन, लोकसंख्या नियंत्रण इत्यादी विविध विषयांचा समावेश झाल्याने सर्वांगीण अभिसरण घडून येण्यास मदत झाली आहे.

धार्मिक स्थळे ही लोकशिक्षण आणि लोकसंग्रहाची महत्त्वाची ठिकाणे असल्याने प्रवचन, किर्तन, भारूड, भजन, व्याख्यान, कव्वाली याद्वारे फार मोठ्या प्रमाणावर समाज प्रबोधन घडवून आणले जाते. जसजसा काळ बदलत आहे त्यानुसार या विचारांचे अभिसरण घडून येताना दिसून येते. वरील माध्यमांच्याद्वारे अलिकडच्या काळात सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक विचारांची देवाण-घेवाण होऊन माणसांच्या जीवनामध्ये अभिसरणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर घडून आली आहे. सामाजिक अभिसरण प्रक्रियेमुळे विविध ठिकाणी स्त्रियांचा सहभाग वाढलेला दिसून येतो. शिक्षण, राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण अशा विविध क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येऊ लागला आहे. विचारांच्या या अभिसरणामुळे व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत झाली.

विविध धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने होणाऱ्या यात्रा व उत्सवामध्ये काळानुसार आर्थिक अभिसरण झालेले दिसून येते. शहरात भरणाऱ्या गड्डा यात्रा उत्सवाप्रसंगी विविध देव-देवतांच्या

उत्सवाप्रसंगी विविध प्रदर्शने भरवून त्यामध्ये लोकांचा सहभाग वाढवला जातो. या प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकांना नवनवीन वस्तूंचे ज्ञान, नवीन यंत्रांची माहिती होऊ लागली. शेतकी प्रदर्शनाद्वारे पारंपारिक पध्दतीच्या शेती अवजारांच्या ऐवजी आधुनिक पध्दतीची अवजारे, पिकांच्या विविध जाती, विविध संकरित बी-बियाणे, पिक किड नियंत्रण औषधे इत्यादींचा त्यात समावेश होतो. त्याचबरोबर या यात्रेत जनावरांचेही प्रदर्शन भरवून चांगल्या प्रतीच्या जनावरांचे नंबर काढून त्यांना बक्षिसे दिली जातात. यातून आर्थिक अभिसरण होण्यास मदत होत आहे.

सोलापूर शहरात असणाऱ्या धार्मिक स्थळांचा मानवी जीवनावर फार मोठा प्रभाव पडल्याने सर्व धर्मीयांचे लोक उत्सवाप्रसंगी एकत्रित येऊन राष्ट्रीय ऐक्याचे प्रदर्शन घडवितात. हिंदुच्या सण-उत्सवामध्ये मुस्लिम बांधवांचा सहभाग, मुस्लिमांच्या सण आणि उत्सवामध्ये हिंदुचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग, हिंदु, मुस्लिम, लिंगायत सहभोजनाचे कार्यक्रम इत्यादीद्वारे सामाजिक व सांस्कृतिक एकोप्याबरोबरच राष्ट्रीय ऐक्य टिकून राहण्यासही मदत झाली आहे.

संदर्भ व तळटिपा

१. शर्मा रामशरण, प्राचीन भारताचा परिचय (अनु.), बिंदा परांजपे, २००४, पृ. २-४.

२. चिटणिस के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग-२, समाज व संस्कृती, पृ. १७१.

३. दिक्षीत दुर्गा (संपा.), डायमंड मराठी संस्कृती कोश, २००९, पृ. ९९.

४. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, २००६, पृ. २१६ - २१७.

५. कल्पतरू (साप्ताहिक), सोलापूर, १३ डिसेंबर, १८६८.

६. कुलकर्णी गणेश पंढरीनाथ, शतसवंत्सरिका, पृ. १७.

७. चिटणिस के. एन., उपरोक्त, पृ. ७४.

८. वैभवशाली वारकरी परंपरा, सोलापूर स्मरणिका, २०१०.

९. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास, प्राचीन काळ, खंड-१, पृ. ३९३-३९४, (संपा.) अरूण पाठक.

१०. नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार, २००८, पृ. १४३.

११. डिस्ट्रिक्ट सेन्सेस हँडबुक, १९६७, सोलापूर, पृ. २१.

१२. शर्मा रामशरण, उपरोक्त पृ. २-४.

१३. गर्गे स. मा., (संपा.) भारतीय समाजविज्ञान कोश, खंड -३, पृ. ५१२-५१३.

१४. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १६९ - १७०.

अ) बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, पृ. २२६.

१५. सोलापूर समाचार, १० ऑगस्ट, १९१५.

१६. कित्ता, १७ मे १९१६.

अ) सबकुछ सोलापूर, पृ. ४७.

१७. सोलापूर समाचार, १३ डिसेंबर १९४२.

१८. कित्ता, २ डिसेंबर १९४६.

१९. कित्ता, ५ डिसेंबर १९४६.

२०. सोलापूर समाचार, ४ ऑक्टोंबर १९६७ मधील मा. कृ. शिंदे, सेवानिवृत्त मामलेदार सोलापूर यांनी दिलेल्या निवेदनावरून.

२१. मुलाखत, विठ्ठल तिरूपती नल्ला, निलम नगर, सोलापूर.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, १२ नोव्हेंबर २०१३.

२२. पसारकर शे. द., (संपा.), श्री सिध्दरामेश्वरांची वचने, खंड-१, प्रस्तावना, पृ. १२.

२३. शेंडे एस. आर., मराठेकालीन धार्मिक जीवन, पृ. १०५.

२४. सोलापूर समाचार, १३ फेब्रुवारी १९३३.

२५. कित्ता, १९४१.

२६. कुलकर्णी वि. य., भारतीय कला उद्‌गम आणि विकास, पुणे, १९९६, पृ. ६६, ६७.

२७. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १७.

२८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २१९ - २२२.

२९. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १७०, १७१.

३०. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. १३.

३१. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २२२.

३२. सोलापूर समाचार, १६ जुलै १९४२.

३३. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २२३, २२४.

३४. दैनिक लोकमत, ८ ऑगस्ट २०१२.

३५. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २२४.

३६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ४ ऑगस्ट २०१३.

अ) सिमांत, दिवाळी अंक, यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई, सोलापूर, पृ. ५६.

३७. फडके ज. शा. (संकलन), आपली संस्कृती : सण उत्सव व प्रतिके, सोलापूर, २०११, पृ. ७.

३८. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. २१८, २१९.

३९. सोलापूर समाचार, १५ जानेवारी १९६४.

४०. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९८८.

४१. डायमंड महाराष्ट्र संस्कृती कोश, पृ. १६१, १९३.

४२. पसारकर शे. द., उपरोक्त पृ. ११.

४३. शतसंवत्सरिका ग्रंथ, पृ. २७१.

४४. पाटील म. आ., बसव पथ (त्रैमासिक), बसव समिती, बेंगलोर, २००७, पृ. ६४.

४५. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ९ जानेवारी २०१३.

४६. जावळे सो. सं., (संपा.), सोलापूर शहर व परिसराचा इतिहास, सोलापूर, पृ. ११८ ते ११९.

४७. जोशी महादेव शास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड-१०, पृ. ३६.

अ) पसारकर शे. द., उपरोक्त पृ. १२.

४८. अंदुरकर व्ही. जी., सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे, १९५८, पृ. २४०-२४२.

४९. मुलाखत, किरण जोशी, (पुजारी), जुने विठ्ठल मंदिर, सोलापूर.

५०. डायमंड मराठी संस्कृती कोश, पृ. १८९.

५१. पाटोळे अरविंद, श्री तुळजाभवानी महात्म्य, पृ. ४५ - ४६.

५२. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १७ ऑक्टोंबर २०१२.

५३. सोलापूर समाचार, २९ ऑक्टोंबर १९०२.

५४. कित्ता, २ ऑक्टोंबर १९०६.

५५. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त पृ. १५१.

५६. डायमंड मराठी संस्कृती कोश, पृ. १९६, १९९.

५७. सोलापूर समाचार, १६ सप्टेंबर १९०२.

५८. कित्ता, ८ सप्टेंबर १९०३.

५९. कित्ता, १५ सप्टेंबर १९४२.

६०. कित्ता, १९ सप्टेंबर १९४५.

६१. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९९५.

६२. सद्‌गुरू शुभराय महाराज चरित्र, श्री शुभराय मठ, सोलापूर, पृ. ८, ९.

६३. भूर्के शाम, मुक्काम पोस्ट सोलापूर, पृ. १५.

६४. सोलापूर समाचार, ६ नोव्हेंबर १९४६.

६५. इराबत्ती आ. ल., माझ्या आयुष्यातील टिपणे, सोलापूर, १९७१.

६६. ५९ वा वार्षिक अहवाल, पद्‌मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर, २०१० - २०११, पृ. १-३.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, ३ ऑगस्ट २०१२.

६७. कित्ता, पृ. ३ - ४.

नारळीपोर्णिमा अथवा 'नुल्लूपुल्लम' हा सण पद्मशाली लोक मार्कंडेय मुनीचे पुत्र वीर भावनाऋषीचा राज्याभिषेक दिन म्हणून साजरा करतात. नारळीपोर्णिमेदिवशी मार्कंडेय मंदिरातून मार्कंडेयांच्या रथाची मिरवणूक काढली जाते.

६८. मुलाखत, जनार्दन साखरे, अध्यक्ष, जिव्हेश्वर जन्मोत्सव समिती, सोलापूर.

६९. मुलाखत, सिध्दय्या स्वामी हिरेमठ, सोलापूर.

अ) दैनिक तरूण भारत, सोलापूर, २२ जुलै २०१२.

७०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १४ ऑगस्ट २०१२.

७१. दैनिक सकाळ, सोलापूर, २५ जुलै २०१३.

७२. खेर संजीवनी, धर्म, पृ. ५७.

७३. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. ५४१ - ४२.

मोहरमः 'मोहरम' च्या मूळ अरबी शब्दाचा अर्थ 'धिक्कार', 'निषिध्द' असा आहे. महमंद पैगंबराच्या मुलीचे मुलगे हसन व हुसेन यांना त्यांच्या शत्रूंनी म्हणजे सुन्नी पंथीयांच्या खलिफाने ठार मारले. त्या दुखःद प्रसंगाची आठवण म्हणून हा उत्सव साजरा केला जातो.

७४. सोलापूर समाचार, २२ एप्रिल १९०२.

७५. कित्ता, २४ जानेवारी १९७५.

बारा इमामांची नांवेः सय्यद असदुल्लाह-हिल-गालीब हजरत अली करम अल्लाह, हजरत सय्यदना इमाम हुसेन, हजरत सय्यदना इमाम जैनुल आबदीन, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद बरकर, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद जाफर सादिक, हजरत सय्यदना इमाम मुसा काझम, हजरत सय्यदना इमाम अली रजा, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद तकी, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद तकी, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद तकी, हजरत सय्यदना इमाम मोहम्मद नकी, हजरत सय्यदना इमाम मु. हसन असबरी, हजरत सय्यदना इमाम महेदी आखुरूजमा.

७६. कित्ता, १२ मे १९३२

७७. मुलाखत, मकबुल मोहोळकर.

अ) सोलापूर समाचार, २२ फेब्रुवारी १९४०.

७८. भारतीय संस्कृती कोश, खंड-७, पृ. ७२०.

७९. मुलाखत, अजमद अली काझी, शहर काझी, सोलापूर.

८०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ९ ऑगस्ट २०१२.

८१. दैनिक सकाळ, सोलापूर, १३ ऑगस्ट २०१२.

८२. उपरोक्त, ९ ऑगस्ट २०१२.

८३. मुलाखत, जैनुद्दीन पटेल, सोलापूर सोशल महाविद्यालय, सोलापूर.

८४. सोलापूर समाचार, १ एप्रिल १९६६ मधील महमंद इसाक हसनसाो कलवल यांच्या लेखावरून.

८५. सिमांत, दिवाळी अंक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या लेखावरून.

८६. सोलापूर समाचार, २६ डिसेंबर १९७४.

८७. दैनिक सोलापूर समाचार, २६ मे १९३०.

८८. येळेगांवकर श्रीकांत, सोलापूरचे स्वातंत्र्य लढ्यातील दिपस्तंभ, सोलापूर, २०११, पृ. ८१.

अ) सोलापूर समाचार, १७ मे १९१६.

८९. शहा सुमतीबाई, माझी जीवनगाथा (आत्मचरित्र), सोलापूर, १९८९, पृ. २७ - ३१.

९०. शहा विद्युलता, (संपा.), पद्मश्री सुमतीबाई शहा गौरवग्रंथ, सोलापूर, १९८७, पृ. ८८.

९१. शहा सुमतीबाई, उपरोक्त, पृ. ३० - ३२.

९२. शहा विद्युलता, उपरोक्त, पृ. ८८.

९३. येळेगांवकर श्रीकांत, उपरोक्त, पृ. ८३.

९४. शहा विद्युलता, उपरोक्त, पृ. ८७.

९५. येळेगांवकर श्रीकांत, उपरोक्त, पृ. ६२ - ६९.

९६. शहा सुमतीबाई, उपरोक्त, पृ. ६२ - ६९.

९७. नागावकर विकास, हे खोड चंदनाचे, शरयू शहा (प्रकाशिका), मुंबई, २०१३, पृ. ११४-११५ .

९८. सिध्दचेतन स्मरणिका, २००७, गडीनाड साहित्य संमेलन सोलापूर, पृ. ४३.

९९. कित्ता, पृ. ४५

१००. नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. ३२.

१०१. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ३० जून २०१२.

१०२. कवि शुभराय मठातील माहितीच्या आधारे.

१०३. दैनिक सकाळ, सोलापूर, २० ऑगस्ट २०१३.

१०४. पाखर संकुल अनाथाश्रम, कवि शुभराय मठ, माहिती पत्रकावरुन, २०१३.

१०५. स्मरणिका, दंडवते महाराज गुहा (मठ) सोलापूर.

१०६. ज्ञान प्रबोधिनी संस्था, सोलापूर पौरोहित्य विभागाच्या माहिती पत्रकावरून.

१०७. भूर्के शाम, उपरोक्त, पृ. ७४ - ७५.

१०८. मुलाखत, अपर्णा कल्याणी, महिला पुरोहीत, सोलापूर.

१०९. दैनिक सकाळ, सोलापूर, २ जानेवारी २०१३.

११०. मांडे प्रभाकर, लोक साहित्याचे स्वरूप, १९८९, पृ. २५३ - २५४.

१११. राजाध्यक्ष विजया, मराठी वाङ्मय कोश, खंड-४, पृ. ४०६.

११२. मुलाखत, अर्जून व्हटकर, वालचंद महाविद्यालय, सोलापूर.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, २१ जुलै २०१०.

११३. कवि राघवांक, सिध्दराम चरित्र (अनु. रामराव आर. एस.), कन्नड साहित्य परिषद, बेंगलोर, १९७७, पृ. १८.

११४. कुंभार आनंद, संशोधन तरंग, पृ. ६९.

११५. उपरोक्त, पृ. ७० (शिलालेख क्रमांक १, ओळ क्रमांक ९).

शिलालेख- मल्लिकार्जून देवरिगे, अणदूर, मुन्नुरशेळगे बिट्ट आय मोनेगोम्मान भ.

११६. श्री सिध्देश्वर चरित्र (संपा.), सुदर्शन सोलापूर, पृ. ५८.

११७. कोसंदर प. रे., संस्थानिक संस्थापक आणि ५० वर्षापूर्वीचे व्यापारी, सोलापूर.

११८. जक्कल बाबुराव, सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ९.

अ) बुवा परिवार अंकित माहिती, कवि शुभराय मठ, सोलापूर, पृ. ९.

११९. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९७९ - ८०.

१२०. जक्कल बाबुराव, उपरोक्त, पृ. ५८.

१२१. सीमांत, दिवाळी अंक, २००८, पृ. ३४.

१२२. कित्ता.

१२३. शेंडे एस. आर., मराठेकालीन धार्मिक जीवन, पृ. ९५.

१२४. टिकेकर अरूण, स्थळकाळ, पृ. १३२.

१२५. अकलुजकर लता, किल्ले सोलापूर, पृ. ५३.

१२६. फारूक सय्यद नसीम, ऐनेमे इरलाही व फलाही तनजीम, सोलापूर, १९९९, पृ. ५९ - ६०.

१२७. सोलापूर समाचार, १० डिसेंबर १९६५, महमद इसाक हासनसाो कलवल, यांच्या लेखारून.

१२८. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, सोलापूर, १९४९, पृ. २१६.

अ) श्री सिध्देश्वर चरित्र, सुदर्शन सोलापूर, पृ. ५९ - ६०.

१२९. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९८८.

१३०. जावळे सो. सं., उपरोक्त, पृ. ११९.

१३१. सोलापूर समाचार, १० जानेवारी १९५७.

अ) कित्ता, १० जानेवारी १९७४.

१३२. कित्ता, ९ सप्टेंबर १९४२.

१३३. दैनिक तरूण भारत, सोलापूर, २२ जुलै २०१२.

१३४. दैनिक सकाळ, सोलापूर, २५ जुलै २०१३.

प्रकरण - पाचवे

उपसंहार

"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला होता. या संशोधन प्रबंधामध्ये एकूण चार प्रकरणांचा आढावा घेण्यात आला आहे. चार प्रकरणांतून सोलापूर शहराचा इतिहास, धर्म व पंथ, शहरातील धार्मिक स्थळे आणि धार्मिक स्थळांचा लोकजीवनावरील पडलेला प्रभाव इत्यादि घटकांवर प्रकाश टाकला असून त्याचे समग्रपणे विवेचन प्रस्तुत प्रकरणातून केलेले आहे. ही मांडणी करताना धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्य व कला या मुद्यांना अनुसरून संशोधनाची फलिते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटकच्या सीमेवर असल्याने याठिकाणी मराठी, तेलगु आणि कन्नड संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. मध्यकाळात मुस्लिम सत्ताधिशाबरोबर आणि व्यवसायाच्या निमित्ताने अनेक मुस्लिम लोक सोलापूर शहरात कायमचे स्थिरावले त्यामुळे इस्लामी संस्कृतीचे ही अस्तित्त्व शहरात आढळून येते. विविध जाती-धर्मांचे लोक शहरात राहतात त्यांच्या धार्मिक समजूती, धार्मिक स्थळांतील विविधता, चालीरिती, रूढी, परंपरा, सण, उत्सव इत्यादी घटकांमध्ये विविधता असली तरीही शहरातील लोक धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक संकटाच्या प्रसंगी संघटीत होतात.

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत शहरातील विविध जाती-धर्मांच्या लोकांनी हिरिरीने भाग घेतला होता. त्यामध्ये अनेकांनी आपल्या प्राणांची आहूती दिली. सोलापूरात संक्रातीनिमित्त ग्रामदैवत श्री सिध्देश्वराची याञा भरते. काठ्यांचा सोहळा हा या याञेतील अपूर्व सोहळा मानला जातो. १२ जानेवारी हा याञेचा पहिला दिवस असून या दिवशी पहिली काठी धरण्याचा मान मल्लप्पा धनशेट्टी यांचा होता. हा दिवस हेरुनच १२ जानेवारी १९३१ या दिवशी ब्रिटिशांनी शहरातील जगन्नाथ शिंदे, मल्लप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन आणि किसन सारडा या चौघांना येरवडा तुरूंगात फासावर लटकाविले होते.

माणसाच्या जीवनात धार्मिक स्थळास अथवा देवालयास अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही देवालये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका बजावतात. सामाजिक

रूढी, परंपरा व वारसा जपून ठेवण्याचे कार्यही धार्मिक स्थळे करीत आहेत. धार्मिक स्थळांच्या माध्यमातून भजन, कीर्तन, प्रवचने आयोजित केली जातात. त्यामुळे वाङ्मयीन व कलात्मक मूल्यांचे जतन तर होतेच पण त्याचबरोबर आचार-विचारांचे व संस्कृतीचे अभिसरण घडून येते. अशा या धार्मिक स्थळांमध्ये प्रस्थापित धर्मस्थळे आणि लोकदैवते इत्यादींचा समावेश होतो. प्रस्थापित प्रमुख धर्माशी संबंध नसलेली पण विशिष्ट लोकसमुहाने श्रध्देने आपली मानलेली दैवते ही लोकदैवते होत. धार्मिक जीवनाला देव-देवतांच्या पूजे-अर्चेतून अभिव्यक्ति प्राप्त होते. माणसाना भक्ती करण्यासाठी प्रतिकाची आवश्यकता असते. या भक्तीच्या अविष्कारातून अनेक देवालयाची निर्मिती झाली. त्यामध्ये प्रत्येक देवाचे स्वरूप व पूजा पध्दती भिन्न भिन्न आहेत. प्रस्थापित धार्मिक स्थळांबरोबर शहरात असणाऱ्या पारंपारिक लोकदैवताचा अभ्यास आजपर्यंत कोणीही केला नाही. म्हणून "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रबंधातील पहिले प्रकरण हे सोलापूर शहराचा इतिहास असे असून या प्रकरणाचा अभ्यास केला असता पुढील घटक निदर्शनास आले. सोळा गावांचे एकत्रीकरण होऊन 'सोलापूर' हे नांव या शहरास मिळाले असावे असे वाटते. शहरातील कापड गिरण्यातून काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढल्याने हे शहर कामगारांचे शहर म्हणूनही ओळखले जाऊ लागले. कापड गिरण्या सुरू झाल्याने शहराच्या आर्थिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकास होण्यास मदत झाली. प्रकरणाच्या पुढील भागात शहराचे कसबा आणि जुने शहर, पेठा, वेशी, नगरपालिकेची स्थापना, ऐतिहासिक व धर्मिक स्थळांची निर्मिती, धर्मवार लोकसंख्या, भाषिक व सांसकृतिक ऐक्य व प्रभाव अशा विविध घटकांचा विचार करण्यात आला असून येथे मराठी कानडी आणि तेलगू असा त्रिवेणी सांस्कृतिक समन्वय साधलेला दिसून येतो. यामुळेच या शहराचे धर्मिक दृष्टीकोणातून एक वेगळेपण निर्माण झाल्याचे दिसून येते.

प्रकरण दोनमध्ये शहरात अस्तित्त्वात असणाऱ्या विविध धर्म आणि पंथ व उपपंथावर प्रकाश टाकण्यात आला असून या प्रकरणात धर्माच्या पारंपारिक व्याख्याबरोबर अलिकडील काळातील विचारवंतानी केलेल्या व्याख्या दिल्या आहेत. शहरातील धार्मिक जीवनात प्रामुख्याने हिंदू, इस्लाम, जैन, बौध्द, ख्रिश्चन, शीख व पारशी इत्यादी धर्मांचा समावेश आहे. धर्म या संकल्पनेत विधीयुक्त

क्रिया-कर्म, ईश्वरोपासना, परमेश्वर प्राप्तीची साधने, मार्ग किंवा पंथ, परंपरेने चालत आलेले आचार-विचार आणि कर्तव्य इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. हिंदू धर्मात अनेक पंथ व उपपंथ असून शहरात वारकरी, लिंगायत आणि दत्त सांप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून आले. या संप्रदायाप्रमाणेच नाथ आणि नागेश संप्रदायाचे अस्तित्त्व शहरात असले तरी त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला नाही.

या विविध पंथातील पुजा-अर्चा, परमेश्वराविषयी असलेल्या कल्पना व तत्त्वज्ञान इत्यादीबाबतीत बरेचशे साम्य दिसून येते. परंतु विविध उपपंथाचे आचार-विचार, बाह्य वेश व पंथ प्रसाराच्या पध्दती वेगवेगळ्या असल्या तरी या पंथ-उपपंथावर प्राचीन धर्म शास्त्रीय ग्रंथांचा व त्यातील विचारांचा प्रभाव दिसून येतो. इस्लाम धर्मात सिय्या व सुन्नी असे दोन उपपंथ अस्तित्त्वात आहेत. सुन्नी पंथीय दिवसातून पाच वेळा व सिय्या दिवसातून तीन वेळा नमाज अदा करतात. इस्लाममध्ये पाच अध्यात्मिक अधिष्ठाने ही माणसाच्या अध्यात्मिक प्रगतीचे पाच टप्पे मानले असून, पाच आचार तत्त्वांनाही महत्त्व आहे. शहरातील सिय्या आणि सुन्नी पंथी यांची आचार तत्त्वे, विचारप्रणाली यामध्ये थोड्या फार प्रमाणात फरक जाणवतो.

शहरातील जैन धर्मीय समाज हा श्वेतांबर आणि दिगंबर पंथामध्ये विभागलेला असून त्यांची धार्मिक स्थळे वेगवेगळी आहे. सण व उत्सव, पूजाविधी यामध्ये सारखेपणा आहे. जैन धर्मात संस्कारांना विशेष महत्त्व असून ते पर्युषणपर्व, चातुर्मास, चैत्र पोर्णिमा, वर्षप्रतिपदा, भाद्रपद उत्सव इत्यादी सण-उत्सव साजरे करतात. जैन समाजातील विविध स्त्री-पुरूषांनी धार्मिक साहित्याचे लिखाण करून शहराच्या धार्मिक इतिहासात भर घातली आहे. बौध्द, शिख आणि पारशी व ख्रिश्चन धर्मीय लोक ही शहरात आपापल्या धर्माप्रमाणे धर्माचरण करताना दिसून येतात.

तिसऱ्या प्रकरणात सोलापूर शहरातील विविध धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचा सविस्तर अभ्यास केला असता असे दिसून आले की, निरनिराळ्या राज्यातील धर्म व संस्कृतिनुसार धार्मिक स्थळे उभारलेली आढळतात. त्यामध्ये हिंदूं देवतांची मंदिरे, लोकदेवतांची मंदिरे, मुस्लिमांच्या मशिदी, दर्गे, ईदगाह, ख्रिश्चनांचे चर्च, जैन, बौद्ध, पारशी, शीख इत्यादिंची धार्मिकस्थळे दिसून येतात. याठिकाणी धार्मिकस्थळांची बांधकाम पद्धती, पुजा-अर्चा, देवतांची यात्रा, उत्सव, नित्यपूजा व

वार्षिक पूजा तसेच मूर्तीचे स्वरुप इत्यादी घटक विचारात घेतले आहेत. मंदिरातून व मठातून होणारे प्रवचन, किर्तन, व्याख्याने यासारख्या कार्यक्रमांतून वैचारिक अभिसरण घडून आल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन कालखंडात शहरात मुस्लिमांची कांही धार्मिक स्थळे व पेठांची निर्मिती झाली आहे. त्यामध्ये आदिलशाही काळातील बत्तीस खांबी मशिद, काळी मशिद, जामा मशिद, औरंगजेबकालीन पानगल ईदगाह, शहाजौहरवली दर्गा आणि बेगम पेठ व पाच्छा पेठ इत्यादींचा त्यात समावेश होतो. अशा या धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने मुस्लिम बांधव आपला नमाज अदा करतात व त्याचबरोबर बकरी ईद, रमजान ईद, पैगंबर जयंती इत्यादी सण व पीरांचे उरूस साजरे करतात.

उत्तरेतून दक्षिण भारताकडे जाताना अनेक जैन मुनी सोलापूर शहरास भेट देत. त्यांच्याबरोबर गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेशातून आलेले अनेक श्रावक सोलापूर शहरात स्थायिक झाले आहेत. जैन मुनींच्या उपासनेसाठी त्यांनी शहरात जैन मंदिराची स्थापना केली. जैनांची प्रसिध्द तेरा मंदिरे असून दहा दिगंबर पंथीय आणि तीन श्वेतांबर पंथीय आहेत. श्वेतांबर पंथीयांची नऊ वैयक्तिक मंदिरेही शहरात आहेत. या मंदिरातून महावीर जयंती, अक्षय तृतीया, चातुर्मास, दिवाळी, अष्टानिकपर्व, पर्यूषणपर्व इत्यादी जैन समाजाचे सण उत्सव साजरे केले जातात. यावेळी अनेक जैन मुनी व साधू मंदिरांना भेटी देऊन जैनाचे आचार, तत्त्वे यावर भाष्य करतात. दिगंबर पंथीय जैन मंदिरे मानस्तंभावरून ओळखली जातात.

शहरात बौध्द धर्मीयांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने अनेक बौध्द विहारांची निर्मिती झाली आहे. त्यामध्ये मिलींद नगर बौध्द विहार, अस्थी विहार, राजागृह बुध्द विहार, प्रबुध्द भारत बुध्द विहार, बुध्ददर्शन बुध्द विहार इत्यादी बुध्द विहारांचा त्यात समावेश होतो. या बौध्द विहारांमध्ये दररोज बुध्दवंदना केली जाते. बुध्द जयंतीला शहरातील बौध्द धर्मीय लोक या विहारांमध्ये दर्शनासाठी गर्दी करतात. या बौध्द विहारांमध्ये अनेक बौध्द भिख्खु प्रवचन देण्यासाठी बाहेरून येतात. शहर व जिल्ह्यात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी सुरूवातीच्या काळात पहिली ख्रिस्ती मंडळी ही मिशन स्थापन केली गेली. पुढील काळात प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक पंथीय लोकही शहरात आले. त्यांनीही आपापली चर्चेस निर्माण केली. मेथॉडिस्ट चर्च, प्रोटेस्टंट चर्च, अमेरिकन मराठी मिशन, पेंटीकॉस्टल चर्च इत्यादी चर्चच्या माध्यमातून ख्रिश्चनांनी आपल्या धर्माची तत्त्वे व

विचार प्रणाली शहरात रूजविण्याचा प्रयत्न केला. नाताळ, गुडफ्रायडे सारखे सण साजरे करतात. तसेच रविवारी वेगवेगळ्या चर्चमध्ये ख्रिश्चन बांधव एकत्रित येऊन येशुची प्रार्थना करतात.

पारशी धर्मीयांचे प्रार्थना स्थळ 'अग्यारी' हे शहराच्या लष्कर भागात असून त्याठिकाणी मोबेद हा पुजा-अर्चा व इतर धार्मिक विधी करतो. अग्यारीमध्ये अखंड दिवा तेवत ठेवलेला असतो. शीखांचे अस्तित्त्व शहरात असल्याने अलिकडच्या काळात त्यांनी गुरूद्वाराची निर्मिती केलेली आहे. धार्मिक स्थळांचा अभ्यास केला असता इतर धर्मीयांच्या धार्मिक स्थळांच्या तुलनेत शिख व पारशी समाजाची धार्मिक स्थळे कमी प्रमाणात दिसून येतात. ही धार्मिक स्थळे धर्म, संस्कृति, शिक्षण, पशू संवर्धन, इतयादि सारख्या समाजोपयोगी घटकांशी संबंधित असलेली दिसून येतात. धार्मिक स्थळांच्या उत्सवाच्या निमित्ताने संस्कृति, समन्वयाप्रमाणेच आर्थिक देवाण घेवाणही होताना आढळते.

धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव या चौथ्या प्रकरणात सोलापूर शहरातील धार्मिक जीवन, धर्मांतर प्रक्रिया, धार्मिक ऐक्य, धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने होणारे सण व उत्सव, धार्मिक कार्यात शहरातील महिलांचा सहभाग आणि धार्मिक स्थळांचा सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव व त्या अनुषंगाने घडून आलेले अभिसरण यावर प्रकाश टाकला आहे. आपापल्या धर्म संस्काराप्रमाणे प्रत्येक धर्मीयांना वर्तन करण्याची परवानगी असली तरीही इतर धर्मीयांच्या बाबतीत सहिष्णुवृत्ती असल्याचे दिसून आली. शहरातील हिंदु आणि मुस्लिम पंथीयांचे उत्सव दोन्ही धर्मातील लोक आनंदाने एकत्रितपणे साजरे करतात. धार्मिक चालीरिती, आचार-विचार, रूढी, परंपरा, सामाजिक संस्था, श्रध्दा, मूल्यनिष्ठा इत्यादींचा समावेश संस्कृतीच्या अध्यात्मिक अंगामध्ये होतो. अशा संस्कृतीच्या जडण-घडणींमध्ये धार्मिक स्थळांचा प्रभाव दिसून येतो. शहरातील मराठी, कानडी, तेलगु, उर्दू इत्यादी भाषा बोलणाऱ्या लोकांच्यावर वेगवेगळ्या धार्मिक स्थळांचा प्रभाव पडलेला असल्याने त्यांच्यात आचार-विचार, अन्न, वस्त्र, बोलीभाषा, सण-समारंभ, विविध संस्कृत्यांचा संगम इत्यादी घटकांमधून धार्मिक व सांस्कृतिक ऐक्य दिसून आले.

प्रस्तुत प्रकरणात विविध सण, उत्सवावर धार्मिक स्थळांचा कसा प्रभाव जाणवतो हे विचारात घेतले असून धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने महिलांच्या धार्मिक, सामाजिक आणि साहित्यिक कार्याचाही आढावा घेण्यात आला आहे. त्याचबरोबर धार्मिक स्थळांना मिळणारी अनुदाने, इनामे, देवस्थान कर, धर्मांदाय कर या अनुषंगांनी होणारी आर्थिक उलाढाल, त्यातून धार्मिक स्थळांची

होणारी देखभाल आणि तत्कालीन राज्यकर्त्यांचा धार्मिक स्थळांबाबतचा दृष्टीकोन, याचाही अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

निष्कर्ष

सोलापूर शहर हे मुंबई - मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून ते महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाच्या सीमेवर वसले असल्याने येथे मराठी, कानडी आणि तेलगु भाषिक लोक मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. मुस्लिम लोकही शहरात मध्ययुगीन काळापासून स्थायिक झालेले आहेत. अशा विविध धर्मीय आणि पंथीयांचा भरणा असलेल्या या शहरात अनेक महत्त्वाची धार्मिक व ऐतिहासिक ठिकाणे आहेत. सिध्देश्वर तलाव, भूईकोट किल्ला, कंबर तलाव, कुंभार कन्येचा वाडा, देशमुख वाडा, द्वारकानाथ कोटणीस स्मारक, इंद्रभुवन इत्यादींचा त्यात समावेश होतो. सिध्देश्वरांनी आपल्या हजारो भक्तांना बरोबर घेऊन एक मोठ्या तलावाची निर्मिती केली. त्यातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्याने शहराच्या वाढीस हे एक कारण कारणीभूत ठरले. मध्यकाळाच्या सुरूवातीस सिध्देश्वरांनी सर्वधर्मिय लोकांचे सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करून सर्वधर्म सहिष्णुवृत्तीचा पायडांच घातलेला होता असे दिसून येते.

शहराच्या सौंदर्यात भर घालणारी इंद्रभुवन ही इमारत आप्पासाहेब वारदांनी निर्माण केली. ही इमारत शहरातील वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. भारत आणि चीनमध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणारे डॉ. द्वारकानाथ कोटणीसांचे भव्य स्मारक शहराच्या पश्चिमेकडील भागात असून आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून अभ्यासकांच्या व पर्यटकांच्या दृष्टीने हे स्मारक महत्त्वाचे मानले जाते.

शहरातील धार्मिक जीवनात सर्व धर्मियांचे अस्तित्त्व असले तरी त्यांची उभारणी ही ईश्वराच्या संकल्पनेतूनच झाल्याचे दिसून येते. सामाजिक जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान असल्याने आणि धर्माचा आधारही ईश्वरच असल्याने प्रत्येक धर्मियांनी ईश्वराचे अस्तित्त्व मान्य केले आहे. हाच धर्म मानवी वर्तनाला मार्गदर्शन करतो आणि त्याग, प्रेम, ज्ञान, दान यासारख्या उच्च मूल्यांचेही रक्षण करतो. विविध पंथीयाचे उपासक व उपासना पध्दती वेगवेगळ्या असल्या तरी अंतिम ध्येय हे परमेश्वर प्राप्तीच असते, हे अभ्यासांती दिसून आले. शहरातील विविध धर्म व पंथीयांच्या धर्मसंघटना निर्माण होऊन त्याच्या आश्रयाने मठ, आश्रम, देवालये चालविली जाऊ

लागली आहेत. या धर्मसंघटना आपल्या धार्मिक स्थळांच्या माध्यमातून कलेचे, साहित्याचे, शिक्षणाचे, विचारांचे अभिसरण घडवून आणत आहेत.

माणसाच्या जीवनात देवालयाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणसाच्या मनात असणाऱ्या अलौकिक शक्तीचे मूर्त स्वरूप म्हणजे देव होय. अशा देवतेची पूजा-अर्चा करून मनुष्य आपले हित साधताना दिसून येतो. ईश्वरोपसनेसाठी माणसानी मंदिर, मशिद, गुरूद्वार, चर्च इत्यादी धर्म स्थळांची निर्मिती केली. मध्ययुगीन कालखंडातील धर्म स्थळांबरोबर अलिकडील काळात काही नवीन धार्मिक स्थळेही शहरात निर्माण झालेली आहेत. शहरात स्थापन झालेल्या व्यंकटेश व कालिका मंदिरांची वैशिष्ट्ये पाहिली असता मूळ ठिकाणी असणाऱ्या वैशिष्ट्यांची पुनरावृत्ती येथे आढळून येते.

शहरात हिंदु मंदिरात मंदिराची रचना, मूर्तीचे स्वरूप, उत्सव, नित्यनैमित्तिक पूजा या मूळ देवस्थान प्रमाणेच असल्याचे आढळून आले. मंदिर रचनेत गर्भगृह, सभा मंडप, अंतराळ व शिखर अशी पारंपारिक रचना पाहावयास मिळते. मंदिरातील मूर्ती या पाषाणाच्या, धातूच्या आणि वालुकामय स्वरूपातील असून लोकदेवताच्या मूर्ती या प्रतिकात्मक पाषाणाकृती आढळून आल्या आहेत. शिवलिंगे ही पितळ व चांदीच्या आवरणांनीयुक्ती असून त्यावर प्रस्थापित देवतेच्या चांदी किंवा पितळेचे मुखवटे बसविलेले आढळतात.

मुस्लिमांच्या धार्मिक स्थळांतून इस्लामी परंपरा जपण्याचा प्रयत्न होत आहे. मशिदी, दर्गे, ईदगाहमधून अदा होणाऱ्या नमाजाच्या माध्यमातून ईश्वराची उपासना केली जाते. यामध्ये इमामाची महत्त्वाची भूमिका असते. मशिदी या चौरसाकृती किंवा आयताकृती असून त्यामध्ये सहन, वजू करण्यासाठी पाण्याचा हौद, मेहराब, मिबंर, लिबान, रिबाक, उंच मिनार असे घटक आहेत. काही मशिदीतून धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरसा, मक्तब आणि तालिम आढळून आल्या. या धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने इस्लामी संस्कृतीचा वारसा शहरात टिकून राहिला आहे.

शहरात मराठी भाषा बोलणारे कानडी व तेलगु भाषा जाणतात, तर कानडी व तेलगु बोलणाऱ्यांना चांगल्या प्रकारे मराठी भाषा अवगत आहे. एवढेच नव्हे तर आचार, विचार, पोशाख, राहणीमान, चालीरिती, खाद्यपदार्थ इत्यादी घटकांचा परस्परांवरही प्रभाव जाणवतो. शहरात साजरे होणारे सण, उत्सव व देव-देवतांच्या यात्रा यामध्ये आंध्र व कर्नाटकमधील हजारो भाविक सामील होतात. सिध्देश्वराची गड्डा यात्रा, मार्कंडेय रथयात्रा, श्रावणातील माल्लिकार्जून व रेवणसिध्देश्वर

यात्रा व नवरात्रातील रूपाभवानीची यात्रा इत्यादी यात्रेच्या प्रसंगी अनेक भाविक सोलापूर शहरात येतात. शहरातील हजारो भक्त कर्नाटकातील गाणगापूर येथील दत्त मंदिरास व आंध्रातील तिरूपतीच्या बालाजीच्या दर्शनासाठी जातात. त्यातूनच महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील मराठी, कानडी व तेलगु संस्कृतीची देवाण-घेवाण होऊन संस्कृती समन्वय झाल्याचे दिसून आले.

शहरातील जैन मंदिरे ही स्थापत्यकलेच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची वाटतात. जुनी मंदिरे ही दगडी बांधकामातील असून अलिकडील काळात निर्माण झालेली जैन मंदिरे संगमरवरी बांधकामातील आहेत. फक्त दिगंबरपंथीय मंदिरासमोरच मानस्तंभ दिसून येतो. प्रत्येक जैन मंदिराच्या शिखरात एक छोटेसे मंदिर असून त्यात एका जिनमुर्तीची स्थापना केलेली आढळले.

बुध्द विहारात बुध्द मूर्ती असून तेथे बुध्दवंदना केली जाते तर चर्चसमधून दर रविवारी प्रभु येशूची सामुहिक प्रार्थना होते. अग्यारी व गुरूद्वारा ही धार्मिक स्थळे कमी प्रमाणात आढळून आली. पारशी धर्मीयांचे धर्मस्थळ अग्यारीमधून बाराही महिने दिप तेवत ठेवलेला असतो तर गुरूद्वारात दररोज 'गुरूग्रंथ साहेब' या ग्रंथाचे पठण होते.

शहरातील ही धार्मिक स्थळे धार्मिक व सांस्कृतिक वारसांची प्रतिके आहेत. काळाच्या ओघात भाषिक आणि प्रांतीय संस्कृती विकसित होत गेल्याने देव-देवतांच्या बाबतीत भिन्नता असूनही या देव-देवतांचा प्रभाव शहरावर टिकून राहिला आहे. शहरातील धार्मिक स्थळांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, लोक अनेक देव-देवतांची उपासना व भक्ती करतात. विविध देवतांच्या होणाऱ्या यात्रा, उत्सवात सहभागी होऊन एकात्मतेचे दर्शन घडवितात. प्राचीन काळापासून चालत आलेल्या चालीरिती, रूढी-परंपरा, व्रत्ते, सण, उत्सव, संस्कार पध्दती, लोकभ्रमातील दृष्टीबाधा, भूतबाधा, देवाचे सामर्थ्य, भविष्य विषयाची जिज्ञासा, विश्वास, शकून-अपशकून कल्पना, अवतारी पुरूषावरील श्रध्दा इत्यादी बाबी कमी अधिक प्रमाणात जशाच्या तशा सोलापूर शहरात प्रचलित असल्याचे दिसून आले.

२१ वे शतक हे विज्ञानाचे युग असल्याने माणसाचे बाह्य जीवन हे विज्ञानाभिमुख बनले असले तरी धार्मिक स्थळांमुळे अंतर्गत जीवनात परंपरागत धर्म भावनेचे प्रभावी संस्कार खोलवर रूजलेले आहेत. ही धार्मिक स्थळे पवित्र आणि मंगल असल्याने माणसाच्या मनात देवालयाबद्दल

आदर व सद्‌भावना निर्माण झाली आहे. ही देवालये मानवतावादाची केंद्रे मानल्याने देवालयांनी सांस्कृतिक, सामाजिक, नैतिक आणि आर्थिक क्षेत्रात केलेले कार्य महत्त्वाचे वाटते.

"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास" या संशोधन विषयामध्ये सर्वच पैलूंवर प्रकाश टाकणे शक्य नसल्याने अशा पैलूंवर संशोधन होणे आवश्यक आहे. उदा. महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवरील सामाजिक, सांसकृतिक व भषिक समन्वय, मराठी-कानडी-तेलगु अनुबंध, विविध कालखंडातील मंदिर स्थापत्य, निरनिराळ्या धार्मिक स्थळांचा स्वतंत्र अभ्यास, विविध धार्मिक स्थळांचा स्थापत्यकलेचा अभ्यास, शहरातील लोकदैवते, निरनिराळ्या रोगांच्या देवतांचा अभ्यास, धर्मवार धार्मिक स्थळांचा अभ्यास अशा स्वतंत्र विषयातून या विविध पैलूंवर प्रकाश टाकता येतो.

सूचना

१) शहरातील महत्त्वाच्या ऐतिहासिक व धार्मिक ठिकाणांची देखभाल व व्यवस्था चांगल्या स्वरूपात ठेवली गेली तर हा ऐतिहासिक ठेवा जपण्याबरोबरच सोलापूर शहराच्या पर्यटनास महत्त्व प्राप्त होऊन आर्थिक विकासास हातभार लागेल.

२) सिध्देश्वर तलाव, हिप्परगा तलाव व कंबर तलावाच्या बाजूने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करुन कायम स्वच्छता ठेवल्यास शहराचे सौंदर्य तर वाढेलच प्रदूषणही होणार नाही. त्याचबरोबर शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

३) धार्मिक स्थळांमधून होणा-या कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग वाढावा यासाठी प्रसारमध्यमांचा जाहिरातीसाठी वापर करावा.

४) धार्मिक स्थळांमधून चालविल्या जाणाऱ्या पाठशाळा व मदरसातून दर्जेदार शिक्षण दिले जावे.

५) धार्मिक स्थळांना मिळालेल्या देणग्यांची यादी, बांधकाम खर्च, मूर्तीची प्रतिष्ठापना, जीर्णोध्दार आणि रजिस्टर नंबर तेथील फलकावर लावण्यात यावा. जेणेकरून लोकांना धार्मिक स्थळांची सर्व माहिती मिळण्यास मदत होईल.

६) धार्मिक सण व उत्सवाच्या प्रसंगी लोकांकडून मिळालेल्या देणग्यांचा योग्य विनिमय करून तो समाज प्रबोधनासाठी खर्च करण्यात यावा.

७) धार्मिक स्थळांमध्ये स्वच्छता ठेवून त्यांचे पावित्र्य राखले जावे व स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा यासाठी देवालयामार्फत सेवक वर्ग नेमावा.

८) धार्मिक स्थळांची बांधकामे सरकारी परवाागीशिवाय करू नयेत. ही धार्मिक स्थळे गावाच्या बाहेर असावीत त्याठिकाणी वाहन तळाची व्यवस्था करावी.

९) सार्वजनिक ठिकाणी होणारे उत्सवाचे मंडप रस्त्याच्या मधोमध न घालता ते एका बाजूस रहदारीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी घालावेत.

१०) धार्मिक देव-देवतांच्या यात्रा, सण व उत्सवाच्या प्रसंगी मिरवणूकीवेळी रस्त्यावर अडथळा होईल असे वर्तन लोकांनी करू नये.

११) धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी महाराष्ट्र व परराज्यातून येणाऱ्या भक्तगणांना राहण्यासाठी शहरात यात्री निवासाची व्यवस्था करण्यात यावी यासाठी मंदिर संस्थेने व महानगरपालिके-ने योगदान द्यावे.

१२) धार्मिक स्थळांमध्ये विविध धर्मियांचे धार्मिक ग्रंथ ठेवून त्याची पारायणे करावीत.

१३) देवस्थानपंचकमिटीच्या माध्यमातून धार्मिक स्थळांच्याद्वारे सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करावेत. जेणेकरून गरीब लोकांना याचा लाभ घेता येईल.

१४) यात्रेकरू व गोरगरीबांसाठी धार्मिक स्थळांच्या माध्यमातून अन्नछत्र चालवावीत.

संदर्भ ग्रंथ सूची

❖ प्राथमिक साधने:

अ) अप्रकाशित

१) मुंबई पुराभिलेखागार

I. Administration Report of Solapur Municipality Files

१. 1919-20 File No. N - 45328/1

२. 1920-21 File No. N - 45910

३. 1918-19, File No. N-44276/1

II. Census Report

१. Census of India, 1941, Vol. III, Bombay File No. R-14416/1.

२. Census Handbook, 1951, Bombay, Solapur Dist. File No. R-20231.

३. Census of India, 1961, Dist. Census Handbook, Solapur, File No. R40016.

४. Census of India, 1911,Vol. II, Bombay File No. R-3177.

III. Generel Dept. Files

१. File No. 25, 1860.

२. File No. 17, 1851.

३. File No. R. 638

४. Vol. 93, 1892

IV. Land Alieanetion Files

१. Land Revenue Administration Report of Bombay Presidency, 1926-1927, File No. R-3106.

२. Registered of Cash Allowances in the Alienated Village Solapur Dist. 1st February, File No. R-9698.

V. P.W.D. Files

१. File No. २८७७, १९२२-२३

२. File No. २.

VI. Religion Files

१. File No. 31775.

VII. Revenue Department Files

१. File No. S - 36/16 - 1922

२. vol. III, 1876.

३. vol. IV 1896.

2) पुणे पुराभिलेखागार

१. पेशवा दप्तर, पुणे, स. नि. का., पत्र क्रमांक 02983.

२. पेशवा दप्तर, पुणे, स. नि. का, पत्र क्रमांक 0193.

ब) मुलाखती (सोलापूर शहरातील देवस्थान समितीचे अध्यक्ष व पुजारी)

१. सुरेंद्रनाथ महाराज, (मठाधिपती), इंचगिरी मठ नेहरू नगर, (५/५/२०११).

२. कुंभार आण्णप्पा गेनप्पा, (मुख्य कार्यकारी अधिकारी), श्री बृहन्मठ होटगी संस्था सोलापूर, (५/५/२०११).

३. वनकुद्रे सुभाष, (विश्वस्त), चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, (१८/६/२०११).

४. उपाध्याय अरविंद बाहुबली, (पंडित), माणिकस्वामी महाराज दिगंबर जैन मंदिर, (१४/८/२०११).

५. पवार बंडोबा, (पुजारी), श्री रुपाभवानी देवी मंदिर, (७/६/२०१२).

६. बंदगूळ रविंद्र, (अध्यक्ष), श्री नगरेश्वर मंदिर देवस्थान, (७/६/२०१२).

७. कोंतम बाबुराव दत्तात्रय, (अध्यक्ष), श्री चौडेश्वरी देवी मंदिर, (८/६/२०१२).

८. जिंदम सिद्राम, (सदस्य), श्री मार्कंडेय मंदिर, (८/६/२०१२).

९. बटगेरी दत्तात्रय विठोबा, (सदस्य), श्री निलकंठेश्वर मंदिर देवस्थान, (८/६/२०१२).

१०. कोंडा गोविंदराव बाळकृष्ण, (अध्यक्ष), व्यंकटेश देवस्थान समिती, (९/६/२०१२).

११. धुळम दिनानाथ विठ्ठल, (अध्यक्ष), निलकंठेश्वर देवस्थान, (९/६/२०१२).

१२. चव्हाण प्रकाश शंकर,(पुजारी),काळभैरवनाथ मंदिर, बलिदान चौक, (११/६/२०१२).

१३. माळगे शकुंतला, खंडोबा मंदिर, (पुजारी), पूर्व विभाग, साखर पेठ, (११/६/२०१२).

१४. पतंगे धनंजय किसन, (पुजारी), मश्रुम गणपती मंदिर, तळे हिप्परगा, (१६/६/२०१२).

१५. रायाचूरक रामदास, (पुजारी), बनशंकरी चौडेश्वरी देवी मंदिर, (१६/६/२०१२).

१६. जगताप सौदागर, (पुजारी), गवळी वस्ती विठ्ठल मंदिर, (२५/६/२०१२).

१७. धनशेट्टी मल्लप्पा बसप्पा, (अध्यक्ष), शंकरलिंग देवस्थान, (१२/७/२००१२).

१८. आळंद फुलचंद पार्श्वनाथ, (पुजारी), जैन मंदिर, नेहरू नगर, (१७/७/१२).

१९. दंडवते गोविंदराज, (मठाधिपती), दंडवते गुहा मठ, (१८/७/२०१२).

२०. जोशी महादेव पद्माकर, (पुजारी), सद्गुरू गोविंदबुवा मठ, (१८/७/२०१२).

२१. हिरेहब्बू राजशेखर, (पुजारी), स्वन्नलिगे सिद्धेश्वर मंदिर, (२२/७/२०१२).

२२. तेली सिद्रमाप्पा, (पुजारी), जगदंबा मंदिर, (२२/७/२०१२).

२३. महामूनी रमेश, (अध्यक्ष), कालिका मंदिर, (२५/७/२०१२).

२४. शिंगाडे मल्लिनाथ रेवणसिध्देश्वर, (पुजारी), मल्लिकार्जून मंदिर, (५/८/२०१२).

२५. जोशी किरण, (पुजारी), जुने विठ्ठल मंदिर, (५/८/२०१२).

२६. एडके धनराज, (अध्यक्ष), स्वकुळ साळी विठ्ठल मंदिर समिती, (६/८/२०१२).

२७. कुलकर्णी सतीश, (पुजारी), चौपाड विठ्ठल मंदिर, (६/८/२०१२).

२८. इंगळे पोपट रावसाहेब, (पुजारी), क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर, (७/८/२०१२).

२९. अळ्ळी नागनाथ, (अध्यक्ष), विठ्ठल गणेश मंदिर समिती, (७/८/२०१२).

३०. चौहान संजयसिंहप्रतापसिंह,(अध्यक्ष),बालाजी मंदिर देवस्थान,चौपाड, (९/८/२०१२).

३१. वासुदेव धोंडोपंत पुजारी, (पुजारी), जुने श्रीराम मंदिर, (९/८/२०१२).

३२. शर्मा संतोष भगवानदास, (पंडित), श्री आदेश्वर जैन श्वेतांबर मूर्ती पुजक संघ सम्राट चौक, सोलापूर, (१४/८/२०१२).

३३. जोशी मधुकर अनंत, (पुजारी), श्रीराम मंदिर, दक्षिण सदर बझार, (१४/८/२०१२).

३४. जोशी बाळकृष्ण नारायण, (पुजारी), दत्त मंदिर, दक्षिण सदर बझार, (५/९/२०१२).

३५. हिरेमठ मल्लिनाथ रूद्रय्या, (पुजारी), दत्त मंदिर, मड्डी वस्ती, (५/९/२०१२).

३६. गणाचार्य कल्लय्या पंचय्या, (पुजारी), शनि मंदिर रेल्वेस्टेशन, (२३/१०/२०१२).

३७. बुबणे हर्षवर्धन, (अध्यक्ष), बुबणे जैन मंदिर समिती, (२९/१०/२०१२).

३८. शर्मा भगवानदास, (पंडित), शंकेश्वर पार्श्वनाथ मंदिर, (२९/१०/२०१२).

३९. पुजारी भरत, (पंडित), श्री लोद्रवा पार्श्वनाथ श्वेतांबर जैन मंदिर, (३०/१०/२०१२).

४०. गांधी सुधीर रमणिकलाल, (मंदिराचे मालक), श्री वासुपुज्य श्वेतांबर जैन मंदिर, सिव्हील लाईन, गांधी नगर, (३०/१०/२०१२).

४१. ह. भ. प. इंगळे सुधाकर महाराज, (अध्यक्ष), अखिल भारतीय वारकरी मंडळ सोलापूर, (२५/११/२०१२)

४२. सोमाणी लक्ष्मीनारायण रघुनाथराव, (अध्यक्ष), लक्ष्मीनारायण मंदिर समिती, (२५/११/२०१२).

४३. दायमा शशी, (पुजारी), द्वारकाधिश मंदिर, (२५/११/२०१२).

४४. मल्लेलवार शकुंतला पापाराव, (पुजारी), गणपती मंदिर मोदीखाना, (२८/११/२०१२).

४५. कटारे किशोर, (अध्यक्ष), हिंगुलांबिका देवी मंदिर समिती, (२८/११/२०१२).

४६. चंदनशिवे प्रल्हाद जगन्नाथ, (भिख्खु), बुध्दाचे दानमय बुध्द विहार, (३०/११/२०१२).

४७. वातवाणी सरदार रमेशसिंगजी पामनदास, (गुरूद्वार व्यवस्थापक), सोलापूर, (३०/११/२०१२).

४८. मुजावर महमंद अब्दुलगफूर, (मुजावर), तीन दर्गे, जिल्हा परिषद परिसर, सोलापूर, (१२/२/२०१३)

४९. काझी अजमल अली, सोलापूर शहर काझी, (१२/२/२०१३)

५०. मुम्ती अब्दुल अहम्मीद, (इमाम), जामा मशीद (१५/२/२०१३),

५१. मकानदार महमंद इसाक, (इमाम), इकरार अली मशीद, (१५/२/२०१३)

५२. नालवार इसमाईल, (मुतावली), गौसीया मशीद, (१५/२/२०१३)

५३. वाघमारे भानुदास, (पोतराज), मरिआई मंदिर, मरिआई चौक, (६/४/२०१३)

५४. कसबे सरुबाई दगडू, (पुजारी), खोकलेआई मंदिर, (६/४/२०१३)

५५. कल्याणी अपर्णा, महिला पुरोहित, सोलापूर, (१०/५/२०१३)

ब) प्रकाशित दुय्यम साधने

१. मराठी

१. अकलुजकर लता प्रमोद : किल्ले सोलापूर, संकल्प प्रकाशन, सोलापूर, २०१३.

२. अघोर भगवंतराव वासुदेव : पुण्यात्मा पांडुरंग, सौभाग्यलक्ष्मी प्रकाशन, सोलापूर, १९५५.

३. आपटे व ओतुरकर : महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, पुणे, १९६३.

४. आठवले रा. ब. : जगातील विद्यमान धर्म, महाराष्ट्र सोसायटी यलिशब्रिश अहमदाबाद, (वर्ष उपलब्ध नाही).

५. इराबत्ती आशण्णा : माझ्या आयुष्यातील टिपणे (प्रवास वर्णन व श्री मार्कंडेय चरित्रासह), प्रथमावृत्ती , कोटा प्रकाशन, सोलापूर, १९७१.

६. इराबत्ती आशण्णा : ज्ञानसागरातील १०१ बिंदू, प्रथमावृत्ती, पाक्षिक पद्मसाळी प्रकाशन, नांदेड, १९८२.

७. उदगिरी विनायक : सोलापूर गाईड, चौडेश्वरी प्रकाशन, सोलापूर (वर्ष उपलब्ध नाही).

८. उदगिरी व फलमारी (संपा.) : श्री चौडेश्वरी देवी पाटलू दंडकमूलू, श्री चौडेश्वरी प्रकाशन, सोलापूर, १९७४.

९. ओक जनार्दन : राणा शेगावाईचा, युनिटी प्रकाशन, पुणे, २००६.

१०. अंदुरकर व्यं. गो. : सोलापूरची संग्रामदेवता, रविंद्र प्रकाशन, सोलापूर, १९७५.

११. अंदुरकर व्यं. गो. : सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे, साहित्य प्रकाशन, सोलापूर, १९५८.

१२. अंदुरकर व्यं. गो. : चणे खावे लोखंडाचे, लोकसेवा सहकारी मुद्रणालय, सोलापूर, १९८५.

१३. आंबेडकर बाबासाहेब : तळवटकर घनश्याम, (अनु.) भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, सद्धम्मादित्य प्रकाशन, केळझर, ता. सेलू, जि. वर्धा, २००६.

१४. आंबेडकर भिमराव रामजी, : पाटील व्ही. टी., (अनु.) बुध्द आणि त्यांचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, नागपूर, २०१३.

१५. आंबेडकर बाबासाहेब : हरी नरके (संपा.), बहिष्कृत भारत आणि मुकनायक, द्वितीयावृत्ती, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८.

१६. कदम स. भा., (संपा.) : श्री संत चोखामेळा चरित्र व अभंग, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९६९.

१७. कदम विकास : पंढरपूरातील सांप्रदायिक मठांचे स्वरूप, परंपरा व कार्य, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, २०११.

१८. कर्वे इरावती : संस्कृती, द्वितीय आवृत्ती, देशमुख आणि कंपनी,पुणे, २००६

१९. कर्वे इरावती : मराठी लोकांची संस्कृती, पुणे, १९६२.

२०. कळके जयंत : प्राचीन मराठी साहित्यातील समाजजीवन, दर्या प्रकाशन, पुणे, २००९.

२१. काणे पा. वा. : धर्मशास्त्राचा इतिहास, उत्तरार्ध, भट यशवंत आबाजी (अनु.), महाराष्ट राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८०.

२२. काळे-पाटसकर भाग्यश्री : महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.

२३. किर धनंजय व माळसे स. ग. : फडके य. दि. (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६.

२४. कुंदूर तुकाराम भवानी : परमार्थ प्रदिप, इंचगिरी सांप्रदाय, कुंदूर बंधू, पुणे. (वर्ष उपलब्ध नाही).

२५. कुलकर्णी व. दि. : लिळाचरित्र (एक अभ्यास), द्वितीय आवृत्ती व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७८.

२६. कुलकर्णी जी. एम. व शेटे व्ही. टी. : महाराष्ट्राची सत्त्वधारा, पुणे, १९८१.

२७. कुलकर्णी वि. य. : भारतीय कला, उद्‌गम आणि विकास, सुयोग प्रकाशन, पुणे, १९९६.

२८. कुलकर्णी पी. के. : भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २००१.

२९. कुलकर्णी गणेश पंढरीनाथ : सोलापूर नगरपालिका शतसंवत्सरिका ग्रंथ, सोलापूर नगरपालिका, सोलापूर, १९५३.

३०. कुलकर्णी अ. रा. : महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८.

३१. कुबेर वा. ना. : भारताचा स्वातंत्र्यलढा : १९३०-१९३४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

३२. कुंभार आनंद : संशोधन तरंग, नवभरत प्रकाशन संस्था, मुंबई, १९८८.

३३. कुंजविहारी (कवी) : श्री संत कवि शुभराय १७५० ते १८२०, गीता गुरूनाथ प्रकाशन, ओनामा मंदिर, सोलापूर, १९६३.

३४. कोसंदर प. रे. : संस्था आणि संस्थापक (५० वर्षापूर्वीचे व्यापारी), क्षत्रिय प्रकाशन, सोलापूर. (वर्ष उपलब्ध नाही).

३५. कृष्णदेव : वैद्य गो. वि., (अनु.), उत्तर भारतातील मंदिरे, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, १९७०.

३६. खरे ग. ह. : श्री विठ्ठल आणि पंढरपूर, पुणे, १९६३.

३७. खरे ग. ह. : महापाष्ट्राची चार दैवते, पुणे, १९५८.

३८. खरे ग. ह., (संपा.) : ऐतिहासिक फारशी साहित्य, खंड- ५,भाग-२ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संशोधन मंडळ, मुंबई.

३९. खेर संजिवनी : धर्म, श्रीविद्या प्रकाशन, पुणे (वर्ष उपलब्ध नाही).

४०. गवळी टी. ए., हिवराळे सुखराम, इ. (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, (प्रका.), नंदिनी गवळी, सागरमाळ, कोल्हापूर, १९९१.

४१. गोसावी र. रा. : पाचभक्ती सांप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, तृतीय आवृत्ती, पुणे, २००८.

४२. गोडसे रा. अ., (अनु.) : राघवेंद्र स्वामी चरित्रामृत आणि मंत्रालय, आदोनी, (प्रकाशक व वर्ष उपलब्ध नाही).

४३. घुगरे सुर्यकांत : वीरशैव व इतर धर्म आणि समाज, साधना बुक स्टॉल, द्वितीयावृत्ती, गडहिंग्लज, २०००.

४४. घैसास भा. अ. : किर्तनकला, मनोरमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मुंबई, २००३.

४५. चव्हाण चंद्रकांत : सोलापूरची गिरणी कामगार चळवळ (१९००-१९६५), प्रथमावृत्ती, आचार्य जंबुसागर ग्रंथमाला, सोलापूर, २०१३.

४६. चिटणीस के. एन. : मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग-२, समाज व संस्कृती, द्वितीयावृत्ती , पुणे, १९८७.

४७. जक्कल बाबुराव, (संपा.) : सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६.

४८. जक्कल वि. न. : सोलापूर शहराचा इतिहास, प्रथमावृत्ती, सोलापूर समाचार सोलापूर, १९२८.

४९. जक्कल बाबुराव, (संपा.) : श्री शुभराय महाराजांचे चरित्र, सोलापूर समाचार, १९३०.

५०. जावळे सो. सं., (संपा.) : सोलापूर शहर व परिसराचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, २०१२.

५१. जोशी प्र. न. : लिंगपुराण, प्रसाद प्रकाशन, पुणे, १८९२.

५२. जोशी प्र. न. : अग्निापुराण, प्रसाद प्रकाशन, पुणे, १८९२.

५३. जोशी प्र. न. : नाथ संप्रदाय, राजीव प्रकाशन, ठाणे, १९७७.

५४. जोशी महादेव शास्त्री : भारताची मूर्तीकला, १९८०.

५५. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : हिंदु धर्म समिक्षा, तिसरी आवृत्ती आणि सर्वधर्म समिक्षा, पहिली आवृत्ती, प्रज्ञापाठशाळा मंडळ, वाई, १९८४.

५६. जोशी ज. वा. : धर्माचे तत्त्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.

५७. जोशी नी. पू. : भारतीय मूर्तीशास्त्र, कल्पना प्रिंटिग प्रेंस, नागपूर, १९७९.

५८. डहाके वसंत आबाजी : मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, २००५.

५९. डिस्कळकर डी. बी. : महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, पुणे, १९६४.

६०. डोळके ग. म. : दप्तरी यांची धर्ममीमांसा, प्रथम आवृत्ती, १९६९.

६१. ढेरे रा. चि. : खंडोबा, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६१.

६२. ढेरे रा. चि. : दत्त सांप्रदायाचा इतिहास, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९६.

६३. ढेरे रा. चि. : श्री गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा, ओरा अँड कंपनी, मुंबई, १९५९.

६४. ढेरे रा. चि. : श्री विठ्ठल एक महासमन्वय, श्रीविद्या प्रकाशन पुणे, १९८४.

६५. ढेरे रा. चि. : लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९६.

६६. ढेरे रा. चि. : नाथपंथ परिचय, ओरा आणि कंपनी, मुंबई, १९५९.

६७. ढेरे रा. चि. : लोकसंस्कृतीची क्षितिजे, पुणे, १९७१.

६८. ढेरे रा. चि. : लोकदैवताचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००७.

६९. ढेरे रा. चि. : लज्जागौरी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००४.

७०. तर्टे त्रिं. कृ., (संपा.) : सोलापूरचे स्वातंत्र्य शाहीर कवि कुंजविहारी व्यक्ती आणि वाड.मय परिचय, सत्कार समिती, सोलापूर, १९५६.

७१. थावरे द. का. : जीवनगंगा, लक्ष्मण महाराज धोत्रे, वडार समाज संस्था, सोलापूर, २०११.

७२. दप्तरी के. ल. : धर्मरहस्य, दुसरी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९६५.

७३. दांडेकर, श. वा. : वारकरी सांप्रदायाचा इतिहास, १९२७.

७४. देखणे रामचंद्र : वारी स्वरूप आणि परंपरा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००७.

७५. देव सु. बा. : इथे संताचिये नगरी, वसुधा प्रकाशन, नागपूर, १९८८.

७६. देशमुख कृ. गो., (प्रका.) : प्रभाकर महाराज चरित्र ग्रंथ, प्रभाकर मंदिर, सोलापूर, १९७०.

७७. देशमुख गोपाळ : सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, प्रथमावृत्ती, रेवू प्रकाशन, पंढरपूर, २००९.

७८. नरके हरी, (संपा.) : महात्मा फुले : साहित्य आणि चळवळी महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६.

७९. नाईक म. भि. : धन्य ते संसारी, सोलापूर, (प्रकाशक व वर्ष उपलब्ध नाही).

८०. निकम गौतम : संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगाव, २०१०.

८१. नेमाडे भालचंद्र : वारकरी चळवळीची अविष्कार शैली, औरंगाबाद, १९९०.

८२. पगडी सेतु माधवराव (संपा.) : मोगल आणि मराठे, ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३.

८३. पगडी सेतु माधवराव : महाराष्ट्र - कर्नाटकातील सुवर्णकाळ, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, १९९०.

८४. पवार जयसिंगराव (संपा.) : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २००७.

८५. पवार जयसिंगराव (संपा.) : श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, राजर्षी शाहू साहित्यमाला : खंड - १, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८.

८६. पसारकर शे. दे. (संपा.) : श्री सिध्देरामेश्वरांची वचने, खंड - १, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, सोलापूर, २०१०.

८७. पाटोळे अरविंद : श्री तुळजाभवानी महात्म्य, पुणे, २००५.

८८. पानसे मु. ग. : यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६३.

८९. पाठक प्रभाकर : राष्ट्र धर्माचे प्रणेते, प्रथमावृत्ती, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २००७.

९०. पुंडे नि. त्र्य. : मार्शल लॉ आणि सोलापूरचे चार हुतात्मे, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००९.

९१. फडके य. दि. : सोलापूर मार्शल लॉचा दैदिप्यमान इतिहास, प्रकाशक, रविंद्र मोकाशी, सोलापूर, २००६.

९२. फडके जयंत शामराव (संकलन) : आपली संस्कती : सण, उत्सव व प्रतिके, प्रथमावृत्ती, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २०११.

९३. फडकुले निर्मलकुमार : साहित्यातील सौंदर्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५.

९४. बहिरट भालेराव : वारकरी सांप्रदायाचा उगम व विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९८८.

९५. बामणगांवकर, ना. रा : पुण्यश्लोक वारद, प्रथमावृत्ती, सोलापूर, १९४९.

९६. बेंद्रे वा. सी. (संपा.) : महाराष्ट्र इतिहासाची साधने, विभाग-१, पहिली आवृत्ती, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या इतिहास संशोधन ग्रंथमाला क्रमांक १०, मुंबई, १९६७.

९७. भवाळकर तारा : संस्कृतीची शोधयात्रा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५.

९८. भवाळकर तारा : लोकपरंपरा आणि स्त्रि प्रतिभा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००८.

९९. भगत रा. तु. : शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, १९९९.

१००. भगत रा. तु., (संपा.) : संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, चेतन प्रकाशन, कोल्हापूर, २००४.

१०१. भागवत दुर्गा : धर्म आणि लोकसाहित्य, पाप्यूलर प्रकाशन, मुंबई,, १९७५.

१०२. भागवत दुर्गा : लोकसाहित्याची रूपरेखा, पाप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९५६.

१०३. भिडे, गजानन (संपा.) : शोधनिबंध संग्रह, दयानंद महाविद्यालय, सोलापूर, १९८६.

१०४. भूर्के श्याम : मुक्काम पोस्ट सोलापूर, प्रथमावृत्ती, महेशजी कोठे (प्रका.), सोलापूर, १९९४.

१०५. मदनी मुस्ताक (संपा.) : इस्लाम आणि पैगंबर महमद, उसूल पब्लिकेशन, पुणे, २००८.

१०६. मडकी शशीकला (अनु.) : लिंगायत धर्म दर्पन, विश्वकल्याण मिशन, बेंगलोर, २०००.

१०७. मडकी शशीकला : शिवयोगी सिध्दराम चरित्रामृत, राजशेखर मडकी (प्रका.), सोलापूर, १९९९.

१०८. माटे श्री. म. : संत पंत व तंत, प्रथमावृत्ती, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९५७.

१०९. माटे म. श्री. : प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५.

११०. मादास स. वि. : श्रीमद् वीरशैव कुरूहिनशेट्टी वंशचरित्र महाराष्ट्र मुद्रणालय, साखरपेठ, सोलापूर, १९९९.

१११. माने राजा, (संपा.) : सबकुछ सोलापूर, लोकमत मीडिया प्रा. लि. सोलापूर, २०१४.

११२. मांडे प्रभाकर : लोकसाहित्याची स्वरूप, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८९.

११३. मेहता बाळूभाई : ख्रिस्त चरित्र, भारत प्रकाशन, धुळे, १९४४.

११४. मोहोळकर, द. शं. : संत कवि श्री शुभराय चरित्र दर्शन, श्री शुभराय मठ, सोलापूर, २००१.

११५. मोहोळकर, वि. शं. (संपा.) : श्री वडवळसिध्द नागेश चरित्र, नागेश, प्रकाशन, सोलापूर, १९९४.

११६. येळेगांवकर श्रीकांत : सोलापूरचे स्वातंत्र्य लढ्यातील दिपस्तंभ, प्रथमावृत्ती, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २०११.

११७. रामराव आर. एस. (अनु.) : सिध्दराम चरित्र, कन्नड साहित्य परिषद बेंगलोर, १९७७.

११८. रोडे सोमनाथ : सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर, विद्याभरती प्रकाशन, लातूर, २०११.

११९. लिगाडे जयदेवी : श्री सिध्दरामाची त्रिविधी, कन्नडकोटी प्रकाशन सोलापूर, १९५८.

१२०. वर्तक प. वि. : उपनिषदाचे विज्ञाननिष्ठ निरूपण्, वर्तकाश्रम, पुणे,भाग - १, तृतीयावृत्ती, १९९५, भाग - २, तृतीयावृत्ती, १९९७.

१२१. शहा प्रेमचंद देवचंद : जैन धर्म (उपलब्ध नाही).

१२२. शहा आणि वागदरीकर : जैन संस्कृती (उपलब्ध नाही).

१२३. शहा सुमतीबाई : माझी जीवनगाथा, श्राविका संस्था, सोलापूर, १९८९.

१२४. शहा विद्युलता हिराचंद, (संपा.) : पद्मश्री सुमतीबाई शहा गौरव ग्रंथ, श्राविका संस्थानगर, (प्रका.), सोलापूर, १९८७ .

१२५. शर्मा रामशरण : डॉ. परांजपे बिंदा, (अनु.), प्राचीन भारताचा परिचय, ओरिएंट ब्लॅक स्वॅन, पाटणा, २००४.

१२६. शाबादे रेवण : करूणाघन महात्मा बसवेश्वर, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००९.

१२७. शास्त्री वर्धमान पार्श्वनाथ : श्री आदिनाथ जैन मंदिर, श्री आदिनाथ जैन मंदिर समिती, सोलापूर, १९४९.

१२८. शिंदे महर्षी विठ्ठल रामजी : धर्म जीवन व तत्त्वज्ञान, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७९.

१२९. शिरगांवकर वर्षा : पेशव्यांचे विलासी जीवन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००१.

१३०. शितोळे हरिभाऊ अंबादास : सोलापूर दर्शन, साखर पेठ, सोलापूर, १९८०.

१३१. शुभराय महाराज मठ, बुवा परिवार, (प्रका.) : श्री सद्गुरू शुभराय महाराज चरित्र, सोलापूर, २००१.

१३२. शेणोलीकर व देशपांडे : महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, के. सागर प्रकाशन, पुणे, २००६.

१३३. शेंडे एस. आर. : मराठेकालीन धार्मिक जीवन, प्रथमावृत्ती, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, २०१२.

१३४. सरकार जदुनाथ : कुंटे, भ. ग., (अनु.), औरंगजेबाचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८.

१३५. सरदेसाई, गो. स. : मुसलमानी रियासत, खंड-१, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९३.

१३६. सरदार, गं. बा. : संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, चौथी आवृत्ती, पुणे, १९५२.

१३७. सरदार, गं. बा. : संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, चौथी आवृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, मुंबई, १९८२.

१३८. संगवे विलास : जैन कम्युनिटी, द्वितीय आवृत्ती, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८०.

१३९. सहस्त्रबुध्दे पु. ग. : महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९४.

१४०. साने गीता : भारतीय स्त्रीजवन, मौज प्रकाशन, मुंबई, १९९७.

१४१. स्वामी विवेकानंद : देशपांडे रं. रा., (अनु.), भारताची अध्यात्मिक विचारधारा, सहावी आवृत्ती, रामकृष्ण आश्रम धंतोळी, २००६.

१४२. स्वामी विवेकानंद : हिंदु धर्म, रामकृष्ण मठ, नागपूर, २००२.

१४३. सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी (संपा.) : श्री सिध्देश्वर महात्म्य, सोलापूर, २००९.

१४४. सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, (संपा.) : वीरदासोही नालतवाड महाशिवशरण विरेश्वर महाराज यांचे चरित्र, सोलापूर, २००७.

- **English**

1. Dasgupta S. N. : History of Indian Philosophy, 1955.
2. Kakade R. G. : A Socio-Economic Survey of Weaving Communities in Solapur City, Pune, 1939.
3. Karndikar R. G. : Biogrpahy of Saint Damaji, Dimaji Institute, Mangalwedha, 3rd Edition, 1989.
4. Rananaware D. D. : History of Solapur (1852-1952), Abhay Publication, Akluj, 2000.
5. Sharma D. S. : Esence of Hinduism, Bhartiya Vidhyabhavan, Bombay, 1971.

हिंदी

१. श्रीवास्तव के. सी. : प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, प्रथमावृत्ती, यूनाइटेड बुक डिपो, इलाहाबाद, १९९१.

२. झा द्विजेंद्र नारायण एवं श्रीमाली कृष्ण मोहन : प्राचीन भारत का इतिहास, प्रथम संस्करण, १९८१, नविन संस्करण, १९९८, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

३. नंदी रमेंद्रनाथ : प्राचीन भारत में धर्म के सामाजीक आधार (अनु.), नरेंद्र व्यास, ग्रंथशिल्पी, नवी दिल्ली, २००८.

❖ अप्रकाशित प्रबंध (पीएच. डी., एम. फिल.)

१. कुलकर्णी स्वराली, सोलापूर जिल्ह्यातील मध्ययुगीन ऐतिहासिक स्मारकांचा टिकात्मक अभ्यास (१२०६-१८०८), अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, सोलापूर विद्यापीठ, २००८.

२. देशमुख आप्पासाहेब, लघुशोधप्रबंध , (एम. फिल.), सोलापूर जिल्ह्यातील लिंगायत समाजाच्या संघटना, पुणे विद्यापीठ, पुणे, ऑगस्ट २००६.

३. शेंडे, एस. आर., मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८९,

❖ गॅझिटिअर, नियतकालिके, स्मरणिका ग्रंथ, अहवाल, कोश वाङ्मय व इतर

१) गव्हर्नमेंट गॅझिटिअर

१. Gazetteer of Bombay Presidency Solapur District, Vol. XX, Pune, 1997.

२. Gazetteer of India Maharashtra State Solapur District, Bombay, 1977.

३. महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर, इतिहास : प्राचीन काळ, खंड-१, महाराष्ट्र शासन, मुंबई (संपा.), अरूण पाठक, द्वितीय आवृत्ती, २०१०.

४. महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर, महाराष्ट्र : इतिहास : प्राचीन काळ, खंड-१, भाग-२, स्थापत्य व कला, महाराष्ट्र शासन, मुंबई (संपा.), अरूण पाठक, द्वितीय आवृत्ती, २००९.

२) नियतकालिके

१. संशोधक, राजवाडे संशोधन मंडळ धुळे, जून २००४, मार्च २००६.

२. ज्ञानप्रसाद, कोल्हापूर, ऑगस्ट १९७८, डिसेंबर १९८१, मे १९८३.

३. बसवेश्वर, मासिक, सोलापूर, निर्मला लिगाडे, (कन्नड/मराठी), डिसेंबर, १९८१.

३) स्मरणिका ग्रंथ आणि अहवाल

१. सोलापूर मुनसिपालिटी नियम व पोटकानून (मराठी भाषांतर), अहवाल, सोलापूर म्युन्सिपालिटी प्रकाशन, सोलापूर, १९४२.

२. स्मृतीची चाळता पाने, स्मरणिका, सोलापूर महानगरपालिका, १९९६.

३. सोलापूर दंगल चौकशी व कृती अहवाल, सोलापूर, संजय सेठी, अप्पर आयुक्त पुणे विभाग पुणे, महाराष्ट्र शासन, २००५-२००६.

४. श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर, क्षत्रिय समाज सोलापूर, अमृत महोत्सवी वर्ष स्मरणिका, २००६.

५. सिध्दचेतन स्मरणिका, २००७, गडिनाड कन्नड साहित्य संमेलन, सोलापूर.

६. सीमांत, (दिवाळी अंक), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, २००८.

७. सुवर्ण महोत्सवी स्मरणिका (१९६०-२०१०), निलगार ज्ञाती संस्था, सोलापूर, २००९.

८. सोलापूर महोत्सव स्मरणिका, २०१०, जगदीश पाटील, जिल्हाधिकारी, सोलापूर.

९. वैभवशाली वारकरी परंपरा, स्मरणिका, अखिल भारतीय वारकरी सांप्रदाय, सोलापूर, २०१०.

१०. संशोधनाची वाटचाल, स्मरणिका, दयानंद कॉलेज, सोलापूर, डिसेंबर २०१०.

११. पद्मशाली ज्ञाती संस्था, ५९ वा अहवाल, सोलापूर, २०१०-२०११.

१२. श्री निलकंठेश्वर मल्लिकार्जून देवस्थान, ६९ वा वार्षिक अहवाल, सोलापूर, २०१२.

१३. जिव्हेश्वर जन्मोत्सव व नाम सप्ताह कार्यक्रम पत्रिका, श्री स्वकुळ साळी (विणकर) समाज, सोलापूर, २०१३.

१४. श्री बृहन्मठ होटगी संस्था, श्री वीरतपस्वी विशेषांक, (संपा.), रोडगीकर रेवणसिध्द, सोलापूर. (प्रकाशनकाळ नाही)

१५. श्री दत्त गुरूनाथ लहरी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, (संपा.), सुनिल शिणखेडे, सोलापूर. (प्रकाशनकाळ नाही)

४) साप्ताहिक व दैनिक

१. कल्पतरू, सोलापूर, (साप्ताहिक १३ डिसें. १८६८ व दैनिक ५ फेब्रु. १९५५)

२. सोलापूर समाचार, सोलापूर, (१८८८-१९७८)

३. दैनिक सकाळ, सोलापूर, (२००९-२०१४)

४. दैनिक संचार, सोलापूर, (२००९-२०१४)

५. दैनिक लोकमत, सोलापूर, (२००९-२०१४)

६. दैनिक तरूण भारत, सोलापूर, (२००९-२०१४)

७. दैनिक पुढारी, सोलापूर, (२०१०-२०१४)

८. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, (२०१२-२१४)

५) संकेतस्थळ

१. http://www.solapuruni.com 20/01/2009

२. http://www.solapurcorporation.com 11/09/2010

३. http://www.marathi-vishwakosh.com 3/10/2013

८) कोश वाङ्मय

१. कँडी आणि मोल्सवर्थ, मराठी-इंग्रजी शब्दकोश, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, १९७५.

२. कानडे मु. श्री., संत साहित्य संदर्भकोश, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९५.

३. कातगडे पुंडलीकजी, (संपा), मराठी - कन्नड शब्दकोश, म. रा. सा. आणि सं. मंडळ मुंबई, १९६९.

४. कुलकर्णी कृ. पां., मराठी उत्पत्तीकोश, के. बी. ढवळे, प्रथमावृत्ती, १९४६.

५. गर्गे स. मा., (संपा), भारतीय समाज विज्ञानकोश, समाजविज्ञान मंडळ पुणे, खंड - ३, (१९८९), खंड - ५, (१९९१),

६. जोशी पं. म., भारतीय संस्कृतीकोश, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, खंड - ४, ६, ७, ९, १० .

७. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संशोधन मंडळ, मुंबई.

८. जोशी रमाबाई व जोशी पु. दी., (संपा), तमिळ - मराठी शब्दकोश, म. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, १९७६.

९. दि न्यू इन सायक्लोपेडिया ब्रिटानिका, इन्डेक्स एल. झेड, १५ वी आवृत्ती.

१०. दिक्षित दूर्गा, डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोश, डायमंड प्रकाशन पुणे, २००९.

११. प्रभूदेसाई प्र. कृ., (संपा.), देवीकोश, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे २००५.

१२. बनहट्टी, धर्माधिकारी, (संपा.), सुगम मराठी शब्दकोश, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८८.

१३. मोगलेवार सुधाकर, वीरशैवकोश, खंड-१, अखिल भारतीय वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, २००१.

१४. राजाध्यक्ष विजया, मराठी वाड.मयकोश, खंड-४, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

१५. शहा सुमतीबाई (संपा.), पुर्णाध्य, जैन ज्ञानकोश, श्राविका संस्था, सोलापूर, १९९९.

परिशिष्टांची यादी

अ. क्र	परिशिष्टांचे शीर्षक	पृष्ठ क्र
१.	जिल्ह्यातील कोरीव लेखातील काही स्थळांची जुनी नांवे व सध्याची प्रचलित नांवे	३२४
२.	किल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारावरील अदिलशाहीकालीन शिलालेख	३२५
३.	शहरातील विविध धार्मिक स्थळांमधील लेख	३२६
४.	अली आदिलशाह (पहिला) याचा हनुमान बुरूजावरील लेख	३२७
५.	३१ मार्च १९२१ मधील नगरपालिका शाळेतील जात व धर्मवार विद्यार्थी	३२९
६.	श्री सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांची यादी	३३०
७.	श्री सिध्देश्वर यात्रेतील धार्मिक विधी सोहळा	३३३
८.	वंशावळ, समस्त ग्रामजोशी व हिवटदार पुजारी श्री जुने विठ्ठल मंदिर सोलापूर	३३५
९.	श्री जुने विठ्ठल मंदिर समितीकडे असलेले मूर्तीची आभुषणे, पोषाख व साहित्य	३३६
१०.	सिध्दरामेश्वराच्या प्रतिमेचे १९०१ मधील पोस्टकार्ड	३३८
११.	सोलापूर शहरातील मशिदींची यादी	३३९
१२.	सोलापूर शहरातील दिंड्यांची यादी	३४०
१३.	शहरातील महिला भजनी मंडळांची यादी	३४४
१४.	प्रश्नावली	३४५

परिशिष्टे

परिशिष्ट क्र. १

जिल्ह्यातील कोरीव लेखातील काही स्थळांची जुनी नांवे व सध्याची प्रचलित नांवे

मूळ स्थळनाम	प्रचलित नाव
अंकुलिगे	अंकलगी, ता. दक्षिण सोलापूर
कुंबरिगावे	कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर
गुंजयगावे	गुंजेगांव, ता. दक्षिण सोलापूर
चिट्टयन करंजिगे	करजगी (निलगार) ता.अक्कलकोट
धाकुटी कंमती	कामती (खुर्द), ता. मोहोळ
कम्मतिगे	कामती (खुर्द), ता. मोहोळ
पांडरीपूर	पंढरपूर
षंडरंगे	पंढरपूर
भंडारगबिट्टगे	भंडारकवठे, ता. दक्षिण सोलापूर
मारूढिगे	मार्डी, ता. उत्तर सोलापूर
मंदुब्बे	मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर
मंदुब्बे	मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर
लंपगी	लवंगी, ता. दक्षिण सोलापूर
वंगिगे	वांगी, ता. दक्षिण सोलापूर
***सोन्नलिगे**	**सोलापूर**
***सोनलिपूर**	**सोलापूर**
***संदलपूर**	**सोलापूर**
सामंतन धुदनिगे	सातन दुधनी, ता. अक्कलकोट
होट्टिगे	हुटगी, ता. दक्षिण सोलापूर
भीमरथी	भीमा नदी
सिन्ने	सीना नदी

(संदर्भः संशोधक, जून, २००४, आनंद कुंभार यांच्या लेखावरून)

परिशिष्ट क्र. २

किल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारावरील अदिलशाहीकालीन शिलालेख



(सौजन्यः जयजित पटवा, छायाचित्रकार, सोलापूर)

परिशिष्ठ क्र. ३

शहरातील विविध धार्मिक स्थळांमधील लेख

१. श्री कुठार सोमेश्वरलिंगाच्या चौथऱ्यावरील लेख, रेवणसिध्देश्वर मंदिर.

२. जुने विठ्ठल मंदिरातील फरशीवरील लेख (१८५५), कमानीवरील लेख (१९२१), छोट्या गणपती मंदिरावरील लेख (१९४३), गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावरील लेख, सभा मंडपातील खांबावरील लेख (२०१३).

३. चौपाड विठ्ठल मंदिरातील ज्ञानेश्वर मूर्तीच्या चौथऱ्यावरील लेख.

४. क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर प्रवेशद्वारावरील लेख (शके १८३४).

५. श्री बालाजी मंदिर, चौपाड, प्रवेशद्वारावरील व पद्मावती मंदिरावरील लेख.

६. जामा मशिदीतील शिलालेख.

७. श्री माणिकस्वामी महाराज दिगंबर जैन मंदिर प्रवेशद्वारावरील लेख.

८. आदिनाथ जैन मंदिराच्या गर्भगृहावरील व भुयारी मंदिरावरील लेख.

९. श्री. भ. १०००८ बाहुबली भगवार दिगंबर जैन मंदिरातील भिंतीवरील लेख.

१०. जुने श्रीराम मंदिर प्रवेशद्वारावरील लेख.

११. नवी पेठ श्रीराम मंदिर प्रवेशद्वारावरील लेख.

१२. दक्षिण सदर बझार श्रीराम मंदिर प्रवेशद्वारावरील लेख.

१३. दक्षिण सदर बझार दत्त मंदिरातील चौथऱ्यावरील लेख.

१४. श्री दत्त मंदिर, चौपाड, प्रवेशद्वारावरील लेख.

१५. खंडोबा मंदिर, साखर पेठ, फरशीवरील लेख.

१६. रूपा भवानी मंदिर गर्भगृहाच्या भिंतीवरील लेख.

परिशिष्ट क्र. ४

लेख क्रमांक ६

अली आदिलशाह (पहिला) याचा हनुमान बुरूजावरील लेख

- **प्राप्तिस्थळ**

सोलापूरच्या भूईकोट किल्ल्याला अनेक बुरूज आहेत. बालेकिल्ल्यात दक्षिण दिशेस एक सर्वांत उंच बुरूज आहे, त्यास हनुमान बुरूज म्हणतात. या उंच बुरूजावर २६ जानेवारी व १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय ध्वज फडकावून त्यास वंदन केले जाते. बुरूजावर ज्या ठिकाणी ध्वजकाठी उभी असते त्याच्या जवळच खाली जमिनीवर फरशी घालतात त्या स्वरूपात हा लेख सापडला असून तो मुळचा पूर्वी कोठे होता व येथे कसा आला याची माहिती मिळत नाही.

- **वर्णन**

काळ्या शिळेवर कोरलेला हा एक द्वैभाषिक लेख आहे. येथे सध्या एका भाषेतील लेखाचा विचार केलेला आहे. त्याच्या एकंदर पाच ओळी आहेत. संपूर्ण शिळेची लांबी रूंदी ७५ x ७१ सें.मी. आहे. त्यात वरील निम्म्या भागातील लेखाची व्याप्ती ५१ सें.मी. जागेत झाली आहे. अक्षरांची उंची ४-५ सें.मी. असून ते सुबक आणि सुंदर दिसतात.

- **लिपी व भाषा**

लेख अपसव्य पध्दतीने कोरला असून, तो फारसी पद्यमय भाषेत आहे. अक्षरे नश्क पध्दतीचे आहेत.

- **कालनिश्चिती**

विजापूरच्या आदिलशाही राजघराण्यातील सुलतान अली (पहिला) याचा उल्लेख त्याच्या एक अधिकाऱ्यासह यात आलेला आहे. अली (पहिला) याची कारकीर्द इ. स. १५५८-८० या काळात होती. यावरून आणि सोलापूरात आढळलेला याच अलीचा व उपरोक्त त्याच्या अधिकाऱ्याचा उल्लेख असलेला एक शिलालेख (शिलालेख क्रमांक २) इ. स. १५७०-७१ मधील आहे. या

आधीचा त्याचा एकही लेख येथे अद्यापी सापडलेला नाही. त्यावरून प्रस्तुत लेख इ. स. १५७० ते १५८० दरम्यान म्हणजे अलीची कारकीर्द संपेपर्यंतच्या दरम्यानच्या कालखंडातील आहे.

- **व्यक्तिनामे / स्थळनामे**

प्रस्तुत लेखात अली आदिलशाह (प्रथम) व नायब गैबत बाबाजी जाबितखान अशी दोन व्यक्तिनामे आली असून स्थळनामामध्ये सोलापूरचा निर्देश शोलापूर असे करण्यात आले आहे.

- **आशय**

अली आदिलशाहनी किल्ला बांधण्यासाठी नायब गैबत बाबाजी जाबितखानाची नेमणूक केल्याची नोंद या लेखातून मिळते. सोलापूरचा किल्ला यापूर्वीच बांधून तयार असल्याचे एका कैफियतीवरून समजून आले आहे. त्यामुळे या लेखात अली आदिलशाह हा जाबितखानाची नेमणूक किल्ला बांधण्यासाठी करतो याचा अर्थ इतकाच की, सुलतान किल्ल्यातच काही इमारती किंवा बदल करून पुनर्बांधणी करण्याकडे त्याची नेमणूक केली असावी.

- **वाचन**

१.	अली आदिलशाह अलसुलतान	हिसारी शोलापूर पनहाइ सुबहान
२.	नायब गैबत बाबाजी जाबितखान	दौरे आदिलशाह कर्द ईन निशान
३.	खललस्त परवरदिगार बदॉ	इलाही करमखीश हैरतकुनान
४.	हर आँकस के आज हिंदु मुसलमान	पए दुआ बखैरीश मारा बखोन
५.	इलाही अताकुन तू इशाँ गुलिस्तान	के इनरा बख्शाहंद बा दिन व जान

(संदर्भ: संशोधक, मार्च, २००६, आनंद कुंभार यांच्या लेखावरून)

परिशिष्ट क्र. ५

सोलापूर नगरपालिका शाळेतील जात व धर्मवार विद्यार्थी (३१ मार्च १९२१)

Caste	on 31st March 1920			on 31st March 1921		
	Boys	**Girls**	**Total**	**Boys**	**Girls**	**Total**
Brahmins	533	327	860	526	350	876
Jains	45	11	56	38	07	45
Lingayats	209	137	346	261	202	463
Depressed Classes	109	41	150	137	41	178
Other Advanced Hindus	906	433	1339	566	280	846
Backward Hindus				589	221	810
Mahomedans	638	325	963	760	348	1108
Parsis	03	06	09	00	03	03
Jews	00	00	00	01	01	02
Native Christans	03	00	03	11	01	12
Criminal Tribes	00	00	00	09	02	11
Total :-	**2446**	**1280**	**3726**	**2898**	**1456**	**4354**

(संदर्भः सेन्सेस ऑफ इंडिया, १९६१, सेन्सेस हॅन्डबुक सोलापूर, फाईल नं. ४००१६)

परिशिष्ट क्र. ६

श्री सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेली ६८ लिंगे

अ. क्र.	लिंगाची नांवे	स्थाने
१)	श्री अमृत लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
२)	श्री पापेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
३)	श्री पोपेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
४)	श्री संगमेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
५)	श्री परमेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
६)	श्री योगीनाथ लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
७)	श्री वज्रेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
८)	श्री ओंकारेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
९)	श्री आहेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
१०)	श्री माहेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
११)	श्री अकलेश्वर लिंग	श्री सिध्देश्वर देवालयाच्या आवारात
१२)	श्री उमेश्वर लिंग	संमती कट्टा
१३)	श्री शिखरेश्वर लिंग	महाद्वार
१४)	श्री आदिलिंगेश्वर लिंग	महाद्वार
१५)	श्री नंदिकेश्वर लिंग	महाद्वार
१६)	श्री आलेश्वर लिंग	महाद्वार
१७)	श्री तेलेश्वर लिंग	नॉर्थकोट हायस्कूलजवळ
१८)	श्री विश्वेश्वर लिंग	डफरीन हॉस्पिटलजवळ
१९)	श्री ब्रम्हेश्वर लिंग	पारशी बंगला, रेल्वे लाईन
२०)	श्री कोपेश्वर लिंग	हेड पोस्ट ऑफिसजवळ
२१)	श्री अडकेश्वर लिंग	रेल्वे स्टेशनजवळ
२२)	श्री त्रिपुरेश्वर लिंग	रेल्वे स्टेशनजवळ

२३)	श्री आनंदेश्वर लिंग	जुन्या मिल आवारात
२४)	श्री हावगेश्वर लिंग	मुरारजी पेठ, माणिक मिल
२५)	श्री रामेश्वर लिंग	मुरारजी पेठ, माणिक मिल
२६)	श्री नागेश्वर लिंग	मुरारजी पेठ, माणिक मिल
२७)	श्री रामभद्रेश्वर लिंग	मुरारजी पेठ, माणिक मिल
२८)	श्री होमेश्वर लिंग	जुनी गिरणी चाळजवळ
२९)	श्री जगेश्वर लिंग	चक्रदेव मळा
३०)	श्री अनंतनामेश्वर लिंग	भोगडे वस्ती कॅनॉल
३१)	श्री पाशुपतीय लिंग	देशमुख मळा, गणेश नगर
३२)	श्री शतकेश्वर लिंग	चंडक बगीचा , बाळीवेस
३३)	श्री यल्लेश्वर लिंग	तरटी नाक्याजवळ, बुधवार पेठ
३४)	श्री जंबुकेश्वर लिंग	मारूती मंदिराच्या (तळघरात)
३५)	श्री जबरेश्वर लिंग	मारूती मंदिर, बाळीवेस
३६)	श्री जगदेश्वर लिंग	मारूती मंदिर, बाळीवेस
३७)	श्री बंडेश्वर लिंग	सिध्देश्वर कापड मार्केट प. मं. पेठ
३८)	श्री भद्रेश्वर लिंग	सिध्देश्वर कापड मार्केट प. मं. पेठ
३९)	श्री शेळगी गणेश लिंग	साबळे, मं. का. पू. मं. पेठ
४०)	श्री कामेश्वर लिंग	साबळे, मं. का. पू. मं. पेठ
४१)	श्री शंकेश्वर लिंग	वारद मठासमोर, पू. मं. पेठ
४२)	श्री पंचमुखी लिंग	वारद मठासमोर, पू. मं. पेठ
४३)	श्री अमोघेश्वर लिंग	साखरे वाडा, पू. मं. पेठ
४४)	श्री सोमेश्वर लिंग	मधला मारूती मंदिराजवळ
४५)	श्री अहिमुखीब्रम्हेश्वर लिंग	खारी बावडी, शुक्रवार पेठ
४६)	श्री ब्रम्हानादेश्वर लिंग	मारूती मंदिर, शुक्रवार पेठ
४७)	श्री अचलेश्वर लिंग	वैद्य वाडा, शुक्रवार पेठ

४८)	श्री चिन्हेश्वर लिंग	त्रिपुरांतकेश्वर मंदिर, शुक्रवार पेठ
४९)	श्री त्रिपुरांतकेश्वर लिंग	त्रिपुरांतकेश्वर मंदिर, शुक्रवार पेठ
५०)	श्री सर्वेश्वर लिंग	पंचकट्टा
५१)	श्री उमामहेश्वर लिंग	कलेक्टर बंगला
५२)	श्री नवणेश्वर लिंग	गुरूभेट (कलेक्टर बंगल्यजवळ)
५३)	श्री सिध्दवंती लिंग	होमकट्टा
५४)	श्री ज्योतीश्वर लिंग	होमकट्टा
५५)	श्री अकलेश्वर लिंग	पार्क मैदान
५६)	श्री गोमुखी लिंग	पार्क मैदान
५७)	श्री बालब्रम्हेश्वर लिंग	शमीवृक्षाजवळ, पार्क
५८)	श्री वज्रेश्वर लिंग	शमीवृक्षाजवळ, पार्क
५९)	श्री उमामहेश्वर लिंग	शमीवृक्षाजवळ, पार्क
६०)	श्री बालयोगीश्वर लिंग	शमीवृक्षाजवळ, पार्क
६१)	शमीश्वर लिंग	शमीवृक्षाजवळ, पार्क
६२)	श्री खयेश्वर लिंग	बारा बलुती, मुरारजी पेठ
६३)	श्री मोळगेश्वर लिंग	श्री काळम्मा मंदिर, उ. कसबा पेठ
६४)	श्री कुठारसोमेश लिंग	श्री रेवणसिध्देश्वर मंदिर, उ. कसबा पेठ
६५)	श्री मल्लिकार्जून लिंग	श्री मल्लिकार्जून मंदिरात
६६)	श्री आयलेश्वर लिंग	श्री मल्लिकार्जून मंदिरात
६७)	श्री आनंदेश्वर लिंग	श्री मल्लिकार्जून मंदिरात
६८)	श्री उमाक्षेत्रेश्वर लिंग	श्री मल्लिकार्जून मंदिरात

(संदर्भः सिध्देश्वर पंचकमिटी (संपा.), श्री सिध्देश्वर महात्म्य, सोलापूर, २००९)

परिशिष्ट क्र. ७

श्री सिध्देश्वर यात्रेतील धार्मिक विधी (१० ते १६ जानेवारी)


तारीख	विधी	स्थळ
१० जानेवारी	योगदंड पुजा	शेटे वाडा (शुक्रवार पेठ)
११ जानेवारी	सांज चढविणे	हिरेहब्बु वाडा (उत्तर कसबा)
१२ जानेवारी	यात्रेतील मिरवणुक सुरूवात	हिरेहब्बु वाडा (उत्तर कसबा)
	यात्रेतील पहिला विडा	सिध्देश्वर मंदिर (अमृत लिंग)
	६८ लिंगांना तैलाभिषेक	सिध्देश्वर मंदिरापासून
१३ जानेवारी	अक्षता सोहळा मिरवणुक	हिरेहब्बु वाडा (उत्तर कसबा)
	अक्षता सोहळा धार्मिक विधी	संमती कट्टा (सिध्देश्वर तलाव)
	अक्षता सोहळा सुगडी पुजा	संमती कट्टा (सिध्देश्वर तलाव)
	अक्षता सोहळा विडा	संमती कट्टा (सिध्देश्वर तलाव)
	अक्षता सोहळा संमती पुजा	संमती कट्टा (सिध्देश्वर तलाव)
	अक्षता सोहळा संमती वाचन	संमती कट्टा (सिध्देश्वर तलाव)
	विडा, अमृतलिंग पुजा	सिध्देश्वर मंदिर (अमृत लिंग)
	सिध्देश्वर मंदिर पूजा	सिध्देश्वर मंदिर (मुख्य गाभारा)
	६८ लिंग अभिषेक मिरवणुक	सिध्देश्वर मंदिरपासून
१४ जानेवारी	नंदीध्वज मिरवणुक	हिरेहब्बु वाडा
	योगदंड, नंदीध्वज स्नान	सिध्देश्वर तलाव
	गंगा पुजन	सिध्देश्वर तलाव
	होमदेवी पूजा (सतीवान	सिध्देश्वर मंदिर (अमृत लिंग)
	मानकऱ्यांना विडा	सिध्देश्वर तलाव
	नंदीध्वज मिरवणुक	हिरेहब्बु वाडा
	नंदीध्वजाला नागफणी बांधणे	जुनी फौजदार चावडी
	होम विधी	होम मैदान
	भाकणूक	सिध्देश्वर मंदिर (उतारा)

१५ जानेवारी	शोभेचे दारूकाम	होम मैदान
१६ जानेवारी	योगदंड पुजा	देशमुख वाडा (दक्षिण कसबा)
	नंदीध्वज कप्पडकळी (वस्त्र विसर्जन)	मल्लिकार्जून मंदिर

(संदर्भः दैनिक सकाळ १० जानेवारी २०१३)

परिशिष्ट क्र .८


वंशावळः समस्त ग्रामजोशी वहिवटदारपुजारी श्री जुने विठ्ठल मंदिर सोलापूर



(सौजन्यः किरण जोशी, पुजारी, जुने विठ्ठल मंदिर सोलापूर)

परिशिष्ट क्र .९

श्री जुने विठ्ठल मंदिर समितीकडे असलेले मूर्तीची आभुषणे, पोषाख व साहित्य




॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ यादीपुजेचीक सबेसोलापूरयेथील श्रीपांडुरंगदेवाचीपुजामीतीफा
॥ ल्गुणशुद्धपौर्णीमारोजसोमवारशके १६२६ तीर्थस्वरूपरामचंद्रकृष्ण
॥ जोशीयाजपासूनघेऊनरामचंद्रबालकृष्णजोशीयानेतीनमहीनेपु-
॥ जीलपुजाकरूनशके १६३७ राक्षसनामसंवत्सरेमीतीवैशाखवद्य १०
॥ दशमीरोजसोमवारतेदिवशीरंगनाथगुंडोपंतबाळेकरयांचेमा-
॥ फैतभंडभटवेणुसरकरजोशीयांसीदिलीयाबद्दल श्रीचेसामान

॥ वस्तुचनांव ॥ यातपशीलखालीलिहीलाप्रमाणें - ॥

१	श्रीचेपागोटें एक १	१	पीतळेचाझंगट एक .
१	शेलाजरीकाठी एक १	२	पितळेचातांब्याफुलपात्रनबक
१	रेशमीअंगरखा एक १	३	पितळीसमयामोठीलहानएक
२	धोतरजोडा .	१	समयाखालीलपितळेचेताटेएक
२	चिरड्यादोन .	१	पितळेचीतेलाचीझारीएक .
२	चोळ्यादोन .	१	पितळेचीपंचारतीएक .
१	खोल्यामोत्याचीनथएक .	२	तांब्याचेगंगाळवतांब्याचीकळसी
३	सोन्याचेमंगळसुत्रवमणी	१	तांब्याचीपाणीजाण्याचीतोंडी
१	श्रीचीपोवळ्यांचीकंठीएक	३	शंख सहानखोड एकूनतीन
२	प्रभावळीपीतळीदोन .	२	लोखंडी तिवयादोन २
१५	छत्र, चामर, पताका एकूना	१	थोरलाचौरंगप्रभावळीसह १
१	पीतळेच्याझांजावटाकसाव (एकून९)	१	लाकडीधाकटाचौरंग .



(सौजन्यः किरण जोशी, पुजारी, जुने विठ्ठल मंदिर सोलापूर)

परिशिष्ट क. १०

सिध्दरामेश्वराच्या प्रतिमेचे पोस्टकार्ड (१९०१)



सोलापूर : टपाल खात्याने १९०१ मध्ये सिद्धेश्वरांचे प्रतिमा असलेले कार्ड प्रकाशित केले.

(सौजन्य: विरेश अंगडी, वार्ताहर, दैनिक सकाळ, सोलापूर)

परिशिष्ट क्र. ११

सोलापूर शहरातील मशिदींची यादी

अ.क्र.	मशिदीचे नांव	ठिकाण
१.	काझी गल्लीची मशिद	कसबा, काझी गल्ली
२.	बाबा कादरी मशिद	कसबा पेठ
३.	दिनदार मशिद	सिध्देश्वर पेठ
४.	जिनतूल इस्लाम मशिद	जोडभावी पेठ
५.	बेरिया मशिद	गणेश पेठ
६.	बेगमबी मशिद	बेगम पेठ
७.	हाशमपीर मशिद	साखर पेठ
८.	नुरूद्दिन खादीर मशिद	मरगम पेठ
९.	विष्णु कॉटन मिल मशिद	रेल्वे ब्रिजजवळ (मरिआई चौक)
१०.	बकर खाटीकाची मशिद	मंगळवार पेठ
११.	मदिना मशिद	शुक्रवार पेठ
१२.	गुरूजपेठ मशिद	गुरूवार पेठ
१३.	बुखारिया मशिद	बाळीवेस
१४.	काझीची मशिद	लष्कर विभाग
१५.	मुनशीची मशिद	लष्कर विभाग
१६.	पलटणची मशिद	लष्कर विभाग
१७.	मोदी मशिद	मोदीखाना परिसर
१८.	बोहऱ्याची मशिद	मंगळवार पेठ

(संदर्भः जक्कल, सोलापूर शहराचा इतिहास, पृ. ४६-४८)

परिशिष्ट क्र. १२

सोलापूर शहरातील दिंड्यांची यादी

अ. क्र.	भजनी मंडळाचे नांव	वर्ष	संस्थापक	दिंडी प्रमुख	वीणेकरी
१.	श्री. सद्‌गुरू नाशिककर महाराज स्मारक मंदिर दिंडी सोहळा, चौपाड			ह.भ.प. श्रीहरि महाराज वैद्य नाशिककर	ह.भ.प. रामचंद्र शेटे
२.	श्री. ह.भ.प. बाजीआण्णा महाराज वारकरी सांप्रदायिक मठ (ट्रस्ट), पी.टी.आर. नंबर अ-५९७/६३, ९ उत्तर कसबा, शिवाजी चौक (पांजरापोळ), सोलापूर	१९१४	वै. ह.भ.प. सद्‌गुरू बाजीआण्णा महाराज	नामदेव देवकते महाराज	सिद्राम मारूती माने
३.	वडार समाज भजनी मंडळ	१९२०		ह.भ.प. रामदास इरकल	ह.भ.प. औदुंबर भांडेकर
४.	महर्षी मातंग ऋषी भजनी मंडळ, निराळे वस्ती, सोलापूर	१९२५		परशुराम केंदळे	राम हरिबुवा कांबळे
५.	विठ्ठल मंदिर भजनी मंडळ	१९२५		ह.भ.प. लक्ष्मण भगत	ह.भ.प. श्रावणकुमार जमादार
६.	श्रीराम भजनी मंडळ, देगांव	१९३४		ह.भ.प. शंकर जाधव	ह.भ.प. संतोष नवले
७.	कैकाडी समाज भजनी मंडळ	१९३५		ह.भ.प. किसन जाधव	ह.भ.प. नागेश माने
८.	श्री. हनुमान मंदिर भजनी मंडळ, लक्ष्मी चाळ, सोलापूर	१९३९	ह.भ.प. निवृत्ती दादा लोंढे	गोपाळ ज्ञानेश्वर लोंढे	शिवाजी सुरवस
९.	हनुमान भजनी मंडळ, सलगरवाडी, सोलापूर	१९४०	निवृत्ती भोसले, रामचंद्र शिंदे	ज्ञानेश्वर विश्वनाथ भागवत	नारायण निवृत्ती माने
१०.	श्री. नामदेव विठ्ठल	१९४५	श्री. सद्‌गुरू	ज्ञानेश्वर माऊली	विजयकुमार

	मंदिर ट्रस्ट, सोलापूर		विरनाथ मल्लिनाथ महाराज औसेकर	पतंगे	शेंडगे
११.	विठ्ठल मंदिर मातंग समाज भजनी मंडळ			ह.भ.प. नामदेव रणदिवे	ह.भ.प. चंद्रकांत लोखंडे
१२.	गुरूजी बुवा राशीनकर महाराज फड	१९५२		ह.भ.प. गणेश वारे	ह.भ.प. सोपान कर्देगळ्ळीकर
१३.	गुरूवर्य गुरूजीबुवा राशीनकर फड, पाणीवेस भजनी मंडळ	१९५२	ह.भ.प. दगडोबा घोडके, ह.भ.प. नरहरी पोळ	गणेश वारे	सोपान कर्देहळ्ळीकर
१४.	मार्कंडेय दिंडी संस्था, ८७-ब, न्यु पाच्छा पेठ, पद्मा नगर, सोलापूर	१९५४	ह.भ.प. श्री. पल्ली महाराज		ह.भ.प. काशिनाथ राजूल महाराज
१५.	श्रीराम मंदिर देवस्थान नामदेव शिंपी समाज	१९५४		ह.भ.प. मुकूंद सुत्रावे	ह.भ.प. विष्णुदास उंडाळे
१६.	दिगंबर महाराज भजनी मंडळ (कैकाडी समाज, सोलापूर)	१९५४	ह.भ.प. दिगंबर महाराज	ह.भ.प. विश्वास गायकवाड	ह.भ.प. विठ्ठल गायकवाड
१७.	वै. ह.भ.प. कृष्णप्पा महाराज दिंडी सोहळा	१९६०	कै. कृष्णप्पा महाराज कोंगारी	नंदु महाराज कोंगारी	चन्नप्पा विटकर
१८.	श्री. पंचमुखी हनुमान भजनी मंडळ ट्रस्ट, सोलापूर	१९६६	कै. जगन्नाथ बा. पुजारी	उमराव दादा वाघचवरे	शिवाजी शिंदे
१९.	श्री. निलकंठेश्वर वारकरी भजनी मंडळ	१९६७	कै. ह.भ.प. सायण्णा सिद्रामप्पा आडकी	ह.भ.प. सुदर्शन नारायण चरकुपल्ली	ह.भ.प. नारायण सायण्णा आडकी
२०.	सद्गुरू मामा दांडेकर मंडळ	१९६७	ह.भ.प. दिगंबर कवठे	ह.भ.प. रघुनाथ कवठे	ह.भ.प. तुकाराम कापसे
२१.	बाळ हनुमान भजनी मंडळ	१९६७	कै. महादेव महाराज शिंदे	ह.भ.प. ज्ञानेश्वर चव्हाण	ह.भ.प. पंडित ताटे
२२.	वै. ह.भ.प. बाबुराव सातारकर भजनी मंडळ, सोलापूर	१९६८		किसन बापु कापसे	हरिभाऊ जावळे
२३.	नामदेव मंदिर दिंडी सोहळा, बाळीवेस	१९६९	कै. दामोदर पतंगे व ज्ञानोबा पतंगे	ह.भ.प. नामदेव बाचल	ह.भ.प. प्रकाश शेंडगे
२४.	नव मध्यवर्ती वारकरी सांप्रदायिक संस्था	१९७४	नानासाहेब शेळके	माईसाहेब शेळके	महादेव दिंडोरी

२५.	नव मध्यवर्ती वारकरी सांप्रदायिक संस्था, सोलापूर	१९७४	नानासाहेब शेळके	माईसाहेब शेळके	महादेव महाराज गपाट
२६.	बाळ हनुमान भजनी मंडळ	१९७५	महादेव शिंदे महाराज	सुभाष शिंदे	तुकाराम देवकते
२७.	संत मुक्ताई भजनी मंडळ	१९८०	ह.भ.प. अनंत इंगळे महाराज	ह.भ.प. अनंत इंगळे महाराज	भगवान सुतार
२८.	माऊली भजनी मंडळ	१९८२	ह.भ.प. लक्ष्मण तात्या माने	ह.भ.प. लक्ष्मण तात्या माने	ह.भ.प. बाबुराव होरडे
२९.	रामकृष्ण हरी वारकरी सांप्रदाय	१९८४	वै. ह.भ.प. श्रीनिवास कंदी महाराज	रमेश शिवापूरकर	
३०.	हनुमान भजनी मंडळ, कोयना नगर	१९८७	कै. ज्ञानदेव गायकवाड	सुभद्राबाई गायकवाड	गुंडू वराडे
३१.	श्री. विठ्ठल मंदिर भजनी मंडळ, गवळी वस्ती	१९८९	सौदागर गोविंद जगताप, दिनानाथ बचुटे	सौदागर जगताप	नागनाथ सुरवसे
३२.	श्री. सद्गुरू गेनुबुवा संतसेवा भजनी मंडळ			दिलीप वाघमारे	तुकाराम रोकडे
३३.	ह.भ.प. श्री. हरिदास महाराज वि. शिंदे देहूकर फड प्रासादिक हरिदास महाराज सोलापूर दिंडी, १६१, मुरारजी पेठ, सोलापूर		हरिदास महाराज विठ्ठल शिंदे		
३४.	श्रीमद् गीता ज्ञानेश्वरी सेवा मंदिर, सोलापूर		गुरूवर्य दादासाहेब मोफरे	सिध्दव्वाअम्मा दादासाहेब मोफरे	राम जाधव
३५.	श्री. सद्गुरू मामा दांडेकर सेवा मंडळ, सोलापूर			रघुनाथ दिगंबर कवठे	तुकाराम गणपत कापसे
३६.	काकडे विठ्ठल मंदिर			ह.भ.प. ज्ञानदेव महाराज काकडे	देविदास गव्हाण
३७.	वै. धोंडोपंत भोसेकर इंचगिरी सांप्रदाय, सोलापूर				
३८.	मध्यवर्ती वारकरी सांप्रदायिक संस्था, सोलापूर		सावता बाबा जांभळे	निळोबा सावता जांभळे	चंदु लोकरे

३९.	विठ्ठल मंदिर भजनी मंडळ, बाळे, सोलापूर			बापु पाटील	लिंबराज तळखडे
४०.	श्रीराम मंदिर दिंडी सोहळा, सोलापूर		सद्‌गुरू विरनाथ मल्लिनाथ महाराज औसेकर	गजानन उंडाळे	विष्णु उंडाळे
४१.	श्री. विठ्ठल मंदिर मातंग समाज भजनी मंडळ, सोलापूर		परशुराम येताळा रणदिवे	नामदेव रणदिवे	नामदेव रणदिवे
४२.	वै. ह.भ.प. श्री. गुरू परशुराम मास्तर सेवाभावी दिंडी संस्था, सोलापूर		परशुराम (मास्तर) गोरे	शिवाजी जाधव	पांडुरंग (महेश) जाधव
४३.	जय हनुमान भजनी मंडळ, केगांव, सोलापूर	२००८		काशिनाथ दळवी	अरूण गुदगे

(संदर्भः वैभवशाली वारकरी परंपरा, स्मरणिका, सोलापूर, २०१०)

परिशिष्ट क्र. १३

शहरातील महिला भजनी मंडळे

अ. क्र.	महिला भजनी मंडळाचे नांव
१)	श्री. आसाराम बापु भजनी मंडळ, दत्त नगर, सोलापूर.
२)	श्री. ओम श्री. मल्लिनाथ महिला भजनी मंडळ, बाणेगांव
३)	श्री. उपासना महिला भजनी मंडळ
४)	श्री. कलावती महिला भजनी मंडळ
५)	श्री. गवळी वस्ती भजनी मंडळ
६)	श्री. जुने दत्त भजनी मंडळ
७)	श्री. दत्त माऊली भजनी मंडळ, विजापूर रोड, सोलापूर.
८)	श्री. दत्त मंदिर भजनी मंडळ
९)	श्री. दिगंबर भजनी मंडळ, लिमयेवाडी, सोलापूर
१०)	श्री. पाणीवेस भजनी मंडळ
११)	श्री. बाल हनुमान भजनी मंडळ, एन. जी. मिल चाळ, सोलापूर.
१२)	श्री. बाजी आण्णा भजनी मंडळ
१३)	श्री. मंगलमूर्ती महिला भजनी मंडळ
१४)	श्री. माऊली भजनी मंडळ, बुधवार पेठ, सोलापूर.
१५)	श्री. मारूती सेवा भजनी मंडळ, जानकी नगर, जुळे सोलापूर
१६)	श्री. यशश्री महिला भजनी मंडळ
१७)	श्री. रूक्मिणी भजनी मंडळ, मार्डी
१८)	श्री. श्रीकृष्णा महिला भजनी मंडळ
१९)	श्री. शिवानंद भजनी मंडळ, दमाणी नगर, सोलापूर.
२०)	श्री. शिवगणपती महिला भजनी मंडळ
२१)	श्री. शुभराय महिला भजनी मंडळ
२२)	श्री. सद्‌गुरू गेनुबुवा सार्वजनिक भजनी मंडळ, थोबडे वस्ती

(सौजन्यः शुभांगी बुवा, शुभराय मठ सोलापूर)

परिशिष्ट क्र. १४

प्रश्नावली

१. मुलाखत देणऱ्याचे पूर्ण नाव व पत्ता

२. मुलाखतीची दिनांक व वेळ

३. धार्मिक स्थळ हे कोणत्या धर्माचे / पंथाचे अथवा समाजाचे आहे.

४. हे धार्मिक स्थळ कोणत्या देवतेचे आहे? गर्भगृहातील मूर्तीचे स्वरुप कसे आहे?

५. धार्मिक स्थळ स्थापन करण्यामागचा उद्देश काय होता?

६. धार्मिक स्थळ कोणी व कोणाच्या काळात बांधले .

७. धार्मिक स्थळाच्या निर्माण करण्यामध्ये समाजातील कोणाकोणात्या व्यक्तींचे महत्वाचे योगदान राहिले आहे.

८. धार्मिक स्थळांचा जिर्णोद्धार कोणी व केंव्हा केला आहे, त्यासाठी समाजातील लोकांचे आर्थिक सहकार्य मिळाले का ?

९. धार्मिक स्थळाची एकूण जागा किती आहे?

१०. धार्मिक स्थळाचे व्यवस्थापन करण्यासाठी देवस्थान समिती आहे का ? या समितीचा कारभार कशा प्रकारे चालतो?

११. धार्मिक स्थळाची बांधकाम शैली कोणत्या प्रकारची आहे?

१२. धार्मिक स्थळात नित्यपूजाअर्चेसाठी पूजारी / जंगम / इमाम इत्यादींच्या नेमणूका कशाप्रकारे केल्या जातात? तसेच त्यांना दिल्या जाणाऱ्या मानधनाचे स्वरुप कसे आहे?

१३. नित्यपूजाअर्चेची पद्धती, नैवद्याचे स्वरुप, तसेच भकतांना दिलया जाणाऱ्या प्रसादाचे स्वरुप कसेआहे?

१४. धार्मिक स्थळाच्या माध्यमातून कोणकोणते वार्षिक उत्सव व सण साजरे होतात?

१५. या धार्मिक उत्सव व सणामध्ये कोणकोणत्या धर्मातील व प्रांतातील लोक सहभगी होतात?

१६. धार्मिक स्थळास सरकारी अनुदान मिळत होते काय? असल्यास ते कोणत्या प्रकारचे ? सध्या ते चालू आहे काय?

१७. या धार्मिक स्थळास मिळालेल्या देणग्यांचे स्वरुप कसे आहे?

१८. आजपर्यंत या धार्मिक स्थळास उत्सवप्रसंगी कोणकोणत्या सत्पूरुषांनी भेटी दिल्या आहेत?

१९. धार्मिक स्थळाच्या उत्सव प्रसंगी महिलांचा सहभाग आहे काय ?

२०. धार्मिक स्थळांच्या अनुशंगाने धर्मा-धर्मात संघर्ष घडून आले आहेत काय? संघर्ष घडून आले असल्यास त्याची कारणे.

२१. धार्मिक स्थळांच्या माध्यमातून सामाजिक कार्य केले जाते का? ते कशा स्वरुपात केले जाते काय?

२२. नैसर्गिक आपत्तीच्यावेळी धार्मिक स्थळांच्या माध्यमातून कोणत्या प्रकारचे सहाय्य केले जाते?